Ancestor (*-cedere*, to go) a forefather वडील, पूर्वज, पितर ; *pl*. वाडवडील *pl*, बापदादे *pl*; acquired by one's *ancestors* वडिलोपार्जित; through one's *ancestors* वडिलोवडलीं; to abuse one's *ancestors* सात -बेताळीस पिढ्या उद्धरणें.—Ancestral *a*. वडिलांचा, पैत्र ; descending from *ancestors* वडील परंपरागत.—Ancestry, lineage कुल -वृद्धपरंपरा *f*, पितर *pl*, वाडवडील *pl*; birth or honorable descent कुलीनता *f*, खानदानी *f*.

Anchor *n*. (*anchora*) an iron instrument for holding a ship or other vessel at rest in water नांगर, लंगर; that which gives stability धीर, आधार, आश्रय (Heb. vi. 19).—*v*. नांगरणें, नांगर टाकणें ;—for a season बंदर-ओरवा क.; fix or fasten बसविणें, जडविणें : to a. the cables of a suspension bridge. -age गलबतें नांगरण्याची जागा *f*, नांगरवाडा; duty imposed on a ship for anchoring in a harbor खुटवा. -ing नांगरणी *f*; mooring ओरवा.

Anchorite (*Gr. ana*, up, *choros*, place) a hermit वनवासी, तपस्वी, गोसावी ; Brahman of the third order वानप्रस्थ.

Ancient *a*. (*ante*, before) old जुना, पुरातन, प्राचीन (authors); of great age वयोवृद्ध, जुना, पुरातन (forest); known from ancient times जुना, प्राचीन -जुन्या काळा पासून ठाऊक असलेला : the a. continent.—*n*. *pl* very old men वृद्ध मनुष्यें ; *pl* governors, rulers, &c. अधिकारी, सत्ताधीश (Is. iii. 14); God is called the "Ancient of Days," पुराणपुरुष, from His eternal existence (Dan. vii. 9). -ly *ad*. जुन्याकाळीं, पूर्वी प्राचीनकाळीं.

AND *conj.* आणि, व; a. so forth इत्यादि, वगैरे.

ANECDOTE (*Gr. -didonai,* to give) an incident of private life कुळकट *n,* कुळकथा *f;* a particular or detached incident or fact of an interesting nature फुरडुकें *n,* चुटका.

ANEW* *ad.* (*a* and *new*) over again पुनः, पुनरपि; in a new form नव्यानें, पुनः : to create a.

ANGEL,* a messenger जासूद, दूत, चार; a spiritual being, employed by God to communicate His will to man दूत, दिव्यदूत, ईश्वराचा दूत (Heb. i. 14); an evil spirit दुष्टआत्मा, भूत *n* (Rev. ix. 11); a. of death (Hindu term) यमदूत; recording a. चित्रगुप्त. -IC, -AL, *a.* दुताचा, दुतासंबंधी.

ANGER (*angere,* to choke) a strong passion or emotion of the mind excited by a real or supposed injury to, or intent to injure, one's self or others राग, क्रोध, कोप; to vent a. upon -वर रागें भरणें.— *v.* enrage राग आणणें; smart खिजवणें, चिडवणें, खाजवणें.—ANGRY *a.* रागावलेला, क्रुद्ध, कोपायमान: God is a. with the wicked every day; to be a. रागें भरणें; to become a. रागावणें; showing anger रागीट, क्रोधाचा, क्रोधयुक्त (words); inflamed, as a sore खिजविलेला, विकोपास गेलेला; red लाल (hue); stimulated प्रदीप्त, चेतलेला (appetite).—ANGRILY *ad.* रागानें, रागें भरून.

ANGLE (*angulus,* a corner) कोपरा, कोन; fishing tackle गळ; *Geom.* कोन;—acute a. लघुको.; obtuse a. विशाळको.; right a. काटको.; rectilineal a. वक्ररेषाको.; contiguous a. समीपको.; external a. बाह्यको.; oblique a. लघुको.; vertical *angles* समोरासमोरचे कोन.—ANGULAR *a.* कोनाचा, सकोन.—ANGLE *v.* गळ टाकणें, गळानें मासे धरणें; use some bait गूळखोबरें दाखविणें.—*n.* गळ.—ANGLER गळकरी, गळानें मासे धरणारा.

ANGLICAN *a.* (*Angli,* the Angles, a German tribe) इंग्लंड देशाचा -संबंधी.—ANGLICIZE *v.* make English इंग्लिश लोकांच्या चाली वगैरेचें रूप देणें; render conformable to the English idiom इंग्लिश भाषेच्या चाली प्रमाणें रूप देणें -लिहिणें.—ANGLICISM इंग्लिश भाषेची शैली *f* -पद्धती *f.*

ANGUISH (See ANGER) extreme pain;—of body शरीरपीडा *f,* यातना *f;*—of mind मनस्ताप, मनोवेदना *f.*

ANIMADVERT *v.* (*animus,* mind, *advertere,* to turn to) मन लावणें, विचार क.; remark by way of criticism or censure गुणदोष दाखवून बोलणें, दोष ठेवून -काढून बोलणें, बोल लावणें [upon]. —ANIMADVERSION, बोल, दोषारोपक भाषण *n.*

ANIMAL (*anima,* breath; *Skr. an,* to breathe; *anil,* wind) an organized living being endowed with sensation and the power of voluntary motion सदेह प्राणी, प्राणी, शरीरी, जीव; an irrational being हैवान, पशु; a rational a. सुबुद्ध प्राणी.—*a.* प्राण्यासंबंधी, जीवसंबंधी, जीव (in comp.); consisting of the flesh of animals मांसाचा, मांस in comp. (food). -CULE लहान प्राणी, जीवजंतु, क्षुद्रजंतु. -CULAR *a.* क्षुद्रजंतुसंबंधी.—ANIMATE *v.* give natural life to -ला जीव देणें, सजीव -सचेतन क.: the soul *animates* the body; heighten the powers or effects of -स रंग जीव आणणें (a lyre); give spirit चेव आणणें, उचल -उठावणी क., प्रोत्साहन क. [with, by].—*a.* सजीव, सचेतन; उत्तेजित; रसिक.—ANIMATION सजीव क. *n;* उचल *f,* उठावणी *f,* उत्तेजन *n;* पाणी *n,* तेज *n,* जीव; रंग, उत्साह. —ANIMOSITY, active enmity वैर *n,* अतिशत्रुत्व *n,* द्वेष, अदावत *f.*

ANISE (*anisum*) शेपू *f,* बडीशेप *f.*

ANKLE* (पायाचें) मणगट *n*, गोंफा. -BONE पायाचा डोळा, घोटा, खुबा.

ANNALS *n. pl* (*annus*, year) दरवर्षाचा-प्रतिवार्षिक इतिहास -वृत्तांत; relation of events in chronological order कालानुक्रमाप्रमाणें इतिहास; periodical publication, containing records of discoveries &c. विद्येसंबंधी शोधाचें वगैरे नियमित काळीं निघणारें पुस्तक *n*.

ANNATS *pl* (*annus*, year) प्रथम फल *n*, नवधान्य *n*.

ANNEAL * *v*. heat in order to fix colors रंग स्थिर करण्यासाठीं (कांच वगैरे) तापविणें; temper glass कांच नरम क.

ANNEX *v*. (-*nectere*, to tie) connect जोडणें; unite at the end शेवटास जोडणें, दुमाल्यास लावणें; add as a smaller thing to a greater मोठ्या वस्तूस लहान वस्तु जोडणें, सामील क., मिळवणें: to a. a province to a kingdom; connect जोडणें: to a. a penalty to a prohibition. -ATION जोडणें *n*, संयोग; नवीन देश -प्रांत (स्वराज्यास) जोडणें *n*, खालसा क. *n*.

ANNIHILATE *v*. (-*nihilum*, nothing) reduce to nothing नाहींसा क., लय क.; destroy the form or peculiar distinctive properties of नाश -उच्छेद -भंग क.: to a. a forest.—ANNIHILATION क्षय, लय; नाश, विध्वंस, भंग, फन्ना.

ANNIVERSARY (*annus*, year, *versum*, to turn) a day celebrated as it returns each year वर्षाचा दिवस, प्रतिवार्षिक दिवस, वर्षी *f*; a. of a birth वाढदिवस;—of a death मृततिथि *f*, वर्षी *f*;—of the incarnation of a Hindu deity जयंति *f*; the act of celebration वाढदिवस पाळणें *n*, जयंतीचा उत्साह.—*a*. प्रतिवर्षाचा, प्रतिवार्षिक (a feast).

ANNOTATE *v. i*. (-*nota*, mark) make marks टिपण -विवरण क.; comment टीका -भाष्य क. [upon].—ANNOTATION टीका *f*, भाष्य *n*; टिपण *n*, विवरण *n*.—ANNOTATOR टीकाकार, भाष्यकार.

ANNOUNCE *v*. (-*nunciare*, to report) publish जाहीर -प्रसिद्ध -विदित क.: the birth of the Lord Jesus Christ was *announced* by an angel; declare by judicial sentence न्यायाचा ठराव जाहीर क. [to]. -MENT खबर देणें *n*, निवेदन *n*, घोषणा *f*; advertisement जाहिरात *f*; publication प्रसिद्धि *f*.

ANNUNCIATE, See ANNOUNCE.—ANNUNCIATION,— of the Virgin Mary कुमारी मरया हिला निरोप आल्याचा दिवस.

ANNOY *v*. (-*nocere*, to hurt) त्रास -उपद्रव -तसदी देणें, छळणें [by]. -ANCE इजा *f*, तसदियां *f*, नड *f*, त्रास, उपद्रव.

ANNUAL *a*. (*annus*, year) coming yearly वार्षिक, सालाबाद, दरसाल (a feast); lasting only one year एक वर्ष मात्र वांचणारा, एकवर्षजीवी (a plant); performed in a year एक वर्षांत केलेला -करावयाचा -होणारा, वार्षिक (the motion of the earth).—*n*. a small book published yearly वार्षिक पुस्तक *n*; a plant that lives but one summer एक वर्ष वांचणारें झाड *n*. -LY *ad*. वर्षाचे वर्षास, दरसाल, सालोसाल, प्रतिवर्षी.—ANNUITY, a sum of money, payable yearly, to continue for a given number of years, for life, or for ever, साल *n*, वर्षासन *n*, वार्षिक वेतन *n*, तहहयात वर्षासन *n*. [Governments often borrow money upon annuities; that is, for a certain sum advanced on loan, the government contracts to pay the lender a specific sum, for life, or for a term of years.]

ANNUL (-*nullus*, none), See ABROGATE.

ANNULAR *a*. (*annulus*, ring) वाळ्याच्या -कड्याच्या आकाराचा, वलयाकार, कंकणाकृती.

ANNUNCIATE, See under ANNOUNCE.

ANODYNE (*Gr*. -*odune*, pain) दुःख कमी करणारें औषध *n*, दुःख उपशामक औषध *n*.

ANOINT *v.* (*-ungere*) pour oil upon -वर तेल ओतणें; smear over with oil or unctuous substances चोपडणें, माखणें, तैलाभ्यंग क.; daub लेथडणें, भरवणें, चोपडणें (John ix. 6); consecrate, esp. a king, priest, or prophet by unction, or the use of oil तैलाभिषेक क.; — the eyes अंजन घालणें [with]. -ED माखलेला, चोपडलेला, अनुलिप्त; अभिषेक केलेला, अभिषिक्त: our blessed Lord Himself, who united in his own person the threefold character of king, priest, and prophet, was distinguished by the name of the Messiah, which, in the Hebrew language (*Gr. Christos*), signifies *the anointed.*

ANOMALY (*Gr. -homalos*, even) deviation from the common rule अनियम, व्यभिचार: *oxen*, the plural of *ox*, is an a. in grammar.— ANOMALOUS *a.* नियमविरुद्ध, असंप्रदायी, विलक्षण, विधिभंजक.

ANON* *ad.* quickly लागलाच, लवकर, तत्क्षणीं; again पुनः, अणखी; ever and a. वरचेवर, नेहमीं.

ANONYMOUS *a.* (*Gr. -onoma*, name) बिननांवाचा, निनांवी, अनामक (a pamphlet, petition).

ANOTHER *a.* (*an* and *other*) not the same दुसरा, निराळा, वेगळा, अन्य, इतर, अंतर; (in comp. भाषांतर); one more अणखी एक: grant one request, they will ask a.; any other दुसरा कोणी, अणीक: let a. man praise thee, and not thy own mouth.

ANSWER* *v.* speak in return to परतून-उलटून बोलणें; respond to उत्तर-जाब देणें; satisfy पुरवणें, निर्वाह क.: money *answereth* all things; refute उत्तर देणें, उत्तर देऊन खंडण क. (a pamphlet); act in return उलटून -परतून क.,-देणें, प्रतिकार क.: the enemy *answered* our fire; to, bear a due proportion to, प्रमाणानें असणें, -होणें, बेतास उतरणें: the success does not a. our expectation.— *i.* उत्तर-जाब देणें -क.: there is none to a.; be accountable जाब-हिशेब देणें: we cannot a. to God for our sins; for, vindicate दोष उडवणें: a man cannot a. for his friend; solve, as a proposition in mathematics उलगडणें; to, suit with जुळणें, गांठ पडणें (Prov. xxvii. 19); echo प्रतिध्वनि होणें, -उठणें: the voice seems to fly away, and a. at a great distance; stand as opposite or correlative बरोबरीचा असणें: allegiance in the subject *answers* to protection on the part of the prince; effect the object intended लागू पडणें, कामीं पडणें: gypsum *answers* as a manure on a dry soil; to a. to a call ओ -हजीर म्हणणें;—back saucily उलटी -फेर गोष्ट सांगणें.—*n.* उत्तर *n*, जाब; प्रतिउत्तर *n*, उलटजबाब; दोषखंडन *n*; पडसाद, प्रतिध्वनि; उलगडा, किल्ली *f*, उत्तर *n*. -ABLE *a.* उत्तर देण्याजोगा; मोसबेदार, धनी; जुळण्याजोगा, जमण्याजोगा, योग्य, अनुसारी. See the verb.

ANT * मुंगी *f*; black a. मुंगळा, मुंगळी *f*; red a. चांचड *n*; white a. वाळवी *f*, उधई *f*; swarm of ants हुरण *n*; train of वऱ्हाड *n*, सांईर *f*.

ANTAGONIST *n.* & *a.* (*Gr. -agonistes*, combatant) विरोधी, प्रतिपक्षी; [*Anat.* a muscle which acts in opposition to another].

ANTARCTIC *a.* (*Gr. -arctos*, bear) दक्षिण ध्रुवाकडचा -संबंधी; a. circle दक्षिण ध्रुववृत्त *n.*

ANTE *prep.* (*L.*) पूर्वी, मागें, अगोदर.

ANTECEDENT (*-cedere*, to go) मागला -पूर्वीची गोष्ट *f* -ला -चा विषय; *Gram.* the noun to which a relative refers तत्पद *n*, वाच्य *n*; *Logic*, the first of two propositions in an enthymeme प्रतिज्ञावाक्य *n*; *Math.* the first of two terms of a ratio प्रमाणांतलें पहिलें पद *n*, अग्रपद *n*; the *antecedents* of a person or matter पूर्ववृत्तांत -वृत्त *n*,

प्राक्संबंध.—*a.* पूर्वीचा, मागला, अग्रगामी; प्राक्संबंधी.

ANTECHAMBER दिवाणखान्यांत जाण्याची खोली *f*, सदरेची खोली *f*, पशदालन *n.*

ANTEDATE *v.*(*ante* and *date*) date before the real time खऱ्या मितीच्या अगोदर तारीख घालणें.—*n.* पूर्वीची तारीख *f.*

ANTEDILUVIAN (-*diluvium*, deluge) one who lived before the Flood जलप्रलया पूर्वीचा रहिवाशी.—*a.* जलप्रलया पूर्वीचा; in Noah's time नोहाच्या वेळचा.

ANTELOPE हरण, मृग; black a. काळवीट.

ANTEMETIC *a.* (*anti* and *emetic*) उलटी बंद-करणारा, वांतिशमक.—*n.* वांतिशमक औषध *n.*

ANTENNÆ *pl* (*L.*) the feelers of an insect किड्याच्या मिशा *f pl*, -चे तंतू *pl*, -ची सोंड *f.*

ANTEPENULT (-*pæne*, almost, *ultimus*, last) शब्दाच्या शेवटील दोन वर्ण सोडून जो वर्ण तो, उपांत्यवर्णापूर्वीचा वर्ण. -IMATE *a.* उपांत्यवर्णापूर्वीचा.

ANTERIOR *a.* (*L.*) before in time पूर्वीचा, अगोदरचा; in front पुढला, अग्रवर्त्ती [to].

ANTHEM (*Gr.* -*thonè*, sound).

ANTHER (*Gr. anthos*, a flower) the tip of the stamen in a flower फुलांतील केसरावरची गोळी *f*, परागकोश.—ANTHOLOGY, discourse on flowers फुलांवर व्याख्यान *n*, पुष्पविद्या *f*; collection of flowers पुष्पसंग्रह; a garland पुष्पहार; a collection of beautiful passages from authors ग्रंथांतील सुंदर वेंच्यांचा गुच्छ.

ANTHROPOPATHY (*Gr. anthropos*, man, *pathos*, suffering) ascription of human passions to the Supreme Being मनुष्याचे विकार देवास लावणें *n* -वर आरोपणें *n.*

ANTHROPOPHAGI *pl* (*Gr.* -*phagein*, to eat) मनुष्यभक्षक, नरभक्षक. — ANTHROPOPHAGY नरभक्षण *n.*

ANTIC *a.* (*antiquus*) मस्करीचा, थट्टेचा, माकड-चेष्टेचा.—*n.* a buffoon मस्कऱ्या, भंड; चाळे *pl.*

ANTICHRIST (*Gr. anti*, against, *Christ*) a great adversary of Christ ख्रीस्तविरोधी. See 1 John ii. 18; 2 Thess. ii.

ANTICIPATE *v.* (-*capere*, to take) take before the proper time वेळे अगोदर घेणें, अगाऊ घेणें, अपकर्षण क.; take before another अवली -अघाडी साधणें, -मारणें; foretaste पूर्वभोग -पूर्वानुभव घेणें; have a previous impression of होऱ्यांत -धारणांत -लक्षांत येणें, अगा असणें: to a. the evils of.—ANTICIPATION अपकर्षण *n*, अप्राप्तकालग्रहण *n*; अवली *f*, अगपाई *f*: the a. of the joys of heaven; अगा *f*, होरा.

ANTI-CLIMAX (*anti* and *climax*) a sentence in which the ideas fall or become less important and striking at the close सारालंकार विपक्ष:

> And thou, Dalhousie, thou great god of war,
> Lieutenant-colonel to the Earl of Mar.

ANTIDOTE (*Gr. anti*, against, *didonai*, to give) remedy against poison विषावरचें औषध *n*, प्रतिविष *n*, विषभंजक *n*, जेहरमोहरा; whatever tends to prevent mischievous effect वस्ताद, धगड, गोहा.

ANTIMONY (*Gr.* -*monos*, alone) सुरम्याचा धातु; sulphuret of a. खरा सुरमा.

ANTINOMY (*Gr.* -*nomos*, law) a contradiction between two laws दोन नियमांत परस्पर विरोध; a law or other thing opposite विरुद्ध नेम.—[ANTINOMIAN, one of a sect who were charged with maintaining that, under the Gospel dispensation, the moral law is of no use or obligation.]

ANTIPATHY (*Gr.* -*pathos*, suffering) स्वाभाविक द्वेष, वैर *n*, विषमभाव; contrariety in the properties of matter वैगुण्य *n.*

ANTIPHRASIS (*Gr.* -*phrasis*, way of speaking) the use of words in a sense opposite to their proper meaning विपरीत लक्षणा *f*; as when a court of justice is called a *court of vengeance.*

ANTIPODES *pl* (*Gr.* -*podos*, foot) the people who live on the opposite side of the globe, and whose feet are, of course, directly opposite to the feet of those who live on this side परस्पराभिमुखपादलोक *pl*.

ANTIQUATE *v.* (*antiquus*, old) माजी-रद्द-निरुपयोगी क.— ANTIQUATED *p.a.* जुना झालेला; माजी, रद्द, बातल (law, words).— ANTIQUARIAN *a.* relating to antiquity, or to antiquaries प्राचीनकाळ संबंधी, अथवा प्राक्कालिक द्रव्यसंग्रह संबंधी; [a technical term for a large-sized drawing paper measuring 56 by 38 inches]. — *n.* one versed in antiquities प्राचीन काळच्या वस्तूंचा जाणता -शोध करणारा, प्राचीनकालिक द्रव्यसंग्रही.—ANTIQUE *a.* ancient जुना, प्राचीनकाळचा; of old fashion जुन्या चालीचा: See ANTIC. — ANTIQUITY, ancient times प्राचीनकाळ: the people of old times जुन्या काळचीं माणसें *n pl*, वाडवडील *pl*; ancientness जुनेपणा, प्राचीनत्व *n*; *pl* remains of ancient times प्राचीनकाळची अवशेष वस्तु *f*, कृत्यें *n pl* (coins, inscriptions, weapons, manners, &c.).

ANTISPASMODIC *a.* (*Gr.* -*span*, to draw) resisting convulsions अंगग्रहनाशक.—*n.* अंगग्रहनाशक औषध *n*.

ANTITHESIS (*Gr.*-*thesis*, a setting) opposition of words or sentiments occurring in the same sentence अर्थान्तरन्यास: when our vices *leave us*, we flatter ourselves we *leave them*.

ANTITYPE (*Gr.* -*tupos*, type) प्रतिबिंब मूर्त *n*, बिंब *n*, दर्शक विषय, आदर्श: the Paschal lamb, in Scripture, is the type, of which Christ is the a.

ANTLER *F.* हरणाच्या शिंगाची शाखा *f*, मृगशिंगशाखा *f*.

ANUS (*L.*) the orifice of the alimentary canal गांड *f*, मलद्वार *n*, गुद *n*.

ANVIL* ऐरण *f*; to be on the a. घाटत असणें.

ANXIETY (*angere*, to cause pain) concern or solicitude respecting some event, future or uncertain, which disturbs the mind, and keeps it in a state of painful uneasiness काळजी *f*, चिंता *f*, फिकीर *f*, घोर.—ANXIOUS *a.* solicitous काळजी लागलेला, चिंतातुर, उद्विग्न; काळजी धरून करणारा -चालणारा;—app. to persons; accompanied with anxiety काळजीचा, दगदगीचा (labor); उत्सुक, उत्कंठित: a. to please; *for*, desirous इच्छु (in comp. as कल्याणेच्छु) [for, about]. -LY *ad.* काळजीनें, काळजी धरून.

ANY* *a.* one out of many कोणीही, कोणताही; some कांहीं; a. how, a. wise भलतासा, कसेंही, कसेंतरी; a. one भलता, हरकोणी; a. thing कांहींही; a. where कोठेंही; a. more अणखी, शिवाय.

AORTA (*L.*) great artery of the heart रक्ताशयाची (काळजाची) मोठी धमनी *f*.

APACE* *ad.* (*a* and *pace*) जलदी, सत्वर, शीघ्रगतीनें.

APART *ad.* (*a* and *part*) separately, as to place एकीकडे, एकेवाजूस, दूर (Matth. xiv. 13); in a state of distraction, as to purpose, use, or character अलग, पृथक्. वेगळा, उद्देशानें अ० उपयोगार्थ निवडून काढलेला (Ps. iv. 3); in two or more parts निरनिराळा, वेगळाला: consider the two propositions a. -MENT, a room खोली *f*, कोठडी *f*, women's a. अंतःपुर *n*, जनाना *f*; divisions of building खण, घई *f*: as दुघई having two *apartments*.

APATHY (*Gr.* -*pathos*, suffering) want of feeling जाड्य *n*, मांद्य *n*, बेपर्वा *f*, विराग.— APATHETIC *a.* जड, मंद; free of passion विरागी, बेपर्वेचा.

APE* (*Skr. kapi*) a kind of monkey माकड, वानर, प्लवंग; one who imitates servilely,

in allusion to the manners of the ape नकल्या.— *v.* वानरासारखी नकल क., ठवण -धाटणी उतरणें -साधणें.—Apish *a.* माकड-चेष्टा, नकल्या; मर्कटस्वभावाचा.

Aperient (*aperire*, to open) सुखाचा ढाळ, सौम्यरेचक *n.*— *a.* रेचक, ढाळक.—Aperture भोंक *n*, रंध्र *n*, खिंड *f.*

Apetalous *a.* (*Gr. -petalon*, leaf) पाकळी-शिवाय, पुष्पपत्ररहित, दलहीन.

Apex (*L.*) शिखर *n*, अग्र *n*, कळस, अणी *f*; mark of a long syllable दीर्घ अक्षराची खूण *f.*

Aphelion (*Gr. -helios*, the sun) point of a planet's orbit which is most distant from the sun कोणत्याही ग्रहाच्या कक्षेतील सूर्यापासून अतिदूर बिंदु, उच्च *n.*

Aphorism (*Gr. -horos*, a limit) a precept or principle expressed in a few words सूत्र *n*, वाक्य *n*, वचन *n*, नियम, ह्मण *f.*

Apiary (*apis*, a bee) मधमाशा राखून ठेवण्याचें घर *n*, मधुमक्षिकालय *n.*

Apiece* *ad.* (*a* and *piece*) एकएकास, प्रत्ये-कास, एकएकाच्या वांट्यास: here is an orange a.; each by itself एकएकास, दर-एकास: they cost a shilling a.

Apocalypse (*Gr. -kaluptein*, to cover) re-velation प्रगटविणें *n*, प्रगटीकरण *n*; name of the last book in the New Testament प्रगटविण्याचें पुस्तक *n*, प्रगटविणें *n.*

Apocope *Gr.* शब्दटच्या अक्षराचा लोप, अंत्य-वर्णलोप.

Apocrypha (*Gr. -krutein*, to hide) books whose authenticity, as inspired writings, is not admitted, and which are there-fore not considered a part of the sacred canon of the Scripture ज्यांस ईश्वरप्रेरित ह्मणण्यास कांहीं प्रमाण नसल्यावरून ज्यांची गणना ख्रिस्ती शास्त्राच्या संहितेंत केली नाहीं अशीं कित्येक पुस्तकें आहेत. यहुदी लोकांनी जेव्हां आपलीं धर्मपुस्तकें प्रसिद्ध केलीं तेव्हां त्यांस ईश्वरप्रणित शास्त्रसंहिता असें नांव दिलें, व जीं पुस्तकें अप्रसिद्ध राहिलीं त्यांस "शास्त्रसंहिताबाह्य" असें नांव दिलें.—Apocryphal *a.* अप्रसिद्ध; शास्त्रसंहिता-बाह्य; बनावट, खोटा. See the noun.

Apogee (*Gr. -ge*, the earth) that point in the orbit of the moon which is at the greatest distance from the earth उच्च *n.*

Apology (*Gr. -logos*, word) something said or written in defense of what ap-pears to others wrong दोषनिवारक भाषण *n*, -लेख; an excuse माफीची विनंति *f* [for].—Apologize *v.* माफी मागणें, चुकलों ह्मणणें [for].

Apologue (*Gr. -logos*, speech) कल्पित गोष्ट *f*, कहाणी *f.*

Apoplexy (*Gr. -plexis*, striking) a sudden disorder of the brain सुनबहिरी रोग, अर्धांग *n*, पक्षघात, सन्न्यास.—Apoplectic *a.* सुनबहिरी रोगाचा, पक्षघाती.

Apostasy (*Gr. -stenai*, to stand) departure from one's faith, principles, or party स्वमत -पक्षत्याग.—Apostate ज्यानें आपल्या धर्माचा -मताचा -पक्षाचा -मंडळीचा त्याग केला आहे तो, स्वधर्म-पक्षत्यागी.—*a.* स्वमत -स्वपक्ष-त्यागी, पतित.—Apostatize *v.* स्वधर्म -पक्ष-त्याग क.

Apostle (*Gr. -stellein*, to send) a person deputed to execute some important business गुमास्ता, मुतालीक; one of the twelve disciples of Christ sent forth to preach the Gospel प्रेषित.—Apostolic, -al *a.* प्रेषित संबंधी; delivered or taught by the Apostles प्रेषितानीं सांगितलेला -आज्ञापिलेला, प्रेषितस्थापित -उक्त (rules, doctrines).

Apostrophe (*Gr. -strophè*, a turning) a turning away from the real auditory and addressing an absent or imaginary one कांहीं बोलणें चाललें असतां मध्येंच

जवळ नाहींत त्यांस किंवा कल्पित श्रोत्यांस संबोधून बोलणें *n*, संबोधितान्यसंबोधन *n*; *Gram.* contraction of a word by the omission of a letter or letters शब्दाचा संक्षेप; the mark (') used to denote that a word is contracted शब्दाच्या संक्षेपाची एक खूण आहे; as *call'd* for *called*.

Apothecary (*Gr. -thekè*, chest) one who prepares and sells drugs for medical purposes औषधें तयार करून विकणारा, गांधी, 'पातिकेरी.'

Apotheosis (*Gr. -theos*, god) act of elevating a mortal to the rank, and placing him among the number of gods देवत्व देणें *n*, देवगणांत जागा देणें *n*, देवगणप्रविष्टीकरण *n*.

Appall *v.* (*-pallere*, to look pale) भय-धाक -दहशत घालणें -बसविणें [by].—*i.* दहशत इ० बसणें.

Apparatus (*-parare*, to prepare) things for any art or trade provided as means to some end साज, सरंजाम, संच.

Apparel (do.) dress पोषाक, वस्त्रें *pl.* —*v.* पोषाक घालणें, वस्त्रें नेसविणें; embellish अलंकार -भूषण घालणें, भूषित -मंडित क.

Apparent *a.* (*-parere*,to come forth) visible to the eye डोळ्यास दिसता, दृष्टिगोचर; plain स्पष्ट, उघड, व्यक्त; seeming दिसण्यांत मात्र खरा, दर्शनी; heir a. युवराज. -ly *ad.* उघड, स्पष्ट; बाहेरून दिसायास, दिसण्यांत मात्र.— Apparition, visibility दृष्टिगोचरता *f*; the thing appearing दृश्यवस्तु *f*; a ghost भूत *n*, छाया *f*, संबंध; *Astron.* the first appearance of a star or other luminary after having been obscured उदय.—Appear *v. i.* be in sight दृष्टीस पडणें, दिसणें (Gen. i. 9); stand in presence of -च्या समोर उभें राहणें, हजीर -रुजू होणें (2 Cor. v. 10); be manifest समजणें, प्रगट होणें (1 John iii. 2); be clear प्रमाणानें -पुराव्यानें सिद्ध होणें (Rom. vii. 13); seem भासणें, वाटणें, -वरून दिसणें (Matth. vi. 16). -ance दिसणें *n*, दर्शन *n*; आविर्भाव, प्रादुर्भाव, उद्भव; उमग; हाजिरी *f*; आभास; आकार, रूप *n*; पोकळ डौल, सोंग *n*; phenomenon चमत्कार: an a. in the sky; *Law*, कोर्टापुढें हजीर होणें *n*; mien चर्या *f*, ढब *f*, डौल; to save *appearances* फड राखणें -संभाळणें, फड संपादणी क. [to, from, in].

Appeal *v. i.* (*appellare*, to call upon) *Law*, remove a cause from an inferior to a superior judge or court वरच्या न्यायाधिशाकडे खटलें नेणें, "अपील" क.; refer to another for the decision of a question controverted तिऱ्हाईताकडे नेणें, पंचाच्या निवाड्यावर सोपणें; call on one for aid मदतीस बोलावणें.—*n.* अपील *n*; साक्ष *f*; साक्षीस बोलावणें *n*.—Appellant अपील करणारा. — *a.* अपिलासंबंधी.

Appear, See under Apparent.

Appease *v.* (*-pax*, peace) शांतवणें, सांत्वन क. [by].

Appellation (See Appeal) नाम *n*, संज्ञा *f*.

Appellative सामान्य नाम *n*.—*a*. सामान्य.

Append *v.* (*-pendere*, to hang)—to टांगून -लगटून देणें, अवलंबणें; add जोडणें, लावणें. -age जें दुसऱ्या वस्तूस -गोष्टीस जोडलें असतें तें *n*, अनुषंगी पदार्थ, उपांग *n*, दुमाला? -ant *a.* टांगलेला; जोडलेला,लगत्याचा, संबंधी. —Appendix ग्रंथाची पुरवणी *f*, शेषसंग्रह.

Appertain *v.* (See Pertain) See Belong [to].

Appetence, -cy, (*-petere*, to seek) fixed and strong natural longing वासना *f*, इच्छा *f*.—Appetite, desire इच्छा *f*, वासना *f*, कामना *f*; hunger भूक *f*, क्षुधा *f*.

Applaud *v.* (*-plaudere*, to clap the hands) टाळ्या वाजवून शाबसकी देणें, वाहवा क.; commend वाखाणणें, स्तुति -प्रशंसा क.— Applause शाबासकी *f*, वाहवा *f*.

APPLE * एक फळ आहे;—of the eye पुतळी *f*, डोळ्यांतली बाहुली *f*; a. of one's eye नाकाचा बाल, जिवाचा कलिदा; to prize as the a. of one's eye सातांकाळजांच्या पलीकडे ठेवणें.

APPLY *v.* (*-plicare*, to fold) place ठेवणें; put लावणें; bring or carry नेणें; use for a particular purpose कामास -उपयोगास लावणें; incline लावणें, वळवळणें, मन लावणें: a. thy heart unto instruction;—as an epithet लावणें, ठेवणें.—*i.* लागणें, लागू होणें; make request विनंती -अर्जी क.— APPLICABLE *a.* लावायाजोगा, लायक, लागू पडण्याजोगा.—APPLICABILITY लायकी *f*, लावायाची योग्यता *f*, लाग.—APPLICANT योजणारा, प्रयोजक; मागणारा, याचक; अर्जदार.—APPLICATION लावणें *n*, योजणें *n*, प्रयोग, योजना *f*;—the thing applied लावलेली वस्तु *f*, लेप वगैरे; मन -लक्ष्य लावणें *n*, व्यासंग, अभिनिवेश, अभ्यास; अर्ज, अर्जी *f*; प्रार्थना *f*; याचना *f*.

APPOINT *v.* (*-punctum*, a point) establish नेमणें, स्थापणें; decree ठरविणें, विधान क.; equip सज्ज -तयार क.; nominate अधिकारावर नेमणें -योजणें;—a time वायदा क. [to]. —*i.* ठरविणें, नेमणें (2 Sam. xvii. 14). -ED स्थापित, नेमलेला; सोपून दिलेला, नियुक्त; an a. duty नियोग; a. time कालावधि, वायदा. -EE नेमलेला मनुष्य. -MENT नेमणें *n*; कामावर नेमणूक *f*, योजना *f*; stipulation ठराव, संकेत; decree नियम, विधि *f*; सज्जा, सरंजाम, सामग्री *f*; post जागा *f*, असामी *f*; allowance मुशारा.

APPORTION (*-portio*, portion) विभागून -वांटून देणें.

APPOSITE *a.* (*-ponere*, to put) योग्य, समर्पक, लायक, युक्त [to]. -LY *ad.* प्रसंगानुसार, यथोचित.—APPOSITION, *Gram.* the state of two nouns put in the same case without a connecting word between them एकविभक्तिकता *f*; act of adding मिळविणें *n*.

APPRAISE *v.* (*-pretiare*, to prize) मोल लावणें, किंमत ठरवणें: to a. goods [at, for].

APPRECIATE *v.* (do.) value किंमत क.; मोल -गुण जाणणें; one who knows how to a. गुणज्ञ, मर्मज्ञ, गुणग्राही.

APPREHEND *v.* (*-prehendere*, to seize) धरणें, पकडणें; conceive in the mind समजणें, उमजणें, बोध होणें; entertain fear of -ची भीति बाळगणें; entertain suspicion of -चा संशय-अंदेशा धरणें.—APPREHENSIBLE *a.* मनांत येण्याजोगा, बोधगम्य, उपलभ्य, ग्राह्य.—APPREHENSION धरणें *n*; पकड *f*, धरपकड *f*; समज, उमज, ग्रह, बुद्धि *f*; वहमा, संदेह, शंका *f*, अभिप्राय, बुद्धि *f*, मत *n*; conception कल्पना *f*.— APPREHENSIVE *a.* समजणारा; quick of understanding लवकर समजणारा, तैलबुद्धि; भयभीत, भयशंकित; संशययुक्त.

APPRENTICE *n.* (do.) one bound for a time to learn an art or trade करारी विद्यार्थी -चेला -शागिर्द, संकेतपत्रबद्ध विद्यार्थी.— *v.* करारनाम्यानें बांधून विद्या किंवा धंदा शिकायास ठेवणें -घालणें [to]. -SHIP विद्यार्थीपणा, शागिर्दी *f*; शागिर्दपणाची मुदत *f*.

APPRIZE *v. F.* See INFORM [of].

APPROACH *v. i.* (*-propiare*, to draw near) —in place जवळ येणें-जाणें;—in time काळवेळ जवळ येणें (Heb. x. 25); approximate जवळ येणें, सारखा -बरोबरीस उतरणें: it *approaches* to his character.—*n.* जवळ येणें *n*, आगमन *n*; एखाद्या घराकडे जाण्याचा मार्ग [*pl* works thrown up by besiegers to protect them in their advances towards a fortress]. -ABLE *a.* जवळ जायाजोगता, अभिगम्य, गम्य. -ING *a.* जवळ येणारा; near at hand जवळचा, उपस्थित, आसन्न.

APPROBATION (see APPROVE) मान्य करणें *n*; अनुमोदन *n*; approval पसंती *f*, मान्यता *f*; to meet the a. of मनास -मर्जीस येणें.—APPROBATORY *a*. अनुमोदक.

APPROPRIATE *v*. (*-proprius*, one's own) set apart for -करितां वेगळा -नांवानें काढून ठेवणें; claim or use, as by an exclusive right दुसऱ्यास वर्जून आपणच हक्कानें आपला -खासगत क.: let no man a. the use of a common benefit; to a. unlawfully डल्ला मारणें, खाणें, गिळंकृत क.; assign to some particular use विशेष कामाकडे योजणें -लावणें [to].— *a*. See PROPER.—APPROPRIATION उपयोग, विनियोग; काढून ठेवलेला पैसा;—fraudulent तनाखोरी *f*, हरामखोरी *f*.

APPROVE *v*. (*-probare*, to prove) be pleased with आवडणें, पसंत -मान्य होणें; commend वाखाणणें, स्तुति क. (Ps. xlix. 13); sanction officially मंजूर -काईम क. [of]. -ED पसंत, मंजूर केलेला; मान्य (Acts ii. 22); पटलेला (2 Tim. ii. 15).

APPROXIMATE *v*. (*-proximus*, nearest) जवळ नेणें [to].— *i*. जवळ येणें.—*a*. जवळ, समीप. —APPROXIMATION, See APPROACH.

APPURTENANCE (*-pertinere*, to reach to) जें नेहमीं दुसऱ्यास लागून असतें तें, आनुषंगिक.

APRICOT (*præcox*) एक फळ आहे, अल्बुर्क *Ar*.

APRIL (*Aprilis*) इंग्रजी वर्षाचा चवथा महिना, चैत्र-वैशाख.

A PRIORI (*-prior*, former) *Logic*, reasoning à p. is that which deduces consequences from definitions formed, or principles assumed, or which infers effects from causes previously known कारणावरून कार्याची सिद्धि *f*, किंवा अनुमान *n*.

APRON (*Fr*.) कामाच्या वेळीं अंगावरचीं पांघुरणें मळूं नयेत ह्मणून जें मळवस्त्र पुढून बांधतात तें *n*; वर्गांत बसतांना पाऊस धूळ वगैरे लागूं नये ह्मणून जें कातडें पायावर घेतात तें *n*.

APROPOS *ad*. *F*. प्रसंगानुरूप, प्रसंगवशात्; to come a. प्रसंगास येणें.

APT *a*. (*apere*, to fit) योग्य, यथोचित; liable जोगा, जोगता, शील: a. to break फुटण्याजोगा, भंगशील;— of persons, inclined -शील, -लु: a. to sleep निद्रालु; ready तयार: men are a. to slander others; quick हुशार, चपळ, पटु; qualified लायक, उपयोगी, कामाचा [for, to]. -ITUDE योग्यता *f*, उपयोग; ओढ *f*, प्रवृत्ति *f*, कल; सुजाणपण *n*, पटुत्व *n*, चणचणीतपणा. -LY *ad*. ठीक, यथायोग्य; हुशारीनें, चातुर्यानें.

AQUATIC *a*.(*aqua*, *Skr*. *ap*, water) पाण्याचा, पाण्यासंबंधी, in comp. जल: a. animal जलजंतु; inhabiting water पाण्यांत राहणारा, जलस्थायी; frequenting water जलचर.—*n*. पाण्यांतील वनस्पति *f*, जलवनस्पति *f*.—AQUEOUS *a*. पाण्याच्या गुणाचा, जलरूप; made by means of water पाण्यानें केलेला (solution). —AQUEDUCT नळ, नहर, सारणी *f*.—AQUAFORTIS, nitric acid आगपाणी *n*.—AQUARIUS कुंभरास -शि *f*.

AQUILINE *a*. (*aquila*, an eagle) गरुडासारखा, गृध्राकार; hooked अंकडीदार, वक्र; that has an a. nose गरुडनाक्या.

ARABIC *a*. आरबी.— *n*. आरबी भाषा *f*.

ARABLE *a*. (*arare*, to plough) लागवड करण्यासारखी (जमीन), जिराईत; a. land नांगरलेली -लागवडीची जमीन *f*.

ARBITER (*L*.) *Law*, तिऱ्हाईत, मध्यस्थ, पंच.—ARBITRABLE *a*. depending on the will इच्छाधीन; determinable ठराव करण्याजोगा, निर्णनीय.— ARBITRARY *a*. absolute स्वतंत्र, मुखत्यार; मनास येईल तसा, ऐच्छिक; capricious लहरी; not governed by any fixed rules बेकायदा, बेबंद.—ARBITRARILY *ad*. मनास येईल तसें, मनपूत.—ARBITRATE *v*. पंचाईत -मनसुबी क.—ARBITRATION तिऱ्हाइती *f*, मनसुबी *f*, लवादी *f*, पंचाईत *f*, मध्यस्थी *f*; निर्णय, विचार. —ARBITRATOR तिऱ्हाईत, पंच.

Arbor (*arbor*, a tree) वेल किंवा फांद्या पसरून केलेली छाया *f*, गुफा *f*, पर्णमंडप. -eous *a.* वृक्षसंबंधी; growing on trees झाडांवर वाढणारा: moss is a. -ous *a.* झाडांचा केलेला, वृक्षमय, झाडांचा (roof).

Arc (*arcus*, a bow) segment of a circle परिघाच्या वर्तुलाचा भाग, कौंस. -ade, a series of arches मंडपश्रेणी *f*.—Arch कमान *f*, मेहराब *f*; the vault of heaven नभोमंडल *n.* See Arc.— *v.* कमानदार क.— *a.* (*Gr. archos*, chief) cunning धूर्त, बिलंद, अट्टल, इरसाल; chief मुख्य, प्रधान, श्रेष्ठ. -angel पहिल्या प्रतीचा दूत, महादूत. -bishop मुख्य धर्माध्यक्ष, सरपाद्री. -deacon बिशप पाद्रीचा सहकारी. -duke युरोपांत कित्येक मांडलिक राजांची पदवी आहे.—Archer (*arcus*, a bow) तीरकमानवाला, तिरंदाज, धनुर्धर.—Archery धनुर्विद्या *f*, तिरंदाजी *f*.—Archetype (*Gr. -tupos*, a form) मूलप्रत *f*, असल *n.*— Archipelago (*Gr. -pelagos*, sea) ज्यांत बहुत बेटें असतात असा समुद्र किंवा जलाशय, 'आर्किपिलेगो.' —Architect (*Gr. tekton*, workman) professor of the art of building घर वगैरे बांधण्याची विद्या जाणणारा, शिल्पशास्त्री. -ure शिल्पशास्त्र *n*; workmanship कारागिरी *f*, रचना *f*, घटना *f*: the formation of the first earth being a piece of divine a.

Archives *pl* (*Gr. archè*, government) दफतरखाना, जुने लेख ठेवण्याची जागा *f*, दफतर *n.*

Arctic *a.* (*Gr. arktos*, a bear) उत्तर ध्रुवाकडील.

Ardent *a.* (*ardere*, to burn) hot or burning जलाल, कडक, उष्ण, तलख, चणचणीत (spirits, fever); having the appearance of fire विस्तवा सारखा लाल (eyes); zealous हौसदार, उत्सुक, उत्कंठित. -ly *ad* उत्साहानें, उत्कंठेनें, कडकावून [in, for]. — Ardency, Ardor, आंच *f*, तलखाई *f*; आग *f*, गरमी *f*; हौस *f*, उत्साह.

Arduous *a.* (*arduus*, high) उंच (paths); difficult कठीण, मेहनतीचा, दुर्घट (task). -ly *ad.* मेहनतीनें, श्रमपूर्वक.

Area (*L.*) any plane surface, as the floor of a room, of a church or other building, or of the ground मोकळी जागा *f*; *Geom.* superficial contents of a figure क्षेत्रफळ *n*, गर्भ; sunken space around the basement of a building अंगण *n*; [*Med.* disease of the hair, in which it changes color, but does not fall off].

Arefy *v.* (*arere*, to be dry, *facere*, to make) सुकवणें, वाळवणें.

Arena (*arena*, sand) area in the central part of an amphitheatre, in which the gladiators fought and other shows were exhibited रंगभूमि *f*, मल्लभूमि *f*, तालीमखाना; fig. any place of public contest अंगण *n* (in comp. रणांगण *n*); the middle of a temple or other enclosed place चौक; [sand in the kidneys]. -ceous *a.* रेतीचा, रेंवाळ, रेंवट.

Argent *a.* (*argentum*, silver) रुप्याचा, रौप्य; रुप्यासारखा चकचकीत (fields).

Argil (*argilla*, white clay) कुंभारमाती *f*, पांढरी माती *f*. -laceous *a.* चिकणमातीचा.

Argonaut (*-nauta*, a sailor) आर्गो नामक गलबतांत बसून सोनेरी लोंकर शोधायास जे गेले होते त्यांतील एक असामी. -ic *a.* आर्गोनाट संबंधी (story).

Argue *v.* (*arguere*, discuss) घाटणें, मथणें, वादविवाद क.: the counsel *argued* the cause before a full court; prove सिद्ध क., कारण-प्रमाण दाखवणें: the order visible in the universe *argues* a divine cause; persuade by reasons कारणें दाखवून खातरी क., मन वळवणें: to a. a man into different opinions.— *i.* reason वाद क., तकरार घेणें: A *argues* in favor of a measure; with वाद -वादविवाद क.: you may a. with your

friend without convincing him ; idle or empty *arguing* काथाकूट *f.* —ARGUMENT, a reason offered in proof, to induce belief, or convince the mind प्रमाण *n*: a convincing a. of the existence of a Deity; the subject of a discourse भाषणा-चा-संवादाचा विषय; controversy वाद, विवाद; abstract of a discourse, writing, &c. सार *n*. -AL *a*. वादसंबंधी, वादाचा. -ATIVE *a*. वादाचा, वादात्मक; given to argument वादी, तकरारी.

ARID *a*. (*arere*, to be dry) रखरखीत, रुक्ष, शुष्क: an a. waste. -ITY रखरखाट, रुक्षता *f*.

ARIES (*L*.) मेषरास *f*.

ARIGHT* *ad*. (*a* and *right*) नीट रीतीनें, नीट, बरोबर.

ARISE* *v. i*. ascend वर चढणें: a cloud *arose*; come above the horizon उगवणें, उदय पावणें -होणें; come up from one's bed or place of repose उठणें, निजून उठणें, बसल्या जाग्यावरून उठणें; originate उत्पन्न-उद्भव होणें; come into action उद्युक्त-प्रवृत्त होणें, उठणें; be visible दिसणें, उठणें: the waves a.

ARISTOCRACY (*Gr. aristos*, best, *kratos*, strength) a form of government, in which the supreme power is vested in the principal persons of a state थोर लोकांचें राज्य *n*, कुलीनवर्गप्रभुत्व *n*, उमराई हुकुमत *f*; the nobility or chief persons of a state बडेलोक *pl*, उमराव.—ARISTOCRAT, one who favors aristocracy बडे लोकांच्या राज्याचा पक्षधारी. -IC, -ICAL *a*. बडे लोकांच्या राज्या संबंधी; बडे लोकांचा, उमरावांचा, उमराई (pride, manners).

ARITHMETIC (*Gr. arithmos*, number) गणित *n*, अंकगणित *n*, हिशेब *pl*;— of fractions अपूर्णांक ग.;—of integers पूर्णांक ग.;—of known quantities व्यक्त ग.;—of unknown quantities अव्यक्त ग. -AL *a*. गणित संबंधी, हिशेबाचा; गणितानुसार. -LY *ad*. गणिता प्रमाणें, हिशेबानें.—ARITHMETICIAN गणित्या, गणक, हिशेबी.

ARK (*arca*, a chest) पेटी *f*; a repository कोष, कोश; the large floating vessel in which Noah and his family were preserved during the deluge जलप्रलयाच्या वेळीं नोहा व त्याचें कुटुंब यांचें जींत रक्षण झालें ती नौका *f* (Gen. vi.).

ARM,* the limb of the human body which extends from the shoulder to the hand बाहु, हात;—from the shoulder-joint to the elbow भुजदंड, दंड;—from the elbow to the wrist हात; the branch of a tree फांदी *f*, फांदडा, स्कंध;— of the sea खाडी *f*, समुद्राचा फांटा; navigable a. तरती खाडी *f*;— of a garment बाही *f*; fig. power सामर्थ्य *n*, बल *n* (Is. liii. 1);—of a math. figure भुज.— FUL, —of grass, &c. कवळ *f*, वेंग *f*, आडव *f*. -PIT बगल *f*, कक्ष *f*.

ARM *v*. (*arma*, arms) furnish with arms हत्यारबंद-सज्ज क. [with, against, for].—*i*. हत्यारबंद होणें.—*n. pl* हत्यारें *n pl*, शस्त्रें *n pl*; exploits of war युद्धाच्या कथा *f*; to be in a. लढाईस उठणें; to be under a. हत्यारबंद होऊन लढाईस तयार असणें. —ARMADA *Sp*. लढाऊ गलबतांचा समुदाय. —ARMAMENT (*armare*, to arm) force equipped for war सेनाभार, फौजबंदी *f*.—ARMISTICE लढाईची तहकुबी *f*, अवहार. — ARMOR, defensive arms for the body चिलखत *n*, कवच *n*; iron covering of ships of war लढाऊ गलबतांचे लोखंडी पत्रे *pl*. -ER maker of arms हत्यारें करणारा. -IAL *a*. शस्त्रसंबंधी.—ARMORY हत्यारें ठेवण्याची जागा *f*, शस्त्रागार *n*, शिलेखाना; a collection of arms शस्त्र-संग्रह -समूह. —ARMY फौज *f*, लश्कर *n*, सैन्य *n*; invading a. परचक्र *n*; a host समुदाय, सैन्य *n*.

ARMILLARY *a.* (*armilla*, a bracelet) कंकणाकृति.

AROMA (*L.*) सुगंध, सुवास. -TIC *a.* सुगंधित, सुवासिक; spicy मसाल्याचा, मसालेदार.—*n*, सुगंध द्रव्य *n.*

AROUND* *ad.* (*a* and *round*) circularly गरगरां, चक्रवत्; on every side आजूबाजूस, असमंतात्.—*prep.* भोंवतालीं, सभोंवतीं.

AROUSE* *v.* (*a* and *rouse*) जागा -जागृत -प्रबोधित क., चेतवणें, चेव आणणें.

ARRACK *Ar.* दारू *f.*

ARRAIGN* *v.* दोषारोपाचा जाब देण्यास कोर्टापुढें उभा क.

ARRANGE *v.* *F.* put in order व्यवस्थेनें रचणें, मांडणें, जुळणें; settle व्यवस्था -बंदोबस्त क. -MENT रचणें *n*, &c.; व्यवस्था *f*, बंदोबस्त; the state of being in order क्रम; settlement regular and systematic तोडजोड *f*, निकाल; classification वर्गीकरण *n*, वर्गावर्गी *f*, विल्हेवारी *f*: the Linnæan a. of plants.

ARRAY* *v.* place in order रचणें, रांगेनें -क्रमानें -व्यवस्थेनें उभें क. -बसविणें; deck पोशाकाचा थाटमाट क., अलंकृत क.; *Law*, set in order as a jury, for the trial of a cause खटल्याच्या चौकशी करितां जुरीस व्यवस्थेनें बसविणें.—*n.* रचना *f*, क्रम;— of troops सेनारचना *f*, विहू, व्यूह; थाटमाट, बनाव, पोषाक.

ARREAR *F.* बाकी *f*, शिलक *f*: the *arrears* of pay चढलेला पगार.

ARREST *v.* (*-restare*, to stay back) थांबवणें, अटकाव -स्तंभन क.; *Law*, take, seize, or apprehend by authority of law सरकारी हुकुमानें धरणें -पकडणें [for, in].—*n.* कैद *f*, नजरकैद *f* -बंदी *f*, अटकाव; an issue of a. पकड समान *n*; [a. of judgment, *Law*, the stopping of a judgment after verdict for legal cause.]

ARRIVE *v.* (*-ripa*, bank of a river) come in progress by water, or by travelling on land पोहचणें, पावणें; reach a point by progressive motion पर्यायानें येऊन पोहचणें, पावणें: to a. at a conclusion [from, at]. —ARRIVAL पोहचणें *n*, आगमन *n.*

ARROGATE *v.* (*-rogare*, to ask) नसता अभिमान -आढयता बाळगणें, पोम दाखविणें: the pope *arrogated* dominion over kings.—ARROGANT *a.* अहंकारी, गर्विष्ठ, मगरूर.—ARROGANCE, -CY, गर्व, अभिमान, मगरुरी *f.*

ARROW* तीर, बाण; the feathered end of an a. पिस *n*; practising a. तुका; barbed a. अकडीदार तीर. -ROOT तवकील *f.*

ARSENAL *Ar.* दारूगोळा वगैरे ठेवायाची जागा *f*, तोफखाना, दारूखाना.

ARSENIC (*arsenicum*) सोमल, सोमलखार; sulphuret of a. हरताळ; red sulphuret of a. मनशीळ; white oxide of a. शंख्या -फटक्या सोमल. -AL, ARSENIOUS, *a.* सोमलाचा.

ARSON (*ardere*, to burn) the malicious burning of a dwelling-house or out-house of another man दाव्यानें घर जाळण्याचा अपराध.

ART (*ars*) employment of means to accomplish some desired end युक्ति *f*, हिकमत *f*; a system of rules serving to facilitate the performance of certain actions कला *f*; skill कसब *n*, हुन्नर *f*, जुगुत *f*: man has the a. of managing his business to advantage; cunning युक्ति *f*, कावा, कपट *n*; fine *arts* मानसिकश्रमसाध्यकला *f pl* (गायन, कविता इ०); mechanical *arts* शारिरश्रमसाध्यकला *f pl* (शिवणें, भांडीं घडणें इ०). -FUL *a.* कलेनें केलेलें, कृत्रिम; skilful निपुण, चतुर; cunning कावेबाज, धूर्त, कारस्थानी. -IST कारागीर, शिल्पी, हुन्नरबाज; professor of the liberal arts शिल्पशास्त्री. -LESS *a.* void of art अनाडी, मूर्ख; guileless साधा,

भोळा, निष्कपट, गरीब.—ARTIFICE कसब *n*, कृति *f*, in a bad sense डाव, पेंच, फटवण *f*. —ARTIFICER कारागिर, शिल्पकार.— ARTIFICIAL *a*. कृतीनें केलेला, कृत्रिम, काल्पनिक; खोटा, कपटाचा; cultivated लागवडीचा, लावलेला (grasses).

ARTERY (*arteria*) one of the vessels or tubes which convey the blood from the heart to all parts of the body धमनी *f*, नाडी *f*.— ARTERIAL *a*. धमनी संबंधी, नाडीचा (action); contained in an artery धमनींतला, नाडीगत (blood).

ARTICLE (*artus*, a joint) *Gram*. one of the parts of speech उपपद *n*; a single clause of an account कलम *n*, बाब *f*, रकम *f*; a point of faith श्रद्धाविषय, सिद्धांत; a particular commodity जिन्नस *f*, चीज *f*; precise point of time क्षण, समय: in the a. of death;—in a magazine, newspaper मासिक वगैरे पुस्तकांतील किंवा वर्त्तमानपत्रांतील निबंध, कलमवार मजकूर, 'आर्टिकल' *n*; particular one of various things नग, डागिना; *pl*.—of war लढाईचे कायदे *pl*.— *v*. stipulate ठराव -करार क.; draw up in articles कलमबंदी क. — ARTICULATE *a*. jointed सांधलेला, संधियुक्त; distinctly uttered साफ, स्पष्ट, वागिंद्रिययुक्त (sound.) —*v*. सांधे जोडणें, सांध्यानें जोडणें; स्पष्ट उच्चार क., मनुष्यासारखे शब्द सांधून बोलणें. -LY *ad*. कलमवार; स्पष्ट उच्चारानें, व्यक्त.—ARTICULATION सांधा, संधि; *Botany*, कांडें *n*, पेर *n*; स्पष्ट उच्चार.

ARTILLERY *F*. offensive weapons of war फेंकून मारायाचीं युद्धोपयोगी शस्त्रें *pl* (1 Sam. xx. 40); gunnery तोफेची विद्या *f*; ordnance तोफखाना; great guns मोठाल्या तोफा *f pl*; body of gunners गोलंदाज *pl*.

AS* *conj*. similar to सारखा, प्रमाणें, जसा, तसा: ye shall be a. gods; do a. you are bidden; while जेव्हां, तेव्हां, असतां: he trembled a. he spoke; in the sense of proportion जसजसा, तसतसा, जितका जितका; for instance जसें, उदाहरणार्थ; a. if जसें काय, जणू काय; a. far a., a. to त्याविषयीं; a. well हीं, सुद्धां; शिवाय; a. yet अजून, अद्याप.

ASAFŒTIDA (*-fœtidus*, fetid) हिंग;—the tree हिंगाचें झाड *n*; fine bright a. हिराहिंग.

ASCEND *v. i.* (*-scandere*, to mount) चढणें, वर जाणें, lit., fig.; as a star उगवणें, उदय होणें; rise, fig. उदय होणें, नांवारूपास चढणें [up, upon, from, to].—*t*. वर चढणें, चढणें. -ANT, superiority वरचढ *f*, वर्चस्व *n*; ancestor पूर्वज; *Astron*. उच्च *n*.—*a*. क्षितिजावर, उदयंगत; वर्चस्वी, उत्तम, प्रबळ. -ANCY चढ, शह, उपर *f*, प्राबल्य *n*, प्राधान्य *n*. —ASCENSION चढणें *n*, आरोहण *n*; उदय;— to heaven स्वर्गारोहण *n*; right a. विषुवांश. -DAY, the anniversary of our Savior's ascension into heaven after His resurrection आमचा तारणारा मरून उठल्यावर आकाशांत सदेह चढून गेला त्याच्या स्मरणार्थ (कित्येक ख्रिस्ती मंडळ्या) जो दिवस पाळतात तो, "वर जाण्याचा दिवस."—ASCENT चढणें *n*, आरोहण *n*; the way by which one ascends चढाव, चढण *f*, *n*; the means of ascending चढण्याचे उपाय; a. and descent चढ उतार; steep a. उभासूळ.

ASCERTAIN *v*. (*-certus*, certain) खचीत क.; find out for a certainty by trial अजमासून खचीत क.: to a. the purity of a metal. -ABLE *a*. निर्धार करायाचा -जोगा, निर्धारणीय. -ED निर्धार केलेला, निर्णित, निश्चित. -MENT निर्धार क. *n*; शोध; निर्णय.

ASCETIC (*Gr. askein*, to exercise) one who practises undue rigor and self-denial in religious things विरक्त, तापसी; Hindu *ascetics* गोसावी, बैरागी, वानप्रस्थ.— *a*. विरक्त, तपोनिष्ठ.

ASCRIBE *v*. (*-scribere*, to write) attribute, as a cause -कडे कारण लावणें, आरोपणें, ठेवणें: losses are often to be *ascribed* to impru-

dence; attribute as a quality गुण लावणें -देणें: to a. perfection to God.—Ascribable *a.* लावायाजोगा, आरोपणीय.—Ascription *n,* आरोपणें *n,* आरोपण *n,* आरोप.

Ash * एक झाड आहे; आश झाडाचें लांकूड *n.*

Ashamed *a.* (*a* and *shamed*) affected by shame ओशाळा,लज्जित; confused by guilt, or a conviction or consciousness of some wrong or impropriety हिरमुसून गोंधळलेला [of].

Ashes * *pl* earthy or mineral particles of combustible substances remaining after combustion राख *f,* रक्षा *f,* भस्म *n*; the remains of the human body when burnt चिताभस्म *n.*—Ashy *a.* राखेचा, भस्माचा; ash-colored भस्मरंगी; filled with ashes राखेनें भरलेला.

Ashore *ad.* (*a* and *shore*) on shore किनाऱ्यावर; to the shore कांठाकडे, तडीस; on the land adjacent to water पाण्या जवळच्या जमिनीवर: the captain of the ship remained a.; on the ground भूमीवर -किनाऱ्यावर चढलेला: the ship was driven a.

Asian *a.* (*Gr. asia,* eastern land; *Skr. ushac,* aurora) आशियाचा.—Asiatic आशिया खंडांतला मनुष्य.—*a.* आशीया खंडसंबंधी.

Aside *ad.* (*a* and *side*) on, or to one side एकीकडे, बाजूस, आडबाजूस; out of the way रस्त्याच्या बाहेर, मार्ग सोडून; to set a. रद्द -नामंजूर क.

Asinine, see under Ass.

Ask* *v.* (*Skr. ish,* to desire) request मागणें, विनंती क.: a. counsel of God: require मागणें: what price do you a.? inquire of विचारपूस क.; put a question पुसणें, विचारणें (John ix. 21).

Askance, Askant, Askew, *D.,* Aslant *a.* (*a* and *slant*) तिरकस, आडवा, ओझरता; to look a. काण्या डोळ्यानें पाहणें.

Asleep* *ad.* (*a* and *sleep*) झोंप लागलेला, निद्रिस्त.

Aslope* *ad.* ढाळता, उतरता.

Asp (*aspis*) एक विखारी सर्प आहे.

Asparagus (*L.*) नागदवण *f* (एक झाड आहे).

Aspect (*-spicere,* to look) look आकार, डौल, कटाक्ष, रूप *n*; particular appearance of the face चेहरा, मुद्रा *f,* वदन *n*; severe a. कठोर मुद्रा *f*; position तोंड *n,* लक्ष्य *n,* अभिमुख *n,* रोख: a house has a southern a.; *Astr.* the situation of one planet or star with respect to another दृष्टि *f,* दशा *f.*

Asperity (*asper,* rough) खरबरीतपणा; harshness of sound कर्कशपणा; sourness अंबटपणा; moral ruggedness कर्कशपणा, कडुस्वभाव; sharpness तीक्ष्णता *f,* तिखटपणा, कडकपणा.

Asperse *v.* (*-spargere,* to scatter) कुभांडघेणें, काजळी लावणें (a character).— Aspersion तुफान *n,* अपवाद; a sprinkling शिंपडणें *n,* शिंचन *n.*

Aspire *v.i.* (*-spirare,* to breathe) desire with eagerness उमेद -आशा धरणें [to, after]; ascend चढणें. —Aspiring *a.* आशा धरणारा, उमेदवार; हौसदार, महत्वाकांक्षी.—Aspirant *a.* इच्छु, अर्थी: विद्यार्थी, धनेच्छु.—Aspirate *v.* जोरानें उच्चार क., महाप्राणोच्चार क.: we a. the words *horse* and *house.* —*n.* जोराच्या उच्चाराचा वर्ण, महाप्राण वर्ण. —*a.* जोराच्या उच्चाराचा, महाप्राणाचा.—Aspiration जोराचा उच्चार, महाप्राण; आशा *f,* आस *f,* लालसा; दम, उमेद *f,* हाव *f.*

Asquint *ad.* See Askance.

Ass (*asinus*) गाढव *m, n*; a stupid fellow गाढव, गद्दा, ढ.—Asinine *a.* गाढवाचा, गर्दभ संबंधी; गाढवाच्या गुणांचा.

Assail *v.* (*-salire,* to leap) assault हल्ला क., घाला घालणें [with, for]; attack morally

आब्रूवर हल्ला क. -ABLE *a.* हल्ला करण्या-जोगा, आक्रमणीय. -ANT हल्ला करणारा.

ASSASSIN *F.* one who kills, or attempts to kill, by surprise or secret assault मारेकरी, गुप्तघाल्या. -ATE *v.* घाल्यानें -दग्यानें मारणें -जीव घेणें. -ATION गुप्तघात.

ASSAULT *v.* (*See* ASSAIL) हल्ला क.—*n.* a violent onset with physical means, as blows, weapons, &c, हल्ला, उचल *f*; *Law*, a. and battery मारामार *f*, दंडपारुष्य *n*; a violent onset with moral means, as words, arguments, &c. आब्रूवर हल्ला क.

ASSAY *v.* *F.* परीक्षा क., कसोटीस लावणें [with, for].—*i.* यत्न क.: he *assayed* to go. —*n.* परीक्षा *f*, पारख *f*; of coin नाण्याची पारख *f*, नाणकपरीक्षा *f*; the substance to be assayed परीक्षेची वस्तु *f*; attempt यत्न, प्रयत्न. -ER, -MASTER धातूची परीक्षा करणारा, पोतदार.

ASSEMBLE *v.* (-*simul*, together) bring together एकत्र आणणें, एकवटणें; convene बोलावून जमवणें, मिळवणें.— *i.* जमा -गोळा होणें; एकत्र जमणें -मिळणें -येणें [at, in, for, together].—ASSEMBLAGE जमाव, मेळा, समुदाय.—ASSEMBLY जमाव, मेळा, जमात *f*; a heterogeneously composed a. पंचमिसळ *f*; a religious society convened मंडळी *f*, धर्मसभा *f*; a legislative body राजसभा *f*, राजकार्याची सभा *f*; an a. of the learned पट्टी *f*. [*Mil.* a beat of the drum or sound of the bugle as a signal to troops to assemble]. -ROOM सभागृह *n*.

ASSENT *v.i.* (-*sentire*, to think) संमत -रुकार -अनुमत देणें.—*n.* रुकार, होकार, संमत *n* [to].

ASSERT *v.* (-*serere*, to join together) affirm खचीतपणीं -प्रतिज्ञेनें बोलणें; maintain स्थापणें, प्रतिपादन क.: a system of doctrine, &c. उपपादन -उपपत्ति क., कैवार घेणें. -ION उपपादन *n*; ज्याविषयीं खातरीचें भाषण केलें तें; positive declaration निश्चित वाक्य *n*; position advanced प्रतिज्ञा *f*, पक्ष, मत *n*; संभाळ, रक्षण *n*: a. of our rights.

ASSESS *v.* (-*sedere*, to sit) set, fix, or charge a certain sum upon, as a tax पट्टी -कर बसवणें; fix the value of, for the purpose of taxation कर बसविण्या करितां किंमत ठरवणें; fix ठरवणें: to a. damages. -MENT पट्टी बसवणें *n*; सरकारी पट्टी *f*, कर; ज्युरीनें नुकसानीची किंमत -अजमास ठरविणें *n*. -OR पट्टी बसवणारा; जमाबंदी करणारा; one who sits by another, as next in dignity सभासद; an assistant and adviser मदतनीस, "आसेसर"; कर बसविण्या करितां जिनगीचा किंमत ठरविणारा, "आसेसर."

ASSETS *pl* (-*satis*, enough) property of a deceased person, subject by law to the payment of his debts and legacies मैयताचें कर्ज वगैरे फेडण्यापुरती त्याची जिंदगी *f*, मैयत जिंदगी *f*, जायदाद *f*; effects of an insolvent debtor or bankrupt, applicable to the payment of his debts नादार मनुष्याची पुंजी *f*; entire property of all sorts, belonging to a merchant or to a trading association व्यापाऱ्याची किंवा व्यापाराच्या मंडळीची पुंजी *f*, भांडवल *n*, ठोकमाल.

ASSEVERATE *v.* (-*severus*, serious) शपथपूर्वक बोलणें.—ASSEVERATION शपथपूर्वक भाषण *n*.

ASSIDUITY (-*sedere*, to sit) उद्योग, व्यासंग, अभ्यास.—ASSIDUOUS *a.* उद्योगी, व्यासंगी, व्यवसायी; performed with constant diligence or attention झटून -लक्ष्य लावून केलेला (labor); attentive सावध, हुशार [at].

ASSIGN *v.* (-*signare*, to mark out) नेमून -लावून देणें (a limit); appoint for a particular purpose विशेष कामाकरितां नेमणें, नियोजणें; allot नांवानें वांटा काढून ठेवणें;

Law, make over to another दुसऱ्याच्या स्वाधीन क. -सोपणें; transfer to, and vest in, certain persons, called *assignees*, for the benefit of creditors सावकारांस वांटून देण्याकरितां (जिंदगी) मुखत्यारांच्या स्वाधीन क.;—a reason कारण लावणें -सांगणें [to]. -EE, a person to whom an assignment is made तैनाती; a person deputed by another मुखत्यार, वकील; नादार जिंदगीची व्यवस्था करणारा, मुतालिक, 'असैनी.' -MENT —of land जाहगीर *f*; on the revenues वरात *f*, तनखा *f*.

ASSIMILATE *v.* (-*similis*, like) सारखा -सादृश क.; convert into a like substance समपदार्थ क.: food is *assimilated* by conversion to animal substances.-*i*. सारखा होणें; जिरणीस पडणें, पचणें.—ASSIMILATION सारखा करणें *n*, समीकरण *n*; सारखेपणा, समता *f*, अनुगुण;—of food परिपक्कता *f*, विपाक.

ASSIST *v.* (-*sistere*, to stand) मदत क. -ANCE सहाय *n*, कुमक *f*, मदत *f*. -ANT मदतनीस, हस्तक.— *a*. मदतीचा, सहायकारी -कारक.

ASSIZE, ASSIZES *pl* (-*sedere*, to sit) tribunal न्यायसभा *f*, अदालत *f*; statute for determining weight or price निरखाचा कायदा; market rate बाजार निरख -भाव.— *v*. कायद्यानें दर -भाव ठरवणें -नेमणें; कराचा दर ठरवणें.

ASSOCIATE *v.* (-*sociare*, to join) join in company, as a friend संगत -सोबत करून देणें, जूट घालून देणें: to a. others *with* us in business; unite in the same mass मिळवणें: particles of matter *associated* with other substances.— *i*. संगत -सहवास क. -होणें: congenial minds are disposed to a.— *a*. संयुक्त; joined in interest or purpose मिलाफी, सामील, एकचित्त; confederate संगनमति; संगती, जोडीचा: an a. judge.—*n*. सोबती, भागीदार, साथी; a. in crime सागया.—ASSOCIATION संयोग क. *n*, संयोजन *n*; connection गांठ *f*, प्रसंग, संबंध; संगत *f*, सोबत *f*; union संगम; union of persons in a company or society for some particular purpose सभा *f*, मंडळी *f*: a. for the advancement of science; a benevolent a.

ASSORT *v.* (-*sors*, lot) प्रत -वर्ग लावणें; to furnish with all sorts सर्व प्रकार पुरविणें. -ING विल्हेवारी *f*. -MENT प्रत लावणें *n*, वर्गीकरण *n*; variety of the same kind एकाच जातीचा निरनिराळा प्रकार, थर: an a. of goods.

ASSUAGE *v.* (-*suavis*, sweet) soften हलका -उपशम क. (pain, grief); mitigate शमवणें, थंडावणें, शांतवणें.— *i*. उपशमन -शांत होणें; उतार पडणें, ओसरणें (Gen. viii. 1). -MENT समाधान *n*, प्रशमन *n*; उतार.

ASSUME *v.* (*assumere*, to take) take upon one's self आपणाकडे घेणें, अंगिकारणें; take for granted, or without proof प्रमाणावांचून घेणें; take in appearance वेष धारण क., मिथ्याग्रह क.: to a. the garb of humility.—ASSUMING मगरूर, अभिमानी, आढ्यतेचा. — ASSUMPTION आपणाकडे घेणें *n*, स्वीकरण *n*; प्रमाणा वांचून घेणें *n*, प्रमाणव्यतिरिक्तग्रहण *n*; false a. मिथ्याग्रहण *n*; the thing supposed प्रमाणा वांचून सिद्ध मानलेली गोष्ट *f*, कल्पना *f*; *Logic* प्रतिज्ञा *f*; —of a disguise वेषधारण *n*; taking a person up into heaven स्वर्गारोहण *n*; [*Rom. Cath. and Gr. Churches*, a festival in honor of the ascent of the Virgin Mary into heaven.]

ASSURE *v.* (-*securus*, secure) make sure खचीत क.; render confident by a promise, declaration, or other evidence खातरी क., भरवसा देणें; embolden धैर्य -दिलासा देणें; insure तोट्याची हमी भरणें [to, for,

against]. —ASSURANCE अभयवचन *n*; अभयदान *n*, अभयप्रमाण *n*; promise भाक *f*, प्रतिज्ञा *f*, वचन *n*; firm persuasion दृढनिश्चय, निर्धार, धडा (Heb. x. 22); intrepidity धारिष्ट *n*: brave men meet danger with a.; impudence धिटाई *f*; trust in self उमेद *f*, दम, भरवसा: testimony of credit निशा *f*, खातरी *f*; तोटयाची हमी *f*. —ASSURED खातरी झालेला, निश्शंक, निभ्रांत. -LY *ad.* निश्चयपूर्वक, निःसंदेह, निश्चयें, खचित.

ASTERISK (*Gr.* *aster*, star) फुली *f*, चौफुली *f* [*].—ASTERISM नक्षत्रगण.

ASTERN* *ad.* (*a* and *stern*) गलबताचे पिछाडीस.

ASTEROIDS (*Gr.* *aster*, star, *eidos*, form) मंगल आणि बृहस्पति यांच्या कक्षेमध्यें जे उपग्रह आहेत त्यांतला एक.

ASTHMA (*Gr.*) दमा, श्वास, धाप *f*.—TIC *a.* दम्याचा *n*, दम्यासंबंधी; affected by asthma धापकरी.

ASTONISH *v.* (-*tonare*, to thunder at) strike dumb with sudden fear, terror, surprise, or wonder चकित -विस्मित -दंग क. [with, by, at]. -ING *a.* विस्मित करणारा, चमत्कारिक, आश्चर्यकारक. —MENT आश्चर्य *n*, विस्मय *n*, अचंबा.

ASTOUND, see ASTONISH.

ASTRAY* *ad.* (*a* and *stray*) आडवाटेनें, वाट चुकून: before I was afflicted I went a. (Ps. cxix. 67); to go a. बहकणें; to lead a. बहकावणें.

ASTRIDE * *ad.* (*a* and *stride*) दोहींकडे पाय टाकून -ठेवून, घोडेबसणी.

ASTRINGENCY (-*stringere*, to bind) तुरटपणा, स्तंभक गुण.—ASTRINGENT *a.* binding स्तंभक (medicines).—*n.* स्तंभक औषध *n.*

ASTROLOGY (*Gr.* *aster*, star, *logos*, a discourse) art of judging of the influences of the stars, and of foretelling future events by their position and aspects प्रश्न -मुहूर्त्त ज्योतिषविद्या *f*, दैवप्रश्न, फलज्योतिष *n*.—ASTROLOGER शकुन्या, गणक, दैवज्ञ.—ASTROLOGICAL *a.* फलज्योतिष संबंधी.

ASTRONOMY (*Gr.* *aster*, star, *nomos*, a law) the science which treats of the celestial bodies ज्योतिषशास्त्र *n*, खगोलविद्या *f*.—ASTRONOMER ज्योतिषी, खगोलवेत्ता.— ASTRONOMICAL *a.* ज्योतिष विद्येसंबंधी. -LY खगोल विद्येप्रमाणें, ज्योतिषशास्त्रानुसार.

ASTUTE *a.* (*astutus*, cunning) शहाणा, धूर्त्त, चतुर [in].

ASUNDER *ad.* (*a* and *sunder*) वेगळा, अलग, पृथक्; in comp. वि: विछिन्न.

ASYLUM (*Gr.* -*sulon*, plunder) a place of retreat थारा, आश्रय, ठाव; an institution for the protection of the unfortunate अनाथगृह *n*, धर्मशाळ *f*.

AT *prep.* near to जवळ, पाशीं; noting time क्षणींच; towards कडे: to aim an arrow a. a mark; a. the house घरीं; a. the minute क्षणीं; a. this time तत्क्षणीं; a. last शेवटीं; a. least निदान; a. leisure रिकाम्या वेळीं; a. most फार केलें तर; a. night रात्रीं, रात्री; a. once एकदम; एकाएकीं; एकदां; a. pleasure खुशी प्रमाणें; a. present तूर्त, हल्लीं; a. random बेशिस्त; a. sight दर्शनी, देखत; a. the well विहिरीवर; a. war लढाईत गुंतलेला, लढाईवर; a. hand हाताशीं, हाजर; a. all times सर्वदा, हरघडी.

ATHEISM (*Gr.* -*theos*, god) disbelief or denial of the existence of a God नास्तिकमत *n*, निरीश्वर वाद.—ATHEIST नास्तिक.

ATHIRST *a.* (*a* and *thirst*) तान्हेला, तृषार्त.

ATHLETE (*Gr.* *aethlos*, contest) पेहेलवान, जेठी, मल्लयोद्धा.—ATHLETIC *a.* पहिलवानाचा, मल्-

क्रीडासंबंधी; vigorous धट्टाकट्टा, जोरकस; a. exercise कसरत *f*.

ATHWART* *a*. (*a* and *thwart*) आडवा, मध्यें.—*ad*. उफराटा, गैरशिस्त, अन्यायानें.

ATLAS (*Gr*.) नकाशांचें पुस्तक *n*.

ATMOSPHERE (*Gr*. *atmos*, vapor, *sphaira*, sphere) whole mass of aëriform fluid surrounding the earth वातावरण *n*, मेघमंडळ *n*.—ATMOSPHERICAL *a*. वातावरण वाय्वावरण संबंधी.

ATOM (*Gr*. *atomos*, uncut) an *ultimate*, indivisible particle of matter परमाणु. अणु, fig. anything extremely small लव, लेश; अतिसूक्ष्म पदार्थ. -IC, -AL *a*. परमाणूचा, परमाणुमय; परमाणुसंबंधी; सूक्ष्म, फार बारीक. -ISM, the doctrine of atoms; a system which, assuming that atoms are endued with gravity and motion, accounted for the origin and formation of all things परमाणुवाद.

ATONE *v*. (*at one*) make reparation, compensation, amends, or satisfaction for an offense or a crime निस्तरणें, भरून देणें, बदला देणें. -MENT मिलाफ, समेट (Rom. v.11); निस्तरणें *n*, निष्कृति *f*; *Theol*. the expiation of sin made by the obedience and personal sufferings of Christ प्रायश्चित्त *n* [for].

ATRABILARIAN, ATRABILARIOUS, *a*. (*atra bilis*, black bile) affected with melancholy, which the ancients attributed to the black bile उदास, उदासवृत्तीचा.

ATRAMENTOUS *a*. (*ater*, black) शाईसारखा, काळा.

ATROCIOUS *a*. (*atrox*, cruel) अतिदुष्ट, घोर. -NESS उग्रता *f*, क्रूरता *f*, घोरपणा.—ATROCITY महापाप *n*, अतिदोष, घोरकर्म *n*.

ATTACH *v*. *F*. tie बांधणें; take by legal authority जप्त क., टांच लावणें;—to, win the heart of मन ओढणें, प्रीति -स्नेह जोडून घेणें; connect with जोडणें, लावणें; adhere चिकटणें; fig. apply लावणें, आरोपणें [to, for]. -ED जप्त केलेला, जप्त; स्नेही, अनुरक्त, तत्पर, परायण, आसक्त; जडीव, लावलेला; युक्त, सलग्न, आरोपित. -MENT जप्ति *f*; a. after judgment पक्की जप्ति *f*; प्रीति *f*, स्नेह, निष्ठा *f*, आसक्ति *f*.

ATTACK *v*. *F*. assault चढून -चालून जाणें, हल्ला क.;— insidiously गुप्तघाला घालणें; suddenly छापा घालणें; begin a controversy with (शब्दांनीं अथवा लिहिण्यानें) वाद -भांडण चालू क. ; to a. in front आघाडीमारणें [with].—*n*. हल्ला, घाला;—of a band of robbers दरवडा; first invasion चढाई *f*, उचल *f*.

ATTAIN *v*. (-*tenere*, to hold) gain मिळवणें, संपादणें ; equal बरोबरी क.—*i*. reach पोंचणें, पावणें (Acts xxvii. 12); come or arrive, by an effort of mind संपादन -प्राप्त होणें (Ps. cxxxix. 6) [to, by]. -ABLE *a*. मिळवायाजोगा, प्राप्य; येण्याजोगा, आगम्य; संपादायाजोगा, साध्य. -MENT संपादणूक *f*, प्राप्ति *f*, उपलब्धि *f*; that which is attained लाभ, सिद्धि *f*; difficult of a. दुर्लभ; easy of a. सुलभ.—*pl* संपादित गुण.

ATTEMPER, -ATE *v*. (-*temperare*, to soften) moderate by mixture मिसळ घालून माफक क. : to a. heat by a cooling mixture; soften नरम -हलका क.: to a. rigid justice with clemency; regulate कायद्यांत ठेवणें : a mind well *attempered* with kindness and justice; adapt जम -जुवा बसविणें: arts *attempered* to the lyre.

ATTEMPT *v*. (-*tentare*, to touch) try यत्न -उद्योग क.; attack हल्ला क.: to a. the enemy's camp. —*i*. यत्न क. — *n*. यत्न, उद्योग; हल्ला.

ATTEND *v*. (-*tendere*, to stretch) be united to जडून -लागून असणें : a cold *attended*

with fever; go or stay with बरोबर जाणें किंवा राहणें; serve सेवा -चाकरी -खिजमत क.; be present हजीर -समीप -जवळ असणें; await बरोबर येणें -राहणें : happiness or misery *attends* us after death ;—as a physician औषध देणें; शोध -समाचार घेणें.—*i.* listen ऐकणें, लक्ष्य देणें (Ps. lxxxvi. 6); on, upon, wait on भक्ति -चाकरी -सेवा -शुश्रूषा क. [to, upon, on]. -ANCE हाजर असणें *n*, सेवा करणें *n* &c.; ध्यान *n*; अवधान *n*; चाकरी *f*, परिचर्या *f*, सेवा *f*; हजिरी *f*; retinue जिलीव *f*. -ANT हुजऱ्या, खिदमतगार, अनुचर.—*a.* बरोबर असणारा.—ATTENT, -IVE *a.* सावधान, तत्पर, एकचित्त. -ION, लक्ष्य *n*, चित्त *n*, मन *n*;—to one object एकाग्रता *f*; act of civility बरदास्त *f*, ताजीम *f*, तवाजू *f*, समाचार, आगतस्वागत *n* : a. to a stranger.

ATTENUATE *v.* (-*tenuare,* to make thin) बारीक -पातळ -कृश क.; break into very minute parts फोडून बारीक तुकडे -चुरा क.—ATTENUATION बारीक करणें *n*, कृशीकरण *n*.

ATTEST *v.* (-*testis,* witness) साक्ष देणें -घालणें; give proof of -चा दाखला -चें प्रमाण देणें : the ruins of Palmyra a. its ancient magnificence; call to witness साक्षीस ठेवणें. -ATION साक्ष *f*, प्रमाण *n*.

ATTIRE * *v.* पोषाक घालणें, वस्त्र नेसवणें. —*n.* पोशाक, वेष, लिभास.

ATTITUDE (*aptus,* suited) posture ठाणमाण *n*, आसन *n*; position स्थान *n*, अवस्था *f*.

ATTORNEY *F.* one who is legally appointed by another to transact any business for him मुखत्यार, मुनीम; a. at law वकील; power of a. वकिलातनामा, मुखत्यारपत्र *n*.

ATTRACT *v.* (-*trahere,* to draw) ओढून घेणें, आकर्षण क.; allure मोहणें, भुलवणें [from, to, by, with]. -ION आकर्षण *n*; मोहन *n*, प्रलोभन *n*; a. of gravitation गुरुत्वाकर्षणशक्ति *f*; capillary a. केशाकर्षण *n*; *pl* मोहक गुण. -IVE *a.* आकर्षण करणारा, आकर्षक; मोहक.

ATTRIBUTE *v.* (-*tribuere,* to give) consider as belonging -चा आहे असें मानणें -आरोपणें, घालणें (power, quality); give as due यथान्याय देणें : a. to God all the glory of the redemption; impute as a cause लावणें, आरोपणें.—ATTRIBUTION गुण, धर्म. — ATTRIBUTABLE *a.* -कडे लावायाजोगा, आरोपणीय, आरोप्य.—ATTRIBUTIVE *n.* विशेषण *n*. — *a.* वाच्य, विशेषक -LY *ad.* *Gram.* विशेषणरूपानें.

ATTRITION (-*terere,* to rub) झिजणें *n*, घर्षण *n*; waste by a. झीज *f*, घस *f*; *Theol.* grief for sin arising only from fear of punishment or feelings of shame भय -लज्जामूलक पश्चात्ताप.

ATTUNE *v.* (-*tonus,* tune) सूर लावणें -मिळवणें; make accordant जम -मेळ बसवणें [to].

AUBURN (*albus,* white) reddish brown पिंगट, सोनसळा; bright a. गोरा, भुरका, पांडुवर्ण.

AUCTION (*augere,* to increase) लिलांव *n*, लिलाम *n*. -EER लिलांव करणारा -वाला.

AUDACIOUS *a.* (*audere,* to dare) impudent उद्धट, धीट, निर्लज्ज; bold in wickedness दुष्टाई करण्यांत धारिष्टवान -साहसिक; committed with, or proceeding from, daring contempt of law कायद्यास न जुमानून केलेला (crime). —NESS, AUDACITY उद्धटपणा, औद्धत्य *n*; धीटपणा, साहस *n*.

AUDIBLE *a.* (*audire,* to hear) capable of being heard ऐकायास योग्य, श्राव्य; loud enough to be heard ऐकूं येईसा, कर्णगोचर [to].— AUDIBLY *ad.* ऐकूं येईसा, कानीं पडेसा. — AUDIENCE ऐकणें *n*, श्रवण *n*; admittance to a hearing सुनावणीची मुलाखत *f*, कानावर मजकूर घालण्याची

भेट *f*; an assembly of hearers श्रोते *pl*, श्रोतेमंडळी *f*; a. chamber सुनावणीची जागा *f*, दिवाणखाना; श्रोते बसण्याची जागा *f*.—

AUDIT *n*. examination तपासणी *f*; a final account हिशेबाची शेवटची तपासणी *f*.—*v*. हिशेब तपासून -रुजू पाहून बार क. -OR हिशेबाची तपासणी करणारा, तजकरनीस; ऐकणारा, श्रोता. -ORY *a*. श्रवण संबंधी; having the power of hearing श्रवणशक्तीचा.—*n*. an assembly of hearers श्रोतेमंडळी *f*; a lecture-room पाठ सांगण्याची जागा *f*, पाठशाला *f*.

AUGER* सामता, बरमा.

AUGHT * किंचित, कांहीं.

AUGMENT *v*. (*augere*, to increase) वाढविणें, वृद्धि क. [by, with]. —*n*. वृद्धि *f*, वाढ *f*; *Gram*. an increase of the quantity of the initial vowel आगम. -ATION वृद्धि *f*, वाढ *f*; *Med*. चढ, भरतें *n*.

AUGUR (*L*.) शकुनग्राहणारा, शकुन्याजोशी.—*v*. पूर्वी सुचविणें -दर्शविणें.— *i*. शकुनावरून -चिन्हावरून समजणें -अनुमान क. -ED प्रदर्शित. — AUGURY शकुनविद्या *f*; an omen शकुन.

AUGUST *a*. (*augere*, to increase) majestic प्रतापशाली, प्रभावशाली.—*n*. (from *Augustus*) इंग्रजी सालाचा आठवा महिना,श्रावण भाद्रपद. -NESS प्रताप; magnificence वैभव *n*. -AN *a*. आगस्तस बादशहाचा -च्या वेळेचा (age).

AUNT (*amita*) sister of one's father आत *f*, मावळण *f*; of one's mother मावसी *f*.

AURICLE (*auris*, ear) the external ear कान, कर्ण; one of the two muscular sacs situated at the base of the heart रक्ताशयाचा एक अवयव आहे.—AURICULAR *a*. कानाचा, कर्ण संबंधी; told in the ear कानांत सांगितलेला, गुप्त (confession); known by the sense of hearing कर्णगोचर; a. evidence शब्दप्रमाण *n*; traditional कानोकानीं आलेला, कर्णपरंपरागत (traditions); आरिकल नामक रक्ताशयाच्या अवयवाचा.

AURORA (*L*.; *Skr*. *ushásá*, *auróra*) पहाट *f*, अरुणोदय; a. borealis उत्तरेकडील प्रकाश; a. australis दक्षिणेकडील प्रकाश.

AUSPICE *a*. (*avis*, bird, *spicere*, to inspect) पक्ष्याच्या गतीवरून काढलेला शकुन; *pl* कृपादृष्टि *f*, नेकनजर *f*, आश्रय.—AUSPICIOUS *a*. शुभ, श्रेयस्कर; prosperous सभाग्य, यशस्कर (person); favorable प्रसन्न, अनुकूल; an a. moment शुभलग्न *n*.

AUSTERE *a*. (*austerus*) severe करडा, कठोर, खरमरीत, निष्ठुर (master, look); sour आंबटढाण, खट्टा (fruit).—AUSTERITY अंबटपणा, खट्टेपणा; करडेपणा, खरमरीतपणा: *pl* तप *n*, तपश्चर्या *f*, देहदंडन *n*.

AUSTRAL *a*. (*L*.) दक्षिणेचा -कडचा (ocean, land).

AUTHENTIC, -AL *a*. (*Gr*. *authentes*) having a genuine original authority सप्रमाण, प्रमाणसिद्ध; genuine खरा, असल, बिन्तीम, (paper, register); trustworthy विश्वासू, खातरीचा (writer). -ATE *v*. खरा क., सप्रमाण -सत्य क.—AUTHENTICITY खरेपणा, असलपणा.

AUTHOR (*auctor*) creator उत्पन्नकर्ता, सृष्टा: God is the a. of the universe; the first mover प्रवर्त्तक; one who writes a book ग्रंथकर्ता -कार. -ESS ग्रंथकरणारी *f*, ग्रंथकर्त्री *f*.

AUTHORITY (do.) legal or rightful power सत्ता *f*, अखत्यार, अधिकार (Matth. xxi. 23); influence वजन *n*, चलती *f*, कदर *f*, भारदस्ती *f*: a magistrate of great a.; testimony साक्ष्य *f*, साक्ष *f*; the Gospels are our a. for the miracles of Christ; credibility खरेपणा, श्रद्धेयता *f*: an historian of no a.; received text आप्तवचन *n*; a precedent मागला दाखला -लेख -उदाहरण *n*; [a decision of a court, an

official declaration, or an opinion, saying, or statement worthy to be taken as a precedent; also a book that contains them, or the name of the author]. — AUTHORITATIVE *a.* प्रमाणाचा, सप्रमाण; imperative दबदब्याचा, दरान्याचा, धनीपणाच्या डौलाचा. -LY *ad.* प्रमाण सांगून -दाखवून, सप्रमाणतः; दाबानें. — AUTHORIZE *v.* give right to act करण्याची अखत्यारी -मुखत्यारी देणें; make legal कायद्यानें स्थापणें, कायदेशीर क., विध्युक्त क. (a marriage); establish by authority विधि -आचार -प्रमाण -चाल इ० कडून स्थापणें, विहित क.: idioms *authorized* by usage; give authority, credit, reputation, or support to पुष्टीकरण क., पुरवणी क., संभाळणें (a report).

AUTOBIOGRAPHY (*Gr. autos*, self; and *biography*) आपणच आपला लिहिलेला वृत्तांत, आत्मचरित्र *n.*

AUTOCRACY (*Gr. -kratos*, strength) स्वतंत्रशक्ति *f*; एकाच्याच हातांत कुल मुखत्यार, स्वाधिपत्य *n*, मुखत्यारी *f*.—AUTOCRAT मुखत्यार राजा, सम्राट्;—a title assumed by the emperor of Russia.

AUTOGRAPH (*Gr. -graphein*, to write) स्वदस्तूरचा लेख, स्वहस्ताक्षर *n.*

AUTOMATON (*Gr. -maein*, to move) आपोआप चालणारें यंत्र *n*, स्वयंवह यंत्र *n.*

AUTUMN *n.* (*autumnus*) season between summer and winter खरिपाचे दिवस *pl*, शरत्काल; latter half उत्तरार्द्ध; third stage तृतीयावस्था *f.* -AL *a.* शरत्कालाचा.

AUXILIARY *a.* (*auxilium*, aid) सहायकर्त्ता, कुमकेचा.—*n.* साह्यकारक क्रियापद; *pl* foreign troops in the service of a nation at war युद्धप्रवृत्त सरकारच्या सहायार्थ परकी सैन्य *n*, कुमकी लष्कर *n.*

AVAIL *v.* (*-valere*, to be strong) profit फायदा क.; one's self आपला फायदा करून घेणें; aid सहाय क., कामीं -उपयोगीं पडणें: artifices will not a. a sinner in the day of judgment.—*i.* कामास पडणें -येणें: this scheme will not a.—*n.* फायदा, लाभ, फळ *n*; use प्रयोजन *n*, उपयोग; *pl* उत्पन्न *n*, विक्रीचा पैसा. -ABLE *a.* उपयोगी पडण्याजोगा, कामाचा (funds); नफ्याचा, लाभदायक; valid बळकट, प्रबल (plea).

AVALANCHE *F.* डोंगरावरून लोटत येणारी बर्फाची धोंड *f.*

AVARICE (*avarus*) द्रव्यलोभ, लोभ.—AVARICIOUS *a.* धनलोभी, लोभी, कृपण.

AVAUNT *int. F.* चलजा, नीघ.

AVENGE *v.* (*-vindicare*, to revenge) सूड उगवणें [by]. — AVENGER सूड उगवणारा; "a. of his people" भक्तकाजकैवारी.

AVENUE (*advenire*, to come to) a passage द्वार *n*, मार्ग; a walk in a park or garden दुतर्फा झाडांचा रस्ता.

AVER *v.* (*-verus*, true) प्रतिज्ञेनें -निश्चयानें सांगणें -बोलणें.

AVERAGE *F.* मध्यप्रमाण *n*, बस्तान *n*, शेरा.—*a.* सरस, मध्यप्रमाणाचा, सरासरीचा.

AVERT *v.* (*-vertere*, to turn) टाळणें, निवारणें, चुकवणें, फिरवणें [from].—AVERSE *a.* disliking कंटाळा -त्रास करणारा; not favorable प्रतिकूल, पाठमोरा, विन्मुख [to].—AVERSION *n*, कंटाळा, त्रास, तिटकारा; प्रतिकूलता *f*, पराङ्मुखता *f* [to, for].

AVIARY (*avis*, bird) पक्ष्यांचा शिकारखाना, पक्षिशाला *f.*

AVIDITY (*avere*, to long) अधाशीपणा, हवरेपणा, अतिलोभ.

AVOCATION (*-vocare*, to call) कामावरून बोलावणें *n*; the business which calls aside काम *n*, धंदा, बोलावणें *n.*

AVOID *v.* (*-vitare*) shun टाकणें, वर्जणें: a. bad company; *Pleading*, evade टाळणें, चुकवणें; annul रद्द क., खोडणें. -ABLE *a.*

टाळायाजोगा, परिहार्य. -ANCE त्याग, वर्जन *n*; रद्द क. *n*.

AVOIRDUPOIS *a.* & *n.* *F.* साकर, तूप, गवत, दाणा वगैरे तोलण्याचें विलायती वजनाचा, -चें वजन *n*.

AVOUCH *v.* (*-vocare,* to call), See AVER.

AVOW *v.* (*vovere,* to vow) confess frankly कबूल क., पदरीं घेणें; declare openly उघडपणें बोलणें [to]. -AL कबूली *f*, अंगिकार, स्वीकार.

AWAIT *v.* (*a* and *wait*) wait for वाट पाहणें, मार्गप्रतीक्षा क.; be in store for -करितां राखलेला असणें, -च्यासाठीं तयार असणें : a glorious reward *awaits* the good.

AWAKE * *v.* (*a* and *wake*) wake जागा -जागृत क.; put into action, or new life सचेतन क. —*i.* जागा -सावध होणें, उठणें.— *a.* जागृत, सावध, प्रबुद्ध.—AWAKEN *v.* उठवणें, जागा क. -ING जागाकरणारा, प्रबोधक (discourse, dawn).—*n.* जागा करणें *n*, उठवणें *n*; a revival of religion धर्मसंजीवन *n*.

AWARD * *v.* निवाडा -फैसला करून देवविणें.— *n.* निवाडा, फैसला, निर्णय; written a. हुकूमनामा.

AWARE * *a.* watchful सावध, हुशार; apprised माहितगार झालेला, विज्ञापित.

AWAY* *ad.* दूर, लांब; to go a. निघून जाणें; give a. देऊन टाकणें; I cannot a. with it माझ्यानें तें सोसवत नाहीं; a. with चल निघ, चल; to make a. with मारणें, ठार क.

AWE* reverential fear धाक, दरारा, वचक *f*, आदरप्रयुक्त भय *n*. (Ps. iv. 4); to stand in a. of वचकणें. — *v.* influence by reverential fear धाक -जरब बसविणें. -STRUCK *a.* धाक बसलेला, विस्मयाकुल. —AWFUL *a.* धाकाचा, जरबेचा; भयंकर, घोर; worshipful, आदरनीय, पूज्य.

AWHILE* *ad.* (*a* and *while*) कांहीं वेळ, अमळ, क्षणभर.

AWKWARD* *a.* —of persons अडाणी, हेंगाडा, अडमूठ, गवत्या; — of things ओबडधोबड, बेढब-डौल; disagreeable नडीचा, गैरसोईचा, अडचणीचा.

AWL* चांभाराची आरी *f*.

AWN* कुसळ *n*, कुसूं *n*.

AWNING *Goth.* चांदणी *f*, छत *n*, चांदवा.

AWRY* *ad.* तिरकस, तिरवा, वांकडा.

AXE, AX* कुऱ्हाड *f*.

AXIOM (*axioma,* that which is thought worthy) a self-evident and necessary truth प्रत्यक्ष प्रमाण *n*; maxim सूत्र *n*, वचन *n*. -ATICAL *a.* प्रत्यक्ष प्रमाण संबंधी.

AXIS (*L.*) AXLE, -TREE कणा, आंस, अक्ष, ध्रुव.

AY* *ad.* होय, बरें, हो.

AYE* *ad.* सर्वदा, सतत, निरंतर.

AZIMUTH *Ar.* समकोण, समांश.

AZURE *a.* *F.* आकाशवर्ण, नीलवर्ण, अस्मानी रंगाचा. — *n.* नीलवर्ण, अस्मानी रंग.

B.

BAA बें *n*.—*v. i.* बेंबावणें.

BABBLE *v.* *Ger.* prate like a child बोबडें बोलणें; talk thoughtlessly बकणें, दडबडणें; make a constant murmuring noise, as a small stream running over rocks खळखळणें. — BABBLER बडबड्या, वाचाळ, जल्पक; a teller of secrets जिभेचा हलका, लुतरा; a bird, Timalia Malcomi कोकाटी *f*; the Bengal b. सातभाई *f*.—BABBLING वटवट *f*, बकबक *f*.

BABE *Ir.* तान्हेंमूल *n*, बाल *n*.—BABY *n.* तान्हेंमूल *n*, अर्भक *n*; a doll बाहुली *f*. — *a.* लहान बाळासारखा, बाल (eyes).

BABEL *Heb.* the name of a city in the land of Shinar, where the confusion of languages took place (Gen. xi. 9) शिनार देशांतील एका शहराचें नांव *n*; तेथें भाषांची भेळमेळ झाली; confusion बलबलपुरी *f*, बलबल *f*.

BABOON माकडांची एक जात आहे.

BACCHANAL, -IAN *n.* (*Bacchus*, the god of wine) दारूबाज, छाकटा, मद्यपि.—*a.* धामधुमीचा, धुमश्चक्रीचा.—BACCHANALS, BACCHANALIA दारू पिण्याचा उत्साह, पानोत्सव.

BACHELOR *F.* a man of any age who has not been married अविवाहित पुरुष, बालब्रह्मचारी; person who has taken the first degree in the liberal arts, at a college or university पाठशाळेंतील पहिली पदवी ज्यास मिळते तो; [a young knight].

BACK* the upper or hinder part of an animal, from the neck to the loins पाठ *f,* पृष्ठ *f;* a broad high ridge पठार *n;* the part opposed to the front पाठ *f,* पृष्ठभाग: the b. of a book; hinder part of a thing पिछाडी *f,* पाठ *f:* the b. of an army; the thick and strong part of a cutting tool सुरी वगैरे हत्याराची पाठ *f;* to turn the b. on one धिःकारणें; to cast behind the b. विसरणें, क्षमा क. (Is. xxxviii. 17); to plough the b. पाठीवर धोंड -तुळई ठेवणें, काचणें; to bow the b. दबणें, वें झणणें (Rom. xi. 10); behind the b. पाठीमागें, परोक्ष; on the b. of पाठकुळी; to turn the b. on one पाठमोरा होणें, सोडणें; at the b. of, lit. fig. पाठीवर -मागें.—*ad.* पाठीमागें, परत : to go b.; to a former state पहिल्या स्थितीस: to go b. to poverty; away from contact मागें, उलट (Matth. xxviii. 2); behind मागें : to keep b. a part; in return परतून, परत : give b. the money; towards things or times past परत, मागें : to look b. on former ages.—*v.* पाठीवर चढणें, स्वार होणें; strengthen by aid पाठ देणें -राखणें -उचलणें, पाठबळ देणें; cause to retreat माघारीं फिरवणें (oxen); furnish with a b. पाठ क. -लावणें (books); up पाठबळ देणें. माघारां फिरणें -जाणें: a horse refuses to b.—*a.* मागला, मागचा (settlement); उलट, पाठीकडचा (action). -BITE *v.* censure, slander, reproach, or speak evil of, in the absence of the person traduced चहाडी -चुगली क. -सांगणें. -BITER चहाड, चहाडखोर. -BONE पाठीचा कणा -दांडा, पृष्ठास्थि, moral principle धैर्य *n,* दृढनिश्चय *n.* -DOOR परसूं *n,* मागलें दार *n.* -GROUND मागली जागा *f;* the space behind the principal figures of a picture, scene, &c. चित्रांच्या मागली जागा *f;* a place of obscurity गल्लीकुचींतली जागा *f.* -SIDE मागली बाजू *f,* पृष्ठभाग. -SLIDE *v.* सदाचाराचा मार्ग सोडणें, बिथरणें; [turn gradually from the faith and practice of Christianity]. -SLIDER पतित, सन्मार्गत्यागी (Prov. xiv. 14). -STAIRS *pl* आडजिना. -WARD -WARDS, *ad.* पाठमोरा, पाठसामोरा; पाठीकडे -मागें; मागल्या काळाकडे, गतकाळीं; by way of reflection चिंतन -मनन करून; from a better to a worse state बिचलत, बिथरत (in comp.); contrarily उलट्या क्रमानें, उलट. -WARD *a.* unwilling माघार -उलटघेणारा, नाराजी : b. to be slaves; dull मंद, मंदबुद्धि; coming after the usual time मागाहून येणारा, मागस (season); already past गेलेला, गत (year). -NESS नाखुशी *f,* माघार *f;* ढिलेपणा, सुस्ती *f.* -WATER धरून -कोंडून ठेवलेलें (धरणाचें) पाणी *n.*

BACON *F.* खारें केलेलें डुकराचें मास *n;* to save one's b. पागोटें बचावणें, अंगसुटका करून घेणें.

BAD *a.* (*Per. bad*) wanting good qualities, whether physical or moral वाईट, खराब, ओंगळ; injurious बाधक; unfavorable प्रतिकूल, अनिष्ट; vicious दुष्ट, दुर्गुणी, पापिष्ट; b. is often expressed in comp. by दुर, कु, कत; as दुर्जन, कुपथ, कदन्न; b. coin खोटें नाणें *n;* b. sign दुश्चिन्ह *n.* -LY *ad.* वाईट रीतीनें, वाईट. -NESS दुष्टपणा; वाईटपणा, वावडेपणा, बाधकता *f,* &c.

BADGE* चिन्ह *n*, लक्षण *n*, बिरीद *n*, निशाणी *f*.

BADGER* एक जनावर आहे; a person who is licensed to buy corn in one place, and sell it in another एका ठिकाणीं धान्य विकत घेऊन दुसऱ्या ठिकाणीं विकण्याची ज्याला परवानगी असते तो.—*v.* पाठीस लागणें, जीव-खाणें, त्रास देणें.

BAFFLE *v. F.* elude चुकवाचुकव -टाळाटाळ क.; defeat मोड क., लटपटविणें (a purpose) [by, with].

BAG* sack थैला, पोतें *n*;—of money कसा, पिशवी *f*; sac in animal bodies containing some fluid कोश, पिशवी *f*; two-mouthed b. पडशी *f*; four-mouthed b. झोळणा; b. with pockets चंची *f*, वाटवा; treasure-b. of Government पोतें *n*;—of musk मृगनाभ *f*; waterman's b. मसक *f*; [*Com.* a certain quantity of a commodity, such as it is customary to carry to market in a sack; as a b. of pepper.]—*v.* पिशवींत -पोत्यांत -गवसणींत घालणें; capture लढाईत धरणें (an army); load with bags पिशव्यांचें ओझें लादणें: a bee *bagged* with his honeyed venom.—*i.* झोल -फुगारा येणें. -GAGE, the luggage of an army खेल-खाना, बाजारबुणगें *n*; — of any traveller बाडबिछाना, सामान *n*. -PIPE नागसुरासारखें एक वाद्य आहे, सनई *f* resembles it in sound, but not in appearance.

BAGNIO *It.* bath न्हाणघर *n*, हमामखाना; brothel वेश्यालय *n*.

BAIL *v.* (*bajulare*, to bear a burden) set free on security जामीन घेऊन सोडणें; deliver, as goods in trust, for some special purpose विश्वासावर माल हवालीं क.: to b. goods to a carrier.—*n.* security given for the release of a prisoner जामी-नकी *f*; person who procures the release of a prisoner from the custody of the officer arresting him, or from imprisonment, by becoming surety for his appearance in court जामीन; b. for appearance हजीरजामीन, दर्शनप्रतिभू; — for pecuniary surety मालजा°;— for good conduct फैल-खातरजा°. -ABLE *a.* जामीन घेण्याजोगा (an offence);—of persons जामीन घेऊन सोडण्याजोगा (a person).

BAILIFF *F.* a sheriff's deputy, appointed to make arrests, collect fines, summon juries, &c. नाझरच्या हाताखालीं एक कामदार आहे, वर्त्तक; overseer or under-servant on an estate कारभारी, चौकसनीस.

BAIT *v. Icel.* put on or in, as on a hook or in an enclosure, to allure fish, fowl, and other animals into human power घास -आमिष लावणें; give portion of food and drink to, upon the road वाटेवर (जनावरास) दाणापाणी देणें.—*i.* कुत्तरओढ -तोडातोड -हाल हाल क.—*n.* आमिष *n*, घास, लालूच *f*; temptation पेंढीचा खडा, प्रतिलोभन *n*, गूळ-खोबरें *n*

BAIZE (perhaps from Base) लोंकरी पट्ट.

BAKE* *v.* भाजणें;—by fire अग्निपुट देणें; by the sun सूर्यपुट देणें; harden by cold थंडीनें कठीण क.: the earth is *baked* by frost. —*i.* भाजणाराचें -भट्यान्याचें काम क., भाकरी भाजणें: she washes and *bakes*; dry and harden in heat उष्णतेनें वाळून कठीण होणें, भाजणें: the ground *bakes* in the hot sun. —BAKER भाजणारा, रोटीवाला.—BAKERY रोटी -तंदूरखाना, 'बेकरी' *f*.

BALANCE (*bis*, twice, *lanx*, scale) तराजू *f*, ताजवा; just proportion समतोलपणा: the b. of power; the excess on one side वरतवळा, शिलक *f*: the b. of an account; estimate अजमास; beam of a b. दांडी *f*; dish of a b. पारडें *n*; false b. दांडदांडी *f*; fraudulent turn of a b. in weighing झोका; tongue of a b. कांटा; inclination of an equal b. पासंग *n*;—of an account शिलक बाकी *f*; b. brought forward ओढण *f*; b.) for

or against) on a tradesman's books खाते-बाकी *f*; b. -sheet शिलकबंद ; dead b. बुडित बाकी *f*; to settle a b. बाकी पूज क., चुकविणें; b. payable फाजील *f*; a sign of the zodiac तूळरास *f*; an impartial state of the mind in deliberating समान चित्तवृत्ति *f*, विवेचन *n.*—*v.* तोलणें, वजन क.;—an account शिलक -झाडा काढणें -उतरणें, जमाखर्च पाहणें; scales पासंग बांधणें -क.; समतोल क.; अजमास काढणें -पाहणें : b. the good and evil of things.—*i.* समतोल असणें: the scales b.; hesitate गुटमळणें, नानू क.

BALCONY *It.* गच्ची *f.*

BALD *a. Sp.* destitute of the natural or common covering सुना, मुंडा, बुचा, उघडा, नागवा; as of the hair टक्कल पडलेला; inelegant अप्रौढ, असंस्कृत (translation). -HEAD टकल्या. -NESS टक्कल *n*; बुचेपणा, सुनेपणा. -PATE *n.* टक्कल *n*, डोई *f*, मुंडमस्तक *n.*—*a.* टक्कलडोयीचा, टकल्या.

BALE *F.* गठ्ठा, बस्ता, दिंड *n*; strap of a b. दाटणी *f*; wrapper of a b. बारदान *n*, बासन *n.*—*v.* गठ्ठा बांधणें; free from water by dipping पाणी उपसणें (a boat)—*n.* अनर्थ, दुःख *n.* -FUL *a.* अनर्थाचा, संकटाचा; destructive नाशकारक (enemies); full of grief दुःखभरित, खिन्न (eyes).

BALK * a ridge of land left unploughed between furrows, or at the end of a field वरळ *f*, खावडें *n*; a great beam बहाल *n*; disappointment निराशा *f*, आशाभंग.—*v.* नांगरण्यांत वरळ राखणें -सोडणें; टोला देणें, ठकविणें, आशाभंग क.

BALL *Ger.* a round body पिंड, गोळी *f*, गोळा;—of the eye बुबूळ *n*, अक्षिगोल; a bullet गोळी *f*, गोळा;—of the earth पृथ्वीगोल; fire-b. अग्निगोल, उल्का *f*;—of thread गुंडी *f*;— of medicine गुटिका *f*, गोळी *f*; a game चेंडू, कंदुक.—*v. i.* घोड्याच्या पायावर बर्फाचे -स्नोचे गोळे होणें : the horse-*balls*.

BALL (*Gr. ballein*, to toss) a social assembly for the purpose of dancing नाच, 'बाल.'

BALLAD *F.* लावणी *f*, ठुमरी *f*, ग्राम्यगीत *n.* -SINGER शाहीर. -MONGER लावण्या विकणारा.

BALLAST *D.* any heavy substance, as stone, iron, &c., placed in the hold of a vessel, to sink it in the water to such a depth as to enable it to carry sufficient sail without oversetting निलीम *f*, निरीम *f*; gravel, broken stone, &c. laid in the bed of a railroad लोखंडी रस्त्यावरली खडी *f.*—*v.* निलीम भरणें; खडी टाकून मजबूत -कठीण क.

BALLOON *F.* a bag made of silk or other light material, and filled with hydrogen gas or heated air, so as to rise and float in the atmosphere आकाशयान *n*, विमान *n*, 'बलून'; *Chem.* कांचेचें ग्राहकपात्र *n.*

BALLOT *F.* a ball used in voting संमत गुटिका *f*, चिठ्यानीं संमत देणें *n.*—*v. i.* लेखनद्वारा गुप्त संमति देणें.

BALM (*Gr. balsamon*) एक सुगंधित झाड आहे; any fragrant ointment सुगंधित उटणें *n*; anything which heals, or which mitigates pain उपशमक औषध *n.*—BALMY *a.* सुगंधि;—of slumbers गोड, सुखाचा; उपशमक.— BALSAM सुगंधिक उटणें *n*; common b. तेरडा.

BALUSTER *F.* कठड्यांतलागज, गराद *f.*—BALUSTRADE कठडा, कठारा.

BAMBOO *Malay.* वेळू, वंश, कळक, बांबू; clump of *bamboos* बेट *n*; manna of the b. तवकीर *f*; efflorescence of the b. मेळ. —*v.* बांबूनें मारणें.

BAMBOOZLE *v* (?) फसविणें, धत्तुरा दाखविणें, नखांबोटांवर खेळविणें [Low].

BAN *F.* a public notice जाहीरनामा; interdiction मनाई *f*, निषेध ; a curse श्राप *pl* ; notice of a marriage proposed, or of a matrimonial contract, proclaimed in a church, or other place prescribed by law, that any person may object, if he knows of any kindred between the parties, of any pre-contract, or other just cause why the marriage should not take place लग्नाचा जाहीरनामा.

BAND* a fillet पट्टा, पट्टी *f*, बंधन *n* ; means of union between persons लगाबांधा, संबंध ; a company of persons united in any common design, especially a body of armed men जूट *f*, मंडळी *f*, थवा, तांडा ; हत्यारबंद लोकांची टोळी *f*; encompassing belt आटा, आळा, कडें *n* ;—of musical instruments बाजा, नगारखाना ;—of dancing girls and musicians कळवंतणींचा ताफा.—*v.* पट्टीनें बांधणें, वेष्टणें ; जुटणें, जथणें. —*i.* एकहोणें, कट क. -AGE *n.* पट्टी *f*, बंधन *n*. —*v.* पट्टीनें बांधणें, पट्टी बांधणें.

BANDICOOT *Ger.* घूस *f*.

BANDIT *It.* दरवडेखोर, लुटारू, वाटमाऱ्या.

BANDY *F.* a club for striking a ball at play दांडू ; — the play इटीदांडूचा खेळ. —*v.* beat to and fro इकडून तिकडे तिकडून इकडे फेंकणें, टोलवाटोलव क. ; exchange अदलाबदल क., देणें घेणें : to b. hasty words. -LEGGED *a.* फेंगड्या पायांचा.

BANE* poison of a deadly quality जालीम विष *n* ; any fatal cause of mischief, injury, or destruction नाशाचें मूळ *n* -घर *n* : vice is the b. of society. -FUL *a.* विखारा, विषयुक्त ; नाशक, घातक.

BANG *D.* दणका, रपाटा, खणका.— *v.* beat, as with a club दणकावणें, कडकावणें ; thump धडका -टकर मारणें.

BANIAN (*Skr. banik,* merchant) वाणी, बनिया ; the Indian fig tree वडाचें झाड *n*, वड ; a morning gown कुडती *f*, 'बन्यान' *n*.

BANISH *v. F.* condemn to exile हद्दपार करण्याची शिक्षा ठरवणें, देशपार क. ; drive away हाकून -घालवून देणें, काढून टाकणें ; to b. all offence [from, to]. -MENT देशपार क. *n*, देशबहिष्कार.

BANK * a ridge of earth raised above the surrounding level बांध ; side of a watercourse तड, तीर ; shoal भाट, भाटी *f*, लाग ; *Com.* an establishment for the custody, or the loaning, exchange, or issue, of money, and for facilitating the transmission of funds सावकारी दुकान *n*, पेढी *f*, ठेवपेढी *f*, 'ब्यांक' *f*; company of persons concerned in a bank पेढीवाले *pl.* -ER सावकार, हुंडीवाला. -ING *n.* सावकारी *f*.—*a.* सावकारीचा, ब्यांकेचा (operations). -NOTE, a promissory note issued by a bank पेढीवाल्याची देखतहुंडी *f*, 'ब्यांक नोट' *f*. -RUPT (-*ruptus,* broken) दिवाळें निघालेला, नादार. -CY दिवाळें *n*, नादारी *f*.

BANNER *F.* a military ensign बावटा, झेंडा ध्वज ; a streamer पताका *f*.

BANQUET *F.* a feast मेजवानी *f*, भोजनोत्सव —*v.* मेजवानी क.— *i.* खाण्यापिण्याची चैन -धमंडी क. -ING-ROOM रंगमहाल.

BANTER *v. F. ?* उपहास -थट्टा क. — *n.* थट्टा *f* मस्करी *f*, विनोद.

BANTLING *Ger.* लहान मूल *n*, चिटलिंग *n*.

BAPTIZE *v.* (*Gr. baptein,* to dip in water) administer the sacrament of baptism to -ला बाप्तिस्मा देणें, -चा बाप्तिस्मा क.— BAPTISM, the application of water to a person, as a sacrament or religious ceremony, by which he is initiated into the visible church of Christ ख्रिस्ती

मंडळींत प्रवेश करणारास जो जलसंस्कार करितात तो, 'बाप्तिस्मा.' -AL *a.* बाप्तिस्म्या संबंधी. — BAPTIST बाप्तिस्मा करणारा; [applied to John, the forerunner of Christ; one who denies the doctrine of infant baptism, and maintains that baptism ought to be administered only to adults or believers by immersing the body in water]. -ERY बाप्तिस्मा देण्याची जागा *f.*

BAR *n. F.* a long piece of wood or metal, used for various purposes, but especially for a hindrance गज ;—of metal कांब *f*, लगड *f*; a barrier अटक *f*, अडकाठी *f*; —of a door अडसर, अर्गळा *f*; of a railing, window गराद *f*; —a bank at the entrance of a harbor नस्त *n*, बारा, दांडा; place in court where prisoners stand कोर्टांत कैदी उभे राहण्याची कठडेबंद जागा *f*; the railing that incloses the place which counsel occupy in courts कोर्टांत वकील लोक बसण्याची कठडेबंद जागा *f*; [*at the b. of the court*, in open court]; the whole body of lawyers licensed in a court कोर्टांतील सनदी वकिलांची मंडळी *f*; any tribunal न्याय -धर्मसभा *f*: the b. of public opinion. — *v.* अडसर घालणें (a door); अटकाव क., अडविणें: b. the entrance of evil; the statutes b. my right; the laws b. the use of poisoned weapons. -BARRICADE, a fortification made in haste to keep off an attack कच्ची तटबंदी *f*.— BARRIER, a stockade मेढेंकोट, लकडकोट; a fortress or fortified town on the frontier of a country सरहद्दी वरला किल्ला किंवा तटबंदीचा गांव; obstruction अडकाठी *f*, अटकाव; boundary हद्द *f*, मर्यादा *f*.— BARRISTER कोर्टांतला वकील, 'बारिस्तर.'

BARB (*barba*, beard) a crooked point आंकडा, कांटा; beard कुसूं *n*, कुसळ *n*.— *v.* (तिरास -गळास) अंकडा -उलट कांटा लावणें; clothe, as a horse, with armor घोड्यास सशस्त्र -सज्ज क. -ER हजाम, न्हावी.

BARBAROUS *a.* (*barbarus*) savage रानटी, जंगली; cruel निर्दय, क्रूर; coarse हेंगाडा, अपशब्दाचा. — BARBARIAN रानटी माणूस; निर्दय, खाटीक.—BARBARISM रानटीपणा; निर्दयपणा; भाषेचा अशुद्धपणा; a b. कानडें *n*, रांगडें *n*, अपशब्द. — BARBARITY रानटीपणा; क्रूरपणा.

BARD, *Gael.* a poet and singer among the ancient Celts भाट, पोवाडे गाणारा, चारण; a poet कवि.

BARE* *a.* naked उघडा, नागवा, खुला; with b. feet अनवाणी; with the head uncovered from respect बोडका; unadorned सुना, मुंढा, साधा; empty रिकामा, रिता (treasury); mere नुस्ता, केवळ (words); much worn जीर्ण झालेला, जुना (liveries).— *v.* उघडा नागवा क. (the breast). -BONE *a.* रोडका, सुदामदेव; to become *barebones* सांपळा वळणें. -FACED *a.* not masked उघड्या तोंडाचा; shameless निलाजरा, निर्लज्ज. -HEADED बोडका. -LY *ad.* केवळ, मात्र, निस्तुक.

BARGAIN (*barka*, boat) an agreement between parties concerning the sale of property विक्रीचा ठराव; an agreement of any kind कबूलात *f*, बोली *f*, ठराव; a gainful transaction किफायतीचें काम *n*; to strike a bargain टाळी देणें, हातावरहात मारणें.—*v.* विकणें, खंडणें: A *bargained* away his farm.— *i.* करार क., ठरावणें [for, with].

BARGE *D.* a pleasure-boat क्रिडानौका *f*, ऐषआरामाची बोट *f*; a large boat for the conveyance of passengers or goods पडाव.

BARK *D.* the rind साल *f*, त्वचा *f*; inner b. अंतर्साल *f*; Peruvian b. एक औषधी आहे. —*v.* साल काढणें, सोलणें.

BARK * कुत्र्याचें भोंकणें *n*.— *v.* भोंकणें; clamor गलबला -कलकल क.

BARK, BARQUE, *F.* लहान गलबत *n*, 'बारकस' *n*.

BARLEY * जव, सातू. -CORN सातूचा दाणा, जव; about the third part of an inch in length यव. -SUGAR कोरडी साकर उष्ण करून तिचा रस झाल्यावर तो तसाच निवूं दिला ह्मणजे तिचा जो पिवळा कांचरूप गोळा बनतो तो, 'बार्लिशुगर' *f*.

BARM * सातूच्या दारूवरची साय *f*.

BARN * धान्य, गवत, ताग इ०चें कोठार *n*.

BARNACLE *F.* खुबा, खुबडी *f*.

BAROMETER (*Gr.* *baros*, weight, *metron*, measure) an instrument for measuring the weight of the atmosphere वायुभार-मापक यंत्र *n*.

BARON *F.* विलायतेंत एक बडे लोकांची पदवी आहे [*barons* of the exchequer, the five judges who try cases between the king and his subjects relating to the revenue); b. of beef गायीच्या कासेचें मास *n*, गांपृष्ठ भाग. -ESS बारन पदवीच्या गृहस्थाची पत्नी *f*. -ET बारनच्या खालची एक पदवी आहे.

BARRACK *Sp.* शिपाई लोक राहण्याची चाळ *f*, 'बराक' *f*, *n*.

BARREL *F.* wooden cask पीप *n*, पिंप *n*; tube of a gun बंदुकीची नळी *f*.— *v.* पिपांत घालणें -ठेवणें -भरणें.

BARREN * *a*. unprolific वांझ, वंध्या; —land नापीक, उखीर; unaffected उदास, निस्पृह (spectators). -NESS वांझपणा, वंध्यत्व *n*.

BARRICADE, See under BAR.

BARROW* a small carriage moved by the hand हातगाडी *f*; a hog डुकर; a mould मातीची रास *f*-चा ढिगार.

BARTER *F.* साटेलोटें *n*, मोबदला, विनिमय.—*v.* साटेलोटें क.

BASALT (*basaltes*) एक कठीण काळा पाषाण आहे.

BASE (*basis*) the bottom तळ, पाया, बूड *n*;—the pedestal of a statue बैठक *f*, बसक *f*, पात्र *n*;—of a vessel पडघी *f*; *Mus.* the gravest male voice घोर, धूम; *Chem.* the principal element of a compound मिश्रपदार्थांतील मुख्य तत्व *n*; *Geom.* the line constituting that part of a figure on which it is supposed to stand भूमि *f*; *Mil.* a tract of country protected by fortifications, or by natural advantages, from which the operations of an army proceed युद्धप्रसंगीं सैन्याच्या रक्षणार्थ ज्या जागीं तटबंदी करून तेथून पुढें लढाईचें काम चालवितात ती जागा *f*; a rustic play वाघबकरी *f*.—BASS तंतुवाद्याचा खरजसूर, नीचसवन *f*. -RELIEF, sculpture whose figures do not stand out far from the ground on which they are formed प्रतिछाया *f*.—BASSOON, a wind instrument भोंवारा.—BASE *a*.(*basis*) mean हलका, नीच, उणा; of humble birth and low degree हलक्या कुळांत जन्मलेला; of illegitimate birth बटकीच्या पोटचा; low in value उणाख, हीन (metals); illiberal कृपण; not classical असंस्कृत, प्राकृत : b. Latin.

BASHFUL *a*. *F.* having a downcast look अधोमुख -दृष्टि; very modest लाजाळू, लाजरा, भिडस्त; sheepish मेंगा, गायतोंड्या.

BASIL (*Gr. basilikos*, royal) तुळस *f*; sweet b. सबजा; common b. रानतुळस *f*.

BASIN *F.* a hollow vessel to hold water, for washing, and for various other uses तस्त *n*; any hollow place containing water हौद, कुंड *n*, खाडी *f*, इ०;—for ships गोदी *f*; a hollow place बसक *f*.

BASK *v. D.* ऊन देणें, उनांत ठेवणें.—*i.* उनांत बसणें, ऊन खाणें, तिरपेस बसणें.

BASKET *W.* टोपली *f*, पाटी *f*, डुरडी *f*, पेटारा. -HILT, the hilt of a sword to protect the hand खोबळा.

BASS, See under BASE.

BASTARD *F.* दासीपुत्र, अकरमाशा.—*a.* राखेच्या पोटचा, मंगळीचा; spurious कृत्रिम, खोटा; [*Print.* abbreviated, as the half-title on a page preceding the full title-page of a book].

BASTE *v. Sw.* cudgel चेंचणें, कुंदीकाढणें; [sprinkle flour and salt and drip butter or fat on, as on meat in roasting].

BASTE *v. F.* sew slightly टांचे मारणें.

BASTINADE *F.* सोटेमार, टोणपेमार.— *v.* सोटाळणें, चेंचणें, चोपणें.

BASTILE *F.* किल्ला, गढी *f.*

BASTION *F.* बुरूज; fortress of four *bastions* चौबुरजी *f.*

BAT* a heavy stick दंडूका, सोटा; in playing a ball दांडू.—BATON सोटा, दांडा, गदा *f.*

BAT *O. E.* पाकोळी *f;* wild b. वडवाघूळ *n.* -FOWLING रात्रीं पक्षी धरण्याचा एक प्रकार आहे.

BATCH * quantity of bread baked at one time घाणा, भट्टी *f;* any work dispatched at once एकरास *f,* एकहात.

BATE* *v.* abate कमी क., उतरणें; leave out सोडणें, गाळणें.—*i.* कमी होणें, उतरणें [of].

BATING *prep.* सोडून, वजा करून.

BATH * place to bathe in स्नानाची जागा *f,* न्हाणी *f;* a house for bathing न्हाणघर *n,* हमामखाना; immersion in a bath स्नान *n;* a Hebrew measure एक कैली माप आहे; [Order of the B., a high order of British knighthood, composed of three classes, viz., Knights Grand Crosses, Knights Commanders, and Knights Companions]; cold b. शीतोदकस्नान *n;* tepid b. कोष्णजलस्नान *n;* warm b. कवोष्णजलस्नान *n;* hot b. उष्णजलस्नान; shower-b. धारास्नान *n;* medicated b. औषधी वाफारा; hot-air b. उष्ण हवेची ऊब *f.*—BATHE *v.* न्हाणघरांत अंघूळ घालणें, नाहणें; suffuse with a liquid ओला क., नाहणें, माखणें : her bosom *bathed* in blood.—*i.* अंघूळ क.—BATHING अंघूळ *f,* स्नान *n.*

BATTALION, See under BATTLE.

BATTEN * पुष्ट क., खुराक चारून माजवणें;—land खत घालून सुपीक क.—*i.* पुष्ट होणें, माजणें.—*n.* a piece of board, or scantling, of a few inches in breadth, used for various purposes चिरखांब, कडी *f.*

BATTER *v. F.* beat with successive blows दणके देणें, खोमलणें, ठोकणें; attack with artillery तोफांचा मारा चालविणें. — BATTERY धक्के मारणें *n; Mil.* any place where cannon or mortars are mounted, for battering a fortification or attacking an enemy मोरचा; disposition of *batteries* मोरचेबंदी *f;* an apparatus for generating galvanic electricity विद्युत उत्पन्न करण्याचें यंत्र *n; Law,* the unlawful beating of another कायद्याविरुद्ध दुसऱ्यास मारणें. — BATTERING RAM धक्का देऊन भिंत वगैरे पाडण्याचें यंत्र *n.*

BATTLE *n. F.* लढाई *f,* युद्ध *n;* a drawn b. ज्या लढाईत कोणत्याही पक्षास जय मिळत नाहीं ती, कच्ची लढाई *f;* a pitched b. ज्या लढाईत सैन्य पूर्वींच बंदोबस्तानें उभें केलेलें असतें ती; to give b. लढाई देणें, भिडणें; mingled b. तुमुलयुद्ध; b.-cry सिंहनाद; field of b. रणभूमि *f;* brave in b. रणधीर; the tumult of b. रणधुमाळी *f.*—*v.* युद्ध क., लढणें, भिडणें [with, for, against]. -ARRAY सैन्यरचना *f,* व्यूह. -MENT जंग्यांची भिंत *f.* -AXE परशू, फरश.—BATTALION पलटण *n, f.*

BAUBLE *F.* नकली दागिना.

BAWD *F.* कुंटण्या, कुंटीण *f.*

BAWL* *v. i.* cry out with a loud, full sound गळा काढून शिरा ताणून बोलणें, मोठ्यानें ओरडणें; cry aloud हेल काढून रडणें, बोंबलणें, आक्रोशणें [out, to].— *t.* ओरडून प्रसिद्ध क.—*n.* ओरड *f,* पुकारा.

BAY *a.* (*badius*) dark b. तेलिया, कुमाईत, तेल्याबोर ; chestnut b. लाखी ; light b. सुरंग ; app. to the color of horses.

BAY *F.* आखात *n*, उपसागर. -SALT समुद्राचें मीठ *n*. (also Bow) -WINDOW भिंतीच्या बाहेर आलेली खिडकी *f*.

BAY *v. F.* bark at -वर भोंकणें ; follow with barking भोंकत मागें जाणें -लागणें : to b. the boar.—*i*. भोंकणें.—*n*. शत्रूच्या वेढ्यांत आपली जागा धरून राहणें *n* ; to keep at b. दूर राखणें, जवळ येऊं न देणें.

BAY *F.* तज, लवंगेचें झाड *n*; the bark of b. दालचिनी *f*, तज *n*; the leaves of b. लवंगपत्र *n*.

BAYONET *F.* बंदुकीची संगीन *f*.— *v*. संगिनीनें भोसकणें ; compel or drive by the bayonet संगीन रोखून पुढें चालवणें -हाकून देणें.

BDELLIUM (*L*.) गुगूळ, देवधूप.

BE* *v*. (*Skr. bhú*) exist असणें; become होणें : to be large ; remain राहणें, असणें : let the garment *be* as it was made ; be present in a place असणें : where *was* I at the time ? -ING, existence अहिपण *n*, अस्तित्व *n*, स्थिति *f*; to bring into b. जन्मास घालणें ; that which exists व्यक्ति *f*, वस्तु *f*, भूत *n* : a human b. ; a living existence प्राणी ; Supreme B. परमेश्वर.

BEACH (?) समुद्रकांठ -किनारा ; strand वाळवंट *n*.

BEACON* a signal-fire to notify the approach of an enemy शत्रु जवळ आल्याची सूचना करण्यासाठीं पेटवलेला अग्नि; a conspicuous mark erected on an eminence near the shore, or moored in shoal water, as a guide to mariners नावाड्यांस वाट दाखविण्याची खूण *f* (आकाशदिवा, दीपमाळ *f*, इ०) ; that which gives notice of danger भयसूचक चिन्ह *n*.

BEAD* a little ball bored मणी, पोत *f*;— as used to count prayers जपमाळेचा मणी; to tell one's *beads* जप क.; a bubble on spirit मद्यावरचा फुगा; a drop of sweat घामाचा बिंदु -टिपूस; a small piece of metal in a fire-arm, used for taking aim माशी *f*; to draw a b. नेम धरणें -बांधणें ; *Arch*. गोलची *f*. -SMAN दुसऱ्याकरितां प्रार्थना करायास लावलेला मनुष्य, जप्या, अनुष्टानी.

BEADLE* a messenger of a court छडीदार, चोपदार ; an inferior parish officer पट्टेवाला, चपराशी ;—of a temple गुरव.

BEAK *O.E.* bill of a bird चोंच *f*, चंचु *f*; anything like a beak, as a promontory of land चंचुरूप -टोकदार वस्तु *f* -पदार्थ ; a process, like the beak of a bird, terminating the fruit in certain plants कित्येक (बदाम, आंबा इ०) फळांचा चंचुरूप भाग.

BEAM * any large piece of timber or iron long in proportion to its thickness, and prepared for use सोटा, लाट *f*; one of the principal horizontal timbers used in buildings तुळई *f*, बहाल *n*; the width of a vessel गलबताची रुंदी *f*; the part of a balance from the ends of which the scales are suspended दांडा, दांडी *f*; pole of a carriage, which runs between the horses दांडा, 'पोल'; part of a loom तुरी *f*;—of a draw-well ओकती *f*; a ray of light किरण *n*.—*v*. किरण पाडणें, प्रकाशणें ; — the countenance टवटवणें, लुसलुसणें [forth].

BEAN * घेवडा, वारवा.

BEAR* (*Skr. bhri*) *v*. hold up आधार-पुस्ती देणें, पेलणें ; convey वाहणें, नेणें (burdens) ; wear धारण क. (sword, name); exercise चालवणें, बाळगणें (sway) ; cherish मनांत वागवणें, धरणें, बाळगणें ; endure साहणें, सोसणें, कंठणें ; be answerable for अंगावर घेणें, पत्करणें (blame, expense); bring forward पुढें आणणें -क., देणें : your testimony b. ; carry on

चालवणें, चालू -सुरू ठेवणें: to b. a part in conversation; be capable of योग्य असणें, शक्ति असणें: give his words the most favorable interpretation they will b.; behave वागणें, वर्तणें: hath he *borne* himself penitently ?; afford देणें, पुरवणें; bring forth उपजविणें (fruit); give birth to जन्म-देणें, प्रसविणें (children); down जिंकणें, मोड क. (an enemy); off दाबांत ठेवणें, आकळणें; out शेवटपर्यंत संभाळणें; through चालवणें, वहिवाटणें; up आधार देणें; तरता ठेवणें; पडूं न देणें: religious hope *bears* up the mind under sufferings; to b. date तारीख -मिती असणें.—*i.* be patient ऐकून घेणें, साहणें, सोसणें: I cannot b.; produce फळ येणें -लागणें; on, upon, press निकड लावणें, आग्रह क.; succeed शेवटास -सिद्धीस नेणें: to bring matters to b.; have direction कलणें, रोंख असणें: the land *bears* N. by E.; on, upon, relate संबंध असणें: how does this b. on the question; take effect लागू होणें; against लगाव साधणें; with संभाळून घेणें, वागवणें. -ER नेणारा;—of burdens हमाल;—of a palanquin भोई;—of a standard निशाणबरदार; one who assists in carrying a body to the grave प्रेत वाहून नेणारा, खांद्या; [one who holds a check, note, draft, or other order for the payment of a sum of money]; a tree yielding fruit फळ देणारें झाड *n*: a good b. -ING, relation संबंध; behavior वर्तन *n*; direction रोंख, कल, झोंक.

BEAR* आस्वल,रीस; *Astron.* सप्तर्षि. -GARDEN अस्वल-रीसखाना; a rude turbulent assembly वेड्यांचा बाजार; to become a b. वेड्यांचा बाजार पिकणें.

BEARD* hair that grows on the chin, lips, and adjacent parts of the face दाढी *f*;—of corn कुसळ *n*, कूस *n*; barb of an arrow तिराचा उलटा कांटा, अंकडा; [that part of a horse, underneath the lower jaw and above the chin, which bears the curb of a bridle].—*v.* set at defiance दाढी उपटणें, नाकावर पाय देणें; oppose to the face तोंडावर अप्रतिष्ठा क., उलट जाब देणें.

BEAST (*bestia*) any four-footed animal which may be used for labor, food, or sport पशु, चतुष्पद (Prov. xii. 10); horned b. शिंगाटी *f*;—of burden पाठाळ *n*;—of draught वाहीम *n*;—of pasture गुरूं *n*, ढोर *n*; as opp. to *man*, any irrational animal पशु, हैवान *m, f, n*. -LY *a.* पशुसारखा, पशुतुल्य, पशूच्या आकाराचा; filthy मळीण.

BEAT* *v.* strike repeatedly मारणें, ठोकणें, बडवणें; pulverize by pounding कुटून भुगा क. (hemp); hammer हतोड्यानें ठोकणें -ठोकून वाढवणें; range over in hunting पारध करतांना फिरणें -हिंडणें; tread, as a path मळणें; thrash झोडणें, मळणी क. (Ruth ii. 17); vanquish जिंकणें, पराजित क.; perplex गोंधळवणें, घोटाळ्यांत पाडणें, माथाकूट क.: why should any one b. his head about the Latin grammar; brush, as water or wind थाप -धडक मारणें; back मागें हटविणें; out थकणें; लंघून जाणें;—an alarm नगारा वाजवून भयाची सूचना क.; down मारून -ठोकून -धक्के देऊन पाडणें, विध्वंस क. (a wall); पाण्याच्या ओघानें -थडकेनें अथवा वाऱ्याच्या झटक्यानें पाडणें -दाबणें; किंमत कमी क.; पाडून घेणें (price or value); into मनांत-डोक्यांत भरविणें, ठसवणें; off मागें हटविणें; — the hoof पायीं चालणें; the wing फडफडणें;—time ताल धरणें; up एकाएकीं हल्ला क.; घाबरविणें, भय घालणें: to b. up the enemy's quarters. — *i.* knock ठोकणें, ठोठावणें; move with pulsation उडणें, धडधडणें (heart); dash or fall with force आपटणें, थडकणें (tempests); to b. about धुंडणें, नाना उपायांनीं शोधणें.—*n.* stroke टोला, प्रहार; pulsation धडधडी *f*; थडक *f*; *Mus.* ताल, पावडा; a watchman's b. फेरी *f*;

गस्त *f*; a place of resort फेरी टाकण्याची -जाण्या येण्याची जागा *f*, अड्डा, चवाठा;—of a watch घड्याळाची टकटक *f*, खटखट *f*. -EN ठोकलेला, मारलेला &c.;—a road रावत्याचा, मळलेला, धोपट.

BEATIFY *v.* (*beatus*, happy, *facere*, to make) सुखी क.; regard as happy सुखी मानणें; bless with the completion of celestial enjoyment स्वर्गसुख -मुक्ति देणें; [*Rom. Cath. Church*, declare, by a decree, that a person is received into heaven, and is to be reverenced as blessed, though not canonized]. — BEATIFIC *a.* सुखकर -प्रद. —BEATIFICATION मेलेला मनुष्य मुक्ति पावला असें आज्ञापत्राकडून प्रसिद्ध क.— BEATITUDE स्वर्गसुख *n*, परमसुख *n*; Hindu philosophical terms for b. मुक्ति *f*, सिद्धि *f*, मोक्ष, निर्वाण *n*.

BEAU *F.* अकडबाज, छानछूक. -ISH *a.* छानदार, चट्टीपट्टीचा.

BEAUTY *O. E.* an assemblage of graces or of properties which pleases the sight or any of the other senses, or the mind सौंदर्य *n*, लावण्य *n*, शोभा *f*, सुंदरपणा; a particular grace, feature, ornament, or excellence खुबी *f*, नोक *f*, टूम *f*; a beautiful person सुंदर पुरुष; a beautiful woman सुंदरी *f*, रूपवती *f*. — BEAUTEOUS, BEAUTIFUL *a.* सुंदर, सुदर्शन, रूपवंत. —BEAUTIFY *v.* सुशोभित क., शोभा आणणें.— BEAUTY-SPOT, a patch or spot placed on the face to heighten beauty सौंदर्यवर्द्धक तिलक.

BEAVER* एक जलस्थलचर प्राणी आहे.

BECALM *v.* (*be* and *calm*) स्थिर -शांत क., शमविणें; keep from motion, as a ship by want of wind गति खुंटविणें, थिरावणें.

BECAUSE *conj.* (*by* and *cause*) कारण कीं, कारण; b. of ज्यामुळें.

BECHANCE *v.* (*be* and *chance*) अकस्मात घडणें -येऊन पडणें, बितणें.—*ad.* अकस्मात, एकाएकीं.

BECK* *v. i.* डोक्यानें किंवा हातानें खूण क., हस्तशिरसंकेत क.—*t.* हाताच्या किंवा डोक्याच्या खुणेनें बोलावणें.—*n.* संकेत, इशारा, सूचना *f*; to be at the b. of अध्यविचनांत -कह्यांत असणें. -ON *v.* पालवणें, बोलावणें.

BECLOUD *v.* (*be* and *cloud*) मंद -अंधूक क.

BECOME *v. i.* (*be* and *come*) होणें, बनणें.—*t.* शोभणें, साजणें.— BECOMING *a.* शोभणारा, लायक, उचित. -LY *ad.* लायकीनें, साजेसा, शोभेसा.

Boss *F.* a knob गेंद, गोंडा, बोंड *n*.

Botany (*Gr. botanè*, a plant) वनस्पतिविद्या *f*.—Botanical *a.* वनस्पतिविद्येचा *f* -संबंधी:

b. garden वनस्पतिविद्या शिकण्याचा बाग.—Botanist वनस्पतिविद्यावेत्ता.

Botch *It.* an ulcerous affection खांडूक *n*; a patch कप्पा, ठिगळ *n*; work done in a bungling manner गोदडशाई काम *n*.—*v.* ओबडधोबड तांगडणें; गोदडशाई काम क., कप्पे देणें.

Both* *a.* & *pron.* (*Skr. abha, ubhan,* the two) दोन्ही; without exception of either दोन्ही, उभयतां; the one and the other हें आणि तें.

Bother (?) tease त्रास देणें; perplex तारंबळ क. —*n.* उपद्रव, खटपट *f*, उपद्व्याप; तारंबळ *f*, त्रेधा *f*.

Bottle *F.* a hollow vessel of glass शिसी *f*, कुपी *f*, 'बाटली' *f*;—of leather बुधला -ली *f* -लें *n*, दबडा; contents of a bottle बाटलीभर पदार्थ, बाटली *f*.—*v.* बाटलींत भरणें. -friend दारू पिण्याचा सोबती. -glass बाटलीची कांच *f*. -gourd दूधभोपळा, कद्दु.

Bottom * the lowest part of anything मूळ *n*, तळ *n*, बूड *n*; base बैठक *f*, पडघी *f*; foundation पाया, आधार, मूळपीठिका *f*; low land formed by alluvial deposits along a river तळ, ठाव, तळाची जमीन *f*; a dale सखल *n*, बदखल *f*, लवण *n*; the keel of a vessel पठार *n*; a ship गलबत *n*; power of endurance पाणी *n*, दम, जीव: a horse of good b; dregs मळ, रेंदाड *n*: the b. of beer; a ball of thread सुताची गुंडी *f*.—*v.* -वर बांधणें -रचणें [on, upon]; तळ लावणें -बसवणें -घालणें; गुंडी क.

Bougie *F. Surg.*, a waxed cord or stick बत्ती *f*, वात *f*.

Bough * फांदी *f*, शाखा *f*.

Bounce *v. i. D.* leap suddenly तटकन -सटकन उसळणें; thump दणकण आपटणें; bully तुच्छ मानणें.—*n.* उसळी *f*; a bold lie धादांत लबाडी *f*.

Bound (*bunda*) मर्यादा *f*, सीमा *f*, टप्पा.—*v.* मर्यादा क., आळाबांधणें. —*p. p.* बांधलेला, बद्ध.—*a.* destined नेमलेला; going जाणारा [to, for]. -ary मर्यादा *f*, सीमा *f*, हद्द *f*.

Bound *F.* उडी.—*v.* उडी मारणें; in dancing पावटा टाकणें.

Bounty (*bonus*, good) generosity औदार्य *n*; that which is given liberally उदारपणाचें देणें *n*; [a premium offered or given to induce men to enlist into the public service, or to encourage any branch of industry].—Bounteous, Bountiful *a.* उदार हाताचा, सढळ, उदार.

Bouquet *F.* bunch of flowers फुलांचा झेला -झुबका, तुरा; perfume सुवास, सुगंध.

Bout *D.* a turn खेप *f*, पाळी *f*; contest कलह, तंटा; conflict झुंज *n*, झोंबी *f*.

Bovine *a.* (*bos*, ox) गाई संबंधी, गव्य.

Bow* *v.* (*Skr. bhudj*, to be bent) bend वांकविणें, लवविणें; incline वळविणें; subdue जिंकणें, दबविणें; bend, in token of respect नमविणें; incline towards लक्ष्य -चित्त देणें -लावणें.—*i.* वांकणें; नमणें, नमस्कार क. [down].—*n.* नमन *n*, नमस्कार; the prow (गलबताची) नाळ *f*.

Bow* anything bent कमानदार -बांकदार वस्तु *f*; an instrument for shooting arrows धनुष्य *n*, तिरकमटा; —of a saddle खोड *n*; —for cleaning cotton धनुकली *f*. -man तिरंदाज, धनुर्धारी. -shot बाणाचा टप्पा. -string धनुष्याची दोरी *f*, गुण.

Bowel (*botulus*) an entrail अंतडें *n*; the interior part of anything पोट *n*: the *bowels* of the earth; tenderness कळवळा, कळकळ *f*.—*v.* -चीं अंतडीं काढणें.

Bower* arbor गुंफा *f*, मंडप; country-seat बंगला.

BOWL* a concave vessel to hold liquors पेला, प्याला, वाटी *f*; —of wood काठवट *f*, पाळें *n*; — of earth खापर *n*; — of a gourd तुंबा; the hollow part of anything पोट *n*;—of a spoon हरडा;— of a *wina* भोपळा;—of a cocoanut shell डौला.

BOX* a case of any size पेटी *f*, डबा; a snuff-b. डब्बी *f*; the quantity that a box contains पेटीची मोताद, पेटी *f*; an inclosed place with seats in a theatre नाटकगृहांत पेटी सारखी एक बसायाची जागा असते, 'बाक्स'; a money-chest पैक्याची पेटी *f*; driver's seat on a carriage गाडीवर गाडी हाकणार बसायाची जागा *f*; a present बक्षीस *n*: a Christmas b.; in a b. अडचणींत.— *v*. पेटींत घालणें; गाडीच्या चाकांत डबा बसविणें. — *n*. (?) बुक्की *f*, मुष्टि *f*. —*v. i*. ठोसाठोसी क., मुष्टियुद्ध क.—*t*.बुक्कीनें मारणें; कानशिलांत बुक्की मारणें. -ER मुष्टियोद्दा. -ING ठोसाठोसी *f*, बुकलाबुकली *f*; मुष्टियुद्द *n*.

BOY *Ger*. मुलगा, पोर; *Hindu Law*, a b. under five years of age कुमार; under eight रिपु; from the fifth to the end of the ninth year पौगंड; from the tenth to the sixteenth किशोर; after the end of his minority the youth is termed प्राप्तव्यवहार. -HOOD पोरपण *n*, बालपण *n*. -ISH *a*. पोरकट, पोरकळ.

BRACE (*brachia*, the arms) a prop धिरा, टेका; in carpentry कैंची *f*.; a bandage ओढण *f*, कसणी *f*; *pl* of a drum कांकर *f*, ओढण *f*; of a cart नाडा, ओढण *f*; a pair जोडी *f*,जोड: a b. of ducks; *Print*. the mark } कंस. — *v*. धिरादेणें; ताणणें, ओढणें; — a drum चढवणें; strengthen बळकट -जिवट क. (the nerves). -LET कडें *n*, करभूषण *n*, चुडा; — of glass बांगडी *f*; seller of glass *bracelets* काजारी.

BRACHYGRAPHY (*Gr. brachus*, short, *graphein*, to write) संक्षिप्त अक्षरानीं लिहिण्याची विद्या *f*.

BRACKET *f*. (*brachium*, arm) कौंस, कोंडें *n*.

BRACKISH *a*. *Ger*. खारट, मचूळ, सौळ.

BRAD *D*. a kind of nail तुरई *f*.

BRAG *D*. See BOAST. -GADOCIO अरेराव, शेंदड शिपाई.

BRAID* *v*. गुंफणें, वळणें.—*n*. वेणी *f*.

BRAIN* the whitish, soft mass which constitutes the anterior extremity of the nervous system in man and other vertebrates, occupying the upper cavity of the skull, and considered to be the centre of sensation and perception मेंदू, मगज, मज्जा *f*; the seat of intellect बुद्धीचें स्थान *n*; the understanding बुद्धि *f*, अक्कल *f*, fancy कल्पना *f*. -LESS *a*. बुद्धिहीन. -PAN कंवटी *f*, कपाल *n*.

BRAKE *Ger*. an instrument for breaking flax ताग ठेंचण्याचें एक यंत्र आहे: a baker's kneading-trough पीठ मळायाची काठवट *f*; [contrivance for confining refractory horses while the smith is shoeing them]; a large heavy harrow for breaking clods after ploughing गुटाळ *n*; [a piece of mechanism for retarding motion by friction, as of a railway car; a carriage without a body used for breaking in horses].

BRAMBLE* कांटेझाड *n*.

BRAN *W*.कोंडा; as remaining in fine flour तांब *f*. -NEW. See BRAND-NEW.

BRANCH *F*. a bough फांदी *f*, खांदी *f*; ramification शाखा *f*, कोंब; a section अंग *n*, प्रकरण *n*: a b. of knowledge; line of family descent, in distinction from some other line or lines from the same stock पालव, शाखा *f*; minor b. उपांग *n*; a chandelier झुंबर; [*Law*, a warrant or commission

given to a pilot].—*v. i.* फांद्या फुटणें; विभाग -पोटभाग क.; off फांदी -फाटा फुटणें -फैलावणें; out पाल्हाळ क., (भाषणाचा) विस्तार क.; विषयाचे बहुत विभाग क.—*t.* फांद्या -शाखा फोडणें; adorn with needlework representing branches, flowers, or twigs फुलाफांद्यांचा कशीदा काढणें -क. -LET लहान फांदी *f*, शिपटी *f*.—BRANCHY *a.* फांद्यांनीं भरलेला; पसरट फांद्यांचा.

BRAND* a burning piece of wood कोलीत *n*; a mark made by burning with a hot iron डाग, लास; quality जात *f*: good b. of flour; a mark put upon criminals with a hot iron अपराध्याला डागणीनें जी खूण करितात ती; stigma कलंक, डाग; [a disease in vegetables, by which their leaves and tender bark are partially destroyed, as if burnt]; डागणें, डाग देणें; कलंक लावणें. -ING-IRON डागणी *f*. -NEW *a.* नवा कोरा, घणकोरा.

BRANDY (*burned wine*) एक प्रकारची तलख दारू आहे, 'ब्रांडी.'

BRASS * alloy of copper and zinc पितळ *n*; impudence तिखें *n*, नाक *n*, निलाजरेपणा. -FOIL पितळीपान *n*.—BRASSY *a.* पितळेचा, पितळी; having the color of brass पितळी रंगाचा; hard as brass पितळे सारखा कठीण.—BRAZIER, one who works in brass कांसार; a pan to hold coals शेगडी *f*.—BRAZE *v.* solder with an alloy of brass and zinc पक्का डाक लावणें, पितळेनें सांधणें; cover or ornament with brass पितळेनें मढवणें किंवा शृंगारणें; harden to impudence कोडगा-निलाजरा होणें, मुसळ नेसणें.—BRAZEN पितळेचा; also -FACED निलाजरा, कोडगा.

BRAT कारटें *n*, पोरटें *n*, पोर *n*; *brat* and bantling पोरेंबाळें *pl.*

BRAVE *a. F.* of noble or admirable courage शूर, धारिष्टवान; excellent उत्तम, नामी, खासा, उमदा: iron is a b. commodity.—*v.* धैर्यानें गांठणें, शिंगावर घेणें.—BRAVERY शौर्य *n*, धाडस *n*, छाती *f*; उमदेपणा, छानदारी *f*. — BRAVADO (*Sp.*) फुशारकीची धमकी *f*, फुशारकी *f*.—BRAVO (*It.*) मारेकरी.—*int.* शाबास, भले, वाहवा.

BRAWL *v. i. F.* quarrel noisily and indecently कलागत -कटकट क.; make a noise गलबला -गोंगाट क.—*n.* कलागत *f*, कटकट *f*, गोंगाटाचें भांडण *n*. -ER कटकट्या, कलागत्या.

BRAWN *F.* flesh of a boar डुकराचें मांस *n*; salted and preserved flesh of the wild boar रानडुकराचें खारलेलें मांस *n*; the arm बाहु, दंड; muscular strength अंगबल *n*, शरीरबल *n*.— BRAWNY *a.* मांसल, गोंडस; strong बळकट.

BRAY *v. F.* खलणें, कुटणें (Prov. xxvii. 22).—कर्कश शब्दानें बोलणें -वाजवणें -क.—*i.* utter a harsh cry, as an ass गाढवासारखें ओरडणें; make a harsh, grating cry कर्कशनाद क.—*n.* गर्धभध्वनि *f*, खरशब्द.

BRAZEN, See under BRASS.

BREACH* the act of breaking मोडणें *n*, तोडणें *n*, भंग; gap made by breaking खिंड *f*, भगदाड *n*;—violation भंग; of promise प्रतिज्ञाभंग;— of confidence विश्वासघात; a breaking up of amicable relations फूट *f*, तूट *f*, बिघाड.

BREAD* भाकर *f*, रोटी *f*; food अन्न *n*, भाकर *f*, जीवन *n* (Matth. vi. 11).

BREADTH* रुंदी *f*;—of cloth पन्हा.

BREAK* *v.* divide with violence फोडणें, मोडणें; sever by fracture तोडणें (a rope); disclose फोडणें, मनाची गांठ सोडणें (secrets, the mind); infringe मोडणें, भंग क. (a law, promise); interrupt खंड पाडणें, भंग क., मोडणें (sleep); destroy the completeness of विजोड क. (a set); shatter to

pieces चकणाचूर क., तुकडे तुकडे क.; bruise ठेंचणें; weaken, impair, or subdue, as health or the faculties बिघडणें, निर्बळ क.; diminish the force of वेग -रग -बळ मोडणें; tame वठणीस आणणें, वश क. (a colt); make bankrupt मोडणें, दिवाळें काढणें; cashier बरतर्फ क., कामावरून दूर क. -काढणें: I see a great officer *broken;* — the spirits मनोहत -भमाश क.; down दाबून -दडपून टाकणें; in जबरीनें आंत शिरणें: to b. in a door; वठणीस आणणें, राबविणें (a horse); खोड -व्यसन सोडविणें, सुधारणें (one of a habit); off तोडणें (a twig); शेवट क., सोडणें (Dan. iv. 27); open फोडून उघडणें; out फोडून घेणें किंवा काढणें, उखळणें: to b. out a pane of glass; over उल्लंघन क. (a rule); up मोडणें, बरखास्त -विसर्जन क. (the court);—an army रजा देणें, मोडणें;—the back बगाड -पेंकाट मोडणें -बसविणें;—cover झाडींतून -जाळींतून निघणें (game); fast पारणें सोडणें; न्यहारी क.; ground नांगरणें, खणणें, पोखरणें इ०; fig. आरंभ क., पेरणें; गलबताचा नांगर तळापासून सोडविणें;—the heart दुःखानें छाती फोडणें; — a house, *Law,* remove any part of the house or of the fastenings provided to secure it, with violence and a felonious intent घर फोडणें (चोरीच्या इराद्यानें); — ice तोंडच्या -आरंभींच्या अडचणींतून पार जाऊन आरंभ क.;—jail तुरंगांतून पळून जाणें; —a path वाट फोडणें;—wind पादणें.—

Break *v. i.* फुटणें, मोडणें, तुटणें (Matth. ix. 17); open spontaneously फुटणें, उफलणें, उतटणें (a tumor, bubble, seed-vessel); burst forth violently एकदम -जोरानें येणें -पडणें (a storm); तुटणें, निर्बळ होणें: see how he begins to b.; दिवाळें निघणें, पडणीस येणें; change the gait चालण्याची ढब बदलणें: to b. into a run; फूट होणें, बिघाड पडणें; away पळून जाणें; फाकणें, वितुळणें (clouds); down मोडून खालीं पडणें (coach); मोडणें, गळणें, थकणें: he had *broken* down at the outset; forth निघणें, बाहेर पडणें; [in, into] (Is. lviii. 8; xliv. 23); in, upon एकदम आंत येणें -शिरणें -जाणें; loose सुटणें, मोकळा होणें; off तुटणें, तुटून वेगळा होणें -येणें; out सुटणें, बंद तोडणें; (पाणी इ०) उतून निघणें; (आग) भडकून पेटणें -दिसणें; (रोग) उद्भवणें; (पुरळ इ०) उतणें -उठणें -निघणें; up उखळणें, फुटणें: the wreck will b.; with बिघडणें; फाटाफूट होणें; समजूत क. -पाडणें, बोलणें.—

Break *n.* खिंड *f,* खिंडार *n;* pause खंड, विराम;—in the weather उघाड, उघाडी *f;* the dawn अरुणोदय, प्रभात *f;* — in a wall भगदाड *n,* खिंडार *n;* [a kind of carriage]. -able *a.* फुटायाजोगा, भंगशील. -age फुटीतुटीची सूट *f.* -er फोडणारा, भंजक; *pl* किनाऱ्यावर -खडकावर आदळून फुटणाऱ्या लाटा. -fast न्यहारी *f.* —*v.* न्यहारी क. -water लाटांचें जोर मोडण्या करितां बांध, भिंत वगैरे जें घालतात तें.

Breast* the fore part of the body between the throat and the belly ऊर, छाती *f;* protuberant glands, situated on the front of the chest or thorax in the female of man and of some other mammalia, in which milk is secreted for the nourishment of the young थान *n,* स्तन *n;* fig. the heart मन *n,* पोट *n;* make a clean b. सर्व कबूल होणें -क.; सर्व गुज सांगून मनावरचें ओझें उतरणें. -bone उराचें हाड *n,* उरोस्थि *n.* -deep, -high *a.* छाती इतका, छातीभर. -plate उरस्त्राण *n.* -work छाती एवढी उंच भिंत *f.*

Breath* air inhaled and exhaled in the respiration of animals श्वास, दम; the act of breathing naturally or freely दम घेणें *n,* श्वासोश्वास चालवणें *n;* power of respiration

श्वास घेण्याची शक्ति *f;* life जीव, प्राण; time to breathe दम, गम: let me take b.; a single respiration दम; an instant क्षण: he smiles and frowns in a b.; very slight breeze झुळूक *f,* वाऱ्याची लहर *f.*—Breathe *v.* श्वासोश्वास घेणें -टाकणें -चालणें; live जगणें; inject by breathing फुंकून आंत सोडणें (Gen. ii. 7); utter softly मंजूळ वाणीनें बोलणें; emit, as breath श्वास सोडणें-टाकणें; cause to sound by the breathing फुंकणें, वाजविणें: to b. on the flute; suffer to take breath दम घेऊंदेणें (a horse); put out of breath दमविणें, बेदम क.; — hard दम लागणें -चढणें. -less *a.* बेदम, श्रांत; dead मेलेला, मृत (body). -ing श्वासोश्वासाची क्रिया *f,* श्वासोश्वास; inspiration प्रेरणा *f,* संचार; secret prayer गुप्त -मनांतील प्रार्थना *f;* utterance उद्गार, उच्चार; vent श्वास सोडण्याची जागा *f,* उसास: *Gram.* aspiration महाप्राणउच्चार; hard b. महाप्राण; — as practised by the Vedantist प्राणायाम.

Breech* lower part of the body behind ढुंगण *n;* hinder part of anything पाठीमागला भाग, पश्चाद्भाग; [esp. the part of a cannon or other arm behind the bottom of the bore]; *pl* चोलणा, गुडघी *f;* to wear the b., to usurp the authority of the husband;—said of a wife नवऱ्याच्या डोकीवर मिरें वाटणें -बसणें.

Breed* *v.* procreate उत्पन्न क., जन्म देणें; bring up लाहनाचा थोर क.; educate शिकवून तयार क., तरबेत क.; originate उत्पन्न क.: my quaint habits b. astonishment; be the native place of -ची खाण असणें; give birth to जन्म देणें: a pond *breeds* fish. —*i.* उपजणें (Gen. viii. 17); be formed in parent or dam (उदरांत) बनणें, आकारास येणें: children b. in the matrix; raise a breed ताणा वाढविणें: choose the kind of animal which you wish to b. from; [to b. in and in, to b. from animals of the same stock that are closely related].—*n.* जात *f,* अवलाद *f;*—of cattle ताणा, वाढा. -ing पालण *n,* पोषण *n;* manners माणूसकी *f,* विनय; रीत -शिक्षा -राबता लावणें *n.*

Breeze *F.* झुळूक *f,* लहर *f,* मंदवायु; balmy b. मंदसुगंधवायु; cool and balmy b. शीतसुगंधवायु; land-b. मतलई *f;* sea-b. समुद्राकडला वारा.

Brethren *pl* (See Brother) भाऊ, बंधुवर्ग -जन *pl.*

Brevet (*brevis,* short) *Mil.* लष्करी सरदाराची सनद *f;* ही पगारापेक्षां मोठ्या जाग्याची असते.—Breviary, an abridgment संक्षेप, सार *n;* a book containing the daily service of the Roman Catholic or Greek Church रोमन क्याथॅलिक किंवा ग्रीक मंडळीचें नित्य प्रार्थनापद्धतीचें पुस्तक *n.* — Brevity, briefness of time अल्पकाळ; संक्षेप, समाहार.

Brew* *v.* seethe शिजवणें; prepare, as a liquor, from malt and hops माल्ट नांवाची दारू क.; plot पिकवणें, धुमसवणें; शिजवणें; बीरदारू करण्याचा धंदा क. -er यवसाची दारूकरणारा.

Bribe *F.* a price, reward, gift, or favor bestowed or promised with a view to pervert the judgment or corrupt the conduct of a judge, witness, or other person लांच *m, f,* पानसुपारी *f,* लुचपत *f;* allurement लालूच *f,* खाऊ; sums expended in *bribes* to official persons अंतस्थ *n.*—*v.* लांच देणें, तोंड दाबणें, हात चेपणें; gain by a bribe लांच देऊन मिळविणें. —Bribery लांचेचा व्यापार -व्यवहार.

Brick* वीट *f,* ईट *f;* baked b. पक्की ईट *f;* sun-dried b. कच्ची ईट *f;* [a b. in his hat, used of a person intoxicated].—*v.* वीटबंदी क.; imitate a brick wall on विटांच्या

भिंती सारखी नकल क. -BAT इटकूर *n.*—-CLAY विटा करायाची माती *f*, विटांची माती *f*. -DUST इटकर *f, n*. -KILN विटा भाजण्याची भट्टी *f*; the mouth of a b. बारा. -LAYER गवंडी. -MAKER कुंभार. -TROWEL करणी *f*. -WORK इटबंदी *f* -काम *n*.

BRIDE* (*Skr. praudha, pri,* to love) a woman recently married नवरी *f*; a woman contracted to be married नवरी *f*. -GROOM नवरा. -MAID करवली *f*. -MAN करवला. -WELL बंदीखाना, तुरंग.

BRIDGE * a way built over water पूल, सेतु; supporter of the strings of a fiddle घोडी *f*, चौकी *f*, तारदानी *f*;—of the nose नाकाचा दांडा.—*v*. -ला -वर पूल बांधणें: to b. a river पूल बांधून रस्ता क.

BRIDLE* instrument with which a horse is governed लगाम *m, f*, अनीन *f*; restraint लगाम *f*, संयम. — *v*. लगाम देणें -घालणें -चढविणें; आकळणें, लगामीं ठेवणें -चालवणें; put one's b. in the jaws of नाकीं वेसण घालणें. -HAND लगामीचा हात. -PATH घोडेवाट *f*.

BRIEF *a*. (*brevis,* short) short in duration अल्पकालिक; concise संक्षिप्त, लहान, थोडा (tale).—*n*. संक्षेप, समाहार; an abridgment of a client's case, made out for the instruction of counsel on a trial at law वकिलाकरितां तयार केलेलें कुळाच्या खटल्याचें टिपण *n*; a writ राजाज्ञापत्र *n*. -LESS *a*. ज्यापासीं कूळ किंवा खटला नाहीं तो (barrister). -LY *ad*. थोडक्यांत, संक्षेपानें.

BRIER * a prickly plant कांटेझाड *n*; the sweet-brier and the wild-brier रानगुलाब, सदागुलाब.

BRIG *F*. दुकाठी जहाज *n*.

BRIGADE *F*. a division of troops commanded by a general officer or brigadier ब्रिगेडियर पदवीच्या सरदाराच्या सैन्याची टोळी *f*; ह्या टोळींत अमूकच संख्या लोक असावे असा नेम नाहीं. — BRIGADIER ब्रिगेड नामक सैन्यभागाचा सर्दार, 'ब्रिगेडीर' साहेब.

BRIGAND *F*. पुंड, बंडकरी, लुटारू. -AGE पुंडाई *f*, बंडाळी *f*.

BRIGHT * *a*. (*Skr. bhrâdsh,* to shine) उजळ, चकचकीत, टिपूर, तेजस्वी; clear नितळ, स्वच्छ (wine); having qualities that render attractive मनोरम गुणांचा, मनोहर; sparkling तेजदार, पाणीदार (eyes); sparkling with wit चाणाक्ष्य, तैलबुद्धि: be b. and jovial among your guests; evident स्पष्ट, व्यक्त; b. - eyed दिप्तलोचन. -EN *v*. उजळ क.; तेजोवृद्धि क., उजरणें, make cheerful आनंदित क. — *i*. उजळणें, उजळ होणें; रंगास चढणें, खुलणें: उजरणें. -NESS तेजी *f*, कांति *f*, प्रभा *f*, झिलई *f*; उजळपणा; बुद्धिसौक्ष्म्य *n*, सौंदर्य *n*.

BRILLIANT *a*. *F*. sparkling with lustre लकलकीत, पाणीदार, तेजोमय; shining तेजशाली, प्रतापशाली (talents).—*n*. a diamond of the first cut or water तरतरा.—BRILLIANCY लकलकी *f*, तकतकी *f*, पाणी *n*, तेज *n*, ढाळ.

BRIM * rim of any vessel, or other thing कड *f*, कांठ, तोंड *n*; the brink पाळ *f*, किनारा, तट. — *v. i*. तंतोतंत -कांठोकांठ भरणें. -FUL *a*. तोंडोतोंड, भरपूर, तुडुंब.

BRIMSTONE * गंधक.

BRINDED, BRINDLED* *a*. बांडा, कसरा (cat, lion).

BRINE* matter saturated with salt मिठवणी *f*, खार; the sea समुद्र; tears, so called from their saltness आंसवें *n pl*.—*v*. मिठवणींत घालणें, खारणें; mix salt with मीठ मिसळणें -घालणें (hay).

BRING* *v*. fetch आणणें, घेऊन येणें; procure मिळवून -प्राप्त करून देणें: nothing will b. you more honor; influence मन वळविणें; convey नेणें: the water *brings* over with it

some oil; about घडविणें, बधविणें; back परत आणणें -बोलावणें; down खालीं आणणें, उतरणें; नमविणें, गर्वखंडन क., पाणउतारा क. (high looks); forth प्रसविणें, जन्म देणें; उपजविणें; उघडकीस आणणें; forward पुढें -दृष्टोत्पत्तीस आणणें; in चालू क., प्रचारांत आणणें; मर्यादेंत -आटोप्यांत आणणें; मिळकत करूनदेणें, वसूल येणें; मंडळींत-सोबतींत मिळायास मनावणी क.; off दूर नेणें; सुटका मिळविणें; दंडमुक्त क.; on आरंभ करायास लावणें (an action); उत्पन्न क., आणणें (a disease); out उघड क., फोडणें; over पैलतिरीं -कांठास नेणें (passengers in a boat); पलीकडे नेणें (despatches); मन वळविणें, मत फिरविणें; to शुद्धीवर -देहभानावर आणणें (a fainting person); under वश क., जिंकणें; दाबांत ठेवणें; up लहानाचा मोठा क.; प्रतिपाळ क.; शिकविणें, तरबेत क.

BRINK *D.* कड *f*, किनारा, तट, कांठ.

BRISK *a. W.* full of liveliness and activity आनंदी, उल्लासी; full of spirit हुशार, चपळ, तल्लख; — of towns गजबजीत, भरलेला; — of trade तेजीचा, भरभराटीचा; b. fire धगधगीत आग *f*; effervescing, as liquors खतखतणारा, उतणारा. -NESS उल्लास, आनंदवृत्ति *f*; चलाखी *f*, तेजी *f*; b. and dulness of trade तेजीमंदी *f*; — of fire धगधगी *f*.

BRISTLE* रांठकेश, सड. — *v.* केश उभारणें -पिसारणें. — *i.* केश उभे राहणें, कांटा येणें.

BRITISH* *a.* ब्रिटन देशाचा, 'ब्रिटिश,' इंग्रजी. — BRITON ब्रिटन देशचा राहणारा.

BRITTLE* *a.* ठिसूळ, लवकर मोडणारा; of thread तुटीर, फुसका.

BROACH *F.* an awl चांभाराची आरी *f*; a tool for smoothing or enlarging holes in metal धातूंत भोकें मोठीं किंवा साफ करण्याचें हत्यार; a brooch वस्त्र अडकविण्याचा अंकडा. — *v.* सळईस टोंचणें (मांस, भाजण्याकरितां); भोंक तोंड -पाडणें; give out फोडणें, षट्कर्णी क.; open for the first time, as stores फोडणें, उघडणें (कोठी वगैरे).

BROAD* *a.* wide रुंद, विस्तीर्ण; open फटफटीत, भणभणीत: b. and open day; fig. extended प्रशस्त: a b., statesman-like, and masterly way; gross निबिड, बेमुर्वतीचा (compliment, mirth). -CLOTH बनात *f*, सकलात *f*. -SIDE, discharge of all the guns on one side of a ship गलबताच्या बाजूवरून सर्व तोफांचा भडमार; side of a ship above the water पाण्याच्या वरली गलबताची बाजू *f*; in printing, a sheet of paper printed on one side only पाठकोरा ताव. -SWORD रुंद पात्याची तरवार *f*. -WISE *ad.* आडवा, कडे कडून.

BROCADE *Sp.* जर, किनखाब. — BROCADED *a.* जरतारी; that has a b. border लप्पेदार; dressed in brocade जरतारी पोशाक ल्यालेला.

BROCAGE, See under BROKE.

BROIL *F.* कटकट *f*, कलागत *f*. — *v.* निखाऱ्यावर भाजणें. — *i.* तळतळणें.

BROKE *v. i. F.* transact business for another गुमास्त्याचें काम क.; act as procurer कुंटणपणा क. -AGE दलाली *f*. — BROKER, an agent गुमास्ता; *Law*, an agent employed to effect bargains and contracts दलाल. -AGE दलाली *f*, दलालाचें काम *n*; दलालाची दस्तुरी *f*, दलाली *f*.

BROKEN *p. a.* (See BREAK) फुटलेला, मोडलेला; थकलेला, मोडलेला; वश झालेला, जिंकलेला &c. See BREAK. -HEARTED भग्नहृदय.

BRONCHIAL *a. Gr.* कंठसंबंधी, कंठ्य. — BRONCHOCELE गंडमाळा *f pl.*

BRONZE *F.* compound of copper and tin तांब्याचा व कथलाचा मिश्रधातु; a statue, medal, &c. cast in bronze पूर्वोक्त धातूचा ओतीव पुतळा, पदक वगैरे; the color of bronze ह्या धातूचा रंग. — *v.* ब्रांझ धातूचा रंग देणें.

Brooch *F*. a jewel रत्न *n*; ornamental pin for a garment वस्त्राचें अडकण *n*.

Brood * *v*. पाखर घालणें : a hen *broods* her chickens.—*i*. sit on and cover eggs, as a fowl अंडीं उबविणें; sit over and cover young, as a hen her chickens पाखर घालणें; sit quietly उगा -स्तब्ध बसणें; over, on, remain long in anxiety ध्यास धरणें, चिंता करीत बसणें, फिकिरींत असणें.—*n*. hatch वीण *f*, वेत *n*; species generated वाढा, ताणा; offspring संतति *f*, संतान *n*.

Brook * ओढा, ओहळ.

Brook * *v*. सोसणें, सा़हणें, पोटांत घालणें.

Broom * besom केरसुणी *f*, झाडू *f*; a shrub एक कांटेझाड आहे. -stick केरसुणीचा दांडा.

Broth * मासाचा किंवा दुसऱ्या पदार्थाचा घाटा -रस.

Brothel *F*. छिनालवाडा, वेश्यालय *n*.

Brother* (*Skr. bhrâtar*) he who is born of the same father and mother with another भाऊ, बंधु; half - b. सावत्र भाऊ; one related closely to another by some common tie or interest, as of rank, profession, membership in a society, toil, suffering, &c.;—used among judges, clergymen, professors of religion, &c. भाऊ, बंधु (in comp. विद्या -धर्म कर्म -गुरुबंधु); one that resembles another in manners or traits of character भाऊ (Prov. xviii. 9). -hood भाऊबंदकी *f*, भाऊपणा; an association अखाडा, पंक्ति *f*; a class of men of the same kind, profession, or occupation एका धंद्याचे -पेशाचे लोक. -in-law मेहुणा. -ly *a*. भावांचा; b. love बंधुप्रीति *f*.—*ad*. भावासारखा; affectionately प्रीतीनें, ममतेनें: I speak but b.

Brow* (*Skr. bhrú*) the prominent ridge over the eye भोंवई *f*, भ्रुकुटी *f*; the eyebrow भोंवईचे केश *pl*, भोंवई *f*; forehead कपाल *n*, भाळ *n*, ललाट *n*; general air of the countenance मुखचर्या *f*; edge of a steep place कडा, कड *f*; to knit the *brows* भोंवयांस गांठ देणें. -beat *v*. भोंवया चढवून बोलणें: to b. witnesses. -bound *a*. मुगुट घातलेला, किरीटधारी, किरीटी. -less *a*. निलाजरा.

Brown* उदी -तपकिरी रंग; dark b. घनसावळा; light b. भुरा. — *a*. उदी, तपकिरी, पिंगटवर्ण. — study, thoughtful absent-mindedness विचारांत गुंग होऊन देहभानावर नसणें *n*.

Browse *F*. झाडाचा कोंवळा पाला, कोंवळ्या फांद्या *f pl*.—*v*. कोंवळ्या कोंवळ्या फांद्या -पाला खाणें [on].

Brucina, Brucine *F*. काजऱ्याचा सत्वांश.

Bruise* *v*. crush as drugs, &c. ठेंचणें, चेंचरणें, खरंगटणें; injure, as animals, or vegetables दुखापत क., चेंचरणें.—*n*. दुखापत *f*, खोंक *f*, जखम *f*.

Bruit *F*. अफवा *f*, आवई *f*, जनप्रवाद. — *v*. जाहीर -प्रसिद्ध क.

Brumal *a*. (*bruma*, winter) हिंवाळ्याचा, हैम.

Brunette *F*. काळसांवळी बायको *f* -मुलगी *f*.

Brunt* heat of an onset झपाटा, तडाखा: the b. of a battle; shock धक्का, धडाका, आघात.

Brush *F*. instrument to rub or clean clothes, lay on colors, &c. कुंचा *f*, बोथ *f*: branches of trees lopped off कवळ *f*; फांट्या *f pl*; thicket of shrubs झुडूप *n*; skirmish चकमक *f*, झटापटी *f*, फाटफूट *f*, bushy tail of a fox कोल्ह्याचें गोंडाळ शेपूट *n*. — *v*. कुंचीनें झाडणें -साफ करणें -रंगविणें इ०; कुंचा -कुंची फिरविणें; touch in passing घसरा देऊन जाणें; up घांसपूस क.; उजळणें, उजरणें, उजळणी क. -wood झाडी *f*, झुडूप *n*; small branches of trees cut off कवळ *f*.

Brute (*brutus*, stupid) beast पशु, जनावर *n*; brutal person पशुशील मनुष्य, हैवान

—*a.* not having sensation जड, चैतन्यशून्य (earth); irrational बुद्धिहीन, अज्ञान (beast); animal देहसंबंधी, दैहिक, अंग; b. force अंगधटाई *f* -मस्ती *f*; bestial जनावरासारखा (violence); uncivilized रानटी, अडाणी: b. philosopher अरण्यपंडित.—BRUTAL *a.* पशूचा, पशुसंबंधी (nature); पशूसारखा; merciless निर्दय, क्रूर. -ITY पशुपणा, पशुत्व *n*; निर्दयपणा, निठुरता *f*.—BRUTISH *a.* पशूसारखा, पशुतुल्य; निर्दय; रानटी.

BUBBLE *D.* small bladder or vesicle of water or other fluid inflated with air बुडबुडा, फुगा; vain project चटक्याचे मांडव *pl*, भुसकेलड्डू *pl*, पाण्यावरचा बुडबुडा; dishonest speculation ठकबाजीचा व्यापार: the South - Sea b.—*v. i.* बुडबुडे येणें; make a bubbling sound खतखतणें, सळसळणें [up, out].—*t.* ठकविणें, फसविणें.

BUBO (*L.*) बद *n*, वळ.

BUCK *Ger.* male of the fallow-deer काळविंट;—of the goat बोकड;—of the sheep मेंढा;—of the rabbit and hare ससा; a gay, dashing young fellow अकडबाज, छानछूक.

BUCKET* पोहरा, डोल, बादला, मोट *f*, इ० प्रकारचें शेंदणें *n*; the large b. of a draw-well मोट *f*.

BUCKLE *F.* an instrument for fastening dress or harness अडकवण *n*, 'बकल' *n*; a curl कुरळ *n*.—*v.* कचकीनें अडकविणें; prepare for action (काम करायास) कंबर बांधणें, कासघालणें. — BUCKLER एक प्रकारची ढाल *f* आहे.

BUD *D.* कळी *f*; a large b. कळा.—*v. i.* कळी येणें -फुटणें.—*t.* पिवंदी क.: the plum and the peach are *budded* on each other.

BUDGEROW ऐषआरामाची एक बंगाली बोट *f* आहे, बजरा.

BUDGET *F.* a bag with its contents (भरलेली) पिशवी *f* -थैली *f*; a stock पुंजी *f*, पोतें *n*, भरणा; papers respecting the finances of the British nation ब्रिटिश राज्याच्या वसूल वासलातीच्या पत्रकांचा रुमाल; [to open the b., to lay before a legislative body the financial estimates and plans of the executive government].

BUFFALO *It.* रेडा, टोणगा, हेला; female b. म्हैस *f*.—BUFF म्हसीचें कातडें *n*; military coat made of buff-skin or similar leather म्हशीच्या कातड्याचा लष्करी डगला; [color between light pink and light yellow]; a blow ठोंसा, बुक्की *f*.

BUFFET *It.* बुक्की *f*, ठोंसा.—*v.* बुकलणें, ठोंसे मारणें; contend against भांडणें, भिडणें; to b. the billow (पाणी -लाट) तोडणें.

BUFFOON *F.* low jester हांडीबाग, भांड; a mimic माकडी, विदूषक. -ERY मस्करी *f*, थट्टा *f*; माघवीपणा.

BUG *W.* ढेंकूण. -BEAR बागुलबावा, बौ; to make a b. of भोंवा करून सांगणें.

BUGLE *F.* तुतारी *f*, रणशिंग *n*, करणा, 'बिगुल' *n*. (*bugulus*) काळीपोत *f*, कांचेचा काळामणी *f*.

BUILD **v.* construct बांधणें, रचणें, उभारणें; establish पाया घालणें, स्थापणें (reputation, hope); up, increase and strengthen वृद्धि क., स्थिर -दृढ क. (Acts xx. 32); to b. castles in the air मनांत मांडे खाणें.— *i.* (घर वगैरे) बांधण्याचा धंदा क.; depend, as on a foundation अवलंबणें, भिस्त -मदार ठेवणें -राखणें. -ER घरबांधणारा, गवंडी, सुतार इ०, शिल्पी. -ING बांधणें *n*; a thing built इमारत *f*, इमला; the art of constructing edifices इमारती बांधण्याची कला *f*, शिल्प *n*.—BUILT *a.* बांधलेला, बंदिस्त.

BULB (*bulbus*) गड्डा, कांदा; — of the eye डोळ्यांतलें बुबूळ *n*. -OUS *a.* कांद्याचा, कंदमय.

BULGE* *v.* swell out कोंक -फुगा -पोट येणें; see BILGE.

BULK *W.* size लांबीरुंदी *f*, परिमाण *n*; the main mass or body मुख्यभाग. — BULKINESS मोठेपणा, स्थूलत्व *n*. — BULKY *a*. मोठा, रटेल, अवजड.

BULL *Ger.* बैल; a sign of the zodiac वृषभरास *f*; — *a.* in comp. large मोठा, घोड, (in comp. घोडशीर *f*): b.-head. -DOG एक जातीचा मोठ्याडोक्याचा कुत्रा आहे.—BULL'S-EYE पोलीसच्या शिपायाचें कंदील *n*. — BULRUSH मोठ्या जातीचा लव्हाळा. — BULLOCK खोंड, गोऱ्हा.

BULL (*bulla*, a seal) an edict of the pope पोपाचें आज्ञापत्र *n*; the seal appended to the edicts of the pope पोपाच्या आज्ञापत्राची मोहर *f*; a blunder चूक *f*, भूल *f*.

BULLET *F.* a small ball गोळी *f*; a shot (बंदुकीची) गोळी *f*.

BULLETIN *F.* an official account, as of a battle लढाई वगैरेची सरकारी बातमी *f*; news recently received ताजी बातमी *f*; [an official statement respecting the health of some distinguished personage].

BULLION (*bulla*, bubble) लगडीचें-गट्टाचें सोनें *n*, किंवा चांदी *f*.

BULLY (?) गरिबांचा काळ, इमाम दांडगा. — *v.* गुरकावणें, दांडदपट क. -ING डरकावणी *f*, दटावणी *f*.

BULWARK *D.* a bastion बुरूज; a means of defence रक्षण *n*, आश्रय [*pl* the sides of a ship above the upper deck].

BUMBOAT (from *bum*, the buttocks) बंदरांतील जहाजावर सामग्री नेण्याची होडी *f*, 'बाबोट' *f*.

BUMP *W.* a thump धप्पा, थडाका, झपाटा; a swelling टेंगूळ *n*, गांठ *f*. — *v.* थडाका मारणें, धाडकन मारणें. — *i.* बगळ्यासारखा आवाज क.

BUMPER *F.* a cup filled to the brim or till the liquor runs over तोंडोतोंड भरलेला प्याला, परिपूर्णपात्र *n*; crowded house at a theatre गच्च-दाट भरलेलें नाटकगृह *n*.

BUNCH *D.* a protuberance टेंगूळ *n*; — on a camel's back मदार *f*; a cluster घोंस, घड, जुडगा;—of flowers झेला, झुमका.—*v. i.* टेंगूळ येणें.—*t.* घोंस-झुबका-जुडगा बांधणें.

BUNDLE * a number of things bound together गाठोडें *n*, बोचकें *n*, मोट *f*; a small b., as of paper &c. पुडका;—as of medicine-powder पुडी *f*;—of grass, sticks जुडी *f*, जुडगा, मोळी *f*, भारा;—of cotton गट्ठा, बिंडा;—of papers तबलक *f*.—*v.* गाठोडें बांधणें; off उचलबांगडी क.; up गठडी बांधणें.

BUNG *W.* stopper of a cask पिपाचा दट्टा.—*v.* दट्टा-गुडदी बसविणें [up]. -HOLE पिपाचें तोंड *n*, पिपांत दट्टा बसविण्याचें भोंक *n*.

BUNGLE *v.* (?) ओबडधोबड क.-तांगडणें-शिवणें. —*n.* अडाणी-अडमूठ काम *n*.

BUOY *F.* a floating mark to point out shoals, anchors, rocks, &c. बोयरा, तरतें *n*. —*v.* तरतें-तरता-तरंगत ठेवणें [up]; mark by buoys बोयऱ्याची निशाणी क. (a channel); support धीर देणें. -ANCY तरतेपणा, तरण्याची शक्ति *f*, तरणधर्म; vivacity उल्लासवृत्ति *f*. -ANT *a.* तरता: b. on the flood; bearing up, as a fluid वाहून नेणारा, वहनशील; उल्लासी, आनंदवृत्ती.

BUR *F.* वनस्पतीच्या बिजावरचें खरखरीत किंवा कांट्याचें वेष्टन *n*.

BURDEN* that which is borne ओझें *n*, भार; that which is grievous, wearisome, or oppressive भार, ओझें *n*, कष्ट *pl*, पीडा *f*, जाच, काच; the contents of a ship भरताड *n*; ship of b. बारकस *n*; — of a favor received आभार *F.*; chorus or refrain पालुपद *n*, ध्रुपद *n*; the main topic मुख्य विषय, अनुवाद: the b. of a prayer; beast

of b. पाठाळ *n.* — *v.* ओझें घालणें -लादणें; जाचणें, काचणें. -SOME दुर्वह, जड, भारि.

BUREAU *F.* a desk with drawers for papers कागद ठेवायाचें खणांचें मेज *n*, 'बिरो'; office where business is transacted कचेरि *f*; department for the transaction of business by a public functionary खातें *n*.

BURGH, See BOROUGH.

BURGLAR *F.* घरफोड्या, भिंतफोड्या, गृहभेदी.—BURGLARY, *Law*, the breaking and entering the dwelling-house of another, in the night-time, with intent to commit felony therein घर फोडण्याचा अपराध, संधिचौर्य *n*.

BURIAL, See under BURY.

BURLESQUE *F.* satire निंदात्मक भाषण *n*; an ironical composition intended to excite laughter हसूं येण्यासारखी नक्कल *f*. — *a.* थट्टेचा, हसण्याजोगा.—*v.* थट्टा क.

BURN* *v.* consume with fire जाळणें; reduce to ashes भस्म -राख क.; injure by fire or heat विस्तवानें किंवा उष्णतेनें खराब क., जाळणें; to b. steel in forging;—food in cookery करपवणें, जाळणें; to b. one's face in the sun उनानें तोंड काळवटणें; subject to the action of fire आंच -अग्निपुट देणें; to b. bricks विटा भाजणें; excite animal heat in आग -दाह क.: this fever *burns* me up; cauterize लासणें, भाजणें;—the throat &c. खवखवणें, जाळणें; b., or b. together, as two surfaces of metal, to fuse and unite them by pouring over them a quantity of the same metal in a liquid state कस्तुर क.;—out, up जाळून फस्त क., राख -रांगोळी क.; to b. one's fingers, to get one's self into unexpected trouble, as by interfering in the concerns of others, speculation, &c. शेकणें; [to b. out of house and home, to be driven out from a dwelling, warehouse, &c., by the burning of it].—*i.* आग लागणें, पेटणें (Deut. ix. 15);—a lamp जळणें, तेवणें; जळणें, करपणें (food, in cookery); sparkle चकचकणें: the barge *burned* on the water; with desire हुरहुरणें, सुरसुरणें; be in commotion क्षोभणें, संतापणें, क्षुब्ध होणें;—the mouth, &c., under acrid or pungent tastes पोळणें, फणफणणें;—the body in fever धगधगणें, तलखी क., तापणें; rage with destructive violence जळफळणें; to b. out जळून राख होणें, जळून जाणें.—*n.* जळणें *n*, दहन *n*; a hurt caused by fire चरका, चटका. -ING जळणें *n*; आग *f*, दाह, डोंब.—*a.* फार तापलेला, अतिउष्ण; उग्र, तिखट (scent); —glass सूर्यकांत.

BURNISH *v. F.* polish शिकल क., झिलई देणें (silver); render bright उजळ -सोज्वळ क. -ER शिकलगार; the tool that burnishes मोहरा, ओपसळई *f*.

BURROW * बीळ *n*, विवर *n*. — *v.* बीळ करून राहणें [in].

BURSE, BOURSE (*bursa*) an exchange where merchants meet व्यापाऱ्यांचा अड्डा -फड.—BURSAR विद्यालयाचा खजीनदार.—BURSARY, treasury of a college or monastery विद्यालयाचा किंवा मठाचा खजीना; charitable foundation in a university विद्यालयांतील धर्मार्थ नेमणूक *f*.

BURST* *v.* एकदम जोरानें फोडणें -फाडणें उघडणें. — *i.* break open with force जोरानें फुटणें -निघणें; break away सुटून मोकळा होणें;—with laughter हसूं लोटणें;—into tears गहिंवर येणें; [forth, out, away, upon, into].—*n.* फुटणें, स्फोटन *n*;—of applause गजर;—of thunder कडाका, धडाका, भडाड, बार;—of grief, tenderness गहिंवर;—of anger झटका.

BURY* *v.* cover out of sight लपविणें, झांकणें; with earth मातींत पुरणें; inter with funeral ceremonies पुरणें, मूठमाती देणें,

प्रेतक्रिया क.; hide in oblivion विसरणें, पोटांत घालणें (strife) [in, under]. -ING-PLACE प्रेतभूमि f, मसणवट f.—BURIAL पुरणें n, मूठमाती f, प्रेतक्रिया f.

BUSH Ger. झुडूप n; close and dense b. जाळी f.—BUSHY a. झाड्य.झुडपाचा; thick like a bush गोंडस, गोंडेदार (tail); full of branches झांपळ, निबिड.

BUSHEL F. the circle of iron in the nave of a wheel वसूं n; a dry measure एक कैली माप (मुंबईच्या फऱ्या इतकें) आहे; a large quantity खंडी f, मण, डोंगर.

BUSS L. चुंबन n, मुका.

BUST F. कमरे पासून वरच्या शरिराचें चित्र n, मुखवटा.

BUSTARD F. माळढोक.

BUSTLE* v. i. धांवाधांव क. — n. धांवाधांव f, गडबड f; as of business &c. खटपट f, वावर; tumult गोंधळ, घालमेल f.—BUSTLER खटपट्या, उलेढाल्या.

BUSY* a. engaged for the time in business कामांत गुंतलेला -असलेला, उद्योगांत लागलेला; constantly active उद्योगी, व्यवसायी; restless चपळ, चंचळ (feet); officious लुबरा, लांडा, बुचाकारभारी; — a town गजबजीत [with].—v. कामांत लावणें, गुंतवणें. -BODY लुडबुड्या.—BUSINESS, that which occupies the time, attention, or labor of one, as his principal concern काम n, कामगिरी f, उद्योग; any particular occupation for a livelihood धंदा, उद्योग; traffic व्यापार, देणें घेणें n; concern -कडचें काम n, खटलें n; affair खटला, प्रकरण n, गोष्ट f.

BUT* prep. & conj. except शिवाय, खेरीज, सोडून; nevertheless तरी, पण, परंतु (1 Cor. xiii. 13); that कीं; only केवळ, मात्र (2 Cor. iv. 17).

BUTCHER F. one who slaughters animals, or dresses their flesh for market खाटीक, कसाई; a slaughterer कसाब.—v. खाटीकपणा क.; खून क., कंदन क.—BUTCHERY खाटीकपणा; कंदन n, कतल f.

BUTLER F. वाकनीस, कोठवळा, 'बुटलेर, बुटनेर.'

BUTT F. large end of a thing बुडखा; limit मर्यादा f, सीमा f;—of a musket दस्ता; mark to be shot निशाण n, टिपण n; person at whom ridicule, jest, or contempt is directed खेळवणा, विनोदास्पद; push given by the head of an animal टक्कर, हुंदका, ढेमणी f; [a short piece of land left unploughed at the end of a field].—v. टक्कर -ढुसणी देणें.

BUTTER * लोणी n, नवनीत n.—v. लोणी लावणें, चोपडणें [over]. -FLY फुलपांखरूं n, पिंगाणें n. -MILK ताक n. -TOOTH चौकीचा दांत. -TREE एक झाड आहे त्यापासून लोण्या सारखा पदार्थ मिळतो.—BUTTERY a. लोण्यासारखा.—n. दूध, ताक वगैरे ठेवायाची खोली f; [a room in some colleges where refreshments are sold to the students].

BUTTERIS F. instrument for paring the hoof of a horse सुंबतरास.

BUTTOCK F. ढुंगण n, टिरी f.

BUTTON F. गुंडी f, भुतावें n, अडकवण n; holding by the b. मगरमिठी f;—of wood to fasten doors चिमणी f. — v. गुंडी अडकविणें, गुंडीनें अडकाविणें [up].

BUTTRESS F. टेका, टेकावा, धिरा, पुस्ती f.—v. टेकावा देणें.

BUXOM* a. रंगेल, खुषमौजी.

BUY * v. acquire the property, right, or title to, by paying a consideration or an equivalent, usually in money विकत घेणें; procure at a price मोल देऊन घेणें: to b. favor with flattery; off मन वळविणें; पैसा -लांच देऊन आपल्या पक्षाचा क.; out (व्यापारांत) दुसऱ्याची पाती विकत घेणें; on

credit उधार घेणें, उचापत काढणें. -ER विकतघेणारा. -ING खरिदी *f*, क्रय.

Buzz *O. E. v. i.* गुणगुणणें, गोंगावणें [about]. —*t.* फुसफूस -कुजबूज क. — *n.* गुणगुणाट, घोंघों; कुजबूज *f*, फुसफूस *f*.

By* *prep.* near to जवळ, पाशीं: sit b. me; past जवळून, वरून: to go b. a church; through कडून, पासून, हातून, नें: a city is destroyed b. fire; to take b. force; b. this timo आतां, एव्हां; day b. day दिवसेंदिवस; to sell b. pounds शेरांवर -शेरांवारी विकणें; to pass b. water पाण्यावरून जाणें; to swear b. heaven आकाशाची शपथ वाहणें; to sit b. himself एकटा बसणें; b. and b. अमळशानें; b. day दिवसा; to stand b. जवळ उभें राहणें, धीर -आसरा देणें; one b. one एक एक, एकामागून एक; twenty feet b. forty एका बाजूनें वीस फूट व दुसऱ्या बाजूनें चाळीस, चाळीस फूट लांब व वीस फूट रुंद; [to let go b. the run, to let go altogether; north-west b. west, toward the west from north-west; good-b. is a corruption of *God be with you* (b'w'ye)].

By *ad.* near जवळ: there was no person b. at the time; gone गेलेला, गत: the procession is gone b.; aside एकीकडे, बाजूस: to lay b.—*n.* also Bye गौणपक्ष, फलितार्थ: upon the b.; b. the b. प्रसंगवशात्, हां, बरीच आठवण झाली इ०.

By *a.* आड, चोर. -BIDDER लिलावांत मालधन्याच्या वाटची किमत चढविणारा. -BUSINESS आडकाम *n.* -CORNER आडकोन, चोरकोनाडा. -END स्वार्थ, स्वहित *n.* -GONE *a.* गत, गेलेला.—*n.* गतगोष्ट *f*, गेलेली गोष्ट *f*. -LANE आडगल्ली *f*. -PATH आड -चोरवाट *f*. -STANDER मौज पाहणारा, तमासगीर; idle *bystanders* आलेभाऊ कोलेभाऊ *pl.* -VIEW स्वार्थदृष्टि -बुद्धि *f*. -WAY आडवाट *f*. WORD म्हण *f*.

C.

Caaba *Ar.* ह्या नांवाचा मक्केंत एक दगड आहे, त्याची मुसलमान लोक भक्ति करितात.

Cabal *Heb.* a junto जट, जूट *f*; an intrigue कवटाळ *n*, कूट *n*. — *v.* कट -मसलत क. — Cabala, tradition of the Jews यहुदी लोकांची दंतकथा *f*; secret science गूढ विद्या *f*.

Cabbage (*caput*, head) a vegetable कोबी *f*, कोई *f*; [cloth purloined by one who cuts out garments].—*v.* बेततांना कापड चोरणें.

Cabin *W.* small room लहान कोठडी *f*; cottage खोपट *n*, झोपडी *f*; any covered place for a temporary residence तंबु, राहुटी, छप्पर वगैरे दोन दिवसांसाठीं असऱ्याची जागा *f*; apartment in a ship गलबतांतली खोली *f*.

Cabinet *F.* closet लहान खोली *f*; private room in which consultations are held मसलतीची खोली *f*, खलबतखाना; select or secret council of a prince or executive government राजमंत्र्यांचा निवडक किंवा गुप्तसभा *f*, अष्टप्रधान *pl*, मंत्रिसमूह; a box with drawers and doors; a private box खणांची पेटी *f*, बगदें *n*; close place, where things of value are deposited for safe keeping मोलवान वस्तु सुरक्षीत ठेवण्याची कडीकोट जागा *f*.—COUNCIL मुख्य प्रधानांची सभा *f*. -MAKER सफाईचें लाकडी काम करणारा सुतार.

Cable *D.* rope or chain by which a ship is anchored लंगर दोर, दोरखंड *n*; a large rope नाडा; [cable's length, the length of a ship's cable, usually 120 fathoms; to pay out, or to veer out the c., to slacken it that it may run out of the ship]; to slip the c., to let it run out लंगर दोर सोडणें.

CACKLE *v.* *D.* make a noise like a hen or goose हंसनाद क.; giggle हिहीं करून हसणें.

CACOCHYMY *Gr.* vitiated state of the humors त्रिदोष.

CADAVEROUS (*cadaver*, corpse) प्रेतकळेचा (look); प्रेताचा (scent).

CADENCE (*cadere*, to fall) (बोलतांना किंवा वाचतांना) उतरता स्वर, पात; tone वाणी *f*, स्वर; pause at the end of an air विराम.

CADET *F.* a volunteer in the army, who serves in expectation of a commission लष्करांतील सनदी जागेचा (पगारी) उमेदवार; a military student लष्करी विद्यार्थी.

CAGE *F.* enclosure for birds पिंजरा; place of confinement for criminals कोंडी *f*, पिंजरा.—*v.* पिंजऱ्यांत कोंडणें.

CAJOLE *F.* भोंदणें, फुसलावणें. -RY लाडीगोडी *f*, गुळगुळ थापडी *f*.

CAKE *D.*—of flour भाकर *f*, पोळी *f*; concrete matter ढेप *f*, डिखळ *f*, वडी *f*; as of dried mud खपला, पोपडा.—*v.* वडी क.—*i.* जमणें, डिखळी होणें.

CALAMITY (*calamitas*, injury of crops) अरिष्ट *n*, संकट *n*, विपत्ति *f*.—CALAMITOUS *a.* हाल अपेष्टेचा, विपत्ति सोसणारा (persons); producing distress दुःखप्रद, अनिष्टकारक.

CALCAREOUS, CALCINE, See under CALX.

CALCOGRAPHY (*calx*, lime, *Gr.* *graphein*, to write) खडूनें चित्रें काढण्याची अथवा खडूच्या चित्रांसारखीं चित्रें खोदून काढण्याची विद्या *f*.

CALCULATE *v.* (*calculus*, pebble) compute हिशेब क., गणणें; as an eclipse वर्त्तविणें, पाहणें; adjust by computation बेतानें -हिशेबानें बसविणें -जुळणें, उपयुक्त क.: to c. a system of laws;—roughly अजमासणें, आकारणें [on, upon].—CALCULATION गणना *f*, हिशेब; अदमास, सुमार; *Astron.* गणित *n*, अंकचालन.—*n.* CALCULATOR गणित करणारा, अजमासणारा, आकारणारा; वर्त्तविणारा, गणक.

CALCULUS (*L.*) मुतखडा.

CALDRON *F.* हांडा, डेग *f*.

CALENDAR (*calendarium*, account-book) almanac पंचांग *n*; list फेरिस्त *n*, याद *f*; c. month सौर मास.—*v.* कुंदी क.

CALF*—of a cow वासरूं *n*;—of a buffalo रेडकूं *n*; stupid person टोणगा, गाईचा गोऱ्हा; thick part of the leg पायाची पोटरी *f*, पिंडरी *f*.—*v.* विणें, जावपें देणें.

CALIBRE (*F.*) diameter of the bore बंदुकीच्या -तोफेच्या तोंडाचा व्यास; diameter of a round body गोलाचा परिघ -व्यास; compass of mind पोंच, आंवाका *f*.

CALICO (from *Calicut*) कापसाचें कापड *n*; printed c. छीट *n*.

CALIF *Ar.* title of the successors of Mahomed खलीफ.— CALIPHATE खलीफाचा अधिकार.

CALIGRAPHY (*Gr.* *kalos*, fair, *graphein*, to write) कलमसफाई *f*, सुलेखन *n*.

CALIX, CALYX (*L.*) फुलाचें बाहेरलें आच्छादन *n*, पुष्पावरण *n*.

CALL *v.* (*calare*) invite or command to come बोलावणें, पाचारणें; summon by a particular name नांवानें हाक मारणें; name नांव घेणें; designate (कामावर) योजणें, नेमणें; proclaim जाहीर क.; back रद्द क., फिरवणें; for मागणें, हक्कानें मागणें; a crime *calls* for punishment; forth पुढें आणणें (a faculty of the mind); in उगविणें, उगराणी क.; बोलावणें, जमविणें (friends); off वरून फिरवणें -वळविणें (attention); वरून बोलावणें: to c. off workmen from their employment; out युद्धास ये म्हणणें -आमंत्रण देणें; हटकणें, ललकारणें; चाकरीवर बोलावणें (troops); names नांवें बोटें ठेवणें

शिव्या देणें;—in question संशयघेणें; over हजिरी घेणें, नांवनिशी वाचणें; up आठवणें; कामा करितां किंवा वादाकरितां आणणें (a bill before a legislative body).—*i.* हाकमारणें; बोलावणें; make a brief stay उतरणें, राहणें; make a brief visit भेटीस जाणें; on, upon भेटीस जाणें; कर्जाची मागणी क.; प्रार्थना किंवा धांवा क.—*n.* हाक *f*, आरोळी *f*, साद; मागणी *f*; बोलावणें *n*, पाचारणें *n*; requisition प्रयोजन *n*, अवश्यकता *f*; divine vocation ईश्वराचें बोलावणें *n*, ईश्वरीवाणी *f*; short visit भेटीस जाणें *n*, थोडकी भेट *f*, (in humble phraseol.) पायां जवळ येणें; vocation धंदा, रोजगार. -ING बोलावणें *n*, आवाहन *n*; धंदा, उद्योग; a class of persons engaged in any profession एका पेशाचे लोक; ईश्वराचें बोलावणें *n* -काम *n*.

CALLOUS *a.* (*callosus*) hardened बधिर, सुना, बहिरा; unfeeling कोडगा, निलाजरा.

CALM *a. F.* not stormy निर्वात, संत; quiet शांत, थंड, निर्वात; चित्ताची स्वस्थता *f*, सौमनस्य *n*.

CALOMEL (*Gr. kalos*, fair, *melas*, black) पाऱ्याची मात्रा *f*, रसकापूर.

CALORIC (*calor*, heat) उष्णतेचें बीज *n* -तत्व *n*, —*a.* उष्णतेचा.—CALORIFIC *a.* उष्णताजनक -कारक.

CALUMBA (from *kalumb*, its native name in Mozambique) कलमकाचरी *f*.

CALUMNY (*calumnia*) false accusation of a crime or offense, knowingly or maliciously made or reported to the injury of another बालंट *n*, तुफान *n*, आळ.—CALUMNIATE *v.* तुफान -आळघेणें [by].—CALUMNIATOR बालंटखोर, कुभांडी.—CALUMNIOUS *a.* चुगलीचा, तुफानाचा.

CALX (*L.*) limestone भस्म.—CALCAREOUS *a.* चुन्याचे धर्माचा, चूर्णधर्मक; c. spar सुफेद सुरमा.—CALCINE *v.* भस्म क., मारणें.

12 n

CAMBRIC *F.* एक फार तलम तागाचें कापड *n* आहे.

CAMEL* उंट *m, n*, सड *f*.—CAMLET उंटाच्या केसाचें वस्त्र *n*; हें आतां केस व रेशीम, किंवा लोकर व सूत यांचें करितात.

CAMELOPARD (*Gr. kamelos*, a camel, *pardalis*, leopard) जिराफ नांवाचें एक आफ्रिकेंतलें जनावर आहे.

CAMERA OBSCURA (dark chamber) फोटोग्राफीच्या विद्येंत चित्र काढण्याचें एक यंत्र *n* आहे.

CAMP (*campus*) ground on which tents, huts, &c. are erected for shelter तळ, collection of tents, huts, &c. for shelter, arranged in an orderly manner छावणी *f*; body of persons encamped in the same spot गोट, छावणी *f*.

CAMPAIGN *F.* large open plain मैदान *n*. पटांगण *n*; time that an army keeps the field मोहीम *f*, स्वारी *f*.

CAMPHOR (*camphora*) कापूर, कर्पूर. -ATE *v.* कर्पूरमिश्रित क.—*a.* कापराचा; also -ATED *a.* कर्पूरमिश्रित (liquors, draught). -OIL कापरेल *n*. -TREE कापराचें झाड *n*.

CANAL (*canalis*, a channel) artificial water-course कालवा, नदीचा पाट; duct in the body for the passage of liquids or solids नळ, नळी *f*, वाहिनी *f*: the alimentary c.

CANCEL *v.* (*cancelli*, lattice) cross and deface the lines of a writing खोडणें, छेकणें, हरताळ चोळणें; annul रद्द क., फांटा देणें.

CANCER (*L*). crab खेकडा; a sign of the zodiac कर्करास *f*; a virulent sore चाळणपुळी *f*.

CANDID *a.* (*candidus*, white) fair मनाचा मोकळा, निष्कपट, प्रांजल; just वाजवी, रास्त, नीट (view).—CANDOR निष्कपटपणा,

सरळभाव, सालसपणा.—CANDIDATE उमेदवार, पदाभिलाषी.

CANDLE (*candela*) मेणबत्ती *f*; luminary उजेड देणारा पदार्थ; [excommunication by inch of c. is a form of excommunication when the offender is allowed time to repent only while a c. burns; sale by inch of c., an auction in which persons are allowed to bid only till a small piece of c. burns out]. -LIGHT मेणबत्तीचा उजेड; अमूक वेळपर्यंत लागतील तितक्या मेणबत्त्या *f pl.* -STICK मेणबत्तीचें घर *n*.

CANDY (*Skr. khand,* a piece, sugar in pieces) साकरपाक. — *v.* साकरेंत पाकविणें; form into crystals साखरेचे खडे -कांडी क.

CANE (*canna*) reed वेत, बांबू, ऊंस ह्यांच्या जातीचें झाड *n*; a walking-stick वेतकाठी *f*, हातांत धरायाची छडी *f*, काठी *f*. — *v.* वेतानें -छडीनें मारणें, चमकावणें; furnish with c. वेत घालणें (chairs); punish with a c. वेताच्या छडीनें मारणें -शासन क.

CANINE *a.* (*canis,* dog) कुत्र्यांचा; having the properties of a dog कुत्र्याच्या गुणांचा, श्वानधर्मक. — CANICULE, the dog-star लुब्धक.

CANISTER (*canistrum,* a basket of reeds) वेताची टोपली *f*, करंडी *f*; चहा, साखर, काफी इ॰ ठेवायाचा डबा.

CANKER (*cancer*) corroding ulceration पुळी *f*, चाळपुळी *f*; anything that corrodes, corrupts, or destroys कीड *f*, वाळवी *f*, कसर *f*; a disease in trees कीड *f*; a disease of the horse's foot घोड्याच्या पायांतला एक रोग आहे.

CANNIBAL *F.* माणसाचें मासखाणारा मनुष्य, नरभक्षक मनुष्य. -ISM माणसानें माणूस खाणें *n*, नरभक्षण *n*; barbarity रानटीपणा, निर्दयपणा.

CANNON (*canna,* tube) तोफ *f*, नाळ *f*; blank discharge of c. वायबार; c.-ball (तोफेचा) गोळा; range of c.-ball गोळ्याचा टप्पा -मारा. -ADE *v.* तोफेच्या गोळ्यांनीं हल्ला क., -वर तोफमारणें-सोडणें.—*i.* तोफांचा भडिमार क., मारागिरी क.

CANOE *Sp.* होडी *f*, डोणी *f*.

CANON (*L.*) rule कानू, कायदा; rule of doctrine or discipline शास्त्र *n*, सूत्र *n*; authentic books of the Holy Scriptures ख्रिस्तीशास्त्राचीं असल पुस्तकें *n pl*, ख्रिस्तीधर्म शास्त्रसंहिता *f*; [in monasteries, book containing rules of a religious order]; catalogue of saints canonized in the Roman Catholic Church संतावळी *f*; a dignitary of the church ख्रिस्ती मंडळींत एक अधिकारी आहे. -ICAL *a.* शास्त्रसंबंधी; यथाशास्त्र, शास्त्राप्रमाणें; [c. books, those books of the Scriptures which are admitted by the canons of the Church to be of divine origin]. -IZE *v.* संतमाळिकेंत गणणें, अमूक मनुष्य संत झाला असें प्रसिद्ध क.

CANOPY (*conopeum*) छत *n*, छत्र *n*, चांदवा; —of a travelling carriage पिंजरी *f*.

CANT (*cantare,* to sing) whining, hypocritical manner of speech मानभावाचें बोलणें *n*, दांभिक भाषण *n*; vulgar jargon कुभाषा *f*; technical form of speech परिभाषा *f*; secret language spoken by thieves, beggars, &c. चिकारी बोली *f*, नंदभाषा *f*, इ॰. -ER तोंडचा ब्रह्मज्ञानी, वाग्वेदांती; रडगाणें सांगून भीक मागणारा. — CANTICLE गीत *n*; *pl* शलमोनाचें गीत *n*, ह्या नांवाचें ख्रिस्ती शास्त्रांत एक पुस्तक आहे.— CANTO काव्याचा भाग, सर्ग.

CANTEEN *F.* vessel used by soldiers for carrying liquors for drink प्यायाचे पदार्थ ठेवायाचें शिपाई लोकाचें एक भांडें *n* आहे; sutler's shop in a garrison फौजेबराबरचें दुकान *n*, 'क्यांटीन' *f*; [a chest containing culinary and other vessels for officers].

CANTER (abbrev. of *Canterbury*) चौक-सात्रक चाल *f.*—*v.* चौक चालीनें चालणें.

CANTON *F.* जिल्हा, परगणा. -MENT फौजेची छावणी *f*, लश्कर *n.*

CANVAS (*cannabis*, hemp) coarse cloth made of hemp or flax, used for tents, sails of ships, painting, and other purposes ताट *n*, किंतान *n*; clear unbleached cloth, used for working tapestry with the needle वेलबुटी काढण्याचें एक जातीचें कापड *n* आहे; sails of a vessel तारवांचीं शिडें *n pl* -अवजारें *n pl.*—*a.* ताटाचा, किंतानाचा.

CANVASS *v. F.* sift शोध -छडा काढणें -लावणें; debate घाटणें, मथणें, घोळणें (opinion); go through in the way of solicitation समत मागत फिरणें (a district for votes). — *i.* समत मागणें: to c. for a friend.

CAP * part of the dress, made to cover the head टोपी *f*; mark of some rank, office, or dignity, as that of a cardinal पदवी किंवा अधिकार याची एक खूण आहे; the uppermost शिरोभाग, माथा, शिरोमणी; c. of fools मूर्खांचा शिरोमणी; respectful uncovering of the head सन्मानार्थ मस्तक उघडें क. *n*; anything resembling a cap in form टोपण *n*, टोपी *f*, शेंबी *f.*—*v.* शेंबी बसविणें; consummate पूर्ण क., शेवटास पोंचविणें, कळस क.; to c. verses, to name alternately verses beginning with a particular letter भेंडी लावणें. —*i.* सन्मानार्थ डोकें उघडें क.— CAP-A-PIE *F.* आपादमस्तक, आनखशिख, सर्वांग: he was armed c.

CAPABLE *a.* (*capere*, to take) possessing ability, qualification, or susceptibility शक्तिमान, मानून घ्यायाजोगा: a man c. of lifting heavy weights, a room c. of holding a large number; qualified लायक, योग्य, क्षम: a c. judge [of]. — CAPABILITY शक्ति *f*, धारणशक्ति *f*, क्षमता *f*, दक्षता *f*, काबिली *f*.

DIURNAL *a*. (*dies*, day) दिवसाचा (heat); daily रोजचा, नित्याचा, नित्य (task); recurring every day नित्य येणारा (fever); constituting the measure of a day दिवसाच्या मानाचा: d. revolution of the earth पृथ्वीची दैनंदिनगति *f*.

DIVAN *Ar*. a book पुस्तक *n*; account-book हिशेबाची चोपडी *f*; a council मसलत करणारांची मंत्रीसभा *f*; दिवाण *n*; council-chamber दिवाणखाना; a sofa मंचक.

DIVE* *v*. *i*. descend or plunge into water बुडी -डुबकी मारणें; study thoroughly पुरा अभ्यास क., निपुण -निष्णात् होणें; plunge into any business गर्क -चूर होणें, -च्या नादांत असणें; penetrate भेदणें, वेधणें [into, down, under].—DIVER बुडी मारणारा, पाणबुड्या; a bird एक पक्षी आहे, पाणडुबी *H*.

DIVERGE *v*. (*-vergere*, to bend) extend from a common point in different directions मध्यापासून -केंद्रापासून फांकणें -पसरणें [from].—DIVERGENT *a*. केंद्रापासून फांकणारा, केंद्रपराङ्मुख.

DIVERT *v*. (*-vertere*, to turn) फिरवणें, वळवणें, तोंड -मोहरा फिरवणें; amuse रमवणें, रंजवणें; draw away बहकावणें, भुलवणें; [from, with, by, to].—DIVERS *a*. अनेक, नाना, कित्येक (examples).—DIVERSE *a*. भिन्न, निरनिराळे, तऱ्हेतऱ्हेचे; multiform बहुरूपाचा, बहुरूप.—DIVERSIFY *v*. बहुरूप -बहुगुण क., चित्रविचित्र -नानाविध क.—DIVERSION फिरवणें *n*, परिवर्त्तन *n*; sport क्रीडा *f*, खेळ, अनुरंजन *n*; pastime गमत *f*, करमणूक *f*; *Mil*. act of drawing the ac-

tion and force of an enemy from the point where the principal attack is to be made भूल *f*, बहकावणी *f*.—DIVERSITY निराळेपणा, भेद; variety नानाप्रकार, अनेक प्रकार; separateness of being व्यक्तिभेद.

DIVEST *v.* (*-vestis*, garment) नागवणें, हिरावणें, उघडा -नुना -बुचा क.; opp. to *invest*, deprive हरण क., मुकविणें, हिसकून घेणें: to d. one of his rights [of].

DIVIDE *v.* (*dividere*) विभागणें, छेदणें; cause to be separate वेगळा -निराळा -अलग क.; share वांटणी -वांटे क., वांटणें; disunite in opinion or interest फूट -बिघाड पाडणें; भागणें, भाग देणें; [separate into two parts, for ascertaining opinions for and against a measure: to d. a legislative house in voting]; graduate अंश -भाग पाडणें -मांडणें: to d. a sextant [from, into].—*i.* फुटणें, अलग होणें, भेगलणें; मित्रत्व-स्नेह तुटणें; सभेचे दोन भाग करून मत देणें.—DIVIDED *a.* छिन्नविछिन्न; वेगळा केलेला, विभक्त; भागलेला, भाजित.—DIVIDEND भाग, हिस्सा; division of assets among creditors दामाशाई *f*; *Arith.* भाज्यांक.—DIVIDER भेदक, छेदक; वांटणारा &c.—DIVISIBLE *a.* भेदायाजोगा; खंडनीय; वांटायाजोगा; भाज्य; DIVISIBILITY भेद्यत्व *n*.—DIVISION दुभागणें *n*, कापणें *n*; छेद, विभागलेपणा; that which divides छेदक, भेदक; a partition पडदा, पूड, खण; a distinct section भाग, वर्ग, कोटि *f*;—of an army टोळी *f*, तुकडी *f*; difference in opinion बेबनाव, फूट *f*, मतभेद; difference of condition भेद, स्थित्यंतर *n*; *Arith.* भागाकार; distribution of a discourse into parts प्रकरणें -खंडें पाडणें *n*; a part so distinguished प्रकरण *n*, खंड *n*, भाग.—DIVISOR भाजक.

DIVINE *a.* (*divus*, belonging to a deity) देवसंबंधी, ईश्वरी, दैवी; proceeding from God देवा पासून निघणारा, देवाचा, ईश्वरी (judgments); appropriated to God देवास वाहिलेला, देवसेवेस योजलेला, देवाचा (service); d. songs देवाचें भजन करण्याचीं गीतें; godlike देवा सारखा -समान, ईश्वरतुल्य; excellent in the highest degree अत्युत्तम, अत्युत्कृष्ट; relating to theology ईश्वरविद्येचा -संबंधी (learning).—*n.* a minister of the Gospel ख्रिस्ती धर्मोपदेशक, पाद्री; a theologian ईश्वरविद्या जाणणारा, ईश्वरविद्येंत अभिज्ञ, *Hindu* terms, वैदिक, ब्रह्मज्ञानी, वेदशास्त्रसंपन्न, शास्त्री.—*v.* predict भविष्य सांगणें, detect शोधून काढणें.—*i.* use divination शकुन पाहणें, जोसीपण क.; utter prognostications ठोका -भविष्य सांगणें; have forebodings पूर्वसूचना असणें, होऱ्यांत येणें; guess अटकळ -अनुमान क. -LY *ad.* सर्वोत्तम, लोकोत्तर: d. fair; by the agency or influence of God ईश्वरी कर्तृत्वानें, ईश्वरी सत्तेनें, ईश्वर, in comp.: d. inspired ईश्वरप्रेरित.—DIVINER शकुन पाहणारा, दैवज्ञ, शकुन्याजोसी.—DIVINATION शकुनविद्या *f*, चेटक *n*, दैवज्ञान *n*, रमल *n*; prediction भविष्य *n*, भाकीत *n*.—DIVINITY, the state of being divine देवत्व *n*, देवपण *n*; God ईश्वर, देव; a false god खोटा -कल्पित देव; a celestial being, inferior to the supreme God, but superior to man देव, सुर, दैवत *n*; supernatural power or virtue अलौकिक शक्ति *f*; awe-inspiring character प्रभव, दरारा; science of divine things ईश्वरी विद्या *f*, परमार्थ ज्ञान *n*.

DIVORCE (See DIVERT) a legal dissolution of the marriage contract by a court or other body having competent authority नवऱ्या बायकोची कायद्या प्रमाणें सुटासूट *f*; separation वियोग; writing by which marriage is dissolved सूटपत्र *n*, सोडचिठ्ठी *f*.—

[from].— *v.* सूटपत्र देणें, सूटपत्र देऊन संबंध तोडणें; वियोग पाडणें, संबंध तोडणें.

DIVULGE *v.* (*-vulgare*, to spread among the multitude) फोडणें, प्रसिद्ध क., पुकारा क., चौघांत -चट्कणीं क.: *divulging* of a secret रहस्यभेद;—of counsel मंत्रभेद [to].

DIZZY* *a.* giddy घेरी -भोवंड आलेला; causing vertigo भोवंड आणणारा; heedless मूर्ख, अविचारी, डोकें फिरलेला.—DIZZINESS भोवंड *f*, घेरी *f*, गिरकी *f*.

DO* *v.* perform, as an action करणें; bring about घडविणें; finish समाप्त क., उरकणें, शेवटास नेणें: the battle *done*; make ready for an object, purpose, or use, as food by cooking शिजविणें, होऊं देणें, करणें: the meat is *done* on one side only; let होऊं देणें; to d. to death ठार मारणें; to d. away काढून टाकणें, दूर क.; to d. into आंत उतरणें, भाषांतर क.: the Pilgrim's Progress has been *done* into verse; deceive फसविणें, धत्तुरा दाखविणें; to d. one's best पराकाष्ठा- यथाशक्ति -होईल तितकें क.; to d. over पुनः -उलटून क.; आच्छादणें, लेपडणें, चोपडणें: boats *done* over with a kind of slimy stuff; up बांधणें, आवळणें; पुरतें क.; with कामीं लावणें: they know not what to d. with themselves; what have I to d. with you? मला तुम्हासीं काय करायाचें आहे, माझें तुझें काय आहे, मी तुझें काय लागतो? d. come अवश्य ये; I d. love him मी त्याला खरोखर -खचीत चाहतों.—*i.* चालणें, वागणें (2 Kings xvii. 34); how d. you d.? तुम्ही कसे आहां, तुमची प्रकृति कशी आहे इ०; manage चालवणें, लोटणें: if no better plan be found, he will make this d.; for चालणें, उपयोगीं येणें; put an end to शेवट क., निःपात क, नाश क.: a goblet is *done* for when it is broken;—without शिवाय-वांचून क. -ER करणारा, कर्त्ता; आचरणारा, पाळणारा (Rom. ii. 13). -INGS कृत्यें *n pl*, कर्में *n pl*; आचरण *n*, वर्त्तणूक; stir गडबड, धांदल *f*.—DOING-UP सांधासांध *f*.

DOCILE *a.* (*docere*, to teach) teachable शिकण्याजोगा; tractable ताब्यात -कह्यांत राहण्याजोगा; easily managed गरीब, सालस.—DOCILITY शिक्षाशीलत्व *n*; सालसाई *f*, गरिबी *f*.

DOCK* a plant वृद्धराज, रक्तसौगंधिक.

DOCK *v. Ger.* cut off, as the end of a thing लांडा क.; deduct from बाद -वजा क. (an account). — *n.* (*doga*, a sort of vessel) place for building or laying up ships गोदी *f*; place where a criminal or accused person stands in a court कोर्त्तांत कैदी अथवा आरोपित उभा राहण्याची जागा *f*. -AGE गोदीचें भाडें *n*. -YARD जहाजाचें सामान ठेवण्याची बंदराजवळची कोठी *f*, गोदी *f*.

DOCKET *f.* a summary गोश्वारा; a label चिठी *f*, बीजक *n*; [*Law*, an abridged entry of a judgment in an action].

DOCTOR (*docere*, to teach) शिक्षक; a learned man विद्वान, पंडित; a title in divinity, physic, law, &c. आचार्य, पंडित, शास्त्री, मौलवी ह्यासारखा एक किताब आहे; 'डाकतर' a physician वैद्य, 'डाकतर'; d. of divinity वेदशास्त्र -श्रुतिविद्यासंपन्न, मुरशीद, शेख *Pers.* —DOCTRINE, instruction उपदेश, शिक्षा *f*; what is held, put forth as true, and supported by a teacher, a school, or a sect मत *n*, सूत्र *n*, न्याय, सिद्धांत इ०; learning विद्या *f*, ज्ञान *n*; difference of d. शाखाभेद; received d. संप्रदाय.—DOCTRINAL *a.* शिक्षेचा, शिक्षेसंबंधी; मत -उपदेश संबंधी. — DOCUMENT, original or official paper relied upon as the basis, proof, or support of any thing else दस्तऐवज, दाखला, कागदपत्र; original d. अस्सल दस्त-

ऐवज, कागदपत्र *n pl.* -ARY *a.* दस्तऐवज संबंधी.

DODDER *Ger.* आकाशवेल *m, f.*

DODECAGON (*Gr. dodeka,* twelve, *gonia,* angle) द्वादशकोणाकृति *f.*

DODGE *v. i.* ? shift place by a sudden start टणकर उठून जागा बदलणें; play tricks थट्टा मांडणें, ठकवणें, झोंका, देणें.—*t.* चुकविणें, टाळणें, वारणें [about].

DOE* हरिणी *f,* हरणी *f.*

DOG *D.* कुत्रा, श्वान; a mean, worthless fellow अधम, नीच, पाजी; a fellow गडी, माणूस: a lazy d.; give or throw to the *dogs* चुलींत -मातींत घालणें, उकीरड्यावर टाकणें; to go to the *dogs* चुलींत -मसणांत जाणें, नाश पावणें, सत्यनाश -वाटोळें होणें.—*v.* पाठपुरवणें -घेणें, पाठीस लागणें. -CHEAP *a.* cheap as *dogs'-meat* पैशापायली, मातीच्या मोलाचा. -DAY ज्या दिवसीं लुब्धक ताऱ्याचा उदयास्त सूर्याबरोबर होतो तो; [the *dogdays* commence in the latter part of July, and end in the beginning of September]. -FANCIER कुत्र्यांचा शोकी व कुत्रेविक्या. -FOX कोल्हा. -GED *a.* कुचर स्वभावाचा, कुरठा. -GISH *a.* कुत्राच्या (वाईट)स्वभावाचा, तुसडा. -GRASS एक जातीचें गवत *n,* कुत्र्याची चार *f,* पंदें *n,* कुतरें *n.*? -LATIN धेडगुजरी लाटीन भाषा *f.* -ROSE सदागुलाब. -'S-EAR पुस्तकाच्या पानाचा दुमडलेला कोपरा. -SLEEP ढोंगाची झोंप *f,* कुतरझोंप *f.* -'S-MEAT उष्टेंपाष्टें *n.* -STAR लुब्धक. -TOOTH सुळादांत, सुळा. -TROT कुत्तर चाल *f.* -TRICK कुचेष्टा *f.* [-WATCH, *Naut.* a watch of two hours, of which there are two called respectively the first d. and second d., the first being from 4 to 6 o'clock P. M., the second from 6 to 8 o'clock P.M.]

DOGMA (*L.*) that which is held as an opinion मत *n;* a formally stated and authoritatively settled doctrine सूत्र *n,* सिद्धांत; a principle of doctrine that is asserted or taught without sufficient evidence मतबीज *n,* मततत्वमूल *n.* -TICAL *a.* मत संबंधी; magisterial दबदब्याचा, दाबाचा, मीपणाचा (philosopher); authoritative प्रमाणाचा, सप्रमाण, आप्त (opinion). -TISM, arrogance in opinion हटवाद, मताभिमान. -TIZE *v.* स्वमतानें -हटवादानें स्थापणें.

DOLE* *v.* वांटणें [out].—*n.* वांटा, हिस्सा.

DOLEFUL *a.* (*dolere,* to feel pain) दुःखभरित, उदास, दिलगीर.

DOLICHUS (*Gr.* long) Chinese d. चवळी *f;* two-flowered d. कुळीथ *f;* black-seeded d. वालपापडी *f;* d. pruriens कवच कुयरी *f.*

DOLL (from Dorothy) लेंकराची खेळायाची बाहुली *f,* पुतळी *f.*

DOLLAR *Ger.* सवादोन रुपयांच्या किंमतीचें एक नाणें आहे, 'डालर.'

DOLT* मूर्ख, टोणपा, गाढव, ढ.

DOMAIN (*dominus,* master) dominion राज्य *n,* अधिकार; territory over which dominion is exerted राष्ट्र *n,* राज्य *n,* देश; landed property वतन *n,* वतनी जमीन *f; Law,* ownership of land जमिनीची मालकी *f,* वतनदारी *f,* फाजिदारी *f.*

DOME (*domus,* house) घर *n;* a cupola घुमट, कळस. — DOMESTIC *a.* घरचा, गृह in comp.: d. affairs गृहकृत्य *n;* pertaining to a nation considered as a family, or home, or to one's own country आपल्या देशांतला, मुलखी, स्वदेशीय, घरगुती (dissensions); remaining much at home घर धरून राहणारा, घरकुबडा (man); tame माणसाळलेला, पाळलेला, ग्राम्य in comp.: d. animals ग्रामपशु; made in one's own house, nation, or country घरीं केलेला, घरगुती: d. chaplain कुलाचार्य; d. contentions गृहकलह; d. slave गृहदास; d. duties कुलकर्म *n.* —*n.* घरचा चाकर, घरअसामी. -ATE *v.* घरची सवयी लावणें: to d. one's self; tame माण-

साळवणें, बाळगणें (wild animals).—DOMICILE घर *n*.

DOMINATE *v*. (*dominus*, lord) अधिकार -सत्ता -जोर चालविणें. — DOMINANT *a*. जोराचा, प्रबळ, प्रधान; d. party प्रबलपक्ष. — DOMINATION हुकमत *f*, अमल, अधिकार, आधिपत्य *n*.—DOMINEER *v*. rule with insolence कडक -करडा अमल चालवणें, हुकमत चालवणें; bluster शेखी चालवणें -मिरवणें [over].—DOMINICAL *a*. indicating the Lord's day, or Sunday प्रभूचा दिवस अथवा आदितवार दाखविणारा; relating to, or given by, our Lord आमच्या प्रभूचा, अथवा आमच्या प्रभूनें (येशू खिस्तानें) सांगितलेला (prayer).—DOMINION, supreme authority अधिकार, सत्ता *f*; empire राज्य *n*; preponderance वर्चस्व *n*, प्राधान्य *n*; territory सत्तेखालचें राज्य *n* -राष्ट्र *n* -चा देश; a governing power of very high rank प्रभुत्व *n* (Col. i. 16).

DONATION (*donum*, gift) act of giving देणें *n*; a grant दान *n*, बक्षीस *n*, देणगी *f*. —DONOR देणारा, दाता.

DOOM* judicial sentence शिक्षेचा हुकूम -ठराव; penalty शिक्षा *f*, दंड; unhappy fate नशीब *n*, होतव्य *n*.—*v*. शिक्षा सांगणें -ठरवणें; fine दंड घेणें -क.; destine दैवीं नेमणें -लिहिणें [to]. -SDAY शिक्षा ठरविण्याचा दिवस; day of the final judgment जगाच्या न्यायाचा दिवस.

DOOR* (*Skr. dvâr*) दार *n*, कवाड *n*; passage वाट *f*, दार *n* (John x. 9); entrance-way and the house to which it leads घरांत जाण्याचा रस्ता व ज्या घरास तो जातो तें घर *n*: his office is now the second d. in the street; from d. to d. दारोदार, घरोघर; in-*doors* घरांत; out-*doors* बाहेर; to be out of *doors* गमावणें; to lie at one's d. (दोष -पाप इ०) पदरीं येणें -घालणें इ०; private d. चोरदार *n*, अंतर्द्वार *n*; back d. मागला दरवाजा, परसदार *n*; front d. पुढला दरवाजा. -CASE दरवाज्याची चौकट *f*. -KEEPER द्वारपाळ, देवडीवरचा शिपाई. -POST बाही *f*, दारकस *f*.

25 D

DORMANT *a*. (*dormire*, to sleep) निजलेला, निद्रिस्त; quiescent शांत, स्वस्थ (passions); not disclosed गुप्त, अप्रकट (claims).—DORMITORY निजायाची खोली *f*, शय्यागृह *n*; burial-place मसणवट *f*.

DORSAL *a*. (*dorsum*, the back) पाठीचा, पृष्ठ्य.

DOSE (*Gr. dosis*, a giving) quantity of medicine prescribed to be taken at one time औषधाची मोताद *f* -ची मात्रा *f*; a portion मोताद *f*, रकम *f*; [any thing nauseous that one is obliged to take.]—*v*. परिमाणानें औषध देणें, मात्रा देणें.

DOT* टिंब *n*, पूज्य *n*, शून्य *n*.—*v*. टिंब देणें; mark or diversify with small detached objects बिंदुवत् अंकित -चित्रविचित्र क. [with, over].

DOTE *v. i. D*. have the intellect impaired, esp. by age, so that the mind wavers म्हातारचळ लागणें, खुळावणें; be foolishly fond भुलणें, वेडा होणें, मरणें [on, upon]. —DOTAGE चळ, म्हातारचाळे *n pl*, साठीबुद्धि *f*; अतिवेड *n*, नाद *f*. — DOTARD म्हातारचळ लागलेला, साठ्या.

DOUBLE *a*. (*duo*, two, *plicare*, to fold) दुप्पट, द्विगुण; coupled जोडगीर, जुळा; divided into two दुभागलेला; deceitful दोन मनांचा, कपटी; d.-tongued दुतोंड्या; d.-edged दुधारी. —*ad*. दुप्पट; दुहेरी.—*v*. दुप्पट क., दुणावणें; दुमटणें, दुमडणें, मोडणें: to d. up a sheet of paper; be the double of -ची दुपटी होणें -असणें -भरणें; pass around भोंवतालीं फिरणें, प्रदक्षिणा क., वळसा घालणें. —*n*. दुपटी *f*, दुणी *f*; घडी *f*, पदर; a trick पेंच, डाव. -NESS दुहेरीपणा, द्वैगुण्य *n*; कपट *n*, द्वैत *n*, दुजाभाव; d.-dealing दुटप्पी व्यवहार -FACED *a*. दुतोंड्या, मनांत एक जनांत

एक, उभयतोमुख. -MINDED *a.* चंचल मनाचा, द्विमनस्क. -STAR [*Astron.* two stars so near to each other as to be seen separate by means of a telescope only].

DOUBT *v. i.* (*dubitare*) waver in opinion गुटमळणें, कांकू क., आशंकणें; fear भिणें, भय वाटणें.—*t.* question शंका काढणें -घेणें, संशय बाळगणें, पृच्छा क. [of].—*n.* a fluctuation of mind arising from defect of knowledge or evidence धरसोड *f,* दुग्धा *f,* अनिश्चय; uncertainty of condition अंदेशा, संधिग्धावस्था *f*; suspicion संशय, वहीम; dread भय *n*; objection शंका *f,* दिक्कत *f,* कांक्षा *f.* -FUL *a.* hesitating अस्थिर; dubious संशयाचा, संदेहाचा, संदिग्ध (expression); questionable संशय घेण्याजोगा, संशयात्मक (case); affected by fear भयाक्रांत; timorous भयशील. -LESS *ad.* निःसंशय, खचित, बेलाशक.

DOUGH* मळलेली -तिंबलेली कणीक *f*; a lump of kneaded d. उंडा; my cake is d. माझें काम अझून कच्चें आहे.

DOUGHTY* *a.* गाढा, मर्द, समशेर बहादर: a d. hero.

DOVE * खबुतर *n,* कपोत. [The d. is often employed as the emblem of innocence, gentleness, and affection; also in art and in the Scriptures as the typical emblem or symbol of the Holy Ghost]; a word of endearment प्यारा, लाडका, राघू, चिमणा इ॰. -COTE खबुतरखाना. -TAIL, *Carp.* चाळा, कळासी *f.*—कळासी जोडणें.

DOWAGER (*dotare,* to endow) a widow having a jointure रांडरोटा मिळालेली विधवा, *f,* मृतभर्तृधनभागिनी *f*; [a title given in England to a widow, to distinguish her from the wife of her husband's heir bearing the same name; it is chiefly applied to the widows of personages of rank: queen d., the widow of a king].–DOWER, DOWRY, endowment वृत्ति *f*; gift दान *n* (Gen. xxxv. 12); property with which a woman is endowed स्त्रीधन *n*; esp. that which a woman brings to a husband in marriage अंदण *n*; that portion of the real estate of a man which his widow enjoys during her life, or to which a woman is entitled after the death of her husband बाईलवांटा, रांडरोट; d. given to a first wife on her supersession by a second marriage आधिवेदनिक *n.*

DOWN* *prep.* खालीं, खालतां; towards the mouth of a river नदीच्या मुखाकडे; d. the country समुद्राकडे.—*ad.* खालीं, खालती; from a higher to a lower condition निचावस्थेंत; from a higher antiquity प्राचीन काळापासून; below the horizon खालीं, क्षितिजाखालीं: the moon is d.; to boil d. आटविणें, जाळणें; d. in the mouth खिन्नवदन; d. with खालीं पाड -ओढ; up and d. मागें पुढें; इकडे तिकडे; to throw d. पछाडणें; to take d. उतरणें; to take d. a house &c. उस्तरणें, उघडणें; to take d. in writing लिहून घेणें; to go or sit d. बुडणें, खालीं जाणें; to throw d. पाडणें, खालीं पाडणें; to lay d. ठेवणें.—*a.* dejected खिन्न, म्लान; flat खसखसीत, साफ, निखालस (denial); downward खालचा (train). -CAST *a.* खिन्न झालेला, अधोमुख; लज्जित. -FALL खालीं पडणें *n,* पतन *n,* अधःपात; destruction पतन *n,* पराजय, मोड, नाश &c. -HILL उतरण *f.*—*a.* उतरता. -RIGHT *ad.* straight down नीट, धोपट; in plain terms साफ, निखालस, धडधडीत, उघड, धादांत, बजिन्नस.—*a.* साफ, उघड, सरळ: a man of d. character; unmixed नितळ, निवळ: d. atheism. -WARD, WARDS *ad.* खालीं, खालतीं; towards misery, humility, disgrace, or ruin दुःख, अपमान, नाश इ॰, कांकडे; from a remote time बहु कालापासून.—*a.* खालचा, अधोगामी (course); declivious उतरता;

descending from a head, origin, or source वंशांतला, परंपरेनें आलेला; dejected उदास, खिन्न.

Down *D.* close hairy covering of birds under the feathers पक्ष्यांचे मऊ केंस *pl,* लंव *f,* मृदुलोम; pubescence of plants कापूस;—of cloth फूल *n;* soft hair of the face when beginning to appear तोंडावरची लंव *f.*—* माळजमीन *f,* रान *n,* माळ.

Doxology (*Gr. doxa,* praise) in Christian worship, a hymn expressing praise and honor to God ईश्वरस्तवनाचें गीत *n,* ईश्वरस्तुति गान *n.*

Doze *v. i. D.* डुकली घेणें, डुकल्या देणें.—*n.* डुकली *f,* अल्प निद्रा *f.*—Dozy *a.* निद्राळु, डुकलीखोर.

Dozen *F.* दोन छकड्या *f pl,* बारा 'डजन.'

Draft, See Draught.

Drag* *v.* pull along the ground by main force जमिनी वरून जोरानें ओढणें -खेचणें, फरफरावणें, खरडीत ओढणें; harrow गुठाळणें; pass in pain or with difficulty रडत रखडत चालवणें -लोटणें [about, along].—*i.* रखडणें: the day *drags* through.—*n.* a kind of net महाजाळें *n;* [kind of sledge for conveying heavy bodies]; a heavy harrow, for breaking up ground कुळव *n;* a clog लोढणें *n,* खोडा; a heavy motion, as if dragged along ओढ *f.* -net महाजाळें *n,* पाग.—Draggle *v.* लोळवून -भिजवून मिळविणें.

Dragon (*Gr. drakon*) एक कल्पित सपक्ष सर्प आहे.—Dragoon, a soldier who is taught and armed to serve either on horse-back or on foot करोल, 'ड्रगुन.'

Drain* *v.* cause to flow gradually out or off ओसरविणें; cause the exhaustion of खपविणें, उपसणें, अटविणें, खर्चणें: this alone *drained* their treasure; exhaust of liquid contents by drawing them off निथळून -निचरून काढणें; empty of wealth, resources, &c. कोरडा पाडणें -क., रिकामा क.; filter गाळणें;—land पाट -पन्हळ बांधून पाणी काढणें [off].—*i.* हळूहळू वाहून जाणें, ओसरणें; निथळणें, निचरणें.—*n.* उपसा; a channel मोरी *f,* नळ; water-course पाट, पन्हळ.

Drake *Ger.* बदकाचा नर, हंस.

Dram (*Gr. drachmè*) वैद्याच्या औन्स नामक वजनाचा आठवा हिस्सा; वाण्याच्या औन्साचा सोळावा हिस्सा; a mite गुंज *f,* रती *f,* मासा इ०; as much spirituous liquor as is drunk at once दारूचा घोंट, 'ड्राम.'

Drama (*Gr.*) नाटक *n,* रूपक *n;* religious d. लळीत *n;* the science of— नाट्य *n,* भारतशास्त्र *n.* -tical *a.* नाटकाचा, नाटक संबंधी; d. representations नटचर्या *f.* -tist नाटक कवि.

Draper *F.* कापडकरी -विक्या.—Drapery कापड विकण्याचें किंवा करण्याचें काम *n;* cloth कापड *n,* कापडी माल; clothing of the human figure in sculpture and painting पुतळ्याचा -चित्राचा पेहराव, लिभास.

Draught* act of drinking पिणें *n;* act of drawing ओढणें *n;* act of drawing a net जाळें ओढणें *n;* act of drawing men from a military band, army, or post, or from any company or society फौजेंतून अथवा कोणत्याही टोळींतून -मंडळींतून माणसें काढून घेणें *n;* act of delineating अंकणें *n,* बेतणें *n,* वर्णन क. *n;* that which is drawn ओढलेला पदार्थ, ओढा *f;* that which is taken by sweeping with a net जाळ्यांत एका खेपेस धरलेले मासे वगैरे, ओढ *f;* a potion घोंट, घुटका; detachment (लष्कराची) तुकडी *f,* टोळी *f;* a delineation वर्णन *n;* a sketch आराखडा, बेत, नकाशा; order for the payment of money चिठ्ठी *f,* हुंडी *f;* current of air moving through an inclosed place

वाऱ्याची धार *f* -चा नेट; a sink मोरी *f*; *Med.* a sinapism मोहरीचें पोटीस *n*: to apply *draughts* to the feet; capacity of being drawn ओढण *f*; depth of water necessary to float a ship बुड, ओंडी *f*: a ship of twelve feet d.; *pl* checkers सोंगट्या *f pl*; a piece or man at d. सोंगटी *f*; beast of d. वाहीम, खांद्याचा बैल.—*v.* आराखडा काढणें, अंकणें, बेतणें; compose and write मजकूर जुळून लिहिणें, मसूदा क. (a memorial); फौजेची तुकडी वेगळी काढणें [out, from]. -BOARD सोंगट्यांचा पट. -MAN नकाशा काढणारा, 'ड्राफ्टम्यान.'

DRAW * *v.* pull along ओढणें, खेंचणें; attract ओढणें, आकर्षणें; allure मोहणें, भुलवणें; pull from a sheath, as a weapon उपसणें, काढणें;—as water from a well &c. काढणें, शेंदणें; extract काढणें, निपसणें (spirits); deduce from premises अनुमानानें-तर्कानें काढणें: to d. moral lessons from history; take from a place of deposit काढणें, पेढीवरून -ठेवीच्या जाग्यांतून काढणें: to d. money from a bank; receive from a lottery by the drawing out of the numbers for prizes or blanks सोडतीच्या चिठ्या टाकून मिळवणें -घेणें; obtain by good fortune दैवानें-भाग्यानें मिळविणें; suck dry चोखून टाकणें (the breast); eviscerate पोट चिरणें, अंतडीं बाहेर काढणें (a fowl); inhale श्वासानें -श्वासाबरोबर ओढणें -घेणें, खाणें (air); extend in length as a piece of metal into wire लांबविणें, वाढविणें, काढणें; run, extend, or produce, as a line on any surface (रेघ) ओढणें, काढणें;—a picture चित्र काढणें; depict वर्णन क.; write in due form यथापद्धत -रीतीनें लिहिणें, रिवाजाप्रमाणें लिहिणें, तयार क., सजवणें (a memorial, deed); prepare a draught of खरडा -मसूदा तयार क.; sink in water पाण्यांत बुडणें: a ship *draws* ten feet of water; require a depth of, as water, for floating तरण्याकरितां (गलबतास) अमूक परिमाणाच्या ओंडीचें पाणी लागणें; [*drawn* butter, butter melted and prepared for use as gravy, to be poured on food]; *drawn* battle ज्यांत दोनी पक्षांस जय मिळत नाहीं असें युद्ध *n*, कच्ची लढाई *f*; to d. a bow धनुष्य ताणणें -ओढणें; a curtain पडदा पाडणें किंवा सारणें: night *draws* the curtain which the sun withdraws: to d. back परत मिळणें -घेणें (duties on goods for exportation); in आंत ओढणें -आणणें; गोळा -जमा क.; भुलवणें, मथवणें; interest व्याज उत्पन्न क. -मिळवणें -खाणें; व्याज घेण्याचा अधिकार देणें; off परत -माघारा घेणें; on घडविणें, बनवून आणणें; out लांबवणें, ताणणें, वाढवणें; up यथापद्धत लिहिणें, मजकूर जुळणें; खरडा तयार क.; रांगेनें उभें क., रांग लावणें: *drawn* up in battle to receive the charge.—*v. i.* ओढणें: a horse *draws* well; मोहणें, आकर्षणें: watch the bias of his mind that it may not d. too much; आकृति -चित्रें काढणें: he *draws* with exactness; म्यानांतून -गवसणींतून काढणें (तरवार) उपसणें; *Med.* पिकविणें, वाहविणें; shrink अखुडणें, अवळणें; move, come, or go चालणें, येणें, जाणें; off पाठीमागें सरणें, माघार घेणें; on भिडणें, नेटणें, जवळ येणें; up रांगेनें उभें राहणें, सजणें; -वर तनखा -वरातचिठ्ठी देणें, चिठ्ठी पाठवून मागणें क.: you may d. on me for the expenses of your journey; undergo draught ओढला जाणें. -BACK, hindrance अडथळा, अटकाव; *Com.* money remitted सूट *f*, माफीचा पैका. -BRIDGE काढाया -घालायाचा पूल. -EE हुंडीचे पैसे देणारा. -ER ओढणारा, काढणारा; चित्रें -नकाशा काढणारा, चितारी; हुंडीचे पैसे घेणारा;—of a purse &c. ओढदोरा; box in a case खण, पूड *n*, ओढखण; secret d. चोरखण; *pl* a close under-garment इजार *f*, पायजामा; short d. चोळणा, चड्डी *f*. -ING ओढणें *n*, आकर्षण *n*; चित्र *n*; नकाशा. -ING-ROOM,

room appropriated for the reception of strangers बैठकीची जागा *f*, सदर *f*, दिवाणखाना; company assembled in such a room सदरेची मंडळी *f*. -WELL मोटेची विहीर *f*; land watered from a d. मोटस्थळ *n*.

DRAY* a low cart छकडा, छकडीगाडी *f*.

DREAD* terror excited by the prospect of great evil दहशत *f*, जरब *f*, धास्ती *f*; reverential fear वचक *f*, अदब *f*; object of terrified apprehension, or of reverential fear भय धरण्याचा विषय, सन्मानाचा विषय, भय -सन्मानपात्र.—*a*. भयंकर, जरबेचा; पूज्य, बुझरुग.—*v*. धास्ती -वचक बसणें. -FUL *a*. भयंकर, दारुण (storm); धाकाचा, दराऱ्याचा, इज्जतीचा.

DREAM* thought, or series of thoughts, of a person in sleep स्वप्न *n*; sleeping vision दर्शन *n*, दृष्टांत! an idle fancy वृथा मनोरथ -कल्पना *f*, अभास.—*v. i.* स्वप्न पडणें -पाहणें; वृथा कल्पना क., मनांत मांडे खाणें.—*t*. स्वप्नांत पाहणें; away, out, through वृथा विचारांत घालविणें -खर्चणें (life). -ER स्वप्न पाहणारा -दर्शी; वृथा वासना -मनोरथ बाळगणारा.—DREAMY *a*. स्वप्नवत्, वृथा; full of dreams स्वप्नांचा, स्वप्नमय.

DREARY* *a*. शून्य, भयाण, भणभणीत.—DREARINESS शून्यता *f*, उदासपणा.

DREGS *Ger. pl* sediment गाळ, रेंदा, मळ; vilest and most worthless part of any thing खरवड *f*, गाळ : the *dregs* of society.

DRENCH* *v*. put a potion down the throat of, as of a horse घोटयानें पाजणें; purge violently by physic ढाळ देणें; wet thoroughly चिंब भिजवणें, थबथबीत क., उपळविणें [with].—*n*. घोंट; घोटयानें पाजायाचें औषध *n* : d. horn घोटें *n*, घोटें *n*.

DRESS *v*. *F*. make straight नीट -सरळ -उजू क.; [*Mil*. arrange, as soldiers, in a straight line and at proper distances]; get ready तयार क.;—food शिजविणें, पाक क.;—a garden मशागत क., ओजवणें;—leather कमावणें; — ground कमावणें, कारवणें; a lamp नीट -चकपक क.;—hemp or flax विंचरणें;—a horse शिकवणें, वठणीस आणणें;— a wound जखम धुणें -बांधणें, मलमपट्टी बांधणें;—a slain animal (पिसें -अंतडीं -केंस वगैरे काढून) साफ -नीट क.; clothe वस्त्रें नेसविणें; deck शृंगारणें, सजवणें; up, out मोठ्या थाटाचा पोशाक क. [to d. up a ship, to ornament her with colors] [in, with, for].—*i*. शिपायांच्या रांगेत जाग्यावर नीट उभें राहणें; वस्त्रें नेसणें, पोशाक -कपडे क.—*n*. पोशाक, वस्त्रें *n pl*, लिभास; a lady's gown सभ्य स्त्रीचा पेशवाज, झगा. -ING वस्त्र *n*, पोशाक; मलम, पट्टी *f*, इ॰; manure spread over land जमिनीवर पसरलेलें खत *n*; gum, starch, and other articles used in stiffening or preparing silk, linen, and other fabrics गोंद, खळ, इ॰ मालमसाला. -ROOM वस्त्रें नेसण्याची खोली *f*, वस्त्रपरिधानशाला *f*.

DRIBBLE* *v. i.* fall in drops थेंब थेंब पडणें, ठिपकणें; slaver लाळ गळणें.—*t*. थेंब थेंब पाडणें -गाळणें.—DRIBLET लहान रकम *f*; to pay in *driblets* अधेल्या दमडीनें देणें.

DRIFT* that which is driven along लोंढा, लोट;— of dust वावधूळ *f*;— of rain वावझड *f*; a drive, as of cattle तांडा; — of birds झुंड *f* झांक *f*; force which impels ओढ *f*, ओढण *f*; course along which any thing is driven धोरण *n*, ओढ *f*, झोंक: our d. was south; tendency कल, रोंख : the d. of a poem.—*v. i.* ओघा बराबर वाहून जाणें, वाहणें, तरंगत जाणें : a raft *drifted* ashore वाऱ्याच्या जोरानें जमणें -गोळा होणें, ढीग -रास होणें : snow *drifts*.—*t*. रास -गोळा -ढीग क. : a current of wind *drifts* sand [away,

about].—*a.* वाऱ्यानें -ओघानें चालाया -हलाया जोगा (ice).

DRILL* *v.* bore with a drill सामत्यानें भोंक पाडणें, विंधणें; sow, as seeds, in rows काकरींत पेरणें; train in the military art शस्त्रविद्येंत निपुण क., कवाईत शिकविणें; instruct in the rudiments of any art कोणत्याही विद्येचीं मूळतत्वें शिकविणें; waste away by degrees हळूहळू खर्चणें -उडवणें -दवडणें.—*n.* सामता; कवाईत *f,* शस्त्राभ्यास; मूलतत्वाभ्यास; implement for making holes for sowing seeds पाभर *f;* drilled seed-box of d.-plough चाडें *n;* furrow dug along by the plough तास *n,* काकरी *f.*

DRINK* *v.* swallow as liquids पिणें -प्राशन क.; absorb शोषणें, पिणें; receive within one, through the senses ऐकणें, पाहणें (words); —off, up घोटासरसें पिऊन टाकणें; [—the health, or, to the health of, to drink while expressing good wishes for the health or welfare of] [with].—*i.* तहान भागविणें, पिणें: to d. from a brook दारू पिणें; दारू पिण्याची सवयी असणें, दारूबाज होणें; पानोत्सव क.—*n.* प्यायाचें *n,* पेय *n.* -ABLE *a.* प्यायाजोगा, पेय.—*n.* पिण्याचा पदार्थ. -ER पिणारा; छाकटा, दारूबाज. -MONEY, a gratuity to one who has rendered a service पोस्त *n,* चिरीमिरी *f,* बक्षीस *n.* -OFFERING पेयार्पण *n.*

DRIP* *v. i.* थबथबणें, गळणें.—*t.* गळूं देणें, थबथबूं देणें.—*n.* ठिपकणी *f,* गळती *f;* the eaves वळचण *f,* पागोळ्या *f pl.* -PING, from a tree and after a shower उथळे *pl,* ओथळे *pl;* as fat from meat in roasting मांसवसा *f.* -PAN भाजलेल्या मांसाची चरबी धरायाचें पात्र *n.* -STONE पाऊस वारायाची दारापुढली -खिडकी पुढली ताटी *f.*

DRIVE* *v.* push forward ढकलणें, लोटणें;—a nail &c. खिळा इ० मारणें -ठोकणें -रोवणें -खुपसणें -खोवणें;—cattle गुरें हाकणें, हाकून लावणें -नेणें; hunt पारध क., पारधीसाठीं पाठीस लागणें;— a carriage हाकणें, चालवणें; hurry forward पिटाळणें, दामटणें, दवडणें; urge निकड -नेट लावणें; carry on चालवणें, वाहणें (trade).—*i.* ओढवणें: a ship *drives* before the wind; go by carriage गाडींत बसून फिरणें -जाणें; strive झटणें, यत्न क.—*n.* excursion in a carriage गाडींत बसून फिरणें *n,* रथविहार; a road prepared for driving गाडींत बसून फिरायाचा रस्ता; a place suitable for driving रथविहाराची जागा *f.*—DRIVER हाकणारा, पिटणारा, लोटणारा इ०; one who drives beasts गुरेंहाक्या; coachman गाडीवान, गाडी हाकणारा; one who runs or regulates the operation of a locomotive आगगाडीच्या पुढचें वाफेचें यंत्र चालविणारा, 'ड्रैवर'; [the driving wheel of a locomotive].

DRIVEL* slaver लाळ *f;* nonsense बडबड *f.* —*v.* लाळ गळणें; dote खुळावणें, म्हातारचाळे क.

DRIZZLE *Ger.* पावसाची बुरबूर *f,* बुरंगट *n.* —*v.i.* बुरबूर पाऊस पडणें, रिपरिप लागणें.

DROLL *a. F.* मौजेचा, कौतुकाचा, हसविण्याजोगा. —*n.* मस्कऱ्या, मौज्या, विनोदी. -ERY थट्टा *f,* मस्करी *f;* a comic picture थट्टेचें चित्र *n.*

DROMEDARY (*Gr. dromas,* running) एक जातीचा उंट आहे.

DRONE* male of the honey-bee मधमाशीचा नर; one who lives on the labors of others फुकटखाऊ, तुकडेमोड्या; humming or low sound गुणगुण *f,* गुंजारव;— of the bagpipes सूर.

DROOP* *v.i.* sink or hang down, as an animal, plant, &c., from physical inability मान खालीं टाकणें, लुंघणें, गळणें, थकणें; be dispirited धैर्य खचणें, ग्लानि येणें, ग्लान होणें.

DROP* a liquid globule थेंब, बिंदु, ठिपका; the smallest easily - measured portion of a fluid बिंदुइतकी जिन्नस *f,* बुंद, थेंब, लेश; that which resembles, or that which

hangs like a liquid drop, as an earring, a glass pendant लोलक, चमकी *f*, इ० बिंदुसारखा पदार्थ; whatever is arranged to drop or fall from an elevated position उंच जागावरून खालीं पडण्याजोगें केलेलें दार *n*, फळी *f*, पडदा, झडप *n*, इ०; any medicine the dose of which is measured by drops बिंदूनीं मोजायाचें औषध *n*.—*v*. थेंबथेंब गाळणें -पाडणें -ओतणें; let fall सांडणें, पाडणें, सोडणें (anchor, line in fishing); let go जाऊंदेणें, राहूंदेणें, सोडणें (controversy); to d. an acquaintance ओळख सोडणें-टाकणें; communicate by a suggestion, or an indirect, cautious, or gentle manner युक्तीनें सुचविणें, दर्शविणें, नाक दाखविणें (a hint); to d. a word शब्दटाकणें; lower, as a curtain or the muzzle of a gun खालीं क., उतरणें, पाडणें; send by dropping into the post-office box, as a letter टपालांत पाठविणें, टपालांत टाकणें: please d. me a line मला एक बोटभर चिठ्ठी लिहीं, मला चार ओळी पाठीव इ०; speckle ठिपकेदार -चित्रविचित्र क.; bedrop टिकल्यांनीं शृंगारणें [from, to].—*i*. थेंबथेंब गळणें -पडणें, ठिपकणें: the dew *drops* from the tree; let drops fall गळणें, स्रवणें, पाझरणें (Ps. lxviii. 8); descend suddenly, abruptly, or spontaneously एकाएकीं -आपोआप पडणें, गळून पडणें: ripe fruits d. from a tree; die मरणें; die suddenly एकाएकीं -तडकातडकीं -बोलतां चालतां मरणें; राहणें, पडणें, तहकूब होणें: the affair *dropped*; come unexpectedly एकाएकीं -अवचित येणें; खालीं उतरणें -होणें [in, into]. -PING गळणें *n*, सांडणें *n*, सांड *f*; गाळणें *n*, गाळण *f*; matter falling in drops गळती *f*, गळ *f*.

DROPSY (*Gr. hudor*, water, *ops*, face) [an unnatural collection of serous fluid in any cavity of the body, or in the areolar texture] ;—of the belly जलोदर; —of the body जलत्वक, सर्वांगामध्यें पाणी भरणें *n*;—of the chest जलपिंजर, उरामध्यें पाणी भरणें *n*.—DROPSICAL *a*. उदररोगी; उदररोगाचा; उदररोगा सारखा.

DROSS* scum of metals किटण *n*, कीट; rust जंग, तांब *f*; refuse गाळ, मळ, रेंदाड *n*: all the world's glory is but d. unclean.

DROUGHT* want of rain or water अवर्षण, *n*, अनावृष्टि *f*; dryness of the throat and mouth कोरड *f*, शोष, प्यास; scarcity तंचाई *f*, कमताई *f*, वाण *f*.

DROVE* a number of animals driven in a body तांडा, काफला, खिल्लार *n*; crowd of people in motion लोकांचा चालता थवा -रव *f*.

DROVER खिल्लारी, हेड्या.

DROWN* *v*. overwhelm in water पाण्यांत बुडविणें, बुडविणें; deluge जलमय क., पूर आणून बुडवणें; deprive of life by immersion in water or other liquid बुडवून मारणें; overpower, extinguish, overcome;—said esp. of sound दाबणें, मारणें, विझवणें, निमविणें [in, with].—*i*. बुडून मरणें; बुडणें.

DROWSE* *v*. *i*. झोपेंत गुंग होणें, गुंगी येणें.—DROWSINESS झोपेची गुंगी *f*, तार *f*, तंद्री *f*; sluggishness सुस्ती *f*, आळस.—DROWSY *a*. झोंपाळू, निद्रालु; आळशी, जड, सुस्त; disposing to sleep झोंप -गुंगी आणणारा (hours); heavy with sleepiness गुंगी आलेला, निद्राग्रस्त.

DRUB *v*. *Sw*. काठीनें -वेतानें मारणें -ठोकणें, कुमकणें. -BING कुट्टा, कुंदी *f*.

DRUDGE * *v*. कबाडकष्ट क., हाडें झिजविणें.—-RY कबाडकष्ट *pl*, दगदग *f*.

DRUG* any substance used in medicine औषधी द्रव्य *n*, औषध *n*, दवादारू *f*; article of slow sale, or in no demand in the market सांदोरीस पडलेला माल, पडीत माल. —*v*. औषध देणें. -GIST औषधें विकणारा, गांधी.

DRUID* प्राचीन ब्रिटन, गाल व जर्मन लोकांचा उपाध्या, 'ड्रुद.' -ICAL *a.* ड्रुदा संबंधी, ड्रुदाचा. -ISM ड्रुदाचा धर्म; -विद्या *f*; -ज्ञान *n.*

DRUM * *Mus.* मृदंग, नगारा, ताशा; *Mil.* पडघम *n,* तंबूर, नगारा; tympanum of the ear कानाचा पडदा; a small cylindrical box in which figs &c. are packed मृदंगाकार बांधलेला पुडा; [d.-head court-martial, a court - martial called suddenly, or on the field]. -MER तंबूरजी, ढोलवाजविणारा, 'ड्रमर'; sorts of—ढोलक्या, ताशेकरी, तबलजी, &c.—*v.* मृदंग -तबला -ढोल इ० वाजविणें.

DRUNK *a.* (See DRINK) झिंगलेला, कैफ चढलेला, मस्त. -ARD *a.* दारूबाज, मद्यपी. -EN *a.* छाकटा, मस्त. -NESS दारूची निशा -तार *f* -अमल.

DRY * *a.* not wet कोरडा, सुका; —as the weather उघाडीचा; the vegetable matter सुका, कोरडा, शुष्क;—animals not giving milk भाकड, उडालेली, अटलेली : the cow is d.;—persons, thirsty तान्हेला, कोरडे पडलेला;—the eyes, not shedding tears कोरडा; lacking pathos अळणी, निरस (a fable); sarcastic तिखट, वर्मी, टोमण्याचा (a remark); shrewd हुशार, चाणाक्ष्य; d. cupping फासण्या टाकल्या शिवाय तुंबडी लावणें *n*; d. goods कापड, सूत, रेशीम, कलाबतू इ० (कोरडा) माल; d. measure गला, फळें, कोळसे, मीठ इ० मोजायाचें माप *n*; d. wine ज्या मद्यांत साखरेचा अंश समभाग असतो म्हणजे तो समजण्यांत येत नाहीं तें *n*, फिकीदारू *f.*—*v.* वाळविणें, कोरडा -निर्जल क.; up शोषणें, अटवणें; बोलणें बंद क., बोलायाचा राहणें.—*i.* सुकणें, वाळणें; अटणें, सुकून जाणें, कोरडा पडणें. -NESS कोरडेपणा, सुकेपणा; रखरखीत -रूक्षपणा. -NURSE जी दाई लेंकरास आपलें दूध पाजल्या वांचून त्याचा संभाळ करिते ती, दाईखिलाई (*H.*) -SHOD *a.* कोरड्या पायांनीं, पाय भिजल्या शिवाय.

DUAL *a.* (*duo,* two) दोघांचा, द्वि. -ISM दुभागणें *n*; a system which is founded on double principle द्वैतमत *n*; a system of the universe which accepts two gods द्विदेवमत *n*; d. member द्विवचन *n.*

DUBIOUS *a.* (*dubius*) not settled in opinion संदिग्धमति, भ्रांतिवट; occasioning doubt भ्रांतिकारक, संशय उत्पन्न करणारा: of uncertain issue संदिग्ध, नरोवाकुंजरोवा (battle); [of].

DUCAL, See under DUKE.

DUCK *Ger.* बदक; to make *ducks* and drakes, to throw a flat stone, tile, or the like, obliquely, so as to make it rebound repeatedly from the surface of the water, raising a succession of jets भाकरीचा खेळ, भाकऱ्या; to play at *ducks* and drakes with property संपत्तीचे -द्रव्याचे धुडके उडविणें; an inclination of the head resembling the motion of a duck in water पाण्यांत पोहणाऱ्या बदकासारखी मुंडी डोलविणें *n*; wild d. हंस; Brahmin d. चक्रवाक्.—*v.* बुडवून -बुचकळून बाहेर काढणें: to d. a seaman; plunge the head of in water immediately withdrawing it पाण्यांत डोकें बुचकळून लागलेंच बाहेर काढणें; गटंगळी -गचकळी खायास लावणें: d. the boy [under].—*i.* बुडणें, बुटकुळी मारणें.

DUCT (*ducere,* to lead) नळी *f,* वाहिनी *f,* नळ.—DUCTILE *a.* flexible लवचीक, मृदु; obsequious आर्जवी; capable of being drawn out into wire तार काढण्याजोगा, तार निघण्याजोगा, प्रसारक्षम.— DUCTILITY लवचीकपणा, प्रसारक्षमता *f.*

DUE *a.* (*debere,* to owe) owed लागता, हक्कहलाल, द्यायाचा; proper योग्य, उचित, लायक; appointed नेमलेला, नेमका (time); rightly expected to arrive यायाचा,

पोंहचायाचा: the mail is now d. [to]. *ad.* थेट, नीट: d. east course.—*n.* देणें *n*, घेणें *n*, येणें *n*, हक्क; *dues* paid in cash हक्कटक्क. —DULY *ad.* वाजवी, रास्त, बराबर.—DUTY, that which a person is bound, by any natural, moral, or legal obligation, to do, or refrain from doing कर्त्तव्य *n*, धर्म; service rendered चाकरी *f*, काम *n*; military service लष्करी चाकरी *f*; — of a soldier चौकी *f*, पाहरा; respectful obedience आज्ञाधारण *n*, -पालन *n*; respect मुजरा, ताजीम *f*; tax कर; excise जकात *f*;—upon exports थळभरीत *n*, बरामद *f*;—upon imports थळमोड *f*; upon chattels or commodities सायर *f*; daily d. नित्यकर्म *n*; discharge of d. धर्मनिष्पत्ति *f*, कृतकृत्यता *f*; appointed d. नियोग, अधिकार; to become the d. of -ला भाग होणें.—DUTIFUL *a.* आज्ञाधारक, हुकमी, सेवातत्पर; आदरयुक्त (affection);—to a parent पितृभक्त;—to a husband पतिव्रता *f*;—to a master प्रभुभक्त. -NESS आज्ञाधारकता *f*, हुकमीपणा, आज्ञानुवर्तन *n*, आज्ञापालन *n*.

DUEL (*duellum*, contest between two) दोघांचें युद्ध *n*, द्वंद्वयुद्ध *n*; [a premeditated fight between two persons to decide some private difference, or establish some point of honor]. -IST द्वंद्वयोद्धा.

DUET, DUETTO (*duo*, two) दोवांनीं गायाचें गीत *n*, जोडीचें गाणें *n* -वजावणें *n*.

DUG* सड, आंचूळ, गुराचें थान *n*.

DUKE (*dux*, leader) नायक, सरदार; one of the highest order of nobility next below the Prince of Wales इंग्लंदांत कुलीन राजपुरुषाची एक पदवी आहे; [a sovereign prince, in some European countries, without the title of King: the D. of Savoy; to dine with D. Humphrey, to go without dinner]. -DOM ड्युकाचें राज्य *n* -अधिकार इ०; ड्युकाचा किताब.—DUCAL *a.* ड्युकाचा -संबंधी.—DUCAT ड्युकाचें -ड्युकाच्या शिक्क्याचें नाणें *n*; चांदीच्या ड्यु० ची किंमत सुमारें सवा दोन रु० आहे व सोन्याच्या ड्यु० ची त्याच्या दुप्पट आहे.

26 D

DULCET *a.* (*dulcis*, sweet)—to the taste गोड, मधुर; to the ear सुस्वर, मधुर.—DULCIMER सितार *f*, तंबुरा (Dan. iii. 5).

DULL* *a.* stupid जड, मंद, मंदबुद्धि; slow in action सुस्त, थंडा, मंद;—of motion मंदगति, जड, धिम्या; blunt बोथट; dim अंधक, निस्तेज, फिकट, मर्जित (fire, color, lamp); gross जड, स्थूल (earth); sad उदास, खिन्न, विषण्ण; —of places उदासवाणा, भणभणीत;—trade मंद, मंदीचा;—weather धुंद, अंधारीचा;—a story मळमळीत, विरस.—*v.* सुस्त -जड -मंद क.; निस्तेज -बोथट क.; मळीण -मर्जीत क.; खिन्न -उदास क.—*i.* मंद -सुस्त इ० होणें. -HEAD टोणपा, जड डोक्याचा, मंदबुद्धि. -ARD *a.* मूर्ख, टोणपा.

DUMB* *a.* destitute of the power of speech मुका; silent मुका, निश्शब्द, मौना; to strike d. तोंड बंद क., बोबडी वळविणें. -BELLS मुदगल *n*. -NESS मुकेपणा; मौन्य *n*.—DUMMY पोटगडी, दगड्या, अंधळा तिरवा.

DUMPY *a. D.* टिल्लू, थबकडा, ठेंगू.

DUN* *a.* of a color partaking of brown and black जरद्या रंगाचा.—*n.* urgent demand for payment तगादा; one who duns तगादादार, मागणेकरी.—*v.* तगादा लावणें -क. -NER तगाददार.

DUNCE *a. Ger.* जडबुद्धीचा, टोणपा, दगड.

DUNG * विष्ठा *f*, मल;—of man गू;—of cattle शेण *n*;—of elephants लेंड *n*; of horses &c. लीद *f*; of sheep, deer लेंडी *f*;—of birds शीट *f*.—*v.* शेण वगैरेचें खत घालणें.—*i.* मलविसर्जन क., हगणें. -HILL, heap of dung उकिरडा, शेणखाई *f*; mean situ-

ation or condition नीच स्थिति *f,* दशा *f* (1 Sam. ii. 8). -YARD उकिरड्याची जागा *f,* नरकाड *n,* शेणखाई *f.*

DUNGEON *F.* strongest tower of a castle किल्ल्याचा सर्वांहून बळकट बुरूज, गढी *f* ? a secure prison बंदोबस्तीचा बंदीखाना; a dark, subterranean place of confinement अंधारकोठडी *f,* कोंडी *f.*

DUODECIMALS *pl* (*duodecim,* twelve) द्वादशांश *pl.* — DUODECIMO *a.* द्वादशपत्री सांच्याचा, द्वादशपत्री.—*n.* द्वादशपत्री सांच्याचा ग्रंथ -चें बूक *n;* द्वादशपत्रांचा सांचा.

DUPE *a. F.* भोळा, फशा.—*v.* फसविणें, ठकविणें [with].

DUPLICATE *a.* (*duplex,* double) दुहेरी; द्विगुण; दुप्पट.—*n.* प्रत *f,* नक्कल *f; Law,* दस्तऐवजाची दुसरी नकल *f.*—*v.* द्विगुण -दुप्पट क.; दुसरी प्रत -नक्कल उतारा क.— DUPLICATURE दुमड *f,* दूण *f.*—DUPLICITY दुटप्पीपणा, दुजाभाव, कपट *n; Law,* एका जबाबाच्या ठिकाणीं दोन जाब *pl.*

DURABLE *a.* (*durare,* to last) टिकाऊ, खंबीर, चिरस्थायी.—DURABILITY टिकाऊपणा, स्थिरता *f,* स्थिति *f.*—DURANCE बंद, अटक *f;* See ENDURANCE.—DURATION टिकणें *n;* continuance in time स्थिति *f,* टिकाव.—DURING *prep.* मध्यें, असतां, आंत, भर: d. life.

DUSK *a. Ger.* tending to darkness ओंधट, धुकट, अंधारीचा; darkish काळसर.—*n.* काळोखी *f,* अंधारी *f;* twilight झुंजुंमुंजुं *n;* d. of the evening गोधूल *m, n;* color partially black काळानिळा, धूसर.—DUSKY *a.* ओंधट. धुकट; काळसर, धूसर; gloomy उदास, भयाण.

DUST * earth or other matter reduced to powder धूळ *f,* धुरळा, माती *f;* the grave प्रेताची खळी *f,* माती *f* [Job vii. 21]; low condition कंगाली *f* -गरीब स्थिति *f* [1 Sam. ii. 8]; gold dust सोन्याची माती *f.*—*v.* धूळ काढणें -झाडणें -झटकणें: to d. a table; sprinkle with dust धूळ टाकणें -घालणें.—DUSTY *a.* धूळ बसलेला, धुळीनें भरलेला; धुळीच्या रंगाचा.

DUTCH *a. Ger.* हालंद देश संबंधी; वलंदेजी लोकांचा.

DUTY, See under DUE.

DWARF* *a.* ठेंगणा, खुजा, वामनमूर्त्ति *f.* -ISH *a.* ठेंगू, टिल्लू.

DWELL *v.i. D.* राहणें, वस्ती क.; —on, upon एकच गोष्ट पुढें चालवणें -लांबवणें; -ईत चूर-गुंग होणें; -वर जाणें: d. not on her beauty, but mention her accomplishments तिच्या सौंदर्यावर जाऊं नको इ० [in, at, with, upon]. -ING घर *n,* निवासस्थान *n,* राहण्याचें ठिकाण *n.*

DWINDLE* *v. i.* कमी -न्यून -क्षीण -जीर्ण -खराब होणें [to, into].

DYE* *v.* रंग देणें, रंगवणें.—*n.* रंग.—DYER रंगारी.

DYING, See under DIE.

DYKE, See DIKE.

DYNAMICS (*Gr. dunamis,* power) science of moving forces पदार्थगतिशास्त्र *n.*

DYNASTY (*Gr. dunastes,* a lord) राजवंशावळी *f,* राजावळी *f,* राजांचें घराणें *n,* राजवंश.

DYSENTERY (*Gr. dus,* ill, *enteron,* entrails) inflammation of the rectum or colon, attended with griping pains, constant desire to evacuate the bowels, and discharges of mucus and blood आंवरक्ताची हगवण *f,* आमरक्त *n,* आमातिसार; acute d. उग्रातिसार.

DYSPEPSIA, DYSPEPSY (*Gr.-peptein,* to cook) difficulty of digestion अजीर्ण *n,* अग्निमांद्य *n,* अन्नकोशविकार, अन्नविकार.

DYSPHONY (*Gr. -phonē,* sound) धाप *f,* श्वासावरोध.

DYSURY (*Gr.-ouron,* urine) difficulty in discharging urine, attended with pain

and a sensation of heat उन्हाळें *n*, मूत्रकृच्छ्र.

E.

Each* *a.* प्रत्येक, दरएक ; e. other एकमेक ; e.—his, her, its आपापला.

Eager *a.* (*acer*, sharp) excited by desire in the pursuit of any object उत्सुक, उत्कंठित ; earnest कळकळीचा, मनापासूनचा. -ly *ad.* उत्सुकतेनें ; hastily उतावळीनें. -ness उत्कंठा *f*, उत्सुकता *f*, हौस *f*; उतावळी *f*, हुटहुटी *f*, हुरहुर *f*.

Eagle (*aquila*) गरुड, पक्षिराज ; एक नाणें आहे. -eyed *a.* बारिक-तीक्ष्ण दृष्टीचा. -winged *a.* गरुडा सारखा चपळ.

Ear* the organ of hearing कान, कर्ण ; the sense of hearing कर्णेंद्रिय *n*, कान ; attention लक्ष *n*, कान ;—of a dish कान ;—of wheat ओंबी *f*; spike of corn कणीस *n* ; to poison one's *ears* कान फुंकणें -भरणें ; to give e. कानदेणें, ऐकणें ; to set one by the *ears* लावालावी क., भांडण लावणें ; to turn a deaf e. to कानाविगळा -कानाबाहेर क· ; कान झाडणें, न ऐकणें ; to disabuse the *ears* of कानाचे किडे झाडणें ; to whisper in the e. of कानांत जपणें, कानीं लागणें [for, to]. —*v. i.* कणसें येणें, पसवणें. -drop कर्णगोल, लोलक. -drum कानाचा पडदा. -lock झुलूप *n*. -ring कर्णभूषण *n*, कुंडल *n*. -shot हाकेचा टप्पा. -wax कानांतला मळ -witness, one who has the testimony of hearing as to any matter ऐकींव साक्षी, श्रुतसाक्षी.

Earl* इंग्लंदांत बडे लोकांची एक पदवी आहे. [The rank of an e. corresponds to that of a *count* in France]. -dom अर्लाचा हक्क -अमल वगैरे.

Early *a.** in advance of the usual or appointed time वेळेच्या अगोदरचा, सकाळचा, लवकर ; prior in time प्रथम, पूर्व ; in good season सुवेळीं, सकळ, वेळेवारचा ; e. dawn प्रातःकाळ.—*ad.* लवकर, सकाळ ; वेळेवारीं (Prov. viii. 17).

Earn* *v.* acquire by labor, service, or performance कमावणें, मिळवणें, कष्टानें -चाकरी -काम करून मिळवणें, उपार्जन क. -ing मिळकत *f*, कमाई *f* ;—used com. in *pl.*

Earnest* *a.* intent upon acquiring उत्सुक, उत्कंठित ; intent तल्लीन, एकाग्रचित्त [in, for, about].—*n.* reality खरेपणा, सत्यभाव ; eagerness उत्कंठा *f*, हौस *f* ; token of what is to come विसार ; *Law*, some thing given by the seller, by way of token or pledge, to bind the bargain and prove the sale सचकार, विसार, बयाणा ; pledge तारण *n*, हडप *n*. -ly *ad.* उत्कंठेनें, आस्थेनें, झटून ; warmly कळकळीनें, पोटागीनें ; तत्परतेनें, एकाग्रतेनें. -ness आस्था *f*, उत्कंठा *f* ; पोटाग *f*, कळकळ *f*, तिडीक *f*.

Earth* the globe which we inhabit पृथ्वी *f*, भूगोल ; dry land कोरडी भूमि *f*, भूमि *f*, (Gen. i. 10); soil जमीन *f*, माती *f*; a country देश, प्रदेश ; people on the globe जग, *n*, दुनिया *f*.—*v.* जमिनींत लपविणें -पुरणें. -en *a.* मातीचा, मृन्मय. -ly *a.* मातीचा ; इहलोकींचा, ऐहिक ; carnal दैहिक, विषयसंबंधी, संसारिक ; possible व्हायाजोगा, शक्य : what e. benefit can be the result ? base नीच, हलका. -nut भुईमूग. -quake भूमिकंप, धरणीकंप. -work मातीचा कोट. -worm गांडूळ, गांडवळ ; niggard कंजूस, कंगाल.—Earthy *a.* मातीचा, मृन्मय ; ऐहिक, संसारिक ; gross स्थूल.

Ease *F.* freedom from pain, disturbance, trouble, toil, &c. चैन *n*, आराम, विसावा ; leisurely indolence सुस्ती *f* ; quiet समाधान *n*, स्वस्थता *f* ; peace सुख *n*, शांति *f*, विश्रांति *f* (Ps. xxv. 13) ; facility अनायास, सौगम्य *n* ; at e. सुखानें, स्वस्थ (*v.* नीज, बस, अस).— *v.* आराम क., सुखास पाडणें : to e. the body ; mitigate कमी -हलका क.,

उपशमन क॰ ;—the mind चिंता -काळजी वारणें -हरण क.; release from pressure दाबांतून काढणें, भार -ओझें उतरणें [by, with, off, from].-*ad.* सहज, अनायासें; सुखानें, स्वस्थतेनें खुशालींत : to pass life well and e.; readily खुशीनें, संतोषानें : he e. forgives ; without violent shaking or jolting संत, निवांत, सावकाशीनें : a carriage moves e.; gracefully छबीनें, ढबीनें; gently हळू, हलक्यानें, अचानक. —Easy *a.* सुखरूप, स्वस्थ, आराम, खुशाल : the patient is easy; स्वस्थ, निकाळजी, शांत (mind); मृदु, सरळ, सुगम्य, सुबोध (style); खळबळीत, साबडा (manners); not requiring labor हलका, सोपा, सोयीचा (ascent, roads); not difficult सोपा, सुलभ, सुसाध्य (a task); furnishing comfort सुखकर -प्रद -दायक : he is in e. circumstances तो खाऊन पिऊन -घरचा सुखी आहे; complying भिडस्त, नरम, कोवळा (heart); not straitened as to money matters आबादान, भरपूर : the market is e.

East* the quarter where the sun rises पूर्व *f*, पूर्वदिशा *f*, उगवत *f*; — eastern parts of the earth पूर्वेकडील प्रदेश, पूर्वदेश. —*a.* पूर्वेकडला, पूर्वेचा; the e. wind मतलई *f*.—*v.* पूर्वेकडे चालणें -वाहणें -फिरणें. -er कित्येक ख्रिस्ती मंडळ्यांचा एक सण आहे; ख्रीस्त मरून पुनः उठल्याच्या आठवणी करितां हा पाळतात. -ly *a.* पूर्वेकडून आलेला; पूर्वेकडून येणारा; पूर्वेकडला, पूर्वस्थ [side, course]. — *ad.* पूर्वेकडे, उगवत. -ern *a.* पूर्वेचा, प्राचीन, प्राच्य; पूर्वेकडे जाणारा.

Eat* *v.* (*Skr. ad*) partake of as food खाणें, भक्षणें; corrode खाणें, चरणें; out खाऊन चट क., फन्ना क.; prey upon खाणें, धुपवणें, झिजवणें; to e. one's words बोलला बोल परत घेणें, बोलणें फिरवणें.—*i.* जेवणें, भोजन क.; taste रुच लागणें; into चरणें. -able खाणें *n*, भक्ष्य *n*.—*a.* खाण्याजोगा, खाद्य, भोज्य.

Eaves* *pl* the edges of the roof of a building वळचण *f*, पागोळ्या *f pl.* -drop *v. i.* वळचणी खालीं उभें राहून घरांतल्या माणसांचें बोलणें ऐकणें, वळचणीस लागणें; गुप्त गोष्टी ऐकण्या करितां जपणीस लागणें -बसणें. —*n.* वळचणीचें पाणी *n*.

Ebb* reflux of the tide ओहटी *f*, सुकती *f*.—*v.* क्षय -र्‍हास होणें : the hours of life e. fast.

Ebony (*ebenus*) टेंबुरणीचें झाड *n*, टेंबुरणी *f*, अबनूस *n*.

Ebriety (*ebrius*, intoxicated), See Drunkenness.

Ebullient *a.* (*-bullire*, to bubble) कढत— Ebullition कढ, ऊत, अधण *n*;—of grief, anger, &c. उमाळा, कढ, ऊत, उकळी *f*.

Eccentric, -al *a.* (*-centrum*, centre) केंद्राकडे न जाणारा, केंद्रपराङ्मुख; pertaining to eccentricity मध्याचा, केंद्राचा; no having the same centre विषमकेंद्र; anomalous तर्‍हेवाईक, विलक्षण, एक तर्‍हेचा (conduct).—Eccentricity केंद्रपराङ्मुखता *f*; *Geom.* विषमकेंद्र; विलक्षणपणा, तर्‍हेवाईक चाल *f*, लोकाचारविरोध.

Ecclesiastic, -al *a.* (*ecclesia*, assembly) (ख्रिस्ती) मंडळी संबंधी, ख्रिस्ती धर्मप्रकरणी. —Ecclesiastic धर्मोपदेशक, पाद्री.

Echo (*Gr.*) पडसाद, प्रतिशब्द-ध्वनि; [a vault so formed as to produce an echo]. —*v.* प्रतिध्वनि उठणें-निघणें, दुमदुमणें; adopt पत्करणें, स्वीकारणें; respond उत्तर -जाब देणें

Eclat (*F.*) splendor शोभा *f*, बहार *f*, रंग; applause वाहवा *f*, प्रशंसा *f*.

Eclectic *a.* (*Gr. ek*, from, *legein*, to choose) निवडून -वेचून काढणारा, विवेचक.

Eclipse (*Gr. -leipein*, to leave) ग्रहण *n*; —of the moon चंद्रग्र॰ *n*;—of the sun सूर्यग्र॰ *n*; duration of e. स्थिति *f*; total

e. मीलन *n*, खग्रास; obscuration तेजोऱ्हास, प्रभा -कांतिक्षय.—*v*. ग्रासणें, ग्रहण लागणें; तेजोऱ्हास -कांतिक्षय क., माजी पाडणें [by].—ECLIPTIC क्रांतिवृत्त *n* -मंडल *n*.—*a*. क्रांतिवृत्त संबंधी.

ECONOMY (*Gr. oikos*, house, *nomos*, law) management of domestic affairs घरजुगूत *f*, घरजोगवणी *f*; internal management of any thing निर्वाह, वहिवाट *f*; system of rules and regulations by which any thing is managed नीति *f*, व्यवस्था *f*, विधान *n*, मार्ग; thrifty and frugal housekeeping काटकसर *f*, काटकसरीचा खर्च; political e. व्यवहारशास्त्र *n*, अर्थशास्त्र *n*.—ECONOMICAL *a*. व्यवस्थित, बेताचा;—of persons बेतबातानें चालणारा, काटकसर करणारा, दक्ष, मितव्ययी;—of expenses काटकसरीचा, बेताचा; घरजोगवणीचा, गृहकर्मनिर्वाह संबंधी; व्यवहारशास्त्र संबंधी.—ECONOMIZE *v*. काटकसरीनें -बेतबातानें -टापटिपीनें वापरणें -खर्च क. (time, money).

ECSTACY (*Gr. ek*, from, *stasis*, a standing) a being beside one's self so far that the primary functions, particularly of the senses, are suspended समाधि *f*, तन्मयावस्था *f*; frenzy उन्मत्तवायु, उन्माद; rapture अत्यानंद, प्राल्हाद.

EDDY* current water running back पाण्याचा उलटा ओघ, घोटाळा, फुगं *n*;—of air वाऱ्याचा उलटा ओघ; whirlpool भोंवरा; whirlwind वावटळ *f*.

EDEN *Heb*. the garden in which Adam and Eve first dwelt एदेन बाग; a delightful region सुखस्थान *n*, सौख्यभुवन *n*.

ESPOUSE *v.* (-*sponsare*, to betroth) वाग्दान -वाग्निश्चय क.; marry वरणें, पाणिग्रहण क.; make one's own आपलासा क, अंगिकारणें; embrace कैवार -पक्ष घेणें (a cause).—ESPOUSAL मागणी *f*, वाग्निश्चय; वरणें *n*, पाणीग्रहण *n*; स्वीकार, अंगिकार; कैवार.

ESPY *v.* *F.* catch sight of दृष्टीस पडणें, पाहणें; discern unexpectedly अकस्मात् पाहणें; inspect narrowly निरखून -न्याहळून पाहणें, हेरणें. — ESPIONAGE हेर पाठवून पाहणें *n*, हेरणें *n*.

ESQUIRE *F.* a title of dignity next in degree below a knight रावसाहेब, रावबहादूर अशा प्रकारचा एक सन्मानाचा किताब आहे; हा कागदोंपत्रीं साधारण मनुष्यासही देतात.

ESSAY *v. F.* try यत्न क.; make trial of अजमावून पाहणें; as metals तावणें, सुलाखणें [on].—*n.* यत्न, उद्योग; परीक्षा *f*, अजमाव; composition treating of any particular subject निबंध, प्रबंध; trial to prove the qualities of a metal धातुपरीक्षा *f*, धातूची पारख *f*. -IST निबंध रचणारा.

ESSENCE (*esse*, to be) the constituent qualities which belong to any object मूलप्रकृति *f*, सत्व *n*, तत्व *n*; distinctive character भेददर्शक लक्षण *n*, विशेषगुण; an existing being व्यक्ति *f*; virtues of a plant or drug, extracted and refined from grosser matter सार *n*, तत्व *n*, अर्क; perfume सुवास, अत्तर *n*, आमोद.—ESSENTIAL *a.* really existing वास्तविक, खरा, स्वाभाविक; important in the highest degree आवश्यक, जरुरीचा: piety is e. to Christian character; pure निरा, नितळ, असल; highly rectified गाळून -निझरून काढलेला. -LY *ad.* स्वभावेंकरून, स्वभावतः, वास्तविक, वस्तुतः.

ESTABLISH *v.* (*-stabilis*, firm, from *stare*, to stand) make stable स्थिर क., थारावणें, थिरावणें; enact ठरवणें, स्थापणें (laws); secure खचित क. (opinions); found स्थापणें, मांडणें, स्थापना क. (a state); confirm मुकरर -खचीत -सदृढ क.; set up in business काम उभारणें -चालू क.; secure against assault or harm निर्भय स्थान -आसरा धरून राहणें: the enemy *established* themselves in the citadel [on, at]. -ED स्थापित, व्यवस्थित; निर्णित, सिद्ध, उपपन्न; काईम, नियत; e. custom दस्तुर. -ER स्थापणारा, स्थापक, संस्थापक. -MENT स्थापणें *n*, अधिष्ठान *n*; settlement स्थापना *f*, संस्थापना *f*; a state of being established उपपत्ति *f*, सिद्धि *f*; a form of government, civil or ecclesiastical राज्यव्यवस्था *f*, धर्मव्यवस्था *f*, बंदोबस्त *f*; fixed allowance नेमणूक *f*; salary वेतन *n*; a permanent civil, military, or commercial force or organization नेमणुकीचें मंडळी *f*; a style of living संसार, खटला, खटलें *n*; state or domestic e. इतमाम, लवाजमा, खटला; large e. लंगरखाना.

ESTATE (*-stare*, to stand) state स्थिति *f*, अवस्था *f*, पद *n*, स्थान; rank पदवी *f*; property मालमत्ता *f*, दौलत *f*, जिंदगी *f*; property in land जमीनदारी *f*, फजीनदारी *f*, 'इष्टेट'; hereditary e. वतन *n*; [one of the ranks or classes of men which are considered as constituting the state, as the crown, the lords, or the commons; or the lords, the clergy, and the people]; interest which any one has in land and *estates* वतनवाडी *f*, वृत्ति *f*.

ESTEEM *v.* (*æstimare*) set a value on गणणें, लेखणें, मोजणें; regard with reverence, respect, or friendship चांगला समजणें, सन्मान्य -पूज्य मानणें, प्रीति -प्यार -चहा क.—*n.* मान्यताबुद्धि *f*, मान्यता *f*, मान, आदर; प्यार, चहा *f*, प्रीति *f* [for]. -ABLE *a.* मान्य, भला, योग्य. -ED मान्य, सन्मानित.—ESTIMATE *v.* अजमासणें, अटकळणें, सुमार पाहणें [at].—*n.* अडसट्टा, अटकळ *f*, हिशेब, अजमास, आकार [for]. — ESTIMATION तोलणें *n*, गणणें *n*; अजमास, अंदाज: e. of distance; in his e. त्याच्या नजरेंत -मनांत; regard मान, मान्यता *f*, पाड.

ESTRANGE (See STRANGE), See ALIENATE [by, from].

ESTUARY (*æstus*, fury) खाडी *f*.

ET CETERA *ad.* (*L.*) इत्यादि, वगैरे.

ETERNAL *a.* (*ævum*, eternity) without beginning or end of existence अनाद्यंत, सनातन (Deut. xxxiii. 27); without end of existence सर्वकालिक, शाश्वत, सर्वकाळचा (2 Tim. ii. 10); perpetual अखंड, निरंतर, सतत: fires e.; immutable निर्विकार, अवि-

कारी, नित्य (truths).— *n.* सनातन परमेश्वर. -LY *ad.* सतत, निरंतर, नित्य.—ETERNITY, duration without beginning or end अनाद्यंतत्व *n;* duration without end शाश्वति *f*, सातत्य *n*; condition which begins at death मरतांच ज्या स्थितीस आरंभ होतो ती *f*, मरणोत्तरची अवस्था *f*, परलोकची -अनंतकालची स्थिति *f*.

ETHER (*Gr. aithein,* to burn) supposed matter above the air सूक्ष्मवायु, आकाश *n*; *Chem.* a volatile fluid वायुरूपानें उडून जाणारा एक मद्यार्क आहे, 'ईथर' *n.* -EAL *a.* ईथराचा केलेला, ईथरमय; exceedingly light हलफूल; tenuous अति सूक्ष्म, फार पातळ -बारीक; celestial आकाशाचा, आकाशीय, दिव्य.

ETHIC, -AL *a.* (*Gr. ethos,* custom) आचार संबंधी, नीतिविषयक; containing precepts of morality नीतिशास्त्राचा.—ETHICS नीतिशास्त्र *n*, नीति *f*: विदुरनीति *f*.

ETHNOLOGY (*Gr. ethnos,* nation, *logos,* discourse) नृकुलविद्या *f*, मनुष्यजातिविवेचनविद्या *f*.

ETIQUETTE (*F.*) शिष्टाचार रीति *f*, सभ्याचार पद्धति *f*.

ETYMOLOGY (*Gr. etumos,* true, *logos,* discourse) शब्दांची फोड *f* -व्युत्पत्ति *f*;— the science शब्दविचार, शब्दसाधनविद्या *f*.—ETYMOLOGICAL *a.* शब्दांच्या व्युत्पत्ति संबंधी.—ETYMON मूळशब्द, धातु.

EUCHARIST (*Gr. eu,* well, *charis,* favor, grace) the sacrament of the Lord's Supper प्रभुभोजन *n*; thanksgiving स्तुति करणें *n*, स्तुतिवाद.

EULOGIUM, EULOGY (*Gr. eu,* well, *legein,* to speak) a speech or writing in commendation of the character or service of a person -च्या गुणाची -कामाची -तारीफ *f* स्तुति *f*, प्रशंसा *f* [on, for].

EUNUCH (*Gr. eunè,* bed, *echein,* to keep) खोजा, षंड, नपुंसक; chamberlain घरची व्यवस्था पाहणारा, कारभारी.

EUPHONY (*Gr. eu,* well, *phonè,* voice) सुस्वर, मधुर.—EUPHONIC *a.* कानास गोड, कर्णमधुर, सुस्वर.

EUROPEAN *a.* (*L. Europæus, Heb. ereb,* evening, west) युरोप खंडा संबंधी, विलायती, 'युरोपियन.'— *n.* युरोपांतला राहणारा, 'युरोपियन.'

EVACUATE *v.* (*-vacare,* to be empty) खाली -रिकामा -रिता क. (a vessel); as the bowels हगणें, मलविसर्जन क.; desert सोडणें, टाकणें (a city); nullify मोडणें, रद्द क. (a contract).—EVACUATION रिकामें करणें *n*; त्याग, उत्सर्ग; —of the bowels मलविसर्जन *n*, हगणें *n*.

EVADE *v.* (*-vadere,* to walk) elude झुकांडी -झुगारा देणें; escape चुकवणें, टाळणें; avoid by dexterity, subterfuge, address, or ingenuity झुलवणें, टाळाटाळ मांडणें [from, to.]—EVASION टाळणें *n*, चुकवणें *n*, चुकवाचुकव *f*, उडवणी *f*.—EVASIVE *a.* चुकवणारा, टाळणारा; चुकवाचुकवीचा, झुगारपटीचा, उडवणीचा.

EVANGELICAL *a.* (*Gr. eu,* well, *aggellein,* to bear a message) contained in, or relating to, the four Gospels चार शुभवर्त्तमानांतला -संबंधी -चा (history); agreeable to the Gospel शुभवर्त्तमानानुसार, ख्रिस्ती शास्त्रानुसार (truth); strict in interpreting Christian doctrine शुभवर्त्तमाना प्रमाणें उपदेश करणारा, यथाशास्त्र; [technically applied to a party in the English and other churches].—EVANGELIST, a writer of the history or doctrines, precepts, actions, life and death, of our blessed Savior, Jesus Christ: as, the four *Evangelists,* Matthew, Mark, Luke, and John शुभवर्त्तमान लिहिणारा, मंगलसमाचार लेखक, आमचा सुवंद्य तारणारा येशू ख्रीस्त याचें चरित्र लिहिणारा; a preacher who is au-

thorized to preach, but has not charge of a particular church, and is not allowed to administer the Eucharist शुभवर्त्तमानाचें घोषण करणारा, सुवार्त्तिक.—EVANGELIZE *v.* ख्रिस्ती धर्म शिकविणें; ख्रिस्ती धर्म शिकवून ख्रिस्ती क.

EVAPORATE *v. i.* (*-vaporare*, to emit steam) वाफ होऊन उडून जाणें; be wasted खर्चणें, व्यर्थ -फुकट जाणें: arguments e. in words. —*i.* वाफ क.; dissipate in vapor वाफ करून उडवणें. — EVAPORATION वाफ क. *n*, बाष्पीकरण *n*, वाफ होणें *n*, बाष्पीभवन *n*.

EVE, EVEN* close of the day संध्याकाळ *f*, सांज *f*; evening preceding some particular day पूर्वसंध्या *f*: Christmas e.; the period just preceding some important event एखादी मोठी गोष्ट होण्याच्या जवळचा काळ, लाग: the e. of an engagement.

EVEN* *a.* level सपाट, सारखा, साफ; calm स्थिर, शांत, समवृत्ति (temper); parallel -शीं बराबर, सारखा (Luke xix. 44); fair बराबर, रास्त, उजू: our accounts are e.; not odd सम: 4 and 10 are e. numbers.—*v.* सारखा -सपाट क., बराबर क.; बाकी पूज क.; *ad.* likewise तसाच, तद्वत्; at the very time त्याच वेळीं: they were bad enough to please, e. when I wrote them; so much as देखील, इतका कीं, ही; as was not to be expected ही, देखील, सुद्धां. -HANDED निष्पक्षपाती.

EVENT (*-venire*, to come) that which comes, arrives, or happens घटित गोष्ट *f*; consequence परिणाम, शेवट, फळ *n*. -FUL *a.* घडामोडीचा, उलटापालटीचा. -UAL *a.* coming or happening as a consequence अनुसारी, कार्यकारण संबंधी, आनुषंगी; final शेवटचा, अंतिम. -LY *ad.* शेवटीं, अखेरीस, परिणामीं.

EVER* at any time कधीं कोणत्या तरी वेळीं, केव्हां तरी (Eph. v. 29); at all times नित्य, सदां, सर्वदां: he shall e. love; continually निरंतर, अखंड; e. and anon जेव्हां तेव्हां, वारंवार. -GREEN *a.* सदां हिरवा -ताजा, सदां हरित. -LASTING *a.* सर्वकाल राहणार, शाश्वत, सनातन; निरंतर, सर्वकालिक.—*n.* सनातन काल, अनादि काल. -MORE चिरकाल; नित्य, निरंतर, सर्वदां.

EVERY* *a.* हरएक, प्रत्येक. -DAY *a.* दररोजचा, प्रतिदिवसीं; प्रतिदिवसाचा, नित्याचा (suit of clothes). -WHERE चहुंकडे, सर्वत्र.

EVIDENT *a.* (*-videre*, to see) स्पष्ट, व्यक्त, उघड, जाहीर. — EVIDENCE, conclusive testimony मुद्दा, प्रमाण *n*; a witness साक्षी, साक्षिदार; *Law*, that which is legally submitted to a competent tribunal, as a means of ascertaining the truth of any alleged matter of fact under investigation before it साक्ष *f*, शाहिदी *f*; written e. लेखप्रमाण *n*; corroborative e. पडसाक्ष *f*; ocular e. प्रत्यक्ष प्रमाण *n*;—of analogy उपमान *n*; [State's, King's, Queen's e., an accomplice in a crime who is admitted as evidence for the government].

EVIL* that which produces unhappiness अरिष्ट *n*, संकट *n*, दुःख *n*; moral badness, or the deviation of a moral being from the principles of virtue impressed by conscience, or the will of the Supreme Being, or the principles of a lawful authority पाप *n*, दुष्टता *f*, दुष्टपणा.—*a.* वाईट, खराब (beast, plant); wicked वाईट, दुष्ट, पापी, in comp. कु, दुर, अप (words, thoughts), producing or threatening sorrow, distress, injury, or calamity अरिष्टाचा, दुःखाचा, अनर्थाचा, दुःखोत्पादक (days, tidings). -EYE, a supposed power of fascinating, of bewitching, or otherwise injuring, by the eye or look मोहक दृष्टि *f*, दृष्ट *f*, दृष्टि *f*, घातुक दृष्टि *f*. -EYED *a.* पापदृष्टि, नजरपापी. -MINDED *a.* मनाचा

कपटी, कुड्या भावाचा. -SPEAKING *a.* चाहडी *f*, अपवाद. -WORKER दुष्कर्मी.

EVINCE *v.* (*-vincere*, to vanquish) सिद्ध -शाबीत क., स्पष्ट दाखविणें -दाखवून -करून देणें.

EVISCERATE *v.* (*-viscera*, the bowels) आंतडीं बाहेर काढणें.

EVOKE *v.* (*-vocare*, to call) बोलावणें, आव्हान क. [from].

EVOLVE *v.* (*-volvere*, to roll) उघडणें, खुला -स्पष्ट क., उकलणें; emit बाहेर टाकणें, सोडणें (odors).—*i.* उघडणें, खुलणें, फांकणें.—EVOLUTION विस्तार, प्रकटिकरण *n*; a series of things unrolled श्रेणी *f*, श्रेढी *f*; *Arith.* मूळकर्म *n*; *Mil.* कवाईत *f*.

EWE* (*Skr. avi*) मेंढी *f*.

EWER* हात तोंड धुवायास पाणी आणण्याचें (एक प्रकारचें भांडें *n*; झारी *f*, लोटा, गडवा या सारखें).

EXACERBATION (*-acerbus*, bitter, sour) irritation चिढवणें *n*, खिजवणें *n*; *Med.* a periodical increase of violence in a disease भरतें *n*, चढ.

EXACT *a.* (*-agere*, to drive) precisely agreeing with a standard, a fact, or the truth बरोबर, नेमका, यथातथ्य, खरा (time, sum);—of persons बेतबात्या, सुती, रेखला, व्यवस्थित;—punctual वक्तशीर येणारा -जाणारा -देणारा -करणारा; definitely conceived or stated साफ, कडक, सखत, ठास, स्पष्ट (command) [in].—*v.* require authoritatively अधिकारानें मागणें -घेणें; extort जुलमानें घेणें -काढणें [from]. -ION बलात्कार, जबरी *f*; tribute, fee, rewards, or contributions, demanded or levied with severity or injustice जुलमानें -अधिकाराच्या बळानें मागितलेला किंवा घेतलेला पैका, जोरतलब *f*, खंडणी *f*. -LY *ad.* बराबर, नेमका, पुरता; precisely according to a rule खरा, बरोबर, हुबेहुब. -NESS रेखलेपणा, टापटीप *f*, सुतीपणा, सुयंत्रता *f*.

EXAGGERATE *v.* (*-aggerare*, to heap up) फुगवून -मीठमिरची लावून सांगणें, राईचा पर्वत क., रजाचा गज क.—EXAGGERATION अतिशयोक्ति *f*, अत्युक्ति *f*.

EXALT *v.* (*-altus*, high) उभारणें, उंच क.; dignify वाढविणें, मोठेपणा देणें, योग्यतेस चढवणें; extol स्तुति *f* -स्तव क.; lift up with joy, pride, or success हर्षानें, गर्वानें किंवा जयानें फुगविणें [from, to, by]. -ED उंच, थोर; sublime प्रगल्भ, प्रौढ, प्रशस्त. -ATION मानवृद्धि *f*, सरफराजी *f*, मोठेपणा देणें *n*; मोठेपणा, मोठी पदवी *f*.

EXAMINE *v.* (*examen*, tongue of a balance) test by a balance तोलून -ताडून पहाणें; inquire into and determine शोधणें, तपासणें, परीक्षणें; try as an offender अपराध्याची चौकशी क.;—as a witness (साक्षीस) विचारपूस क., सवाल घालणें;—as a scholar परीक्षा घेणें;—accounts मोहसबा घेणें [into, in].—EXAMINATION विचारणें *n*, परीक्षण *n*, शोध परीक्षा *f*;—by question विचारपूस *f*, पुस्तपास्त *f*;—judicial तलाश, चौकशी *f*.—EXAMINER परीक्षक, परीक्षा करणारा; चौकसनीस, चौकशी करणारा; परीक्षा घेण्यास नेमलेला मनुष्य, परीक्षा घेणारा: an e. of students for rank.

EXAMPLE (*eximere*, to take out) a sample मासला, नमुना; a model नमुना, कित्ता; a warning जरब *f*, ताकीद *f*; precedent मागला दाखला, उदाहरण *n*; an instance दृष्टांत, दाखला, प्रतीक *n*.

EXASPERATE *v.* (*-asper*, rough) provoke खिजविणें, चेतविणें; aggravate अधिक जड क.; to be *exasperated* विकोपास जाणें [by, at].

EXCAVATE *v.* (*-cavare*, to make hollow) hollow out पोखरून काढणें, पोखरणें (the

earth); form by hollowing पोखरून -कोरून क. (a canoe).—EXCAVATION पोखरणें *n*: cavity formed by removing the interior पोखर *f*, पोखरून केलेलें भोंक *n*, खळी *f*.

EXCEED *v*. (*-cedere*, to go) go beyond पलीकडे जाणें, वर जाणें, मर्यादे बाहेर जाणें, अधिक होणें; surpass मागें टाकणें, जिंकणें; -चे कान कापणें. — *i*. मर्यादा उलंघून जाणें; अधिक होणें. -ING *a*. and -LY *ad*. अतिशय, पुष्कळ [by, in].

EXCEL *v*.(*Gr*. *-kellein*, to urge on) मागें टाकणें, जिंकणें, माजी पाडणें, अधिक श्रेष्ठ होणें.—*i*. वर्चढ -उत्कृष्ट असणें [in, at]. -LENCE उत्तम -उत्कृष्टपणा, गुणाधिक्य *n*; any valuable quality गुण, भूषण *n*. -LENCY सुलक्षण *n*, भूषण *n*, गुण; a title of honor or respect given to the highest dignitaries of a court or state, also to embassadors, governors, and commanders-in-chief महाराज, हजरत असा एक किताब आहे. -LENT *a*. उत्तम, उत्कृष्ट, श्रेष्ठ; excelling in attainments गुणी, गुणवान (judge, artist).

EXCEPT *v*. (*-capere*, to take) खेरीज -निराळा -वर्ज क., वगळणें. — *i*. तकरार -दिक्कत घेणें [from, to].—*prep*. शिवाय, वांचून, विना; unless शिवाय, नाहीं तर *n*. -ING *prep*. शिवाय. -ION बाहेर टाकणें *n*, वर्जणें *n*; that which is excepted अपवाद, विपक्ष: every general rule has its *exceptions*; objection शंका *f*, दिक्कत *f*; offense रुसवा; esp. with *to take*, followed by *against*; [*Law*, an objection, oral or written, taken, in the course of an action, as to bail or security; or as to the decision of a judge in the course of a trial, or in his charge to a jury.] -AL *a*. नियमा बाहेरचा, विपक्ष. -ABLE *a*. दूषण लावायाजोगा, बाध्य, दूषणीय, वर्ज्य.

EXCESS (*-cedere*, to pass) the state of surpassing or going beyond limits अतिशयपणा, आधिक्य *n*, अधिकाई *f*, पराकाष्ठा *f*; —of action बेहद्द *f*, सीमा *f*, जुलूम; dissipation अत्याचार, दुराचरण *n*, बदफैली *f*; remainder बाकी *f*, कसर *f*, वरताळा [of, in]. -IVE *a*. अतिशय, फारच, पराकाष्ठेचा (labor); अमर्याद, बेहद्द (anger).

EXCHANGE *v*. (See CHANGE) part with for compensation बदला घेऊन देणें, मोबदला घेऊन देणें; part with for a substitute अदलाबदल क., फेरमोबदला क.: to e. a crown for a cowl; barter अदलाबदलीचा व्यापार क., सार्टेलोटें -विनियम क.: to e. horses with a neighbor;—as money वटावणें, बटावणें [for].—*n*. बदलणें *n*; अदलाबदला, मोबदला; सट्टाबट्टा; सार्टेलोटें *n*, विनियम; balance of currencies बट्टा, बट्टाई *f*;—on bills हुंडणावळ *f*; place where merchants meet उदम्यांचा फड, अड्डा, चौक.

EXCHEQUER *F*. court into which public money is paid जमाबंदीची कचेरी *f*, खजीना.

EXCISE (*-cædere*, to cut) जकात *f*, सायर *n*, महसूल. -MAN जकातदार. — EXCISION कापून टाकणें *n*, अवच्छेद; excommunication बहिष्कार; (खिस्ती) मंडळीच्या बाहेर काढणें *n*.

EXCITE *v*. (*-cire*, to put in, move) rouse to feeling उठवणें, जागृत क., चेतवणें (spirits, passions); agitate क्षोभवणें, खवळणें [for, by]. -MENT उचल *f*, उठावणी *f*; गडबड *f*, धांदल *f*; as of the passions क्षोभ, उद्वेग, मनस्ताप.

EXCLAIM *v*. (See CLAIM) ओरडून -मोठ्यानें बोलणें; against नांवानें बोंब मारणें, गिल्ला सांगणें [at, to, against]. -ATION रड *f*, आरड *f*, आक्रांत; हाकाटी *f*, बोंब *f*; *Rhet*. a sentence passionately uttered उद्गार; *Print*. e. point उद्गारचिन्ह *n* (!).

EXCLUDE *v.* (*-claudere*, to shut) आंत येऊं न देणें, बाहेर ठेवणें; thrust out बाहेर टाकणें -काढणें [from, by, for].—EXCLUDED बाहेर ठेवलेला, वर्ज केलेला, खेरीज.—EXCLUSION बाहेर टाकणें, वर्जन *n*, बहिष्करण *n*.—EXCLUSIVE *a*. आंत येऊं नदेणारा, प्रवेश न होऊं देणारा; सर्वांस नसतां एकास असणारा, इतरव्यावृत्त (privileges); शिवाय, खेरीज, सोडून: five thousand troops, e. of artillery. -LY *ad*. इतरांस -दुसऱ्यांस सोडून -वर्जून.

EXCOMMUNICATE *v.* (See COMMUNICATE) expel from communion बाहेर टाकणें, बहिष्कार घालणें, अपंक्त क.;—from a caste वाळीत टाकणें [from, for]. — EXCOMMUNICATION बहिष्कार; the act of ejecting बाहेर टाकणें *n*; expulsion from the communion of a church, and deprivation of its rights, privileges, and advantages ख्रिस्ती मंडळीच्या बाहेर काढणें -टाकणें -ठेवणें -दूर क. *n*, धर्मबहिष्कार *n*; — from a caste वाळीत, जातिबहिष्कार; [e. is of two kinds, the *lesser* and the *greater*; the *lesser* e. is a separation or suspension from partaking of the Eucharist: the *greater* is an absolute exclusion of the offender from the church and all its rights and advantages].

EXCREMENT, EXCRETION (*-cernere*, to separate) विष्टा *f*, मळ, गू.

EXCRESCENCE *F*. any thing growing out unnaturally from any thing else वृद्धि *f*, टेंगूळ *n*;—upon the body आवाळूं *n*, टेंगूळ *n*, गलंड *n*;—upon a tree टेंगूळ *n*, गुळुंब *n*, गुंज *n*.

EXCRUCIATE *v.* (*-cruciare*, to slay on the cross, torment) अति वेदना देणें, यातना क. —EXCRUCIATING *a*. अति वेदनाकारक, व्यथाकारक.

EXCULPATE *v.* (*-culpare*, to find fault with) निरपराधी -निर्दोष ठरवणें, दोष उडवणें [from]. —EXCULPATION दोषमुक्ति *f* -मोचन *n*.

EXCURSION (*-currere*, to run) धावणें *n*, धांव *f*, दौड *f*; expedition मोहिम *f*, दौड *f*; a trip for pleasure or health सहल *f*, सफर *f*, फेरफटका; digression भटकणें *n*, रानांत शिरणें *n* [from, to].—EXCURSIVE *a*. भटक्या, भ्रमणकारी -शील, विहारी.

EXCUSE *v.* (*-causa*, cause) exculpate निर्दोष -निरपराधी ठरवणें -क.; pardon क्षमा -माफ क.; overlook कानाडोळा क., मनावर न घेणें (irregular conduct); release by favor सूट देणें, सोडणें, माफी देणें (a forfeiture); relieve of an imputation by apology निमित्त -सबब -बाहणा सांगणें [for, from].—*n*, सबब *f*, निमित्त *n*, कारण *n*: e. for delay; दोष उडविणें *n*, सुटका *f*, दोषमुक्तता *f*; माफी *f*, क्षमा *f*; false e. मीस *n*, निमित्त *n* [for].

EXECRATE *v.* (*-sacer*, holy) शाप -अभिशाप -तळतळाट देणें [for].—EXECRATION शाप, अभिशाप.—EXECRABLE *a*. शापयोग्य, अति दुष्ट, कुत्सित.

EXECUTE *v.* (*-sequi*, to follow) complete पुरा क.; शेवटास -सिद्धीस नेणें (a plan); complete as a legal instrument पुरा क., बजावणें (a deed); give effect to अमलांत आणणें, बजावणें; inflict capital punishment on देहांत शिक्षा क., देहदंड क., जिवें मारणें; *Mus*. perform on an instrument वाद्य वाजविणें: to e. rapidly. — EXECUTION करणें *n*, बजावणें *n*; साधन *n*, साधणूक *f*: e. of a plan; *Law*, कागदपत्रावर सही -शिक्का क. *n*; final process अमलांत आणणें *n*, बजावणें *n*; देहांतशिक्षा क. *n*, देहांतशिक्षा *f*. -ER करणारा, बजावणारा; फासीदेणारा, शिरच्छेद करणारा, मांग, चंडाळ.—EXECUTOR करणारा, साधणारा; person appointed by a testator to execute his will मृत्युपत्राची व्यवस्था करणारा, मृत्युपत्र चालविणारा -बजावणारा. —EXECUTRESS, -TRIX मृत्युपत्र चालविणारीण *f*.

Exegesis (*Gr.*) exposition प्रकाश, व्याख्या *f*, विवरण *n*; scientific interpretation of the Holy Scriptures ख्रिस्ती शास्त्राचें विद्यासूत्रानुसार अर्थप्रकाशन *n*.—Exegetical *a.* अर्थप्रकाशक -सूचक, टीकारूप.

Exemplar (See Example) नमुना, कित्ता; [an idea or image formed in the mind of an artist, to which he conforms his work]. —Exemplary *a.* कित्ता घेण्याजोगा, अनुकरणीय; commendable वर्णनीय, स्तुत्य (conduct); serving as a threatening धाक -दहशत बसवायाजोगा, जरबेचा (punishment); conspicuous प्रसिद्ध, उत्कृष्ट, प्रख्यात: to be e. in life. —Exemplify *v.* उदाहरणानें -दृष्टांतानें दाखविणें; copy प्रत -नक्कल क.—Exemplification दाखला देणें, उदाहरण *n*; प्रत *f*, नक्कल *f*.

Exempt *v.* (*eximere*, to take out) सोडणें, माफ क. [from].—*a.* सोडलेला; माफीचा, सुटा, मुक्त. -ion, freedom from that to which others are subject सुटका *f*, माफी *f*, मोकळीक *f*: e. from servitude, anxiety, suffering.

Exequies *pl* (*-sequi*, to follow) प्रेतकर्म *n*, उत्तरक्रिया *f* -कार्य *n*.

Exercise *v.* (*exercere*), to put in action habitually वापरणें, वहिवाटणें, घोळणें; discipline शिक्षा -पद्धत लावणें, सराव क., कसरत क., शिकवणें (arms, troops);—as the mind मनोव्यापार क., व्यवसाय क.; worry छळणें, गांजणें: *exercised* with pain; put in practice आचरणें, चालवणें, करणें (authority, an office);—as the dumb-bells मुद्गल फिरवणें [in, at, on, upon].—*i.* शरीरव्यायाम क., सहील -रपेट क.—*n.* अभ्यास, सराव; आचरण *n*: the public e. of religion; व्यापार, व्यवसाय, वापरणें *n*: e. of the eyes;—of the body कसरत *f*, व्यायाम, शरीरपरिश्रम;—of the mind मनोव्यापार, व्यवसाय; military e. कवाईत *f*, शस्त्राभ्यास; a lesson धडा, संथा *f*, तालीम *f*; to take e. सहल -रपेट क.

Exert *v.* (*-serere*, to join together) put forth, as strength, force, or ability झटणें, श्रम घेणें, परिश्रम क.; do करणें; to e. one's self प्रयत्न क. -ion प्रयत्न, आयास, कष्ट.

Exhale *v.* (*-halare*, to breathe) श्वास सोडणें, निश्वास टाकणें; emit, as vapor वाफेच्या रूपानें बाहेर सोडणें -टाकणें: the earth *exhales* vapor; evaporate वाफेच्या रूपानें बाहेर काढणें: the sun *exhales* the moisture of the earth [from].—*i.* वाफेच्या रूपानें बाहेर निघणें.—Exhalation उद्गार, निश्वास; बाष्परूप त्याग; that which rises in the form of vapor वाफ *f*.

Exhaust *v.* (*-haurire*, to draw) फडशा क., खर्चणें: to e. the water of a well; empty by drawing out the contents खर्चून-काढून रिकामा क., खपवून -कोरडाटांक पाडणें -क.: to e. a well of its water, — a treasury of its contents; weary दमविणें, भागविणें, थकविणें, (one's strength) [by, of]. -ion निझाडा, फन्ना, खडखडाट; ताण *f*, त्रेधा *f*, भागवटा, शीण; the state of being emptied शून्यता *f*.

Exhibit *v.* (*-habere*, to hold) डोळ्यापुढें -दृष्टिपुढें धरणें -ठेवणें, दाखविणें, दर्शविणें: to e. a picture in a gallery; present in a public or official manner हुद्याच्या -अधिकाराच्या -सरकारी नात्यानें नमूद -रुजू क. (a charge);—a complaint नालिस्त -सांगणें-क.; *Med.* administer as a remedy (औषध) देणें -चारणें: to e. calomel; [to e. a foundation or prize, to hold it forth as a bounty to candidates [at, to].—*n.* नमूद केलेला कागद -लेख -दस्तऐवज. -ion दाखविणें *n*, प्रदर्शन *n*, दर्शन *n*; that which is exhibited दाखविलेली -प्रदर्शित वस्तु *f*; public show

तमाशा; a display of works of art &c. (कळाकुसरी इ० च्या पदार्थांचें) प्रदर्शन *n*; allowance for the maintenance of scholars, under certain conditions विद्यार्थ्यांची नेमणूक *f* -वृत्ति *f*. -ER नेमणुकीचा विद्यार्थी.

EXHILARATE *v.* (-*hilaris*, merry) आनंदित -हर्षित -खुश क. [with]. — EXHILARATION खुशी *f*, आनंद, उल्लास.

EXHORT *v.* (-*hortari*, to incite) बुद्धिवाद सांगणें, उपदेश क.; warn बजावणें, ताकीद देणें [to]. -ATION उपदेश; बुद्धिवाद, बोध; ताकीद *f*, सांगी *f*.

EXHUME *v.* (-*humus*, ground) पुरलेला बाहेर काढणें (a corpse).

EXIGENCE, -CY (-*agere*, to drive) distress अडचण *f*, तारंबळ *f*, आपदा *f*; urgent want गरज *f*, अडचण *f*, निकड *f*, प्रयोजन *n*.

EXILE (-*solum*, ground) forced separation from one's native country हद्दपार क. *n*, स्वदेशत्याग; the person banished हद्दपार केलेला मनुष्य, बेवतन.—*v*. हद्दपार क.

EXIST *v.* (-*sistere*, to cause to stand) be असणें; continue in being राहणें, चालणें, असणें; occur घडणें, होणें; live जगणें, वाचणें: men do not e. in water [in, on, upon, by]. -ENCE असणें *n*, अस्तित्व *n*; घडणें *n*, घटना *f*. उपस्थिति *f*; नांदणूक *f*, स्थिति *f*, चालवणूक *f*; a being व्यक्ति *f*: a living e. प्राणी, जीव. -ENT *a*. असणारा, विद्यमान.

EXIT (*L.*) departure of a player from the stage, when he has performed his part नाटकांतील सोंगाचें निघून जाणें *n*; any departure जाणें *n*, निघून जाणें *n*, निष्क्रमण *n*; death मरण *n*, निर्याण *n*; a way of departure.

EXODUS (*Gr.* -*hodos*, way) निघून जाणें *n*, निर्गम; [departure of the Israelites from Egypt under the conduct of Moses]; the second book of the Old Testament निर्गम.

EX OFFICIO *ad.* (*L.*) अधिकारपरत्वें.

EXOGENOUS *a.* (*Gr.*-*genein*, to bring forth) growing by successive additions to the outside of the wood बहिर्वर्धिष्णु.

EXONERATE *v.* (-*onerare*, to load) दोष -ठपका उडविणें;—as an obligation उपकाराचें ओझें उतरणें [from].

EXORABLE *a.* (-*orare*, to pray) capable of being moved by entreaty प्रार्थना-काकळूत केल्यानें दया-पान्हा येण्याजोगा, वरद, सुप्रसादित.

EXORBITANT *a.* (-*orbis*, circle) excessive अतिशय, बेहद्द, अमर्याद (claims, taxes); —of prices जबर, भारी; anomalous संप्रदायविरुद्ध, विधिभंजक, विलक्षण. — EXORBITANCE अमर्यादपणा, अतिशयता *f*; जुलूमजास्ती *f*.

EXORCISE *v.* (*Gr.*-*horkos*, oath) drive away in consequence of adjuring by some holy name भूत काढणें -घालविणें, झाडणें, उतरणें; deliver from the influence of an evil spirit -च्यांतून -आंतलें भूत काढणें (a house) [by, from].—EXORCISER, -IST भूतकाढ्या, पंचाक्षरी.

EXORDIUM (*L.*) introductory part of a discourse, poem &c. उपोद्घात, उपन्यास, प्रस्तावना *f*.

EXOTIC *a.* (*Gr. exo*, outside) परदेशीय, परभू, विदेशी (plant, word).—*n*. विदेशीय झाड *n* -शब्द -चाल *f*.

EXPAND *v.* (-*pandere*, to spread out) फुलविणें, उमलविणें, खुलविणें; diffuse पसरणें, विस्तारणें, फैलावणें.—*i*. फुलणें, उमलणें, खुलणें; पसरणें, वाढणें [from, to]. -ED *a*. पसरलेला, विस्तारित, विस्तृत; खुललेला, प्रफुल्लित, विकसित. —EXPANSE मोठा विस्तार, सपाटी *f*, तळवट *n*;—of heaven व्योम.—EXPANSION फैलावणें *n*, प्रसार; विस्तार, फैलाव, वृद्धि *f*; मैदान *n*, सपाटी *f*.—EXPANSIVE *a*. पसरायाजोगा, प्रसरणीय, प्रसरणशील.

Ex-parte *a.* (*L.*) एकपक्षी, एकतर्फी.

Expatiate *v.* (*-spatiari,* to walk about) मोकळें -मोकाट -मोकार फिरणें; enlarge in discourse or writing पाल्हाळ करून बोलणें किंवा लिहिणें [on, upon].

Expatriate *v.* (*-patria,* one's fatherland) देशपार -हद्दपार क.;—one's self स्वदेशत्याग क., मुलखावर उठून जाणें [from, for].

Expect *v.* (*-spectare,* to look at) वाट पाहणें, मार्गप्रतिक्षा क.; anticipate अगा असणें, अटकळींत येणें [from, of]. -ancy, -ation मार्गप्रतिक्षा *f,* अपेक्षा *f,* आशा *f;* अगा *f,* संभव, सुमार. -ant *a.* वाट पाहणारा, मार्गप्रतिक्षा करणारा, सावचित.

Expectorate *v.* (*-pectus,* the breast) खाकरणें, कफ पाडणें.—*i.* कफ पडणें.

Expedient *a.* (*-pes,* foot) proper under the circumstances उचित, लायक, कार्योपयोगी; tending to self-interest स्वहिताचा, स्वहितकारक [for].—*n.* तोड *f,* युक्ति *f,* उपाय.—Expedite *v.* quicken जलदीवर घेणें -आणणें, गतित्वरित क.; dispatch जलदीनें पाठविणें, दवडणें, फेंकणें; issue officially अधिकाराच्या नात्यानें प्रसिद्ध क., फरमावणें.—Expedition जलदी *f,* घाई *f,* त्वरा *f;* an important enterprise, undertaking, or attempt at some distance मोहीम *f,* सफर *f;* naval e. सफर *f;* military e. मोहीम *f,* दौड *f;* the body of persons making such an excursion दौडीचीं -स्वारीचीं मनुष्यें *n pl;* with e. जलदीनें, शिताबीनें.—Expeditious *a.* जलद, शिताब, झटपट्या;—of matters ताबडतोबीचा, जलदीचा.

Expel *v.* (*-pellere,* to drive) काढून -घालवून देणें -टाकणें; banish देशपार क.; [cut off from further connection with an institution of learning, a society, and the like].

Expend *v.* (*-pendere,* to weigh) lay out खर्चणें, व्यय क.; consume by use खपवणें, सारणें, खलास क.; waste उडवणें, उधळणें [on, upon].—*i.* खर्चणें, सरणें, खपणें, उडणें. -iture खर्चणें *n,* वेच, व्यय; charge खर्च, व्यय; extra e. गैर खर्च.— Expense खर्च, व्यय; income and e. आयव्यय: village *expenses* सादिलवार खर्च.—Expensive *a.* खर्चीक, धौताल; dear महाग; costly बहुमोलाचा, किंमतदार. -ness खर्चीकपणा; उधळेपणा; मोठें मोल *n,* बहुमूल्यता *f.*

Experience (*experiri,* to try) practical acquaintance with any matter by personal observation or trial of it, or by feeling its effects, by living through it, or the like अनुभव, प्रचीत *f;* experimental knowledge अनुभविक ज्ञान *n;* repeated trial of a matter परीक्षा *f,* अजमास; personal trial and experiment स्वानुभव; to agree with the e. of दाखल्यास -प्रतितीस उतरणें -येणें [of].—*v.* अनुभव घेणें, भोगणें; परीक्षा क., अजमासणें; exercise राबवून तयार क., सराव पाडणें [in, from].—Experienced *p.a.* अनुभव घेतलेला, अनुभुक्त; skilful or wise by means of trial, use, or observation जाणता, वाकब, शहाणा, व्यवहारज्ञ (statesman, physician, artist). — Experiment पारख *f,* प्रचीति *f,* अनुभव; scientific e. प्रयोग? -al *a.* परीक्षेचा, परीक्षेसंबंधी; अनुभविक, अनुभवस्थापित (religion).

Expert *a.* (do.) हाताचा कुशळ, कसबी, हुशार, चालाख [at]. -ness हातवटी *f,* सुगराई *f,* निपुणता *f,* हस्तकौशल्य *n.*

Expiate *v.* (*-piare,* to seek to appease) निस्तरणें, प्रायश्चित्त करून -घेऊन घालविणें (crime) [by].—Expiation प्रायश्चित्त घेऊन घालविणें, निरसन *n;* प्रायश्चित्त *n* [for].—

EXPIATORY *a.* प्रायश्चित्ताचा, प्रायश्चित्तरूप, पापनिष्कृतिकारक (sacrifice).

EXPIRE *v.* (*-spirare,* to breathe) श्वास टाकणें, दमसोडणें; exhale वाफेच्या रूपानें सोडणें: plants e. odors.—*i.* die प्राण सोडणें, मरणें; come to an end शेवट होणें, संपणें, सरणें [at].—EXPIRATION श्वास, निश्वास; मरण *n,* प्राणांत; शेवट, पर्यवसान *n*; matter exhaled forth श्वासानें बाहेर टाकलेला पदार्थ, निश्वास.

EXPLAIN *v.* (*-planare,* to make plain) अर्थ सांगणें, फोड क., उघड करून सांगणें, समजाविणें [by, to]. -ATION, the act of expounding अर्थ सांगणें *n,* स्पष्टिकरण *n,* उलगडा, फोड *f*; that which explains टीका *f,* व्याख्या *f*; understanding समज, उमज; reconciliation, agreement, or good understanding of parties who have been at variance समजूत *f,* मनसमजावणी *f.*—EXPLANATORY *a.* उलगड्याचा, प्रकाशक; टीकारूप, विवरणरूप (notes).

EXPLETIVE (*-plere,* to fill) a word not necessary to the sense, but inserted to fill a vacancy, or for ornament पादपूरक शब्द, वाक्यालंकार, पालव पद *n.*

EXPLICATE *v.* (*-plicare,* to fold) उलगडा -फाड -परिस्फोट क.—EXPLICATION उलगडा, फाड, विवरण *n*; टीका *f,* प्रकाशन *n.*—EXPLICIT *a.* -LY *ad.* साफ, स्पष्ट, निवळ; direct खरपूस, खरमरीत.

EXPLODE *v. i.* (*-plaudere,* to clap) आवाजाबरोबर फुटणें,बार उडणें.—*t.* बार उडवणें,दारूनें उडविणें; cry down हुर्यो हुर्यो क., धुत्कारणें.—EXPLOSION बार होणें -उडणें *n*; धाडकन उडवणें *n*; बार,धडाड,भडाड *f*; हुर्यो,धुत्कार·

EXPLOIT (*explicare,* to unfold) पराक्रम, महत् कृत्य *n,* शूरकर्म *n.*

EXPLORE *v.* (*-plorare,* to cry out) search through शोधणें, तपासणें, पाहणें; spy out हेरणें, टेहळणें [into].

EXPONENT (*-ponere,* to place) *Alg.* घातप्रकाशक; one who, or that which, stands as an index or representative ज्ञापक, सूचक, मुख *n,* प्रतिनिधि.

EXPORT *v.* (*-portare,* to carry) देशांतरास माल पाठविणें.—*n.* देशांतरास नेलेला माल, रवानगी *f* [from, to].

EXPOSE *v.* (*-ponere,* to place) उघड्यावर मांडणें -ठेवणें; बाहेर -वाऱ्यावर ठेवणें -टाकणें: to e. one's self to cold; promulgate प्रसिद्ध क.; explain अर्थ सांगणें, उलगडा क.; lay open to attack or danger भयाच्या -धोक्याच्या जाग्यावर ठेवणें, धोक्यांत घालणें, उघड्यावर टाकणें; lay open to public inspection, as a thing that shuns publicity, something criminal, shameful, and the like उघडा पाडणें, फोडणें, उघाडीस आणणें (faults); divulge the reprehensible practices of रेवडी -फटफजिती क.: to e. a liar [to].—EXPOSITION उघड करणें *n,* प्रसिद्धिकरण *n*; फोड *f,* व्याख्या *f*; प्रदर्शन *n,* दाखविणें *n.*—EXPOSURE उघडा -उघाड्यांत टाकणें *n*; फजिती *f,* रेवडी *f,* टेर *f,* धिंड *f*; position in regard to influences of climate वारा -ऊन आंत येण्याची उघडी जागा *f,* बाजू *f,* किंवा दिशा *f.*—EXPOSITOR व्याख्या -विवरण करणारा; व्याख्या -टीकारूप ग्रंथ.—EXPOUND *v.* व्याख्या -विवरण क., स्पष्टार्थ क., अर्थ सांगणें. -ER अर्थ सांगणारा, प्रकाशक;—of the law धर्मप्रवक्ता.

EXPOSTULATE *v.i.* (*-postulare,* to ask) बुद्धिवाद सांगणें, कान उघडणें, चार गोष्टी सांगणें [with].—EXPOSTULATION कानझाडणी *f,* बुद्धिवाद.

EXPRESS *v.* (*-premere,* to press) पिळणें, पिळून काढणें (juice of grapes, truth); imi-

tate नक्कल -प्रत उतरणें -क.; represent दाखविणें, दर्शविणें: my words e. my purpose; utter बोलून दाखवणें, सांगणें; indicate सुचविणें, दर्शविणें, व्यक्त क.; send by express messenger मुद्दाम जासूद करून पाठविणें (a package).—*a.* प्रत केलेला, उतरून घेतलेला; plain साफ, स्पष्ट (command); direct चरचरीत, साफ, खरमरीत (terms); intended for a particular purpose मुजरतचा, विशेष कामाकरितां केलेला -योजलेला (train, messenger) [by].—*n.* मुजरत -मुद्दाम पाठविलेला जासूद; मुद्दाम -लवकर जाणार घोडा -गाडी वगैरे. -ION उच्चारणें *n*; उच्चार, उल्लेख;—of the features ठेवण *f*, ठेव *f*, पाणी *n*; a phrase वाक्य *n*, शब्दप्रयोग; *Alg.* बीजरूप *n*. -IVE *a.* serving to express दर्शक, बोधक; significant वाचक, अर्थक, उद्देशक (look). -LY *ad.* उघड, स्पष्ट, साफ.

EXPULSION (See EXPEL) काढून -घालून देणें, उच्चाटण *n*.

EXPUNGE *v.* (*-pungere,* to prick) blot out, as with a pen पुसणें, खोडणें, बोळा फिरविणें (words, lines); annihilate नाहींसा क., मागमूस मोडणें (an offence) [from].

EXPURGATE *v.* See PURGE.

EXQUISITE *a.* (*-quærere,* to ask) excellent उत्तम, उत्कृष्ट; exceedingly nice फार बारिक, नाजूक, सूक्ष्म; e. pleasure परमानंद; e. pain तीक्ष्ण -तीव्र दुःख *n*; of delicate perception सूक्ष्मदृष्टि, बारीक पाहणारा, नजरबाज.

EXTANT *a.* (*-stare,* to stand) protruded बाहेर आलेला; now subsisting प्रसिद्ध, उपलब्ध, विद्यमान.

EXTEMPORE *a.* (*-tempus,* time) without previous study or meditation पूर्वी विचार केल्यावांचून, समयस्फुर्त्तीनें.— EXTEMPORANEOUS, EXTEMPORARY *a.* समयीं सुचलेला, समयस्फूर्त्त.—EXTEMPORIZE *v. i.* पूर्वी विचार केल्यावांचून -समयास बोलणें.—*t.* उतावळीनें -घाईनें -लगबगीनें क. (a dinner).

EXTEND *v.* (*-tendere,* to stretch) ताणणें, वाढवणें, लांब क. (a line); expand पसरणें, विस्तारणें, फैलावणें; prolong लांबवणें, वाढवणें (the time of payment); hold out पुढें क.; लांब क. (the hand); bestow देणें, अर्पणें [from, to]. — *i.* वाढणें, लांबणें, पसरणें; पोहचणें, जाणें.—EXTENSION लांब क. *n*; विस्तार, फैलाव; लांबी *f*; *Physics* and *Metaph.* that property of a body by which it occupies a portion of space परिमेयता *f*; *Com.* a written engagement on the part of a creditor, allowing a debtor further time to pay a debt वायदेचिठ्ठी *f*.—EXTENSIVE *a.* लांबरुंद, प्रशस्त, विस्तीर्ण.—EXTENT, length लांबी *f*; size परिमाण, विस्तार, लांबीरुंदी *f*.

EXTENUATE *v.* (*-tenuis,* thin) बारीक-क्षीण-पातळ क.; palliate, as a crime हलका-कमी क. [by].

EXTERIOR *a.* (*L.*) outward बाहेरचा, बाहेरल्या अंगाचा, बाह्य; on the outside with reference to a person बाहेरील, वरचा, दर्शनी; foreign विदेशी, परदेशचा, परका: e. relation of a kingdom.—*n.* बाहेरचें अंग *n*, बाह्यांग *n*; बाह्यप्रदेश; बाहेरची चाल *f* -चें वर्त्तन *n*.—EXTERNAL *a.* बाहेरचा, बाह्य; derived from, or related to, the body, its appearance, functions, &c. शरीरविषयक, शारीर, शरीर संबंधी; accidental आगंतुक, आनुषंगिक (circumstances); परदेशचा, विदेशी *n*.—*pl* बाहेरचीं अंगें *n pl*. -LY *ad.* बाहेरून, बाहेरच्या आंगून; वरून, दिसण्यांत, दर्शनीं.

EXTERMINATE *v.* (*-terminus,* limit) हद्दपार क.; destroy utterly समूळ नाश क., निःपात क.; root out समूळ उपटणें, खणून काढणें; *Math.* छेदणें.—EXTERMINATION निसंतान *n*, समूळ नाश, संहार; उच्छेद, छेद.

EXTINCT *a.* (*-stinguere,* to quench) विझव-लेला, मालवलेला; having ceased नाहींसा झालेला, सरलेला, नष्ट; as a family बींमोड झालेला, निर्बीज. -ION विझवणें *n,* मालवणें *n;* विनाश, लय, लोप;—of a family बींमोड, निर्वंश, निसंतान *n.* — EXTINGUISH *v.* विझवणें, मालवणें; नाश -लय -लोप -उच्छेद क. -ER मालवणारा; नाश -संहारकर्त्ता; a hollow cone used to put out a candle दीपनिर्वापक, गुलतराश (*H.*).

EXTIRPATE *v.* (*-stirps,* root) मुळासुद्धां उपटणें; destroy wholly समूळनाश -निःपात क. —EXTIRPATION संहार, निःपात.

EXTOL *v.* (*-tollere,* to raise) स्तुति -प्रशंसा -तारीफ क., वाखाणणें [for].

EXTORT *v.* (*-torquere,* to twist) बळजोरीनें -जुलमानें पिळून घेणें -काढणें; take unlawfully बळकाविणें, अन्यायानें घेणें. -ION बळजोरीनें घेणें *n;* बलात्कार, जुलूम. -ER जुलमानें घेणारा, हपापानें दौलत मिळविणारा.

EXTRA *a.* (*L.*) शिवाय, खेरीज.

EXTRACT *v.* (*-trahere,* to draw) काढणें, काढून घेणें; remove forcibly from a fixed position उपटून -बळजोरीनें काढणें: to e. a tooth from its socket; withdraw by distillation, or other chemical process अर्क -काढा काढणें; choose out, as a passage from a book वेचा -उतारा घेणें; *Math.*—the root (वर्ग -घन इ०) मूळ काढणें [from].—*n.* काढा, कषाय, अर्क; वेचा, उतारा. -ION काढणें *n,* निष्कासन *n;* lineage कुळी *f,* वंश, घराणें *n;* अर्क, काढा.

EXTRANEOUS *a. L.* बाहेरचा, विजातीय, आनुषंगिक.: to separate gold from e. matter [to].

EXTRAORDINARY *a.* not usual विलक्षण, लोकोत्तर, अलौकिक (remedies); remarkable चमत्कारिक, अपूर्व (talents); employed or sent for an unusual or special object मुजरत -मुद्दाम पाठविलेला किंवा कामास लावलेला, विशेष.

30 D

EXTRAVAGANT *a.* (*-vagans,* wandering) भ्रमणशील, भटक्या; irregular गैरशिस्त, अमर्याद; excessive अतिशय, मनश्वी (flights of fancy); prodigal उधळा -ळ्या, उडाऊ (man). -LY *ad.* उधळेपणानें; सैरावरा, मनश्वी —EXTRAVAGANCE पराकाष्ठा *f,* अमर्यादा *f,* अनर्थ; उधळपट्टी *f,* उधळाखर्च, अतिव्यय; —of language अतिशयोक्ति *f,* अत्युक्ति *f.*

EXTREME *a.* (*extremus*) at the utmost point शेवटच्या टोंकाचा, अग्रवर्त्ती (verge); final शेवटचा, निदानींचा, अंतींचा (hours of life); utmost, worst or best पराकाष्ठेचा. परमावधीचा, अति, अतिकठीण (case, remedy); [e. unction (*Rom. Cath. Church*), the anointing of a sick person with oil just before death].—*n.* शेवट *n,* अग्र *n,* टोंक *n;* पराकाष्ठा *f,* बेहद्द *f,* सीमा *f,* कळस;—of an arith. or geom. progression,—the first आदिधन *n,*—the last अंत्यधन *n.* -LY *ad.* फारच, अतिशय, परम.—EXTREMITY टोंक *n,* अग्र *n,* शेवट *n*: e. of a country; परमावधि *f,* परम मर्यादा *f*: e. of pain; greatest need or peril निदानींची वेळ *f,* पराकाष्ठेची अडचण *f,* तारांबळ *f,* तंगी *f,* लाचारी *f*: man's e. is God's opportunity;—of the body हस्तपादादि अवयव.

EXTRICATE *v.* (*-tricæ,* hindrances) disentangle सोडवणें, मोकळा क.; send out बाहेर पाठवणें -सोडणें [from].—EXTRICATION सोडवणूक *f,* सुटका *f.*

EXTRINSIC *a.* (*-secus,* by, nigh to) बाहेरचा, बहिर्भूत, बाह्य.

EXTRUDE *v.* (*-trudere,* to thrust) बाहेर लोटणें -ढकलणें; drive away हांकून लावणें -काढणें.—EXTRUSION *n.* बाहेर लोटणें *n,* टाकणें *n,* काढणें *n,* उच्चाटण *n.*

EXUBERANT *a.* (-*uber*, fruitful) पुष्कळ, विपुळ, अतिशय —as growth, foliage उफाड्याच्या वाढीचा, उफाड्याचा.—EXUBERANCE,-CY पुष्कळपणा, चळचळाट, पूर; अतिवृद्धि *f*, उफाड्याची वाढ *f*, माज.

EXUDE *v. i.* (-*sudare*, to sweat) पाझरणें, वाहणें, स्रवणें [from].—EXUDATION स्राव, पाझर, निचरा.

EXULT *v. i.* (-*salire*, to leap) आनंदानें नाचणें, उड्या मारणें, उल्लासणें, टाळ्या पिटणें [in, over]. -ATION आनंदानें नाचणें *n*; अत्यानंद, परमानंद, उल्लास.

EXUVIÆ *pl* (*L.*) cast skins, shells, or coverings of animals प्राण्यांनीं टाकलेलें कातडें *n*, कवच *n*, वगैरे;—of a snake कांत *f*.

EYE * (*Skr. akshi*) the organ of sight डोळा, नेत्र, नेत्रेंद्रिय *n*; power of seeing नजर *f*, दृष्टि *f*: to have the e. of a sailor; sight नजर *f*, दृष्टि *f*; view लक्ष्य *n*, दृष्टि *f*, रोख; opinion मत *n*, विचार; face तोंड *n*: we shall express our duty in his e.; watch नजर *f*, डोळा: the e. of the master; look रूप *n*, मुद्रा *f*, चेहरा: yon gray is not the morning's e.;—as of a peacock's tail, of a grain of corn डोळा, नाक *n*;— of a needle वेज *n*, नाक *n*; a catch for a hook फांस, डोळा, तुकमा; that which resembles the organ of sight in relative importance or beauty नेत्र, चक्षु: the sun is the e. of day: Athens, the e. of Greece; *eyes* of a ship गलबताचा पुढला भाग; to obtain the desire of one's *eyes* डोळे निवणें; to strain one's *eyes* डोळेफोड क.; long *eyes* आकर्णलोचन; having good *eyes* सुलोचन; before one's *eyes* प्रत्यक्ष; visible to the *eyes* दृष्टिगोचर; glance of the *eyes* दृष्टिपात; have an e. to नजर ठेवणें, लक्ष्य ठेवणें.—*v.* पाहणें, लक्षिणें;—wishfully टुकणें;—intently and pointedly रोखून पाहणें;—fiercely गुरकावून पाहणें; डोळे पिंजारणें. -BALL डोळ्याचें बुबूळ *n*, नेपिंडा. -BROW भंवई *f*, भ्रुकुटि *f*. -DROP असूत्र *n*, अश्रु *n*. -GLASS spectacles उपनेत्र *n*, आरशी *f*; the eye-piece of a telescope डोळ्यास लावून पाहण्याचें दुर्भिणीचें भिंग *n*; [a glass adapted for the application of remedies to the eyes]. -LASH डोळ्याच्या पापणीचे केश *pl*; पापणीच्या केशांतला एक केश. -LET नेडें *n*, वेज *n*. -LID डोळ्याची पापणी *f*. -SALVE नेत्रांजन *n*, खत्ता. -SERVANT कामचोर, धन्याच्या डोळ्यापुढलें काम करणारा चाकर. -SERVICE तोंडापुढली चाकरी *f* [Col. iii. 22]. -SIGHT नजर *f*, दृष्टि *f*. -SORE सल *n*, नेत्रकंटक, शल्य *n*. -TOOTH सुळा, दातांचा सुळका, सुळका. -WITNESS साक्षी, प्रत्यक्षदर्शी.

EYRY (*area*, an open space) घार वगैरे हिंस्र पक्ष्यांचीं घरटें बांधण्याची जागा *f*.

F.

FABLE (*fabula*) a feigned story or tale, intended to instruct or amuse कल्पित कथा *f*, कादंबरी *f*; fiction खोटी गोष्ट *f*.—*v.* कल्पित कथा लिहिणें -रचणें.—FABULIST कल्पित कथा रचणारा.—FABULOUS *a.* कल्पित, बनावट; related in fable कादंबरींतला, पुराणांतला, पंचोपाख्यानी.

FABRIC (*faber*, workman) structure of any thing रचना *f*, घटना *f*, बांधणी *f*; edifice इमारत *f*; texture वीण *f*, विणकर *f*; manufactured cloth विणलेलें कापड *n*.—FABRICATE *v.* रचणें, बांधणें; manufacture हातानें -कसबानें क.; forge खोटा क.-रचणें, बनावट क. (a story).—FABRICATION रचणें *n*, बांधणें *n*; कुभांड *n*, कंवटाळ *n*, कुफरांड *n*.—FABRICATOR कुभांड्या, थोतांडी, पाखंडी.

FACE (*facies*) exterior form or appearance of any thing मुख *n*, तोंड *n*, अग्रभाग; surface तळ, पाठ *f*, अंग *n*;—of the ground भूमीची पाठ *f*, भूतल *n*; — as of a

gem पैलू; outside appearance रूप *n*; that part of the head of an animal, esp. of a human being, in which are the principal organs of sense तोंड *n*, मुख *n*; countenance चेहरा, तोंडवळा, सुरत *f*; cast of features ठेव *f*, ठेवण *f*; effrontery नाक *n*, तिखें *n*; boldness छाती *f*, धिटाई *f*; favor or anger मर्जी किंवा गैरमर्जी *f* (Ezek. xv. 7, Prov. vii. 15); before the f. of तोंडा समोर, समक्ष; f. to f. तोंडातोंडीं, रुबरू; in the f. of तोंडावर; to set one's f. against तोंडास तोंड देणें; make f. at वाकुल्या दाखविणें; to make a long f. तोंड वासणें -पसरणें. —*v.* meet in front समोर भेटणें; stand opposite to समोर -सन्मुख उभें राहणें; confront रुबरू क.;—an instrument तोंड बसविणें -लावणें. -CLOTH प्रेताचें मुखवस्त्र *n*. —FACET पैलू.—FACIAL *a*. तोंडाचा, मुखसंबंधी.

FACETIOUS *a*. (*facetus*) merry गमत्या, विनोदी, थट्टेखोर (companion); विनोदाचा, थट्टेचा, विनोदात्मक (reply).

FACILE *a*. (*facere*, to make) not difficult सोपा, हलका, सुगम, सुखकर; easily persuaded to good or bad मनाचा नरम -कोंवळा, चलमति, भोळा.—FACILITATE *v*. सोपा-सुलभ क.—FACILITY सोपेपणा, सुलभपणा; dexterity हातवटी *f*, हात; assistance मदत *f*, सहाय *n*; advantage सवड *f*, सोयी *f*; pliancy नरमाई *f*, मऊ स्वभाव; easiness of access सुगम्यता *f*; affability खळबळीतपणा.

FACT (do.) event झालेली-खरी-घटित गोष्ट *f*: the resurrection of Christ is a f.; reality खरेपणा, तथ्यता *f*; in f. खरोखर, वस्तुतः; statement of a thing done or existing, sometimes, even when false, improperly put by a transfer of meaning for the thing done or supposed to be done हकीकत *f*, बयान, गोष्ट *f*; history abounds with false *facts*.—FACTION, a party तट, पक्ष, तड, फळी *f*; tumult बंड *n*, बलवा.—FACTIOUS *a*. दंगेखोर, बंडखोर; बंडाळीचा, फंदफितुराचा.—FACTITIOUS *a*. बनावट, कृतीचा, केलेला.—FACTOR अडत्या, गुमास्ता, कारभारी; *Math*. गुण्य किंवा गुणकपद *n*. -AGE अडत *f*, दस्तुरी *f*. — FACTORY, house where factors reside वखार *f*, कोठी *f*, अडत्यांचा अड्डा; the body of factors अडते लोक *pl*; a manufactory कारखाना.—FACTOTUM (*L*.) हरकाम्या, हरबाबी, कामाचा गाडा, चौकोनीचिरा.

FACULTY (do.) ability to act शक्ति *f*, सामर्थ्य *n*;—of mind मनःशक्ति *f*, बुद्धिवैभव *n*, आंवाका; authority अधिकार, अखत्यार; [a body of men to whom any specific right is granted, as the medical f., the professors and tutors in a college].

FACSIMILE (*L*.) अस्सल बरहुकूम नक्कल *f*.

FADE *v. i*. (*fatuus*, insipid) wither कोमेजणें, कोमणें, सुकून जाणें; lose freshness, color, or brightness विटणें, (रंग) उडणें, मजीत पडणें, फिका पडणें; vanish उडून जाणें, नाहींसा होणें.—*t*. विटविणें, कोमविणें, मजीत पाडणें [away].

FÆCES *pl* (*L*.) मळ, विष्टा *f*, गू.

FAG* *v. i*. drudge खपणें, कष्ट क.; tire थकणें, दमणें.—*t*. दमविणें, भागविणें.—*v*. खप्या, कबाडकष्ट करणारा; [a schoolboy who does menial services for another boy of a higher class in English schools]. -END, end of a web दशा *f pl*; refuse of any thing गाळ, गदळ. -GING आटापीट *f*, अट्टाहास.

FAGOT (*fax*, torch) लांकडाचा -सरपणाचा भारा, मोळी *f*.

FAIL *v. i*. (*fallere*, to deceive) fall short कमी -उणा पडणें, तूट येणें: streams f.; be affected with want गरजवंत होणें, गरज लागणें; fall away गळणें, पडणें; fall off

with respect to vigor मोडणें, बसणें, थकणें, खचणें; die मरणें; miss चुकणें, हरणें, फसणें; become unable to meet one's engagement चुकणें, टळणें, अंतर -तफावत पडणें; be baffled लटपटणें, अपेश येणें; become bankrupt दिवाळेदार होणें, थकणें, डगागणें; as eyes, ears, &c. फुटणें, नष्ट होणें, जाणें. —*t.* अंतर देणें, फशीं पाडणें, सोडणें. -ING तूट *f*, अपूर *f*, तोटा; fault चूक *f*, दोष, ऐब *n*; lapse चळ, ढळ, भ्रंश. -URE तूट *f*, तोटा, अभाव; — of crops बूड *f*, बोंबूड *n*; क्षय, भ्रंश; f. of memory मोड, मोडकळ *f*: f. in business; — in duty तफावत *f*, चूक *f*, अंतर *n*.

FAIN* *a.* glad आनंदी, खुशी; [content to accept, for lack of any thing better, as the more desirable of two alternatives]. —*ad.* खुशीनें, आनंदानें.

FAINT *a.* (*fingere*, to feign) weak अशक्त; languid थकलेला, शिणलेला, लुंबलेला; inclined to swoon मूर्च्छित होण्याजोगा; as color फिका, अंधक, पुसकट; as sound मंद, हलका, बारिक; hardly perceptible पातळ, बारीक, कळेनासा, सूक्ष्म (image); performed in a feeble manner मळमळीत, मिणमिणा; dejected खिन्न, उदास, दिलगीर. —*v. i.* मूर्च्छा -अंधारी येणें, कासावीस होणें, गळणें, म्लान होणें (Prov. xxiv. 10; Matth. viii. 3); धीर -अवसान सोडणें; नाहींसा होणें, अंतर्धान पावणें, अदृश्य होणें. -HEARTED *a.* अल्पधीर, निर्वीर्य, मनमरू, भित्रा. -LY *ad.* मंद, हलका, बारिक; मंद, मिणमीण; हलका, कळेनकळेसा; धिमासा, मंद, हळू; ग्लानीनें, खिन्नतेनें; भित्रेपणानें. -NESS म्लानि, कळमळ *f*; थंडाई *f*, सुस्ती *f*, मंदपणा; भय *n*, भित्रेपणा.

FAIR* *a.* free from spots निष्कलंक; free from dirt निर्मळ; from imperfection निर्दोष, अव्यंग, निर्दोष; clear साफ, स्वच्छ; beautiful सुंदर, सुरेख (maid, city); free from a dark hue गोरा, उजळ, गौर (skin); cloudless निरभ्र, स्वच्छ, उघाडीचा (day, sky); favorable सोयीचा, अनुकूल (weather); open उघडा, स्पष्ट (view); upright प्रमाणिक, वाजवी, उजू, नीट, रास्त (man, conduct); inspiring hope and confidence भरवशाचा, दिलाशाचा (words); legible स्पष्ट, ठळक (writing); moderate मध्यम, सरासरी, बराच: the news is f. and good; f. play सचोटीचा व्यवहार, रास्तबाजी *f*.—*n.* सुंदर स्त्री. *f*, सुंदरी *f*. -LY *ad.* वाजवी, वाजवी रीतीनें, मार्गानें; स्पष्ट, साफ, निस्तूक: he was f. beaten. -NESS गोरेपणा: f. of skin; उघाडी *f*, निरभ्रता *f*; स्वच्छता *f*, निर्मलता *f*: f. of water; प्रमाणिकपणा, रास्तपणा, सचोटी *f*; ठळकपणा, स्पष्टता *f*; सौंदर्य *n*, लावण्य *n*. -SPOKEN *a.* बोलून गोड -भला, तोंडचा गोड.

FAIR (*feria*, day of rest) a gathering of buyers and sellers, assembled with their merchandise at a stated or regular season मेळा, जत्रेचा -उरसाचा बाजार, बाजार.

FAIRY *F.* enchantment मोहणी *f*, चेटक *n*, an imaginary supernatural being or spirit supposed to assume a human form, either male or female, and to meddle, for good or evil, in the affairs of mankind परी *f*? वनदेवता *f*?, अप्सरा *f*? — *a.* वनदेवतेचा, परीचा; परीनें दिलेला (money).

FAITH (*fides*) assent of the mind to the truth of what is declared by another, resting solely and implicitly on his authority and veracity विश्वास, भरवसा, इतबार; firm and earnest belief, in probable evidence of any kind, esp. in regard to important moral truth विश्वास, खातरी *f*, निश्चय; *Theol.* belief in the historic truthfulness of the Scripture narrative, and the supernatural origin of its teachings, sometimes called *historical* and *speculative* faith शास्त्रश्रद्धा *f*, ख्रिस्ती शास्त्राच्या खरेपणावर विश्वास; belief in the

facts and truth of the Scriptures, with a practical love of them; esp. that confiding and affectionate belief in the person and work of Christ which affects the character and life, and makes a man a true Christian, called a *practical, evangelical,* or *saving* faith तारक विश्वास, भाव,श्रद्धा,प्रेम -भक्तियुक्त विश्वास,निष्ठा *f* (Heb. xi. 6); system of religious belief धर्म,पंथ, मत *n*; loyalty इमानीपणा, इमान *n*; promise given वचन *n*, भाक *f* [in]. -FUL *a.* विश्वासू, भाविक; खरा, इमानी, स्वामिसेवानिष्ठ (friend, servant, husband); वचन -भाक राखणारा, सत्यप्रतिज्ञ,खरा (Deut. vii.9); conformable to truth इत्थंभूत, खरा, सत्य (narrative); worthy of belief विश्वसनीय, विश्वासास योग्य;—a. f. wife पतिव्रता *f*, सती *f*. -LY *ad.* इमानें इतबारें; सत्य राखून; खरेपणानें; यथावृत्त, इत्थंभूत. -NESS इमानदारी *f*, इतबार; खरेपणा, प्रामाणिकपणा;—in a wife पातिव्रत्य *n*;—in a husband एकपत्निव्रत *n*.—FAITHLESS *a.* अविश्वासी, श्रद्धाहीन, बेइमान, खोटा, दगलबाज; —as a subject निमकहराम. -NESS अविश्वास, अश्रद्धा *f*; दगलबाजी *f*, निमकहरामी *f*.

FALCHION, FAULCHION, (*falx*, a sickle) a short crooked sword तेगा.

FALCON (do.) बहिरीससाणा. -ER बहिरीससाणा बाळगून त्यास शिकार करायास शिकविणारा. -RY बहिरीससाण्याची शिकार *f*.

FALL* *v. i.* drop down खालीं पडणें, पडणें, पतन पावणें; cease to be erect आडवा पडणें, पडणें: trees f.; empty into पडणें, मिळणें (a river into a sea); cease to live पडणें, मरणें (Ps. xc. 7); lose strength पडणें, शमणें, हलका होणें: the wind *falls*; be brought forth, said of certain animals उपजणें, जन्मणें, पैदा होणें; decline in weight or value उतरणें; depart from faith and from rectitude पतित -भ्रष्ट होणें (Heb. iv. 11); be entrapped घोटाळ्यांत -फांशांत पडणें: to f. into difficulties;—as the countenance तोंड उतरणें; asleep निजणें, झोंपीजाणें; sick रोगी पडणें -होणें; happen घडणें, येऊन पडणें, बनणें; begin with haste (करीत, मारीत इ०) सुटणें, (करायास, मारायास) लागणें: they *fell* to blows; pass or be transferred by chance, lot, distribution, inheritance, &c. जाणें, मिळणें, वांटयास येणें: the estate *fell* to his brother; be dropped or uttered carelessly सहज तोंडांतून -तोंडावाटे निघणें (an expression); among एकाएकीं -अकस्मात् येणें; away रोड -कृश होणें; झुरणें, गळणें; पतित -भ्रष्ट होणें, फितणें, बंडावणें; विटणें, मजीत होणें (color); back मागें सरणें -हटणें; अंतरणें, चुकणें, कामांत कसर क.; calm शांत -निवांत होणें, शमणें; down नमणें, नमस्कार घालणें; जमिनीवर पडणें -उतरणें; foul हल्ला क., घाला घालणें; from पक्ष -बेत -मसलत सोडणें; फितणें, बंडावणें; in जमणें, मिळणें; मान्य होणें; आंत येणें,मिळणें: to f. into the ranks; —into the clutches of कबजांत -तावडींत सांपडणें; in with गांठ -प्रसंग पडणें, भेटणें; off आंग काढणें, माघरघेणें: friends f. off in adversity; नष्ट होणें, गळणें: words f. off by disuse; सन्मार्ग सोडणें, बिघडणें, बिथरणें, इमान सोडणें; सोडणें: his subscribers *fell* off; पडणें, गळणें (fruits); किंमत -गुण कमी होणें; on बितणें, जुपणें, लागणें; वर उतरणें; out भांडणें, बिघाड पडणें; घडणें, येऊन पडणें; over फितणें, बंडावणें; short अंतरणें, कमी पडणें; to झटणें, लागणें; under खालीं ओढणें, मोडणें; upon तुटून पडणें, अंगावर घसरणें. —*t.* नीच क., उतरणें (the voice); तोडणें, तोडून टाकणें (a tree).—*n.* पडणें *n*, पतन *n*, पात: f. from a horse; death मरण *n*, नाश, क्षय; degradation मानभंग, पदभ्रंश: the f. of Cardinal Wolsey; — as of prices उतार;—of rain वर्षाव, वृष्टि *f*;—of

snow हिमवर्ष; — of the voice उतार, ढाळ, उतरता स्वर; a slope ढाळ, उतार; cascade धबधबा, पाण्याचा धोधाटा; नदीचें समुद्रांत पडणें *n* -मिळणें *n*; the fall of the leaf शरद्; autumn शरद् ऋतु; act of felling कापणें *n*, तोडणें *n*; the first apostacy आमच्या मूळ पूर्वजांचें (आदाम व हावा यांचें) पापांत पडणें *n*, पतन *n*. -EN *a.* पडलेला; पतित, भ्रष्ट; पदच्युत, स्थानभ्रष्ट.

FALLACIOUS *a.* (*fallere*, to deceive) भ्रांतिजनक, खोटसाळ; fitted to deceive ठकविण्याचा, फसविण्याचा. — FALLACY आभास, खोटेपणा; चूक *f*, भ्रांति *f*, भ्रम; *Logic*, मिथ्याभास, हेत्वाभास.— FALLIBLE *a.* चुकायाजोगा, चुकी होण्याजोगा, चूक करण्याजोगा, भ्रमयोग्य (men, opinions, hopes) — FALLIBILITY भ्राम्यता *f*, भ्रांतिधर्म.

FALLOW *a.** (*Skr. palita*) uncultivated पडीत, बिनलागवडीचा (land); pale red प्याजी.—*n.* पड *f*, पडज़मीन *f*.—DEER एक जातीचा हरिण, or माळशिकारी हरण?

FALSE *a.* (*fallere*, to deceive) uttering falsehood खोटें बोलणारा, लबाड, खोटा, अनृतभाषी (witness); perfidious बेइमान (friend, subject); not true बनावट, खोटा, नकली (statement, weight, measure); hypocritical खोटा, ढोंगी, ढोंगाचा, बेगडी, खोटानाटा, वरपंकी (tears, modesty, jewelry, colors); not well founded खोटा, मिथ्या (claim) [to, in]. -HOOD खोटेपणा, लबाडी *f*; कपट *n*; बेइमान *f*; बनावट *f*, नकल *f*.— FALSIFY *v.* खोटा पाडणें -क.; भंजणें, मोडणें (word).—FALSITY खोटेपणा; लबाडी *f*, अनृत *n*.

FALTER *v.* (do.) stammer बोलतांना अडखळणें; tremble कापणें, लटलटणें; fail in distinctness or regularity of exercise कचकणें, घसरणें, कचखाणें [at].

FAME (*fama*) public report आफवा *f*, आवाई *f*, बोलावा *f* (Gen. xlv. 16); renown कीर्ति *f*, ख्याति *f*, नांव *n*. — FAMOUS *a.* प्रख्यात, नामांकित, प्रसिद्ध.

FAMILY (*famulus*, servant) collective body of persons who live in one house, and under one head घर *n*, परिवार; household, including parents, children, and servants कुटुंब *n*, परिवार, घर *n*; tribe वंश, कुळ *n*, घराणें *n*: f. of Abraham; noble stock कुलीन घराणें *n*, खानदानी *f*; — of minerals, plants, &c. वर्ग, जात *f*; head of a f. कुलपति; that has a f. कुटुंबी, कुटुंबवत्सल; f. pride कुलाभिमान; f. tale कुळकट *f*; line of a f. कुलपरंपरा *f*; f. honor कुल मर्यादा *f*; f. priest कुलाचार्य; of good f. कुलीन.—FAMILIAR *a.* घरचा, घरगुती; closely acquainted परिचित, अभ्यस्त, निपुण, वाबकदार: f. with the Scriptures; unceremonious खळबळीत, रहाळसाळ, बोलून चालून भला: be thou f., but by no means vulgar; well known, as a friend माहितीचा, परिचयाचा; well understood, as a book परिचित, माहीत; f. spirit, a demon or evil spirit supposed to attend at a call बोलावल्या बराबर -हाकेसरसें हाजीर होणारें भूत *n* [with].—*n.* खेळीमेळीचा मित्र. -ITY खळबळीतपणा, घळघळीतपणा; सवयी *f*, अभ्यास, परिचय, राबता; खेळीमेळी *f*, रहसाळी *f*, घसटणी *f*, जवळीक *f*; f. breeds contempt नात्याची जसी जवळीक तसी आदराची कोवळीक, अति परिचयात् अवज्ञा. -IZE *v.* वहिवाटींत -राबत्यांत आणणें, घसणी खालीं पाडणें; make easy by practice or study सवयीनें -अभ्यासानें -शिकण्यानें सुलभ क. -LY *ad.* संकोचा वांचून, घळघळीत; स्नेह -सख्यभावानें.

FAMINE (*fames*, hunger) दुकाळ, दुष्काळ, दुर्भिक्ष *n*; a f. the consequence of excessive rain ओला दुकाळ.—FAMISH *v.* उपासी

मारणें; उपासानें शक्तिहीन क.; distress with hunger उपासानें लंघविणें; force by famine उपासानें -उपासी ठेवून प्राप्त क. -भाग पाडणें: he had *famished* Paris into a surrender. —*i.* उपासानें मरणें; उपास -तान्ह सोसणें, उपासमर होणें.

FAN* an instrument used for producing artificial currents of air पंखा, विंझणा;—for winnowing grain सूप *n*;—to raise the fire हडपण *n*.—*v.* पंख्यानें वारा घालणें; पाखडणें, आंसुडणें; हडपणें.

FANATIC (*fanaticus*, from *fanum*, temple) one who indulges wild and extravagant notions of religion धर्मवेडा -खुळा, मजनून. —FANATICISM धर्मवेड *n*.

FANCY (*fantasia*, a making visible) faculty by which the mind forms an image or a representation of any thing perceived before कल्पनाशक्ति *f*; conception कल्पना *f*, तर्क, तरंग; caprice लहर *f*, खोड *f*, छंद; liking formed by caprice rather than reason मन *n*, मर्जी *f*, शौक; object of liking आवडती वस्तु *f*; to indulge the *fancies* of लाड -कोड पुरवणें -चालवणें [for].—*v.* कल्पना -तर्क क.; मर्जीस येणें, आवडणें.—*i.* कल्पना क., तर्क चालवणें. -FUL *a.*—of persons छंदी, छांदिष्ट, लहरी;—of matters मनास येईल तसा, मनःकल्पित. -MONGER मनमौजी, ख्याली.

FANG* tusk of a boar or other animal by which the prey is seized and held दाढ *f*; a long pointed tooth सुळा, सुळादांत; claw पंजा, नखी *f*.

FANTASTIC *a.* (*Gr.* *phantasein*, to make visible) fanciful कल्पित, कल्पनेचा; capricious छांदिष्ट, लहरी, तब्यती.

FAR* *a.* not near दूरचा, लांबचा; remote from purpose दूर, इच्छेविरुद्ध: f. be it from me to justify cruelty; remote in affection दूर (Ps. lxxiii. 27); more or most distant of the two दोहोंतून अधिक दूर; [the f. side of the horse, that is, the right side].—*ad.* दूर लांब; in great part बहुतेक अंशीं, बहुधा; as f. as जेथपर्यंत; how f. कोठेपयत; so f. एथपर्यंत, तेथपर्यंत; by f. फार, अति; f. off दूर; f. spent, to be, as day चढणें (Luke xxiv. 29; Rom. xiii. 12) [from]. -FETCHED ओढून ताणून आणलेला, क्लिष्ट. -SIGHTED दूरदृष्टि, दूरवर पाहणारा; incapable of seeing near objects distinctly ज्याला जवळची वस्तु स्पष्ट दिसत नाहीं तो. -THER *a.* अणखी, अधिक दूर, अधिकतर.—*ad.* पलीकडचा; moreover अणखी.—FARTHEST *ad.* सर्वांहून दूर, दूरतम.

FARCE (*F.*) हसविण्याचा खेळ, प्रहसन *n*, "फार्स."

FARE * *v.* go जाणें, चालणें; be in any state असणें: he *fared* ill or well; be treated or entertained at table जेवणें, खाणें, आहार क., भोजन क.; to be treated with bodily or social comforts ख्यालखुशाली -चैन क. (Luke xvi. 19); happen well or ill वितणें, गुजरणें, होणें [well, ill].—*n.* price of passage भाडें *n*;—over the sea नोर, उतार; food अन्न *n*, जेवण *n*. -WELL *int.* go well स्वस्ति कल्याण असो, क्षेम असो.—*n.* स्वस्तिकल्याणाची इच्छा *f*, स्वस्ति *n*, शेवटचा सलाम -रामराम; leave निरोप, आज्ञा *f*.—*a.* निरोप घेण्याचा, शेवटच्या भेटीचा (address).

FARINA (*L.*) flour पीठ *n*; pollen पराग, पुष्परेणु. -CEOUS *a.* पिठाचा, पिष्टमय (diet); yielding flour पीठ देणारा, पिष्टजनक (seeds); like meal धान्यमय, पिष्टमय (taste).

FARM* piece of ground farmed out धाऱ्यानें -इजाऱ्यानें दिलेली जमीन *f*, शेती *f*, कुणबावा; extended piece of ground, devoted by its owner to agriculture शेत *n*; a lease कौल;—of the revenue, customs खोती *f*, गुत्ता, इजारा.—*v.* धाऱ्यानें -इजाऱ्यानें देणें -लावणें

[to]. -ER शेतकरी, रयत, कुणबी; मक्तेकरी, खोत. -ING शेती f, कृषिकर्म n; खोती f.

FARRAGO (*L.*) भेळमेळ *f*, पंचभेळ *f*, खिचडी *f*.—FARRAGINOUS *a*. पंचभेळीचा, नाना द्रव्यघटित (mountain).

FARRIER (*ferrum*, iron) shoer of horses नालबंद; veterinary surgeon घोड्याचा वैद्य, शालिहोत्री.—FARRIERY नालबंदी *f*; अश्ववैद्यक *n*, शालिहोत्र *n*.

FARTHER, See under FAR.

FARTHING* दोन पईच्या किमतीचें एक नाणें आहे, 'फार्दिंग'; it is not worth a f. तें कवडीचा माल नाहीं.

FASCINATE *v.* (*fascinare*) bewitch मोहणें, भारणें, भूल घालणें; captivate वश क., चित्त हरण क. [by, with].— FASCINATION नजरबंदी *f*, ज्यादू *f*; भूल *f*, मोहन *n*, मोहिनी *f*.

FASHION (*facere*, to make) आकार, घाट, डौल: f. of a house; prevailing mode or style तऱ्हा *f*, मोड, रीत *f*, रवेश *f*; mode of action चाल *f*, प्रथा *f*, परिपाठ;—of a garment बेत, कातरणी *f*.—*v*. घडणें, करणें; बेताप्रमाणें -चालीप्रमाणें क. -ABLE *a*. लोकचालीचा, जनरूढीचा; genteel शिष्ट, सभ्य, संप्रदायाचा (society); observant of the fashion लोकव्यवहारानुसार.

FAST* *a.* firmly fixed ठाम, ठास, घट्ट: to stick f. in the mud; strong बळकट, मजबूत; निबिड, दाट (places); steadfast स्थिर, विश्वासू, इमानी (friend); deep घोर, गाढ, गडद (sleep); swift चपळ, जलद (horse); rash and inconsiderate उतावळा, हूड; —as color पक्का; f. and loose चंचळ, धरसोडीचा.—*ad*. घट्ट, गच्च; जलद, लवकर; f. by जवळ, निकट; to sit f. खेटणें. -EN *v*. गच्च -बळकट बसविणें, बसविणें; secure, as by lock, bolt, &c. कड्या कुलपें लावून बंदोबस्त क.;—as with nails ठोकून बसविणें -जडणें;—with cords बांधणें, जखडणें; cause to take effect लागू क.—*i*. चिकटून -धरून असणें;—as a leech लागणें. -NESS गच्च -घट्टपणा; निर्धार, एकनिष्ठा *f*, निश्चय; गढी *f*, किल्ला, कोट.

FAST* *v*. abstain from food उपास क., उपासी राहणें; practise abstinence as a religious exercise or duty उपास -उपोषण क.; —dietetically लंघन क.—*n*. उपास, निराहार, लंघन *n*; उपोषण *n*, उपवास; to terminate a f. उपास -पारणें सोडणें.

FASTIDIOUS *a*. (*fastus tædium*, loathing for any sort of enjoyment) delicate to a fault मिजाजखोर, चोखंदळा, खंतखोर [in]. -NESS मिजाज *f*, नाजकाई *f*. चोखटपणा.

FAT* *a*. abounding with fat चरबीदार; fleshy मांसल; plump लठ्ठ, पुष्ट, गुबगुबीत; greasy चिकण, चरबीदार; oily तेलकट, स्निग्ध; gross स्थूल, जड; stupid मूर्ख, मंदमति, जड; yielding a rich supply मातबर, धनत्तर (soil); [*Typog*. affording light work, as a page having much blank space]. —*n*. an oily, concrete substance, deposited in the cells of the adipose or cellular membrane, under the skin, and in various other parts of animal bodies चरबी *f*, मांदें *n*; the best part उत्तमांश.—*v*. पुष्ट -लठ्ठ क., माजवणें.—*i*. पुष्ट होणें, माजणें, अंगानें भरणें; मातबर क., खत घालून सुपीक क.: to *fatten* land. -LING कापण्या करितां पोसवलेलें कोंकरूं वगैरे जनावर *n*. -NESS पुष्टपणा, पुष्टि *f*; चरबी *f*, मेद; सुपीकपणा, मातबरी *f*. -TINESS चिकणाई *f*, चिकणपणा. -TEN *v*. पुष्ट क., माजवणें, अंगानें भरवणें इ० [on]. See FAT *v*. -TY *a*. चरबीदार; तेलकट, स्निग्ध.

FATE (*fatum*) decree or word pronounced by God देवाचा ठराव, ईश्वरी नियोग -विधान *n*; destiny supposed to be independent

of a divine origination or control दैव *n*, नसीब *n*; predetermined event दैवयोग, घटित *n*, पूर्व संकल्प; death मरण *n*; final lot शेवट, परिणाम, गत *f*.— FATAL *a*. deadly जीवघेणा, प्राणघातक; calamitous अरिष्टाचा, अनर्थाचा. -ISM, doctrine that all things are subject to fate दैव -अदृष्ट-वाद. -IST दैववादी, दैवचिंतक. -ITY दैवाधीनता *f*; अदृष्ट *n*, दैव *n*.

FATHER* (*pater, Skr. pitri*) male parent बाप, पिता; progenitor कुल पुरुष, पूर्वज; *pl* वडील, पूर्वज *pl*; he who performs the offices of a parent by maintenance, affectionate counsel, protection, or the like पाळक, पोषक, बाप; a distinguished teacher गुरु, बाप; he who is venerated for age, kindness, wisdom, &c. बाबा, बावा, आचार्य, मुरशीद; producer, author, or contriver उत्पादक, जनक, बाप (Gen. iv. 21); the Supreme Being परमेश्वर; *Theol.* the first person in the Trinity ईश्वर त्र्येकत्वांतील पहिला, बाप, पिता (Matth. vi. 9); [a dignitary of the R. C. Church, a superior of a convent, a confessor, or a priest; a dignitary or elder clergyman in the Protestant church, as an archbishop, bishop, or pastor; one of the chief ecclesiastical authorities of the first centuries after Christ]; adoptive f. पोष्णा बाप; natural f. अनौरस बाप; putative f. मानलेला बाप; derived from f. पित्रार्जित; relating to a f. पित्र्य [of, to].—*v*. -चा बाप होणें; beget जन्मदेणें: cowards f. cowards; adopt दत्तक घेणें; assume as one's own work आपलासा ह्मणणें -मान्य क.; — upon कडे लावणें, आरोपणें. -HOOD बापपणा, पितृत्व *n*. -IN-LAW सासरा; [*Obs.* a man who marries a woman having children already is popularly called their f.] -LESS *a*. निबाप्या, पितृहीन (child). -LY *a*. बापासारखा, बापाचा, पितृवत् (care); बापाचा.

FATHOM* a measure of six feet वांव *f*, *n* —used chiefly at sea.—*v*. sound the depth of ठाव-तळ पाहणें; find the bottom of ठिकाण -शोध लागणें. -LESS *a*. अगाध, बेठाव, अतल.

FATIGUE (*fatigare*, to tire) weariness from bodily labor or mental exertion शीण, ग्लानि *f*, श्रम; toil श्रम, कष्ट.—*v*. शिणवणें, भागवणें, दमवणें [with, by].

FATUITY (*fatuitas*) weakness of mind चळ, खूळ *n*, पिसें *n*.—FATUITOUS *a*. खुळा, नष्ट-बुद्धि.

FAULT (See FAIL) defect उणेंपणा, कमताई *f*; a blemish खोड *f*, गोम *f*, व्यंग *n*; moral failing अपराध, दोष; to be at f. कुंठित होणें, चकभूल होणें, थकणें; to find f. with दोष ठपका, देणें; to bring up (against) one's *faults* नालस्ती सांगणें; to expose one's secret *faults* छिद्रें -वर्मे काढणें. -LESS *a*. पूर्ण, पुरता, सांग; बिनखोड, अव्यंग, निर्बाध; निर्दोष, निरपराध.—FAULTY *a*. उणा, कोता, अपूर्ण; ऐबदार, खोडकर; दोषी, अपराधी; सदोष, अशुद्ध.

FAVOR (*favere*, to be favorable) kind regard कृपा *f*, मेहेर *f*, लोभ; support अनुकुलता *f*, सोई *f*, आश्रय; a kind act उपकार, आभार; lenity दया *f*, सौम्यता *f*; a present भेट *f*, नजर *f*: a marriage f.; partiality पक्षपात, तरफदारी *f*; a letter पत्र *n*: your f. of yesterday; token of f. प्रसाद; by one's f. -च्या परवानगीनें.—*v*. कृपा क.; कृपादृष्टीनें पाहणें; aid आश्रय -हिमाईत देणें; afford advantages for success सोयीवार पडणें, अनुकूळ होणें. -ABLE *a*. उपकारी, सुप्रसन्न, अनुकूळ; conducive उपयोगी, उपयुक्त; सोयीचा, सोईवार. -ED आभारी, अनुग्रहीत. -ITE *a*. & *n*. आवडता, लाडका, प्रिय.

FAWN (*F*.) हरणाचें पिलूं *n*, पाडस *n*.

FAWN* *v.* court favor by low cringing आर्जव करून मर्जी संपादणें; flatter meanly हाजी हाजी क., थुंकी झेलणें, जीजी क. [on]. -ER आर्जवी, थुंकी झेलणारा, तोंडपुज्या.

FEALTY (*fides*, faith) राजनिष्ठा *f*, निमकहलाली *f*, प्रजाधर्म.

FEAR* a painful emotion or passion excited by an expectation of evil, or the apprehension of impending danger भय *n*, भीति *f*; dread दहशत *f*, धास्ती *f*; terror जरब *f*, धाक; *Scrip.* apprehension of incurring, or solicitude to avoid, God's wrath ईश्वरी क्रोधाचें भय *n*; trembling and awful reverence felt toward the Supreme Being ईश्वरभीति *f*, सद्भीति *f*; respectful reverence for men of authority or worth मान, अदब *f*; source of terror भय *n*, भयहेतु [of].—*v.* भिणें, भय धरणें; जरब -धाक असणें -बाळगणें.—*i.* भय वाटणें; चिंता -काळजी वाहणें -लागणें. -FUL *a.* भयभीत, भ्यालेला, आशंकित; timid भित्रा, भ्याड, भेकड; indicating fear भयसूचक -दर्शक; frightful भयंकर, भ्यासूर. -LESS *a.* निर्भय, बेपरवा, निश्शंक; bold धीट, शूर. -LY *ad.* बेधडक, बेलाशक; निर्भय, बिनघोर.

FEASIBLE *a.* (*facere*, to do) करण्याजोगा, व्हायाजोगा, साध्य.—FEASIBILITY संभावना *f*, घटनीयता *f*, साध्यता *f*.

FEAST (*festum*) a festival सण, उत्सव; a festive meal मेजवानी *f*, सण.—*v. i.* मेजवानीचें जेवण जेवणें, धमंडी -दिवाळी क.; be highly gratified धन पुरविणें, संतोष पावणें.—*t.* मेजवानी क.; हौस पुरविणें: to f. the eyes डोळ्याचें पारणें फेडणें [on].

FEAT (*facere*, to do) काम *n*, कृत्य *n*; striking act of strength, skill, or cunning पराक्रम, कसरत *f*, कसब *n*, इ०.

FEATHER* a plume पीस *n*, पर *n*; kind जात *f*;—of an arrow परगिरी *f*; to get a f. in one's cap तुरा लावणें; birds of a f. एका माळेचे मणी *pl*; to show the white f. भित्रेपणाच्या खुणा दाखविणें, पायांत शेपूट घालणें.—*v.* पंखांनीं सुशोभित क., पंखें लावणें; to f. one's nest आपल्या पानावर पोळी ओढणें, आपलें घर भरणें.

FEATURE (*facere*, to make) appearance of a person आकार, डौल; good appearance सुरूप *n*; appearance of the human face रूप *f*, चेहरा, तोंडवळा; any marked peculiarity रूप *n*, लक्षण *n*.

FEBRILE *a.* (*febris*, fever) ज्वराचा, तापाचा, ज्वरसूचक.—FEBRIFUGE तापाचें औषध *n*.—*a.* तापावरचा, ज्वरहारक.

FEBRUARY (*februare*, to purify) इंग्रजी वर्षाचा दुसरा महिना, माघ-फाल्गुन.

FECES (*fæx*) मळ, गू, विष्टा *f*.—FECULENCE गढूळपणा; sediment गाळ, रेंदा, मळ.—FECULENT *a.* गढूळ, रेंदाळ, मलीन.

FECUND *a.* (*feo*, to fructify) बहुप्रसव, प्रसवशील. -ITY साफल्य *n*, फलदातृत्व *n*; power in female animals of producing young in great numbers प्रजाजनकत्व *n*.

FEDERAL *a.* (*fœdus*, league) कराराचा, संकेताचा; composed of states or districts which retain only a subordinate and limited sovereignty जुटीच्या संस्थानांचा, संयुक्त संस्थानांचा.

FEE* property मालमत्ता *f*, जिंदगी *f*; reward for services दस्तुरी *f*, 'फी' *f*, हक्क; a visiting physician's f. पायफोडणी *f*; copyhold पट्टा.

FEEBLE *a.* *F.* deficient in physical strength अशक्त, निर्बल, नबला; wanting force निर्बल, लिचापिचा;—as voice बारीक; not bright मंद, अंधक. -MINDED *a.* कोवळ्या -हलक्या बुद्धीचा; irresolute चंचळ, अस्थिर.

FEED* *v.* give food to खायाला देणें -घालणें, अन्न देणें; supply पुरवणें; satisfy तृप्त क.,

-ची धण -हौस पुरवणें: to f. the eye with the beauties of scenery; graze चारणें, चारा घालणें; as fuel सरपण घालणें; to f. with hopes आशा लावणें.—*i.* खाणें; गुजराण -उदरनिर्वाह क. [on, upon]; गुरें चारणीस घालणें.—*n.* चारा; pasture-ground कुरण *n;* certain portion of provender given to a horse, cow, &c. चंदी *f;* [water supplied to steam-boilers]. -ER अन्न देणारा -पुरविणारा; खाणारा, गुजराण करणारा; one who fattens cattle for slaughter कापण्यासाठीं गुरें पुष्ट -तयार करणारा; a fountain, stream, or channel that supplies a main canal with water नळ, कालवा इ०-कांस पाण्याचा पुरवठा करणारा झरा, ओहळ इ०; a branch railroad or a side line which increases the business of the main line आगगाडीच्या रस्त्याची शाखा *f.*

FEEL* *v.* perceive by the touch स्पर्शज्ञान पावणें, चांसपून पाहणें, स्पर्शणें, स्पर्श क.; touch स्पर्श क., शिवणें; have the sense of -चा समज -बोध होणें -असणें; be conscious of मनांत समजणें, अनुभव होणें, वाटणें, लागणें; after शोधणें, चांपसणें; of चांपसून पाहणें. —*i.* स्पर्शज्ञान होणें; have the sensibilities moved चित्त द्रवणें, कळवळा येणें, पान्हा फुटणें; to f. for others दुसऱ्याचें दरद जाणणें; वाटणें, लागणें: to f. grieved; appear to the touch -स लागणें: blind men say black *feels* rough; to f. sore वरमणें;—well बरें वाटणें;—pleasant भावणें [with, for]. -ER— of an insect किड्याची मिशी *f* -चें शिंग *n.* -ING, sense of touch स्पर्शेंद्रिय *n;* perception स्पर्शज्ञान *n,* बोध, समज; capacity of soul for emotional states करुणा *f,* दया *f,* कळवळा: a man of f.; any mental state चित्तवृत्ति *f,* मनोधर्म: a wrong f.—*p. a.* दयालु, करुणार्द्र (heart); कळवळा -करुणा आणायाजोगा, करुणारसभरित, करुणात्मक (eloquence).

FEIGN *v.* (*fingere*) contrive रचणें, योजणें, कल्पणें; pretend ढोंग -सोंग -मीस क. -ED मनःकल्पित, रचलेला, कृत्रिम; सोंगाचा, ढोंगाचा, कपटी.—FEINT ढोंग *n,* सोंग *n;* mock attack चमक *f,* हूल *f,* पेच.

FELICITATE *v.* (*felix,* happy) सुखी -आनंदी क.; express joy आनंद दर्शविणें, अभिवंदन क. —FELICITY, enjoyment of good सुखानुभव; blissfulness परम सुख *n,* आनंद; prosperity उत्कर्ष, भरभराट.—FELICITOUS *a.* सुखी; skilful चतुर; appropriate योग्य, उचित (words).

FELINE *a.* (*felis,* cat) मांजराचा, किंवा मांजरांचा (race).

FELL *a.* * क्रूर, निर्दय, घातकी.—*n.* कातडें *n;* wool f.—*v.* cause to fall पाडणें, जमीनदोस्त क., चीत क.; hem तुरपणें [with].

FELLOE, FELLY * outward part or rim of a wheel पावटा.

FELLOW* one who follows मागून जाणारा, अनुयायी; companion सोबती, संगती; a sharer साथी, पातीदार; ignoble or mean man लुच्चा, पाजी, अधम, गाढव, बैल: worth makes the man, and want of it the f.; an equal बरोबरीचा, भाऊ, तोड *f* (Zech. xiii. 7); one of a pair जोडा, जोडीचा, जोडींतला एक; a person माणूस, जण, मनुष्य;—familiarly गडी, भाई; [one of the associates in an English college, admitted to share in its revenues; a member of a literary or scientific society]; in comp. एक, सम, सह, स; f. -student सहाध्यायी; f.-countryman एकदेशस्थ; a fine f. गाजी, मर्द. -SHIP सोबत *f,* संगत *f,* सहवास; भागी *f,* साथी *f; Arith.* सर्कत *f,* वांटणी *f;* single f. एकेरी स० *f;* double f. दुहेरी स० *f; Eng. Univ.* फेलोची जागा *f* -वृत्ति *f.*

FELON (*felo*) *Law,* आततायी,साहसी; a person guilty or capable of heinous crime महा-

पातकी; *Med.* whitlow नखुरडें *n.*—FELONY, an offense which occasions a total forfeiture of either lands or goods, or both, at the common law, and to which capital or other punishment may be added, according to the degree of guilt घोर साहस *n*, आततताईपणा; a heinous crime महापातक *n*.

FELT * जेन, बुरणूस, नमदा; [a hat made of wool].

FEMALE (*femina*, woman) an individual of the sex among animals which conceives and brings forth young स्त्रीजात*f*, बायको माणूस *n*;—of animals or plants मादी *f*.—*a*. बायकोचे जातीचा, स्त्रैण; स्त्रीचा, स्त्रीजातीय.—FEMININE *a*. स्त्रीचा; womanish बायक्या, नामर्द; graceful साजरा, गोजिरवाणा; modest सलज्ज, मर्यादशील; affectionate ममताळु; *Gram*. स्त्रीलिंग.

FEMORAL *a*. (*femur*, thigh) मांडीचा, उरुसंबंधी.

FEN* पाणथळ *n*, दलदल*f*.

FENCE (See DEFENCE) रक्षण *n*, त्राण *n*; enclosure about a field कुंपण *n*, वई *f*; fencing दांडपट्टा; [a receiver of stolen goods, or a place where they are received].—*v*. रक्षण -बचाव क.; कुंपण घालून राखणें, कुडणें.—*i*. कुंपण घालणें; [defend one's self by the use of the sword].—FENCER नेचा, नेचरी*f*; कूड -वई घालणारा; दांडपट्टा शिकविणारा किंवा खेळणारा.—FENCING दांडपट्टयाचा खेळ; a system of fencing कुंपण घालण्याची रीत*f* -ची पद्धत*f*.

FENNEL* बडीशोप*f*, वरियाळी*f*.

FENUGREEK (*fœnum græcum*, Greek hay) मेथी*f*.

FERMENT *v. i*. (*fervere*) उमळणें, खतखतणें. -ATION उमाळा, खतखत*f*.

FEROCIOUS *a*. (*ferus*, wild) क्रूर, उग्र, हिंस्र. -NESS क्रूरपणा, उग्रपणा, क्रौर्य *n*.

FERREOUS *a*. (*ferrum*, iron) लोखंडाचा, लोहमय.—FERRULE मांडळ *f*, विडी *f*, वसू *n*.

FERRY* *v*.. तरीपार उतरणें -नेणें [over].—*i*. तरीपार जाणें.—*n*.—the boat तर*f*; — the place तर *f*. -BOAT तर *f*. -MAN तान्या, उतान्या.

FERTILE *a*. (*ferre*, to bear) पिकाऊ, सुपीक; inventive कल्पक, करामती (mind); capable of producing fruit फळ देणारा (flowers) [in]. — FERTILITY पिकाऊपणा, सुपीकपणा, मातबरी *f*; प्रचुर कल्पना *f*, युक्तिबाहुल्य *n*.—FERTILIZE *v*. सुपीक क.

FERULE (*ferula*) a flat piece of wood, used for striking children in punishment चापटी*f*.

FERVENT *a*. (*fervere*, to boil) उष्ण, गरम, उकळता, कडकडीत; warm in feeling उत्साही, आवेशी, हौसदार.—FERVENCY उत्साह, आवेश, अनुराग.— FERVID *a*. उष्ण, कढत, संतप्त; उत्साही, हौसदार, उमेदवार.—FERVOR उष्णता*f*; ardor उत्कंठा*f*, हौस*f*.

FESTAL, FESTIVE *a*. (See FEAST) सणाचा, उत्साहाचा, सोहळ्याचा.—FESTIVAL *a*. सणासंबंधी.—*n*. सण, सणाचा दिवस.—FESTIVITY आनंद, उत्साह, सण, पर्वणी*f*.

FESTER* *v.i.* grow virulent चिडणें, चरणें (a wound); become malignant and invincible दुष्ट आणि अनिवार होणें (passions).—*t*. सलणें, खुपणें.—*n*. चरता व वाहता व्रण -पुटकुळी*f*.

FETCH* *v*. go and bring जाऊन आणणें, आणणें; obtain as price किंमत येणें, उभें राहणें, मिळणें; reach पोंचणें [from].—*n*. डाव, पेच.

FETID *a*. (*fœtere*, to stink) वासट, उबट, घाणेरा.

FETLOCK (*feet* and *lock*) नेवराचे केश *pl*, अथवा त्यांची जागा*f*.

FETTER* a shackle पायाची बिडी *f*, बेडी *f*; chain सांखळी *f*, शृंखला *f*; a restraint अटकाव, खोडा, अवरोध.—*v.* बेडी घालणें; अटकाव क., गति कुंठविणें [with, by].

FETUS (*L.*) गर्भाशयांतील प्राणी, भ्रूण *n*.

FEUD* a combination of kindred to revenge injuries or affronts, done or offered to any of their blood, on the offender and all his race सूड उगविण्या करितां एक झालेल्या कुटुंबांची, किंवा गोतांची जूट *f*; inveterate strife between families, clans, or parties in a state कुटुंबा कुटुंबांचा-गोता गोतांचा कलह; a deadly quarrel मोठें भांडण *n*, तट, खानाजंगी *f* [with, between]; (see FEE) stipendiary estate in land, held of a superior, by service जहागीर, मोकासा. -AL *a.* जहागिरीचा.

FEVER (*febris*) a diseased state of the system, marked by increased heat, acceleration of the pulse, and a general derangement of the functions ताप, ज्वर; unnatural or excessive excitement of the passions in consequence of strong emotion चित्तक्षोभ, मनस्ताप; low f. जीर्णज्वर; putrid f. वेडामधुरा; quartan f. त्र्याहिक ज्वर, तिजारें *n*; quintan f. चातुर्थिक ज्वर; quotidian f. ऐकाहिक; tertian f. द्व्याहिक, दुजारें *n*;—with ague हिंवताप; inflammatory f. तप्तज्वर; intermittent f. अंतऱ्याताप; remittent विषमज्वर; typhus f. सन्निपातज्वर. *Hindu Med. Superst.*—by incantation अभिचारज्वर. -ISH *a.* तापानें आंग मोडून आलेला, ज्वरोन्मुख; to feel f. कणकणणें; fickle चंचल; hot उष्ण, तप्त. -NESS कणकणी *f*.

FEW* *a.* थोडा, कांहीं, अल्प. -NESS थोडेपणा, अल्पता *f*.

FIAT (*L.*) आज्ञा *f*, हुकूम.

FIB (See FABLE) लबाडी *f*.

FIBRE (*fibra*) तंतु, तांतू;—of a leaf, wood, &c. शीर *f*, हीर;—of a root पाळ, पागोरा.—FIBROUS *a.* तांतूचा, तंतुमय.

FIBULA (*L.*) outer and smaller bone of the leg बहिर्जंघास्थि; *Surg.* needle for sewing up wounds जखम शिवण्याची सुई *f*.

FICKLE * *a.* चंचळ मनाचा, चंचलबुद्धि. -NESS चांचल्य *n*, चंचल बुद्धि *f*.

FICO (*ficus*, fig) to give the—टुकटुकाविणें.

FICTION (*fingere*, to invent) कल्पिणें *n*, रचना *f*; that which is feigned कल्पित गोष्ट *f*, कादंबरी *f*; a story feigned to deceive थोतांड *n*, तरकट *n*.—FICTITIOUS *a.* कल्पित, रचलेला; कृत्रिम, बनावट, कपटाचा.

FICUS (*L.*) f. carica अंजिराचें झाड *n*; f. scabriuscula बोखाडा, काळाउंबर; f. benjamina नांदरूख *f*; f. indica वड; f. religiosa पिंपळ.

FIDDLE * सारंगी *f*;—of one string किनरी *f*.—*v. i.* सारंगी वाजवणें.—*t.* सारंगीवर गाणें. -FADDLE उकळाउकळ *f*, उचलाउचल *f*, रिकामा -लांडा कारभार. -STICK सारंगीचा गज -ची कमान *f*. -STRING सारंगीची तार *f*.—FIDDLER सारंग्या, किनऱ्या.

FIDELITY (*fides*, faith) विश्वासूपणा; loyalty राजनिष्ठा *f*, स्वामिभक्ति *f*; honesty इमान, प्रामाणिकपणा; adherence to right सत्यानुयाय; adherence to one's promise एकवचन *n*, स्ववचननिष्ठा *f*.

FIDGET *v. i. D.* चळवळणें, चुळबुळणें, मुंगळा लागणें.—FIDGETY *a.* चुळचुळ्या, तिरतिऱ्या, चंचळ.

FIE *int.* छत्, छी, छु; f.! f.! छीछि, शिवशिव,

FIEF *F.* जहागीर, मोकासा.

FIELD * felled ground वावर *n*, वाडी *f*; cultivated ground शेत *n*; a cleared space where a battle is fought रणभूमि *f*, रणांगण *n*; a battle रण *n*, युद्ध *n*; an open space of any kind मैदान *n*, पटांगण *n*,

क्षेत्र *n*; favorable opportunity for action, operation, or achievement संधि, वेळ *f*, प्रसंग. -BED सफरीपलंग. -BOOK, a book used in surveying जंगली खरडा. -MARSHAL मुख्य सेनापति. -PIECE स्वारीची लहान-सफरी तोफ *f*. -PREACHER मैदानांत उभा राहून उपदेश करणारा. -SPORT शिकार वगैरे वनक्रीडा *f*, मृगया *f*.

FIEND * भूत *n*, पिशाच *n*. -ISH *a*. भुतासारखा, पैशाच; malignant अतिदुष्ट.

FIERCE *a*. (*ferus*, wild) प्रचंड, दारूण (winds); savage क्रूर, उग्र (beasts); vehement in anger कडक्र, जालीम, प्रखर. -NESS उग्र-जालीम स्वभाव; जलाली *f*, प्रखरता *f*, तलखी *f*.

FIERY *a*. (See FIRE) अग्नीचा, अग्निमय; vehement तापट, तलख, जाज्वल; passionate रागीट, तापट; fierce क्रूर, उग्र.

FIFE * (*pipa*, pipe) पोंवा, मुरळी *f*, वेणु.

FIFTH, See under FIVE.

FIG (*ficus*)—the tree अंजिराचें झाड *n*;—the fruit अंजीर *n*; array थाट; dress पोशाक; Indian f. वड, वट; holy f. पिंपळ.

FIGHT* *v. i.* contend for victory, in battle or in single combat लढणें, झुंजणें [with, against]; make resistance अडथळा-विरोध क.—*t.* लढाई क., युद्ध -लढाई चालविणें, लढाईत गुंतणें; -शीं भिडणें -भांडणें: he *fought* the enemy.—*n.* लढाई *f*, युद्ध *n*; भांडण *n*, झगडा. -ING *p. a.* लढाऊ, लढाईच्या कामाचा, युद्धोपयोगी.

FIGMENT (*fingere*, to form) कल्पना *f*, कल्पित गोष्ट *f*.

FIGURE *n*. (do.) form आकार, आकृति *f*; appearance रूप *n*, मुद्रा *f*; imaginary phantom आभास, छाया *f*, भूत *n*; representation of the human body मनुष्याचा पुतळा, प्रतिमा *f*; drawing चित्र *n*, नकाशा; ornamental shape नकशी *f*, वेलबुटी *f*, बूट; distinguished appearance रंग, नकाशा, शोभा *f*; impression made by the career of a person छाप *f*; digit अंक, अंकडा; value, as expressed in numbers किंमत *f*, अंकडा; type दर्शक चिन्ह *n*, प्रतिरूप *n* (Rom. v. 14); *Rhet.* वाक्यालंकार, शब्दालंकार; to cut a f. छान मारणें, नकशा क., विराजणें.—*v.* आकार क., पुतळा बनावणें; चित्र काढणें, रेखणें; अंकानें दर्शविणें; calculate हिशेब क.; प्रतिरूपानें -लक्षणानें सांगणें -दर्शविणें; imagine in the mind कल्पिणें, मनांत धारणें; prefigure पूर्वी सुचविणें; वेलबुटी काढणें, अलंकृत क.; out मोजून एकंदर जमा पाहणें; up मिळवणें, बेरीज क.—*i.* छान -फड मारणें.— FIGURED *a*. बुट्टीदार, नकशीदार.—FIGURATIVE *a*. लाक्षणिक, सादृशावरून घेतलेला; not literal लाक्षणिक, औपचारिक, अलंकारयुक्त (description); representative दर्शक, प्रतिमेवरून दाखविणारा.

FILACEOUS *a*. (*filum*, thread) तंतुमय, सूत्रमय.—FILAMENT तांतू, सूत्र *n*, केसर.

FILCH* *v*. चोरणें, नागवणें [from]. -ER चोर, भामट्या.

FILE (*filum*, thread) row रांग *f*, कतार *f*, माळका *f*;— of soldiers रांग *f*; collection of papers, arranged for preservation and ready reference तबलक *f*, 'फैल' *n*; the wire by which papers are put and kept in order कागदपत्र ओवून ठेवण्याची तार *f* -दोरी *f*, तबलक *f*; a roll पट, यादी *f*, फेरिस्त *n*; [rank and f., the body of private soldiers composing an army].—*v.* रचणें, जुळणें; तबकींत -फैलांत -घालणें -ठेवणें; bring before a court or legislative body by presenting proper papers in a regular way कोर्तापुढें किंवा कायदे करणारे मंडळी पुढें रीती प्रमाणें कागदपत्र -खटला आणणें, फिर्याद क.; *Law*, फैलावर चढवणें, कोर्ताच्या

दप्तरांत (अर्जी, खटला वगैरेंची) मीसि -नंबर वगैरे मांडणें. — *i.* रांगेनें चालवणें, एकामागून एक चालवणें [off].

FILE* कानस *f, m.*—*v.* कानसीनें घांसणें -घांसून साफ क., कानसणें; smooth साफ -गुळगुळीत क. [down, away].—FILING कीस, चुरा.

FILIAL *a.* (*filius,* son, *filia,* daughter) पुत्राचा; पुत्रधर्मक; कन्येचा; पुत्रिकाधर्मक; f. affection पितृभक्ति *f*; f. duty पुत्रधर्म.

FILL* *v.* make full भरणें (John ii. 7); supply abundantly भरती -भरणा क., पुरवणें; cause to abound वृद्धिंगत क., भरणें (Gen. i. 22); satisfy तृप्त क. (Matth. xv. 33); glut टेर क., कंठापर्यंत खायाला घालणें, मिठी बसवणें: sweet things are *filling*;—an office जागा भरणें, अधिकार -काम चालवणें; in भरणें, ओतणें; out पाहिजे तेवढें भरणें; up व्यापणें, भरणें, अटपणें; बुजवणें, भरणें [with, from].—*i.* भरणें; तृप्त होणें; fill a cup for drinking पिण्याकरितां प्याला भरणें; give to drink प्यायाला देणें; up भरणें, बुजणें.—*n.* भरती *f*, भर *f*.

FILLET (*filum,* thread) a band for the hair पट्टी *f*; fleshy part of the thigh जांघेचा मांसल भाग; loins of a horse घोड्याची कमर *f*.

FILLIP *W.* टिचकी *f*, टचकी *f*.—*v.* टिचकी मारणें.

FILLY *W.* a young mare शिंगी *f*; a romp घोडी *f*, धांगडधिंगी *f*.

FILM* a thin skin तवंग, सारा, कोशेरा;—over the eye पटल, पडदा, सारा; a dusky f. over the eye कवडा; slender thread फुसका दोरा -धागा, सूक्ष्मतंतु, कोळ्याचें सूत *n*.

FILTER *F.* strainer गाळणें *n*;—for water गळती *f*;—of cloth शोधणें *n*.—*v.* गाळणें, निथळणें [through].—*i.* गळणें, निथळणें, पाझरणें.—FILTRATION गाळणी *f*.

FILTH* dirt घाण *f*, मळ, हेंदर; corruption भ्रष्टता *f*, कुत्सितपणा.—FILTHY *a.* हेंदरा, घाणेरडा; ओंगळ, कुत्सित. —FILTHINESS हेंदरेपणा, मलीनता *f*, अशुद्धता *f*.

FIN* माशाचा पर -चें पंख *n*. -NY *a.* सपक्ष.

FINAL *a.* See under FINE.

FINANCE (*finis,* end) income of a ruler or state राज्याचा वसूल, वसूल, जमा *f*.—FINANCIAL *a.* वसूलजमा प्रकरणीचा, महसुली, नगदी.

FIND* *v.* meet with, or light upon accidentally अकस्मात् गांठपडणें, अढळणें, भेटणें; experience अनभव -दाखला येणें, समजणें: the torrid zone is now *found* habitable; feel वाटणें; discover by sounding ठिकाण -थांग लावणें (bottom); come upon by seeking सांपडणें, मिळणें (Matth. vii. 7); provide for पुरवणें, साहित्य -पुरावा क.: he *finds* his son in money; determine, as true ठरवणें, निर्णय क. (a verdict); out शोधून -धुंडून -तलाश करून काढणें; उमगणें, शोध लागणें;—fault with दोष -बोल लावणें;—one's self असणें, होणें: how do you f. yourself this morning? [from, by, among].—*i.* *Law* कोर्तास अभिप्राय कळविणें: the jury f. for the plaintiff. -ING शोध; *pl* सामान *n*, साहित्य *n* (जसें चांभाराचीं हातेरें, सूत, मेण इ०); ज्युरीचा अभिप्राय.

FINE *a.* (*finitus,* finished) excellent चांगला, उत्तम, नामी, फर्मासी, खासा, शेलका; showy शोभिवंत, छानदार, ढबदार (writing); not coarse बारीक, सूक्ष्म (thread); thin पातळ, बारीक (edge); made of fine materials बारीक, तलम, नाजूक (silk); artful हिकमती, कावेबाज; [f. arts, originally, poetry, music, &c.; of late, painting, sculpture, engraving, and architecture].

—*v.* शुद्ध क., गाळणें (wine, gold). -NESS बारकाई *f*, सफाई *f*; नाजकाई *f*, सूक्ष्मता *f*; टुम *f*, झळक *f*, भडक *f*; सुंदरपणा.—FINER गाळणारा.—FINERY छानदारीचा पोशाक.—FINICAL *a.* ठाकठिक्या, चापचोप्या; ठाकठिकीचा, चापचोपीचा (dress).

FINE (*finis*, end) दंड, गुन्हेगारी *f*, धनदंड. —*v.* दंड क., गुन्हेगारी घेणें.—FINABLE *a.* दंड घ्याया -करायाजोगा, दंडनीय.—FINAL *a.* शेवटचा, शेवटील, अंत्य, निदानीचा (hope); conclusive निश्चयाचा, निर्णायक; respecting the end or object to be gained हेतुविषयक; [f. cause is that for the sake of which any thing is done].—FINISH *v.* arrive at the end of शेवटास पोंचणें; bring to an end शेवटास -तडीस नेणें; complete पुरा -पूर्ण क.; polish ओजवणें, संस्कृत क. [with].—*n.* ओज *f*, सफाई *f*, झिलई *f*. -ED ओजवलेला, संस्कृत, परिष्कृत, सफाईदार; पूर्ण, निष्पन्न, संपन्न.—FINITE *a.* समर्याद, सावधिक.

FINGER* one of the five terminating members of the hand बोट *n*, अंगुली *f*; one of the extremities of the hand, not including the thumb बोट *n*; breadth of a finger अंगुष्टमान *n*, बोट *n*; skill in the use of the fingers हस्तचापल्य *n* -कौशल्य *n*; little f. करंगळी *f*; ring-f. अनामिका *f*; middle f. मधलें बोट *n*, मध्यमा *f*; fore-f. तर्जनी *f*.—*v.* बोटांनीं स्पर्श क. -धरणें; बोटांनीं खेळणें, वाजवणें, काम क. इ०; touch lightly हळूच स्पर्श क.; pilfer चोरणें. -ED *a.* बोटांचा, सांगुल, बोट्या; *Bot.* बोटां सारख्या पानांचा; light-f. चोरटा, उचल्या.

FIR* देवदार.

FIRE* evolution of light and heat in the combustion of bodies विस्तव, अग्नि; fuel in a state of combustion आगटी *f*, शेकटी *f*; the burning of a house or town घर किंवा गांव जळणें *n*, आग *f*; conflagration आगीचा डोंब, मोठी आग *f*; ardor of passion आग *f*, तलखी *f*, जहाली *f*; intellectual and moral enthusiasm उत्साह, हौस *f*; splendor तेज *n*, प्रभा *f*; torture by burning अग्नियातना *f*; affliction दुःख *n*, क्लेश; discharge of fire-arms गोळीमार, आग *f*;—on f. जळत; to set on f. पेटविणें, आग लावणें; to add fuel to the f. आगीवर तेल ओतणें.—*v.* आग लावणें; पेटवणें; चेतविणें, खिजविणें, संतापवणें; animate चेव आणणें, उठावणी क.; बारसोडणें; cauterize डागणें, लासणें [with].—*i.* पेटणें, चेतणें; संतापणें, कोपणें, रागास पेटणें; बारसोडणें. -ALARM आग लागल्याची सूचना *f*, आगीची हूल *f*. -ARM पिस्तुल, बंदूक, तोफ वगैरे अग्न्यस्त्र *n*. -BALL, a ball filled with powder or other combustibles, intended to be thrown among enemies, and to injure by explosion अग्निगोलक; a luminous meteor, resembling a ball of fire passing rapidly through the air, and sometimes exploding अग्निगोल. -BRAND, piece of wood kindled कोलीत *n*, कोलती *f*; an incendiary आगलाव्या; one who inflames factions कळलाव्या. -COMPANY आग विझविण्याऱ्या व्यापाऱ्यांची कंपनी -मंडळी *f*. -CRACKER फटाकडा. -ENGINE आग विझविण्याचें यंत्र *n*, बंब. -FLY काजवा.—INSURANCE आगीचा विमा. -LOCK चापाची बंदूक *f*. -MAN आग विझविणारा; a man who tends the fires, as of a steam-engine वाफेच्या यंत्राची आग राखणारा. -NEW *a.* fresh from the forge घणकोरा; bright चकचकीत, उजळ.—OFFICE आगीचा विमा उतरण्याचें -घेण्याचें हपीस *n*. -PLACE चूल *f*. -SIDE चुलीजवळची जागा *f*; domestic life संसार, गृहस्थिति *f*. -WOOD जळण *n*, सरपण *n*. -WORK दारूकाम *n* -सामान *n*. -WORSHIP अग्निपूजा *f* -उपासना *f*.

FIRM *a.* (*firmus*) hard कठीण, घट्ट; fixed गच्च बसलेला, अढळ; steady स्थिर, निग्रही; solid खंबीर, कठीण, कणखर (land);—of edifices खंबीर, भक्कम.—*n.* दुकान *n*, पेढी *f*, सावकारांची पेढी *f*. -NESS कठीणपणा; निग्रह, निर्धार, दम; बळकटी *f*, मजबुती *f*.—FIRMAMENT मेघमंडळ *n*, आभाळ *n*, आकाश *n*.

FIRMAN (*Pers.*) (*Skr. pramana*) राजाज्ञा *f*, 'फर्मान.'

FIRST *a.**preceding all others of a series or kind पहिला, प्रथम; ordinal of one पहिला, प्रथम; most forward सर्वांपुढचा, पुढचा, अगोदरचा; most eminent सर्वांहून श्रेष्ठ, मुख्य, परमश्रेष्ठ; at or for the f. time पहिल्यानें; from the f. to the last आद्यंत; f. and last पूर्वापर; f. half पूर्वार्द्ध.—*ad.* पहिल्यानें, अगोदर, प्रथम; at f. पूर्वी, पहिल्यानें; f. of all सर्वांचे अगोदर; आरंभीं; from f. to last अवली पासून अखेर पर्यंत, साद्यंत; from the f. मुळापासून. -BORN *a.* प्रथम जन्मलेला, ज्येष्ठ. -CLASS *a.* अव्वल प्रतीचा, पहिल्या वर्गाचा, अस्सल.—DAY अठवड्याचा पहिला दिवस, रविवार. -FRUIT प्रथमफळ *n*, नवाळी *f*, नवीनवाळ *f*; [usually in the *pl*]. -LING पहिलें वेत *n*. -LY *ad.* पहिल्यानें, प्रथम. -RATE *a.* अव्वल प्रतीचा उत्कृष्ट; मोठ्या आकृतीचा, सर्वांहून मोठा.

FIRTH, See FRITH.

FISC (*fiscus*, basket, imperial treasury) सरकारचा खजीना. -AL *a.* जामदारखान्याचा; वसुलाचा, नगदी, वसुली.—*n.* जामदार, खजीनदार.

FISH * an animal that lives in water जलवासी प्राणी; *Zool.* मासा, मत्स्य; [the flesh of fish, used as food].—*v. i.* मासे धरणें, मासे धरण्याचा धंदा क.; seek to obtain by artifice युक्तीनें मिळविण्याचा यत्न क.—*t.* catch धरणें; draw out or up बाहेर किंवा वर ओढणें: to f. an anchor. -ER मासे धरणारा, कोळी, भोई. -ERY—the business मासे धरण्याचा धंदा;—the place मासे धरण्याची जागा *f*. -FAG मासे विकणारिण *f*, कोळीण *f*. -ING *a.* मासे धरण्याचे कामाचा, मच्छिमारू (boat). -ERMAN मासे धरणारा, कोळी;—a caste of f. भोई, धिवर. -MONGER मासेविक्या; माशांचा व्यापारी. -WIFE, WOMAN मासे विकणारिण *f*, कोळीण *f*. —FISHY *a.* माशांचा; माशा सारखा.

FISSURE (*findere*, to divide) चीर *f*, फूट *f*, भेग *f*, तडा.

FIST * मूठ *f*, मुष्टि *f*.—FISTICUFFS मुष्टामुष्टि *f*, बुकाबुकी *f*, मुष्टियुद्ध *n*.

FISTULA (*L.*) भगंदर *n*, नाडीव्रण;—lachrymalis नासूर.

FIT *a. D.* adapted to an end, object, or design जोगा, बसता, बराबर; qualified लायक, कार्यक्षम; becoming योग्य, उचित (Job xxxiv. 18) [for].—*v.* बसता क.; लायक -योग्य क.; adjust बेतणें, जम -मेळ बसविणें (Is. xliv. 13); furnish duly सज्ज -तयार क.; -ला बसता -जोगता होणें: if the coat *fits* you, put it on; out सामन -साहित्य पुरवणें; up तयार क.: to f. up a house for a guest.—*i.* शोभणें, साजणें; योग्य -उचित असणें; जमणें, जम -मेळ बसणें.—*n.* जम, मेळ. -NESS योग्यता *f*, लायकी *f*; जम, मेळ. -TING *a.* योग्य, लायक, उचित.—*n.* सामन *n*, तयारीचें सामन *n*, साज; esp. used in the *pl.*

FIT* झटका, लहर *f*, वेग;—of anger भिरड *f*, तैष;—of sullenness खळ *f*;—of epilepsy फेंपरें *n*;—of drunkenness निशा *f*; by *fits* and starts धरून सोडून, खंडळमंडळ [of].

FIVE* *a.* the sum of four and one पांच; a symbol representing this number, as 5, or V. पांचाचा अंकडा; aggregate of f. पंचकडी *f*, पंच.—*a.* पांच f. -faced पंचमुखी, पंचानन; having f. parts पंचांग. -FOLD *a.* पांचपट.—FIFTH *a.* & *ad.* पांचवा. -LY *ad.* पांचव्यानें.—

FIFTEEN *a.* पंधरा.—FIFTY पन्नास.—FIFTIETH *a.* पन्नासावा.—*n.* पन्नासावा भाग -अंश.

FIX *v.* (*figere*) make firm, stable, or fast गच्च -घट्ट -बळकट बसविणें, पक्की क.; establish ठराव -निश्चय क.; hold steadily, as the eye on an object, attention on a speaker स्थिरावणें, लावणें, टक लावणें; transfix आरपार भोंसकणें.—*i.* थिरावणें, बसणें; become firm घट्ट होणें, थिजणें; on—विषयीं नेम -ठराव क. —*n.* कातर *f*, अडकिता : he is in a f. -ED *p. a.* ठाम, अढळ, बद्ध, अचळ; स्थापलेला, स्थापित; स्थिर, स्तब्ध; having the eye f. बद्धदृष्टि; *Chem.* न उडणारा, स्थिर (oil); f. stars अचळ तारे *pl.*

FLABBY *a. D.* फोपशा, थलथलीत (flesh).

FLACCID *a.* (*flaccus*) बिलबिलीत. -ITY बिलबिलीतपणा.

FLAG *v. i.* (do.) hang loose without stiffness झोल येणें, ढिला पडणें; grow spiritless ढिला होणें, गळणें, उतरणें.—*i.* गळूं देणें, ढिला होऊं देणें.—*n.* colors झेंडा, निशाण *n*; standard on which are certain emblems indicative of nationality, party, or opinion पताका *f*, ध्वज; [black f., a f. of a black color, displayed as a sign that no mercy will be shown to the vanquished, or that no quarter will be given; f. of truce, a white f. carried or displayed to an enemy, as an invitation to conference, or for the purpose of making some communication not hostile; red f., a f. of a red color, displayed as a sign of defiance and invitation to battle; to hang out the white f., to ask quarter, or in some cases to manifest a friendly design by exhibiting a f. of a white color; to hang the f. half-mast high, or half-staff, as a token or sign of mourning; to strike or lower the f., to pull it down upon the cap, in token of respect, submission, or, in an engagement, of surrender].—STAFF बावट्याची काठी *f*, ध्वजस्तंभ.

FLAG *Ger.* फरशी *f*, फरशादगड.

FLAGELLATE *v.* (*flagellum*, whip) चाबकानें मारणें.

FLAGEOLET (*F.*) अलगुजें *n.*

FLAGITIOUS *a.* (*flagitare*, to demand hotly) अतिदुष्ट, महापापी; दुर्गुणाचा, महापापाचा (times).

FLAGON (*F.*) चंबू, सुरई *f.*

FLAGRANT *a.* (*flagrare*, to burn) धगधगीत, रसरसीत; flaming into notice उघड, धडधडीत (crimes).

FLAIL (*flagellum*, whip) धान्याचीं कणसें झोडण्याची काठी *f.*

FLAKE*—of snow हिमकण, गार *f*; — of fire पोळा, किटाळ *f*, फुणगी *f.*

FLAME (*flamma*) a blaze भडाका, भडका; a stream of burning vapor or gas ज्वाळा *f*, ज्योत *f*, जोत *f*, जाळ; burning zeal or passion जाळ, आवेश, किंवा संताप, क्रोध; warmth of affection पोटाग *f*, कळकळ *f*, जाळ.—*v.* जाळ होणें, भबकणें, मदीप्त होणें; ज्योति प्रमाणें प्रकाशणें, दिपणें. -COLORED *a.* अग्निवर्ण, शामवर्ण.—FLAMING *a.* जाज्वल्य, देदीप्यमान; आवेशी, कडक, खंदा.— FLAMBEAU मशाल *f*, दिवटी *f*, टेंभा.

FLANK (*flaccus*, flabby) the fleshy part of the side of an animal, between the ribs and the hip कड *f*, कडसणी *f*, कटि *f*; side of an army फौजेची बाजू *f*; side of any building इमारतीची बाजू *f*; *pl* injury sustained by a horse in the back घोड्याच्या पाठीस झालेली दुखापत *f*.—*v.* -च्या बाजूस उभें राहणें; बाजूचें रक्षण क., बाजू राखणें

FLANNEL (*lana*, wool) लोंकरीचें वस्त्र *n*, ऊर्णवस्त्र *n*, 'फलानेल' *f*.

FLAP *D.* any thing that hangs broad and loose (अंगरखा वगैरेचा) झोल -घेरा, सोगा, पदर इ०; motion or noise of a flap झटका, झटकारा; — of trowsers, &c. खिस्तक *n.* —*v.* झडपणें, हडपणें; — the wings फडफडवणें; to f. in the mouth टोमणा मारणें, घालून पाडून बोलणें [with].—*i.* फडफडणें, झडपणें; फडफड वाजणें. -EARED *a.* गजकर्ण, मोठ्या कानांचा. -PER फडफडवणारा; झडपण *n,* फटकणें *n.*

FLARE *v. i. Ger.* burn with a glaring and unsteady flame रसरसणें, धगधगणें; shine out with a sudden and unsteady light चंचळ प्रकाश देणें, लिकलिकणें; open or spread outward फुलणें, पसरणें [up].—*n.* रसरसीत उजेड; चंचळ ज्योत *f.*

FLASH *F.* sudden burst of wit चकचकाट, झकझकाट; a momentary brightness or show टिरटिर *f,* टुरटुर *n;*—of wit, joy लहर *f;* with f. चक्कन.—*v. i.* चमकणें, लकलकणें; to f. in the pan रंजकविणें, फुसकणें. —FLASHY *a.* भडक, झळक, लक (dress); देखणाऊ, अहेरी, टिकमिकणा (pleasure); without taste पाणचट, मळमळीत (songs).

FLASK* a narrow-necked vessel for holding fluids चंबू; a bottle कुपा, कुपी *f;* powder-horn शिंगडा.

FLAT *a. D.* having an even surface सपाट; lying at full length upon the ground भुईसपाट, जमिनदोस्त; level with the earth चापट, चपटा, बसका; insipid फिका, मळमळीत, पचपचीत (a work);—as sounds तरळ, बदबदीत; downright साफ, उघड, निखालस (denial); low, as prices of things मंद, थंड, मंदीचा; dull विरस, मळमळीत (a sermon); to become f., as wine &c. उतरणें. —*n.* a plain space of ground पटांगण *n,* माळ; — on hilly ground माळी *f,* भाटलें *n;* a shoal भाट *f,* भाटी *f;* some thing broad and flat in form रुंद आणि चपट्या बुडाची कोणतीही वस्तु *f;* a dull fellow टोणपा, मूर्ख. -LY *ad.* सपाट, भुईबराबर; साफ, निक्षून. -NESS सपाटी *f,* समता *f;* चपटेपणा, फिकेपणा, पाणचटपणा. -TEN *v.* चपटा क., चापटणें; जमीनदोस्त क; खिन्न -उदास क.; सूर -स्वर उतरणें.—*i.* चपटा इ० होणें. -ISH *a.* कांहींसा चपटा, फताडा, चापट

FLATTER *v. F.* win the favoring attention of, by action expressly directed to that end, and esp. by artful, insincere, or servile attentions आर्जव -खुशामत मिथ्या प्रशंसा करून मर्जी संपादणें; wheedle फुसलावणें; soothe by praise स्तुति करून संतोषविणें; please with false hopes मिथ्या आशा लावणें, -लावून संतोषविणें, गुळखोबरें दाखविणें, रिता -सुका ताव -दम देणें;— one's self अभिमान बाळगणें [with, by, for]. -ER खुशामत्या, आर्जवी, हांजी हांजी करणारा. -ING *a.* संतोषकारक, परितोषक; आर्जवी, गोडबोल्या; encouraging उत्तेजक, दमदेणारा. —FLATTERY आर्जव, खुशामत *f.*

FLATULENT *a.* (*flatus,* a blowing) affected with gases generated in the alimentary canal वातूळ, वातप्रकृतीचा; tending to generate wind in the stomach वावडा, वातूळ; turgid with air वायूनें तटतटलेला -फुगलेला (tumor).—FLATULENCE, -CY वातरोग, आमवायु, वावडेपणा.

FLAUNT *v. i. Goth.* छानछुकी -भडक मारणें.

FLAVOR (*fragrare,* to emit a smell) सुगंध, बोई *f;* savor चव, रुचि *f,* स्वाद.

FLAW* a cracking फूट *f,* चीर *f,* तडा, दोरा; — in a rupee फाटफूट *f,* खोड *f;* a defect गोम *f,* पकड *f,* ऐब *n;* a quarrel भांडण *n.* -LESS *a.* निर्दोष, बिनखोड, निकोप.

FLAX*—the plant जवस, अळसी *f;* — the fibres जवसाचे दोर -तंतु *pl,* वाख.

FLAY* *v.* कातडी सोडविणें, चामडें काढणें, उधडणें.

FLEA* पिसू *n.* -BANE,—purple काळेंजिरें *n.* -SEED काळेंजिरूं *n.* -WORT इसपगोल.

FLECK *v. Ger.* चित्रविचित्र क. -ठिपके पाडणें.

FLEDGE* *v.* पंखयुक्त क., सपक्ष क.

FLEE* *v.* run away, as from danger or evil पळणें, पळून जाणें; [to f. the question or from the question, (Legisl. Assemb.) to avoid voting on a question] [from, to].

FLEECE* मेंढराची लोंकर *f.*; मेंढराची एक वेळ कातरेली लोंकर *f.*—*v.* लोंकर कातरणें -काढणें; strip of money or property घर धुणें, मुंडणें, लुटणें;—gradually and gently फोलून फोलून खाणें;—FLEECY *a.* लोंकरीचा; लोंकरी सारखा; लोंकरीनें भरलेला.

FLEET* जहाजांचा समुदाय, नौकासमूह ; लढाऊ गलबतें *n pl,* अरमार *n.*—*a. Icel.* जलद, चपळ, धावरा. -ING क्षणिक, अस्थायी, पळपट्या ; f. good पळतें पीक *n.*

FLESH* aggregate of muscles, fat, and other tissues which cover the framework of bones in man and other animals; esp. the muscles मांस *n,* मास *n*; animal food सागुती *f,* मांसान्न *n,* आमिष *n*; the body शरीर *n,* अंगमास *n*; mankind मनुष्यजात *f*; human nature मनुष्यस्वभाव -प्रकृति *f*; tenderness of feeling ममता *f,* कनवाळूपणा; desire for sensual gratification विषयवासना -बुद्धि *f*; kindred नातलग; soft pulpy substance of fruit गर; an arm of f. मनुष्यबळ *n*; f. and blood अंगमास, रक्तामासाचा प्राणी, सदेह मनुष्य. (Matth. xvi. 17). -LY *a.* मांसाचा; देहाचा; मनुष्यजातीचा, मानवी; विषयी, विषयासक्त, in comp. विषय (lusts). -MEAT मांसान्न *n,* आमिष *n.*—FLESHY *a.* मांसल, मासभरू; गरभरू, भरदार.

FLEXIBLE *a.* (*flectere,* to bend) लवचीक, लवका; tractable हुकमी, वश्य, कह्यांत राहणारा; too easy and compliant नरम; capable of being accommodated सोयीस पडेसा करण्याजोगा -वळविण्याजोगा (a principle).—FLEXIBILITY लवचीकपणा, मृदुता *f.*—FLEXILE *a.* नरम, लवचीक; नरम, सहज वळायाजोगा. —FLEXTURE बांक, वक्रता *f*; obsequious bending अर्जवाचें नमणें -लवणें *n,* लवणभंजन *n.*

FLICK* *v.* झटकणें, झाडणें; हळू हळू चाबकानें मारणें.

FLIGHT* act of fleeing पळणें *n,* पलायन *n*; —of a whole people of a village from an enemy गुढार *n*; act of flying उडणें *n,* उड्डाण *n*; mode of flying उड्डाण *n*; extravagant sally लहर *f*: a f. of folly;—of fancy बुद्धिविलास;—of arrows शरपात; a flock of birds flying in company झुंड *f,* साईर *f*; a soaring वर उडणें *n,* उत्क्रमण *n,* ऊर्ध्वगमन *n*; a reach of steps, from one landing to another जिना, शिडी *f*; to put to f. पळविणें, पळायास लावणें. -SHOT बाणाचा टप्पा.—FLIGHTY *a.* चंचळ, चपळ; उडाणटप्पू, लहरी, वायचळ्या.

FLIMSY *a. W.* फुसका, लिचापेंचा, अलबेला.

FLINCH *v.* (?) कच खाणें, घसरणें, मागें हटणें.

FLING *v.* (*-fligere,* to strike down) throw from the hand झोंकणें, फेंकणें, टाकणें; throw down खालीं पाडणें, चीत क.; defeat मोड क.; away फेंकून देणें; नाकारणें, टाकणें; down जमीनदोस्त क., नाश क.; in हिशेबीं -जमेस न धरणें; open झपाट्यानें -एकाएकीं -जोरानें उघडणें [from, to, at].—*i.* flounce आदळआपट क., हातपाय झाडणें;—as a horse दुमच्या -पिछाड्या झाडणें.

FLINT* a kind of hard stone गार *f*; a piece of flinty stone used in some fire-arms to strike fire चकमकीचा धोंडा -ची गार. *f.*—FLINTY *a.* गारगोट्याचा; गारीसारखा कठीण (heart).

FLIPPANT *a.* *W?* talkative पातळ जिभेचा, लुबलुब बोलणारा; inconsiderate अविचारी. —FLIPPANCY पातळजीभ *f*, वाक्चापल्य *n*.

FLIRT* sudden jerk हिसका.—*Ger.* नखरेबाज मुलगी *f*, नाचणघुगरी *f*.—*v.* झटकारून फेंकणें -टाकणें;—as water चिरकांडी मारणें, फेंकणें [about].—*i.* नखरा -अदा क.; jeer or gibe नाक मोडून -लावून बोलणें.

FLIT *v. i. D.* fly away with a rapid motion भरकन उडून जाणें; flutter फडफडणें; migrate स्थलांतर क.; to be unstable चंचल -अस्थिर असणें.

FLITCH* मिठांत घालून वाळवलेलें डुकराचें मास *n*.

FLOAT* *v. i.* rest on the surface of any fluid तरंगणें, तरणें; move quietly and gently on the water पाण्यावर वाहणें -हलणें; move gently and quietly on the air हवेंत तरंगणें; [*floating* debt, capital, &c., debt not funded, or capital not fixed, or of uncertain amount or employment].—*t.* तरंगविणें, तरता क.; float जलमय क.; बुडविणें [on, over]. —*n.* a raft ताफा, तराफा; timber &c. set to float down ताफा.—FLOTILLA लहान गलबतांचा समुदाय.

FLOCK* a collection of living creatures मेळा, जमाव, समुदाय;—of sheep कळप, खिल्लार *n*;—of birds झांक *f*, झुंड *f*;—of people घोळका, गोट, थवा, समुदाय; a Christian congregation (एका देवळांत भजन करायास मिळणाऱ्या ख्रिस्ती लोकांचा) सभा *f*, कळप; lock of wool लोंकरीचा झुपका; refuse of wool लोंकरीची गुतवळ *f*.

FLOG *v.* (*fligere*, to strike) चाबकानें मारणें, फटके मारणें; chastise with repeated blows फटके मारून शिक्षा क., फटके मारणें [with, for].

FLOOD* great flow of water लोंढा, पूर, लोट; deluge जलप्रलय; flux भरती *f*; abundance रेळचेळ *f*, महापुरी *f*, पूर; stream ओघ, प्रवाह; menstrual discharge विटाळ; the f. नोहाच्या वेळचा जलप्रलय.—*t.* जळमय क., बुडवणें. -GATE उघडी *f*, सांड *f*.

FLOOR* level portion or surface on which one walks in any building घराची भुई *f*, जमीन *f*; a storey मजला;—of planks पाटणी *f*, तक्तपोशी *f*, कडीपाट;—of chunam गच्ची *f*;—of stone फरसबंदी *f*.—*v.* भुई -कडीपाट -फरसबंदी इ० क.; lay level with the floor जमिनदोस्त -चीत क.; put to silence by some decisive argument कुंठित क., तोंड बंद क. -CLOTH जाजम *n*. -ING जमीन *f*, भुई *f*; pavement चिरेबंदी *f*.

FLORA (*flos*, flower) goddess of flowers पुष्पदेवता *f*; complete system of vegetable species native in a given locality अमूक एका प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या वनस्पति *f pl*; a description of such plants स्थानिक वनस्पतिवर्णन *n*. —FLORAL *a.* फुलांचा पुष्पसंबंधी (game); फुलांचा (bud).—FLORID *a.* flushed with red लालबुंद -भडक (countenance); embellished with flowers of rhetoric अलंकारिक, पुष्पित (style); -ITY तोंडाची लाली *f* -टवटवी *f*. -NESS लाली *f*, भडक *f*; अलंकारप्राचुर्य *n*.—FLORIN एक नाणें आहे; [the English f. is one-tenth of a pound sterling].—FLORIST फुलमाळी, फुलारी, माळी; पुष्पवर्णनकर्त्ता.

FLOUNCE, FLOUNDER *v. D.* धडफडणें, तडफडणें, हातपाय अपटणें -झाडणें [about].—*n.* झडफड *f*, तडफड *f*; *Ger.* [part of a lady's dress, a loose trimming].

FLOUR (See FLOWER) finely ground meal of grain पीठ *n*, पिष्ट *n*; wheaten f. कणीक *f*; gram f. बेसन *n*; fine wheaten f. सोजी *f*, मैदा; coarse wheaten f. रवा, सांजा; fine rice f. पिठी *f*; fine and soft powder of any substance पीठ *n*, भुकटी *f*, पूड *f*.

FLOURISH *v. i.* (*florere*, to bloom) grow luxuriantly पोसणें, तरतरणें, फोफावणें; be prosperous भरभराट -चलती -उत्कर्ष -चालता काळ असणें;—as a town, country आबादानी -आबाद असणें; use florid language बतावणी क.; make ornamental strokes with the pen भरकांडे -फरकांडे मारणें; vaunt बढाई सांगणें -क.; play with fantastic and irregular motion परजणें, खेळणें.—*t.* बतावून सांगणें, बतावणी क.; अलंकृत-वेलबुट्टेदार क.; परजणें, चमकावणें; विरखडणें, भरकांडे मारणें.—*n.* beauty सौंदर्य *n*, लावण्य *n*; बोलण्याचा भरकांडा, अर्थवाद; भरकांडा, फरगडा; *Mus.* गत *f*, परजणें *n*. -ING टवटवीत, तरतरीत; समृद्ध, संपन्न, आबाद.

FLOUT *v. D.* झिडकावणें, हिडसावणें, तिरस्कारणें.

FLOW* *v. i.* move by the power of gravity, and with a continual change of place, among the particles or parts, as a fluid वाहणें, ओघ चालणें; melt पाझरणें, गळणें, वितुळणें; glide smoothly सुरळीत-अस्खलित चालणें, सरणें; be full, so as to run or flow over भरून चालणें, वाहणें, लोट येणें; hang loose and waving रुळझुळणें, लोंबणें (mantle, locks); rise, as the tide भरती -जोर लागणें; proceed निघणें, येणें; discharge blood in excess from the uterus गर्भाशया पासून अति रक्तस्राव होणें [from, to, in].—*n.* ओघ, प्रवाह, धारा *f*; रेळचेळ *f*, चंगळ *f*;—of tears अश्रुधारा *f*, अश्रुपात;—of words वाक्चापल्य *n*, वाक्सरणी *f*; भर, पूर, भरतें *n*.

FLOWER (*flos*) a circle of leaves or leaflets on a plant, usually of some other color than green फूल *n*, पुष्प *n*; blossom मोहर, फूल *n*; that part of a plant destined to produce seed फूल *n*;—as of grain फुलोरा; the fairest, freshest, and choicest part of any thing निवड *f*, उत्तमांश, शेलका भाग;—of youth भरज्वानी *f*, तारुण्य *n*; a figure of speech वाक्यालंकार; *pl.* menstrual discharges पुष्प *n*, रज *n*;—as carved, painted फुली *f*, बुटे; *Chem.* फूल *n*. —*v.i.* फुलणें, फुलें येणें, विकसणें; भरास येणें.—*t.* फुलें -बूट काढणें, बुट्टेदार क.—FLOWERY *a.* पुष्कळ फुलांचा; पुष्पमय; अलंकारी, अलंकारयुक्त (style): [the f. kingdom, China].

FLUCTUATE *v. i.* (*fluere*, to flow) move as a wave हेलकावा खाणें; be irresolute धरसोड क.; be unsteady एका स्थितीवर नसणें [from, to].—FLUCTUATION हेलकावा, अन्दोलन *n*; धरसोड *f*; चढउतार, अस्थैर्य *n*.

FLUE *F.* धुराडें *n*.

FLUENT *a.* (*fluere*, to flow) वाहता; fluid पातळ; voluble बोलका, जिभेचा चपळ (speaker); flowing सरळ, सुरळीत, अस्खलित (speech). -LY *ad.* चुरचुर, खडखडीत, भराभर (बोलणें-वाचणें).—FLUENCY जिभेचा चपळपणा, वाक्चापल्य *n*; सरळ -सुरळीतपणा.—FLUID *a.* प्रवाही, पातळ, द्रवरूप.—*n.* पातळ-द्रव-प्रवाही पदार्थ. -ITY द्रवता *f*, पातळपणा.

FLUKE, *Ger.* the part of an anchor which fastens in the ground पावडा, कांटा, फाळ.

FLURRY *Provl. Eng.* a sudden blast वाऱ्याचा झटकारा; bustle गडबड *f*, लगबग *f*, धांदल *f*.—*v.* गडबडविणें, धांदल क.

FLUSH* *v.* redden suddenly एकदम लाली आणणें, तांबडालाल क.; elate चढवणें, फुगवणें.—*i.* भडभड -भळभळ वाहणें: blood *flushes* into the face; लाली येणें, तांबडालाल होणें; to f. up joints दरजा क.—*n.* लोंढा, ऊत, लहर *f*; ardor उकळी *f*, हुरशी *f*, कढ; लाली *f*; भय, लाज, राग इ० विकारांचा क्षोभ झाल्यानें तोंडावर उत्पन्न होणारी लाली *f*, काळिमा *f*.—*a.* fresh टवटवीत, तुकतुकीत; affluent संपन्न, श्रीमंत; liberal उदार; prodigal उधळ्या, उडाऊ.

FLUTE (*flatus*, a blowing) a musical wind instrument मुरली *f*, पोंवा; a channel in a pillar खांचणी *f*.

FLUTTER *v. i. D.* flap the wings rapidly फडफडणें, पंख झाडणें; be in agitation व्याकूल होणें, गडबडणें.—*t.* पंख झाडणें; गडबडविणें, धांदल क.

FLUX (*fluere,* to flow) वाहणें *n*; ओघ, प्रवाह; change पालट; concourse जमाव, मेळा; the tide setting in toward the shore भरती *f*; fusion आटणें *n*, गाळणें *n*;—for metals टाकणखार, सवागी इ० धातूचा रस करणारा पदार्थ; *Med.* आमातिसार, रक्तातिसार इ०; to have a f. हगवण लागणें.

FLY* *v. i.* move in the air with wings, as a bird उडणें; float in the air, as the clouds, the sparks तरंगणें, उडणें; — as a flag उडणें, फडफडणें; hasten away जाणें, लवकर निघून जाणें: time *flies*; flee (संकटा पासून) पळून जाणें: the enemy *flies*; part फुटणें, तुकडे होणें; to come off with flying colors जय मिळविणें, फत्तेहोणें, विजयध्वज मिरवीत येणें; at अंगावर तुटून पडणें, घसरणें;—in the face of बेअदबी क.; off तुटणें, तुटून मोकळा होणें; on अंगावर तुटून पडणें, हल्ला क.;—open जोरानें उघडणें; out उचळणें, उसळणें; रागावणें, कातावणें; to let f. सोडणें; जाऊंदेणें [from, to, against].— *n.* a winged insect of various species माशी *f*, मक्षिका *f*. -BLOW, egg of a fly सडी *f*. -CATCHER शिपाई (एक पक्षी आहे). -ING-FISH एक उडणारा मासा आहे. -LEAF बुकाच्या आरंभीचें किंवा शेवटचें कोरें पान *n*. -TRAP माशा धरणारें झाड *n*, मक्षिकाकर्त्तरी झाड *n*.

FOAL* शिंगरूं *n*, शिंगी *f* (गाढवाचें -घोड्याचें).

FOAM* (*Skr. phêna*) फेंस, फेण.—*v. i.* फेणणें, फेसळणें; फेंसानें भरणें.—*t.* फेंसळून काढणें -टाकणें [out].—FOAMY *a.* फेंसाळ, फेणयुक्त.

FOB *Ger.* घड्याळ ठेवण्याचा लहानसा खिसा.

FOCUS (*L.* fireplace) point in which the rays of light meet किरण एकत्र मिळण्याचें स्थान *n*, तेजस्संकर्ष देश; a central point मध्यकेंद्र *n*.—FOCAL *a.* केंद्रसंबंधी.

FODDER* वैरण *f*, चारा.—*v.* वैरण घालणें.

FOE* वैरी, शत्रु.

FŒTUS, See FETUS.

FOG *Icel.* धुकें *n*, धुकट *n*. -GY *a.* धुक्याचा, धुक्यानें भरलेला; dull मंद, स्थूल.

FOH *interj.* इश्श, इश्शों.

FOIBLE *F.* वर्म *n*, छिद्र *n*, उणें *n*; *pl* कर्में वर्में *n pl*.

FOIL *v. F.* मोडणें, थकणें, चालेनासा क. [by, in]. —*n.* मोड, पराभव; a blunt sword used in fencing बुळी तरवार *f*, पट्टा, बोथाटी *f*, इ०; (*folium*) a leaf or thin plate of metal वर्ख, पत्रा, पान *n*; a coat of metal on a looking-glass आरशाची कल्हई *f*; [a thin leaf of metal, placed under precious stones by jewelers, to increase their brilliancy, or to give them a particular color]; any thing of another color, or of different qualities, which serves to adorn, or set off another thing to advantage कांतिवर्द्धक वस्तु *f*.

FOIST *v. F.* खुपसणें, लाटणें, घुसडणें [on, off, in]. -ER घुसड्या, खुपशा.

FOLD* *v.* lap or lay in plaits घडी क.; double दुमडणें; lay together, as the arms or the hands हात पोटाळणें; envelop गुंडाळणें, वेष्टणें, लपेटणें; confine in a fold कोंडवाड्यांत कोंडणें -घालणें;—a letter लखोटा क., मलफूप क. [together].—*i.* घडी होणें, दुमटणें.—*n.* घडी *f*, पदर; पट: four-f.; embrace मिठी *f*, वेंग *f*; कोंडवाडा. -ING पदर, घडी *f*;—of doors दुतलफी *f*.

FOLIAGE (*folium*, leaf) पानें *n pl*, पालव, पल्लव; new f. पालवी *f*.—FOLIATE *v.* पारा चढविणें, पाऱ्याची कल्हई क.—FOLIO, a sheet of paper once folded दुबंदी कागद; book made of sheets of paper each folded

once दुंड्याचें पुस्तक *n*; page in an account-book चोपडीचें पान *n*.—*a*. दुबंदी, दुबंदी कागदाचा.

FOLK* लोक *pl*, आलमदुनिया *f*.

FOLLOW* *v*. go or come after मागून जाणें -येणें -चालणें; go in pursuit of पाठीस लागणें;—accept, as authority आदरणें, प्रमाण मानणें; obey मानणें, ऐकणें; embrace स्वीकारणें, आदरणें; imitate अनुसरणें, अनुकरण क., कित्ता घेणें; succeed in order of time मागून -नंतर येणें -होणें; accompany संगतीं -बराबर जाणें; result from, as an effect from a cause निष्पन्न होणें, निघणें; understand the meaning, connection, or force of, as a course of thought or argument अर्थ -अन्वय -संदर्भ समजणें; attend upon closely, as a profession धंदा क., वृत्ति चालविणें [from, to, in, after]. -ER मागून जाणारा येणारा, अनुगामी; disciple शिष्य; dependant चाकर, सेवक; ताबेदार; अनुयायी, अनुसारी. -ING *a*. पुढचा, पुढील.

FOLLY, See under FOOL.

FOMENT *v*. (*fovere*, to warm) apply warm lotions to शेक देणें, शेकणें; abet वाईट कामांत मदत क., फूस देणें. -ATION शेकणी *f*, शेक; फुसलावणी *f*, शिकवणी *f*, उठावणी *f*.

FOND *a*. *Icel*. relishing highly -चा आवडता, शौकी, लंपट; much pleased संतुष्ट, खुश; tender ममताळू, स्नेहाळू [of]. -NESS प्रीति *f*, ममता *f*, लळा; आवड *f*, चाड *f*.—FONDLE *v*. गोंजारणें, कुरवाळणें, लाड क.—FONDLING फार लाडका.

FONT (*fons*, fountain) झरा; बाप्तिस्म्याचें पाणी ठेवण्याचें पात्र *n*; [a complete assortment of printing types of one size].

FONTANEL *F*. vacancy in the infant cranium टाळू *f*; issue for the discharge of humors from the body पोत *f*.

FOOD* अन्न *n*, भक्ष्य *n*, खाणें *n*; undressed f. शिधा; heavy f. जडान्न; —of granivorous animals चारा; coarse or bad food कदन्न *n*; the usual quantity of f. आहार; f. and raiment पोटभर अन्न अंगभर वस्त्र [for].

FOOL *F*. an idiot वेडा, वेडगळ; a dunce मूर्ख, टोणपा, मंदबद्धि; *Scrip*. wicked person दुष्ट मनुष्य; a professional jester मस्कऱ्या, हंडीबाग; *fool's* errand हिसका; to go on a f.'s errand पायांची वळ भागविणें; to put on the f. वेडा ठरविणें, वेड्यांत काढणें; a learned f. पढतमूर्ख; to make a f. of झकवणें, भोंदणें, धाब्यावर बसवणें; to make a f. of one's self नकशा गमावणें, झकमारणें; to play the f. वेडेचार क. -ISH *a*. मूर्ख, वेडा, खुळा; मूर्खपणाचा, बेवकुबीचा (act); दुष्ट; ridiculous थट्टा करायाजोगा, उपहासास्पद. -HARDY *a*. उफराट्या काळजाचा. — FOOLSCAP [so called from the water-mark of a *fool's cap and bells* used by old paper-makers] एक जातीचा कागद आहे, 'फुलीसकेप.'

FOOT (*Gr.pous, Skr.padas*) the extremity below the ankle पाय, चरण, पाद;—of a table पाय, खूर; foundation पाया, तळ, बुडखा; a measure of 12 inches 'फूट' *f*; foot-soldier पायदळ *n*, प्यादा;—of a verse चरण; on f. पायीं; cubic f. घन फूट; to set on f. चालू क., उभारणें. -BALL पायानें उडवून खेळायाचा चेंडू. -BOY खिदमतगार, पोऱ्या, पोरगा. -FALL पायरव, चरणपात. -ING, ground for the foot पाय टेकणें *n*, पावठा; firm foundation to stand on थारा, आधार; permanent settlement व्यवस्था *f*, बंदोबस्त; firm position पगडा, पायशीरकाव; condition स्थिति *f*; tread to measure पाऊल *n*, कदम *n*; act of putting a foot to any thing पाय लावणें -जोडणें *n*; act of adding up a column of figures बेरीज क. *n*; to get f. पगडा पडणें,

घालणें, जडणें. -MAN प्यादा; खिदमतगार, चाकर. -MARK पाऊल *n*, पदचिन्ह *n*. -NOTE पृष्ठाच्या तळाचें टिपण *n*. -PAD वाटमाऱ्या. -PATH पाऊलवाट, पायवाट *f*. -PRINT पाऊल *n*, पदचिन्ह *n*. -STALK देंट, डेंख. -STEP पाऊल *n*; token खूण *f*, चिन्ह *n*. -STOOL पीठ *n*, पादासन *n*.

FOP *Ger*. अकडबाज, कुर्रेबाज. -PERY अकडबाजी *f*, छानछुकी *f*.

FOR *prep*. (*pro, Skr. pra*) in the place of जागीं, स्थानीं, बदल; concerning विषयीं; because of मुळें, साठीं, करितां, स्तव; toward कडे: a ship is bound f. China; for the sake of करितां, स्तव, प्रीत्यर्थ: is the world made f. me? in spite of; generally followed by all, aught, anything, &c. हटकून, न ऐकतां: he will do what she pleases *for* all me; notwithstanding असें असतांही, जरी: f. any thing that legally appears to the contrary; during a certain time पर्यंत, आंत, मध्यें, भर: f. a day; f. life ताहयात, जन्मभर, आमरण; in favor of पक्षाचा, वांटचा: he is f. a free government; noting meeting: I am ready f. you मी तुम्हास भेटायास तयार आहें; as if जसा, सारखा: he showed himself f. dead; he looks f. me तो माझी वाट पाहतो; f. my part मला जर विचाराल; f. as much ज्यापेक्षां, ज्या अर्थी; f.-ever निरंतर, सर्वकाल; O f. जर असतें तर किती बरें होतें; मिळो; O f. a muse of fire!—*conj*. साठीं, करितां, म्हणून; ज्या अर्थी -पेक्षां.

FORAGE *F*. घांसदाणा, वैरण *f* [for]. — *v*. घांसदाण्यासाठीं फिरणें; घांसदाण्यासाठीं देश लुटीत फिरणें, कहीं घेणें -क., लुटून खाणें.

FORBEAR* *v. i*. refrain from proceeding थांबणें, राहणें; refuse न मानणें, न ऐकणें.—*t*. give up सोडणें, टाकणें: to f. the use of a word; bear with सोसणें, वागविणें, संभाळून घेणें. -ANCE थांबणें *n*, राहणें *n*; long-suffering सहनशीलता *f*, क्षमा *f*; exercise of patience धीर धरणें *n*, धीर, दम, गम.

FORBID* *v*. prohibit मनाई -बंदी क.; command not to enter आंत जाण्याची -येण्याची मनाई -प्रतिबंध क.: I have *forbidden* him my house; oppose आडवा येणें, अथडळा -प्रतिबंध क.; God f. ईश्वर न करो. -DEN मना केलेला, निषिद्ध. -DING *a*. त्रासजनक, कंटाळवाणा, अनिष्ट.

FORCE (*fortis*, strong) बळ *n*, जोर *n*, *f*; an unusual degree of strength or energy तेज *n*, वीर्य *n*, शक्ति *f*; violence बळजोरी *f*, जुलूम; special signification विशेष अर्थ; validity बळकटी *f*, जीव, वजन *n*: f. of an argument; *pl* troops फौज *f*, सैन्य *n*; *Law*, strength or power exercised without law, or contrary to law, upon persons or things जुलूम, जबरी *f*, बलात्कार; *Physics*, any action between two bodies which changes, or tends to change, their relative condition as to rest or action वेग, शक्ति *f*: the f. of gravity;—of habit कर्मवेग; moral f. बुद्धिबळ *n*;—of a disease, of winds, &c. झपाटा, वेग, बळ *n*, रग *f*;—in f. चालू, उपयोगी.—*v*. जुलमानें -जबरीनें करायास लावणें, जबरी क.: masters f. their slaves to labor; ravish बलात्कार क., दपटणें, हटसंभोग क.; capture by assault हल्ला करून घेणें; drive, wrest, get, &c. by violence दामटणें, दपटणें, ढकलणें [along, away, from, into, through, out, &c.]; strain ओढून ताणून आणणें -काढणें -क. (conceit);—a passage दपटून शिरणें -रिघणें, घुसणें.—FORCIBLE *a*. बळकट, जोराचा, प्रबल; जुलमाचा, जबरीचा; जबरीनें मिळविलेला.—FORCIBLY *ad*. जोरानें, बळानें; जुलमानें.— FORCING, *Gardening*, अवकाळीं -कृतीनें फळफळावळ उत्पन्न क. *n*.

FORCEPS (*L.*) चिमटा ;—of the goldsmith सवाणा.

FORD * a shallow part of a river उतार, पायउतार; a stream ओहळ. -ABLE *a.* पायांनीं उतराया जोगता.

FORE * *a.* advanced in place पुढला, पुढील, समोरचा, अग्र; advanced in time अगोदरचा, पूर्वीचा, पूर्व; advanced in order पहिला, प्रथम, पूर्व : f. part of a writing.—*ad.* पूर्वभागीं. -ARM कोपर आणि मणगट यांच्या मधला हाताचा भाग, हात. -BODE *v.* पूर्वी सांगणें, भविष्य सांगणें; be prescient of, as of a calamity which is to happen येणार संकटा विषयीं प्रबोधित होणें, अरिष्टाची अगा असणें. -CAST *v.* plan before execution अगोदर बेत करून ठेवणें; foresee अगोदर पाहणें, तजवीज क.—*n.* पूर्वीचा बेत, पूर्वयोजना *f*; तजवीज *f*, दीर्घदृष्टि *f*. -CASTLE गलबताचा समोरचा भाग. -FATHER पूर्वज, वडील. -FINGER हाताच्या अंगठ्या जवळचें बोट *n*, तर्जनी *f*. -FOOT जनावरचा पुढला पाय. -GO *v.* quit सोडणें; relinquish the enjoyment or advantage of -चा उपभोग -लाभ सोडणें; go before पुढें जाणें. -HEAD कपाळ *n*, ललाट *n*. -LOCK टाळूवरचे केंस *pl*: to take time by the f., to make prompt use of any thing; not to let slip an opportunity वेळ साधून घेणें. -MAN प्रमुख, पुढारी; overseer कारभारी, चैाकसनीस;—of a jury सरपंच, जुरीचा पुढारी, मीर मजलीस *f*. -MAST पुढली डोलकाठी *f*. -MOST *a.* सर्वांपुढचा, अग्रवर्ती. -NAME, name that precedes the family name or surname आड नांवाच्या पूर्वीचें नांव *n*. -NAMED *a.* पूर्वोक्त, मशारनिल्हे. -NOON सकाळ *f*, दुपारचे पूर्वीची वेळ *f*, पूर्वान्ह *f*. -RUNNER पुढें धावणारा जासूद, अग्रदूत; prognostic पूर्वचिन्ह *n*, लक्षण *n*. -SEE *v.* अगोदर पाहणें-समजणें; भविष्य समजणें. -SHADOW पूर्वी प्रतिरूप दर्शविणें. -SIGHT दूरदृष्टि *f*, दीर्घदृष्टि *f*, दूरवरचा विचार. -SKIN अग्रत्वचा *f*, टोपी *f*, शफा *f*. -STALL, take in advance पूर्वी घेणें; anticipate अगा-अवलो सावणें; preoccupy दुसऱ्याच्या अगोदर किंवा दुसऱ्यास वर्जून अगोदर उपभोग घेणें; to f. the market बाजारांत येण्यापूर्वी खरीद क. (महाग विकण्यासाठीं माल). -TASTE पूर्वानुभव, पूर्वरूचि *f*. -TELL *v. i.* भाकीत क. -सांगणें, भाकणें.—*t.* -चें भाकीत सांगणें, होण्यापूर्वी सांगणें. -THOUGHT पूर्वविचार; anticipation अटकळ *f*, अगा *f*. -TOOTH चौकटीचा दांत. -WARN *v.* पूर्वी सुचविणें, अगोदर ताकीद देणें -क.

FOREIGN (*foras*, abroad) not of one's country परदेशचा, परकीय; remote दूरचा; extraneous बाहेरचा, बहिर्भूत. -ER परदेशीं, परदेशाचा मनुष्य, परकी.

FOREST *F.* an extensive wood रान *n*, अरण्य *n*; a royal hunting-ground राजक्रीडा वन *n*, राजाच्या शिकारीची जागा *f*.—*a.* वनाचा, वन्य, अरण्य; f. law वनरक्षण करण्याचा कायदा. -ER वनरक्षक, बनकरी; a sylvan वनवासी; a forest-tree वनवृक्ष.

FOREVER *ad.* निरंतर, सर्वकाल, नित्य; at all times सर्वदा, हमेश, रोज.

FORFEIT *v.* (*foris*, out of doors, *facere*, to do) अपराध करून गमावणें, दंड देणें, दंडास जाणें.—*n.* दंड, गुन्हेगारी *f*. -URE दंड -गुन्हेगारी देणें *n*; an estate forfeited दंडांत गमाविलेली जिनगी *f*; a fine दंड [for].

FORGE *F.* a smithy लोहाराची भट्टी *f*; a workshop दुकान *n*, साळ *f*.—*v.* form by heating and hammering तापून व ठोकून घडणें, वडणें; form घडणें, डौल -रूप देणें; make falsely बनाऊ -खोटा क.—FORGED *a.* खोटा, बनावट.—FORGERY, the crime of fraudulently making or altering a writing, to the prejudice of another's right बनावट कागद करण्याचा अपराध; the making of a thing in imitation of another thing

with a view to deceive and defraud बनावट नाणें वगैरे क. *n.*

FORGET* *v.* lose the remembrance of विसरणें, विसर पडणें: bless the Lord, O my soul, and f. not all His benefits (Ps. ciii. 2); neglect उपेक्षा -अव्हेर क., विसरणें; [to f. one's self, to be guilty of that which is unworthy of one; to commit an oversight]. -FUL *a.* विसराळू, विसऱ्या; careless गफलत्या, धांदल्या; causing to forget विसर पाडणारा, विस्मृतिकारक -जनक (wine) [of]. -NESS विसराळूपणा, विसर, विस्मृति *f*; गफलत *f*, धांदल *f*.

FORGIVE *v.* * give up resentment or claim to requital on account of, as an offence or wrong -ची माफी क., सूट देणें, अपराध क्षमा क.: f. old faults, cease to feel resentment against on account of wrong committed क्षमा क.,माफ क.,-ची क्षमा क.: I f. you. -NESS सूट *f*, माफी *f*; क्षमा *f*, क्षमाशीलता *f*.

FORK (*furca*) forkation नांगें *n*, दुबेळकें *n*, बेचकें *n*; table f. कांटा;—of a road फांटा; —of a river, the place where separation takes place फांटा;—the place where union takes place संगम; a point टोंक *n*, नोक *f*.—*v. i.* फांकणें, फांटीस येणें; दोन फांटे फुटणें.—*t.* नांगीनें उचलणें; dig and break with a fork, as ground बेळक्यानें जमीन खणून फोडणें, कुळवणें! -ED *a.* दुफाट्यांचा, बेळक्याचा, द्विशाख.

FORLORN* *a.* deserted सोडलेला, टाकलेला, त्यक्त; helpless निराश्रित, अनाथ.

FORM (*forma*) shape आकार, आकृति *f*; the outline of the person शरिराची मूस *f*, रूपरेषा *f*; particular disposition of matter बांधा, घडण *f*; external appearance डौल, आकार, रूप *n*; image प्रतिमा *f*; constitution नीति *f*, रीत *f*, प्रकार: a republican f. of government; formula पद्धत *f*, परिपाठ; conventional ceremony रीत *f*, संस्कार, उपचार, आदरसत्काराची रीत *f*; show without substance पोकळ डौल: f. of justice; beauty रूप *n*, सौंदर्य *n* (Is. liii. 2); mould सांचा, नमुना; bench बांक; rank of students in a school वर्ग; seat or bed of a hare सशाची बसायाची जागा *f*; *Print.* type from which an impression is to be taken, arranged and secured in a chase 'फर्मा'; as of an official paper दस्तूर;—of a verb or noun रूप *n*.—*v.* घडणें, रूप देणें, आकारणें, करणें (Gen. ii. 7); train शिकविणें, वळण लावणें; education *forms* the mind; go to make up करणें, असणें, अंशभूत असणें: they *formed* the majority;—as an estimate आकारणें, अजमासणें [out of, into, from]; रूप घेणें;— as the hand in writing, &c. वळणें. -AL *a.* आकृतीचा, रूपाचा; essential स्वाभाविक, मूळचा; done in due form यथापद्धत -मार्ग; according to form रीतीचा, दस्तूरमाफक, यथाविधि; वरवरचा, बाहेरचा, कोरडा, वरपंकी (worship, duty). -IST *a.* कर्मनिष्ठ; बाह्योपचारी. -ALITY कायदेशीरपणा, यथामार्गता *f*; रीत *f*, चाल *f*; आदर, सत्कार; essence तत्व *n*, अवयवभूत पदार्थ. -ALLY *ad.* रीतीनें, यथापद्धत; आदरसत्कारानें; नीट, बराबर. -ER करणारा, कर्त्ता, घडणारा, रचणारा.—FORMULA पद्धति *f*, रीत *f*. -RY पद्धति -सूत्रग्रंथ; prescription रोग्यास देण्याच्या औषधाची याद *f*.

FORMER* *a.* preceding in order of time पहिला, प्रथम, पूर्व; long past प्राचीन, जुना, पूर्वीचा, गत (ages); first mentioned पूर्वोक्त, मागला. -LY *ad.* मागें, पूर्वी, जुन्या काळीं; पहिल्यानें, अगोदर.

FORMICATION (*formica*, ant) *Med.* a sensation of the body resembling that made by the creeping of ants on the skin मुंग्या *pl*, हुळहूळ *f*.

FORMIDABLE *a.* (*formidare,* to fear) भयंकर, भयउत्पादक -जनक [to].

FORNICATE *v.* (*fornix,* a brothel) शिंदळकी क. —FORNICATION, the incontinence of an unmarried person, male or female अविवाहित स्त्रीचें किंवा पुरुषाचें जारकर्म *n*; criminal conversation of a married man with an unmarried woman अविवाहित स्त्रीशीं विवाहित पुरुषाचा सदोषसंग; lewdness शिंदळकी *f*, जारकर्म *n*; *Scrip.* adultery व्यभिचार; incest अगम्यगमन *n*; idolatry मूर्त्तीपूजा *f*.—FORNICATOR अनूढागामी; शिंदळ, रांडबाज.—FORNICATRESS, -TRIX अनूढव्यभिचारिणी *f*; शिंदळ बायको *f*.

FORSAKE* *v.* सोडणें, टाकणें, त्यागणें, वर्जणें.

FORSOOTH* *ad.* तर खरा, तर होय, खचीत.

FORSWEAR* *v.* reject upon oath शपथ घेऊन -वाहून सोडणें; deny upon oath शपथ वाहून नाकारणें;—one's self खोटी शपथ क. -खाणें -घेणें.—*i.* खोटी शपथ घेणें.

FORT (*fortis,* strong) किल्ला, कोट, दुर्ग; town belonging to a f. पेठ *f*; wall of a f. कोट. -RESS कोट, गढी *f*.—FORTIFY *v.* तटबंदी -कोटबंदी क.; add strength to बळकट क., जोर आणणें; confirm स्थिर -दृढ क. [with, by, against]. —FORTIFICATION तट -कोटबंदी *f*; the art of fortifying दुर्ग प्राकारादि रचनाविद्या *f*; a fortified place कोट.

FORTITUDE (do.) that strength or firmness of mind which enables a person to encounter danger with coolness and courage, or to bear pain or adversity without murmuring, depression, or despondency मनस्थैर्य *n*, धैर्य *n*, धीर, छाती *f*.

FORTH* *ad.* forward पुढें; out बाहेर; abroad बाहेर; so f. इत्यादि, वगैरे [from]. -COMING *a.* तयार, सिद्ध, हाजीर. -WITH *ad.* लागलाच, तत्क्षणीं, तेव्हांच.

FORTNIGHT (contracted from *fourteen nights*) पंधरवडा, पक्ष.

FORTUITOUS *a.* (*fors,* chance) दैवघटित, आगंतुक.—FORTUITY दैवयोग.—FORTUNE, personified or deified power regarded as determining human success, sharing happiness and unhappiness, and distributing arbitrarily or fortuitously the lots of life दैव *n*, नशीब *n*; that which falls to one as his lot in life दैवप्राप्त वस्तु *f*; estate मत्ता *f*, वित्तविषय; great wealth संपत्ति *f*, दौलत *f*, गजांतलक्ष्मी *f*; appointed lot in life दैवाचा वांटा, लाभालाभ, भोग; good f; सुदैव *n*; bad f. दुर्दैव *n*. -BOOK शकुनवंती *f*, -HUNTER धनवान स्त्रीशीं लग्न करून सधन होऊं इच्छिणारा. -TELLER दैव सांगणारा, डाकोता जोशी, दैवज्ञ, पिंगळा.—FORTUNATE *a.* भाग्याचा, दैववान्; coming by good luck दैवानें प्राप्त झालेला, सुभाग्याचा; auspicious शुभ, मंगलदायक. -LY *ad.* दैवानें, दैवयोगानें.

FORTY* *a.* चाळीस.—*n.* चाळीसाचा अंक; चाळिसाची संख्या *f*; an aggregate of f. चाळिसी *f*.—FORTIETH *a.* चाळिसावा.

FORUM (*L.*) न्यायाधिशाची कचेरी *f*, कोडत *n*; [a market-place in Rome, where causes were judicially tried, and orations delivered to the people].

FORWARD -S* *ad.* पुढें. —FORWARD *a.* पुढचा; less reserved or modest than is proper उद्दाम, निर्भीड, धीट; ardent उत्कंठित, उत्सुक; advanced beyond the usual degree पुढें गेलेला, सारलेला; too hasty उतावळा, अधीर. —*v.* send onward पुढें पाठविणें, पेंड पोंचवणें; advance वाढविणें, वृद्धि क., योग्यतेस चढविणें [from, to]. -NESS उत्कंठा *f*, उत्सुकता *f*; निर्भिडपणा, धिटाई *f*; prematureness काळाच्या पूर्वीची पक्वता *f*.

FOSSE (*F.*) खंदक.

FOSSIL *a.* (*fodere*, to dig) जमिनींतून खणून काढलेला; जमिनींतून काढलेल्या पदार्था सारखा; changed into stone दगड झालेला (shells). —*n.* जमिनींतून खणून काढलेला पदार्थ, उत्खात द्रव्य *n.*

FOSTER* *v.* nourish पोसणें, पाळणें; cherish बाळगणें, वागवणें (passion). -BROTHER, a male nursed at the same breast, or fed by the same nurse, but not the offspring of the same parents दूधभाऊ. -CHILD पोसणा मुलगा -मुलगी *f.* -ER पोसणारा, पोशिंदा, पालक. -FATHER पालक बाप, धाता. -MOTHER पालक आई *f.* धात्री *f*; nurse दाई *f.* -SON पालक पुत्र, पालक बेटा.

FOUL* *a.* (*Skr. puj*, to be putrid) filthy मळका, मळीण (cloth); obscene बिभत्स, अभद्र, अवाच्य (words); cloudy वाऱ्यावादळाचा, अभ्रें आलेला, ओंधट (weather); loathsome ओंगळ, घाणेरडा (disease); not favorable अप्रतिकूल, उलटा (wind); dishonest अप्रामाणिक, कपटी, कुटिल (play); entangled गुरफाटलेला, गुतागुत झालेला: a rope is f.; a f. copy खरडा, मसुदा; to fall f. भांडणें, हमरीतुमरीवर येणें; to run or fall f. of एकमेकावरं घसरणें -पडणें.—*v.* मळवणें, मळकट क.; गुतविणें, गुतागुत क.—*i.* गुंतणें, गुरफाट्यांत पडणें; आदळणें, आपटणें, घांसणें: the two boats *fouled*. -MOUTHED *a.* तोंडाचा फटकळ, तोंडाळ, तोंडास कुत्रें बांधलेला.

FOUND *v.* (*fundare*) lay the basis of पाया घालणें; establish स्थापणें; fix firmly घट्ट बसविणें, कायम क.; take the first step in erecting or building up पाया घालणें, बांधणें, उठवणें; establish on a basis पायावर स्थापणें, प्रतिष्ठा क. [on]. -ATION स्थापना *f*, स्थापन *n*; पाया; footing आधार, थारा, आश्रा; endowment धर्मादाय, सदोदित धर्मादाय चालण्यासाठीं जमविलेलें द्रव्य *n.* -ER स्थापणारा, संस्थापक;—of a family मूळपुरुष.

FOUND *v.* (do.) धातूचा रस करून सांच्यांत ओतणें, ओतणें. -ER ओतारी. -RY धातु ओतण्याची कला *f* -क्रिया *f*; धातूचा रस ओतण्याचा कारखाना.

FOUNDER *v. i.* (do.) पाणी भरून बुडणें, पाण्यांत गर्क होणें; stumble and go lame, as a horse अडखळून पडून लंगडा होणें -लंगडत जाणें -चालणें.—*t.* (घोड्याचा) पाय सुजवून अधू क. -लंगडा क.

FOUNT, -AIN (*fons*) a spring झरा; a jet कारंजें *n*, फवारा; first cause मूल *n*, आदिकारण *n*, खाण *f*, उगम, झरा.

FOUR* *a.* चार. -FOLD *a.* चौपट, चतुर्गुण. -FOOTED *a.* चार पायांचा, चतुष्पाद. -SCORE चारविसा, ऐंशी. -SQUARE *a.* चौकोनी. -TEEN *a.* चौदा. -TEENTH *a.* चौदावा—FOURTH *a.* चौथा, चतुर्थ. -LY *ad.* चौथ्या वेळीं, चौथ्यानें, चौथेंदा.

FOWL* a bird पांखरूं *n*, पक्षी; a cock or hen कोंबडें *n.*—*v. i.* पांखरांची पारध क. -ING पांखरपारधी, फांसेपारधी, व्याध. -ING-PIECE पांखरांच्या शिकारीची बंदूक *f*, शिकारी बंदूक *f.*

FOX* कोल्हा, खोकड; a cunning fellow धूर्त्त गडी -माणूस. -HOUND कोल्ह्याची पारध करणारा कुत्रा.

FRACTION (*frangere*, to break) तुकडा, अंश; *Arith.* अपूर्णांक; compound f. प्रभागजाति अ०; vulgar f. व्यवहारी अ०; proper f. सम अ०; decimal f. दशांश अ०. -AL *a.* अपूर्णांकाचा.—FRACTIOUS *a.* तुसडा, तुटसाळ (man).—FRACTURE फुटणें *n*, भंग; भंग *f*, फूट *f*, चीर *f*; *Surg.* breaking of a bone अस्थिभंग; [compound f., a f. in which there is an open wound from the surface down to the f.; simple f., a f. in

which only the bone is divided].—FRAGILE *a.* फुटीर, नाजूक, भंगशील. — FRAGILITY फुटीरपणा, भंगुरता *f.*—FRAGMENT तुकडा, खंड, चूर ; an imperfect part अपूर्ण अंश, भाग.

FRAGRANT *a.* (*fragrare,* to emit a smell) सुवासाचा, सुवासिक.—FRAGRANCE सुवास, सुगंध.

FRAIL *a.* (*frangere,* to break) easily broken फुटीर, तुटीर, फुसका ; weak अशक्त, नबला ; weak in resolution अस्थिर, चंचलबुद्धि. —FRAILTY फुटीरपणा ; अस्थिरबुद्धि *f;* अशक्तता *f,* दौर्बल्य *n;* a f. चूक *f,* चुकून घडलेली गोष्ट *f.*

FRAME* *v.* construct रचणें, करणें, बांधणें (a house); plan बेत क., योजना क.; fabricate थोतांड रचणें, रचणें; adjust जम -जवा बसविणें ; regulate बेतानें चालवणें, वर्त्तवणें; provide with a frame चौकट बसविणें -घालणें.—*n.* बांधणी *f,* रचना *f,* घटना *f;* —as of a picture, window, door, &c. चौकट *f,* घर *n,* सांचा ;—of a building मांडणी *f;*—of a drum, &c. गाडा, खोड *n;* the bodily structure शरिराची काठी *f;* skeleton सांपळा, सांगाडा, खटारा ; scheme बेत, रचना *f,* बंधारण *n;* particular state, as of the mind तबियत *f,* प्रकृति *f.* -WORK चौकट *f,* सांचा.

FRANCHISE *F.* particular privilege conferred by grant from a sovereign or a government सरकारानें दिलेला हक्क ; an immunity from ordinary jurisdiction सूट *f,* माफी *f;* limits of an immunity माफीची हद्द *f;* an asylum आश्रय, आसरा. —*v.* मोकळा क., सूट देणें.

FRANGIBLE *a.* (*frangere,* to break) तुटीर; फुटीर, भंगशील.

FRANK *a. F.* मोकळ्या मनाचा, प्रांजळ, साफ ; licentious बेकैद, स्वच्छंदी.—*v.* send by public conveyance free of expense सरकारी जहाज -गाडी वगैरेंतून फुकट पाठविणें: to f. a person to London; exempt from charge for postage, as a letter पत्राच्या हाशिलाची माफी क. -LY *ad.* निष्कपटानें, मन मोकळें करून. -INCENSE ऊद, धूप.

FRANTIC *a.* (*Gr. phren,* mind) mad वेडा, कावराबावरा, तग्रवग्र ; wild वेडावांकडा, भलताच, स्वच्छंदाचा (abuse).

FRATERNAL *a.* (*frater,* brother) भावांचा, बंधूचा, बंधु, in comp.: f. love बंधुप्रीति *f.*— FRATERNITY भाऊपणा ; a community of men of the same class एका वर्गाचे लोक *pl,* मंडळी *f,* शाई *f.*—FRATERNIZE *v.* बंधुप्रीतीनें -भाऊपणानें एकत्र जमणें -मिळणें.—FRATRICIDE बंधुहत्या *f.*

FRAUD (*fraus*) deception deliberately practised with a view to gaining an unlawful or unfair advantage कपट *n,* ठकबाजी *f,* दगलबाजी *f;* fraudulent procedure दगलबाजीचा व्यापार, कपटी वर्त्तणूक *f.* -ULENCE ठकबाजी *f,* कापट्य *n.* -ULENT *a.* कपटी, दगेखोर ; कपटाचा, दगाबाजीचा (bargain) ; कपटानें मिळविलेला (conquest).

FRAUGHT *a. Ger.* भरलेला, पूर्ण, भरपूर.

FRAY (See AFFRAY) भांडण *n,* कलागत *f,* कलह. —*v.* (*fricare,* to rub) घांसणें, घर्षणें ; wear off by rubbing घांसून झिजविणें -जीर्ण क.

FREAK * लहर *f,* हुक्की *f,* तरंग. -FUL, -ISH *a.* लहरी, छंदी, तबियती.

FREE* *a.* (*Skr. prija,* beloved) exempt from subjection to the will of others स्वाधीन, स्वतंत्र, स्वेच्छ ; not under an arbitrary or despotic government मोकळा, सुटा, व्यवहार -धर्मसंबंधी गोष्टींत राजापासून मोकळीक भोगणारा ; liberated, by arriving at a certain age, from the control of parents, guardian, or master मोकळा, स्वतंत्र, वयांत आलेला, दास्यत्वांतून सुटलेला,

इ० ; not confined, liberated सुटा, मुक्त, मोकळा, खुला; endowed with moral liberty ;—said of the will स्वतंत्र, स्वेच्छाधीन ; guiltless निर्दोष, दोषरहित, मुक्त : my heart is f.; frank, familiar मनाचा मोकळा, खळबळीत : he was f. only with a few; licentious स्वच्छंदी,बेकैद, मोकळा ; liberal मोकळ्या हाताचा, सढळ, उदार; separated अलग, मोकळा, विभक्त, सुटा ; exempt मोकळा, रहित [from, of] ; easy सुलभ, हलका; thrown wholly open or made entirely accessible सर्वांस मोकळा, सर्वांनीं वापरायाचा, मुक्त : the streets are f. for me; gratuitous फुकट, बिन पैशाचा (admission) ; not arbitrary or despotic कायद्या प्रमाणें चालणारा, निर्बंधाचा (government, institution) ; defending individual rights against encroachment by any person, or class मनुष्याच्या हक्काचें रक्षण करणारा (government);—as land माफी ;—as letters बेमहसूल.—*v.* मोकळा क., बंदखुलास क.; सोडणें, माफी क.; प्रतिबंधांतून -अटकावांतून काढणें [from, of]. -BOOTER लुटारू, पुंड. -BORN जन्मापासून स्वतंत्र. -DOM मोकळेपणा, स्वातंत्र्य *n*; franchise मुभा *f*, सूट *f*, माफी *f*; मनाचा मोकळेपणा, प्रागल्भ्य *n*; खळबळीत -घळघळीतपणा; हातवटी *f*, कसरत *f*; बेकैदपणा, अमर्यादपणा, निरंकुशता *f*. -HOLD वतन *n*, मिरास *f*. -LY *ad*. मोकळेपणानें ; सढळपणानें; खळबळीतपणानें; पुष्कळ, अतिशय; फुकट, मोलावांचून (Matth. x. 8); खुशाल, स्वस्थ,बेलाशक. -MAN जो दुसऱ्याचा दास किंवा ताबेदार नव्हे तो, स्वतंत्र मनुष्य; one who enjoys or is entitled to a franchise or peculiar privilege विशेष हक्क भोगणारा मनुष्य. -MASON एक गुप्त मंडळी आहे तिचा सभासद *n*. -MASONRY त्या मंडळीचे नियम, मतें इ०. -THINKER ईश्वरोक्त शास्त्र न मानणारा, नास्तिक, चार्वाक. -WILL, a will free from improper coercion राजी *f*, खुशी *f*, स्वतंत्र इच्छा *f*, स्वसंतोष ; the power asserted of moral beings of choosing or willing without the restraint of natural or physical necessity स्वेच्छाकर्तृत्व *n*, मुखत्यारी *f*; doctrine of f. पौरुषवाद.—*a*. आपखुशीचा, स्वसंतोषाचा.—FREEDMAN दास्यत्वांतून मुक्त केलेला मनुष्य.

FREEZE* *v. i.* become congealed by cold गोठणें, गारठणें, थिजणें ; become chilled with cold थंडीनें गारवठणें, थंड होणें.—*t.* गोठविणें ; थंडी भरविणें, सर्द क.

FREIGHT (See FRAUGHT) cargo भरताड *n*, बारदान *n*; that which is paid for the transportation of merchandise नोर, भाडें *n*. —*v*. गलबतावर किंवा गाडींत माल भरणें; load लादणें, भरती क. [with].

FRENCH *a*. (*Franci*) फ्रान्स देशाचा, फ्रेंच लोकांचा.—*n*. फ्रेंचभाषा *f*; फ्रेंचलोक *pl*, फराशीस *pl*.

FRENZY (See FRANTIC) वेड *n*, उन्माद, कावरेबावरेपणा.

FREQUENT *a*. (*frequens*) often to be met with वारंवार भेटणारा -मिळणारा, वारंवारचा, नित्य ; inclined to indulge in any practice सराव -अभ्यास ठेवणारा, नित्य आचरणारा. *v*. वारंवार जाणें -येणें, जाण्याचा राबता असणें. -LY *ad*. वारंवार, पुनःपुनः.—FREQUENCY पौनःपुन्य *n*.

FRESH* *a*. new and strong ताजा, ताजातवाणा ; lately produced, gathered, or prepared for market नवा, कोरा, ताजा (goods);—as meats, vegetables ताजा, साजूक ; lately come or made public नवा, आलीकडचा, नवसर (news) ; recently taken from a well or spring ताजा, थंड (water) ; unpractised नवा, नवशिका, राबलेला नाहीं असा : a f. hand in a ship ; cool थंड, शितळ (wind) ; not salt गोडा (water) ; in distinction from that which is pickled,

as meat ताजा, न खारलेला; as plants टवटवीत, लुसलुसीत; brisk ताजा, हुशार.—*n.* a pool of fresh water गोडें पाण्याचा झरा -चें कुंड *n*; a flood पूर, लोंढा, रेल; [the mingling of fresh water with salt water in rivers or bays, as by means of a flood of fresh water flowing toward or into the sea]. -EN *v.* ताजा -गोडा क., खारटपणा काढणें (water). — *i.* गोडा होणें, खारटपणा गमावणें -जाणें. -MAN नवशीक, नवा; [a student during his first year's residence at a college]. -NESS ताजेपणा, साजूकपणा; गोडी *f*; टवटवी *f*, तुकतुकी *f*, पाणी *n*; हुशारी *f*, तेजी *f*;—of the air गुलाबी थंडी *f*.

FRET* *v.* rub चोळवटणें, घांसणें, चोळणें, (cloth); wear away झिजविणें, जीर्ण क.; variegate चित्रविचित्र क., नवा रंग देणें: gray lines that f. the clouds; ornament with raised work कशिदा -वेलबुट्टी काढणें; disturb ढवळणें, क्षुब्ध क.; हलवणें, चाळवणें: to f. the surface of water; tease चिडवणें, खिजवणें;—one's self कुसमुसणें [at, for]. —*i.* झिजणें, घांसटणें; क्षोभणें, ढवळणें; fume धुसमुसणें, चिवचिवणें; as the skin through a blister तडतडणें.—*n.* खळखळ *f*; चिरड *f*, खिजवणी *f*; कुसमूस *f*, कुरकूर *f*; कशियाचें -वेलबुटीचें काम *n*. -FUL *a.* चिरडखोर, पिरपिऱ्या.

FRIABLE *a.* (*friare*, to break) पिठूळ, पिठा, भुसभुसीत.—FRIABILITY पिठुळपणा, पिठेपणा.

FRIAR (*frater*, brother) सन्यासी, जोगी, गोसावी (रोमन क्याथोलिक पंथाचा.)

FRICTION (*fricare*, to rub) घांसणें *n*, घर्षण, *n*; *Med.* मर्दन *n*.

FRIDAY* शुक्रवार.

FRIEND* one who, entertaining for another sentiments of esteem, respect, and affection, from personal predilection, seeks his society and welfare मित्र, सखा, स्नेही; one not inimical मित्र; favorer पुरस्कर्ता, अनुकूल; [one of the religious sect usually called *Quakers* by those not of the sect]; a term of salutation गडी, मित्र. -LINESS मित्रत्व *n*, स्नेहभाव, -LY *a.* मैत्रीचा, स्नेहभावाचा; befitting a friend मित्रांस योग्य -गोड; not hostile मित्रत्वाचा, सख्यत्वाचा; अनुकूल, सुप्रसन्न [to]. -SHIP, attachment to a person, proceeding from intimate acquaintance and a reciprocation of kind offices, or from a favorable opinion of the amiable and respectable qualities of his mind मैत्री *f*, सख्यत्व *n*, स्नेहभाव; intimacy सलगी *f*, दाटमैत्री *f*; kindness उपकार, आभार; help सहाय [for].

FRIGATE *F.* लहान जातीचें लढाऊ गलबत *n*.

FRIGHT* *v.* भिवविणें, भेदरावणें [with].—*n.* वचक *f*, धास्ती *f*, धकधक *f*. -EN *v.* भिवविणें, भेडावणें. -FUL *a.* भ्यालेला, घाबरलेला, भयभरित, भयाभीत झालेला: see how the f. herds run from the wood; exciting alarm भयंकर, अक्राळ विक्राळ, घोर, भयोत्पादक (tempest).

FRIGID *a.* (*frigere*, to be cold) थंड, सर्द, शितळ; unfeeling शिथिल, निस्नेह. -ITY थंडी *f*; शिथिलता *f*, मंदी *f*, शैथिल्य *n*.—FRIGORIFIC *a.* (-*facere*, to make) शैत्यकारक, शितोत्पादक.

FRINGE *F.* झालर *f*, लकेरी *f*.

FRIPPERY *F.* old clothes जुनीं पुराणीं पांघुरणें *n pl*; place where old clothes are sold जुनीं पांघुरणें विकण्याची जागा *f*.

FRISK *v. i.* *Ger.* नाचणें, बागडणें; — as deer, horses, &c. ठिकणें, नाचणें;—dogs, kids, &c. बागडणें, नाचणें.—*n.* खिदडा, नाच; wild, boisterous f. थैथया, धिंगाणा.—FRISKY *a.* नाचरा, ठिकरा, मौज्या.

Frith, Firth *Scot.* खाडी *f.*

Fritter (*frigere*, to fry) मासाचा तळलेला तुकडा; fragment तुकडा, खंड *n.*—*v.* तळण्याकरितां (मासाचे) तुकडे कापणें -फोडी पाडणें.

Frivolous *a.* (*frivolus*) हलका, क्षुल्लक, पोकळ, छिचोर.—Frivolity हलकट -पोकळपणा, छिचोरी *f.*

Fro* *ad.* पासून, हून; to and f. इकडे तिकडे, एथून तेथवर, तेथून एथवर.

Frock *F.* an upper coat वरचा अंगरखा, डगला; a gown for children झबलें *n*, 'फ्राक.'

Frog* बेडूक, बेडकी *f*;—of a horse's foot पुतळी *f*, बेडकी *f.*

Frolic *Ger.* खेळ, मौज *f*, कौतुक *n.*—*v.* खेळणें, मौजा मारणें, कौतुक क. [with]. -some *a.* खुशामौज्या, रंगेल, ख्याली.

From* *prep.* हून, पासून, कडून; f. house to h. घरोघर; f. above वरून; f. below खालून; f. behind मागून; f. far दुरून; f. fear भयानें; f. birth जन्मापासून, जन्मतः.

Front (*frons*) forehead कपाळ *n*; face तोंड *n*; a bold f. नाक *n*, तिखें *n*; fore part समोरचा भाग, तोंड *n*, पुरोभाग, अंग *n*;—of an army अगाडी *f*, बिनी *f*; in f. of समोर, मोहरे; f. to f. रुबरू; from in f. of समोरून, मोहरून; unblushing f. उघडामाथा. —*v.* समोर उभा राहणें, भेटणें; समोर -सम्मुख असणें: his house *fronts* the church; adorn in front समोर -दर्शनी -सुशोभित क.—*a.* समोरचा, दर्शनी. -al *a.* कपाळाचा, ललाट संबंधी; समोरचा.—*n.* कपाळपट्टी *f*; *Med.* कपाळास लावायाचा लेप -चें औषध *n.* -ier सरहद्द *f*, सीमा *f*, लगता.—*a.* लगत्याचा, सरहद्दीवरचा. -ispiece दर्शनपट्टी *f*, इमारतीचें दर्शनी अंग *n*; —of a book ग्रंथाच्या आरंभीचें चित्र *n.* -less *a.* निलाजरा, बेशरम. -let कपाळपट्टी *f*; रागाची क्रोधमुद्रा *f.*

Frost* act of freezing गोठणें *n*; severe cold गारठा, कडक हिंव *n*; frozen dew हिमतुषार.—Frosty *a.* हिमउत्पादक; गारठ्याचा, हिंवाचा, हैम (night); पांढरा, शुभ्र, पिकलेला (head).

Froth* foam फेंस, फेण; empty show फुशारकी *f*, फुशारी *f.*—*v.* फेंस आणणें; फेंसानें भरणें -भरिवणें: a horse *froths* his chain.—*i.* फेंस येणें, फेंसळणें, फेणणें; up दरदरणें.—Frothy *a.* फेसाळलेला; पोकळ, शून्य, फोल (speaker); फुशारकीचा, फुशारीचा.

Froward* *a.* perverse करनकर, व्रात्य, वक्र (child); not willing to yield हट्टी, जिद्दखोर.

Frown *v. F.* contract the brow in displeasure, severity, or sternness (रागानें) कपाळास अठी घालणें, भुवया चढवणें; manifest displeasure राग दाखविणें, रागें भरणें, खप्पा होणें [on, upon, at].—*v.* कपाळाची अठी *f*, खप्पा मर्जी *f*, राग.

Frowzy *a. Pro. Eng.* उबट, कुबट.

Frozen *p. a.* गोठलेला, गारठलेला.

Fructify, See under Fruit.

Frugal *a.* (*fruges*, grain) बेतानें खर्च -वापर करणारा, मितव्ययी, काटकसऱ्या. -ity काटकसर *f*, मितव्यय.

Fruit (*fructus*, product) whatever is produced for the enjoyment of man or animals by the process of vegetable growth फळ *n*; the juicy, pulpy product of certain plants फळ *n*, फळें *n pl*, मेवा; product फळ *n*, उपज; result फळ *n*, परिणाम; offspring संतान *n*, आपत्य *n.* -age फळफळावळ *f*, फळें *n pl*, मेवा. -erer फळविक्या. -ful *a.* सफळ, फळवान; सुबत्ता (season); rich मातबर, सुपीक, चिकण (soil); prolific बहुप्रसव, अवंध्य (wife) [of, in]. -less *a.* निष्फळ, व्यर्थ, निरर्थक. -tree फळझाड *n.* — Fruition भोग, उपभोग. —

FRUCTIFY *v.* फलप्रद क., पिकास आणणें, सुपीक क.—FRUCTIFICATION सफलीकरण *n.*

FRUSTRATE *v.* (*frustra,* in vain) मोडणें, निर्फळ -निरर्थक क. (a plan); nullify रद्द क., मोडणें (a deed) [by, in].

FRY *v. t.* & *i.* (*frigere*) तळणें; undergo the action of fire or extreme heat तळतळणें, पोळणें [in].—*n.* तळलेला पदार्थ, तळण *n.*—*F.* लहान मास्यांचा -चिंगळ्यांचा थवा. -ING-PAN कढई *f,* तळणी *f*; to fall out of the f. into the fire फुपाट्यांतून निघून आगींत पडणें.

FUDGE (?) गप्प *f,* कहाणी *f.*

FUEL (*focus,* hearth) सरपण *n,* जळण *n*; any thing that serves to feed or increase flame, heat, or excitement आगीवर तेल *n,* पेटवण *n*; to add f. to fire आगीवर तेल ओतणें *n.*

FUGITIVE *a.* (*fugere,* to flee) पळणारा, पळका; volatile उडून जाणारा, अस्थिर; tender and f. parts of vegetables; uncertain चंचल, क्षणिक, अशाश्वत; flying or escaping from duty, service, danger, &c. भटक्या, पळपट्या, हिंडफिऱ्या.—*n.* पळपट्या, फरारी; दुसऱ्याच्या राज्यांत आश्रयार्थ पळून जाणारा; शासन चुकविण्या करितां पळून जाणारा.

FUGH *interj.* इश्श, इश्शो.

FULCRUM (*L.*) टेंकू, तरफ *f.*

FULFIL * *v.* पूर्ण क., शेवटास नेणें;—as a prophecy, promise, &c. खरा -सत्य करून देणें, प्रत्ययास आणणें;—as a term भरणें, मुद्दत पुरी क. [by]. -ED पूर्ण; संपूर्ण, साधित; one whose wishes are f. पूर्णकाम, कृतार्थ. -MENT पूर्णता *f,* सिद्धि *f,* पूर्ति *f*; बोलल्या प्रमाणें पार क. *n,* उक्तनिर्वाह: the f. of a promise.

FULL * *a.* filled up भरलेला, पूर्ण; copious पुष्कळ, भरपूर, विपुल, चघळ, भक्कम (supply, meal); abounding in व्याप्त, मय, in comp.: चिंतामय *f*; f. of cares; entire सगळा, समग्र;—as ears of corn भरदार;—as voice भरपूर, उद्दाम; f. moon पूर्णचंद्र; f. stop पूर्ण -पूर्णविराम चिन्ह *n* [of].—*n.* भर *f,* भरती *f*; utmost extent सीमा *f,* पराकाष्ठा *f.*—*ad.* तंतोतंत, टांकोटांक; exactly बरोबर, थेट; completely पुरतेपणीं, तब्बल, ताठ. -BLOWN *a.* पुरा फुललेला, पूर्ण, विकसित; fully distended with wind तटतटीत -तट्ट फुगलेला. -GROWN *a.* पुरे वाढीचा, भरदार.—* *v.* कापडास कांजी पाजणें -देणें. -ER कापडास कांजी पाजणारा, परीट, रजक;—fullers' earth खारमाती *f.*

FULMINATE *v. i.* (*fulminare,* to lighten) thunder गडगडणें, गरजणें; thunder forth menaces गरजून -धमकीच्या वाटेनें सांगणें [at, against].

FULSOME * *a.* ओंगळ, किळसवाणा.

FUMBLE *v. i. D.* grope about चांचपणें, चांचपडणें; seek awkwardly अडाण्यावाणी क.; handle much हातानें चाळवणें -शीं खेळणें [about].

FUME (*fumus*) vapor वाफ *f,* बफारा; smoke धूर, धूम; vain imagination वृथाकल्पना *f.*—*v. i.* धुमसणें, धुमणें; be in a rage धुसफुसणें, मुसमुसणें, फुणफुणणें.—FUMIGATE *v.* धूर -धुरी -वाफारा देणें [with].—FUMIGATION वाफारा, धूर, धुकटी *f.*

FUMITORY (do.) पित्तपापडा.

FUN* sport मौज *f,* खेळ, कौतुक *n*; wanton amusement चेष्टा *f,* विनोद, मस्करीचा खेळ. -NY *a.* विनोदाचा, थट्टेचा, मौजेचा.

FUNCTION (*fungi,* to perform) office काम *n,* हुद्दा; duty कर्म *n,* व्यापार; natural or assigned action of any power or faculty of the soul, or of the intellect शक्ति *f,* कर्मशक्ति *f*; activity appropriate to any business or profession कामाची चपळाई *f,*

चलाखी *f*. -ARY कामदार, अमलदार, अधिकारि.

FUND (*fundus*, bottom) a deposit of resources from which supplies are drawn, out of which expenses are provided for, &c. पुंजी *f*, भांडवल *n*, 'फंड' *n*; a full provision of resources पुंजी *f*, भांडवल *n*: f. of good sense; stock of a national debt सरकारास कर्जा दिलेला पैका.—*v*. फंडांत पैसा भरणें; -चें व्याज उत्पन्न होई इतकें फंड जमविणें. -AMENT गुदप्रदेश, अधःप्रदेश, गांड *f*. -AL *a*. मूल -आधारभूत.—*n*. मूलभूत विषय.

FUNERAL (*funus*) ceremony of burying a dead human body प्रेतसंस्कार -क्रिया *f*, मूठमाति *f*; procession of persons attending the burial of the dead प्रेतयात्रा *f*, मसणबोळावा.—*a*. प्रेतयात्रेचा; प्रेतसंस्कार संबंधी; f. fire चिताग्नि, भडाग्नि *f*; rite प्रेतकर्म *n*.

FUNGUS (*L*.) a large natural order of plants, comprehending mushrooms, toadstools, &c. अळंबें *n*, कुतऱ्याचें मूत *n*; excrescence अंगावर वाढलेलें मांस *n*, अवाळू *n*.

FUNNEL (*infundere*, to pour in) an inverted cone with a pipe गळणी *f*, नरसाळें *n*; shaft of a chimney धुराडें *n*.

FUR (*furra*) skin with soft hair लोंकरीची कातडी *f*; soft hair लोंकर *f*, लव *f*;—as upon the tongue बुरा, बुरसी *f*.

FURBISH *v*. *F*. उजळणें, ओप -झिलई देणें [up]. -ER उजळणारा, सिकलगार.

FURIOUS, See under FURY.

FURL *v*. *F*. गुंडाळणें, सुरळी क. [up].

FURLONG* मैलाचा आठवा भाग.

FURLOUGH *D*. *Mil*. रजा *f*, लष्करी रजा *f*.

FURNACE (*fornax*) धातु वगैरेंचा रस करण्याची भट्टी *f*.

FURNISH *v*. *F*. provide पुरवणें; afford देणें; equip सज्ज क.;—as the mind संपन्न -विशिष्ट क.;—a house तयार क., सामान लावून सजविणें -भरणें, संजोगणें [with].—FURNITURE सामान *n*, साहित्य *n*.

FURROW* a trench in the earth made by a plough तास *n*, हरळ; a groove खांचणी *f*, कोरणी *f*.—*v*. तास पाडणें, पाळ्या घालणें [with].

FURTHER* *a*. more remote अधिक दूर, दूरतर, दूरचा; additional अणखी, शिवाय, जास्ती;—*ad*. अधिक लांब; अणखी, खेरीज.—*v*. advance मोठा क., वाढविणें; help सहाय क. [by]. -ANCE वृद्धि *f*, संवर्द्धन *n*; बढती *f*, सरफराजी *f*. -MORE *ad*. or *conj*. अणखी, शिवाय. -MOST *a*. सर्वांच्या पलिकडचा.

FURTIVE *a*. (*fur*, thief) चोरीचा, चोरलेला, चोरीनें मिळवलेला.

FURY (*furere*, to rage) तेष, त्वेष, जाळ; violent passion उन्माद, आवेश, महावेग; a stormy, turbulent, violent woman चंडिका *f*, हडळ *f*.—FURIOUS *a*. आवेशी, साहसी; जबरा, अनर्थाचा, झपाट्याचा (wind); दारुण, तुमल (fighting); उन्मत्त, मदोन्मत्त (animal) [against, at, with].

FUSE *v*. (*fundere*, to pour) वितळणें, रस क., —*i*. रस होणें, वितळणें [with].—FUSIBLE *a*. वितळायाजोगा, द्राव्य, गलनीय. —FUSIBILITY द्राव्यत्व *n*, रस होण्याचा गुण -धर्म.—FUSION आटणें *n*, द्रावण *n*; रस, द्रव; एकीकरण *n* -भवन *n*.

FUSEE *F*. (*fusus*, spindle)—of a watch or clock घड्याळांत सांखळी गुंडाळायाचा एक खिळा असतो तो.

FUSIL लहान बंदूक *f*. -EER लहान बंदूकवाला शिपाई, 'फुजलीर.'

FUST (*fustis*, stick) shaft of a column स्तंभदंड.—*F*. उबट वास, दुर्गंध.

FUTILE *a*. (*futilis*, that easily pours out) trifling हलका, क्षुल्लक, पोकळ; f. in effect निरर्थक, निष्फल.—FUTILITY हलकेपणा, &c.

FUTURE *a.* (*futurus*) पुढला, पुढील, होणारा. —*n.* पुढला -येणार काळ; events that are to happen in time to come होणार गोष्टी *f pl*, होतव्य *n*, भवितव्य *n*.—FUTURITY पुढील काळ, भविष्यकाल; होणार गोष्ट *f*.

FY *F. int.* छी, धिक्, छीछी.

G.

GAB *D.* mouth तोंड *n*; prate बडबड *f*. -BLE *v.i.* बरळणें, बडबड क.—*n.* बडबड *f*, बरळणें *n* (over, about).

GABLE *Ger.* चांदई *f*.

GAD* *v. i.* भटकणें, हिंडणें [about]. -ABOUT पंचाळ. -FLY गोमाशी *f*.

GÆRTNERA RACEMOSA (*L.*) कस्तुरीमोगरा, मधुमाधवी *f*, वासंती *f*.

GAG* *v.* stop the mouth of, by thrusting in some thing तोंडांत बोळाघालणें, तोंड कोंडणें; silence by authority or by violence अधिकारानें किंवा जबरीनें तोंड बंद क. -बोलण्याची बंदी क.; hold open by means of a gag बोळा घालून उघडा ठेवणें; keck उमाळा आणणें [with].—*n.* तोंड कोंडण्याचा बोळा; उमाळा आणणारा घांस.

GAGE *v. F.* पैजेचा विडा -ची खूण *f*; परिमाणमापक यंत्र *n*, परिमाण *n*.

GAIETY, See under GAY.

GAIN *v. F.* get, as profit मिळवणें, मिळकत -कमाई क., नफा मिळवणें; come off victor in मिळवणें, जय मिळवणें, जिंकणें; win to one's side पक्षास मिळवणें; reach पावणें, पोंचणें, सई क.;—ground पाय शिरकवणें, वाढणें; over मन वळवणें, आपल्या पक्षाचा क. [by, at, from]. —*i.* have advantage फायदा -लाभ असणें; grow rich वाढणें (Ezek. xxii. 12);—on, upon दुसऱ्याच्या अधिकारांत शिरणें; वर्चस्व असणें; चालणें, चलती असणें.—*n.* मिळकत *f*, प्राप्ति *f*, फायदा; accumulation संग्रह, संचय, सांठा: the lust of g.

GAINSAY *v.* (*against* and *say*) दुसऱ्याचें बोलणें खंडणें, वाद क., उलट सांगणें.

GAIT* जाणें *n*, चालणें *n*; manner of walking चालण्याची ढब *f*, चाल *f*; solemn or stately g. गजगति *f*.

GALA *Sp.* आनंद, उत्सव; g. day आनंदाचा -सणाचा दिवस.

GALINGAL (*L.*) कोष्टकोलिंजन *n*.

GALAXY (*Gr. gala*, milk) the Milky Way आकाशगंगा *f*, स्वर्गंगा *f*, दूधगंगा *f*; assemblage of splendid persons or things शोभिवंत पुरुषांचा किंवा वस्तूंचा समुच्चय.

GALBANUM (*L.*) गंधबिरूजा, हिंगड्याची एक जात आहे.

GALE *Ir.* (*Skr. djala*, cold) वावटळ *f*, महावात.

GALL* the bitter, alkaline, viscid liquid found in the gall-bladder, beneath the liver पित्त *n*?; spite दावा, अकस.—*v. F.* fret and wear away by friction चोळवटणें, घांसणें; vex छळणें, जाचणें, काचणें; annoy त्रास -उपद्रव देणें [with, by].—*n.* (*galla*) मायफळ *n*; black g. काळामाजा; white g. गोरामाजा.

GALLANT *a. F.* showy भडक, छानदार; high-spirited छातीचा, मर्द, प्रतापशाली; courteous to women स्त्रीसन्मानी, स्त्र्युपासनशील. —*n.* हौसी, विलासी, खुशालचंद; one who woos लग्नासाठीं स्त्रीची खुशामत करणारा; in a bad sense, a seducer धगड, यार, जार. -LY *ad.* शूरपणानें, मर्दाईनें. -RY शौर्य *n*, मर्दाई *f*, पराक्रम; स्त्रीयांचा सत्कार, स्त्रीसन्मान; इष्कबाजी *f*.

GALLERY *F.* a long and narrow place for walking दालन *n*?; a room for the exhibition of works of art कळाकुसरीचे पदार्थ दाखविण्याची खोली *f*; covered terrace outside of a house सज्जा; in churches &c.

देऊळ, नाटकगृह इ० स्थळीं पायऱ्या प्रमाणें चढती व उंच असी बसायासाठीं केलेली जागा *f.*

GALLEY (*galea*) शिडें व वल्हीं यांनीं हकारायाचें गलबत *n*; *Print.* a frame which receives the types from the composing stick 'ग्याली' *f*; cookroom of a ship of war लढाऊ गलबताची स्वयंपाकाची खोली *f.* -SLAVE 'ग्याली' जहाजावर चाकरी करण्याची शिक्षा पावलेला अपराधी -चा कैदी.

GALLINACEOUS *a.* (*gallus*, cock) गृहकुक्कुट संबंधी, घरकोंबड्याचा.

GALLON *F.* पातळ पदार्थ मोजण्याचें पुणेरी पांच शेराचें किंवा साधारण चार बाटल्यांचें माप *n.*

GALLOP *v. i. F.* भरधांव चालणें -पळणें [off, about].—*n.* भरधांव *f*, दौडचाल *f.*

GALLOWS * फांशीं देण्याचा -फांशीचा खांब.

GAMBLE, See under GAME.

GAME* sport खेळ *f*, कौतुक *n*; amusement मौज *f*, गमत *f*, खेळ; a single match at play डाव, हात; that which is gained, as the stake in a game पैज *f*, पण; animals pursued and taken by sportsmen शिकार *f*, पारध *f*; plan बेत, मसलत *f.*—*v.* खेळणें, क्रीडा क.; gamble जुवा खेळणें [for, with]. -KEEPER वनपशु -पक्षी पाळणारा. -STER पैज लावून खेळणारा; जुवेबाज, जुगारी.—GAMBLE *v.i.* जुगार -जुवा खेळणें.—GAMBLER जुवेबाज, जुगाऱ्या.—GAMING-HOUSE शिकारखाना.

GAMBOGE (from *Cambodia*) रेवाचिनीचा शिरा.

GAMUT (*Gr. gamma*, third letter of the Greek alphabet, *ut*, name of a musical note) ग्राम, सरिगम *f.*

GANDER * हंस.

GANG * थवा, गट्टा, टोळी *f.* -WAY रस्ता, वाट *f*; गलबतावर जाण्याचें दार *n.*

GANGRENE (*Gr. -grainein*, to gnaw) एक रोग आहे, याकडून शरिराचें मांस नासकें, मऊ, ओलसर, थलथलीत व दुर्गंधयुक्त होतें, मांसपूति *f.*—*v.* सडणें, मांस कुजणें.

GANTLET, GANTELOPE, a military punishment. The offender is made to run between two files of men facing one another, who strike him as he passes एक प्रकारची लष्करी शिक्षा आहे; [to run the g., to suffer the punishment of the g.; to go through severe criticism or controversy, or ill treatment].

GAOL *F.* तुरुंग, बंदिखाना. -ER तुरुंगावरचा अधिकारी, 'जेलर.' -DELIVERY, *Law*, a clearing the jail of persons confined in it for trial by trying them बंदखुलास, 'जेल डिलिवरी' *f.*

GAP *Icel.* खिंड *f*, भगाड *n*;—in the teeth खांड *f.*

GAPE *v.* open the mouth wide तोंड पसरणें -विचकटणें;—as for food आ पसरून -करून अन्न मागणें; yawn जांभई देणें.—*n.* खिंड *f*, खांड *f.* -TOOTHED दांतपडका, बोथरा, बोथरखिंड्या.

GARB *F.* पोषाक, लिभास.

GARBAGE* गाळसाळ, गदळ *n.*

GARBLE *v.* (*cribellum*, sieve) गाळणें, गाळून लिहिणें.

GARDEN* बाग *m, f*, बगीचा, उपवन *n*; flower-g. पुष्पवाटिका *f*, फुलबाग; kitchen-g. मळा. -ER माळी, बागवान; a g. who cultivates cumin and other aromatic seeds जिरेमाळी; a g. who grows flowers फुलमाळी. -GROUND बागाईत *n*, बागाइती जमीन *f.* -PLOT वाफा, तक्ता. -STUFF माळवें *n.*

GARDENIA LATIFOLIA (*L.*) पित्तपापडा.

GARGLE *Ger.* गुळणा करायाचें औषध *n*; गुळणी *f*, गुळण्या *f pl.*—*v.* गुळणा क.

GARLAND *F.* माळा *f*, हार;—of flowers पुष्पहार;— of pearls मुक्ताहार;— of wild

flowers वनमाला *f*; a collection of little printed pieces ग्रंथमाला *f*.

Garlic* लसूण *m,f*.

Garment *F*. पांघरूण *n*, वस्त्रप्रावर्ण *n*.

Garner. (See Grain.) See Granary.

Garnet (do.) a gem of a red color याकूत.

Garnish *v*. *F*. सजवणें, सुशोभित क. [with].

Garret *F*. शेवटल्या मजल्यावरची -छपराच्या खालची खोली *f*, पोटमाळा.

INTERPRET *v.* (*interpres,* interpreter) explain the meaning of अर्थ -उलगडा क.; तरजुमा क. (language); define व्याख्या क.; unfold the intent or reason of आशय -अभिप्राय सांगणें, -चें कारण दाखविणें, सांगणें, अर्थ सांगणें (dreams); as an enigma सांगणें, जिंकणें [between].—INTERPRETATION अर्थ करणें *n,* व्याख्यान *n,* विवरण *n;* अर्थ, उलगडा, खुलासा;—of dreams स्वप्नविचार; exposition व्याख्या *f,* टीका *f.*— INTERPRETER अर्थकरणारा, अर्थप्रकाशक;—of dreams स्वप्नप्रकाशक; translator भाषांतर करणारा, दुभाषी.

INTERREGNUM (*-regnum,* reign) पाहिला राजा मेल्यापासून किंवा गादी सोडून गेल्यापासून त्याच्या जागीं दुसरा होई पर्यंतचा मधला काळ; राज्यकारभार चालविणाऱ्या प्रधानमंडळीच्या बदलीचा काळ.

INTERROGATE *v.* (*-rogare,* to ask) रीती प्रमाणें सवाल क., प्रश्न विचारून चौकशी क., विचारपूस क.—INTERROGATION प्रश्न -सवाल करणें *n;* सवाल, प्रश्न; note [?] that marks a question प्रश्नचिन्ह *n.*—INTERROGATIVE *a.* प्रश्नाचा, प्रश्नरूप.—*n. Gram.* प्रश्नार्थक शब्द -सर्वनाम *n,* क्रियाविशेषण इ०.

INTERRUPT *v.* (*-rumpere,* to burst) भंग -खंड क.; interfere with the current or motion of मोडा घालणें, अडथळा क.; break the order of क्रमभंग क. [in]. -ION मोडा, व्यत्यय, हरकत *f,* अडथळा; खंड, भंग; गतिभंग, क्रमभंग.

INTERSECT *v.* (*-secare,* to cut) छेदणें, दुभागणें. —*i.* परस्पर छेदून जाणें. -ED दुभागलेला, परिछिन्न. -ION परिच्छेद, विच्छेद.

INTERSPERSE *v.* (*-spargere,* to scatter) मध्यें मध्यें टाकणें -पसरणें, फेंकणें [among].

INTERSTICE (*-sistere,* to stand) फट *f,* चीर *f,* सांध *f,* भेग *f*.

INTERTWINE *v. t & i* गुंतविणें -गुंफणें, गांठविणें, गाठणें; गुतणें.

INTERVAL (*-vallus,* stake) space between two things पदार्थांमधलें अंतर *n,* अवकाश; space of time between any two points or events अवकाश, अवधि, कालांतर *n,* फुरसत *f*; remission खंड, तुट *f*: i. of peace; without i. निरंतर; at *intervals* राहून राहून, वारंवार.

INTERVENE *v. i.* (*-venire,* to come) दोन वस्तूंच्या मध्यें येणें, आड येणें; occur, fall, or come between points of time or events काळाच्या -गोष्टीच्या मध्यें येणें -घडणें -पडणें; happen in a way to disturb, cross, or interrupt विघ्न -अडथळा -व्यत्यय -मोडा येणें [between].—*t.* -च्या मध्यें येणें इ०.—INTERVENTION मध्यें येणें *n,* व्यवधान *n*; mediation मध्यस्थी *f*.

INTERVIEW, mutual sight अन्योन्यदर्शन *n,* दृष्टादृष्ट *f*; formal meeting for some conference on an important subject भेट *f,* मुलाखत *f*; a conference बैठक *f,* प्रसंग, सभा *f*.

INTERVOLVE *v.* (*-volvere,* to roll) एकमेकांत गुंतविणें -गांठवणें.

INTERWEAVE *v.* विणणें, गांठणें.

INTESTABLE *a.* (*-testis,* a witness) मृत्युपत्र करण्यास अयोग्य -नालायक.—INTESTACY मृत्युपत्र केल्याशिवाय मरणें.—INTESTATE *a.* मृत्युपत्र केल्याशिवाय मरणारा; मृत्युपत्रहीन; मृत्युपत्रानें न दिलेला (estate).—*n.* मृत्युपत्र केल्याशिवाय मेलेला मनुष्य -ली असामी *f*.

INTESTINE *a.* (*intus,* within) आंतला, आंतील (disease); depending upon the internal constitution of a body आंतल्या व्यवस्थेवर अवलंबून राहणारा; domestic घरगुती, घरांतला, आपसांतला (war, enemies, troubles).—*n.* आंतडें *n pl*; आंतडीं *n pl*.—INTESTINAL *a.* आंतड्यांचा, अंत्रसंबंधी.

INTHRAL, See ENTHRALL.

INTIMATE *v.* (*intimus,* the inmost) आंतला, अंतरींचा; near जवळचा, सन्निध; familiar सलगीचा, घसणीचा, दाट, जिवलग: i. acquaintance, friendship सलगीचा मित्र, सखा [with].—*v.* खबर -सूचना देणें, सुचवणें; [to]. — INTIMACY सलगी *f,* जिवलगपणा, सख्य *n*.—INTIMATION सूचना *f,* कच्ची बातमी, खबर *f*.

INTIMIDATE *v.* (*-timidus,* fearful) भेडसाविणें, दटावणें [by, with]. — INTIMIDATION भेडावणी *f,* दटावणी *f*;—the state दहशत *f*.

INTO *prep.** आंत, मध्यें.

INTOLERABLE *a.* सोसवेनासा, असह्य (pain); not right to be allowed अक्षमनीय, क्षमा करवेनासा. INTOLERABLY *ad.* सोसवेना असें.—INTOLERANT *a.* असोशिक, अक्षम; not enduring difference of opinion or sentiment, esp. in relation to religion दुसऱ्याचें मत, अथवा धर्मभेद न सोसणारा, परमतासह.

INTONATION (*tonus,* sound) स्वरभेद; deep i. गंभीर स्वर.

INTOXICATE *v.* (*-toxicum,* poison) make drunk (दारूनें) गुंग -मस्त क., कैफ -अमल आणणें; elate to enthusiasm, frenzy, or madness मस्त गुंग क., उन्मत्त क. [with].—INTOXICATION निशा *f,* गुंगी *f,* कैफ, अमल; मस्ती *f,* उन्माद, माज.—INTOXICATING *p. a.* माज आणणारा, उन्मादक, मादक, अमली; i. liquors or drugs अमली जिन्नस.

INTRACTABLE *a.* अडेल, अनिवार, दंडेल (temper); indocile शिकवण -शिक्षा न घेण्या-

जोगा, अशिक्ष्य, दुःशास्य (child).—INTRACTABILITY अडेलपणा, हट्टीपणा, दंडेली *f*.

INTRANSITIVE *a. Gram.* अकर्मक.

INTRAMSMUTABLE *a.* ज्याचा पालट होत नाहीं किंवा करितां येत नाहीं तो, अविकार्य.

INTRENCH *v.* भोंवतालीं खंदक खणणें -क.; fortify with a ditch and parapet खंदक खणून मोर्चा बांधणें, मोर्चेबंदी क.; furrow तास -हरळ पाडणें [on, upon]. -MENT खंदक, मोर्चा; protection आश्रय, रक्षण *n*; encroachment आक्रमण *n*, उल्लंघन *n*.

INTREPID *a.* (*-trepidus*, trembling) छातीचा, धाडस, निर्भय. -ITY छाती *f*, धारिष्ट *n*.

INTRICATE *a.* (*-tricæ*, hindrances) गुतागुतीचा, भानगडीचा, घोटाळ्याचा.—INTRICACY गुतागुत *f*, भानगड *f*.

INTRIGUE *v.* (do.) a complicated plot intended to effect some purpose by secret artifices कुलंगडें *n*, कंत्राट *n* कारस्थान *n*; a secret understanding or commerce of forbidden love between two persons of different sexes कामचारित्र *n* [with, against].—*v.* कंत्राट -कचाट रचणें; कामचरित्र चालविणें.—INTRIGUER कचाट्या, कारस्थानी, कपि.

INTRINSIC, -AL *a.* (*-secus*, side) आंतला-genuine खरा, जातीचा, असल, मुळचा (merit, value).

INTRODUCE *v.* (*-ducere*, to lead) आंत नेणें, प्रवेश करविणें; conduct and make known by formal announcement, proclamation; or recommendation भेट-मुलाखत क.; bring, to be acquainted ओळख करून देणें -देण्यासाठीं आणणें; bring into notice or practice रुढींत -प्रवृत्तींत आणणें, चालू क. (a fashion); begin आरंभ क., चालू क., सुरू क. (a subject) [in, into].—INTRODUCTION चालू करणें *n*, प्रवर्त्तन *n*; भेट करून देणें *n*, मुलाखत *f*; आरंभ; a formal and elaborate preliminary treatise उपोद्घात.—INTRODUCTIVE, -TORY *a.* पूर्वीचा; आरंभींचा; प्रस्तावनारूप (remarks).

INTRUDE *v. i.* (*-trudere*, to thrust) कामावांचून -बोलावल्यावांचून आंत जाणें -येणें, न बोलावतां जाणें -शिरणें; encroach उल्लंघन -आक्रमण क., मर्यादा सोडून जाणें.: to i. on the lands of others.—*t.* कामावांचून -सत्तेवांचून शिरवणें -खुपसणें [on, upon, into].—INTRUDER न बोलावतां जाणारा, आगंतुक, घुसा.—INTRUSION बोलावल्यावांचून येणें -जाणें *n*, अनधिकारपूर्वक प्रवेश.

INTRUST *v.* हवालणें, सोंपणें, विश्वासणें [with, to].

INTUITION (*-tueri*, to look) an act of immediate knowledge, as in perception or consciousness; distinguished from "mediate" knowledge, as in reasoning अंतर्ज्ञान *n*, साहजिक ज्ञान *n*, विचारनिरपेक्षज्ञान *n*; any object or truth discerned by direct cognition अंतर्ज्ञानानें समजण्याची गोष्ट *f*-चा विषय.—INTUITIVE *a.* स्पष्ट पाहणार (vision); पाहतांच कळण्याजोगा, प्रमाणनिरपेक्ष (knowledge); अंतर्ज्ञानानें जाणणारा, अंतर्ज्ञानी.

INUNDATE *v.* (*-undare*, to rise as waves) पूर आणणें, बुडवणें, जलमय क.; fill with an overflowing abundance रेलचेल क., ऊत -पूर -लोट आणून भरणें, -चें पेंव फोडणें [with].—INUNDATION पूर, लोंढा, जलप्रलय; पूर, ऊत, रेलचेल *f*.

INURE *v. F.* सवयींत -घसवटींत आणणें, राबवणें; be or get *inured* घसवटणें, घटणें [to].

INVADE *v.* (*-vadere*, to go) enter, as an enemy, with a view to conquest or plunder स्वारी क.; attack हल्ला क., चढून -चालून जाणें; encroach on उल्लंघन -आक्रमण क.—INVASION हल्ला, चढ; स्वारी *f*, दौड *f*.

Invalid *a.* निर्जीव, निर्बळ; *Law,* void पोकळ, रद्द, निरुपयोगी (contract).—*n.* रोगेला, रोगी मनुष्य; soldier or seaman worn out in service बहुत दिवस नोकरी करून जर्जर झालेला -थकलेला शिपाई किंवा खलाशी. -ate *v.* रद्द क., माजी पाडणें, व्यर्थ -निर्बळ क.; overthrow मोड -खंड -भंग क. (an argument). -ity निर्बळता *f*, पोकळपणा; कायद्याच्या बळाची कोताई *f* -कमजोरी *f*.

Invaluable *a.* अमोलिक, अमूल्य.

Invariable *a.* एकसारखा, स्थिर, निर्विकल्प.—Invariably *ad.* नित्य नेमानें, एकसारखा, सतत.

Inveigh *v.* (*-vehere,* to carry) utter censorious and bitter language against निंदा -निर्भर्त्सना क., ठोमणे मारणें [against].—Invective निंदा *f*, निर्भर्त्सना *f*, निंदात्मक भाषण *n*, ठोमणा.—*a.* निंदेचा, निंदात्मक.

Inveigle *v.* *F.* फुसलावणें, भुलथाप देणें [into].

Invent *v.* (*-venire,* to come) discover, commonly by study or inquiry शोधून काढणें; contrive युक्ति -हिकमत काढणें; fabricate रचणें, बनावणें; in a bad sense खोटा -बनावट क., रचणें. -ion नवी युक्ति *f*, कल्पना *f*, कृति *f*; रचलेली गोष्ट *f*, कल्पना *f*; discovery नवीन काढलेली गोष्ट -वस्तु *f*; —of one's own brain स्वकपोलकल्पित; the power of invention कल्पनाशक्ति *f*, युक्ति *f*; i. to deceive, injure, &c. थोतांड *n*, बालंट *n*. -or युक्ति काढणारा, कल्पक; नवा बनावणारा. -ory, catalogue याद *f*, फेरिस्त *n*; catalogue of all the goods and chattels of a deceased person मयताच्या जिंदगीची याद *f*; to take an i. कलमबंदी क., फेरिस्त क., याद क.

Invert *v.* (*-vertere,* to turn) उलटा-पालथा क., अधोमुख क.; फिरवणें. -ed विपरीत, व्यतिक्रान्त; अधोमुख.—Inverse *a.* उलटा, उफराटा; *Math.* व्यस्त.—Inversion उलटणें *n*; व्यतिक्रम, व्युत्क्रम.

Invest *v.* (*-vestire,* to clothe) नेसवणें, पांघरवणें; confer देणें, दान क.; clothe, as with office or authority अधिकार देणें; *Mil.* surround वेढा -गराडा घालणें; surround with, or place in, as property in business व्यापारांत घालणें, व्याजीं वगैरे लावणें. [with, in]. -iture प्रतिष्ठा *f*, पदस्थापना *f*. -ment—with the sacrificial cord उपनयन *n*;—of goods साटें *n*, खरिदी *f*; *Mil.* वेढा -गराडा घालणें *n*, व्यापारांत -पेढीवर -व्याजीं पैसा गुंतविणें *n*; to buy up the whole of an i. साटें मारणें -घेणें; deed of the purchase of an i. साटेंखत *n*.

Investigate *v.* (*-vestigare,* to track) शोधणें, तपासणें, चौकशी क. [into].—Investigation शोध, तपास, तलाश.

Inveterate *a.* (*-vetus,* old) जुनाट, बहुत दिवसांचा, जडलेला, बद्धमूल (disease); habitual सवयीचा, परिपाठाचा, घटलेला (idler).

Invidious *a.* (See Envy) हेवा उत्पन्न करण्याजोगा, मात्सर्यजनक (affair).

Invigorate *v.* पुष्टी -बळकटी -तेजी आणणें [by, with]. — Invigorating *a.* पौष्टिक, धातुपुष्ट, बलवर्द्धक.—Invigoration पुष्टिकरण *n*, तेजोवर्द्धन *n*; बलोवृद्धि *f*.

Invincible *a.* (*-vincere,* to conquer) अजिंक, दुर्जय; insuperable दुस्तर, अनिवार्य, जबरदस्त (habit) [in, by].

Inviolable *a.* अबाध्य, अपकारायोग्य; not to be profaned अनुलंघनीय (a shrine); not to be broken अभंग, अलंघ (promise, vow).—Inviolate *a.* अभंग, अबाध.

Invisible *a.* अदृश्य; i. green काळ्यारंगासारखा हिरवा रंग जो दिसण्यांत येत नाहीं तो.—Invisibility अदृश्यता *f*, दृष्टयगोचरता *f*.

INVITE *v.* (*invitare*) ask बोलावणें; ask to an entertainment or visit बोलावणें, लग्नकार्यास -मेजवानीस -भेटीस पाचारणें, आमंत्रणें; allure चित्त ओढणें -ओढून घेणें [to].—INVITATION आमंत्रण *n*, पाचारणें *n*, बोलावणें *n*. —INVITING *a.* आकर्षक, मोहक.

INVOCATE *v.* (*-vocare*, to call) address in prayer हाकमारणें, प्रार्थना -धावा क. -मांडणें. —INVOCATION धावा, आवाहन *n*.

INVOICE *F.* a written account of the particulars of merchandise shipped or sent to a purchaser, consignee, factor, with the value or price and charges annexed थेटपट्टी *f*, बीजक *n*, चुलान *n*.

INVOKE, See INVOCATE.

INVOLUNTARY *a.* not having will अस्वाधीन, अस्वेच्छ; independent of will or choice इच्छेबाहेरचा, इच्छानधीन: the motion of the heart is i., but not against the will; opposed to the will इच्छेविरुद्ध, गैर खुशीचा, नाखुशीचा: an i. submission to a master.

INVOLVE *v.* (*-volvere*, to roll) गुंडाळणें, लपेटणें; envelop वेष्टणें, लपेटणें; to i. in darkness; entangle गोवणें, गुंतविणें; connect by way of natural consequence कार्यकारण संबंधानें जोडणें; contain असणें; include by rational or logical construction गर्भित क., अनुमाना वरून निघे असा क.; overwhelm बुडविणें, गर्क क.: to i. in debt; *Arith.* घात देणें [in, by, with].—INVOLVED गुंडाळलेला, वेष्टित; ध्वनित, गर्भित; गुंतलेला, गोवलेला; to be i. सांपडणें; गुरफटलेला, गुंताड्याचा.—INVOLUTION गुंडाळणें *n*, वेष्टन *n*; ध्वनन *n*; जोडणें *n*, ओढून घेणें *n*, आकलन *n*; गुंताडा, गुतागुत *f*; घातकर्म *n*; —of speech लपेट *f*.

INVULNERABLE *a.* incapable of being wounded, or of receiving injury वज्रदेही, वज्रशरीर.

INWARD* *a.* आंतला, आंतील; seated in the mind मनांतला, पोटांतला, अंतस्थ. -LY *ad.* आंतून, आंतल्या बाजूस; मनांत, पोटांत.—*n pl* अंतर्डीं *n pl*.

INWROUGHT *a.* जडित, खचित, भरित.

IOTA (*Gr.*) लवलेश, तिलमात्र *n*, अणु.

IRE (*ira*) राग, क्रोध, द्वेष.—IRASCIBLE *a.* रागीट, तापट, शीघ्रकोपी.

IRIS (*L.*) the rainbow मेघधनुष्य *n*; circle round the pupil of the eye बुबूळ *n*, कनिकामंडळ *n*; a plant श्वेत दुर्वा *f*.

IRISH *a.* ऐर्लंद देशाचा; ऐर्लंद देशांत होणारा.—*n.* ऐर्लंद देशचा राहणारा; ऐरिश भाषा *f*.

IRK *v.* *Scot.* दमवणें, शिणवणें. -SOME *a.* कंटाळा -त्रास येण्याजोगा, त्रासदायक.

IRON* one of the metallic elements लोखंड *n*; utensil made of iron लोखंडाचा डागिना; *pl* fetters बिड्या *f pl*; शृंखला *f pl*; strength शक्ति *f*, बळ *n*, पराक्रम; cast i., or pig i. बीड *n*; malleable i. धावडी लो० *n*; i. filings लो० चा कीस; sulphate of i. हिराकस; oxide of i. लो० चा कीट; wrought i. शुद्ध -निर्मळ लो० *n*; bar i. कांबीचें लो० *n*.—*a.* लोखंडी, लोहमय; resembling iron in color लोहवर्ण; hard कठीण, कडक (age); i. age of the Hindus कलियुग *n*; inflexible हेकड, दुराग्रही (will); robust बळकट, जोरदार (constitution); not to be broken अभंग (sleep); stupid जड, मंद: i.-witted fools.—*v.* smooth with an instrument of iron इस्त्री क.; बेड्या घालणें -ठोकणें; furnish with iron लोखंड -लोखंडी सामान बसविणें (wagon). -BOUND *a.* लोहबद्ध; rugged खडकाळ,

खडबडीत (coast). -CLAD *a.* लोखंडी पत्र्यांनीं मढविलेला.—*n.* लोखंडी पत्र्यांनीं मढविलेलें जहाज *n.* -FOUNDER लोखंडाचा रस ओतणारा. -FOUNDRY लोखंडी रस ओतण्याचा कारखाना. -GRAY धूसर रंग. -MONGER लोखंडी सामान विकणारा. -MOULD, a spot on cloth made by applying rusty iron to the cloth when wet कापडावरला लोखंडाचा डाग. -SMITH लोहार. -WOOD अंजिनी *f.* -WORK लोखंडी काम *n*; *pl* लोखंडी कामाचा कारखाना.

IRONY (*Gr. eiron*, a dissembler in speech) a kind of ridicule which exposes the errors or faults of others by seeming to adopt, approve, or defend them व्याजोक्ति *f*, विपरीतलक्षणा *f*.—IRONICAL *a.* उपरोधिक, व्याजस्तुतीचा.

IRRADIATE *v.* (*-radiare*, to shine) प्रकाशित क.

IRRATIONAL *a.* void of reason ज्ञान -बुद्धिहीन; i. animal हैवान *c*; contrary to reason अयुक्तिक, वेडेपणाचा, बुद्धिविरुद्ध; *Math.* करणीपद *n.* -ITY अजाणपणा, बुद्धिहीनता *f.*

IRRECLAIMABLE *a.* मार्गावर आणायास -परतून मिळवायास अशक्य.

IRRECONCILABLE *a.* असमजुतीचा, अशाम्य; inconsistent परस्परविरुद्ध, संदर्भविरुद्ध, विसंगत.

IRRECOVERABLE *a.* पुनः न मिळण्याजोगा, पुनरलभ्य; not capable of being remedied उपाया बाहेरचा, निरुपाय.

IRREFRAGABLE *a.* खंडन करायास अशक्य, अखंडनीय (proof).

IRREGULAR *a.* बेशिस्त, गैरशिस्त, बेडौल, वांकडा (building); not according to established principles or customs नेमाविरुद्ध, रीती -चाली विरुद्ध, गैरशिस्त, अव्यवस्थित (proceedings); not conformable to nature स्वभाव -सृष्टिनियम विरुद्ध : i. action of the heart; immethodical अव्यवस्थित, क्रमरहित -शून्य (verse); not in conformity to laws human or divine अनाचारी, आडमार्गी, गैरचालीचा; not straight वांकडा, असरळ (line); not uniform उंचनीच, विषम, असम (motion); *Gram.* व्यभिचारी, वर्जनीय (words);—in shape विरूप.—*n.* [a soldier not in regular service]. -ITY बेशिस्तपणा, अव्यवस्था *f*, क्रमविरोध; वांकडी चाल *f*, गैरवर्त्तणूक *f*, अनाचार, अधर्म; उंचनीचपणा.

IRRELEVANT *a.* अप्रासंगिक, अप्रस्तुत, अप्रयुक्त [to].—IRRELEVANCY अप्रासंगिकत्व *n*, अनन्वय.

IRRELIGION अधर्म, धर्मलोप, दुष्टाचार, अभक्ति *f*.—IRRELIGIOUS *a.* अधर्मी, अधार्मिक, दुराचारी, दुष्ट; profane धर्म -देवनिंदक, धर्मविरुद्ध (speech, conduct).

IRREMEDIABLE *a.* बेइलाज, निरुपाय, सुधरायास अशक्य (disease, error).

IRREPARABLE *a.* सुधरायास अशक्य; irrecoverable परत मिळवायास अशक्य, पुनरालभ्य.

IRREPROACHABLE *a.* नांव ठेवायाजोगा, निर्दोष, निष्कलंक (conduct).

IRRESISTIBLE *a.* अनिवार, दुर्निवार.

IRRESOLUTE *a.* चंचळमनाचा, धरसोडीचा, अधीर.—IRRESOLUTION चंचलबुद्धि *f*, धरसोड *f*.

IRRESPECTIVE *a.* अनपेक्ष, अपेक्षाहीन, परिणाम न पाहणारा [of].

IRRETRIEVABLE, *a.* बेइलाज, निरुपाय; irrecoverable परत मिळण्यास अशक्य, पुनरप्राप्य.

IRREVERENT *a.* अनादर -अपमान करणारा; not entertaining or manifesting due regard to the Supreme Being ईश्वराचा अनादर करणारा, अपूजक; proceeding from irreverence अनादराचा, अपमानकारक, निंदेचा

(word).—IRREVERENCE अनादर, अपमान; थोरांचा अपमान -अपूजा *f*.

IRREVERSIBLE *a*. फिरवायास अशक्य; रद्द न करण्याजोगा, अलोप्य, अखंड्य (decree).

IRREVOCABLE *a*. न फिरवायाजोगा, अपरावर्त्तनीय (decree, promise).

IRRIGATE *v*. (*-rigare*, to water) पाणी घालणें; wet भिजवणें; water, as land, by causing a stream to flow upon and over it पाटानें पाणी देणें -सोडणें.—IRRIGATION पाट सोडणें *n*, पन्हळीचें शिंपणें *n*.

IRRITATE *v*. (*irritare*, to pluck) excite heat and redness in, as the skin or flesh of living animal bodies, as by friction खिजवणें, चिडवणें; inflame आग -दाह क.; provoke खिजवणें, चेतवणें, चिडवणें.—IRRITATION खिजवणी *f*, चिडवणी *f*, आग *f*, दाह.

IRRUPTION (*-rumpere*, to break) आंत फुटणें -येणें -पडणें *n*; sudden invasion दौड *f*, धाड *f*, स्वारी *f*.

ISLAM *Ar*. महमदी धर्म.

ISLE (*insula*), ISLAND* बेट *n*, द्वीप *n*, टापू. -ER टापूंत राहणारा, द्वीपवासी, द्वीपस्थ.—ISLET लहान बेट *n*, उपद्वीप *n*.

ISOLATE *v*. (*insula*, island) वेगळा -अलग ठेवणें

ISLE, See AISLE.

ISOCHRONAL, -OUS *a*. (*Gr*. *isos*, equal, *chronos*, time) समकालिक, समसंख्याकाल.

ISOSCÉLES *a*. (*Gr*. *isos*, equal, *-skelos*, leg) *Geom*. समद्विबाहु -भुज.

ISRAELITE *Heb*. इस्राएलाच्या वंशांतला मनुष्य, यहुदी.—ISRAELITISH *a*. इस्राएलाचा, इस्राएली.

ISSUE *F*. the act of flowing out बाहेर निघणें *n* -वाहणें *n* -पडणें *n*, निस्सरण *n*, निर्गम, स्राव; i. of blood, of air, of people from a house; act of sending out बाहेर पाठविणें *n* -काढणें *n*: i. of an order; result शेवट, परिणाम; progeny संतान *n*, संतति *f*; produce of the earth उपज; profits of land, tenements, &c. उत्पन्न *n*; a flux स्राव; *Med*. an artificial ulcer designed to promote a secretion of pus पोत *f*; any point made in debate वादाचा विषय -गोष्ट *f*, प्रस्ताव: i. of rations वांटणें, देणें.—*v. i.* निघणें, वाहणें, जाणें; बाहेर जाणें -पडणें: the troops *issued* from the town; proceed निघणें, पडणें: water *issues* from springs; light *issues* from the sun; उत्पन्न होणें, जन्मणें, संतति होणें; उत्पन्न होणें, मिळणें, नफा होणें -मिळणें: profits *issuing* from land; परिणाम -निकाल -गत -शेवट होणें.—*t.* पाठविणें; put into circulation चालू क. व्यवहारांत आणणें (notes from a bank); deliver for use वांटणें, देणें (provision); deliver by authority फरमावणें, जाहीर -जगप्रसिद्ध क. (an order)

ISTHMUS (*L*. a neck) संयोगभूमि *f*.

IT* *pron*. (*L*. *id*, *Skr*. *it*) तें, हें *n*. -SELF *pron*. आपण, स्वतां.

ITALIAN *a*. इतली देशाचा.—*n*. इतली देशाचा राहणारा; इतालियन लोकांची भाषा *f*.—ITALIC *a*. इतालीचा; [app. esp. to a kind of type in which the letters do not stand upright, but slope towards the right;—so called because dedicated to the States of Italy by their inventor, Aldus Manutius, about the year 1500.] —*n*. इतालिक किंवा तिर्कस अक्षर *n*: *the letters in which this clause is printed*.—ITALICIZE *v*. तिर्कस अक्षरानें लिहिणें किंवा छापणें.

ITCH* an eruption of small, isolated, acuminated vesicles, produced by the entrance of a parasitic animal, and at-

tende by severed irritation खरूज f; sensatioe in the skin occasioned by the disease खाज f, कंडू f; a constant, irritating desire खाज f, खवखव f.—*i.* खाजणें, खाज सुटणें; खुरखुरणें, वळवळणें, फुरफुरणें.—ITCHY *a.* खरजुला, खरजेचा.

ITEM *ad.* (*L.*) देखील, अणखी, दुसरें, ही.—*n.* कलम *n*, रकम *f*, बाब *f*.

ITERATE *v.* (*iterò*, again) फिरून सांगणें किंवा क.—ITERATION पुनरुक्ति *f*, दुसऱ्यानें बोलणें *n*; दुसारणें *n*, पुनः क. *n*.—ITINERANT *a.* (*iter*, a walk) फिरस्ता, फिरता (a preacher).—*n.* फिरस्ता मनुष्य; गांवोगांव फिरून उपदेश करणारा.—ITINERARY मार्गवृत्तांत पुस्तक *n*, देशाटण वृत्तांत, सफरनामा.—*a.* फिरणारा, फिरस्ता.—ITINERATE *v.* गांवोगांव फिरणें, देश फिरणें; गांवोगांव उपदेश करीत -व्याख्यानें देत फिरणें.

IVORY (*ebur*, *Skr. ibha*) हस्तिदंत.

IVY* इशकपेच (वेल), तरुरोहिणी *f*.

J.

JABBER* *v. i.* वटवट बोलणें, बकणें.—*t.* चुरचुर -लबलब बोलणें.

JACK *F.* [a nickname or diminutive of *John*]; a seafaring man खलाशी; [a portable machine variously constructed, for raising great weights through a small space]; *F.* a coat of mail कवच *n*, चिलखत *n*; [male of certain animals, as of the ass]; a horse or wooden frame on which wood is sawed घडवंची *f*; a small flag, usually hoisted at the bowsprit cap जहाजाचा लहान बावटा; instrument to pull off boots पायांतून बूट ओढून काढायाचें हातेर *n*; j.-at-all-trades हरकामी, चौकोनी चिरा.—*Bot.* फणसाचें झाड *n*. [*Note.*—J. is sometimes used adj. to designate something cut short or diminished in size, as a j.-timber, j.-rafter.] -ASS गाढव. -DAW डोमकावळा. -FRUIT फणस. -PUDDING हंडीबाग. -WOOD फणसाचें लांकूड *n*.—JACKET *F.* बंडी *f*, कुडतें *n*, 'जाकीट' *n*.

JACKAL *F.* (*Skr. sringala*) कोल्हा.

JADE *Prov. Eng.* a mean horse घोडकें *n*; a mean woman रांडरू *n*.—*v.* शिणवणें, भागवणें.

JAG *W.* खांडा, सड, कातरा.—*v.* खांडे पाडणें.

JALAP (from *Jalapa*, a town in Mexico) एक प्रकारचें ढाळक आहे, 'जुलाब.'

JAM *Orient.* a mass of people crowded together लोकांची गर्दी *f* -दाटी *f* -भीड *f*, हजिंवा; a conserve of fruit मुरंबा.—*v.* चिरडणें, चेंगरणें, चेंदणें.

JANGLE *v. i. Ger.* sound harshly or discordantly कर्कश अथवा बेसूर वाजणें; wrangle कटकट -कलागत क.—*n.* कर्कशध्वनि; बेसूर; कलागत *f*, किलकिल *f*.

JANITOR (*janua*, door) देहुडीवाला, द्वारपाल.

JANTY, JAUNTY *a. F.* छानछुक्या, नटणारा.

JANUARY (from *Janus*, an old Italian deity) इंग्रजी सालाचा पहिला महिना, पौष-माघ.

JAPAN (from *Japan*, in Asia) रोगणकाम *n*.—*v.* रोगण लावणें -चढवणें -देणें.—JAPANESE जपानदेशचा मनुष्य; जापानी लोकांची भाषा *f*.

JAR *v. i. F.* vibrate harshly कर्कश वाजणें, करकरणें; act in opposition विजोड पडणें, नडणें; quarrel भांडणें.—*n.* कर्कश शब्द; बेबनाव; भांडण *n*.—*n. Ar.* घडा, बरणी *f*, वगैरे मातीचें भांडें *n*; a large j. माठ, रांजण.

JARGON *F.* हेंगाडी -रांगडी बोली *f*.

JASMINE *Ar.* जाई *f*, जाती *f*; the Arabian j. मोगरी *f*; eared j. जुई *f*; yellow j. सोनजुई *f*.

JASPER *Ar.* एक मणी आहे, याशेफ पाषाण.

JAUNDICE *F.* a disease, in its most common form characterized by yellowness of the eyes, skin, and urine, whiteness of the discharges from the intestines, uneasiness, referred to the region of the stomach, loss of appetite, and general langaur and lassitude कामीण*f*, कावीळ *f*, पांडुरोग.—JAUNDICED *a.* पांडुरोगी; prejudiced वक्रदृष्टि.

JAUNT *Scot.* सहल *f*, सफर *f*, रपेट *f*.—*v.* सहल क.

JAVELIN *F.* बरची *f*, सांग*f*.

JAW *F.* जबडा, दाभाड *n.* -TOOTH दाढ*f*.

JAY *F.*—the blue j. चाष, चात.

JEALOUS *a.* (*zelus*, zeal) filled with anxious apprehension शंकित, संशयी, भयाक्रांत; solicitous in a matter affecting character or honor अभिमानी, आवेशी (1 Kings xix. 10); uneasy through fear that goodwill, interest, affection, or the like, regarded as belonging to one's self, is transferred to another प्रेमसंशयी, प्रेमशंकी; a husband of a wife परपुरुषाशंकी, जारशंकित;—a wife of a husband परस्त्रीशंकित; apprehensive of rivalship परोत्कर्षद्वेषी.—JEALOUSY संशय, शंका *f*; प्रीतीचा संशय, प्रेमसंशय;—of a husband respecting a wife परपुरुषाशंका *f*; — of a wife respecting a husband परस्त्रीशंका*f*; अभिमान, आवेश; परोत्कर्षद्वेष -भय *n.*

JEER *v. i. Ger.* टवाळी -थट्टा क.—*n.* टवाळी*f*, थट्टा*f*.

JEHOVAH *Heb.* a Scripture appellation of the Supreme Being, by which He was revealed to the Jews as their tutelary God or Sovereign of the theocracy 'यहोवा', परमेश्वर; the sacred unpronounceable name of the Eternal, usually interpreted as signifying self-derived and permanent existence स्वयंभू -सनातन परमेश्वर.

JEJUNE *a.* (*jejunus*, dry) रुक्ष, निरस, भुकड, भाकड.

JELLY *F.* a glutinous substance चिकी *f*;—of fruit मुरब्बा, फलपाक, 'जेली' *f*.

JEOPARD *v. F.* जोखमांत -धोक्यांत घालणें.—*n.* जोखीम *n*, धोका, प्राणसंकट *n*; to be in j. प्राणावर बितणें. -IZE *v.* जोखमांत घालणें.

JERK *v. O. Eng.* give a sudden pull हिसका -आसडा देणें; throw with a quick effort झटकारून फेंकणें -टाकणें; [cut into thin slices and dry in the sun: to j. beef].—*n.* हिसका, हिसडा, झटका.

JESSAMINE, See JASMINE.

JEST *O. Eng.* something done or said in order to amuse थट्टा *f*, मस्करी *f*, विनोद; a laughing-stock खेळवणा, उपहासपात्र *n*; in j. मस्करीनें, थट्टेनें.—*v.* मस्करी क. [with]. -ER थट्टेखोर -बाज; buffoon हंडीबाग, भांड.

JESUIT *F.* रोमनकाथोलिक धर्मांत एक पंथ आहे, त्यांतला एक; a crafty person कावेबाज -कपटी मनुष्य.

JET (*gagates*) एक खनिज पदार्थ आहे, कारदगड. -TY *a.* काळा.

JET (*jactus*, a throwing) a spouting stream उडती धार*f*, चिरकांडी*f*; a sudden rush, as of water from a pipe, or of flame from an orifice कारंजें *n*, फवारा.—*v.* धार सोडणें.

JEW (from *L. Judæa*) यहूदी.—*v.* फसवणें. ठकवणें. -ESS यहुदीण*f*. -ISH *a.* यहुद्यांचा, -'S HARP चंग, मोरचंग. -RY यहुद्यांचा महला -चकला.

JEWEL *F.* a gem रत्न *n*, जवाहीर *n*, मणी; an ornament of dress in which the precious stones form a principal part जडावाचा डागिना; an object regarded with

special affection and highly valued रत्न *n,* परीस, लाल, जिवडा; a setter of *jewels* जड्या—*v.* रत्नभूषित -मंडित क.; रत्न -मणी बसविणें : to j. the works of a watch; रत्नासारखा शृंगार क.: flowers *jeweling* the grass. -ER, -LER, one who deals in jewels, जवाहिरी; जड्या. -LERY, -RY रत्नें *n pl,* जवाहीर *n.*

JIB *Eng.* the foremost sail of a ship पोगी *f.*

JINGLE *v. i. Ger.* खळखळणें, झणझणणें. —*n.* झणकारा, खळखळ *f;* that which makes a jingling sound घुंगरूं *n,* वगैरे.

JOB *Eng.* a piece of work काम *n;* any thing undertaken, whether of more or less importance अडकाम *n,* अडपझडप *n;* an undertaking with a view to profit प्राप्तीसाठीं -नफ्यासाठीं पत्करलेलें काम *n;* काम *n;* by the j. उक्ता, खंडून.

JOCKEY (dimin. of *jack*) a man who rides horses in a race शर्यतीचा घोडेस्वार; a dealer in horses घोड्यांचा सवदागर; a cheat ठक, लुच्चा, सोदा.

JOCOSE *a.* (*jocosus*) विनोदी, थट्टेबाज (a person); थट्टेचा, विनोदाचा (airs). — JOCULAR, *a.* थट्टेचा, मस्करीचा, विनोदात्मक (style); थट्टेबाज, विनोदी (a person).— JOCUND *a.* आनंदी, खुशमौजी. -ITY आनंद, खुशमौज *f.*

JOG *v. Ger.* धक्का -हिस्का देणें, हबकणें.—*i.* धिमे -हळूहळू चालणें.

JOIN *v.* (*jungere,* to yoke) connect जोडणें, जडणें, सांधणें;—unite with संगत जोडणें, सांगड घालणें, मिळवणें;—in league जूट जोडणें;—in marriage जोडा जोडणें [with, in]. — *i.* मिळणें, एकहोणें; लगत -संगत असणें; —in fight भिडणें. -ER जोडणारा, जडणारा; one whose occupation is to construct things by joining pieces of wood सांधकाम्या, जोडणारा; carpenter सुतार, बढई. -ERY सांधकाम *n,* जोडकाम *n.*— JOINT सांधा, संधि *f;*—in the limbs of an animal खोळ *f,* सांधा; — of cane or of knots पेर *n,* ग्रंथि *f;* to be out of j. सांधा उखळणें;—of meat रान *n II.*—*a.* जोडलेला, संलग्न; shared among more than one समाईक (property); sharing with another विभागी, भागीदार, पातीदार; not solitary in action जोडीनें काम करणारा, 'जाइंट.'—*v.* सांध्यांनीं जोडणें, संधिविशिष्ट क.; provide with a joint पेरें पाडणें; disjoint सांधे सोडविणें -उखळणें.—*i.* सांधे बसणें, सांध्यांत बसणें, बसणें. -ED सांध्याचा केलेला, संधिविशिष्ट; सांधे सोडविलेला, संधिभेदित. -LY *ad.* मिळून, जुटीनें. -URE *Law,* estate settled on a wife, and which she is to enjoy after her husband's decease for her own life at least, and in satisfaction of dower बायकोचा वांटा, बाईलवांटा, स्त्रीधन *n,* रांडरोटी *f.* -RESS जिला बाईलवांटा आहे ती स्त्री *f.*

JOKE (*jocus*) थट्टा *f,* मस्करी *f;* in j. थट्टेनें. practical j. हाताची थट्टा *f.*—*v.* थट्टा -मस्करी क. [with].

JOLLY *a. F.* full of life and mirth आनंदी, उल्हासी, मौजी; exciting mirth and gaiety मौजेचा, हसण्याचा; plump टुमटुमीत, गुबगुबीत.

JOLT *v. i. Ger.* हिंदुळणें, हिसकणें, धक्का बसणें; —*t.* हिंदुळणें, धक्का देणें.—*n.* धक्का, आचका. हबका.

JOSTLE *v. F.* धक्का -हिसका देणें, रेटणें, रेटारेटी क.

JOT (*Gr. iota*) a point काना, मात्रा *f,* फांटा; the least quantity लेश, अणु, तिळमात्र.— *v.* टांचून -टिपून ठेवणें [down]. -TING टिप्पण *n,* टांचण *n.*

JOURNAL (*diurnus,* belonging to the day) a diary रोजनामा, दिनचर्यालेख, दिनवृत्तपत्र *n*; *Com.* book in which every particular article or charge is fairly entered under the date of each day खतावणी *f*, पक्का खरडा; [also, a book in which is entered a condensed and grouped statement of the transactions of each month]; [a daily register of the ship's course and distance, the winds, weather, and other occurrences]; a paper published daily रोज निघणारें वर्त्तमानपत्र *n*; a periodical नियमित कालीं निघणारें पुस्तक *n*. -IST दिनवृत्तलेखक; वर्त्तमानपत्रकर्त्ता.—JOURNEY मजल *f*, सफर *f*.—*v. i.* चालणें, मुसाफरी क., वाटचालणें. -MAN रोजीनें कामास लावलेला मनुष्य, रोजिंदार; रोजीनें काम करणारा कारागीर (tailor, shoemaker).

JOVIAL *a.* (from *Jupiter*) चैनी, खुशमौजा. -ITY चैन *f*, मौज *f*.

JOY (*gaudere,* to rejoice) passion or emotion excited by the acquisition or expectation of good आनंद, हर्ष, संतोष; mirth विनोद, हास्य *n*; cause of joy आनंदहेतु, नंदन *n*.—*v. i.* आनंदित होणें, आनंद पावणें: I will j. in the God of my salvation (Hab. iii. 18).—*t.* आनंदविणें, खुशी-संतुष्ट क. -FUL *a.* आनंदी, हर्षयुक्त, खुश; ever-j. नित्यानंद, सदानंद [of]. -LESS *a.* उदास, निरुत्साह. -OUS *a.* आनंदी, उल्हासी, हर्षयुक्त [of].

JUBILEE *Heb.* [*Jewish Hist.* every fiftieth year, being the year following the revolution of seven weeks of years, at which time all the slaves were liberated, and all lands which had been alienated during the whole period reverted to their former owners]; season of great festivity महोत्सव, सण; joyfulness आनंद.

JUDAISM (from *Judæa*) यहुदी लोकांचा धर्म; conformity to the Jewish rites and ceremonies यहुदी धर्माच्या विधीस अनुसरणें *n*.—JUDAIZE *v. i.* यहुदी धर्मप्रमाणें वागणें; reason and interpret like a Jew यहुदी मतप्रमाणें विचार व अर्थ क.

JUDGE (*jus,* law) *Law,* a civil officer who is invested with authority to hear and determine causes, civil or criminal, and to administer justice between parties, in courts held for that purpose, according to his commission, or according to law न्यायाधीश, 'जज्ज'; the Supreme Being परमेश्वर, सर्वांचा झाडा घेणारा (Gen. xviii. 25); one who has skill to decide on the merits of a question, or on the value of any thing परीक्षक, पारखी, चतुर, चिकित्सक; [(*Jewish Hist.*) a chief magistrate with civil and military powers, such as those who governed the nation more than three hundred years; the title of the seventh book of the Old Testament] न्यायाधिशाचें पुस्तक [of, for, between].—*v. i.* न्याय -इनसाफ क.; परीक्षा -पारख क.; determine ठराव क.—*t.* -चा न्याय क.; be censorious towards दोषदृष्टीनें पाहणें, दोष पाहणें -काढणें (Matth. vii. 1); reckon मोजणें, मानणें (Acts xvi. 15). -SHIP न्यायाधिशाचा हुद्दा, न्यायाधिशी *f*.—JUDGMENT विचार, विवेचन *n*; opinion मत *n*, अभिप्राय; faculty of judging truly, wisely, or skilfully परीक्षा, पारख *f*: you have good j. in horsemanship; the act or faculty of comparing objects of any kind, and discerning their relations, attributes, or properties बुद्धि *f*, समज, विवेक; the result of the act thus performed विचार, निवाडा; *Law,* sentence of the law, pronounced by a court, or a judge thereof, upon a matter in issue

in any cause before it ठराव, निर्णय; a calamity regarded as sent by God, by way of recompense for wrong committed ईश्वराचा गजब, अस्मानी चपेट, अस्मानी *f* (Prov. xix. 29); *Theol.* the final punishment of the wicked दुष्टांचें शेवटचें शासन *n*, जगाचा शेवटचा न्याय.; to the best of one's j. यथामति विचार करून. -DAY, *Theol.* the last day, or day when final judgment will be pronounced on the subjects of God's moral government शेवटच्या न्यायाचा दिवस, न्यायदिन (on, against, for]. -HALL न्यायसभा *f*, कचेरी *f*. -SEAT न्यायासन *n*, धर्मासन *n*.—JUDICATORY न्यायसभा *f*.—*a*. न्यायाचा, न्याय करण्याचा.—JUDICATURE न्याय करण्याचा अधिकार; न्याय करण्याचा धंदा, न्यायाधिशी *f*; court of justice न्यायसभा *f*; extent of jurisdiction of a judge or court कोर्टाच्या अमलाची हद्द *f*, कोर्टाचा अमल, 'जुडिकेचर.'—JUDICIAL *a*. न्यायसभेचा; न्यायाधिशाचा, जज्जाचा (power); practised or employed in the administration of justice न्यायप्रकरणाचा, व्यवहारिक, व्यवहारविषयक, 'जुडिशल' (proceedings); ordered by a court कोर्टाच्या हुकमाचा -नें हुकूम केलेला (sale); कोर्टाचा, कोर्टानें केलेला, कोर्टाचा (determination); established by statute कायद्यानें स्थापिलेला, कायद्यानें ठराव केलेला, विधिस्थापित (law); inflicted, as a penalty or in judgment दंडरूप, दंडादाखल (punishment, hardness of heart).—JUDICIOUS *a*. according to sound judgment समजुतीचा, विवेकाचा; prudent उपयुक्त, उचित, सयुक्तिक, समर्पक (conduct); discreet समजदार, विचारवान, विवेकी (person).

JUG* चंबू, सुरई *f*, कुजा.

JUGGLE *v*. (*joculari*, to jest) amuse and make sport by tricks which make a false show of extraordinary powers हातचलाकी -गौडबंगाल -नजरबंदी क.; practise artifice or imposture गारुड-भानामती खेळणें -क.—JUGGLER गारुडी, गौडबंगाली; a cheat ठक, फसव्या.—JUGGLERY गारुड *n*, गौडबंगाल *n*, हातचलाकी *f*; ठकबाजी *f*, ठकविद्या *f*.

JUGULAR *a*. (*jugulum*, the collar-bone) गळ्याचा, कंठसंबंधी, कंठ्य (vein).

JUICE (*jus*, broth) रस, द्रव.—JUICY *a*. रसाळ, रसभरित, रसरसीत.

JUJUBE *Ar*.— the tree बोर *f*;—the fruit बोर *n*.

JULY (from *Julius*) इसवी सालाचा सातवा महिना, अषाढ-श्रावण.

JUMBLE *v*. *F*. ढवळाढवळ -गोंधळ -घप्पाघोळ क. (together).—*n*. गोंधळ, घोळ, संकर.

JUMP *v. i. Ger.* उडी मारणें, कुदणें; about खिदडणें, टिणटिण उड्या मारणें [up, down, from, off].—*n*. उडी *f*, उड्डाण *n*.

JUNCTION (*jungere*, to join) जोडणें *n*, संयोजन *n*; combination जोड, मिलाफ, संयोग; place or point of union सांधा, संधि.—JUNCTURE सांधा, संधि, जोड: the j. of a vessel; a joint पेर *n*, संधि; a point rendered critical or important by a concurrence of circumstances संधि *f*, योग; perilous j. कच *f*; unseasonable j. आडसंधि *f*.

JUNE (from *Juno*) इंग्रजी सालाचा साहवा महिना, जेष्ठ-अषाढ.

JUNGLE *Hind*. जंगल *n*, रान *n*.

JUNIOR *a*. (*L*.) धाकटा, कनिष्ठ; धाकट्याचा; [j. is app. to distinguish the younger of two persons bearing the same name in the same family].

JUPITER (*L*.) रोमन लोकांचा मुख्य देव होता; *Astron*. बृहस्पति, गुरु J. of the Hindus इंद्र.

JURIDICAL *a.* (*jus*, law, *dicare*, to pronounce)न्यायाधिशाचा; कोर्टांतला,अदालतीचा. —JURISDICTION न्यायाचें काम पाहण्याचा अधिकार; कायदे करण्याचा किंवा अमलांत आणण्याचा अधिकार; अधिकाराची हद्द *f*, अमल, अमलदारी *f*.—JURISPRUDENCE(-*prudentia*, prudence) the science of law व्यवहार -धर्मशास्त्र *n*.— JURIST धर्मशास्त्र जाणणारा, धर्मशास्त्रज्ञ.

JURY (*jurare*, to swear) a body of men, selected according to law, impanelled and sworn to enquire into and try any matter of fact, and to declare the truth of it on the evidence given them in the case पंच *pl*, 'जुरी' *f*, सभासद. -BOX जुरी बसायाची जागा *f*, 'जुरी बाक्स' *n*. -MAN जुरीवाला, जुरींतली असामी *f*.

JUST *a.* (*justus*) upright नीट, सरळ; honest प्रामाणिक,न्यायी, इनसाफी, सचोटीचा (judge); regular नीट, सरळ (array); accurate शुद्ध, यथार्थ, बराबर, समर्पक (expression, description); conforming to rectitude रास्त, खरा, वाजवी (balances, weight).—*ad.* बराबर,नीट,थेट: he guided my hand j. to the heart of the beast; j. now आतां, आतांशीं, इतक्यांत; j. as तसाच; but j. नुस्ता, केवळ, मात्र: having but j. enough; closely थोडक्यांत, जवळून: I j. escaped drowning मी बुडतां बुडतां वांचलों. -LY *ad.* न्यायानें, इनसाफानें; ठीक, वाजवी, यथायोग्य. -ICE, the rendering to every one his due, right, or desert न्याय, धर्म, नीति *f*; integrity in commerce or mutual intercourse सचोटी *f*, प्रामाणिकपणा; impartiality समदृष्टि *f*, साम्यता *f*, निष्पक्षपात; equity उजूपणा, योग्यता *f*: the j. of a claim; merited reward or punishment योग्य बक्षिस *n*, किंवा दंड; a person duly commissioned to hold courts न्यायाधीश, 'जस्टिस.' -IFY *v.* prove or show to be just वाजवी -रास्त करून दाखविणें; defend or maintain प्रतिपादन क., संपादणूक क., प्रपादणें; pronounce free from guilt दोषमुक्त क., निर्दोष क., दोष उडवणें; *Theol.* pardon क्षमा क.; treat as just, though guilty and deserving punishment न्यायी ठरवणें (Acts xiii. 39); *Print.* form even or true lines of, as type, by proper spacing ठशाच्या अक्षरांच्या ओळी जोडणें, 'जस्टिफै क.'—*i.* ठशाच्या अक्षरांच्या ओळी बसणें -लागणें, 'जस्टिफै' होणें. -IFIABLE *a.* योग्य, वाजवी करून दाखवायाजोगा, प्रपादनीय; दोष उडवायाजोगा, दोषमोचनीय. -IFICATION निर्दोष करणें *n*, न्यायीकरणें *n*, दोषमोचन *n*; vindication प्रतिपादन *n*, स्थापन: our disobedience of God's commands admits of no j; absolution दोषमुक्ति *f*; *Theol.* the treating of sinful man as though he were just दोषी -अपराधी -पापी मनुष्यास न्यायी मोजणें *n*, न्यायीकरण *n*. -IFIER दोषमोचक, निर्दोष करणारा (Rom. iii. 26); दोष उडविणारा, प्रतिपादन करणारा.

JUT *v. i.* (See JET) बाहेर येणें -निघणें [out].

JUVENILE *a.* (*juvenis*, young) तरुण; तारुण्याचा, तरुण, तरण्यांचा (sports).—JUVENILITY तारुण्यावस्था *f*, तारुण्य *n*, यौवन *n*.

JUXTAPOSITION (*juxta*, near, *positio*, position) a placing, or being placed, in nearness or contiguity, as the parts of a substance or of a composition लगता, नैकट्य *n*, समीपता *f*.

K.

KAW *v. i.* कावकाव क.—*n.* कावकाव *f*.

KECK *v. i.* *Ger.* उमासा येणें, उमळणें, कळमळणें.

KEDGER *Scot.* लंगर, लोळी *f*.

KEEL* नावेचा कणा, अडें *n*.

KEEN* *a.* eager उत्सुक, हौसदार; sharp कडक, कडकडीत (appetite); sharp तेजदार,

पाणीदार, जलद (edge); severe कडकडीत, प्रखर (cold); bitter कडू, मनास लागाया -झोंबायाजोगा (sarcasm); penetrating हुशार, तीक्ष्णबुद्धि, कुशाग्रबुद्धि.

KEEP* *v.* retain ठेवणें, राखणें; detain खोळंबवणें, खोटी क.; maintain hold upon धरून ठेवणें; हातीं ठेवणें; preserve राखणें, ठेवणें: his loyalty he *kept;* have in custody of राखणें, खबरदारी क., दिमतीस ठेवणें, संभाळ क.: I will k. thee; preserve from publicity गुप्त ठेवणें; tend राखणें, बरदास्त ठेवणें (a garden); manage चालवणें, घालणें, वहिवाटणें (a school);—a house घरसंजोगणी क., घर चालवणें; entertain भोजनास ठेवणें (boarders); support in one's service चाकरीस ठेवणें; have and maintain, as a horse ठेवणें, बाळगणें: continue in, as a course or mode of action चालू ठेवणें, चालविणें; practise or perform, as a duty आचरणें, पाळणें;—as a word राखणें, पाळणें; observe, as a festival करणें, पाळणें (Ps. xlii. 4); —as one's bed, room, &c. -धरून राहणें. -च्या बाहेर न पडणें; back राखणें, मागें ठेवणें, चोरून ठेवणें (Jer. xlii. 4); आवरणें (Ps. xix. 13);—company with सोबत धरणें -क.; बराबर -संगतीं जाणें; down कह्यांत -दाबांत ठेवणें; आवरणें; अडथळा क., अडवणें; —good or bad hours नित्य लवकर किंवा उशीरां घरीं येणें किंवा निजायास जाणें; up कमी होऊं न देणें, न गमावणें, राखणें, संभाळणें, ठेवणें (prices of goods, one's credit).—*i.* राहणें, असणें: to k. at a distance; राहणें, निभणें, टिकणें, तगणें: apples that will k.; dwell राहणें, बिऱ्हाड असणें, रहिवास धरणें; from -पासून दूर राहणें, वर्जणें; on राहणें, चालणें, जाणें: he *kept* on singing; to चिकटून -धरून राहणें -असणें: to k. to old customs, to one's word, promise; up हिंडता -फिरता असणें; अजीत -मोकळा -अनधीन असणें.—*n.* स्थिति *f*; राखण *f*; case गवसणी *f*, संपुट *n*; provisions by which one is kept चंदी *f*, मोताद *f*: the k. of a horse; stronghold गढी *f*, किल्ला, वगैरे बळकट जागा *f*; a charge दिमतीस सोपलेलें काम *n* -ली वस्तु *f*. -ER राखणारा, ठेवणारा; दिम्मतदार, जिम्मेदार; रखवालदार, रक्षक, राख्या; पालन -रक्षणकर्त्ता, रक्षक, पालक; a ring serving to keep another on the finger अडकण *n*; one who retains in custody बंदिशाळेचा रखवालदार.—of the forests अरण्यरक्षक;—of the Great Seal मोंहरबरदार. -ING राखणें *n*, धारण *n*; दिमत *f*, रखवाली *f*; संगोपन *n*, निगा *f*, जतन *f*; consistency जम, बनाव, घटाव. -SAKE आठवणीसाठीं दिलेली -ठेवलेली वस्तु *f*, यादगिरी *f*, आठवणूक *f*.

KEN* *v.* see at a distance दुरून पाहणें; know ओळखणें, जाणणें.

KENNEL (*canis*, a dog) कुत्र्याचें घरकुलें *n*; pack of hounds पारधी कुत्र्यांचा कळप; the hole of a fox or other beast बीळ *n*. —(*canalis*) रस्त्याचा गटार, पऱ्हाळी *f*.

KERNEL* single seed of a grain-bearing or other plant दाणा, बीं *n*; the edible substance contained in the shell of a nut गर, गीर, मगज, खोबरें *n*;—of a pulpy fruit अठी *f*, अठोळी *f*: a hard concretion in the flesh अठी *f*.

KETTLE* हांडी *f*, हांडा, कढई *f*, वगैरे पाणी वगैरे तापवायाचें भाडें *n*, 'केटली' *f*. -DRUM नगारा, डंका.

KEY* a fastener अडसर, अडकण *n*; instrument to shut or open a lock चावी *f*, किल्ली *f*; instrument by which some thing is screwed or turned कळ *f*, किल्ली *f*; part of a musical instrument which is struck with the fingers घर *n*; fundamental note in a piece of music घर *n*; the

highest central stone of an arch मेहराबीचा मधला दगड *n*, कमानीची चावी *f*; that which serves as a means to unlock a secret or mystery किल्ली *f*, घर *n*; false k. चोरकिल्ली *f*. -HOLE किल्लीचें घर *n*, कुलपाचें तोंड *n*. -NOTE कमानीचा मधला दगड.

KICK *v*. *W*. लात मारणें; to k. the beam वजनांत कमी भरणें;—up a row तारा नाचविणें. —*i*. लात मारणें -उचलणें, लाथा झाडणें; recoil;—said of a musket मागें सरकणें. —*n*. लात -थ *f*, लत्ता *f*. -SHAW *F*. भलत्याचें भलतें *n*, वेडेंविद्रें *n*.

KID *D*. करडूं *n* (Is. xi. 6); a fagot लांकडाची मोळी *f*; a small wooden tub or vessel कोटंबा, काथवट *f*.

KIDNAP *v*. *Ger*. steal and carry away or secrete, as a human being, man, woman, or child मनुष्य चोरून नेणें. -ER मनुष्य चोरून नेणारा, मनुष्यस्तेयी.

KIDNEY* मुत्रपिंड, गुर्द; disposition स्वभाव: men of the same k. -BEAN उडीद Rayed k. मूग.

KILL* *v*. deprive of life जीव घेणें, मारणें, ठारमारणें; calm शांत क., शमवणें: a shower of rain *kills* the wind;—time वेळ दवडणें -घालवणें -लोटणें.

KILN* भट्टी *f*;—of a potter आवा.

KIN* relationship नातें *n*, गोत्र *n*, संबंध; relatives भाऊबंध *pl*, गोतवळा, गोत *n*; of k. गोत्रज; सजात. —*a*. सजातीय: one touch of nature makes the whole world k.—*Shaksp*.

KIND* race जात *f*, जाति *f*: human k.; sort प्रकार, तऱ्हा *f*; native character स्वभाव, गुण. -RED *n*. See KIN.—*a*. नातलग, गोत्री, गोत्रज; of the like nature सजातीय, समगुण. —KINSMAN भाऊबंद, दाईज, कुटुंबी.

KIND* *a*. showing tenderness or goodness कृपाळू, दयाळू, परोपकारी;—as an act कृपेचा, मेहरबानीचा, परोपकारबुद्धीचा. -NESS दया *f*, कृपा *f*, मेहरबानी *f*; a kind act उपकार, दयेचें काम *n*. -LINESS गोडीगुलाबी *f*, प्रीति *f*, स्नेह. -LY *a*. kindred जातीचा, सजातीय; gracious कृपाळू, दयाळू.

KINDLE *v*. (*cendere*) set on fire पेटवणें, चेतवणें; inflame, as the passions चेतवणें, पेटवणें.—*i*. पेटणें, चेतणें; संतापणें, तापणें.

KINE, *pl* of *Cow*, गाया *f pl*, गाई *f pl*.

KING *Ger*. a chief ruler अधिपति, प्रभु; a monarch राजा, नृपति, भूप; a card having the picture of a king राजा; *king's* English शुद्ध इंग्लिश भाषा *f*. -CRAFT राज्यचातुर्य *n*, राज्यनीति *f*. -DOM राज्य *n*, प्रभुत्व *n*, राज्याधिकार (Ps. cxlv. 13); dominion of a monarch राज्य *n*, राष्ट्र *n*; principal division जाति *f*, कोटि *f*, वर्ग; animal k. जीवजाति *f*; vegetable k. तृणजाति *f*; mineral k. धातुजाति *f*. -FISHER पाणकावळा, डिचा. -LY *a*. राजाचा, राजकीय, राजास योग्य, पादशाही; grand अलिशाहा, मोठा (couch); directed by the king राजाचा, राजानें चालवायाचा, राज in comp.; k. government राजसत्ताक राज्य *n*. -'S EVIL, a disease of the scrofulous kind, formerly supposed to be healed by the touch of a king गंडमाळा *f pl*. -SHIP राज्याधिकार, राजपद *n*.

KIRK* (See CHURCH) ख्रिस्ती देऊळ *n*; [the regular or established Church of Scotland]; k. session, a petty ecclesiastical session in Scotland 'कर्क सेशन' *n*, वडील वर्गाची सभा *f*.

KISS* *v*. salute with the lips मुका -चुंबन घेणें; caress गोंजारणें, लाड क.; touch gently, as if fondly हळूच -ममतेनें -लाडानें स्पर्श क. -हात लावणें: when the sweet wind did gently k. the trees.—*n*. मुका, चुंबन *n*.

KIT *D.* a vessel of various kinds and uses भांडें *n,* पात्र *n;* the whole outfit खटलें *n,* चवाळें *n,* सामान *n,* बाडबिशात*f*.

KITCHEN* cook-room स्वयंपाकघर *n*; [utensil for roasting meat]. -GARDEN [शाकभाजीचा] मळा, परसांतली भाजी*f*, परसूं *n*. -WORK स्वयंपाकघरांतलें काम *n*.

KITE* a rapacious bird of the hawk kind घार*f*; a paper toy for flying in the air पतंग, वावडी*f*.

KITTEN (dim. of *cat*) मांजराचें पिलूं *n*.

KNACK *Ger.* a toy खेळ, खेळणें *n*; a nice trick कळ*f*, युक्ति*f*; adroitness हतोटी *f*, टूक्*f*.

KNAG *D.* a knot in the wood गांठ *f*, गुळुंब *n*; a peg मेख *f*, खुंटी *f*; a shoot of deer's horn हरणाच्या शिंगाचा कोंब -फणगडा. -GY *a.* गांठाळ, गांठीचा; rough in temper खडतर स्वभावाचा.

KNAPSACK *D.*—of travellers पडशी*f*;—of soldiers थैली*f*, जामदानी*f*.

KNAVE* ठक, सोदा, काशीकर; at cards गुलाम; an arch-k. वाटोळा धोंडा, गोटा, पांढरा परीस, नाशीककर; a pack of *knaves* चांडाळचौकडी *f*.—KNAVERY ठकपणा, सोदेगिरी *f*; mischievous practices ठकबाजी *f*, दगलबाजी *f*, लुच्चेशाई *f*; to become an adept in k. पंख फुटणें, चौपायीं उडणें. —KNAVISH *a.* ठकाऊ, ठकडा, शठ; कुटाळ, कुचाळ.

KNEAD* *v* मळणें;—wheaten dough तिंबणें. -ING-TROUGH —of wood काठवट *f*; —of metal परात*f*, पितळी*f*.

KNEE* (*genu, Skr. janu*) गुडघा. -DEEP* *a* गुडघाभर, गुडघ्याइतका. -JOINT गुडघ्याची खीळ *f*, जानुसंधि. -PAN गुडघ्याची वाटी *f*, जानुफलक *n*.—KNEEL *v. i.* गुडघे टेकणें [down].

KNELL* stroke of a bell rung at a funeral or at the death of a person प्रेत नेण्याच्या वेळचा किंवा मनुष्य मेल्यावरचा घंटाध्वनि किंवा घांटेचा ठोका.

KNIFE* सुरी*f*; large k., सुरा; clasp-k. मोडसुरा; a sword तलवार*f*.

KNIGHT* सरदार बहादूर; एक किताब आहे; —at chess घोडा. -HOOD सरदारबहादुरी*f*.

KNIT* *v.* tie बांधणें; weave without a loom मागावांचून -हातानें विणणें; unite जोडणें, मिळवणें (hands); contract आठ्या घालणें (the brows) [together].—*n.* वीण*f*, विणकर*f*.

KNOB* a hard protuberance in the wood गांठ *f*, गुळुंब *n*;—in the flesh टेंगूळ *n*, गांठ *f*; a round ball at the end of any thing गोंडा, झुबका. -BY *a.* गांठाळ, गांठीचा.

KNOCK* *v. i.* strike or beat with some thing hard or heavy ठोठावणें, ठोकणें: drive against आपटणें, थडका देणें; up थकणें, दमणें; off थांबणें, हात अटपणें; under दबणें, हात टेकणें, कचकणें.—*t.* strike मारणें, ठोकणें; drive against आपटणें, आदळणें: to k. the head against a post; down पाडणें, लोळवणें, आपटणें; टोला -टोले -ठोसा -ठोसे मारून खालीं पाडणें; *Auctions,* assign to a bidder by a blow or knock लिलावांत (घेणाराच्या) माथीं मारणें, हडसणें; — in the head, or on the head मस्तकावर प्रहार करून मूर्च्छित क., किंवा ठार मारणें; मोडणें, पाणी ओतणें, लथडविणें, लटपटविणें;—off झपाटणें, फटकारणें; out हाणून -मारून बाहेर काढणें (the brains); up ठोकून -ठोठावून उठवणें; थकविणें, शिणवणें, भागवणें.—*n.* ठोका, प्रहार; a strike on a door intended as a request for admittance आंत घेण्याकरितां दारावर थाप *f* -ठोका, दार उघडण्याची थाप*f*.

KNOT* a complication of threads, cords, or ropes, formed by tying, knitting, or entangling, and resisting separation or loosing गांठ *f*, ग्रंथि *f*; a tie गांठ *f*, नातें *n*, धागादोरा; nuptial k. रेशमाची गांठ *f*; perplexity गांठ *f*, अठी *f*, कोंडें *n*; cluster झुबका, गुच्छ; band थवा, घोळका; joint in the stem of a plant गांठ *f*, कांडें *n*, पर्व *n*; protuberance occasioned by the outgrowth of a branch डाहळीचें मूळ *n*, गांठ *f*; [a nautical mile of 6086. 7 ft.: to sail ten *knots* an hour]; — in the mind मनांतली अट *f*, गांठ *f*.—*v.* गांठ बांधणें -देणें; जोडणें, मिळवणें; घोटाळ्यांत पाडणें, गोंधळांत घालणें.—*i.* गोंधळणें; पेर -कांडें धरणें; copulate जुगणें, लागणें. -TED *a.* गांठीचा, गांठाळ -TY *a.* गांठळ, गांठळगुठळ; गुतागुतीचा, खचरट (point); कठीण (head).

KNOW* *v.*(-*gnoscere*, *Skr. jna*) be aware of as true ठाऊक -माहीत असणें; perceive clearly जाणणें, समजणें; be acquainted with परिचय-ओळख असणें; possess experience of -चा अनुभव -ची -प्रचीत असणें (2 Cor. v. 21); distinguish भेद समजणें -पाहणें; approve मान्य -पसंत क. (Ps. i. 6); have sexual commerce with जाणणें, जवळ जाणें, भोगणें [of, about]. — *i.* जाणणें, समजणें; परीक्षा क. [of]. -ABLE *a.* जाणायाजोगता, ज्ञानगम्य. -ALL सर्वजाणता, चतुरशहाणा; wisacre दीडशहाणा, चतुरसाबाजी. -ING *p.a.* जाणता; intelligent चतुर, समजदार, ज्ञाता. -INGLY *ad.* जाणून, समजून, अकलहुशारीनें. -LEDGE जाणणें *n*; clear and certain perception of truth and duty ज्ञान *n*, बोध; that which is known जाणीव *f*; a cognition ओळख *f*; acquaintance ओळख *f*, परिचय; learning विद्या *f*, ज्ञान *n*; practical skill वाकबगारी *f*, माहितगारी *f*: a k. of seamanship; information खबर *f*, माहिती *f*; within one's k. जाणोपरी; without the k. of नकळत; spiritual k. आत्मज्ञान *n*, परमार्थज्ञान *n*; sacred and profane k. ज्ञानविज्ञान *n*; eager after k. विद्यार्थी; gained by k. विद्यालब्ध; carnal k. भोग, संग; instruction in k., esp. in the k. of the Divine nature or of one's own soul ज्ञानोपदेश.

KNUCKLE* बोटाचा सांधा, पेर *n*. — *v. i.* ठोठावणें, ठोकणें;—to हात टेंकणें, बें म्हणणें; झटणें. —*t.* बोटांच्या पेरांनीं मारणें.

KORAN *Ar.* कुरान *n*.

L.

LABEL *W.* खुणेसाठीं जी चिठी मारतात ती *f*, खुणपटी *f*.—*v.* खुणपटी -चकती मारणें.

LABIAL *a.* (*labium*, lip) ओठांचा; formed by the lips ओष्ठ्य (letters).—*n.* ओष्ठ्यवर्ण —LABIODENTAL *a.* दंतोष्ठ्य.

LABOR (*L.*) physical toil or bodily exertion मेहनत *f*, श्रम, कष्ट; mental effort श्रम, मनाचा श्रम, मनोनिवेश; that which demands effort श्रमाचें काम *n*; travail प्रसुतिवेदना *f*; forced l. बिगार *f*, वेठ *f*; day l. रोजमजुरी *f*.—*v. i.* श्रम -कष्ट क.; यत्न -प्रयत्न क., झटणें; श्रमी होणें, कष्ट भोगणें; प्रसुतिवेदना भोगणें, वेण येणें.—*t.* कमावणें, राबून तयार क., मशागत क.; श्रमानें क. [at]. -ATORY a chemist's workroom रसायनशास्त्राचें -वैद्यक्रियेचे प्रयोग करण्याची जागा *f*, रसायनकर्मगृह *n*; place where any thing is prepared for use कारखाना, उद्योगगृह *n*. -ER मेहनत करणारा; as disting. from an artisan कामकरी, मजूर; a day l. मजूर. -IOUS *a.* मेहनतीचा, उरस्फोडीचा, कठीण; मेहनती, कष्टाळू, कामसू (mechanic). -IOUS, -LY *ad.* कष्टानें, श्रम घेऊन, श्रमपूर्वक.

LABYRINTH (*labyrinthus*) place full of intricacies गिरकांड्याची जागा *f* -वाट *f*; maze गूढ *n*, कूट *n*, चौऱ्यांशीचा फेरा.

LAC (*Skr. lâkschâ* and *râkshâ*, from *randj*, to dye) लाख *f*, अळता.

LAC *Hin.* लक्ष, लाख.

LACE (*laqueus*, noose) a delicate tissue of thread फीत *f*, नाडी *f*; a string often plaited or otherwise ornamented विणलेली जाळी, 'लेस' *f*; plaited cord विणलेला दोरा -जाळी *f*.—*v.* विणणें, नाडीनें -फितीनें बांधणें; जरीकांठ लावणें.

LACERATE *v.* (*lacerare*) tear फाडणें, विदारणें; afflict दुःख देणें, विदारणें (the heart).

LACK *v. Ger.* उणा -कमी असणें (James i., 5). —*i.* उणें पडणें. —*n.* कमताई *f*, वाण *f*. -LUSTRE *a.* निस्तेज (eyes); as a pearl खवडेवजा, नरम.—*n.* निस्तेजपणा.

LACKER *Ger.* रोगण *n.* — *v.* रोगण लावणें -चढवणें.

LACKEY *F.* खिदमतगार, पोऱ्या.

LACONIC *a.* (from *Laconia* or *Sparta*) थोडक्यांत पुष्कळ बोलून दाखवायाचा, अल्पशब्दक, संक्षिप्त.—& LACONISM *n.* थोडक्यांत पुष्कळ बोलून दाखवायाची रीत *f*; a concise phrase संक्षिप्त वाक्य *n*, संक्षिप्तोक्ति *f*.

LACTAGE (*lac*, milk) दुभतें *n*, गोरस.—LACTARY दुभत्याची जागा *f*.—LACTEAL *a.* दुधाचा, दुग्धमय; conveying chyle अन्नरसवाहक.—*n.* अन्नरसवाहिनी *f*.—LACTESCENT *a.* दूध देणारा, दुग्धोत्पादक; चिकानें -दुधानें भरलेला. —LACTIFEROUS *a.* दूध नेणारा, दुग्धवाहक.

LAD* पोरगा, आडबाप्या, शिशु, कुमार.

LADDER* शिडी *f*, निसण *f*; that by means of which one attains to eminence पायरी *f*, पर्याय.

LADE* *v.* load लादणें, ओझें भरणें -घालणें; ladle पळीनें काढणें -उपसणें [out].

LADLE* पळा, पळी *f*.—of a piece of cocoanut shell, &c. डवली *f*.—*v.* पळ्यानें -पळीनें काढणें -उसपणें. -FUL *n.* पळीभर.

LADY (*bread -keeper) the female head of a household घरधनीण *f*, कारभारीण *f*; a woman of gentle or refined manners कुलीन -सभ्य स्त्री *f*, कुलांगना *f*; as a title बाई *f*; [in England, a title prefixed to the name of any woman whose husband is not of lower rank than a knight, or whose father was a nobleman not lower than an earl]; a wife पत्नी *f*, बायको *f*; Mahomedan l. बिबी *f*; [Our *Lady*, the Virgin Mary]. -BIRD, -BUG, -COW, -FLY कुंकवाचा किडा, सोनकिडा. -LIKE *a.* सभ्य, कुलीन; delicate सुकुमार, कोमल, नाजूक.

LAG *W.* the lowest class गाळ, गदळ, केर: the l. of the people; that which comes in last शेवटीं -सरशेवटीं येणारा: the l. of all the flock.—*v. i.* मागें पडणें, मागसणें [behind].

LAITY (*Gr. laos*, the people) the people as distinguished from the clergy गृहस्थमंडळी *f*.

LAIR *Ger.* couch of a wild beast श्वापद बसायाची जागा *f* -जाळी *f*; any resting-place बसायाची -विसांवा घेण्याची जागा *f*, विश्रांतिस्थान *n*.

LAKE* सरोवर *n*, तळें *n*.

LAMB* young of the sheep kind कोंकरा, कोंकरूं *n*; any person who is as innocent or gentle as a lamb गरिब, बापुडा, गाय, मिसकीन; [L. of God, *Scrip.*, the Savior Jesus Christ, who was typified by the paschal lamb (John i., 29)].

LAMBENT *a.* (*lambere*, to lick) खेळता, चंचळ (flame); twinkling लकलकणारा, चमकणारा: the l. purity of the stars.—LAMBATIVE *a.* चाटायाचा, लेह्य.—*n.* चाटायाचें औषध *n*, चाटण *n*, लेह्य *n*.

LAME* *a* crippled लंगडा, पांगळा, पंगु; not satisfactory लिचापेचा, लंगडा; hobbling, as a verse तुटक, पादविकल.—*v.* लंगडा क.

-LY *ad.* लंगडत लंगडत; लंगडतंगड, तुनुमुनु: an argument l. conducted. -NESS लंगडे-पणा; लिचेपिचेपणा.

LAMELLAR *a.* (*lamina*, plate) खवलांचा, खवल्या; खवलांसारखा रचलेला.

LAMENT *v. i.* (*lamentari*) weep रडणें, आक्रांत क.; feel deep regret अति दुःख वाटणें [for]. —*t.* -चा -विषयीं शोक -खेद क. -ABLE *a.* शोक करायाजोगा, शोच्य: l. declension of morals; mourning शोकाचा (eye). -ATION शोकक. *n*, शोक, विलाप; रडणें *n*, रुदन *n*, आक्रांत; *pl* a book of the Old Testament इर्मेयाचा विलाप.

LAMINA (*L.*) पडदा, पदर, कातळा.

LAMP (*lampas*) दिवा, दीपक, lit. fig.; l. stand दिवठणी *f.* -BLACK काजळ *n*, मस *f*, -LIGHT दिव्याचा उजेड.

LAMPERS, LAMPASS *F.* a swelling of the fleshy lining of the roof of the mouth immediately behind the fore tooth in the horse मुंगा, मुंगी *f.*

LAMPOON *F.* निंदेचा पोवाडा -लेख.

LANCE (*lancea*) भाला.—*v.* भाला मारणें; open with a lancet नस्तरानें फाडणें -चिरणें; throw in the manner of a lance भाल्याप्रमाणें फेंकणें.—LANCER भालेकरी; फांसणी टाकणारा -घालणारा.—LANCET नस्तर *n*; [a high and narrow window pointed like a lancet].

LAND* earth, in distinction from the waters जमीन *f*, भुई *f*; as a country देश, मुलूख; soil जमीन *f*, काळी *f*, क्षेत्र *n*: good l., poor l.; a nation देश, राष्ट्र *n*; the main land, in distinction from an adjacent island देश, मुलूख; the ground जमीन *f*, भूमि *f*; ground left unplowed between furrows बीद *f*; *Law* जमीन *f*, शेत *n*, कुरण *n*, वगैरे; crown *lands* खालसा, शेरी *f*; cultivator of crown *lands* शेरीकरी; *lands* tenanted from the State रक्मी जमीन *f*; irrigated l. पाटस्थळ *n*; descriptive roll of l. जमीनझाडा; bringing of *lands* into cultivation कीर्द *f*; yielding one crop a year एकफरदी *f*, एकपिकी *f*; l. bearing two crops in a year दुपिकी *f*; *lands* and tenements जमीनजुमला; l. held on sub-lease खोतसज्जा *f*; bad and untilled l. lying amidst cultivated fields पोटखराबा; a portion of cultivated l. left unsown amidst land under cultivation पोटपडीत *n*; l. exempted from revenue attached to some secular function, as that of *Pátil*, or any village officer, or for the purpose of keeping up useful constructions, as reservoirs, &c. प्रपंचार्थ; *landed* proprietor मिरासदार; l. farmer of the crown खोत; gift of l. भूमिदान *n*; valuation of l. by inspection नजरपाहणी *f*; to make l., or to make the l. समुद्रांतून जमीन पाहणें -जमिनीचा शोध लागणें.—*v.* किनाऱ्यास -कांठास लावणें -उतरणें. —*i.* किनाऱ्यावर उतरणें [at]. -ED *a.* जमिनीचा, शेताचा (estate); जमीनदार, शेतकरी. -FORCE खुश्कीवरचें लष्कर *n*. -ED GENTLEMAN, -HOLDER जमीन-मिरासदार, फजिनदार. -ING *a.* गलबतावरून माल वगैरे उतरण्याचा (charges).—*n.* गलबतांतून किनाऱ्यावर उतरणें *n*; also -PLACE किनाऱ्यावर उतरण्याची जागा *f*, घाट, बंदर *n*. -JOBBER जमिनीचा व्यापारी. -LADY घरधनीण *f*; mistress of an inn वाटसरांकरितां खाणावळ घालणारीण *f*. -LORD जमिनीचा मालक; घराचा मालक; वाटसरांकरितां खाणावळ घालणारा. -MARK शिवेची खूण *f*; गलबतांस वाट दाखविण्या करितां जमिनीवरली खूण *f*. -SCAPE, portion of land or territory which the eye can comprehend in a single view, including all the objects it contains डोळ्याच्या टप्यांतला -दृष्टींतला देश, दृष्टिगोचर देश; picture exhibiting some real or fancied scene in nature

सृष्टींतील देखाव्याचें चित्र *n*. -SURVEY जमीन-मोजणी *f*. -TAX शेतसारा, धारा, सारा. -WAITER बंदरांतला -घाटावरचा झाडेकरी, तलाशी. -WIND तडीचा वारा, मतलई *f*.

LANE *D*. गल्ली *f*, शेरी *f*, बोळ.

LANGUAGE (*lingua*, the tongue) human speech वाणी *f*, वाचा *f*; forms of speech peculiar to a particular nation भाषा *f*; expression शब्द, वाक्य *n*; style भाषणाची शैली *f* -सरणी *f*; inarticulate sounds by which irrational animals express their feelings or their wants जनावरांची भाषा *f*; [suggestion by objects of ideas associated therewith: the l. of flowers]; a nation, as distinguished by their speech राष्ट्र *n*, लोक; vulgar l. प्राकृत भाषा *f*;—of the gods गीर्वाण भाषा *f*; bad l. दुरुक्ति *f*, दुर्भाषण *n*; abusive l. शिवराळ भाषण *n*, शिवीगाळ *f*; a barbarous l. म्लेंच्छ भाषा *f*; provincial l. देशभाषा *f*.

LANGUID *a*. (*languere*, to be faint) ग्लान, म्लान, सुस्त; tardy मंद, ढिला, शिथिल, धिमा (motion); promoting weakness or heaviness सुस्ती आणणारा, सुस्तीचा.—LANGUISH *v. i.* लंवणें, ग्लानि येणें; आळसावणें, मंदावणें, रेंगणें, रखडणें; wither वाळणें, सुकणें; look with softness or tenderness, as with the head reclined, and a peculiar cast of the eye कामार्द्र -प्रणयमंजुल दृष्टीनें पाहणें; pine विरहानें धुरणें, झुरणें.—LANGUOR सुस्ती *f*, म्लानि *f*, ग्लानि *f*, जाड्य *n*.

LANK* *a*. loose ढिला, सईल; weak and slender लुकड, पातळ.

LANTERN (*lanterna*) फाणस *m*, *n*, कंदील *m*, *n*.

LAP* lower part of a garment that plays loosely पदर, घोळ, झोळ; part of the clothing that lies on the knees when a person sits down मांडी *f*, ओसंग *f*; edge शेव, कांठ; कांच, मणी वगैरे साफ करण्याचें चाक *n*;—of a petticoat, &c. ओटी *f*; —*v.* fold घडी क., दुमडणें; wrap गुंडाळणें; involve गोवणें, गुतविणें.—*i.* एकावर एक पडणें -चढणें; घडी होणें. -DOG मांडकुत्रा.

LAP* *v. i.* take up liquor or food with the tongue चकचक खाणें किंवा पिणें; खातांना किंवा पितांना चकचक आवाज क.—*t.* चकचक खाणें -पिणें; जिभेनें चाटणें [up].

LAPDIARY (*lapis*, stone) जोहारी, मणेर.

LAPSE *v. i.* (*labi*, to fall) निसरणें, प्रवाह -गति होणें; fall from virtue सन्मार्गभ्रष्ट होणें, बिचलणें, घसरणें; fall or pass from one proprietor to another एका मालका पासून दुसऱ्या मालकाच्या हातीं जाणें; *Law*, become void रद्द होणें.—*n.* गति *f*, प्रवाह;—of time कालगति *f*; घसरणें *n*, चळ, ढळ, भ्रंश; a fault दोष, चूक *f*.—LAPSUS LINGUÆ जिव्हादोष.—LAPSUS CALAMI हस्तदोष.

LAPWING* टिटवी *f*.

LARBOARD* the left-hand side of a ship, when a person stands with his face to the head डावें बोडद *n*.

LARCENY (*latro*, a freebooter) *Law* चोरी *f*.

LARD (*lardum*) (मासापासून गाळून वेगळी केलेली) डुकराची चरबी *f*.

LARGE *a*. (*largus*) big मोठा, थोर; wide लांबरुंद, प्रशस्त, मोठा, विशाल (field, plain, river); abundant पुष्कळ, विपुळ (supply); numerous मोठा, मोठे संख्येचा (assembly, town); huge टोलेजंग, बताडा, मोठा (tree, ship); unexpended पुष्कळ, लांब, दीर्घ, (time, day); diffuse पाल्हाळाचा, विस्तारपूर्वक, विस्तीर्ण (language, style); generous उदार, प्रशस्त, प्रगल्भ (the heart); comprehensive व्यापक, बहुसंग्रही, विशाल (the mind); free मोकळा; at l. मोकार, मोकळा; विस्तारानें, विस्तारें करून: to discourse on a subject at l.; prisoner at l.

नजरकैदी. -LY *ad.* पुष्कळपणीं; सविस्तर; उदार -मोकळ्या मनानें -हातानें. -NESS मोठेपणा, महत्व *n*; प्रशस्तता *f*; उदारपणा, औदार्य *n*; पुष्कळपणा, विपुलता *f*, बाहुल्य *n*, प्राचुर्य *n*.—LARGESS बक्षीस *n*, देणगी *f*.

LARK* कुकुडकुंभा, भारद्वाज.

LARUM, See ALARUM.

LARVA (*L.*) कोशांतला किडा, कोशस्थकीट.

LARYNX (*Gr.*) नरडें *n*, कंठध्वनीचें व श्वासोश्वासाचें इंद्रिय *n*, कंठ.

LASCIVIOUS *a.* (*laxus*, lax) स्त्रीव्यसनी, स्त्रीविषयलंपट; in comp. विषय (desires); कामहेतुक, कामभावाचा, विषयवासनेचा. -NESS कामबुद्धि *f* -दृष्टि *f*, कामातुरपणा.

LASH *Ger.* thong of a whip पागोरा; stroke with a whip चाबकाचा फटकारा, फटका; stroke of a sarcasm ठोमणा, ठोंसरा.—*v.* कोरडे -फटके मारणें; ठोमणा देणें.—*i.* चाबूक फडफडावणें; make a severe attack रगडून हल्ला क.; out लाथा मारणें, दुमाल्या झाडणें.

LASS (See LAD) मुलगी *f*, आडबायको *f*, बाला *f*.

LASSITUDE (*laxus*, loose) ग्लानि *f*, सुस्ती *f*, कलमल *f*, मांद्य *n*.

LAST* *a.* coming after all the others of a series, in time or place सरशेवटचा, शेवटचा; final शेवटचा, शेवटला, अंत्य; next before the present गेला, मागला, गत (week); l. year गतसाल *n*, गुदस्त *n*; utmost निदानींचा, निर्वाणींचा; lowest सर्वांच्या खालचा, हलका (prize); most unlikely असंभाव्य, हजार वाटयानें न होण्या -करण्याजोगा: he is the l. man to appear generous; at l. शेवटीं; to the l. शेवटपर्यंत; l. but one उपांत्य.—*ad.* मागें, मागल्या खेपेस; शेवटीं, अखेरीस; सगळ्यांच्या शेवटीं.

LAST* *v. i.* endure राहणें, टिकणें, तगणें; hold out निभणें, पारपडणें, टिकणें. -ING *p. a.* टिकाऊ; सतत राहणारा; l. color पक्का रंग.—

LAST* जोडयाचा सांचा, कलबूत *m*, *n*, 'लास्ट' *f*.—

LAST* ओझें *n*; चार हजार पौंडाचें एक वजन *n*, आहे.

LATCH *F.* दाराची फिरकी *f*, चिमणी *f*.—*v.* खिटी घालणें, फिरकी फिरवणें.

LATE* *a.* coming after others, or after the usual or expected time उशिरां आलेला, समयातीत, मागसलेला (spring); far advanced towards the end फार चढलेला -उतरलेला -गेलेला; l. period of life वृद्धापकाल, उतरतें वय *n*; deceased मयत; out of office माजी; recent अलीकडचा, नवा, नूतन (intelligence).—*ad.* उशिरां, उशिरानें: he arrived l.; अलीकडे, थोड्या दिवसांमागें; फार चढल्यावर -गेल्यावर: it is l. (in the day) दिवस फार गेला, दिवस थोडा राहिला; it is l. in the night रात्र फार गेली -थोडी राहिली; of l. अलीकडे; too l. फार उशिरां. -LY *ad.* अलीकडे. -NESS उशीर, अवेळ *f*.

LATENT *a.* (*latere*, to lie hid) गुप्त, अदृश्य.

LATERAL *a.* (*latus*, side) बाजूचा, बाजूकडला (view of an object) proceeding from the side बाजूकडून निघालेला, बाजूचा (branches). -LY *ad.* बाजूस, बाजूनें; बाजूकडे

LATH* कांबिट *n*;—for a roof रीप *f*, ओंबणाची काठी *f*.—*v.* ओंबण घालणें.—LATHY *a.* काठांग्या, लकड्या.—LATHE चरख;—of the weaver वैकाठी *f*.

LATHER *v. i.* form a foam with water and soap साबणाचा फेस होणें; become froth फेसाळणें.—*t.* साबणाचा फेस लावणें; beat severely खूप ठोकणें -मारदेणें, कुंदी काढणें [vulgar].—*n.* साबणाचा फेस.

LATITUDE (*latus*, broad) रुंदी *f*; room जागा *f*; extent विस्तार; laxity मोकळीक *f*, अप्रतिबंध; शैथिल्य *n*; breadth of signifi-

cation अर्थविस्तार, अर्थव्याप्ति *f*; *Geog.* distance of any place in the globe, north or south of the equator अक्ष; celestial l. शर.—LATITUDINARIAN, one who indulges freedom in thinking ज्याच्या विचारास -मतास निर्बंध नाहीं तो; *Theol.* one who departs in opinion from the strict principles of orthodoxy ज्यास शास्त्राचा निर्बंध नाहीं तो, शास्त्रशैथिल्यानुयायी. -ISM मतशैथिल्य *n.*

LATTER *a.* (comp. of *late*) पाठीमागचा, अलीकडचा, शेवटचा (rain); mentioned as the last of two मागून सांगितलेला, उत्तरोक्त, दुसरा; modern नवा, अर्वाचीन (ages); latest शेवटचा. -LY *ad.* अलीकडे, थोडक्या दिवसांच्या आंत.

LATTICE* जाळी *f*, जाळीदार काम *n*; जाळीची खिडकी *f*.

LAUD (*laus*) स्तुति *f*; भक्तिच्या वेळीं करायाची ईश्वरस्तुति *f*.—*v.* praise in words alone, or with words and singing स्तुति क., स्तुति गाणें. -ABLE *a.* स्तुत्य, वर्णनीय (motives); healthy शरिरास चांगला, आरोग्यप्रद, हितप्रद: l. juices of the body.

LAUDANUM (*L.*) अफूचा अर्क, 'लाड्नम' *n.*

LAUGH * *v. i.* have the countenance light up, or change so as to express merriment हसणें; be gay आनंदी -उल्लासी होणें, —at थट्टा -उपहास क., हसणें;—in the sleeves गालांत -आंतच्या आंत हसणें. -ABLE *a.* हसायाजोगा, हास्यजनक. -TER हसें *n*, हसूं *n*, हास्य *n.* -ING -STOCK खेळवणा, विनोदास्पद.

LAUNCH *v.* (See LANCE) cause or move or slide from the land into the water जमिनी वरून पाण्यांत ढकलणें -लोटणें; send forth पाठविणें, फेंकणें, टाकणें.—*i.* जाणें; into vice निसवणें.

LAUREL (*laurus*) आकाशवेल *f*.—LAUREATE *a.* आकाशवेलानें शृंगारलेला; poet l. राजकवि, राजाच्या पदरचा -दरबारी कवि.

LAURUS (*L.*) L. nobilis आकाशवेल *f*; L. camphora कापराचें झाड *n*; L. cassia तमालवृक्ष; leaf of L. c. तमालपत्र *n.*

LAVA (*lavare*, to wash) ज्वालामुखींतल्या खडकाचा रस, 'लावा.'—LAVE *v.* धुणें.—*i.* अंघूळ -स्नान क.—LAVER तस्त *n*, गंगाळ.—*n.* LAVENDER एक सुगंधि वनस्पति आहे; l. water एक सुवासिक पाणी आहे, 'लवेंडर वाटर *n*,

LAVISH *a.* (*levare*, to raise) profuse घळघळीत, चळचळीत; prodigal उधळ्या, उडाऊ; wild उनाड, बेबंद [of] *v.* उधळणें, उडवणें; छणछण देणें, उदार हातानें देणें, प्रशस्त देणें [on]. -LY *ad.* उडाऊपणानें; सढळ हातानें, उदारपणें, छणछण; रगड, एथेच्छ.

LAW * rule of order or conduct established by authority नेम, निर्बंध, विधि; a fixed regulation कायदा, कानु; an order हुकूम; a decree ठराव, व्यवस्था *f*, बंदोबस्त; appointed rules of a community or state, for the control of its inhabitants कायदा, शिरस्ता, दस्तूर; the regular method or sequence by which certain phenomena or effects follow certain conditions or causes स्वभावनिर्बंध, सृष्टिनियम, नियम: the l. of gravitation; tendency ओढ *f*, कल, प्रवृत्ति *f*: the l. of self-preservation; the will of God, as the supreme moral ruler, concerning the character and conduct of all responsible beings ईश्वरी शास्त्र *n*, ईश्वरी विधि -नियम -शास्त्र *n* -आज्ञा *f*; established usage रूढी *f*, प्रथा *f*, वृत्ति *f*; maxim सूत्र, नियम: the *laws* of versification; the Jewish or Mosaic code मोशाचें नेमशास्त्र *n*; the Old Testament जुनाकरार; litigation वाद, व्यवहार; to go to l. सरकारदरबारांत

जाणें; jurisprudence धर्म -व्यवहारशास्त्र *n*, स्मृति *f*: to study l.; by-law गांवचा -मंडळीचा कायदा; civil l. दिवाणी -मुलकी कायदा; common l. लोकरिवाज; criminal l. फौजदारी कायदा, दंडनीति *f*; [l. -language, language used in legal writings and forms; l. -Latin, corrupt Latin used in the law and in legal documents, &c.]; martial l. लढाईच्या वेळचा लष्करी कायदा; l. of nature सृष्टिनियम, ईश्वरस्थापित सृष्टिनियम; moral law नीतीचा -कर्त्तव्याचा नियम, शास्त्र *n*; the l. of works कर्ममार्ग; ceremonial l. कर्मनियम; code of *laws* धर्मशास्त्र *n*; a work on l. स्मृतिशास्त्र *n*. -FUL *a*. कायदेशीर; यथाशास्त्र, निर्बाध, योग्य; rightful हक्काचा, सत्तेचा. -GIVER कायदे करणारा, विधिस्थापक, स्मृतिकार. -LESS *a*. बेकैद, आचारहीन, पुंड; कायद्याविरुद्ध, बेकायद्याचा, गैरशिस्त (claim); uncontrolled अनिवार, निरंकुश. -LESSNESS बेकैद *f*, पुंडाई *f*. -SUIT खटला, मोकदमा, वाद. -YER धर्मशास्त्रज्ञ, शास्त्री, कायद्यांत वाकबगार; practitioner of law वकील (बारिस्तर, प्लीडर इ०).

LAWN *W*. रानांतलें मैदान *n*, बखळ *f*.—(*linum*, flax) एक जातीचें बारीक वस्त्र *n* आहे.

LAX, See LOOSE. -ATIVE सुखढाळ;—for children घुटी *f*.

LAY* *v*. cause to lie flat भुईसपाट ठेवणें -निजवणें; put down खालीं ठेवणें; deposit बसवणें, शांत क. (a shower, the dust); prostrate जमिनदोस्त -चीत क.; खालीं पाडणें; place in order रचणें, मांडणें (bricks in a wall); make ready तयार क.;—as a snare मांडणें, ठेवणें;—as a plan करणें, रचणें; spread on a surface चढणें, लावणें, माखणें (plaster, paint); appease शांत -थंड क., पाडणें (the wind); stake पण क. -लावणें, पैज मारणें (wager); bring forth and deposit घालणें, गाळणें (eggs); apply लावणें, घालणें (Prov. xxxi., 19); assess बसवणें (a tax); impose घालणें (a burden);—as a punishment लावणें, करणें (Is. liii., 6); charge or ascribe the origin of, or responsibility for आरोपणें, माथीं मारणें -घालणें: to l. want of prudence to one's charge; impose आज्ञा -हुकूम देणें; *Law*, allege पुढें क. -आणणें (damages); *Naut*. depress and lose sight of, by sailing or departing from: to l. the land];—along जमिनदोस्त क.; apart दूर क., टाकणें; aside काढून टाकणें, टाकणें (Heb. xii., 1); सोडणें, टाकणें, बंद क.: to l. aside the use of any thing; away राखणें, निराळा काढून ठेवणें; जतन करून ठेवणें; bare उघडा क.; before दाखविणें, पुढें ठेवणें; by सांठवून ठेवणें, संग्रह क. (1 Cor. xvi., 2); put away टाकणें, सोडणें, घालविणें; काढून ठेवणें (Gen. xxxviii., 19); —damages नुकसानीची रकम मागणें; down देणें, सोडणें (John x., 15); देणें, सोडणें (an office);—as arms खालीं ठेवणें, स्वाधीन क.; offer पुढें क. -ठेवणें (a proposition, principle);—heads together विचार-मसलत क.; hold of on धरणें; in सांठवणें, संचय क.; on चढवणें, लगावणें, मारणें, ओपणें, देणें (blows);—one's self down निजणें, आडवा पडणें (Pls. iv., 8); one's self out बळ खर्चणें, झटणें; open उघडा क.; उघाडीस आणणें, फोडणें (a design); over लावणें; चढवणें, मढवणें: to l. over with gold; out खर्चणें; बेत क.; मांडणें, रचणें (a garden); प्रेतवस्त्रें नेसवणें (a corpse); खर्चणें, कामीं लावणें (one's strength); siege वेढा -गराडा घालणें; गळीं पडणें; आर्जव -जीजी क.; to आरोपणें, लावणें; झटणें; together एकत्र मिळवणें, जुळणें, जमा क.; to heart मनावर घेणें -धरणें, दुःख लागणें; under जिंकणें, वश क.; up सांठवणें, सांचविणें (Matth. vi., 20);

अंथरुणास खिळवणें, निजवणें; to be *laid* up अंथरूण धरून -निजून असणें; उस्तरणें, उखळणें (a ship); upon निकड लावणें, गळीं पडणें; wait for दबा -दडी धरून बसणें -राहणें; waste उद्दस्त क., ओस पाडणें.—*i.* अंडीं घालणें; at मारणें; लावणें; on मारणें, चढवणें (blows); out बेत क.; तजवीज -उपाय क.; upon -वर पण लावणें.—*n.* थर, पदर. -ER थर, पदर; [a shoot or twig of a plant, not detached from the stock, laid underground for growth].

LAY* song गीत *n*; narrative poetry पवाडा.—

LAY* *n.* कुरण *n.*

LAY *a.* (*Gr. laos,* people) pertaining to the laity, as distinct from the clergy गृहस्थाश्रमाचा, गृहस्थांचा. -MAN गृहस्थ, गृहस्थाश्रमी मनुष्य.

LAZAR (from *Lazarus,* Luke xvi., 20) कोडी, रक्तपित्या, कुष्टरोगी. -HOUSE कोड्यांचें इस्पितळ *n.*

LAZY *a. Ger.* slothful आळशी, सुस्त; slow मंद, धिमा, मंदगति (stream); l. weight उणें -कमी वजन *n.*—LAZINESS सुस्ती *f,* आळस.

LEA* कुरण *n*, बहाड *n.*

LEAD* *v.* conduct in a way वाटेनें नेणें, वाट दाखवून नेणें; guide by the hand हात धरून नेणें, पुढें होऊन नेणें; direct and govern पुढार घेऊन चालवणें, अनुशासणें, कारभार पाहणें; precede पुढें होणें, -च्या अगोदर येणें; bring by guidance वाट दाखवून आणणें: self-examination may l. us to a knowledge of ourselves; allure फुसलावणें, फुसलावून -मोह घालून नेणें; influence मनावणें, ओढणें; pass लोटणें, घालणें, काढणें (1 Tim. ii., 2); astray बहकवणें;—captive पाडाव करून नेणें;—the way वाट दाखवणें.—*i.* पुढें होऊन वाट दाखवणें, वाट दाखवणें; पुढार घेणें, पुढाईत होणें; वळवणें, प्रेरणें, नेणें: gaming l. *leads* to other vices.—*n.* पुढार, पुरस्कार; to take the l. पुढार घेणें, पुढारी होणें. -ER हात धरून -वाट दाखवून नेणारा; पुढाईत, प्रमुख, पुरोभागी; one who goes first अग्रसर, अग्रगामी;—of a religious order आचार्य;—of a team सरज्याबैल, मोहरक्या;—of an army सेनापति, बक्षी; the leading editorial article in a newspaper वर्त्तमानपत्रांतला मुख्य निबंध. -ERSHIP पुढारकेपणा, पुढारपणा. -ING *p. a.* मुख्य, प्रमुख; पुढें जाऊन वाट दाखविणारा.

LEAD* a metal शिसें *n*; an article made of lead शिशाचा डागिना; a plummet बुडीद *n;* plates of lead used as covering for roofs छपरावर घालायाचे शिशाचे पत्रे *pl;* roof covered with lead-sheets शिशाच्या पत्र्यांचें छप्पर *n*; *Print.* a thin plate of type-metal, used to separate lines in printing 'लेड' *f*, 'लेडी' *f pl*; red l. शेंदूर; white l., or carbonate of l. सफेता. -EN *a.* शिशाचा. -EN-HEARTED *a.* stupid मूर्ख, मंद, मठ; destitute of feeling निर्दय. -PENCIL शिशाची पेन्सल *f.* -WORT—Ceylon l. चित्रक;—the root रक्तचित्रक -चें मूळ *n.*

LEAF* one of the three principal parts or organs of vegetation पान *n*, पर्ण *n*;—of a flower पाकळी *f*, दळ *n*;—a very thin plate वरख, पत्रा: gold l.; part of a book containing two pages पान *n*, पत्र *n*; one side of a folding door फरदा;—of a handmill तळी *f*; [the movable side of a table; a portion of fat lying in a separate layer]; an ornament resembling, or made in imitation of, the leaves of certain plants or trees पान *n*, पदक *n.*—*v. i.* पानें -पालवी फुटणें: the trees l. in May. -AGE पानें *n pl*, पाला, पालव *f*, पल्लव. -BUD पत्रांकुर. -LESS *a.* नागटा, बुचा (tree). -LET लहान पान *n*, पात *n.*—LEAFY *a.* दाट पानांचा, पर्णमय.

LEAGUE (*ligare*, to bind) a combination of two or more parties for the purpose of maintaining friendship, and promoting their mutual interest, or for executing any design in concert जूट *f*, कट, एकोपा, ऐक्य *n*; alliance between princes or states for their mutual aid or defence राजांचा किंवा संस्थानांचा एकोपा, संधि, कट.—*v.* जुडणें, जूट कूट क. [together, with].

LEAGUE *O. E.* दीड कोस.

LEAK* a crack, fissure, or hole in a vessel that admits water, or permits a fluid to escape गळतें *n*, गळती *f*; to spring a l. फुट घेणें, झरा लागणें; to stop a l. गळतें काढणें.—*v. i.* गळणें, पाझरणें;—a boat &c. पाणी घेणें. -AGE पाझर, गळण *f*; loss by leakage घस *f*, घट *f*.—LEAKY *a.* गळता, पाझरता.

LEAN* *v. i.* deviate from a perpendicular position कलणें, झुकणें; incline in opinion or inclination मनाचा कल -झोंक असणें [to, into]; bend लवणें, ओणवणें; depend for support टेंकणें, ओटंगणें [on, upon].—*v.* ओणवा क.; वांकविणें; टेका देणें. -ING कल, झोंक (to, towards).

LEAN* *a.* wanting flesh रोड, रोडका, कृश; barren भुकिस्त, भुकड (earth); jejune रुक्ष, निरस, पळपळीत (discourse).—*n.* बिन चरबीचें मांस *n*, तांबडें मांस *n*. -NESS रोडपणा, रोडकेपणा, कृशता *f*; *Scrip.* want of the favor of God, or of the satisfaction of a good conscience ईश्वरी कृपेचा आभाव, शुद्धमन नसल्याचें असमाधान *n*. (Pls. cvi., 51).

LEAP* *v. i.* jump उडी मारणें, उडी मारून जाणें; spring झेंप घालणें -मारणें; manifest joy आनंद दर्शविणें, उडी मारणें, टाळ्या पिटणें, कुले थोपटणें इ०.—*t.* वरून उडून जाणें,-वर उडी घालणें; cover,—said of the male of certain beasts—वर उडणें-चढणें.—*n.* उडी *f*, उड्डाण *n*; झेंप *f*; a hazardous act जोखीम *n*, जोखमाचें काम *n*, उडी *f*. -FROG बेडुककुदी *f*. -YEAR अधिक दिवसाचें वर्ष *n*, चौथें वर्ष *n*, (ज्यांत फेब्रुआरी महिन्याला २९ दिवस असतात).

LEARN* *v.* gain knowledge of शिकणें, पढणें, ज्ञानसंपादन क.; teach शिकविणें; receive information -ची बातमी -खबर समजणें [of, from, by].—*i.* शिकणें, समजणें; take pattern अनुसरणें, कित्ता घेणें [of] (Matth. xi., 29); acquire skill in any thing वाकब -निपुण होणें, शिकणें: to l. to play on a flute. -ED *a.* शिकलेला, पढीक, व्युत्पन्न, विद्वान; containing learning विद्वत्तेचा, विद्यासंपन्न (treatise); the l. विद्वज्जन *pl*, पंडित लोक *pl*; a l. fool पढतमूर्ख. -EDLY *ad.* विद्वत्तेनें, पांडित्यानें. -ER शिकणारा, विद्यार्थी. -ING विद्या *f*, ज्ञान *n*; अभ्यास, परिचय, वाकबगारी *f*; हतोटी *f*, कौशल्य *n*; cultivation of l. विद्यानुसेवन *n*; patronising l. विद्यानुपालन *n*; that cultivates l. विद्यानुसेवी; patron of l. विद्येचा पोशिंदा.

LEASE *F.* कौल, कौलनामा.—*v.* कौलानें देणें. -HOLD *a.* कौलाचा, कौलानें घेतलेला (tenement). -HOLDER.—LESSEE इजारदार, कौली मक्तेदार.

LEAST *a.* (comp. of little) सर्वांपेक्षां लहान, कनिष्ठ; हलक्या किंमतीचा, हलका, क्षुद्र; at the l. किमानपक्ष, कनिष्ठपक्ष, निदान; not in the l. कांहींच नाहीं, किमपी नाहीं; at l. खरा तरी, तर खरा.—*ad.* सर्वांहून कमी -थोडा.

LEATHER* skin of an animal dressed and prepared for use कमावलेलें कातडें *n*; dressed hides collectively कामावलेलीं कातडीं *n pl*. -DRESSER ढोर, चर्मकार.—LEATHERN *a.* कातड्याचा, चामड्याचा.

LEAVE* permission परवानगी *f*, आज्ञा *f*, मोक-

ळीक *f*; a formal permission of friends निरोप; to take l. निरोप घेणें;—of absence रजा *f*, सुटी *f*.—*v.* quit सोडणें, सोडून जाणें; forsake सोडणें, टाकणें, त्यागणें; suffer to remain राहूं देणें, ठेवणें, न नेणें: the treasure is *left* behind; intrust स्वाधीन क., हवालणें, सोंपणें: I *left* the papers in his care; refer सोंपणें, हवालणें: whether E were a vassal I l. the reader to judge; cease from सोडणें (Sam. ix., 5.); bequeath मृतपत्रांत लिहून देणें; off टाकणें, बंद क., सोडून देणें (work); नेसायाचा -पांघरायाचा सोडणें, टाकणें (a garment); सोडणें, टाकणें, वर्जणें (acquaintance); out सोडणें, वगळणें, गाळणें, टाकणें (words, a name).—*i.* थांबणें, राहणें.—LEAVINGS *pl.* गदळ, शेष *n*;—of food उष्टें *n*, उच्छिष्ट *n*.

LEAVEN *F.* आंबवण *n*, खमीर *n*; [any thing which makes a general, esp. a corrupting, change in the mass (Matth. xvi., 6). —*v.* आंबवण घालून फुगवणें; taint बिघडवणें, खराब क.

LECHER* रांडबाज, इष्कबाज. -OUS *a.* स्त्रीव्यसनी, इष्की.—LECHERY इष्क -रांडबाजी *f*.

LECTION (*legere*, to read) difference in copies of a manuscript or book पाठभेद; [a lesson or portion of Scripture read in Divine Service].—LECTURE, a formal or methodical discourse, intended for instruction पाठ, व्याख्यान *n*, 'लेक्चर' *n*; a magisterial reproof कानउघडणी *f*, शब्ददंड.—*v.* पाठ सांगणें, व्याख्यान देणें; वाग्दंड क., कान उघडणें [on, upon].—*i.* व्याख्यान देणें, पाठ सांगणें.—LECTURER व्याख्यान देणारा, पाठक, अध्यापक; [a preacher in a church, hired by the parish to assist the rector, vicar, or curate] [on].

LEDGE* a shelf तक्ता, फळी *f*; a ridge of rocks near the surface of the sea पाण्यांतील खडकाचा कंगोरा -चीकड *f*; layer थर.

46 D

LEDGER* खातेवही *f*, खतावणी *f*; a large flat stone such as is frequently laid over a tomb शिळा *f*.

LEE* वाऱ्याचे समोरची दिशा *f* -बाजू *f* -जागा *f*. -WARD *ad.* वाऱ्याच्या समोरच्या दिशेकडे, वाऱ्यासमोर.—*a.* वाऱ्याचे समोरचे दिशेकडचा, दमान, वायुसन्मुख (ship).

LEECH* जळू *f*.

LEER* *v.* आडवा -वांकडा डोळा, नेत्रकटाक्ष. —*v.* वांकड्या डोळ्यानें पाहणें [at].

LEES (See LEE).

LEFT *a.* (*lævus*) डावा, डाव्या हातचा -कडचा; [l. bank of a river, that which is on the l. hand of a person whose face is toward the mouth of the river].—*n.* डावी बाजू *f*; over the l. उलट्या अर्थानें. -HAND उजवा हात. -ED *a.* डावखुरा, डावरा; clumsy अडाणी, आडमुठ्या; unlucky अशुभ, अभाग्य; insincere कपटी, खोटा.

LEG *D.* पाय, तंगडी *f*;—of a table, &c. पाय, खूर;—of mutton रान *f*, टांग *H.*; to stand on one's *legs* पर फुटणें.

LEGACY (*legare*, to appoint by last will) जें मृतपत्रांत लिहून दिलें तें *n*, मृतलेखदान *n*. -HUNTER मृतलेखदानासाठीं आर्जव करीत फिरणारा *n*.—LEGATOR मृतलेखदान देणारा.

LEGAL *a.* (*lex*, law) कायद्या प्रमाणें, कायदेशीर (claim); permitted by law कायद्यांत सांगितलेला, कायदेशीर (trade); *Theol.* according to the law of works कर्ममार्गाचा, कर्ममार्गानुसार; resting on works for salvation कर्ममार्गी; according to the old or Mosaic dispensation मोशेच्या नेमशास्त्रानुसार -प्रमाणें; relating to law कायद्या संबंधी, कायद्याचा. -ITY कायदेशीरपणा, स्मृतिशास्त्रानुयायिता *f*; कर्ममार्गानुसरण *n*. -IZE *v.* कायद्यांत आणणें, कायद्यानें स्थापणें; authorize मोकळीक -मुभा देणें [by].

-LY *ad.* कायद्या प्रमाणें, कायद्या बरहुकूम; कर्ममार्ग आश्रयून -अवलंबून, कर्ममार्गानें.

LEGATE (*legare,* to send with a commission) वकील, राजदूत; [the pope's ambassador to a foreign prince or state].

LEGEND (*legendus,* to be read) a story कथा *f,* चरित्र *n;*—one of a marvellous nature पुराणकथा *f,* चरित्र *n,* महात्म्य *n.* -ARY *a.* कथेंतला, पुराणांतला.—*n.* कथांचें पुस्तक *n,* पुराण *n;* कथेकरी, पुराण सांगणारा.

LEGERDEMAIN *F.* हातचलाखीचा खेळ, गारूड *n.*

LEGIBLE *a.* (*legere,* to read) वाचायाजोगा, सुवाच्य, सुस्पष्ट; capable of being discovered or understood by apparent marks खुणांवरून -चिन्हांवरून समजायाजोगा: the thoughts of men are often l. in their countenances.—LEGIBLY *ad.* साफ, स्पष्ट.

LEGION (*legere,* to gather) a body of soldiers सैन्य *n,* सेनाभार; a great number झुंड *f,* घोळका, समुदाय (Mark v., 9).

LEGISLATE *v.* (*lex,* law) कायदा किंवा कायदे क. [for, upon]. — LEGISLATION कायदे क. *n.* कायदेबंदी *f,* विधिस्थापना *f.* — LEGISLATIVE *a.* कायदे करणारा, विधिस्थापक (body); कायदे करण्याचा, कायदे स्थापण्याचा (style); कायद्यानें केलेला (act). —LEGISLATOR कायदे करणारा, विधिस्थापक.—LEGISLATURE कायदे करणारी मंडळी *f* -सभा *f.*

LEGITIMATE *a.* (do.) कायद्या प्रमाणें, कायदेशीर, यथान्याय; lawfully begotten औरस (children); genuine असल, खरा; following by logical sequence यथान्याय, सुयुक्तिक, तर्कशास्त्रानुसार (result); in accordance with established law रिवाजा प्रमाणें, कायदेशीर, कायद्या प्रमाणें (government); in accordance with rule नेमा प्रमाणें, यथानियम; a l. wife धर्मपत्नी *f.*—LEGITIMACY यथान्यायता *f;* औरसपणा; खरेपणा; सुयुक्ति *f;* कायदेशीरपणा.

LEGUME (*legumen*) शेंग *f; pl* द्विदल धान्य *n.* —LEGUMINOUS *a.* द्विदलजातीय, कडणाचा; शेंगाचा.

LEISURE (*licere,* to be permitted) time free from employment रिकामपण *n,* अवकाश, फुरसत *f;* convenient opportunity सोईची वेळ *f,* convenience सोयी *f,* सोय *f;* at l. रिकामा; सोयीच्या -रिकाम्या वेळीं; अवकाशानुसार, फुरसुतीनें [for, from]. -LY *a.* सावकाशीचा, थंडाईचा, धिमा (walk).—*ad.* सावकाशीनें, थंडाईनें, धिमे.

LEMMA (*L.*) *Math.* पूर्वगृहित सिद्धांत.

LEMON *Per.*—the fruit लिंबू *n;*—the tree निंबुणी *f.* -GRASS गवतीचहा, अतिगंध. -ADE एक प्रकारचें निंबाचें सरबत *n,* 'लेमनेड.'

LEND* *v.* grant to another for temporary use उसणें देणें, जायां -दोन दिवस देणें; afford देणें (assistance); let for hire भाड्यानें देणें;— as money, at interest व्याजीं -कर्जी देणें; to l. a deaf ear कानांत तेल घालून निजणें [to]. -ER उसणें देणारा; money-l. सराफ, सावकार. -ING उसणवारी देणें, जायांस देणें *n;* कर्जी देणें *n;* उसणी दिलेली जिन्नस *f;* l. and borrowing देणें घेणें *n,* देवघेव *f.*

LENGTH* extent of any thing from end to end लांबी *f;* superficial measure क्षेत्रफळ *n;* a determined portion of time नियमित काळ, मुद्दत *f;* indefinite duration अनियतकाळ, दीर्घकाळ; amplification पाल्हाळ, विस्तार; to pursue a subject to a great l.; at l. सविस्तर: let the name be inserted at l.; शेवटीं. -EN *v.* लांबवणें, वाढवणें;—as a line ताणणें; draw out in pronunciation दीर्घोच्चार क., लांबता धरणें [out].—*i.* लांबणें, वाढणें. -WAYS, -WISE *ad.* लांबीनें, लांबी कडून.—LENGTHY *a.* लांबच लांब, लांबलचक, दीर्घसूत्री.

LENIENT *a.* (*lenis,* soft) मवाळ, नरम ; softening सौम्य, सामोपचाराचा; merciful दयेचा, सदय [to].—LENIENCY, LENITY सौम्यता *f,* मृदुता *f;* दया *f;*—as opposed to severity अल्पदंड.

LENS *L.* दुर्बीण वगैरे यंत्राची कांच *f,* भिंग *n.*

LENT* कित्येक खिस्ती मंडळ्याचा चाळीस दिवसांचा उपास आहे.

LENTIL (*lens*) मसूर *f.*

LEO (*L.*) सिंहरास *f.* -NINE *a.* सिंहाचा -संबंधी ; सिंहासारखा. —[L. verse (from *Leo,* a certain monk), a kind of verse the end of which rhymes with the middle.] -PARD (*-pardus,* the male of the panther) खड्यावाघ, चित्ता.

LEPER (*Gr. lepis,* scale) कोडी, कुष्टरोगी. —LEPROSY कोड *n,* कुष्टरोग ; black l. रक्तपित्त *f;* white l. पांढरें कोड *n;* wasting l. गलतकुष्ट *n.*—LEPROUS *a.* कोड्या, महारोगी.

LESS* *a.* -हून लहान -कमी, अल्प ; the privative affix 'less' is expressed by हीन, नि; वि, &c.: पुत्रहीन, निर्बुद्धि, &c.—*ad.* कमी, थोडा. -EN *v.* कमी -थोडा क.; degrade मान कमी क.—*i.* लहान -कमी होणें; उणावणें, उतरणें. -ER *a.* लहान, कमी, अल्पतर.

LESSEE (See under LEASE).

LESSON (See LECTION) any thing read or repeated to a teacher by a learner धडा, पाठ ; a precept विधि, सूत्र *n* ; doctrine उपदेश; शिक्षा *f;* rebuke शब्दाचा मार, वाग्दंड; portion of Scripture read in Divine Service पाठ ; l. to be read वाचणी *f;* l. to be conned घोकणी *f,* संथा *f;* to get a severe l. पटकी -ठेंच खाणें ; to take a l. from दाखला -धडा घेणें; to learn a lesson, get instruction from अद्दल खाणें -घडणें

LEST* *conj.* कदाचित, नजाणो.

LET* *v.* allow मोकळीक -परवानगी देणें, -ऊं देणें : I will l. you go मी तुला जाऊं देईन; lease भाड्यानें देणें [out]; alone सोडणें; वाटेस न जाणें;—blood रक्त काढणें, शीर काढणें; down बुडूं देणें; पडूं देणें; खाली सोडणें; नरम पाणी देणें, पाणी देऊन नरम क. (tools); fly फेंकणें, झोकणें, सोडणें (an arrow, a stone); in, into आंत येऊं -जाऊं देणें; मध्यें घालणें ; loose मोकळा सोडणें -फिरूं देणें ; out सोडणें, जाऊं देणें (an animal); ढिला सोडणें, लांबविणें, ताणणें (a rope); भाड्यानें देणें; off सोडणें, फेंकणें (an arrow) ;—as a gun बार -तोफ -बंदूक सोडणें; release सूट -माफी देणें, दंडमुक्त क.

LET* *v.* अटकाव *f* -अडथळा *f* -हरकत क.—*n.* अडथळा ; without l. or hindrance रोख, ठोक.

LETHARGY (*Gr. lethe,* oblivion, *argos,* lazy) morbid drowsiness झांप *f,* झांपड *f;* profound sleep गाढ निद्रा *f,* कुंभकर्णी झोंप *f.* —LETHARGIC, -AL *a.* अति निद्राळू; जड, मदड ; गाढ, घोर (sleep).

LETTER (*littera*) a mark, used as the representative of a sound, or of an articulation of the human organs of speech अक्षर *n,* वर्ण; an epistle पत्र *n,* कागद; literal statement पदार्थ, शब्दार्थ; types अक्षरें *n pl,* अक्षराचे ठसे -छाप *pl;* learning विद्या *f,* चार अक्षरें *n pl;* l. of administration मयताच्या जिंदगीची वहिवाट करण्याचें मुखत्यारपत्र *n* ;—of attorney मुखत्यारनामा, वकीलपत्र *n* ;—of credit पतीचा -लायकीचा दाखला, भलावणपत्र *n,* भलावण *f;* —of license सावकारानें मोडक्या कुळास दिलेल्या मुदतीचा दाखला; *letters* patent सनद *f;* compound l. जोडअक्षर *n;* l. by l. अक्षरशः ; by l. पत्रद्वारां; on sight of the l. पत्रदर्शनीं.—*v.* -वर अक्षरें लिहिणें, अक्षरां-

कित क. (a book) -ED *a.* शिकलेला, पढलेला, पढीक; विद्येचा, विद्याविषयक; अक्षरांकित. -WRITER पत्रलेखक; [instrument for copying letters].

LEUCO-PHLEGMACY (*Gr. leukos,* white, *phlegma,* phlegm) कफोदर.

LEUCORRHÆA (*Gr. -rhein,* to flow) धुपणी *f.*

LEVEE *F.* सकाळचें दर्बार *n,* मातःसभा *f.*

LEVEL* *a.* flat सपाट, सारखा; horizontal आडवा; of the same height सारख्या उंचीचा, बराबर; equal in rank बरोबरीचा, सारखा, समान; l. ground सपाटी *f,* समभूमि *f;* l. surface समपृष्ठ -तल *n,* सपाटी *f,* सारखी जमीन *f;* सारखेपणा, समानता *f;* rate दर, धडा, भाव; rule नियम; plan बेत; line of direction in which a missive weapon is aimed शिस्त *n,* धोरण *n,* संधान *n;*—of masons and carpenters पाणसळ *f.*—*v.* सारखा -सपाट क.; शिस्त धरणें, रोखणें, आडवा क.; जमीनदोस्त क., जमिनीस मिळवणें; सारखा -समान क.: to l. all ranks and degrees of men; utter बोलणें, झोकणें, तोंडावाटे काढणें (remarks).

LEVER (*levare,* to raise) तरफ *f,* उटाळी *f.*

LEVIGATE *v.* (*levis,* smooth) rub or grind to a fine, impalpable powder उगाळणें, वाटणें, घोटणें; render smooth गुळगुळीत -साफ क. —LEVIGATION उगाळणी *f,* घोटणी *f.*

LEVITE *Heb. a.* लेवीच्या वंशांतला, लेवी.

LEVITY (*levis,* light in weight) हलकेपणा; frivolity हलकटपणा, छिचोरी *f;* vanity पत्राज *f,* मिजास *f;* want of seriousness मनाचा हलकेपणा, अगांभीर्य; inconstancy चंचळ स्वभाव, चंचलता *f.*

LEVY (See LEVER) raise, as troops जमवणें, फौजबंदी क.;—as taxes पट्टी बसवून वसूल जमा क. [for, upon].—*n.* फौजबंदी *f;* पट्टी *f.*

LEWD* *a.* इष्कबाज, बदख्याल, कामासक्त; बदख्यालीचा, कामुक (actions). -NESS स्त्रीव्यसन *n,* इष्कबाजी *f,* बदख्याली *f;* wickedness दुष्टपण *n,* पाप *n.*

LEXICON (*Gr.*) a dictionary शब्दकोश; [a dictionary of words in a foreign language: a Greek l.].— LEXICOGRAPHER कोशकर्त्ता.—LEXICOGRAPHY शब्दकोशरचना *f;* principles according to which dictionaries should be constructed शब्दकोशरचनेचे नियम *pl.*

LIABLE *a.* (*ligare,* to bind) responsible जबाबदार, मोसबदार: the surety is l. for the debt of his principal; subject अधीन, वश, योग्य, जोगा: l. to imprisonment.— LIABILITY मोसबेदारी *f,* जिम्मेदारी *f;* अधीनता *f,* वशता *f,* -जोगेपणा.

LIAR, See under LIE.

LIBATION (*libare,* to pour out as an offering) the act of pouring a liquor, usually wine, either on the ground or on a victim, in sacrifice, in honor of some deity तर्पण *n,* पेयार्पण *n;* the liquor poured out तर्पणद्रव्य *n,* पेयद्रव्य *n.*

LIBEL (*libellus,* a little book) *Law,* a malicious publication expressed either in print or in writing, or by pictures, effigies, or other signs, tending either to injure the memory of the dead, or the reputation of one alive, and expose him to public hatred, contempt, or ridicule निंदालेख, अपवादलेख, 'लैबल' *n;* the crime of publishing a defamatory writing निंदालेख प्रसिद्ध केल्याचा -लैबलचा अपराध.—*v.* निंदापत्र लिहून अब्रू घेणें. -OUS. -LOUS *a.* निंदेचा, अपवादक.

LIBER (*L.*) झाडाची अंतर्साल *f.*

LIBERAL *a.* (*liber,* free) free by birth कुलीन;

gentle in manners सभ्य, शिष्ट ; befitting a gentleman गृहस्तगिरीचा, गृहस्थी, गृहस्थास शोभेस (education); generous उदार, सढळ हाताचा ; enlarged in spirit उदार मनाचा, उदार; ample पुष्कळ, विपुळ, प्रचुर; licentious बेकैद ; [not bound by orthodox or established tenets in political or religious philosophy] [to]. -ITY उदारपणा, औदार्य *n* ; औदार्य *n*, उदारपणाचें कृत्य *n* ; मोकळें -प्रशस्त मन *n* ; candour निष्कपटपणा ; impartiality निष्पक्षपात; many treat the Gospel with indifference, under the name of l. -LY *ad.* उदारपणानें ; प्रशस्तपणानें ; उदारमनानें ; not literally अर्थ न सोडून, अक्षरशः नव्हे : to translate l.—LIBERATE *v.* मोकळा क., बंदमुक्त क.; manumit दास्यत्वांतून सोडणें [from].—LIBERATION मोकळें क. -होणें *n* ; मोकळीक *f*, सुटका *f*, मुक्ति *f*.—LIBERATOR सोडणारा, सोडविणारा, मुक्तिदाता.—LIBERTINE मोकळा, मुक्त ; a man who lives without restraint of the animal passions सोदा, लुच्चा, बदफैली ; a free-thinker शास्त्र न मानणारा.—LIBERTINISM सोदेगिरी *f*, इष्कबाजी *f*.—LIBERTY मोकळीक *f*; leave रजा *f*, परवानगी *f*; privilege मुखत्यारी *f*, अधिकार ; exemption माफी *f*, सूट *f*; permission to go about freely within certain limits हद्दीच्या आंत फिरण्याची परवानगी *f*; the limits within which such freedom is exercised अटकेवांचून फिरण्याची हद्द *f*: the *liberties* of a prison; freedom from, or neglect of observance of, the laws of etiquette, propriety, or courtesy आगळीक *f*, अमर्यादा *f*:—to take a l.; the power of choice स्वेच्छा *f*, निवडण्याची मुखत्यारी *f*; freedom from compulsion or constraint in willing स्वतंत्रता *f*; at l. मोकळा ; civil l. लोकांस आपल्या हक्का प्रमाणें वागण्याची मोकळीक *f*, हक्काची स्वतंत्रता *f*; l. of the press (सरकारची देखरेख नसतां) छापण्याची मोकळीक *f*; moral l. जबाबदार प्राण्याची स्वतंत्रता *f*; religious l. आपल्या मना प्रमाणें धर्मसंबंधी मत बाळगण्याची किंवा भक्ति करण्याची मोकळीक *f*.

LIBIDINOUS *a.* (*libido*, lust) See LEWD.

LIBRA (*L.*) तूळरास *f*.

LIBRARY (*librarium*, book-case) a collection of books belonging to a private person, or to a public institution or company पुस्तकसंग्रह, पुस्तकांचा भरणा; apartment for holding a collection o. books ग्रंथालय *n*, किताबखाना, 'लैब्ररी' *f*.—LIBRARIAN किताबखान्यावरचा अधिकारी -कामदार, 'लैब्ररियन.'

LICENSE (*licere*, to be permitted) हुकूम, परवानगी *f*; a formal permission from the proper authorities to perform certain acts परवानगी *f*, सनद *f*, सरकारी हुकूम; written document by which a permission is conferred सनद *f*, परवाना, 'लेसन' *n*; excess of liberty बेकैदपणा [for].—*v.* सनद -परवानगी देणें ; authorize to act in a particular character अमूक एक काम करण्याची -हुद्दा चालविण्याची परवानगी -सनद देणें ; to l. a man to preach, to practise medicine. -LICENSED *p. a.* सनदी, परवानगीचा.—LICENTIOUS *a.* मोकळा; बेकैद, बेबंद (conduct) ; सोदा, लुच्चा (man). -NESS बेकैदपणा, अत्याचार, अनाचार ; सोदेगिरी *f*, लुच्चेशाई *f*, ढंग *pl*.

LICK* *v.* pass or draw the tongue over चाटणें; take in by the tongue चकचक पिणें, चाटून खाणें, पिणें ; to l. the dust मारला जाणें ; लढाईंत मरणें ; to l. the spittle of थुंकी झेलणें, हांजी हांजी क.; up चाटून पुसून साफ क., चट क., फन्ना उडवणें.—LICKERISH *a.*

nice in the choice of food चोखांदळ, चोखनळ; greedy to swallow लाळघोट्या, मिटक्या मारणारा.

Lick *Sw.* टोला, चपाटा.—*v.* टोला देणें.

Licorice (*Gr. glukos,* sweet, *riza,* root) जेष्ठ -जेठीमध *f,* रतनगुंज *f,* सूस *m,f.*

Lid* cover झांकण *n,* ढांपण *n*; eyelid पापणी *f,* नेत्रकपाट *n.*

Lie* a criminal falsehood अन्यायाची लबाडी *f*; falsehood uttered for the purpose of deception ठकविण्याकरितां सांगितलेली खोटी गोष्ट *f*; intentional violation of truth अनृत *n,* लबाडी *f*; give the l. to लबाडीचा दोष लावणें, खोटेपणा आणणें; false doctrine खोटा उपदेश.—*v.* खोटें बोलणें किंवा खोटें काम क.

Lie* *v. i.* be low पडणें; be in a horizontal position आडवा पडणें -असणें; rest on a bed or couch बिछान्यावर -पलंगावर पडणें -निजणें -लवंडणें, आंगटाकणें; be situated राहणें, असणें: Ireland *lies* west of England; abide राहणें, पडणें: to l. open, to l. hid; be dependent हातीं -अधीन -स्वाधीन असणें; consist असणें: diversion *lies* in hard labor; sleep निजणें; to l. at the heart जिवासीं असणें, मनेच्छा असणें; by बरोबर -पासीं असणें: he has the manuscript *lying* by him; rest विसांवा घेणें: we *lay* by during the heat of the day; down लवंडणें, आंगटाकणें; निजायास जाणें; —hard or heavy दडपणें, चेपणें; in बाळंत होणें, कोनी निघणें;—in one -च्या हातीं असणें (Rom. xii., 18);—in the way वाटेंत -आडवा असणें;—in wait दबा धरून बसणें; on, upon अंगावर -शिरावर -गळ्यांत असणें;—on hand हातीं असणें; बाकी असणें, बाकी विकायाचा असणें;—on the hands रिकामा असणें (time);—on the head of माथीं असणें; over मुदतीच्या पलीकडे (हुंडी वगैरे) पैसा दिल्यावांचून राहणें; महकूब -तहकूब राहणें; to, *Naut.* be checked or stopped, either by counterbracing the yards or taking in sail बाकसी घेणें; under खालीं -अधीन असणें; with -च्या बराबर राहणें -निजणें; -च्या पाशीं निजणें, संभोगणें; -चें असणें: it *lies* with you to make amends.

Liege *a.* (*ligare,* to bind) हुकमी, ताबेदार, प्रजाधर्मी (man); sovereign मुख्य, श्रेष्ठ (lord).—*n.* रयत *f,* प्रजा *f,* ताबेदार; खावंद, धनीसाहेब, महाराज.

Lieutery (*Gr. leios,* smooth, *enteron,* an intestine) a lax diarrhœa, in which the food is discharged only half-digested भसरें *n,* आमातिसार.

Lieu *F.* जागा *f*; in l. of जागीं, ऐवजीं, बदला.—Lieutenant मुतालीक, प्रतिनिधि, नायब; —in the army कपतानाच्या खालचा हुद्देदार, जमादार, 'लेफ्टेनेंट';—in the navy (तारवावर) नाखोदाच्या खालचा हुद्देदार. —Lieutenancy मुतालकी *f,* नायबी *f*; लेफ्टेनेंटाची जागा *f.*

Life* that state of an animal or plant in which its organs are capable of performing their functions जीव; vitality चेतना *f,* जीवित्व *n*; period between birth and death जन्म, आयुष्य *n,* जिणें *n*; manner of living स्थितिरीति *f,* रहाणी *f*; condition or circumstances, as pleasant or painful जीवित *n,* जिणें *n*; deportment चाल *f,* रीतरवेस *f*; present state of existence इहजन्म, संसार; a person or thing which imparts or excites spirit, vigor, or enjoyment हिम्मत *f,* तेज *n,* शोभा *f,* रंग, जीव इ०: he was the l. of the company; vigor पाणी *n,* हिम्मत *f,* दम, जीव: they have no notion of l. and fire in words; living

form जिवंतरूप *n* -आकार : a picture is taken from the l.; a human being मनुष्य *n*, जीव : how many *lives* were sacrificed during the revolution; system of animal nature जीव, जीवराशि *f*, जीवकोटि *f*: nature swarms with l.; *Poet.* blood रक्त *n*: the warm l. came issuing from the wound (See Gen.ix.4); narrative of a past life चरित्र *n*, आख्यान *n*; the l. of Milton; happiness in the favor of God ईश्वरी कृपेचें सुख *n*; eternal life in contradistinction to eternal death अक्षय जीवन *n*; position in society पदवी *f*, दरजा: high l.; human affairs संसार, प्रपंच, भव; a darling जीव, जीवप्राण, जिवडा; to the l. हुबेहूब, मूर्त्तिमंत, मत बरहुकूम; social l. घर *n*; endowed with l. सजीव; abandonment of l. प्राणत्याग; deprived of l. नष्ट -हतप्राण; the present l. इहजन्म; active or secular l. संसार, प्रवृत्तिमार्ग; vicissitudes of l. संसार -कालचक्र *n*; virtuous l. धर्माचरण *n*; dearer than l. जिवापरता, जिवापलीकडे; reckless of l. जिवावर उदार; saving of one's l. जीवदान *n*; the sea of l. भवसागर; the efficient cause of l. जीवनहेतु; the thread of l. आयुष्याची दोरी *f*; l. and soul जीवप्राण; to lose one's l. प्राणास -जिवास मुकणें; tie for l. जन्मगांठ *f*; provision for l. जन्माची भाकर *f*. -ANNUITY, a sum of money paid yearly during a person's life दरसालची तहाहयात नेमणूक *f*. -BOAT, [a boat so constructed as to have great strength and buoyancy for preserving lives in cases of shipwreck]. -GIVING *a*. जीवनदायक. -GUARD हुजरात *f*, खास रिसाला. —INSURANCE, a contract for the payment of a certain sum of money on a person's death जिवाचा विमा. -LAND, land held by lease for life हयातीची जामीनदारी *f*. -LESS *a*. निर्जीव, मेलेला, मृत; unanimated निर्जीव, जड, अचेतन; insipid निस्सार, निःसत्व, निरस; wanting physical energy लिचापेचा, फुसका, नुकसान. -RENT, rent of an estate that continues for life हयाती -उमरपट्टा (*H*). -STRING आयुष्याची दोरी *f*. -TIME आयुष्य *n*, हयात *f*; all one's l.-time जन्मभर. -WEARY *a*. जिवास त्रासलेला.

LIFT* *v*. raise उचलणें, उंच -वर क.; elevate वाढवणें, सरफराजी क., योग्यतेस चढवणें; elate गर्वानें फुगवणें, चढवणें, चण्याच्या झाडावर चढवणें; remove from its place जाग्यावरून हलवणें -उचलणें; remove by stealing उचलणें, चोरणें; to l. up the eyes पाहणें; दृष्टि वर क.; प्रार्थनेच्या द्वारें ईश्वराकडे मन लावणें; —the feet पाय उचलणें, त्वरा क.;—the hand शपथ घेणें; प्रार्थना करितांना हात वर उचलणें, प्रार्थना क.; पुंडाई क.; आंगावर हात उचलणें -टाकणें -उगारणें, आंगावर जाणें; आळस सोडून कामास लागणें, झटणें (Heb. xii., 12); —the hand against जाचणें, काचणें;—the head गरिबींतून वर काढणें, उदयास आणणें, डोयीवर उचलणें; आनंद क. (Luke xxi., 8); —the heel against लात उचलणें, बेअदबी क.;—the voice ओरडणें, गळा काढणें, रडणें. —*i*. उचलणें; वर चढणें; वर चढल्या सारखें दिसणें: the land *lifts* to a ship approaching it.—*n*. उचलणें *n*, उत्थापन *n*; that which is to be raised उचलायाची जिन्नस *f*, -वस्तु *f* -चा पदार्थ; a rise चढ: the l. of a lock in canals; to give one a l. मदत क.; उचलून (ह्म० गाडी वगैरेंत बसवून) नेणें. -ER उचलणारा; उचल्या, चोर; माल वगैरे उचलण्याचें यंत्र *n*.

LIGAMENT (*ligare*, to bind) बंधन *n*, पाश; *Anat.* अस्थिबंधन *n*, संधिबंधन *n*.—LIGATURE बंद, पट्टी *f*; बांधणें *n*, बंधन *n*; stiffness ताठपणा, ताठा; *Print.* a double character, as

fi, fl, ff, जोडाक्षर *n*; *Surg.* रक्तस्राव बंद करण्या करितां शिरा बांधण्याची दोरी *f*, नाडीबंधन *n*.

LIGHT* that agent or force in nature by the action of which upon the organs of sight, objects from which it proceeds are rendered visible उजेड, प्रकाश; that which gives light दिवा, उजेड, ज्योति *f*; medium through which light is admitted खिडकी *f*, गवाक्ष *n*, इ०; life जीव; a pane of glass तावदान *n*, भिंग *n*; knowledge ज्ञान *n*; spiritual illumination आत्मबोध, परमार्थज्ञान *n*; information माहिती *f*, खबर *f*; day दिवस (Job xxiv., 14); the dawn of day अरुणोदय; publicity उघडीक *f*; a time of prosperity and happiness सुबत्तेचा व आनंदाचा काळ; felicity आनंद, हर्ष, सुख *n* (Is. lviii., 8); illuminated part of a picture चित्रांतील उजेडाची जागा *f*; point of view in which any thing is seen नजर *f*, दृष्टि *f*, लक्ष्य *n*; a model कित्ता, नमूना: the l. of the age; the l. of the countenance कृपा *f*, अनुग्रह; to come to l. फुटणें, बाहेर पडणें; to bring to l. बाहेर आणणें, उजेडास आणणें; to stand out of the l. अंधार सोडणें; to stand in one's own l. आपल्या हातीं आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेणें.—*v.* kindle पेटविणें, चेतविणें; give light to उजेड -प्रकाश देणें; illuminate रोशनाई क., दिवे लावणें; show the way to by means of a light दिव्यानें -उजेडानें वाट दाखविणें. -EN *v.* प्रकाशित क.; ज्ञान देणें, प्रबोधित क. (Luke ii., 32); free from trouble and fill with joy दुःखांतून सोडवून हर्षभरित क. (Ps. xxxiv., 5).—*i.* चमकणें, लकाकणें; clear, as the weather निवळणें, उघडणें. -HOUSE मनोरा, दीपस्तंभ, 'लैट हौस' *n*. -NING विद्युत् *n*, वीज *f*. -SOME *a.* उजेडाचा, सुप्रकाश, तेजस्वी. *Poet.* gay आनंदी, उल्हासी.

LIGHT* *a.* having little weight हलका; not burdensome हलका, सोयीचा, सुवाह्य (load); not difficult हलका, सोपा (task); easy to be digested हलका, सुपच; not heavily armed सडा, सडासांठ (troops); not encumbered सडा, बिनघोर: they are l. to run away; active चपळ, सुटसुटीत; not deeply laden रिकामा (a ship); slight हलका, क्षुल्लक, लहान (error); not dense पातळ, हलका, थोडा (rain, vapors); not strong हलका, माफक, सुमाराचा (wind); inconsiderate अविचारी, विवेकशून्य (person); airy चंचल, वावकळ, अस्थिर (mind); wanton अचपळ, चंचळ, उनाड, विलासी: a woman of l. carriage; not of legal weight कायद्याहून कमी वजनाचा (coin); loose पोकळ, फसफसीत (soil); as color फिका, उभरंग; to make l. of हलका -तुच्छ मानणें, हेलणा क.; मनावर न घेणें. -EN *v.* हलका क.; alleviate हलका -कमी -उपशम क. -FINGERED *a.* चोरी करण्यांत चपळ, उचल्या. -FOOTED *a.* पायाचा -धावण्यांत चपळ; नाचण्यांत चपळ. -HEADED *a.* delirious बेशुद्ध, बरळणारा, बडबडणारा; volatile चंचळ, वावकळ. -HEARTED *a.* मौजी, रंगेल, आनंदी, चैनी. -INFANTRY सडें -चपळ पायदळ *n*, 'लैट इन्फंट्री' *f*. -LY *ad.* हळू, हलक्यानें, भार न देतां: to tread l.; हलक्या मनानें, अविचारानें: ideas l. received; आनंदानें, खुशीनें; सहज, अनायासानें; उगीच, कारणा वांचून, सहज: do not l. appear before men; उनाडपणानें, चंचळपणानें, विलासानें; चपळाईनें; मौजेनें, निष्काळजीनें, गमतीनें. -MINDED *a.* हलक्या मनाचा, छिचोर, पचकळ.—LIGHTS *pl* जनावरांचें फोपीस *n*.

LIGHT *v.* See ALIGHT.

LIGNEOUS *a.* (*lignum*, wood) लांकडाचा, काष्टमय.

LIKE* *a.* equal in quantity, quality, or degree सारखा, समान, बरोबरीचा; men

of l. excellence; similar सारखा, सारखा इ० (James v., 17); probable जोगा, संभाव्य: they were not l. to conform themselves to strict rules; the following can only be used in comp. at the end of a word तुल्य, सम, रूप, अनु, प्रतिम.—*ad.* सारखा, प्रमाणें (Ps. ciii., 13); होण्याजोगा; in a manner becoming योग्य रीतीनें, शोभेसा: quit yourselves l. men. -LIHOOD सुमार, रंग, संभावना *f.* -NESS सारखेपणा, सादृश्य *n*; form स्वरूप *n*, आकार; picture चित्र *n*. -LY *a.* होण्याजोगा-सारखा, संभाव्य (story); pleasing आवडता, मनोरम, प्रिय (men). —*ad.* अधिक -फारकरून, बहुधा, तीन वाटयांनीं. -MINDED *a.* एकचित्ताचा, सममनस्क. -WISE *conj.* तसाच, तसेंच, तद्वत्; also देखील, ही.—LIKEN *v.* बरोबरी -तुलना क., ताडणें (Matth. vii., 24).

LIKE* *v.* be pleased with आवडणें, पसंत होणें, मान्य क.—LIKING आवड *f*, गोडी *f*, चहा *f*; to contract a l. for आवड -मन बसणें; to lose one's l. for (-वरून -एथून) मन उठणें; pleasure संतोष, खुशी *f* [for].

LILY* भूईकमळ *n*.

LIMB* edge कड *f*, किनारा, कांठ; a member अवयव, अंग *n*; branch of a tree फांदी *f*, डाहळी *f*; blade पात *n*; *Astron.* edge of the disk of a heavenly body प्रांत. —LIMBER, LIMBO, *Scholastic Theol.* नरकाच्या किनाऱ्यावरचा प्रांत; place of confinement अटकेची जागा *f*. [the *Limbus Patrum* is a place that the schoolmen supposed to be on the edge or border of hell, where the souls of the patriarchs were detained, and those good men who died before our Savior's resurrection.]

LIME* a viscous substance चिकोटा; oxide calcium चुना; quicklime चुनकळ्या *f pl*; fine l. well ground and blended (for overlaying rough chunam-work and its openings) संदला, निरू; pure fine l. कळीचा चुना; slaked l. पिचवलेला चुना.—*v.* चिकटा लावणें; ensnare पाशांत धरणें; manure with lime चुन्याचें खत घालणें; cement सांधणें, सांधा बसविणें. -BURNER लोणारी. -KILN चुन्याची भट्टी *f*. -STONE चुनखडा. -WATER चुनवणी *n*; burnt l. कळी *f*.—LIMY *a.* चिकट; containing lime चुन्याचा; resembling lime चुन्यासारखा.

LIME *F.* लिंबू *n*;—the tree निंबोणी *f*; the small thick-skinned l. कागदी लिंबू *n*.

LIMIT (*limes*) हद्द *f*, मर्यादा, सीमा *f*; prison *limits* तुरंगाच्या जवळ कैद्यास फिरण्याची हद्द *f*.—*v.* हद्द बांधणें -क.; restrain आळा बांधणें, परिमिति क.; confine the signification of -च्या अर्थाची हद्द बांधणें [to]. -ED मर्यादा केलेला, मर्यादित; परिमित, समर्याद, संकुचित, जुजबी; of l. meaning मितार्थ. -ATION मर्यादा करणें *n*; आळा, मर्यादा *f*, बंध.

LIMNER (*luminare*, to light) पुस्तकांचा चितारी.

LIMP* *v.* लंगडणें, लंगडत चालणें.

LIMPID *a.* (*limpidus*) नितळ, निवळ (stream).

LINCHPIN* चाकाची -आसाची खीळ *f*.

LINCTURE (*lingere*, to lick) medicine taken by licking with the tongue चाटण *n*, अवलेह *n*.

LINE (*linea*) a linen thread or string सुताची दोरी *f*, सुतळी *f*, इ०; a thread-like mark of the pen ओळ *f*, रेघ *f*, रेषा *f*; *Math.* that which has length but not breadth रेघ *f*; boundary मर्यादा *f*, रेघ *f*; contour आकृतीच्या परिघाची रेषा *f*, पांडूरेखा *f*; lineament रेखा *f*, रेषा *f*, रूपरेखा *f*; a straight row ओळ *f*, कतार *f*, रांग *f*: a l. of houses, of soldiers; *Print.* a straight row of letters and words ओळ *f*, पंक्ति *f*,

'लेन' *f*; a note चिट्ठी *f*, दोन बोटें चिट्ठी *f*: a l. from a friend; *Poet.* चरण, पाद; course of conduct ओळ *f*, मोड *f*, रहाळ *f*; method of argument क्रम, श्रेणी *f*, पर्याय; deportment of industry, trade, or intellectual activity धंदा, पेशा; succession of progeny वंश, कुल *n*; connected series of public conveyances तांडा; a measuring-rod सूत्र *n*, सूत *n*; that which is measured by a line विभाग, वांटा (Ps. xvi., 6); instruction उपदेश, शिकवणें *n* (Ps. xix., 4); infantry पायदळ *n*; a trench खंदक; the twelfth of an inch इंचाचा बारावा भाग; l. of battle दंड, रांग *f*; right l. सरळ रेघ *f*; [ship of the l., a ship of war large enough to have a place in the line of battle]; meridian l. रेखा *f*, विषुववृत्त *n*;—as drawn through a word फांटा; to draw a l. ओळ फोडणें, रेघ काढणें; l. of fire बंदुकीचा -तोफेचा मारा; l. of life आयुष्याची (हातावरची) रेघ *f*; the l. along the sinciput (of females) made by parting the hair on both sides भांग.—*v.* रेघा ओढणें, रेखांकित क.; cover or put in the inside of अस्तर क.; as with tin, paper, &c. मढवणें; strengthen by adding any thing जोडून बळकटी आणणें: to l. works with soldiers; impregnate, app. to irrational animals गाभण क., लागणें; read or repeat line by line एक एक ओळ वाचणें -ह्मणणें -ह्मणून दाखविणें. -AGE वंश, घराणें *n*; descendants वंशज, वंश. -AL *a.* रेघांचा, अंकित, रेखित (designs); परंपरेनें आलेला, परंपरागत; l. descendant संतान *n*; रेघांवरून मापलेला, रेघांच्या मानाचा. -AMENT रूपरेषा *f*, अंगलोट;—of the face तोंडवळा, रूप *n*. -AR *a.* ओळीचा; रेखामय; नीट वाटेचा, सरळ.

LINEN*, thread or cloth made of flax तागाचें सूत *n*, किंवा कापड *n*; underclothing आंतलें -अंतर्वस्त्र *n*, वस्त्र *n*.—*a.* तागाचा, सणाचे सुताचा; तागा सारखा; white पांढरा; pale फिका.

LINGER *v.** delay उशीर लावणें; loiter रेंगणें, गमणें; hesitate गुटमळणें; remain long in any state रखडत -भिजत -लांबणीवर पडणें; —in sickness रेंगणें, अंथरूण धरणें, खिरपणें; —a sickness रेंगणें, रखडणें, धुपणें. -ING गमणारा, चेंगट; रखडत चाललेला, चेंगटाईचा; —a disease खितपणीचा, खिरपणीचा.

LINGET *F.* धातूची कांडी *f*, लगडी *f*.

LINGUIST (*lingua*, tongue) अनेक भाषा जाणणारा, बहुभाषज्ञ.—LINGUA-DENTAL *a.* formed or uttered by the joint use of the tongue and teeth जिव्हादंत्य.

LINIMENT (*linire*, to anoint) चोळण्याचें औषध *n*, स्नेहन *n*, अभ्यंगतैल *n*.

LINK *Ger.* a single ring of a chain कडी *f*; any thing connecting लगाबांधा; part of a connected series अन्वय, संबंध, शेव. —*v.* सांगडणें, जोडणें, अडकवणें [together].

LINK (*lychnus*, lamp) मशाल *f*. -BOY मशालजी.

LINSEY-WOOLSEY *a.* कांहीं तागाचा कांहीं सणाचा; mean नीच, अधम.—*n.* कांहीं तागाचें कांहीं सणाचें असें वस्त्र *n*.

LINSTOCK (*lint* and *stock*) तोडा, बत्ती *f*.

LINT* flax ताग; [linen raveled, or scraped into a soft substance, and used for dressing wounds and sores].—LINSEED जवस, अळशी *f*. -OIL जवसाचें तेल *n*.

LINTEL *F.* दारावरची किंवा खिडकी वरची कपाळपट्टी *f*, दारवंठा.

LION (*leo*) सिंह, मृगेंद्र; an object of interest and curiosity चमत्कारिक पदार्थ: to visit the *lions* of a place. -ESS सिंहीण *f*.

LIP* one of the two fleshy parts composing the exterior of the mouth in man and many other animals ओंठ; edge of any thing कड *f*, कांठ; the upper l. ओष्ठ; the lower l. अधर. -DEVOTION वरकरणी भक्ति *f* -प्रार्थना *f*. -LABOR वरकरणी बोलणें *n*.

LIPOTHYMY (*Gr. leipein*, to fail, *thumos*, soul) झीट *f*, मूर्च्छा *f*.

LIPPITUDE (*lippus*, blear-eyed) डोळ्यांचा चिपडेपणा.

LIQUEFIABLE *a.* (*liquere*, to be fluid) पातळ करण्याजोगा, द्राव्य;—as a vowel अंतस्थ.—LIQUEFY *v.* रस क., पाघळविणें.—*i.* पातळ होणें.—LIQUID *a.* पातळ, प्रवाही, सद्रव.—*n.* पातळ पदार्थ, रस; *Gram.* अंतस्थवर्ण. -ATE *v.* पातळ क.; नितळून स्वच्छ क.; pay फेडणें, वारणें (debts). -ATION पातळ क. *n*, द्रावणें *n*; फेड *f*, फडशा. -TOR फेडणारा, 'लिक्विडेटर.' -ITY पातळपणा, प्रवाहधर्म.—LIQUOR पातळ पदार्थ, रस; spirituous fluid दारू *f*, मद्य *n*; l. amnii मोट *f*, पाणमोट *f*.

LISP* *v. i.* शीळ घालून बोलणें; speak imperfectly बोबडें बोलणें.—*n.* शिळीचें बोलणें *n*, बोबडा बोल.

LIST* border of broad cloth बनातीचा कांठ; strip of cloth पट्टी *f*, चिंधोटी *f*; a limit हद्द *f*; catalogue याद *f*, फेरिस्त *n*; [civil l., the civil officers of government; the revenue for the support of civil officers; civil l., in England, embraces only the expenses of the reigning monarch's household].

LISTS *pl* (*licium*, thread) ground or field inclosed for a race or combat रणांगण *n*, रंगभूमि *f*, अखाडा.

LIST* *v. i.* आवडणें, चाहणें; hearken मन देणें -लावणें, ऐकणें [to]. -EN *v. i.* लक्ष्य देऊन ऐकणें, ऐकणें; obey मानणें, ऐकणें;—privily कानोसा घेणें [to]. -LESS *a.* उदास, निरिच्छ, निस्पृह. -LESSNESS अनास्था *f*, अनुत्साह.

LITANY (*Gr. litania*) एक प्रार्थनापद्धति आहे.

LITERAL* *a.* (*littera*, a letter) मुळचा, मुख्य, वाच्य, शब्दाप्रमाणें, खरा (meaning); following the letter or exact words अक्षरशः, शब्दशः, मूळ शब्दानुसार (translation); consisting of, or expressed by, letters अक्षरांचा, अक्षरी (notation). -LY *ad.* मूळ शब्दा प्रमाणें; मुख्यार्थाप्रमाणें.—LITERARY *a.* विद्येचा, विद्याविषयक; विद्वान लोकांचा, विद्येचा (fame); विद्वान, विद्याव्यसनी (man); consisting in letters विद्यामय, विद्येचा, in comp. विद्या: l. property विद्याधन *n*.—LITERATE *a.* & *n.* विद्वान.—LITERATURE विद्या *f*, अक्षर *n*, पढणें *n*; collective body of literary productions, embracing the entire result of knowledge and fancy preserved in writing ग्रंथ, विद्येचे ग्रंथ *pl*; *belles-lettres* इतिहास, काव्य इ० विषयांचे ग्रंथ *pl*.

LITHARGE (*Gr. -lithos*, stone, *arguros*, silver) lead vitrified मुडदाशिंग *n*.

LITHOGRAPH *v.* (*Gr. graphein*, to write) शिळेवर छापणें. —*n.* शिळाछाप.—LITHOGRAPHY शिळाछापाची विद्या *f*.

LITHOTOMY (*Gr. -temnein*, to cut) मुतखडा काढण्याची विद्या किंवा क्रिया *f*.

LITIGATE *v.* (*lis*, dispute) वाद -खटला क.—LITIGANT वादी, खटलेकरी.—LITIGATION वाद, खटला.—LITIGIOUS *a.* खटलेखोर, वादप्रिय (client); खटल्याचा, वादाचा, वादपात्र (grounds); खटल्या संबंधी, वादाचा (bar).

LITTER (*lectus*, couch, bed) डोली *f*, पाळणा; bed of straw for animals गवताची शेज *f*; scattered rubbish पडझड *f*, घाण *f*, खेर *f*, कचरा; condition of disorder अव्यवस्था *f*, पसारा; the number of pigs or other small brutes born at once वेत *n*, वीण *f*.—*v*.

गवत पसरणें, गवताची शेज क.; पसारा क., ऐल-पैल टाकणें; विणें, पसवणें.

LITTLE* *a.* small in size or extent लहान; short in duration थोडा, अल्प, किंचित (time, sleep); small in quantity थोडा, थोडका, कांहीं, अल्प (food); insignificant हलका, क्षुद्र, गैरी; inconsiderable थोडा, जरासा, किंचित (effort, weight, attention); not liberal कृपण, किरमाडी, हलका.—*n.* थोडका भाग, अल्पांश; small space थोडकी जागा, *f*; a little थोडासा, किंचित; by l. and l. थोडा थोडा, तीळतीळ.—*ad.* अमळ, जरासा. -GO [*Eng. Univ.*, a public examination about the middle of the course, which, being less strict, and less important in its consequences, than the final one, has received this appellation].—-NESS लहानपणा, अल्पविस्तार; थोडकेपणा; हलकेपणा, लघुत्व *n*; कृपणता *f*, इ० ;—of mind बुद्धिकार्पण्य *n.*

LITURGY (*Gr. leitos*, public, *ergein*, to work) established formula for public worship प्रार्थनापद्धति *f*; ritual for public worship सामाजिक भक्तिमार्ग किंवा प्रार्थनापद्धति *f.*

LIVE* *v. i.* have life जगणें, वांचणें, जिवंत असणें; pass one's time दिवस लोटणें, काल क्रमणें: to l. happily; abide राहणें, असणें, वस्ती क.; remain राहणें, टिकणें: men's evil manners l. in brass; their virtues we write in water; enjoy life नांदणें, सुखी राहणें; subsist उदरनिर्वाह -उपजीविका क.: those who l. by labor; feed खाणें, चरणें, पोट भरणें: horses l. on grass; *Scrip.* be exempt from spiritual death आत्मिक मरणा पासून मुक्त होणें, जीवन पावणें (Lev. xviii., 5); be inwardly quickened, nourished, and actuated by divine influence or faith ईश्वरी अनुग्रहानें -विश्वासानें वांचणें, जगणें (Gal. iii., 11); to l. with एकत्र राहणें; स्त्री पुरुषाच्या नात्यानें एकत्र राहणें, नांदणें. —*t.* आयुष्य खर्चणें, राहणें, दिवस लोटणें: to l. a life of ease.—*a.* जिवंत, सजीव; glowing तेजदार, पाणीदार; ignited पेटलेला; l. coal निखारा; l. stock घोडा, बैल वगैरे शेतकऱ्यांचीं जनावरें *n pl*, जीवधन *n.* -LIHOOD उपजीविका *f*, जीवन *n*, निर्वाह, चरितार्थ. -LINESS हुशारी *f*, चपळाई *f*, जिवटपणा: l. of youth; पाणी *n*, तेज *n*, रंग: l. of the eye;—of health तुकतुकी *f*;—of the spirit आनंदवृत्ति *f*, दिलरोशनाई *f*. -LONG *a.* लांबणीचा, चेंगट (day). -LY *a.* जिवंत, सजीव (hope); जिवट, पाणीदार (youth); चपळ, हुशार; आनंदी, उल्हासी; चकचकीत, भडक (colors); दणक्याचा, कडाक्याचा, रंगाचा (entertainments, eloquence); life-like हुबेहूबचा, खऱ्याखुऱ्या सारखा, प्रत्यक्षप्राय. —LIVING *a.* जिवंत, सजीव; issuing continually from the earth जिवंत, वाहता (spring); quickening जिवंतकरणारा, जीवनदायक; l. by learning विद्योपजीवी; [l. rock, rock in its native state]; the l. जिवंत लोक -मनुष्यें *n pl.* —*n.* उपजीवन *n*, उपजीविका *f*; estate जिंदगी *f*, मालमत्ता *f*; living comfortably वागणूक *f*, नांदणूक *f*: there is no l. without trusting; act of living वांचणें *n*, जगणें *n*; benefice of a clergyman वृत्ति *f*, उपाध्याची वृत्ति *f.*

LIVER* काळीज *n*, पित्ताशय.

LIVERY *F.* लिभास, पेहराव; चाकरांचा बाणा -पेहराव.

LIVID *a.* (*lividus*) काळानिळा, हिरवानिळा.

LIZARD (*lacerta*) चोपई *f*, सरड वगैरे जातीचा प्राणी; house-l. पाल *f.*

LO* *int.* पहा, पहा बरें.

LOAD* a burden ओझें *n*; amount or quantity which a person can carry एका मनु-

ष्याचें ओझें *n*; contents of a cart or vessel भरगत *n*, भरताड *n*, ओझें *n*; that which burdens, oppresses, or grieves the mind or spirit ओझें *n*, धोंड *f*, भार: a l. of guilt; charge of a fire-arm बार;—of wood, grass, &c. भारा, कबाड *n*; half -l. आंखें *n*.—*v*. ओझें घालणें -लादणें; भार घालणें, अधिक जड क.; बार भरणें. -ED लादलेला; भारग्रस्त, पीडित; भरलेला, बार भरलेला. -ING भरगत *f*, *n*.

LOADSTONE* लोहचुंबक.

LOAF* any thick lump or mass गोळा, ढेप *f*;—of bread रोट, रोटी *f*, 'पांव.' -ER, an idle man आळशी; a vagrant who seeks his living by sponging or expedient तुकडमोड्या, उंडीबकाळ, तैलंगभट, 'लोफर.'

LOAM* चिकणमाती *f*. — LOAMY *a*. चिकणमातीचा.

LOAN* act of lending उसणें देणें *n*, उसणवारी *f*; that which is lent उसणा दिलेला -घेतलेला पदार्थ;—of money on interest कर्ज *n*.

LOATH* *a*. नाखूश, नाराजी.—*v*. -ला कंटाळणें, -चा वीट येणें, विष मानणें. -FUL *a*. अतिद्वेषी; कंटाळवाणा, ओंगळ. -ING कंटाळा, वीट, किळस. -SOME *a*. कंटाळवाणा, ओंगळ, कुत्सित (forms); द्वेष उत्पन्न करणारा (sloth).

LOBBY *Ger*. opening before a room ओटी *f*, ढेलज *f*, ओसरी *f*; a waiting-room सदरे पुढची खोली *f*; [space or room at the head of a staircase]; a confined place for cattle गुरांचा वाडा, गोठा.

LOBE (*Gr*. *lobos*) कोणत्याही वस्तूचा गोल भाग;—of the ear कानाचा चाप;—of the lungs, liver, &c. फुप्फुस, काळीज इ० चा गड्डा.

LOBSTER* शेवंडी नांवाचा एक मासा.

LOCAL *a*. (*locus*, place) स्थान -देशसंबंधी; limited to a place एकदेशी, एकस्थानिक; l. usage देशाचार; l. affection स्थानिक रोग; l. law देशधर्म. -ITY जागा *f*, स्थान *n*; existence in a place स्थिति *f*, जागा *f*; geographical situation देशसंबंध, देश.—LOCATE *v*. place ठेवणें, बसवणें; designate the place of -ची -ला जागा नेमणें -योजणें (a church) [on].—LOCATIVE *a*. स्थलदर्शक (adjective); l. case सप्तमी विभक्ति *f*.

LOCH* an arm of the sea खाडी *Scot*. lake सरोवर *n*.

LOCK* instrument to fasten a door, &c. कुलूप *n*, टाळें *n*; part of a gun बंदुकीचा चाप; inclosure to confine the water of a stream बांध, धरण *n*; grapple in wrestling पकड *f*, पेंच; tuft of hair केसांचा बुचका;—as left on the crown at tonsure शेंडी *f*; a ringlet of hair झुलूप *n*;—for a wheel उटाळें *n*, अडकण *n*; a place which is locked up कोंडी *f*, बंद केलेली जागा *f*.—*v*. कुलूप लावणें -मारणें (a door); कुलपांत ठेवून बंद क.; अटकेंत टाकणें; close fast बंद क.; fasten so as to impede motion खिळणें (a wheel); enclose वेढा घालणें (arms).—*i*. घट्ट बसणें -लावणें: the door *locks* close; unite closely by mutual insertion एकमेकांत गुंतणें -अडकणें: they l. into each other. -ED -JAW दांतखीळ *f*. -ER खण;—in a ship पयाळ. -ET लहान कुलूप *n*; a catch अडकवण *n*, फांसा. -SMITH कुलपें करणारा लोहार, कारंचकर.

LOCOMOTION (*locus*, place, *motio*, motion) एक्या जाग्यांतून दुसऱ्या जाग्यांत जाणें *n*, स्थलांतरगमन *n*; power of changing place स्थानांतर -गमनशक्ति *f*: plants have life, but no l.—LOCOMOTIVE *a*. चलनशक्तिक, जंगम, चर.—*n*. लोखंडी रस्त्यावरच्या गाडीच्या तांड्या पुढची यंत्राची गाडी *f*, आगगाडीचें इंजीन *n*.

LOCUST (*locusta*) टोळ, नाकतोडा.

LOCUTION (*loqui*, to speak) वाणी *f*, उक्ति *f*.

LODGE* *v*. deposit for keeping ठेवणें : to l. arms in the arsenal; throw in फेंकणें, टाकणें, झुगारणें; fix in the heart, mind, or memory मनांत, लक्ष्यांत किंवा आठवणींत ठसवणें-भरवणें; furnish with a temporary habitation बिऱ्हाड देणें; to l. an information फिर्याद क. [at, in].—*i*. बिऱ्हाड क.; बसणें, राहणें, थारावणें.—*n*. a refuge आश्रय, आश्रयस्थान *n*; a small house in a park or a forest बंगला -ली *f*; the house of a gatekeeper on a gentleman's estate देहुडीवरच्या शिपायाची झोपडी *f*; [a secret association, as of the Freemasons, &c. the place in which they assemble]. -ING बिऱ्हाड *n*, मुकाम.

LOFT माळा, माडी *f*.—LOFTY *a*. उंच; proud गर्विष्ट, मगरुरीचा, चढेल (looks); sublime प्रौढ, भारदस्तीचा, गंभीर (language); dignified उत्कृष्ट पदयुक्त, थोर (Is. lvii., 15); stately डौलाचा (steps).

LOG *D*. a bulky piece of wood ओंडा, ठोकळा; apparatus for measuring the rate of a ship's motion नौकागतिमापक यंत्र *n*; record of the rate of a ship's velocity गलबताचा रोजनामा. -BOOK गलबताचा रोजनामा. -GER. -HEAD टोणपा, मूर्ख; to be at *loggerheads* मारकुटीवर -हातघाईवर येणें. -WOOD पतंगाचें लांकूड *n*.

LOGARITHM (*Gr. logos*, word, *arithmos*, number) घातप्रमापक संख्या *f*, लागर्तम *n*.

LOGIC (*Gr. logos*, word) the science of pure and formal thought, or of the laws according to which the process of pure thinking should be conducted न्याय -तर्कशास्त्र *n*. -AL *a*. तर्कशास्त्राचा, न्यायशास्त्रांतला; according to the rules of logic न्यायशास्त्रानुसार, युक्तिसिद्ध (argument); skilled in logic तर्कविद्याप्रवीण, तर्कशास्त्रज्ञ (thinker). — LOGICIAN नैय्यायिक, तर्कशास्त्री.

LOGOMACHY (*Gr. -maché*, fight) शब्दाविषयीं विवाद, शब्दवाद; war of words वाग्युद्ध *n*.

LOIN* कमर *f*, कंबर *f*, कटि *f*.

LOITER *v. i. D*. रेंगणें, गमणें [about]. -ER गमणारा, रेंग्या. -INGLY *ad*. गमत गमत, रमत रमत.

LOLL *v.i. Icel*. lie at ease आळसानें पडणें, आंग टाकणें; hang extended from the mouth, as the tongue of an ox or a dog when heated with labor जीभ लळलळ क.; put out the tongue, as an ox, dog, or other animal when heated by labor जीभ लळलळ करीत बाहेर टाकणें -काढणें [about].—*t*. जीभ बाहेर काढणें -टाकणें.

LONE *a*. (abbrev. from *alone*) solitary, unfrequented आडवळणाचा, गैरराबत्याचा; single एकला, एकटा (house); unmarried अविवाहित, सडा, सडी *f*, एकला, एकली *f* (woman). -LINESS भणभणीतपणा, भणभणाट; seclusion एकांतवास; love of retirement एकांतवासाची आवड *f*. -LY *a*. आडवळणाचा, एकीकडचा (situation); एकटा, सडा; forsaken सोडलेला, टाकलेला (traveler). -SOME *a*. एकटा; भणभणीत, उजाड (road).

LONG* *a*. (*longus*) extended लांब, दीर्घ (line); extended in time लांब, पुष्कळ, दीर्घकालिक (sickness, debate); distant दूरचा, लांबचा; slow in coming उशीरलाग्या, उशिरा येणारा, विलंबकारी (death); tedious चेंगट, लांबणीचा (tale); extended to any specified measure मापाचा, परिमित, लांब: a yard l.; as a vowel दीर्घ, गुरु; in the l. run शेवटीं, अखेरीस; [l. clothes, the clothes worn by an infant]; l. home

कबर *f*, प्रेताचा खाडा; मरण *n*.—*ad*. दूरवर, लांबवर; बहुतकाळ, फार वेळापासून; l. after फार वेळानें; l. before बहुत वेळापूर्वी : as l. जों, जोंपर्यंत; how l. कोठपर्यंत; l. ago मागेंच, बहुत काळ झाला; through the whole extent or duration भर, पर्यंत, पावेतों: all night l. रात्रभर.—*v. i.* अति इच्छा धरणें, धादावणें, आशावणें; as a woman in pregnancy डोहळे लागणें-होणें; have an eager craving धादावणें, खाखावणें [for]. -ING आशा *f*, भूक *f*; डोहळे *pl*. -LIVED *a*. चिरंजीवी, दीर्घायु. -SHANKED *a*. लांबटांग्या, ऊर्ध्वजानु. -SOME *a*. लांबचलांब, कंटाळवाणा. -SUFFERING *a*. सोशीक, सहनशील (Ex. xxxiv., 6). —*n*. सोशीकपणा, सहनशीलता *f* (Rom. ii., 4). -TONGUED *a*. लांबजिभ्या, बडबड्या. -WINDED *a*. दीर्घ श्वासाचा -प्राणायामाचा; चेंगटाईचा, लांबलचक (narration).—LONGEVITY दीर्घायुष्य *n*.—LONGEVOUS *a*. दीर्घायु. —LONGMETRY लांबी मोजण्याची विद्या *f*, दूरत्वमापनविद्या *f*. —LONGITUDE लांबी *f*; distance of a place east or west, from a meridian रेखांश.—LONGITUDINAL *a*. लांबीचा; उभा, लांब.

LOOK* *v*. direct the eye toward an object so as to see it पाहाणें, दृष्टि -नजर लावणें, [to, at, on, after, for, toward];—direct the attention to पाहणें, लक्ष्य लावणें; consider पाहणें, विचार क.; examine तपासणें, पाहणें; penetrate समजणें, बोध होणें; seem दिसणें, नजरेस येणें; about हुशारी ठेवणें, सावध राहणें; into चौकशी -विचार क.; over तपासणें; after लक्ष्यदेणें; संभाळणें; अपेक्षणें, वाट पाहणें; शोधणें; down on, upon अपमान -धिःकार क.; for वाट पाहणें; शोधणें; into तपासणें; बारीक रीतीनें शोधणें; on मानणें, मोजणें; पाहणें, समजणें; तमाशा -मौज पाहणें; out हुशारी ठेवणें, सावध राहणें; to, unto संभाळणें, जपणें; मिळण्याच्या आशेनें -अपेक्षा धरून पाहणें, आशा धरणें (Is. xlv., 22); through पार पाहणें; पुरता समजणें, मर्म जाणणें. —*t*. दाब -धाक बसविणें: to l. down opposition; दृष्टीनें दाखविणें: soft eyes *looked* love to eyes that spake again;—in the face धिट्टाईनें -निर्भीडपणानें भेटणें; out शोधून मिळविणें, शोधून काढणें; निवडणें; up a thing शोधून काढणें, धुंडाळून काढणें.—*n*. air of the face चेहरा, मुद्रा *f*; aspect आकार, डौल, घाट; पाहणें *n*, दृष्टि *f*. -ER पाहणारा; on पाहणारा, तमासगीर. -ING शोधणें *n*, शोध; for मार्गप्रतीक्षा *f*, वाट *f*, (Heb. x., 27). -ING-GLASS आरसा, आरशी *f*, दर्पण *n*.

LOOM* माग; the indistinct appearance of any thing दूरचा चुटपुटा देखावा, ईषद्दर्शन *n*. —*v. i.* दुरून अंधक -अस्पष्ट दिसणें; rise and be eminent उंच पदावर चढून श्रेष्ठ -प्रख्यात होणें.

LOOP *Ir*. फांसा, मुदन *n*. -HOLE, hole in a wall for firing through जंगी *f*; shift खिडकी *f*, सवड *f*, सोडवण *f*, फट *f*.

LOOSE* *v*. unbind सोडणें-मोकळा क.; release from any thing obligatory सुटका क.-देणें, मुक्त क.; absolve सुटका -माफी देणें (Matth. xvi., 19); relax ढिला क.; unlock उघडणें, फोडणें (Rev. v. 2).—*i*. हकारणें, निघणें (Acts xiii., 13).—*a*. मोकळा, सुटा (sheet of a book); मोकळा, सुटा, मुक्त: l. of or from a vow; ढिला, सैल, पोकळ (a garment); not crowded पातळ, तुटक: chariots ranked in l. array; not costive पोटाचा अदळ; not dense पातळ, विरळ (texture); not precise धरसोडीचा, पळपळीत (style, way of reasoning); not controlled by moral restraints निर्बंध, मोकळा, मोकार; dissolute बेढंग, दुराचारी, सोदा; to break l. चौपायीं उडणें, दुलाच्या झाडणें; to let l. मोकळा क. -LY

ad. सुटा, मोकार; without order विसकळीत, अव्यवस्थित; बदख्यालीनें, दुर्व्यसनानें. -NESS ढिलेपणा; पातळपणा; फुसफुसीतपणा; पळपळीतपणा; सोंदेगिरी *f*;—of the bowels हगवण *f*, ढाळ; to have a l. पोट जाणें -ढाळणें.

LOP *v. Ger.* cut off, as the top of any thing (शेंडा) तोडणें -छाटणें; cut partly off and bend down खडसणें, कलम क.; let fall पडूं देणें (a horse's ears) [off]. -PING छाटणी *f*; that which is cut off छाट *f*, छाटछूट *f*.

LOQUACIOUS *a.* (*loqui*, to speak) बोलका, वाचाळ, बहुभाष.—LOQUACITY बोलकेपणा, चावटपणा.

LORD* master प्रभु, धनी, खावंद; my l. खुदावंद *H*; nobleman of any rank above that of a baronet उमराव, अमीर; [by courtesy, the son of a duke or marquis, or the eldest son of an earl; and also a bishop, if a member of Parliament; a title bestowed on the persons above named; and also, for honor, on certain official characters, attendants, or representatives of majesty: L. advocate, L. chancellor, L. chief justice, &c.]; husband पति, स्वामि, नवरा; the Supreme Being परमेश्वर, ईश्वर, प्रभु; house of *Lords* ग्रेटब्रिटनच्या पार्लमेंत सभेचा एक भाग आहे; l. advocate सरकार तर्फेचा कोर्तातील मुख्य वकील; *Lords* spiritual ब्रिटिश पार्लमेंत सभेंत बसणारे आर्चबिशप व बिशप *pl*; *Lords* temporal ब्रि० पार्लमेंत सभेंतलें उमराव *pl*; Our *Lord* आमचा प्रभु, येशू ख्रीस्त, तारणारा.—*v. i.* सत्ता -धनीपणा क. -मिरवणें. -LINESS सरदारी *f*, अमिरी *f*; haughtiness मगरुरी, आढ्यता *f*. -LY *a.* सरदारास योग्य, सरदारी, अमिरी (estate); मगरूर, दिमाखाचा. -SHIP प्रभुत्व *n*, अधिपत्य *n*, धनीपणा; अमिरी *f*; domain जहागिरी *f*, जमीनदारी *f*. -'s SUPPER, the sacramental supper instituted by Christ प्रभुभोजन *n*.

LORE* erudition विद्या *f*, ज्ञान *n*; advice बुद्धि *f*, उपदेश.

LORY ? नुरी *f*.

LOSE *v.* be rid of unintentionally गमावणें, हरवणें (a book); forfeit हरणें, हारजाणें (a battle); part with अंतरणें, मुकणें, गमावणें, जाणें, पडणें (an arm by a shot, men in battle, one's life); waste दवडणें, घालवणें (a day, a fortune); miss चुकणें (the way); bewilder घाबरविणें, भांबावणें: *lost* in the maze of words; ruin नाश क., बुडविणें गमावणें (a ship by a storm); cease to view दिसेनासा होणें, गमावणें: he *lost* his companion in the crowd; fail to obtain न मिळणें, गमावणें (Matth. x., 42); to l. one's self. दिशाभूल होणें; to l. heart धैर्य खचणें. —*i.* हरणें, हारजाणें; तोटा -नुकसान होणें -येणें. —LOSING *a.* तोट्याचा.—LOSS हार *f*; तोटा, नुकसान *n*: the l. of liquor by leakage: नाश, हानि *f*: the l. of a child; in trade घस *f*.—LOST *a.* हरवलेला (book); हरलेला (battle); अंतरलेला, गेलेला, गत (honor); दवडलेला, पोकळीस गेलेला (day benefit); बहकलेला, चुकार: a child l. -in the woods; l. in thought ध्याननिष्ठ, विचारांत गुंग; l. to shame लज्जाहीन, कोडगा, निर्लज्ज; one who has l. his kingdom राजभ्रष्ट;—in astonishment चक्कभुल, थक्क, दंग; not visible अदृश्य, दिसेनासा, गडप, गर्क: an isle l. in a fog, a person l. in a crowd.

LOT* that which happens without human design or forethought दैव *n*, नसीब *n*; contrivance to determine a question by chance दैवाची परीक्षा पाहण्याचा फांसा -चिठ्ठी *f*, वगैरे; the part which falls to any one by chance दैवाचा वांटा, भोग, भोक्तृत्व *n*; a distinct parcel प्रत *f*, गठ्ठा, पुडा: a l. of goods;—of ground ठिकें *n*; a prize in a

lottery सोडतींतलें बक्षीस *n*; to cast *lots* चिठ्या टाकणें -काढणें; *lots* रगड *f*, डोंगर, पुष्कळ: *lots* of people [*colloq.*].—*v.* वांटणें, वांटून देणें; मत लावणें, वेगळें क. [out]. -TERY सोडत *f*.

LOTION (*lavare*, to wash) औषधी पाणी *f*, धुवण *n*, घडी *f*.

LOTUS (*L.*) the plant कमळीण *f*;—the flower कमळ *n*.

LOUD* *a.* high-sounding उंच स्वराचा, मोठ्या नादाचा (thunder); clamorous गलबल्याचा, गोंगाटाचा; emphatical जोराचा, नेटाचा: a l. call to avoid danger.—*ad.* मोठ्यानें, उंच स्वरानें; गलबल्यानें, गोंगाट करून; जोरानें, नेटानें.

LOUNGE *F.* रिकामचावडी *f*, फड.—*v. i.* रिकामटवाळी -चेष्टा करित बसणें -फिरणें [about].

LOUSE*—found in the human hair ऊ *f*;—on cloth चिलू *f*;—on cattle, dogs, &c. गोचीड *f*.—LOUSY *a.* बुचबुचलेला, खुतखुतलेला; mean अधम, पाजी, हटाऊ.

LOVAGE *F.* Lingusticum Ajwaen अजमोदा.

LOVE* *v.* (*libere*; *Skr. lubh*, to desire) regard with affection प्रेम -प्रीति -आवड क. -ठेवणें; have goodwill toward -शीं परोपकारबुद्धीनें वागणें (Matth. xxii., 37); delight in चाहणें, गोडी वाटणें.—*n.* प्रीति *f*, स्नेह, लोभ; परोपकारबुद्धि *f*; courtship लग्नासाठीं स्त्रीचे आर्जव *pl* -ची आराधना *f*; fondness आवड *f*, भक्ति *f*, शौक: l. of home; l. of life जीविताशा *f*; object of affection प्रीतिपात्र; Cupid कामदेव; passion between the sexes काम, स्त्रीपुरुषप्रेम *n*, शृंगार; illicit l. दोस्ती *f*; to make l. लग्नासाठीं स्त्रीचे आर्जव क.; l.-knot इष्कपेच; play for l. पण लावल्यावांचून (सोंगट्या वगैरे) खेळणें. -APPLE वेलवांगी. -LINESS सौंदर्य *n*, लावण्य *n*; मनोहरता *f*, प्रियंकरत्व *n*. -LY *a.* सुंदर, रमणीय; amiable प्रियकर. -LETTER शृंगारपत्र *n*, प्रीतिपत्र *n*. -SICK *a.* कामरोगी, विरहरोगी. -SHAFT कामबाण, मदनशर. -SONG रासगीत *n*.—LOVER प्रीति करणारा; a friend मित्र, सखा; one who is in love with a person of the opposite sex—*mas.* कांत, प्राणसखा, यार, *fem.* कांता, प्राणसखी, वल्लभा.—LOVING *a.* ममताळू, प्रेमवान, स्नेही. -KINDNESS कृपा *f*, वात्सल्य *n*, अनुग्रह (Ps. lxxxix., 33). -LY *a.* प्रीतीनें, प्रेमभावानें, आवडीनें, प्रेमानें.

LOW *a. D.* not high नीच, सखल (ground); not rising to the usual height ठेंगणा, लहान (stature); near the horizon धारेजवळ, क्षितिजाजवळ: the sun is l. at six; deep सखल, खोलगट (valley); cheap स्वस्त, हलक्या -उतरत्या दराचा (price, wages); grave मंद, गंभीर (tone, voice); near the equator मध्यरेषे जवळचा (latitude); modern अलीकडला, नवा (empire); dejected उदास, खिन्न, दिलगीर (spirits); humble in rank गरिब, हलका, हलक्या स्थितीचा -पदवीचा; abject नीच, पाजी, अधम, क्षुल्लक (mind, trick); not sublime हलका, अप्रौढ (language); submissive नम्र, दीन (reverence); weak मंद, अशक्त (pulse): made l. by sickness; moderate माफक, परिमित, बारीक, स्वल्प (heat, fever); impoverished भिकेस लागलेला, ओढगस्तीस आलेला; reasonable बेताचा, माफक, बराबर (estimate); not rich हलका, साधा, (diet); l. tide ओहटी *f*; l.-water mark ओहटीच्या वेळीं जेथें पाणी हटून जातें ती जागा *f*.—*ad.* खालीं; हलक्या दरानें, स्वस्त; he sold his wheat very l.; नीच अवस्थेंत; गिरिपदारींत; आपल्या काळांत -काळाजवळ; हळू, हलक्यानें: to speak l.; गरिबींत. -ER *v.* उतरणें, खालीं आणणें -क. (a flag); मानभंग क. -उतरणें, नीच क.; किंमत -कमी क., भाव उत-

रवणें -कमी क. (price, rate.)—*i.* उतरणें, मंदावणें. -ERMOST सर्वांहून खालचा. -LY *a.* नम्र, लीन, निरभिमानी (Matth. xi., 29); साधा, अप्रौढ; नीच, हलका, गरीब. -LINESS नम्रता *f*, लीनता *f*; अप्रौढि *f*; नीच -हलके-पणा. -LAND हेटप्रांत, तळघाट.

LOWER *v. i. Ger.* descend, as the clouds and appear dark उवरणें, भरून येणें, अंधारी -काहूर येणें; look sullen दुर्मुखणें, फुगणें.

LOW* *v. i.* हंबरणें. -ING हंबरडा.

LOYAL *a.* (*lex*, law) devoted to the maintenance of the law धर्म -न्यायनिष्ठ; faithful to the sovereign राजनिष्ठ, स्वामीभक्त; as a wife पतिव्रता *f*, साध्वी *f*; as a husband स्वदाररत. -IST राजाचा निमकहलाल, स्वराजनिष्ठ. -ITY राजनिष्ठा *f*; पातिव्रत्य *n*; एकपत्नीव्रत *n*.

LOZENGE *F.* शर्करायुक्त औषधाची वडी *f* -चें पदक *n*.

LUBBER, LUBBARD *W.* ठोंब्या, झैशा, लट्ठाश्रम. -LY रटाला, रटेल, ढोण्या.—*ad.* अडाणी -अडमूठपणा.

LUBRICATE *v.* (*lubricus*) मऊ -गुळगुळीत क.

LUCERNE *F.* विलायती गवत *n*.

LUCENT *a.* (*lux*, light) तेजस्वी, चकचकीत. —LUCID *a.* लकलकीत, नितळ, लक्क (marbles); clear स्वच्छ, निर्मळ; distinct सुबोध, स्पष्ट: a l. abstract of a debate; rational शुद्धीचा, हुशारीचा; [l. interval, an interval of reason enjoyed by an insane person between two fits of insanity]. —LUCIFER (*lux*, light, *ferre*, to bring) the planet Venus शुक्र; Satan सैतान; a match आगीचें काडें *n*.

LUCK *D.* chance दैव *n*, नसीब *n*; good fortune सुदैव *n*, सौभाग्य *n*; to try one's l. फांसा टाकून पाहणें; to be in l. दैव उघडणें, उखळ पिवळें होणें. -LESS *a.* हतभाग्य, कपाळकरंटा, फुटक्या कपाळाचा.—LUCKY *a.* दैवाचा, भाग्याचा; auspicious शुभ, बरकतीचा (time); l. hour सुवेळ *f*, सुघडी *f*.

LUCRE (*lucrum*) मिळकत *f*, प्राप्ति *f*, नफा.—LUCRATIVE *a.* मिळकतीचा, नफ्याचा, सरिफेवार.

LUCUBRATION (*lux*, light) study by candle-light दिव्याजवळ बसून केलेला अभ्यास; that which is composed by night रात्रीं बसून केलेला ग्रंथ इ०.—LUCUBRATORY *a.* रात्रीं बसून -फार श्रम घेऊन केलेला.

LUDICROUS *a.* (*ludus*, play) हसें येण्याजोगा, हास्यप्रद -कारक -जनक; थट्टेचा, कौतुकाचा.

LUES VENEREA (*L.*) गर्मी *f*, वीसनखीची बाधा *f*.

LUG* *v.* drag खेंचणें, ओढणें, फरफरावणें; to l. by the ears कान धरून नेणें; convey with labour कष्टानें नेणें-वाहणें. -GAGE सामान *n*, बाडबिछाना.

LUKEWARM* *a.* moderately warm कोमट, सोमाळा (water); indifferent उदास, अनास्थ.

LULL *v. Ger.* शांत क., अंगाई क., निजवणें.—*i.* शांत होणें, पडणें, बसणें (wind, storm); शांति *f*, वाऱ्याची बंदी *f*. -ABY मुलांस निजवायाचें गाणें *n*, पाळणा, जोजो.

LUMBAGO (*lumbus*, loin) *Med.* rheumatic pain in the loins and small of the back उसण *f*, टिचरें *n*, कटिवात; to get l. कंबर धरणें-भरणें.—LUMBAR *a.* कमरेचा, कटि; l. region कटिप्रदेश.

LUMBER* गाबाळ *n*, सटरफटर *n*, रिकामी अडचण *f*.—*v.* अडगळीनें भरणें (a room); heap together in disorder घोळ -गव्हाटा करून ठेवणें, ढीग घालून ठेवणें.—*i.* rumble गडगडणें, धडधडणें; move heavily कष्टानें चालणें. -ROOM जकीरखाना, खेरखाना.

LUMINARY (*lumen*, light) प्रकाशक पदार्थ, तेजःपुंज, प्रभाकर; one that illustrates any

subject, or enlightens mankind तेजःपुंज, तेजोराशि.—Luminous *a.* तेजश्वी, तेजोमय; bright चकचकीत, उजळ (color); clear स्वच्छ, निर्मळ (aspect).

Lump *Ger.* a small mass of matter डिखळ *f*, खडा: a l. of sugar; an irregular cake ढेप *f*, लबका, गोळा;—of meat बोटी *f*, रवा; in the lump एकठोक, उधड, सरसगट.—*v.* एकगोळा -एकरास क.;—sums, items एकरकम लिहिणें -मांडणें [together, up]. -ish *a.* जड, स्थुलबुद्धि.

Lunacy (*luna*, the moon) kind of insanity which is broken by intervals of reason, formerly supposed to be influenced by the changes of the moon वेड *n*, उन्माद.—Lunatic *a.* वेडा, पिसा.—Lunar *a.* चंद्राचा, चंद्रासंबंधी, चांद्र; resembling the moon चंद्रासारखा -समान; measured by the revolution of the moon चांद्रमानाचा: l. day तिथि *f*; l. month चांद्रमास; l. measurement चांद्रमान *n*.

Lunch *Eng.* a slight repast between breakfast and dinner फळार, उपहार. -eon, a portion of food taken at any time except at a regular meal फळार, उपहार.

Lung* फुफ्फुस *n*, फोपसं *n*.

Lupine *a.* (*lupus*, wolf) लांडग्या सारखा; ravenous बुभुक्षित, खादाड.

Lurch *W.* गलबताचें कलंडणें *n*; to fetch a l. गोताखाणें; to leave in the l. तोंडघसीं पाडणें [over].—*v. i.* फसवणें, झोका -टोला देणें; lie in ambush दबाधरून राहणें.

Lure *F.* लालूच *f*, आमिष *n*.—*v.* लालूच दाखविणें, मोहणें, गूळखोबरें देणें.

Lurk *v. i. W.* hid दडणें, लिकणें; lie in wait दडी -दबाधरून -मारून राहणें [about]. -ing-place दडण *f*, *n*, लिकण *f*.

Luscious *a. O. E.* गोड, मिष्ट; sweet or rich so as to cloy तोंडास मिठी बसण्यासारखा गोड, अतिमिष्ट; fulsome किळसवाणा, ओंगळ.

Lust* longing desire सोस *f*, हाव *f*; carnal appetite विषयवासना *f*, काम, मैथुनाची इच्छा *f*.—*v.* लुब्धणें, जीव टांगणें [after]; काम उत्पन्न होणें [after]; have inordinate desire अति लोभ धरणें (1 Cor. x., 6) [after, for]. -ful *a.* कामबुद्धीचा, स्त्रीलंपट, विषयलुब्ध; विषयाचा, कामुक, विषय उत्पन्न करणारा.—Lusty *a.* robust धाटामोठा, बळकट, घटमूट; healthful धट्टाकट्टा, ताजातवाना.—Lustily *ad.* बळानें, बळ खर्चून, जीवतोडून.

Lustrate *v.* (*lustrare*, to purify) शुद्ध क.—Lustration शुद्धिकरण *n*.—Lustral *a.* शुद्धीचा, शुद्धिकारक.—Lustre, brightness कांति *f*, तेज *n*;—of a gem पाणी *n*, तेज *n*, ढाळ;—of a metal ओप *f*; renown कीर्त्ति *f*, प्रतिष्ठा *f*, नांव *n*.—Lustrous *a.* तेजश्वी, चकचकीत.—Lustrum (*L.*) पांच वर्षें *n pl*, वर्षपंचक *n*.

Lute *F.* विणा, तंबुरा, तंबुरी *f*, इ०—Lutanist विणा वाजविणारा, विणेकरी.

Luxate *v.* (*luxare*, to loosen) सांधा उखळणें.—Luxation संधिभंग.

Luxuriant *a.* (*luxus*, excess) exuberant in growth उफाड्याचे वाढीचा; exuberant in plenty रेळचेळीचा, भरपुरीचा. -ly *ad.* उफाड्यानें, माजानें.—Luxuriance माज, मात, ऊत; रेळचेळ *f*, चळचळाट.—Luxuriate *v.* माजणें, मातणें, फोपावणें; indulge to excess अमित भोग क.: to l. in description [in].—Luxury, voluptuousness in the gratification of appetite ख्यालखुशाली *f*, ऐषआराम, चैन *f*, विलास; delicious food or drink सुग्रास, गोडघास, मिष्ट पदार्थ; any thing delightful to the senses ऐषआरामाचा -चैनीचा पदार्थ, चीज *f*.—Luxurious *a.*

चैनी, विलासी (life); ऐषआरामाचा, विलासाचा (wealth); furnished with luxuries घमंडीचा, मिष्ट पदार्थांचा -नीं भरलेला (table). -NESS सुखभोग, विषयभोग.

LYING, See under LIE.

LYMPH (*lympha*) लस *f*. -ATIC *a*. लसीचा.—*n*. शोषवाहिनी *f*.

LYNX (*L.*) कोळसुंदा, कोळीसा.

LYRE (*lyra*) विणा.—LYRIC *a*. विण्यावर गाण्याचा (song).—LYRIST विणा वाजविणारा.

M

MACE *F*. a heavy club सोटा, गदा *f*; a staff borne by, or carried before, a magistrate as an ensign of his authority छडी *f*, काठी *f*, चोप, वेत्र. -BEARER चोपदार, भालदार.

MACE (*masis*) जायपत्री *f*.

MACERATE *v*. (*macer*, lean) रोड क.; steep almost to solution भिजूं घालणें, भिजवणें, विरघळून जाई इतका भिजवणें.

MACHINATE *v*. (*machina*, trick) योजणें, रचणें. —MACHINATION योजना *f*, बेत; a hostile scheme कुभांड *n*, लचांड *n*, तरकट *n*.—MACHINATOR योजक, रचक; कुभांडखोर, तरकटी.—MACHINE यंत्र *n*.—MACHINERY कळसूत्र *n*, यंत्रसाहित्य *n*; machines in general यंत्रें *n pl*.—MACHINIST यंत्रकरणारा; one versed in the principles of machines यंत्रविद्यानिपुण.

MACROCOSM (*Gr. macros*, long, *kosmos*, the world) विश्व *n*, त्रिभुवन *n*.

MACULA (*L.*) कलंक, ठिपका, डाग.—MACULATE *v*. डाग -कलंक लावणें.

MAD* *a*. disordered in intellect वेडा, पिसा; excited with violent desire वेडा, पिसा; enraged खवळलेला, तग्रव्यग्र, कावराबावरा, वेडा; proceeding from, or indicating, madness वेडेपणाचा, वेडेचाराचा, वेडा. -DEN *v*. वेडा क., वेड भरवणें.—*v. i*. वेडा होणें, वेड भरणें, पिसाळणें. -NESS वेडेपण *n*, वेड *n*; कावरेबावरेपणा. -CAP साहसी, आततायी, वेडापीर. -HOUSE वेड्यांचा बंदिखाना, किंवा इस्पितळ *n*. -MAN वेडा मनुष्य, वेडा, खुळा.

MADAM *F*. बाईसाहेब, 'मडम' *f*.

MADDER* मंजिष्ठ *n*.

MAGAZINE *Ar*. a storehouse कोठार *n*, भांडार *n*, कोठी *f*;—of arms, ammunition शस्त्रागार *n*, शिलेखाना;—of powder दारूखाना; a periodical pamphlet नियमित काळीं निघणारें पुस्तक *n*.

MAGGOT* a small grub किडा, अळी *f*.

MAGI *pl*. (*L.*) the caste of priests among the Persians पारशी लोकांचे उपाध्यांची जात *f*; holy men or sages of the East पूर्व देशचे साधु *pl*.—MAGIC, the science or practice of working spirits or educing the occult powers of nature, and performing things wonderful by their aid जादू *f*, कुविद्या *f*, पिशाचविद्या *f*, चेटक *n*.—MAGICAL *a*. जादूचा, कुविद्येचा; done by magic जादूनें -चा केलेला, शाबरी; imposing or startling in performance चमत्कारिक कृतीचा. —MAGICIAN जादुवाला, जादुगीर, चेटकी, मंत्री.

MAGISTERIAL *a*. (*magister*, master) धन्याचा; authoritative अधिकाराचा, धनीपणाचा, प्रभुत्वाचा, प्रभुसम्मित; proud अभिमानी, मगरूर (looks).—MAGISTRATE धर्माधिकारी, फौजदार, न्यायाधीश, 'माजिस्त्रेट'; chief m. राजा, मुख्य अधिकारी.—MAGISTRACY माजिस्त्रेटाचा हुद्दा, न्यायाधिकार; the body of magistrates धर्माधिकारी मंडळी *f*.

MAGNANIMITY (*magnus*, great, *animus*, mind) मनाचा मोठेपणा; elevation or dig-

nity of soul, which encounters danger and trouble with tranquillity and firmness, which raises the possessor above revenge, which makes him disdain injustice and meanness, and prompts him to act and sacrifice for noble objects महात्मता *f*, थोरवी *f*, औदार्य *n*, शौर्य *n*. —MAGNANIMOUS *a*. मोठ्या मनाचा, महामनस्क; धीर, उदार, गंभीर; dictated by magnanimity औदार्याचा, प्रगल्भ, उदार मनाचा (policy).

MAGNATE (*magnus*, great) उंच पदवीचा मनुष्य, सरदार, उमराव.

MAGNET (*Gr. magnes*) लोहचुंबक. -IC, -AL *a*. लोहचुंबक संबंधी, लोहचुंबकाचा; attractive आकर्षक. -ISM लोहचुंबकाचा धर्म; science which treats of the properties of the magnet लोहचुंबक गुणविवेचनविद्या *f*; आकर्षणशक्ति *f*.

MAGNIFY *v*. (*magnus*, great, *facere*, to make) मोठा क., मोठा करून दाखविणें; extol वर्णन क., स्तुति क. (Ps. xxxiv., 3); —one's self मोठेपणा मिरवणें.—*i*. लहान पदार्थ मोठा करून दाखविण्याची शक्ति असणें: some lenses m. but little.—MAGNIFICENCE शोभा *f*, थाट, भव्यपणा; liberality उदारपणा, औदार्य *n*.—MAGNIFICENT शोभिवंत, छानदार, भव्य.—MAGNIFIER मोठा करून दाखविणारा; an optical instrument, as a convex lens, which increases the apparent magnitude of bodies दुर्बीन *f*, भिंग *n*.

MAGNILOQUENCE (*-loqui*, to speak) ढबदारीचें बोलणें *n*.

MAGNITUDE (*magnus*, great) size आकारमान *n*, परिमाण *n*, लांबीरुंदी *f*; importance वजन *n*, महत्त्व *n*; greatness मोठेपणा, महत्त्व *n*.

MAID* virgin कन्या *f*, कुमारी *f*; female servant चाकरीण *f*, दासी *f*, परिचारिका *f*; unmarried woman अविवाहित स्त्री *f*. -EN कन्या *f*, दासी *f*.—*a*. कुमारीचा, कौमार; consisting of young women तरुण स्त्रियांचा (throng); fresh नवा, कोरा (sword). -HEAD, -HOOD कुवारपण *n*, कौमार्य *n*. -SERVANT कुळंबीण *f*, दासी *f*.

MAIL *F*. चिलखत *n*, कवच *n*.

MAIL *F*. टपाल *n*, डांक *f*.

MAIM ? अधुपणा, व्यंग *n*.—*v*. अधु -पंगु क. [with]. -ED लंगडा, लुला, हीनांग, व्यंग.

MAIN* *a*. huge मोठा, थोर, प्रचंड (abyss); chief मुख्य, प्रधान, मोठा (interest); mere नुस्ता, केवळ, शुद्ध (untruth); m. body सैन्याचा मधला किंवा मुख्य भाग.—*n*. force बळ *n*, शक्ति *f*; मोठा -मुख्य भाग; the great sea महासमुद्र -सागर; the continent, as distinguished from an island महाद्वीप *n*; a principal duct मोठा नळ; with might and m. मोठ्या जोरानें, जीवतोडून; in the m. एकंदरीनें, एकंदर, ठोक. -LY *ad*. बहुतकरून, मुख्यत्वेंकरून. -LAND मुख्य भूमि *f*, भूखंड. *n*. -MAST (तारवाची) मधली डोलकाठी *f*. -SHEET मोठें शीड *n*, अवजार *n*.

MAINTAIN *v*. (*manus*, hand, *tenere*, to hold) राखणें, ठेवणें, धरणें: to m. a certain degree of heat in the furnace; keep possession of स्वाधीन ठेवणें, हातीं ठेवणें, संभाळणें, राखणें; continue चालू -सुरू ठेवणें: m. talk with him; bear the expense of -चा खर्च चालवणें -अंगावर घेणें; support पाळणें, पोसणें; support by assertion or argument मंडन -प्रतिपादन क., स्थापणें;—one's self उदरनिर्वाह चालवणें. -ABLE *a*. संभाळायाजोगा, रक्षणीय; स्थापनीय, प्रतिपाद्य.—MAINTENANCE राखणें *n*, ठेवणें *n*, धारणा *f*; राखण *f*, संभाळ

पालनपोषण *n*; मंडन *n*, स्थापन *n*; उपजीविका *f*; चालू ठेवणें *n*, स्थिति *f*.

MAIZE (from the language of the island of Hayti) मका.

MAJESTY (*magis*, great) grandeur प्रताप, वैभव *n*, महिमा *f*; title given to sovereigns महाराज, राजश्री; dignity मोठेपणा, प्रौढी *f*.—MAJESTIC *a*. प्रतापाचा, प्रतापी; थोर, उंच; प्रौढ, डौलाचा.

MAJOR *a*. (*L.*) greater in number, quantity, or extent मोठा, मुख्य, बहुतर: m. part of the assembly; of greater dignity मुख्य, प्रधान; m. premise, *Log.* पूर्वपक्ष, प्रतिज्ञा *f*. —*n*. person of full age प्रौढ, पोक्ता, जाणता, वयस्क; officer next in rank above a captain 'मेजर.' -ITY मोठी -अधिक संख्या *f*; जाणतेपणा, प्रौढ वय *n*. -DOMO (-*domus*, house) घरकारभारी.

MAKE* *v*. create करणें, उत्पन्न क.; form घडणें, बनावणें; perform करणें (sport); do करणें (a complaint); get, as profit मिळवणें, कमावणें (money, profit); travel over मार्ग क्रमणें -चालणें: the ship *makes* ten knots an hour; cause to be करणें: to m. public; represent दाखविणें, वर्णन क., सांगणें; esteem करणें, मानणें: he is not that ass that B would m. him; compel बळजोरी क.: to m. to go बळेंच चालविणें; constitute करणें, नेमणें (Ex. ii., 14); compose करणें, असणें, बनावणें: the heavens, the air, the earth, and boundless sea, m. but one temple for the Deity; become होणें: a good daughter *makes* a good wife; reach पोंहचणें, पावणें, सई क., अटपणें: he can m. no land of either side;—a bed अंथरूण क.; —amends भरून देणें; away खपवणें, संपविणें; घात क.; हवालणें, गुजरणें;—account of सन्मान देणें, मानणें; good खरा -सिद्ध क.; भरून देणें; —light of तुच्छ -हलका मानणें (Matth. xxii., 5);—love to विवाहार्थ स्त्रीची आराधना क.; —merry आनंद -चैन क.;—much of सोपस्कार क.;—oath शपथ -प्रतिज्ञा क.; of समजणें, -चा अर्थ क.: I know not what to m. of the news; out अर्थ काढणें, शोध लावणें; खरा -सिद्ध क. (a case); पुरवणें: he was not able to m. out the whole sum; over हवालणें, सोपणें (an estate); up जमवणें, जथवणें, मिटवणें (a quarrel); पुरा क., भरती क.: a rupee is wanted to m. up the sum; करणें, बांधणें, तयार क., सजवणें इ०: to m. up a bundle;—a mass into pills; निश्चय -धडा क. (one's mind);—water गळणें; मुतणें, इराखत क.; way सुधारणें, वाढणें, पुढें पाऊल टाकणें; वाट क. -सोडणें -मोकळी क.—*i*. proceed जाणें, चालणें: he *made* towards home; contribute कामास -उपयोगी पडणें: this argument *makes* nothing in his favour;—as if आकार -डौल दाखविणें (Josh. viii., 15);—away with ठार मारणें;—bold धजणें, हिय्या क.; for -कडे जाणें -चालणें; towards -कडचा रस्ता धरणें; up जवळ येणें -जाणें: he *made* up to us with boldness; मिळणें, मिटणें; up for पुरता -पुरा क.; विसर पाडणें: have you a supply of friends to m. up for those who have gone? with मान्य होणें, मिळणें.— *n*. घडण *f*, बनावट *f*, बांधा. -BATE कळलाव्या, कळीचा नारद, कज्जेदलाल. -BELIEVE अनागोंदी जमाखर्च. -PEACE कळमोड्या. -MAKER कर्त्ता, उत्पन्नकर्त्ता; the Creator सृष्टिकर्त्ता.

MALADY (*malus*, bad) रोग, विकार, व्याधि *f*; a moral defect पाप *n*, अपराध, दोष.—

MALARIA रोग उत्पन्न करणारी पाणथळा जवळची वाफ *f*, रोगजनकवायु.

MALE *a*. (*maris*) pertaining to the sex that begets young पुरुष जातीचा, मर्दानी,

पुरुषाचा; having fecundating organs झाडांतील पुरुष जातीचा; m. screw नर.—*n.* पुरुष, नर.

MALCONTENT *a.* (*mal*, bad, & *content*) discontented गैरखुशी, नाराजी; dissatisfied with the government सरकारावर नाखुश, अमलनाखुश.

MALADMINISTRATION (*mal*, bad, & *administration*) बदअमल, बदमामला.

MALEDICTION (*male*, ill, *dicere*, to say) श्राप, अमंगल वचन *n.*

MALEFACTION (*male*, ill, *facere*, to make) अन्याय, गुन्हा.—MALEFACTOR गुन्हेगार, अन्यायी, अपराधी.

MALEVOLENCE (*-velle*, to wish) दुष्टबुद्धि *f*, कुभाव.—MALEVOLENT *a.* दुष्टबुद्धीचा, दुरात्मा.

MALICE (*malus*, bad) a disposition to injure others दुष्टभाव, द्वेषबुद्धि *f*, अकस.—MALICIOUS *a.* मत्सरी, अकस -चुरसखोर; अदावतीचा, द्वेषभावाचा (report); *Law* द्वेषभाव धरून केलेला.

MALIGN *a.* (*malus*, bad, *genus*, birth) खुनसी, दुष्टभावाचा; pernicious खडतर, नाठाळ (aspect of planets).—*v.* तुफान -कुभांड रचणें -घेणें. -ANT *a.* मत्सरी, खुनसी; tending to destroy life प्राण -जीवनाशक; *Med.* tending to produce death खडतर, दुसाध्य (fever). -ITY कुडाभाव, द्वेषभाव, दुर्बुद्धि *f*; उग्रपणा, खडतरपणा.

MALLEABLE *a.* (*malleus*, hammer) ठोकून वाढविण्याजोगा, प्रसरणशील.—MALLEABILITY घनवर्धिष्णुता *f*. See the adjective.—MALLET मोगरा, ठोकणी *f*; carpenter's m. कुडती *f*.

MALLOWS* गोखरूं *n.*

MALT* barley or other grain steeped in water, fermented, and dried सातू इ० चें वाळवलेलें उंबलें *n.* —LIQUOR एक प्रकारचें हलकें मद्य आहे.

MALTREAT *v.* (*mal* & *treat*) गैररीतीनें वागविणें -वापरणें, धुसडणें, खरडणें, खरडपट्टी काढणें.

MALVERSATION (*-versari*, to move about in a place) बदमामला *f*.

MAMMA (*L.*) आई *f*, बा *f*, बये *f*.

MAMMALIA (*mamma*, breast) सस्तन प्राणीजाति *f*.—MAMMILLARY *a.* स्तनसंबंधी; स्तनासारखा.

MAMMON *Syr.* riches संपत्ति *f*, दौलत *f*; the god of riches कुबेर; the goddess लक्ष्मी *f*.

MAN* (*Skr. man*, to think) a human being मनुष्य, माणूस; a male person पुरुष, बाप्या; adult वयस्क मनुष्य, पणांत आलेला माणूस; mankind मनुष्यजाति *f*; मानव, one of manly strength or virtue मर्द, पुरुष; male servant गडी, चाकरमाणूस; a piece at chess or draughts नरद *f*; सार; a husband नवरा, दादला; sir महाराज; familiarly भाई, गडी; m. of war लढाऊ गलबत *n*, जंगीजहाज *n.* -FUL *a.* मर्द, दिलदारीचा. -HATER माणूसगांध्या, मनुष्यद्वेषी. -HOOD माणूसपणा, मनुष्यत्व *n*; not boyhood प्रौढपणा; courage शौर्य *n*, धैर्य *n*, पुरुषत्व *n*, पुरुषार्थ. -NIKIN खुजा, ऱ्हस्वमूर्त्ति *f*. -KIND मनुष्यजात *f*.—LIKE, -LY *a.* शूर, दिलदार. -LINESS मर्दाई *f*, पुरुषत्व *n.* -SLAUGHTER मनुष्यवध. -SLAYER मनुष्यघातक.

MANACLE (*manus*, hand) हातबेडी *f*.—*v.* हातबेडी घालणें.

MANAGE *v.* (do.) have under control and direction अटपणें, आवरणें, हुकमांत ठेवणें -धरणें; wield with address झेंपणें, वहिवाटणें, वागवणें; train, as a horse तालीम देणें, वळण लावणें; treat with caution युक्तीनें -हुशारीनें चालवणें -वागवणें.—*n* घोड्यास तालीम देणें *n.* -ABLE *a.* चालवायाजोगा, अटोपसार; लगामी धरायाजोगा (horse). -MENT आवरशक्ति *f*, आटोप; बंदोबस्त, आळाबांधा; —in domestic matters घरजुगूत *f*, घरजोगावणी *f*.—

MANAGER वहिवाटदार, कारभारी, मुनीम; a good economist काटकसऱ्या, कतरबेंत्या.

MANDARIN *Pg.* (*Skr. mantrin,* a counsellor) चीनदेशांतला सरकारी हुद्देदार -कामदार.

MANDATE *v.* (*mandare,* to order) आज्ञा *f,* हुकूम.—MANDATORY *a.* आज्ञेचा, आज्ञापक.

MANDRAKE* दुदी *f,* लक्ष्मणा *f,* पुत्रदात्री *f.*

MANE *D.*—of a horse अयाळ *f;*—of a lion केसर, कँसर *n.*

MANEGE *F.* art of horsemanship चाबुकस्वारी *f;* place for training horses अश्वशिक्षाशाला *f,* घोडे शिकवायाची जागा *f.*

MANES *pl* (*manus,* good) souls of the departed पितर *pl;* heaven of the m. पितृलोक.

MANGE *F.* गुरें, कुत्रीं वगैरे जनावरांची खरूज *f;*—in horses गर *f,* खवडे *pl;*—in cattle कथला;—in dogs लूत *f.*

MANGER *F.* (*manducare,* to chew) घोडे व गुरें यांचा दाणा खाण्याचा कोटंबा.

MANGLE *v. Ger.* खांडणें, छिन्नभिन्न क., वेडावांकडा तोडणें.—*Ger.* पांघुरणांच्या घड्या दाबून साफ करण्याचें -कुंदीचें यंत्र *n.*—*v.* यंत्रानें दाबून वस्त्रें स्वच्छ क., कुंदी क.

MANGO *Mal.* आंबा, आम्रफल *n;* grove of *mangoes* अंबराई *f;* revenue from a tax on m. groves अंबा or अंबाटका; unriped *mangoes* sliced and dried अंबोशी *f.* -STEEN कोकंबी *f,* रातंबी *f.* -TREE आंब्याचें झाड *n,* आंबा.

MANGROVE (do.) फणसीचें झाड *n,* फणसी *f.*

MANIA (*Gr.*) madness वेड *n,* उन्मत्तवायु; insane passion वेड *n,* चळ, छंद.—MANIAC वेडा, पिसाळलेला.

MANIFEST *a.* (*manifestus*) उघड, स्पष्ट, व्यक्त; to become m. प्रगटणें, उद्भवणें.—*v.* उघड क. -करून दाखविणें. -LY *ad.* उघड, प्रत्यक्ष, बोलून चालून.—MANIFESTATION स्पष्टीकरण *n;* उघडीक *f,* प्रसिद्धि *f,* उद्भव, आविर्भाव.—MANIFESTO राजाचा जाहीरनामा.

MANIFOLD* *a.* (*many & fold*) various in kind बहुत प्रकारचा, बहु-नानाविध: O Lord, how m. are thy works! (Ps. civ., 24); exhibited at divers times or in various ways बहुरूप, अनेकरूप (Eph. iii., 10.)

MANNER (*manuarius,* belonging to the hand) mode of action रीत *f,* पद्धत *f,* कृति *f;* habit, way चाल *f,* रीत *f,* परिपाठ; certain degree or measure कांहीं प्रकार (1 Sam. xxi., 5); fashion ढब *f,* डौल; sort जात *f,* तऱ्हा *f,* प्रकार; behavior चाल *f,* चालचर्या *f,* वर्त्तणूक *f;* respectable deportment शिष्टाचार, रीतरवेस *f; manners* and customs of a country देशाचार; good *manners* सदाचार, शिष्टाचार; bad *manners* दुराचार; to make one's *manners* सलाम मुजरा -नमस्कार क. -LY *a.* सभ्यशिष्ट. -LINESS सभ्यता *f,* सुशीलता *f,* गृहस्थगिरी *f,* विनय.

MANŒUVRE *F.* युक्ति *f,* पेंच, डाव; military *manœuvres* कवाईत *f; pl* डावपेंच, छक्केपंजे *pl.*—*v.* युक्ति चालवणें -लढवणें; कवाईत क.

MANOR *F.* देशमुखाची जमीन *f,* व जमीनदारी *f.*

MANSE (*manere,* to dwell) धर्मोपदेशकाचें -पाद्रीचें घर *n;* a farm भाड्यानें घेतलेली जमीन *f.*—MANSION वाडा, हवेली *f,* महाल; lunar m. नक्षत्र *n.*

MANTLE* दुलई *f,* चादर *f,* रजई *f,* इ०; as worn over the body अंगवस्त्र *n,* उपवस्त्र *n.*—*v.* लपवणें, पांघरूण घालणें.—*i.* rise and spread माजणें, फोफावणें: the *mantling* vine; revel in pleasure बहर -मौज मारणें; send up a scum फेंसाळणें, फेणणें.

MANTUA *F.* पेशवाज, झगा. -MAKER बायकांचीं वस्त्रें करणारा.

MANUAL *a.* (*manus,* hand) हाताचा, हस्त; performed by the hand हातानें केलेला, in comp. हस्त; m. art शिल्प *n;* m. skill हस्तकौशल्य *n;* sign m. हस्ताक्षर *n,* दस्तुर

खुद.—*n.* सारग्रंथ, संहिता *f*;—of laws धर्मसंहिता *f*.

MANUFACTURE (*-facere*, to do) रचना *f*, घटना *f*, निर्मिति *f*; any thing made by art कसबानें -शिल्प क्रियेनें केलेला पदार्थ, शिल्प *n*.—*v.* कसबानें -कारिगरीनें क.; work up raw materials कमावणें, तयार क., ओजवणें. —MANUFACTORY कारखाना, शिल्पशाळा *f*.—MANUFACTURER कारागीर, शिल्पकार.

MANUMIT *v.*(*-mittere*, to send) सुटका-मोकळीक देणें, दासत्वा पासून मुक्त क.—MANUMISSION सोडवण *f*, सुटका *f*, सुटी *f*, दास्यमोचन *n*.

MANURE *v. F.* खत घालणें, कारवणें.—*n.* खत *n*.

MANUSCRIPT (*manus*, hand, *scribere*, to write) हातानें लिहिलेला कागद, किंवा पुस्तक *n*, हस्तलेख.—*a.* हातानें लिहिलेला, हस्तलिखित.

MANY* *a.* बहुत, पुष्कळ; as m. जितका, जेवढा; how m. किती, केवढा, कितका; m. a one कित्येक, कैक; m.-colored बहुरंगी, चित्रविचित्र, नानावर्ण; m.-cornered बहुकोन.

MAP (*mappa*, napkin) पृथ्वीचा -देशाचा नकाशा, नकाशा.—*v.* नकाशा काढणें -आंखणें; delineate वर्णन क.

MAR* *v.* damage बिघडविणें, नासणें, विचका क.; disfigure कुरूप -विरूप क.

MARASMUS *Gr.* क्षयरोग.

MARAUD *F.* लुटीची स्वारी *f*, धाड *f*.—*v.* लुटी करितां हिंडणें, लुटत फिरणें; लुटणें. -ER लुटारु, पुंड.

MARBLE (*marmor*) संगमरवर, -री दगड; playing m. गोटी *f*; work of art in marble संगमरवरी काम *n*; record in marble संगमरवरी दगडावर कोरलेला लेख.—*a.* संगमरवरी, -दगडाचा; variegated चित्रविचित्र. -HEARTED निर्दय, पाषाणहृदय. -PAPER एक जातीचा नानारंगी कागद आहे.

MARCH (from *Martius*, belonging to *Mars*, the god of war) इंग्रजी सालाचा तिसरा महिना, फाल्गुन-चैत्र.—*v. i. F.* move by steps and in order, as soldiers कदम बराबरीनें -सारखें पाऊल टाकून चालणें; walk in a stately manner थाटानें-डौलानें-मिरवत चालणें [on, upon, to, off].—*t.* कवाइतीनें चालवणें, कूच क.; डौलानें चालवणें.—*n.* कवाइतीचाल *f*; डौलाची चाल *f*, गजगति *f*; कूच *f*; distance passed over मजल *f*, मुकाम, पल्ला; to beat a m. कुचाचा नगारा वाजविणें.

MARCHES* *pl.* शीव *f*, लगता, प्रांत, हद्दीवरचा देश.

MARCHIONESS (See MARQUIS) मार्किसाची बायको *f*.

MARE* घोडी *f*.

MARGIN (*margo*) border कांठ, किनारा; part of a page at the edge left uncovered in writing or printing पुस्तकाच्या पानाची कोर कड *f*, समास; difference between the outlay, expense, number, or amount of any thing as estimated or previously calculated, and that which is actually required, incurred, or ascertained कूस *f*.—*v.* कड -कांठ लावणें; पत्राच्या समासावर लिहिणें; कूस राखणें -ठेवणें, नफ्याकरितां जागा सोडणें -ठेवणें. -AL *a.* कडेचा, कांठाचा; समासावरचा, कडेवर -बाजूस लिहिलेला.

MARINE *a.* (*mare*, the sea) समुद्राचा, समुद्रसंबंधी, सामुद्र (productions); formed by the action of the currents or waves of the sea समुद्रोद्भव, समुद्राच्या ओघांच्या किंवा लाटांच्या क्रियेनें झालेला (shells); having to do with naval affairs जाहजांचे प्रकरणांचा, समुद्रक; m. corps 'मरीन' पलटन, 'मरीन कोर.'—*n.* जहाजावरचा शिपाई; अर्मारी प्रकरण *n* -काम *n*.—MARINER खलाशी.

MARIOLATRY (*Gr. Maria*, Mary, *latreia*, worship) मारया कुमारीची भक्ति *f*.—MARIOLATER मारयेचा भक्त.

MARITIME *a.* (*mare*, the sea) समुद्रकांठचा, तिरावरचा; See MARINE; m. nations ज्यांपासीं बंदरें आहेत व जे दर्यावर्दी व्यापार करितात ते लोक.

MARJORAM *F.* मरवा.

MONASTERY (*Gr. monos*, alone) मठ, आश्रम.—MONASTIC *a.* मठसंबंधी, मठाचा, in comp. मठ.

MONDAY* सोमवार, चंद्रवार.

MONEY (*moneta*, adviser) पैका, पैसा, नाणें *n*. -BAG तोडा, हमिनी *f*. -BROKER, -CHANGER सराफ. -LENDER सावकार. -ED *a.* पैकेकरी, पैकेवाला, पैकेदूर. -LESS *a.* गरीब, निर्धन. -MATTER पैक्याचें काम *n*, देण्याघेण्याची गोष्ट *f*; सावकार व कूळ यांचा हिशेब.

MONGER* विकणारा, व्यापारी, in comp. -करी, -वाला.

MONGREL *a.* भेळीचा, संकरजातीचा.

MONITION (*monere*, to warn) instruction given by way of caution इशारत *f*, ताकीद *f*, बोध; information खबर *f*, बातमी *f*.—MONITOR उपदेशक, शिक्षक; a boy appointed to teach a class in a school मालचाट्या, उपगुरु, 'मानीटर.'—MONITORY *a.* ताकिदीचा, उपदेशाचा, उपदेशरूप, प्रबोधक.

MONK (*Gr. monos*, alone) मठवासी ; *Hindu* m. मुनी, बैरागी, सन्यासी. -ISH *a.* मठवास्याचा, सन्याशाचा.

MONKEY *It.* वानर *m, n*, माकड *m, n* ; m. tricks वानरविचकुल्या *f pl*.

MONOCHORD (*Gr. monos*, single, *chordé*, string) एकतारी -तंत्री वाद्य *n*, एकतारारी *f*; some kinds are : तुणतुणें *n*, किनरी *f*.

MONOCULAR *a.* (*Gr. monos*, *L. oculus*, eye) एकडोळ्या, एकनेत्र ; एक डोळ्याच्या उपयोगाचा.

MONODY (*Gr. odé*, song) एकानें गायाचें गीत *n*, मरशा *Hind.*

MONOGAMY (*Gr. -gamos*, marriage) एकपत्नीव्रत *n*.—MONOGAMIST एकपत्नीव्रती, अपुनर्विवाह.

MONOMANIA (*Gr. mania*, madness) derangement with respect to a particular subject एकविषयभ्रम.

MONOPOLY (*Gr. polein*, to sell) exclusive privilege of selling any thing मक्ता, गुत्ता; —of customs, revenue, &c. इजारा, खोती *f*.—MONOPOLIST मक्तेदार, इजारदार, खोत; person who engrosses a commodity by purchasing the whole of that article in market, for the sake of selling at an advanced price साट्याचें साटें खरेदि करून विकणारा.—MONOPOLIZE *v.* मक्ता -गुत्ता घेणें; साटें घेणें -मारणें; खोती क.

MONOSYLLABLE (*Gr. sullabé*, syllable) एकाक्षरी शब्द.

MONOTONOUS (*Gr. -tonos*, tone) एकसूर, एकस्वराचा, एकस्वर; continued with dull uniformity एकसारखा, एकच गाणें लावून चालविलेला, कंटाळा येईसा एकसारखा लावलेला, एकसुरी.

MONSIEUR *F.* sir, or mister महाराज, साहेब, 'सियेर', 'शिनोर.'

MONSOON *Ar.* पावसाळा, 'मुसम' *f*.

MONSTER (*monstrum*) prodigy अद्भुत *n*, अवचिन्ह *n*, ध्यान *n* ; anything horrible from ugliness, deformity, or wickedness विद्रूप, राक्षस, रावण.—MONSTROUS *a.* अद्भुत, विलक्षण, विजातीय ; राक्षसी, अक्टोविकट, घोररूपी, भीमदर्शन ; enormous जगड्वाळ, अफाट.

MONTH* महिना, मास; lunar m. चांद्रमास half of a lunar m. पक्ष; light or first half of the m. शुक्लपक्ष; dark or second

half of the m. कृष्णपक्ष; solar m. सौरमास. -LY *a.* महिन्याचा, माही, मासिक; प्रतिमासिक.—*ad.* दर महिन्यास, महिना महिना.

MONUMENT (*monere*, to remind) memorial आठवणूक *f*, यादगारी *f*; a building, pillar. stone, or the like, erected to preserve the remembrance of a person, event, action, &c. थडगें *n*, समाध *f*, छत्री *f*, स्तंभ इ० -स्मारक वस्तु *f*. -AL *a.* आठवणूकीचा, यादगारीचा, स्मारक; थडग्याचा, छत्रीचा इ०.

MOOD (*modus*) logical form प्रकार, रूप *n*; *Gram.* अर्थ: potential m. शक्यार्थ; disposition प्रकृति *f*, वृत्ति *f*, भाव.—MOODY *a.* खप्पा, रुष्ट; लहरी, छांदिष्ट.

MOON* (*Skr. más*, from *má*, to measure) चंद्र, चांद; the day of the new m. अमावास्या *f*, अवस *f*; the d. of the full m. पौर्णिमा *f*, पुनव *f*; disk of m. चंद्रमंडळ *n*; day of the m. तिथि *f*; digit of the m. चंद्रकला *f*; rise of the m. चंद्रोदय; waxing m. वर्द्धमान चंद्र; waning m. नष्ट चंद्र; spots on the *moon's* disk कलंक. -BEAM चंद्रकिरण *n*. -CALF, mass of fleshy matter, generated in the uterus सल *n*.? सवड *n*.? monster राक्षस, अवचिन्ह *n*; stupid fellow मूर्ख, टोणपा. -EYE चांदण्यानें रोगी झालेला डोळा; [a disease in the eye of the horse]. -LIGHT, -SHINE चांदणें *n*, चंद्रप्रभा *f*.—STONE चंद्र -सोमकांत. -STRUCK *a.* वेडा, फेफरेकरी.—MOONY *a.* चंद्राचा; चंद्रासारखा, चंद्रवत्; bearing a crescent चंद्रधारी -मौळी.

MOOR* a heath रान *n* ; a marsh पाणथळ रान *n*.—*v. D.* खुटवणें, बांधून ठेवणें (गलबत). -AGE गलबत खुटविण्याची जागा *f*, खुटव्याची जागा *f*.

MOOT* *v.* See DISCUSS.

MOP *W.* कुंचा, झाडू *f*.

MOPE *v. i. D.* उदास -खिन्न होऊन बसणें.—*t.* उदास क.—MOPISH *a.* उदास, खिन्न -EYED *a.* उफराटे बाहुलीचा.

MORAL *a.* (*mos, moris*, manner) relating to duty धर्म -कर्तव्य संबंधी; pertaining to those intentions and actions of which right and wrong, virtue and vice, are predicated, or to the rules by which such intention and actions ought to be directed नीति अनीतीच्या विचाराचा; relating to the practice, manners, or conduct of men as social beings in relation to each other, as respects right or wrong, so far as they are properly subject to rules लोकाचार विषयाचा, वर्त्तनाच्या नियमाचा; conformed to the rules of right or to the divine law respecting social duties सदाचारानुसार, यथान्याय, धर्मानुसार, यथाशास्त्र: certain actions are not m.; conformed to law and right in exterior deportment लोकव्यवहारानुसार, आचारशुद्ध, शिष्टसंप्रदायानुसार: he leads a m. life; subject to the moral law नीतिनियमाधीन, शास्त्राधीन, नीतिवान; capable of moral action नीति अनीतीचें कर्म करण्याजोगा: a moral agent; probable युक्ति -तर्क-अनुमानसिद्ध: m. evidence अनुमानप्रमाण *n*; m. philosophy नीतिशास्त्र *n*. — *n.* doctrine or practice of the duties of life नीति *f*, नीतीचें वर्त्तन *n*; inner meaning of a fable, a narrative, an occurrence, an experience, &c. तात्पर्य *n*, हांसील *n*, भावार्थ. -IST नीतीचा उपदेश करणारा, नीतिशिक्षक; one who practices moral duties सदाचरणी, नीतिमार्गावलंबी, नीतीनें चालणारा. -ITY quality of an intention a character, an action, a principle, or a sentiment, when tried by the standard of right नीति *f*, न्याय, धर्म; the doctrines or rules of moral duties नीति-

शास्त्र *n*, नीति *f*; practice of the moral and social duties सदाचरण *n*, सदाचार, धर्म. -IZE *v*. apply to a moral purpose नीतिपर लावणें, नीतिवर घेणें; render moral सदाचरणी क.—*i*. नीतीच्या विषयावर लिहिणें, बोलणें, अथवा विचार क. [on, upon].—MORALLY *ad*. नीतीचा विचार पाहिला असतां, नीतिदृष्ट्या; नीतीच्या नेमाप्रमाणें; नीतीनें, प्रमाणिकपणानें; probably बहुतकरून, शंभर वांट्यानें, अनुमानानें. युक्त्यनुसार.—MORALS *pl*. आचरण *n*, आचार.

MORASS* पाणथळ *n*, दलदल *f*.—MORASSY *a*. दलदलीचा.

MORBID *a*. (*morbus*, disease) रोगी, विकारी. -NESS रोगीपणा, अस्वास्थ्य *n*.—MORBOSE *a*. रोगा पासून झालेला, रोगज (tumor).

MORDACIOUS *a*. (*mordere*, to bite) चावरा डसरा.

MORE* *a*. greater in number अधिक, जास्त; additional अणखी, विशेष.—*ad*. अणखी अधिक. -OVER *ad*. अणखी, अणीक, शिवाय.

MORN, MORNING* time from midnight to noon मध्यरात्री पासून दोनप्रहरचा वेळ; early part of the day प्रातःकाळ, सकाळ *f*; early in the m. सुप्रभातीं, मोठ्या पहाटेस; m. noon and evening त्रिकाळ; the following day उद्याचा दिवस.—MORNING *a*. सकाळचा प्रातःकालीन. -STAR प्रभाततारा, शुक्र.

MOROSE *a*. (*mos*, *moris* manner) कर्कश स्वभावाचा, दाष्ट, दुःशील. -NESS दाष्टपणा, कडु स्वभाव.

MORPHIA (*Gr*. from *Morpheus*, god of sleep) अफिनीचा स्फटिका सारखा सत्वांश.

MORROW* दुसरा दिवस; on the m. उद्यां, दुसऱ्या दिवशीं. See MORN.

MORSEL (*morsus*, a biting) घांस, ग्रास; a little piece तुकडा, खांड; a dainty m. सुग्रास.

MORTAL *a*. (*mors*, *mortis*, death) मरणारा, मरणाधीन, मर्त्य : man is m.; destructive to life जीवघेणा, प्राणघातक -नाशक; m. wound असाध्यजखम *f*; admitting death मरण पावायाजोगा, मरणसाध्य (place); extreme पराकाष्ठेचा, जबरा, भारी, पांचावर धारण बसायाजोगा (fright); human मनुष्यजातीचा, मानुष, मनुष्यजातीय (power); m. foe हाडवैरी; m. state मानवदशा *f*.—*n*. मनुष्य, मर्त्य. -ITY मरणधर्म, मर्त्यता *f*; मरणाधीनता *f*; मरण *n*; नाश; the whole sum of deaths in a given time or a given community मृत्यूची संख्या *f*, मरणाची सात *f*; human race मनुष्यजात *f*; human nature माणूसपण *n*, मनुष्यस्वभाव. -LY *ad*. मरण येईसा; पराकाष्ठेचा.

MORTAR (*mortarium*) vessel in which substances are pounded उखळ *n*, उखळी *f*; cement for building कमावलेला चुना, cannon for throwing bombs गरनाळ *f*; m. and pestle हमामदस्ता.

MORTGAGE *F*. गहाण ठेवलेली मालमता *f*.—*v*. गहाण ठेवणें.

MORTIFY *v*. (*mors*, death, *facere*, to make) destroy the organic texture and vital functions of कुजवणें, सडवणें, चेतनानाशक. deaden by religious discipline, as the carnal affections, bodily appetites, or worldly desires देहदंडण क., इंद्रियदमन, क., विषयवासना जिंकणें (Col. iii., 5); humble मानखंडण क., पाणउतारा क.—*i*. सडणें, कुजणें; दमणें, चीतहोणें.—MORTIFICATION मांसनाश, चेतनानाश; इंद्रियदमन *n*, संयम;—by penance तपश्चर्या *f*, वैराग्य *n*; पाणउतारा, मानखंडण *n*; that which mortifies दुःखास कारण *n*, पीडा *f*, कांटा, सल *n*.

MORTISE *F*. कुसूंचें घर *n*.—*v*. कुसूंचें घर क.; कुसूं बसविणें.

MORTUARY *a.* (*mortuus*, dead) मृतमाती संबंधी, मर्तीक संबंधी, मर्तिकाचा.

MOSAIC *a.* *F.* variegated by shells and stones of various colors so as to resemble paintings नानारंगाच्या पाषाणांनीं खचीत केलेला, जडाऊ.—*n.* जडावकाम. — & -AL. (from *Moses*) मोशाचा (law).

MOSQUE *F.* मशीद *f.*

MOSQUITO *Sp.* मुरकूट *n,f* मच्छर *n.*

MOSS* शेवाळ *f.*—*v.* शेवाळीनें भरणें. -GROWN *a.* शेवाळ वाढलेला.—MOSSY *a.* शेवाळलेला.

MOST* *a.* बहुतकरून, सर्व, बहुतेक; the m. of a bad bargain जळत्या घरचा वांसा, चोराची लंगोटी *f.* -LY *ad.* फारकरून, बहुतकरून.

MOTE* अणु, कण, रज, कुसळ *n.*

MOTH* पतंग, पिंगाणें *n*; the clothes' m. कसर *f*; that which gradually and silently eats, consumes, or wastes, anything कसर *f*, कीड *f*, वाळवी *f.* -EATEN कसरीनें खाल्लेला.

MOTHER* (*mater*; *Skr. matri*) आई *f*, माता *f*; woman who has borne a child लेंकुरवाळी बाई *f*, लेंकरांची आई *f*; source of birth or origin जन्माचो जागा *f*, खाण *f*, योनि *f*, मूळ *n*; old woman माय *f*, जननी *f*, आई *f.*—*a.* native स्वाभाविक, जातीय: m. tongue जन्म-स्वभाषा *f*; m. country जन्मभूमि *f*; [m. -church, the original or oldest church, or one from which other churches have had their origin; — esp. applied by its adherents to the church of Rome.] -HOOD आईपण *n*, मातृत्व *n.* -IN-LAW सासू *f*, मामी *f.* -LESS *a.* आईपोरका, मातृहीन. -LY *a.* आईचा; आईसारखा, मातृतुल्य.—*ad.* आईप्रमाणें, मातृवत्. -OF-PEARL- मोत्यांची शिंप *f.*

MOTION (*movere*, to move) act of changing place हालणें *n*, चालणें *n*; movement हालचाल *f*, चलनवलन *n*; gait चालण्याची ढब *f*, गति *f*, गमन *n*; power of motion चलनशक्ति *f*; movement of the mind मनोवेग, मनोविकार, कल्पना *f*: let a good man obey every good m. rising in his heart; proposal made सूचना *f*, उद्दू, सुचविलेला अभिप्राय; *Law.* दरखास्त *f*; stool ढाळ, जुलाब. -LESS *a.* अचल, निश्चल, स्तब्ध.—MOTIVE that which incites action हेतु, कारण *n*; relation between the m. and the effect प्रयोजक भाव.—*a.* चालक, प्रवर्त्तक, प्रयोजक (power.)

MOTLEY *a.* *W.* variegated in color चित्रविचित्र, पंचरंगी; composed by different parts पंचभेळीचा, मिसळीचा.

MOTTO *It.* वाक्य *n*, वचन *n*, मुद्रालेख, किताब.

MOULD* soft earth बारीक -नरम माती *f*; composing substance द्रव्य *n*, प्रकृति *f*, अवयवांश; substance like down, which forms in bodies which lie long in warm and damp air बुरशी *f*, बुरा.—*v.* बुरा आणणें, बुरशी चढवणें.—MOULDER चुराडा -धूळ होणें; waste away gradually झिजणें, जिरणीस लागणें [away].—MOULDY *a.* बुरशी चढलेला -आलेला, बुरशेल;—of smells कुईट.

MOULD *Sp.* matrix सांचा, मूस *f*; cast घाट, डौल, भटी *f.*—*v.* घडणें, बनावणें; knead मळणें, तिंबणें. -ING घडणें *n*, घडणी *f*; *Arch.* कंगोरा, कंगणी *f.*

MOULT *v.* (*mutare*, to change) पिसें -पंख -केंस -कांत इ० गाळणें -टाकणें.

MOUND* an artificial elevation of earth बांध, धक्का, बंधारा; hillock टेंकाड *n*, टेंकडी *f.*

MOUNT (*mons, montis*) mountain डोंगर, टेंकडी *f*; mond बांध, धक्का.—*v. i.* rise in high उंच जागयावर चढणें, वर चढणें; get on horseback घोड्यावर बसणें -चढणें, स्वार होणें; amount एकंदर भरणें.—*t.* घोड्यावर

बसविणें; घोड्यावर बसणें, अश्वारूढ होणें; as a diamond by setting कोंदणांत बसविणें; as a gun in a carriage चढविणें; raise aloft वर उचलणें; ascend चढणें, वर चढणें; to m. a guard पाहरेकऱ्यानें आपली जागा घेऊन पाहरा क. [up].—MOUNTAIN, a large hill डोंगर, पर्वत; that which is like mountain for size डोंगर, पर्वत, राक्षस; crest of a m. माथा, शिखर *n*; country at the foot of a m. तळघाट; pass over a m. घाट; ridge of a m. घाटमाथा.—*a*. डोंगरी, पहाडी. -EER डोंगरी माणूस, पर्वतवासी. -OUS *a*. डोंगराळ, डोंगरवट; huge पर्वतप्राय, अवजड, अवाढव्य.

MOUNTEBANK *It.* quack doctor ढोंगी वैद्य, नाकाडोळ्याचा -बाहाडी वैद्य; false pretender पोम दाखविणारा, तोतया, आव घालणारा.

MOURN* *v. i.* express grief खेद -दुःखशोक क.; wear the customary habit of sorrow दुःखाचा -सुतकी वेष धारण क. [for].—*t*. -चा शोक बाळगणें -मानणें -क., -च्या साठीं रडणें. -ER रडणारा, दुःख करणारा; one who follows a funeral in the habit of mourning सुतकी वस्त्रें घालून प्रेतयात्रे बरोबर जाणारा, सुतकी. -FUL *a*. खिन्न, दिलगीर; expressing sorrow खेदसूचक -दर्शक (bell); causing sorrow दुःखकारक -जनक;—of sounds रडका, काकुळवाणा. -ING खेद, दुःख *n*, शोक; सुतकी पांघरूण *n* -वेष.—*p. a*. शोककरणारा, शोकाचा, शोकसूचक. (garments).

MOUSE* (*Skr. mûshiká, Fr. mush,* to steal) उंदीर.—*v*. उंदीर धरणें. -HOLE उंदराचें बीळ *n*. -TRAP उंदराचा सांपळा.

MOUTH* opening in the face through which food is received and the voice is uttered तोंड *n*, मुख *n*; orifice तोंड *n*, मुख *n*, द्वार *n*; principal speaker लोकांच्या -बहुतांच्या वाटचा पुढें होऊन बोलणारा, मुख *n*; cry आरोळी *f*; voice शब्द, गळा, वाणी *f*: all spend their m. aloft; wry face वेडेवांकडें तोंड *n*, विचकुल्या *f pl*: to make *mouths*; to be down in the m. तोंड -मुखश्री उतरणें, पायपोसा सारखें तोंड क.; to stop the m. पुंगी बंद क., कुंठित क. -FRIEND तोंडापुरता मित्र, गोडबोल्या. -FUL घांस, मास;—of water घोट; a small quantity घांसभर, घांस. -HONOR तोंडचा सन्मान, वैठगी आदर. -PIECE piece of a musical instrument to which the mouth is applied पेंपरें *n*, पिंपाणी *f*; one who delivers the opinions of others दुसऱ्यांचीं मतें दर्शविणारा -सांगणारा, मुख *n*.

MOVE (*movêre*) cause to change place or posture हलवणें, चालवणें, चालू क.; give impulse to ढाळणें, सारणें; agitate गडबडवणें, ढवळणें, क्षोभविणें; arouse the feelings of कळवळा आणणें, द्रव -पाझर -पान्हा आणणें (Matth. ix., 36); propose उहू -गोष्ट -विचार काढणें; rouse by persuasion वळवणें, मनावणें, बधवणें.—*i*. चालणें, ठाण बदलणें, हलणें: a ship *moves* rapidly; चेतणें, क्षोभ पावणें; जागा पालटणें, राहण्याचें स्थल पालटणें; उहू काढणें; about फिरणें, फिरकणें.—*n*. चलन *n*, स्थलांतर *n*; at chess डाव, खेळ. -LESS *a*. स्थिर, अचल. -MENT हालणें *n*, स्थलांतर *n*; emotion चित्तवृत्ति *f*, क्षोभ; manner of moving गति *f*; slow in मंदगति *f*; that which imparts motion गति देणारा, चालक: the wheel-work of the clock is called its m.; *Mus*. ग्राम, ताल.—MOVEABLE *a*. चालाया सारखा, चल, जंगम; changing from one time to another वेळोवेळ किंवा वेळ बदलणारा (feasts).—*n. pl* goods जिंदगी *f*, जंगम माल.—MOVER हलवणारा, सारक, चालक; उहू काढणारा.—MOVING *p. a*. स्थानांतर करणारा, गामी, in comp.: m. in the

air आकाशगामी; affecting चित्तवेधक, मनोवेधक (address). -LY *ad.* करुणा -द्रव येईसा.

Mow *v.** cut down with a scythe इळ्यानें -कोयतीनें कापणें; cut the grass from -चें -आंतील गवत कापणें: to m. a meadow कुरण कापणें; cut down indiscriminately काटाकाटी क. [down, off].—*n.* pile of hay or sheaves of grain deposited in a barn सुडी *f*, उडवी *f*, उडवें *n*;—of jawári कात्रा. -BURN *v. i.* heat and ferment in the mow सुडी उबवणें.

Much* *a.* पुष्कळ, बहुत, फार.—*n.* पुष्कळपणा, बाहुल्य *n*; to mention much of पुष्कळ वाखाणणें.—*ad.* पुष्कळ, बहुत, फार; as much as जितपत; how much कितपत.

Muck *Icel.* dung in a moist state ओलें खत *n*; mass of decaying matter घाण *f*, राड *f*, चेंदा. -SWEAT मोठा घाम; to be in a m. घामाच्या धारा लागणें. -WORM खतकिडा, शेणकिडा.

Mucus (*L.*) a vicid fluid secreted by the mucous membrane इंद्रियमल, श्लेष्मा, मल;—of the throat कफ;—of the bowels आंव *f*;—of the nose शेंबूड.—Mucilage ओला डींक, चीक, बलक.—Mucilaginous *a.* चिकण, चिकट.—Mucous *a.* कफादि मलाचा; चिकण, चिकचिकीत; secreting a slimy substance कफादि मलउत्पादक.

Mud *Ger.* चिखल, राड *f*.—*v.* गढूळणें, खंवदळणें. -DLE *v.* गढूळ -खडूळ क.; stupefy गुंग क., निशा आणणें. -DY *a.* चिखलाचा; besmeared with mud चिखलानें भरलेला; dull मजीत, मलूल.—*v.* गढूळ क., चिखलानें भरणें; मजीत क. -DINESS गढूळपणा, गदळपणा; intellectual dulness बुद्धिमांद्य *n*, जाड्य *n*. -WALL कच्ची -मातीची भिंत *f*.

Muffle *v. Ger.* wrap up in something that conceals वेष्टणें, झांकणें, गुंडाळणें; as the face टापसी बांधणें, घुंगट घेणें, बुरखा घेणें; wrap with something that dulls, or renders sound inaudible नाद कोंडे असा बांधणें -वेष्टणें; conceal लपविणें, छपविणें [up].—*i.* तोंडच्या तोंडांत बोलणें, गुटमळणें.—Muffler बुरखा, घुंगट *n*, टापर *f*.

Mug *Ir.* पेला. -GISH -GY *a. W.* ओला, दमसर (straw); warm and unelastic उबेचा, उबाऱ्याचा, उकाड्याचा (air); to be m. उकडणें, गुदमदणें, शिजणें.

Mulberry *Ger.*—the tree तुतीचें झाड *n*;—the fruit तूत *n*, तुतें *n*.

Mulct (*mulcta*) दंड, गुन्हेगारी *f*.—*v.* दंड क., गुन्हेगारी घेणें; to deprive of हरण क.;—a state खंडणी घेणें [in].

Mule (*mulus*) खेंचर *n*; [a plant or vegetable produced by impregnating the pistil of one species with the pollen of another]. -TEER खेंचरवाला -हाक्या.

Mull *v.* (*mollire*, to soften) मसाला घालून कढवणें -ऊन क. (wine).

Muller (*molere*, to grind) बत्ता, वरवंटा, दस्ता.

Mullet (*mullus*) एक जातीचा मासा आहे, बोई *H.*, ओवसी *f.*?

Multifarious *a.* (*multus*, many) नानाविध बहुविध, अनेक प्रकारचा.—Multiform *a.* बहुरूप, नानारूप.

Multiped *a.* (*-pes, pedis*, foot) बहुत पायांचा, बहुपाद.

Multiple (*-plicare*, to fold) गुणाकार.—Multiplicable *a.* गुणायाजोगा, गुणनीय, गुण्य.—Multiplicand गुण्यांक, गुण्य.—Multiplicate *a.* अनेक, बहुत.—Multiplication act of multiplying वाढवणें *n*, अधिक करणें *n*, वृद्धि *f*; *Math.* गुणाकार; cross m.

तेडा गुणाकार; compound m. विविध गुणाकार.—MULTIPLICITY बहुतपणा, पुष्कळपणा, बाहुल्य *n*; m. of meanings अर्थबाहुल्य *n*.—MULTIPLIER गुणक, गुणकांक; one who multiplies वाढविणारा, वृद्धि करणारा.—MULTIPLY *v.* वाढविणें, वृद्धि क.; *Math.* गुणणें [from, by].—*i.* वाढणें, वृद्धि होणें; increase in extent and influence विस्तारणें, बळावणें (Acts xii., 24).

MULTITUDE (do.) बहुतपणा, पुष्कळपणा; assemblage समुदाय, मेळा, जमाव; a great m. भरणा, गाडा, डोंगर; the m. दुनिया *f*, आलमदुनिया *f*.—MULTITUDINOUS *a.* बहुत, पुष्कळ; manifold अनेकविध, पुष्कळ प्रकारचा.

MUM *a. Ger.* मौना, मुका, निःशब्द; to sit m. मुद्द बसणें.—*int.* चुप्प, निमुट, मटकन.

MUMBLE *v. Ger.* mutter ओंठांत -गुटमळत बोलणें; eat with lips closed लुबलुब खाणें, ओंठ हलवून खाणें; chew softly चघळून खाणें.—*i.* गुणगुणणें; utter words with grumbling धुसधुसणें, फुसफुसणें.

MUMMER *Ger.* मुखवटा घालून खेळणारा.—MUMMERY मुखवट्याचा खेळ -तमाशा.

MUMMY (*Per. mûm, môm,* wax) dead body embalmed and dried after the manner of the ancient Egyptians मसाला भरलेलें प्रेत *n*, सुगंधद्रव्यरक्षित प्रेत *n*; to beat to a m. मलीदा -चेंदामेंदा क., कुट्टा काढणें, कणीक तिंबणें.

MUMPS *pl. Ger.* a peculiar and specific unsuppurative inflammation of the parotid glands गालगुंड *n*, कर्णमूल *n*.

MUNCH *v. i.* (*manducare,* to chew) चघळून खाणें, चघळणें.

MUNDANE *a.* (*mundus,* the world) इहलोकचा, ऐहिक; m. egg ब्रम्हांड *n*.

MUNICIPAL (*municeps,* a free citizen, fr. *munia,* official duties, *capere,* to take) pertaining to a corporation or city कसब्याचा, सनदी गांवच्या प्रकरणांतला, 'म्युनिसिपाल'; belonging to a state, kingdom, or nation राज्यसंबंधी, मुलखी, देशी.—MUNICIPALITY जिल्हा.

MUNIFICENT *a.* (*munus,* gift, *facere,* to make) उदार, हाताचा सढळ.—MUNIFICENCE उदारपणा, औदार्य *n*.

MUNITION *F.* दारू गोळा वगैरे लढाईचें सामान *n*, युद्धसाहित्य *n*, जंगी सामान *n*.

MURAL *a.* (*murus,* wall) भिंतीचा; resembling a wall भिंती सारखा; perpendicular उभा, सुती.

MURDER* (*Skr. mri.*) act of killing a human being with malice prepense or aforethought, expressed or implied खून, हत्या *f*.—*v.* खून -हत्या -नरहिंसा क. -ER खून करणारा, खुनी, in comp. हत्यार: पितृह०. -OUS *a.* घातकी, खुनी; bloody हिंसक, हिंस्र (rapine); fond of murder हिंसाप्रिय (tyranny); premeditating murder हिंसाबुद्धि, घातकी (intent).

MURK, MURKY* *a.* अंधारीचा, ओंधट, काहूर आलेला.

MURMUR (*L.*) low, confused and indistinct sound, as that of running water खळखळ *f*, कलकल *f*, गुणगुण *f*; complaint half-suppressed, or uttered in a low, muttering voice कुरकुर *f*, मुरमुर *f*, धुसफुस *f*.—*v. i.* खळखळणें, खळखळत चालणें -वाहणें, गुणगुणणें; कुरकुरणें, धुसफुसणें, कुरकुर -फुसफुस क.

MUSCLE (*musculus*) an organ of motion in animal bodies सांवर *n*, *f*, स्नायु.—* शिंपींतला किडा -मासा.—MUSCULAR *a.* स्नायुसंबंधी, स्नायूचा; well furnished with muscles मांसल, मासाळ, गाठळ, बेडकीचा; strong घट्ट, जोरदार.

MUSE *v. F.* think closely ध्यान -चिंतन क.; to be in a m. ध्यानांत -विचारांत असणें; be absent-minded भान नसणें, भानावर -देहावर नसणें [on, upon].—*n.* ध्यान *n*, चिंतन *n*; (*musa*) one of the nine fabled goddesses who preside over literary, artistic, and scientific matters and labors वाक्-देवता *f*, सरस्वती *f*.

MUSEUM (*L.*) a collection of natural scientific, or literary curiosities, or of works of art चमत्कारिक पदार्थसंग्रह, 'म्युझियम' *f*.

MUSHROOM *F.* कुत्र्याचें मूत *n*, अळंबें *n*, छत्री *f*; kinds of—चुड्यें *n*, चितळें *n*, गवतें *n*, *n*, कुबळें, &c.

MUSIC (*musica*) succession of sounds so modulated as to please the ear, or a combination of simultaneous sounds in accordance or harmony सुस्वर, ताल, वाद्यघोष; vocal and instrumental m. संगीत *n*, गाणें बजावणें *n*; the art or science संगीतविद्या *f*, -शास्त्र *n*; playing on a musical instrument गाणें बजाविणें *n*, गायन *n*. -AL *a*. संगीतशास्त्र संबंधी, सुस्वरविषेचा; सुस्वर, सुश्राव्य, गोड (a sentence); producing music सुस्वर उत्पन्न करणारा; m. glasses जलतरंग; m. instrument वाद्य *n*.—MUSICIAN गाणारा, गवयी; वाद्य वाजविणारा, वाजंत्री.

MUSK (*muscus, Skr. mushaka*, testicle) कस्तुरी *f*. -DEER कस्तुरीमृग. -MELON खरबूज *n*. -RAT चिचुंद्री *f*.

MUSKET (*muska*, a fly) बंदूक *f*. -EER बरकंदाज.

MUSLIN *Ar.* मलमल *f*.

MUSQUITO, See MOSQUITO.

MUSROLE (*morsus*, bite) nose-band of a horse's bridle मुखपट्टा.

MUST* *v. i.* पाहिजे, लावणें, भागपडणें, प्राप्त असणें.

MUST *v.* (See MOIST) उबट क.—*i.* उबटणें.—*n.* बुरा.—MUSTY *a.*—to be m. उतरणें (wines).

MUSTACHE *F.* मिशी *f*.

MUSTARD *F.*—the plant मोहरी *f*, राई *f*;—the seed मोहरी *f*, राई *f*; white m. पांढरी मोहरी *f*; black m. काळी मोहरी *f*; Sinapis dichotoma शिरस; oil extracted from it शिरसेल *n*; the m. of Scripture पिलु *n*; the oil extracted from its fruit किकणेल *n*.

MUSTER *v.* (*monstrare*, to show) collect and show जमा करून दाखविणें, गोळा क.; assemble, as troops for parade, inspection, exercise, &c. फौजेची पाहणी क. -मोजदाद घेणें, किंवा कवायतीसाठीं फौज उभी क.; [to m. troops into service, to inspect and enter them in the muster-roll, according to which they receive pay for for the last time, and are dismissed]; to m. up मिळविणें [up].—*n.* हजिरी घेणें *n*, हजिरी *f*; to pass m. रुजू होणें, पसंत पडणें. -BOOK, -ROLL हजिरीपट, इसमवारी *f*.

MUTE *a.* (*mutus*) silent मुका, निःशब्द, अनुत्तर; dumb मुका; *Gram.* स्वरहीन, ज्याचा उच्चार होत नाहीं तो;—said of certain letters.—*n.* मुकें माणूस *n*; [person employed by undertakers to stand before the door of a house in which there is a corpse]; *Gram.* स्वरसहितोच्चार्य व्यंजन *n*.

MUTILATE *v.* (*mutelus*, maimed) cut off a limb or essential part of अंगच्छेद क., व्यंग -पंगु क.; retrench छाटणें, कापणें.—MUTILATION अंगच्छेदन *n*, अंगच्छेद; व्यवच्छेद, काटणी *f*, कापणी *f*.

MUTINY *F.* insurrection against consituted authority, part. military or naval

authority फौजेंतील बंड *n*, दंगा, बेदा; tumult गडबड *f*, धांदल *f*.—*v*. बंड क., धन्यावर उठणें -फिरणें -फितणें.—MUTINOUS *a*. बंड -दंगेखोर.—MUTINEER फौजेंत बंडकरणारा.

MUTTER *v. i.* (*muttire*) utter words with a low voice and compressed lips, with sullenness or in complaint मुटमुटणें, बुटबुटणें, कुरकुरणें, तोंडच्या तोंडांत बोलणें; sound with low rumbling voice गडबडणें, गडगडणें.—*t*. ओंठांत-तोंडांत बोलणें;—as prayers, &c. inarticulately जप क., जपणें.

MUTTON *F*. मेंढराची -बकऱ्याची सागुती *f*, 'मटन' *n*.

MUTUAL *a*. (*mutare*, to change) परस्पर, परस्परांचा, एकमेकाचा. -ITY परस्परता *f*, अन्योन्यभाव. -LY *ad*. परस्परें, एकमेकांस.

MUZZLE *F*. snout मुसकट *n*, मुसकाड *n*;—of a tube, &c. तोंड *n*;—of a gun मोहरी *f*; fastening for the mouth which stops biting मुस्कें *n*.—*v*. -चें तोंड -मुस्कें बांधणें; fondle with the mouth तोंडानें कुरवाळणें; prevent hurting इजा -दुखापत न होऊं देणें. —*i*. तोंड जवळ आणणें.

MY* *pron*. माझा, आपला. -SELF *pron*. आपण, मी.

MYRIAD (*Gr*. *murios*, numberless) number of ten thousand दहाहजार, अयुत *n*; immense number लाखो, कोट्यावधि, ढीग.

MYROBALAN (*myrolalanum*) सुकविलेला आंवळा, आंवळकटी *f*; beleric m. बेहडा; yellow or chebulic m. हिरडा, हरडा.

MYRRH *Ar*. बोळ.

MYRTLE *Per*. मटली *f*; the common m. विलायती मेंदी *f*.

MYSTERY (*Gr*. *mustérion*) profound secret गूढ *n*, रहस्य *n*, मर्म *n*; enigma कोडें *n*; trade धंदा; [*pl*. kind of secret religious celebrations to which none were admitted except those who had been initiated by certain preparatory ceremonies].—MYSTERIOUS *a*. गूढ, गहन, अगाध, ज्याविषयीं कांहीं तर्क होत नाहीं असा.—MYSTIC *a*. गूढ, गहन; involving some secret meaning गूढ अर्थाचा, लाक्षणिक; m. letter बीजाक्षर *n*; m. verse बीजमंत्र, मंत्र.

MYTHIC *a*. (*Gr*. *muthos*, fable) पुराणकथित, कल्पित, पुराणोक्त, भाकडकथेचा.—MYTHOLOGY, science treating of myths, or of legendery religious popular fables पुराणशास्त्र *n* -विद्या *f*; collective body of popular legends and fables respecting the supernatural actions of gods, divinities and heroes पुराण *n*, कथा *f*, देवताख्यान *n*, देवादिकांच्या कथा *f pl*, -चीं चरित्रें *n pl*.—MYTHOLOGICAL *a*. पुराणांतला, देवतादि कथाविषय.

N

NADIR *Ar*. point in the lower hemisphere opposite to the zenith अधोबिंदु, स्वस्तिक *n*, *m*; lowest point अधोभाग.

NAG* घोडें *n*, तट्टु *n*.

NAIL* नख *n*;—of a bird नख *n*, नखी *f*; —of iron, &c. खिळा, मेख *f*; a measure of length सवादोन इंचांचें एक मेज *n* आहे; on the nail हातावर, रोख; to pay on the n. नगद देणें; hit the n. on the head निशाण -टिपण साधणें.—*v*. खिळा मारणें; खिळा मारून बंद क., खिळणें; trap सांपळ्यांत धरणें.

NAKED* *a*. (*Skr*. *nagna*) उघडा, नागवा; unarmed उघडा, निःशस्त्र, असज्ज; plain स्पष्ट, उघडा; without exaggeration, excuse, &c. शुद्ध, केवळ, नुस्ता; bare ओका, बोडका; with the n. eye नुस्त्या डोळ्यानें, दुर्बीण वगैरेच्या सहाया वांचून; n. flooring कडेपाट.

-NESS नागवेंपण *n*, उघडेंपण *n*; the genetials उत्पत्तीचें अंग *n*, उपस्थ *n*.

NAME* (*nomen, Skr. náman*) title by which any person or thing is known, understood, or spoken of नांव *n*, नाम *n*, संज्ञा *f*; reputation नांव *n*, आबरू *f*, कीर्त्ति *f*; celebrity नांवलौकिक, प्रख्याति *f*; remembrance आठवण *f*, याद *f*, नांव *n*; race जात *f*: enemies of his n.; person असामी *f*, व्यक्ति *f*; *Gram.* नाम *n*; [Christian n. the name a person receives by baptism, as distinguished from *surname*]; in n. नांवाचा, निमित्ताचा; proper n. विशेषनाम *n*; n. given to a child with reference to its horoscope नांवरस *f*; to call *names* नांवें ठेवणें, शिव्या देणें; giving a n. to a new-born child नामकरण *n*; to take a n. in vain व्यर्थ नांव घेणें; नांवानें शपथ घेणें; bearing the n. of नामधारी; family n. आडनांव *n*, उपनाम *n*; n. given at nativity जन्मनांव *n*; to preserve one's good n. नांव -पागोटें संभाळणें; bad n. बदनाम *n*, कुकीर्त्ति *f*; to pass under the n. of नांवाखालीं मोडणें, नांवावर विकणें.—*v.* नांव देणें -ठेवणें; mention by name नांव घेणें -काढणें; call हांकमारणें, बोलावणें; nominate नांव ठेवणें; कामावर नेमण्या करितां नांव सांगणें [to n. the n. of Christ, to make profession of faith in him]. -LESS *a.* निनाव्या, अनामिक; not noted अप्रसिद्ध, सांदीकोंदीचा (dwelling). -LY *ad.* म्हणजे. -SAKE नांवकरी, आपल्या नांवाचा, स्वनामी.—NAMING नांवदेणें *n*; नामकरण *n*; ceremony of n. a child बारसें *n*; नांवघेणें *n*, नामोच्चारण *n*.

NAP* झोंपेचा चुटका, डुलकी *f*.—*v.* डुकली घेणें -खाणें; to be in a careless secure state निश्चिंत राहणें, झोंप घेणें.—* down on cloth फूल *n*.

NAPE* back part of the neck मानेचा कांटा -कळस; [a piece of wood to support the pole of a waggon].

NAPHTHA *Ar.* नखतेल *n*.

NAPKIN *F.* cloth used for wiping or drying the mouth, esp. at the table रुमाल, तोंडपुसणें *n*, 'न्यापकिन.'

NARCOTIC *a.* (*Gr. narké* numbness) causing stupor गुंगी आणणारा, मदकारी; relieving pain, and producing sleep उपशमनकारी, निद्राजनक.—*n.* मदकारी -गुंगीचें औषध *n*; as a poison उपविष *n*.

NARD* (*Skr. nalada*, fr. *nala*, perfume, *da*, giving) जटामांसी *f*, नार्द.

NARRATE *v. F.* सांगणें, कथणें, निरूपण क. —NARRATION कथन *n*, निरूपण *n*; story कथा *f*, गोष्ट *f*, वृत्तांत. — NARRATIVE *a.* कथेचा, कथेसंबंधी; giving a particular or continued account तपशिलाचा, शिस्तवार, बयादवार; story-telling कथा-गोष्टी सांगणारा. —*n.* कथा *f*, गोष्ट *f*, वृत्तांत.—NARRATOR कथनकरणारा, कथक; of legends कथेकरी.

NARROW* *a.* of little breadth अरुंद, बारीक; straitened अडचणीचा, संकोचित; contracted in mind अप्रशस्त मनाचा, एककल्ली -मार्गी; selfish कृपणबुद्धि; close जवळचा, थोडक्या अंतराचा (shot, escape); scrutinizing बारीक दृष्टीचा, सूक्ष्म, पक्का.—*v.* अरुंद क.—*i.* संकोचित होणें, बारकावणें. -LY *ad.* थोडक्या रुंदीनें; संकोचानें; बारकाईनें; बारीक दृष्टीनें, सूक्ष्म विचारानें; थोडक्यांत, थोड्यांत: I had n. escaped from death मरतां मरतां वांचलों. -NESS अरुंदपणा, अरुंदी *f*; अडचण *f*, संकोच; बारकाई *f*, सूक्ष्मता *f*; कृपणपणा, किरमाडीपणा; तारंबळ *f*, अडचण *f*. -MINDED *a.* कृपणबुद्धि, किरटा, किरमाडी.

NARAVELIA ZEYLONICA (*L.*) नरवेल *f*, ज्योतिष्क (*Sanskr*).

NASAL *a.* (*nasus*, the nose) नाकाचा, नस्य; *Gram.* अनुनासिक, सानुस्वार (letter).—*n.* अनुनासिक वर्ण.

NASCENT *a.* (*nasci*, to be born) beginning to exist or grow नुकतांच वाढणारा.—*n.* state of a gas संयुक्तस्थिती पासून वेगळे पडतांक्षणींची ग्यासाची स्थिति *f.*

NASTY *a. Ger.* offensively filthy घाणेरडा; indecent बिभत्स, घाणेरडा, अभद्र.

NATAL *a.* (*nasci*, to be born) जन्माचा, जन्म संबंधी, जन्म, in comp.: *n.* hour जन्मकाल.

NATION (*do.*) body of inhabitants of a country united under the same government देश, प्रजा *f*; people, as distinguished from those of different descent, language, or institutions लोक, जात *f*, राष्ट्र *n.* -AL *a.* लोकांचा, राष्ट्राचा, देशाचा, देशीय; attached, esp. to one's own country स्वदेशप्रिय, स्वदेशाभिमानी; n. custom देशाचार; n. pride देशाभिमान, जात्याभिमान; general साधारण, सर्वसामान्य (calamity, custom). -ITY लोकपणा, जातित्व *n*; स्वदेशाभिमान; जात *f*, राष्ट्र *n*, देश. —NATIVE *a.* pertaining to one's birth जन्माचा, मूळचा; belonging to the place in which one is born जन्मदेशाचा, स्वदेशीय, in comp. स्व, जन्म: n. land स्वदेश, जन्मदेश; conferred by birth जन्मापासून मिळालेला, जन्मप्राप्त -सिद्ध, जन्मार्जित (rights); indigenous देशाचा, देशी, मुलकी (language); produced by nature मूळचा, स्वाभाविक, स्वभावसिद्ध (metal).—*n.* देशीय जन, 'नेटिव.' —NATIVITY, birth जन्म, उत्पत्ति *f*; time of birth जन्मकाल; place of birth जन्मभूमि *f*; horoscope जातक *n*; astrological record of it जन्मपत्रिका *f*; name given at one's n. जन्म -नक्षत्रनाम *n.*

NATURE (*do.*) sum of qualities and attributes which make a thing what it is, as distinct from others स्वभाव, धर्म, जातिस्वभाव, प्रकृति *f*; sort प्रकार, जात *f*; established or regular course of things रीत, *f*, सृष्टिक्रम, मार्ग; existing system of things सृष्टि *f*, जग *n*; personified sum and order of causes and effects प्रकृति *f*, माया *f*, शक्ति *f*; natural affection स्वभाव, स्वभावधर्म, प्रकृतिगुण;—of mind प्रकृति *f*, तब्यत *f*; conformity to that which is natural, as distinguished from that which is artificial स्वभावसादृश्य *n*, स्वरूप *n*; nakedness नग्नावस्था *f*; intellect बुद्धि *f*, ज्ञानशक्ति *f*; vital qualities and energies शक्ति *f*, जिव्हाळा, जीवनशक्ति *f*; good n. सद्भाव, सुशील *n*; ill n. दुर्भाव, दुःशील *n*; in a state of n. नग्न, दिगंबर; causing or relieving n. शौच *n*, मलविसर्ग; to go to ease n. परसाकडे -शौचास जाणें; to leave to n. प्रकृतीवर टाकणें -असूं देणें (a disease, &c).—NATURAL *a.* जातीचा, स्वभावाचा, मूळचा, आंगचा (growth, color); मार्गाचा, सोयीचा, यथाक्रम, उघड (consequence, death); सृष्टीचा (law, history); conformed to truth or reality यथार्थ, सत्य, अकृत्रिम (action); resembling the object imitated वस्तुसादृश्य, हुबेहूबचा (portrait); bastard दासीचा, अनौरस (child); pertaining to, derived from, or formed by, the lower or animal nature, as contrasted with the higher or moral powers, viewed as being themselves spiritual, or as the organs of the divine spirit प्रापंचिक, दैहिक, संसारिक, भौतिक (1 Cor. ii. 14); not forced सरळ, साहजिक *n*; death आपमरण *n*, आपलें मरण *n*; n. history स्थावरजंगमविद्या *f*; n. theology सृष्टिजन्य ईश्वरज्ञान *n* -विद्या *f*; n. day अहोरात्र *f*; n. philosophy पदार्थविज्ञान *n.*—*n.* जन्माचा

खुळा, यथाजात वेडा, मूढ. -IST सिद्धपदार्थविज्ञानी. -IZE *v.* render easy and familiar by custom and habit सराव पाडणें, अभ्यासाखालीं आणणें; confer the rights and privileges of native subjects on देशाचा क., देशीय मंडळींत घेणें; make one's own आपलासा क. (foreign words). -LY *ad.* स्वभावानें, प्रकृतीनें, जन्मतः, मार्गानें, रीतीनें.

NAUGHT* कांहींच नाहीं; for n. उगीच, फुकट; to set at n. धिःकार क., न मानणें.—NAUGHTY *a.* wicked दुष्ट, वाईट; mischievous खोडकर, उत्पाती, व्रात्य.

NAUSEA (*L.*) मळमळ *f*, ओकारि *f*, शिसारि *f*.—NAUSEATE *v.* शिसारि -किळस आणणें; reject with disgust कंटाळून -धुस्कारून टाकणें. —*i.* कंटाळा -वीट -किळस येणें.—NAUSEOUS *a.* ओकारवाणा, कंटाळवाणा, घाणेरडा.

NAUTICAL *a.* (*navis*, ship) नौका चालविण्याचा, नौकाचालनविद्येचा; pertaining to seamen नावाड्यांचा, खलाशांचा.—NAVAL *a.* गलबताचा, अर्मारी, नाविक; consisting of ship नौकामय, जहाजांचा.—NAVIGABLE *a.* गलबत जायाजोगा, नौकागम्य.—NAVIGATE *v. i.* गलबतानें जाणें -येणें, सफर क.—*t.* गलबतांत बसून समुद्रा वरून जाणें -येणें; steer, direct, or manage in sailing गलबत चालवणें -चळवणें -हकारणें.—NAVIGATION सफर *f*, नौकापर्यटन *n*; the art नौकाचालन -नयनविद्या *f*, नाविकविद्या *f*, गलबत चालविण्याची विद्या *f*; vessels गलबतें *n pl*; [inland n., conveyance by boats or vessels in the interior of a country]. —NAVIGATOR गलबतानें जाणारा -येणारा, समुद्रगामी; one who is skilful in the art of navigation नौकाचालनविद्या जाणणारा; one who directs the course of a ship नावाडी, नौकाचालक.—NAVY (*Skr. naus*) fleet of ships गलबतें *n pl*, तारवें *n pl*, नौकासमूह; whole of the ships of war belonging to a nation or ruler, considered collectively अर्मार *n*, युद्धनौकासमूह.

NAVE* (*Skr. nâbhi*) मांदळा, तुंबा, पिंडी *f*.

NAVE (*navis*, ship) देवळाचा मध्यभाग.

NAVEL* बेंबी *f*, नाभी *f*.

NAY* *ad.* no नाहीं; not only so इतकेंच नाहीं, असें केवळ नाहीं.—*n.* नाकार, नन, नन्ना *f*.

NEAP (*napus*) pole of a cart गाडीची दांडी *f*; prop for the front of a cart शिपाई.—*a.** खालचा, नीच; n. tide शुक्ल पक्षाचे आरंभीची आणि शेवटची भरती *f*, भांग *n*; to be at the n. भांग पडणें.

NEAR* *a.* not far distant जवळचा, समीपचा; not distant in place जवळ, नजीक; not distant in time जवळ; closely related जवळचा, जवळच्या नात्याचा; close to one's interests, affections, &c. जिवाचा, जिव्हाळ्याचा, अंतरंगीचा, दाटीचा (a friend); not rambling अटोप्याचा, यथामत: a version n. the original; next to the driver or drivers अल्याडचा, खालाकडला: the n. ox; direct सरळ, नीट (road); close-fisted चिकट, हाताचा जड [to].—*ad.* जवळ, समीप, निकट, आरता: come n. me; almost बहुतकरून, जवळ, प्रायः [to].—*v.* -च्या जवळ येणें; अधिक अधिक जवळ येणें.—*i.* जवळ येणें.—*prep.* जवळ, नजीक [to]. -LY *ad.* जवळ; जवळच्या नात्याचा, जवळचा; बहुतकरून, प्रायः; within a little थोडक्यांत; कृपणपणानें. -NESS जवळपणा, समीपता *f*, सान्निध्य *n*; जवळचें नातें *n*, जवळचा संबंध, परिचय, स्नेह; बारीक नजर *f*, चिकटपणा, कार्पण्य *n*. -SIGHTED *a.* जवळच्या नजरेचा, गजनेत्री.

NEAT* गुरें ढोरें *n pl*.

NEAT *a.* (*nitidus*) clean चकपक, ठाकठीक, नीटनेटका; chaste सुरेख, नीटनेटका, सुघटित

डौलदार (dress, style); free from admixture निरा, शुद्ध, निर्भेळ (wine); adroit पक्का, बिलंद, पटाईत (thief); net निवळ, निक्का (profit). -LY ठाकठिकीनें, चाकचोपीनें. -NESS ठाकठिकी *f*, चकपक *f*; साजरेपणा, नेटकेपणा, निटाई *f*; सफाई *f*, खुमास *f*, सुरेखी *f*.

NEBULA (*L.*, *Skr. nabhas*, sky) तारासमूह; white spot, or slight opacity of the cornea पडदा, भुरी *f*, शुक्लपटल *n*.—NEBULOUS *a*. मेघाच्छादित, अंधारी आलेला.

NECESSARY *a*. (*necesse*) such as must be आवश्यक, अनिवार्य; death a n. end; requisite अगत्याचा, गरजेचा, आवश्यक, पाहिजे: a certain kind of temper is n. to the pleasure of our minds; acting from necessity दैवाधीन, दैवपर: whether man is a n. or free agent is a question much discussed; is n. पाहिजे, व्हावा; was n. पाहिजे होता; to be n. लागणें, पाहिजे [to, for]. —*n*. अगत्याची गोष्ट *f*; *pl* साहित्य *n*, सामोग्री *f*; n. of life अन्नपाणी *n*, अन्नवस्त्र *n*, पोटगी *f*; privy शेतखाना, शौचकूप.—NECESSARIAN, NECESSITARIAN, one who advocates the doctrine of philosophical necessity अदृष्टवादी, दैववादी.—NECESSARILY *ad*. अगत्यपूर्वक, आवश्य, आवश्यमेव; दैववशें करून, दैवाधीनतेनें.—NECESSITATE *v*. अवश्य -भाग पाडणें, प्राप्त क.; oblige बलात्कार -जुलूम क.—NECESSITOUS *a*. आवश्यक, जरुरीचा; pinching अडचणीचा, तंचाईचा, कंगाल (circumstances).—NECESSITY गरज *f*, जरूरी *f*, आवश्यकता *f*; indigence दारिद्र *n*, तारांबळ *f*, अनुपपत्ति *f*; a requisite गरज *f*, अगत्य *n*, प्रयोजन *n*; *pl* साहित्य *n*, सामोग्री *f*; fatality दैवाधीनता *f*, दैव *n*; to yield to n. काळावर दृष्टि ठेवून जाणें; n. has no law भुकेलें गुरूं वळचण ओढतें.

NECK* मान *n*, गरदन *n*;—of a vessel गळा; —of land पट्टी *f*; to turn out n.-and-crop पाळेंमुळें खणून टाकणें; on the n. of पाठोपाठ, पाठीवर; stiff n. हट्ट; to break the n. of मान मोडणें; to harden the n. कठीण मन क., हट्टी होणें. -CLOTH गळेबंद, कंठवस्त्र *n*. -LACE माळ *f*, कंठमाळा *f*, हार; kinds of गरसळी *f*, सरी *f*, कंठी *f*, &c.

NECROMANCY (*Gr. nekros*, a dead body, *menteia*, divination) the art of foretelling future events by communication with the dead पिशाचविद्या *f*, प्रेतसिद्धि *f*, कुविद्या *f*.—NECROMANCER स्मशानमंत्र जपणारा, प्रेतसिद्धिकर्त्ता.

NECTAR (*L.*) drink of the gods अमृत *n*, सुधारस; honey and other sweetish secretions of the glands of plants मधु *n*, मद, मकरंद.—NECTARY पुष्पांतील मधूची जागा *f*.—NECTARIAN *a*. अमृततुल्य, सुधामय.

NEED*, state that requires supply or relief गरज *f*, जरूरी *f*, अगत्य *n*; poverty गरीबी *f*, तारंबळ *f*, अनुपपत्ति *f*; to supply one's n. गरज क. -चालवणें.—*v*. गरज असणें -लागणें —*i*. पाहिजे, नको; for this word, as an auxiliary, पाहिजे is a good rendering and with negative construction नको: वाघ आला तर भ्यालें पाहिजे, शेळी आली तर भ्यायास नको. -FUL *a*. जरुरीचा, आवश्यक; गरजवंत, गिरिपदार. -LESS *a*. निष्कारण, निरर्थक [for, to].—NEEDY *a*. गरीब, कंगाल, महाग; n. of food अन्नास महाग.

NEEDLE*, a small pointed instrument for sewing सुई *f*; a small steel pointer in a mariner's, surveyer's, or other compass होका इ॰ यंत्राचा कांटा; eye of a n. नेडें *n*, नाक *n*; point of a n. सुईचें टोंक *n*, सूच्यग्र *n*. -WORK शिवणकाम *n*; embroidery कशीदा.

NEFARIOUS *a.* (*nefas*, impious) अति दुष्ट, महापातकाचा, अघोर.

NEGATION (*negare*, to say no) act of denying नाकार, अस्वीकार, निषेध; *Logic.* आभाव; universal n. संसर्गाभाव; relative n. अन्योन्याभाव.—NEGATIVE *a.* निषेधाचा, नकाराचा, नचा; opposed to positive अभावसूचक -रूप; having the power of stopping बंद करण्याच्या शक्तीचा, निषेध द्वारां प्रतिबंधक (voice); *Alg.* ऋण.—*n.* नाकाराचा शब्द, निषेधार्थक शब्द; proposition by which something is denied नास्तिपक्ष, आभावपक्ष, निषेधसूचक पक्ष; withholding of ascent निषेधशक्ति *f*, प्रतिबंध सामर्थ्य *n.*—*v.* नाहीं ह्मणून बंद क., निषेध क.; disprove खोटा करून दाखविणें. -LY *ad.* नाहीं ह्मणून, नकारानें; नास्तिपक्षानें, निषेधपक्षानें.

NEGLECT *v.* (*nec*, not, *legere*, to gather) not to treat with due attention हयगयी -अनास्था -आळस क., विसरणें; slight उपेक्षा -अनमान -अव्हेर क. [of].—*n.* उपेक्षा *f*, हयगयी *f*; अव्हेर, हेलसांड *f*; omission of civility अनादर, अवज्ञा *f*. —NEGLIGENCE गाफीलपणा, हयगयी *f*, प्रमाद; उपेक्षा *f*, अव्हेर; a negligent act गफलत *f*, चूक *f*. —NEGLIGENT *a.* गफलती, गाफील, विसराळू; उपेक्षा -अव्हेर करणारा [of]. -LY *ad.* हयगयीनें, गाफीलपणानें; उपेक्षापूर्वक, अनमान करून.

NEGOTIATE *v.* (*nec*, not, *otium*, leisure) procure by mutual intercourse and agreement परस्पराच्या अनुमतानें मिळविणें; sell विकणें.—*i.* transact business वहिवाटणें, काम चालवणें; hold intercourse with another respecting a treaty, league, or convention तहाचें वगैरे बोलणें चालवणें -लावणें, -बोलाचाली क. [for, with].—NEGOTIATION बोलणें चालणें *n*, घडवाघडव *f*, बोलीचाली *f*; trading देवघेव, उदीम, व्यापार; transaction of business between nations व्यापार; mutual intercourse of governments by their agents, in making treaties, &c. तह वगैरेचें बोलणें *n*, पैगम. —NEGOTIATOR बोलणें चालणें करून घडविणारा, वकील, कारभारी; दलाल, विकरी करून देणारा;—of matrimonial alliances घटक. —NEGOTIABLE *a* वहिवाटायाजोगा; चालविण्या -विकण्याजोगा (a note).

NEGRO *Port.* सिद्दि, हबशी.—NEGRESS हबशीण *f*, सिद्दीण *f*.

NEIGH* *v.* खिंकाळणें, हिसणें.

NEIGHBOUR* person who lives near one शेजारी; one of the human race मनुष्य, माणूस; female n. शेजारीण *f*.—*a.* जवळचा, शेजारचा.—*v.* -च्या जवळ असणें -राहणें. -HOOD शेजारीपणा, शेजारपणा; vicinity शेजार, जवळचा प्रदेश; inhabitants who live in the vicinity of one another शेजारीपाजारी *pl*, अडोशीपडोशी *pl*; the law of n. शेजारधर्म; from the n. शेजारून; in the n. शेजारीं, आसपास; village in the n. of भोंवरगांव. -ING *a.* जवळचा, आसपासचा, शेजारचा. -LY *a.* शेजारधर्मास योग्य, शेजारधर्माचा, भाईबंदीचा.—*ad.* शेजारधर्मानें, भाईचारानें.

NEITHER* *pron.* or *a.* कोणताही नाहीं, एकही नाहीं.—*conj.* आणिही नाहीं.

NEOLOGY (*Gr. neos*, new, *logos*, word) भाषेंत नवीन शब्द चालू करणें *n*, नूतन शब्दसेवन *n*; new doctrine नवें मत *n*, नवा उपदेश.

NEOPHYTE (*Gr. -phoutos*, grown) नवा शिष्य; नवा झालेला खिस्ती; नूतनअभ्यासी, नवा शिष्य, नवशिक्या.

NEPHEW* (*Skr. naptri*) son of a brother पुतण्या;—of a sister भाचा.—NEPOTISM

भाचे व पुतणे यांजवरची ममता *f*; undue attachment to relations आप्तांचा ओढा.

NERVE (*nervus*) physical force शरीराची बळकटी *f*, जोर *n*; organ of sensation and motion in animals ज्ञानतंतु, मज्जातंतु; firmness of mind धीर *n*, धैर्य *n*; to strain every n. दांतीं बळ धरणें, जोर मारणें, अंग मोडून श्रम क. -खपणें.—*v.* जोर देणें -आणणें: fear *nerved* his arm [with]. -LESS *a.* निर्बळ, दुर्बळ, पोचट.—NERVOUS *a.* मज्जातंतूचा, मज्जातंतुसंबंधी; characterized by strength in sentiment or style कडकडीत, कटावाचा (writer); मज्जातंतूच्या विकाराचा (fever); weakly अशक्त, भित्रा, कंपशील. -NESS बळकटी *f*, जोर;—of a composition, speech, &c. कटाव.

NEST* (*Skr. níḍa*) place in which birds hatch and rear their young कोटें *n*, घरटें *n*; abode, as of thieves, &c. आखाडा, घर *n*, अड्डा; to feather one's n. घर भरणें, उखळ पांढरें क.—*v. i.* कोटें-घरकुंडा करून राहणें.—*t.* कोट्यांत घालणें; -च्या करितां कोटें क. —NESTLE *v.* पाळणें, लालनपालन क.; घरकुंडा करून राहणें.—*i.* सुखेंकरून नांदणें, सुखवास क. [in].—NESTLING घरकुंड्यांतलें पिलूं *n.*

NET* instrument for catching birds and fish, or wild beasts जाळें *n*, पाश; snare सांपळा, पाश, जाळें *n*;—to carry or hold fruit अखी *f*, अखा. -WORK जाळीचें -जाळीदार -खिडकीदार काम *n.*

NET *a. F.* निवळ, निका, ठाम.

NETHER* *a.* खालचा, खालला. -MOST *a.* सर्वांखालचा.

NETTLE* खाजकोलती *f* -कुयली *f*.—*v.* चिथवणें, संतापविणें. -RASH पित्ताच्या बारीक गांधी *pl*, पित्तांबी *f*, उदर्द.

NEURALGIA (*Gr. neuron*, nerve, *algos*, pain) a disease, the chief symptom of which is very acute pain exacerbating or intermitting, which follows the course of a nervous branch, extends to its ramifications, and seems therefore to be sealed in the nerve चंचलवायु.

NEUTER *a.* (*ne*, not, *uter*, either) मध्यस्थ, तिऱ्हाईत, उभयपक्षा वेगळा; *Gram.* नपुंसक (gender); अकर्मक (verb).—*n.* तिऱ्हाईत, उदासीन; animal of neither sex हिजडा, हिजडी *f*, हिजडें *n*, षंढ.—NEUTRAL *a.* उदासीन, तिऱ्हाईत; neither very good nor bad मध्यम, सरासरी. -ITY मध्यस्थपणा, तिऱ्हाईतपणा. -IZE *v.* निःशक्त -निर्वीर्य क.; destroy the effect or peculiar properties of मारणें, गुण -धर्म नाहींसा क.

NEVER* *ad.* at no time कधीं नाहीं; not in the least अगदीं नाहीं; not नाहीं; n. before पूर्वी कधीं नव्हता; n. so कसाही. -THELESS *ad.* तरी, तथापि, तत्रापि.

NEW* *a.* (*Skr. nawas*) having existed, or having been made but a short time नवा, नवीन, ताजा (coat, book); strange नवखा, अपूर्व, नवा (metal); starting anew नवसर, आरंभीचा, नुकताच चालू झालेला; said of anything that recurs periodically (week, moon, year); not ancient नव्या काळचा, नूतन (man); not worn out नवाच, न वापरलेला, कोरा; not habituated नवा, अनोळखी, अपरिचित, अनभ्यस्त; newly come नवा आलेला; n. land नवेंरान *n*, n. moon अमावास्या *f*. -ISH *a.* नवट, कांहींसा नवा. -LY *ad.* नवा, नुक्ता; नव्यानें, नव्या रीतीनें; with a new form नव्या रूपानें, नव्या डौलानें. -NESS नवेपणा, नवेंपण *n*, ताजेपणा; recent change नवा फेरफार; want of practice अनभ्यास, अपरिचय. —NEWS, recent account ताजी -नवी बातमी *f* -खबर *f*; tidings समाचार, बातमी *f*,

वर्त्तमान *n*; any n.? कांहीं नवल विशेष? -MONGER बात्या, गप्पीदास, खबऱ्या. -PAPER वर्त्तमानपत्र *n*.

NEXT* *a*. nearest in place अगदीं जवळचा, बाजूचा; nearest in time जवळचा; adjoining in a series -च्या मागला, दुसरा, लागोपाठचा; nearest in degree, rank जवळचा; the n. world परलोक; n. time दुसऱ्या खेपेस -वेळीं [to].—*ad*. नंतर [to].

NIB* point टोंक *n*, अग्र *n*; bill of a bird चोंच *f*; —of a pen लेखणीचा टांक; handle of a scythe विळ्याचा दांडा -ची मूठ *f*. -BLE *v*. कुरतुडणें, कुरकुटणें.—*i*. डसणें, चावणें; find fault दोष लावणें, नांव ठेवणें [at].

NICE *F*. *a*. delicious गोड, रुचिकर, मिष्ट; agreeable आवडता, मनोरम, चांगला, रम्य (party); wrought by skilful workman नाजूक, कळाकुसरीचा, बारीक (point); characterized by exactness सुती, रेखला, बराबर, तंतोतंत (proportion); overscrupulous खंतखोर, कांक्षिखोर; apprehending slight differences बारीक पाहणारा, सूक्ष्मदर्शी, कुशाग्रबुद्धि. -LY *ad*. बारीक दृष्टीनें; चांगला, सुंदर, खूप, नीट: a feat is n. done. -TY बारीक दृष्टि *f*, सूक्ष्म शोध; खंत *f*, कांक्षा *f*; बारकाई *f*, सूक्ष्मता *f*; गोडी *f*, चव *f*, लज्जत *f*; मिजास *f*, नाजकाई *f*, नाजुकपणा; टापटीप *f*, चापचोपी *f*; खुमास *f*, खुबी *f*, छान *f*, सुंदरपणा; delicate management युक्ति *f*, कौशल्य *n*, लाघव *n*; a delicacy खाण्याचा नाजूक पदार्थ, पक्वान्न *n*, चीज *f*, मेवा मिठाई *f*.

NICHE *F*. कोनाडा, देवळी *f*.

NICK *Icel*. ऐनवेळ *f*, अणीबाणी *f*, संधि *f*.—* कोनाडा, करकोंचा, पावडा; *Print*. कातरा, सड. —*v*. कातरे -सड पाडणें; fit into बसविणें, जमविणें, जम बसविणें.

NICKNAME *F*. & *E*. ढोंगमताचें नांव *n*, उपाधिनाम *n*.—*v*. निंदेचें नांव देणें -ठेवणें.

NIECE *F*. daughter of a brother पुतणी *f*; —of a sister भाची *f*.

NIGGARD *Ger*. कृपण मनुष्य, मारवाडी.—*a*. किरमाडी, हाताचा जड, कवडीचुंबक. -LY *a*. कृपण, किरटा, दृढमुष्टि; sparing अल्पव्ययी, बारीक दृष्टीचा, काटकसऱ्या.

NIGH* *a*. near जवळचा, समीपचा; intimate सलगीचा, स्नेहाचा [to].—*ad*. जवळ, समीप; almost बहुतकरून [to].—*prep*. जवळ [to].

NIGHT* (*Skr*. *nakta*) time from sunset to sunrise रात्र *f*, रात *f*; darkness अंधार; ignorance अज्ञानांधःकार, अज्ञानतिमिर; adversity विपत्ति *f*; death मरण *n*; in the n. अकस्मात्, एकाकीं; to-n. आजरात्रीं, रात्रीं; day and n. अहोरात्र *f*; sitting up at n. जागरण *n*, उजागरा. -CAP निजतांना घालायाची टोपी *f*. -CART हलालखोराची गाडी *f*. -FALL सायंकाळ, प्रदोष. -FIRE भूतकोलीत *n*. -INGALE the Indian n. बुलबुल, बुलबुलपक्षी. -LY *a*. रात्रीचा, रात्रीचे वेळेचा; प्रतिरात्रीचा.—*ad*. रात्रीं, रात्रीस. -MARE a sensation in sleep as of the pressure of a weight on the chest or stomach, and of an impossibility of motion, speech or respiration, from which one wakes after extreme anxiety, in a troubled state of mind कुस्वप्न *n*, अजीर्णप्रयुक्त स्वप्न *n*. -SHADE—the prickly रिंगणी *f*;—the Malbar मयाळ *f*. -WALKING झोंपेंत चालणें; बदकामा करितां रात्रीं रस्त्यांत फिरणें.

NIHILITY (*nihil*, nothing) नाहींपणा, नास्तित्व *n*, शून्यता *f*.

NIMBLE* *a*. चपळ, चंचळ, अंगचपळ.—NIMBLY *ad*. जलदीनें, चलाखीनें.

NINE* *a*. (*Skr*. *navam*) नऊ. -FOLD *a*. नऊपट. -TEEN *a*. एकोणीस. -LY *a*. नव्वद. —NINTH *a*. नववा.—*n*. नवमांश.

NIP* *v*. pinch चिमटा घेणें; remove by pinching खुडणें, खुटणें; cut off the end of बो-

खडणें, बोखे तोडणें; destroy नासणें, मोडणें; —as by frost करपवणें, जाळणें; to be *nipped* करपणें [off].—*n.* चिमटा. -PERS *pl.* चिमटा, गाशी *f.*

NIPPLE* स्तनाची बोंडी *f,* कुचाग्र *n.*

NIT* लीख *f,* ऊचें अंडें *n.*

NITRE (*Gr. nitron*) सोरा; n. of potash यव-क्षार;—of silver काडीखार. -NITROGEN a gaseous element, forming nearly four-fifths of common air, and incapable of supporting life नैत्रोजिन वायु. -NITROUS *a.* सोऱ्याचा, सोऱ्यासारखा.

NO* *ad.* (*Skr. na*) नाहीं.—*a.* कोणी नाहीं, कांहीं नाहीं.—*n.* नकार; a negative vote नकार-संमति *f.* -BODY कोणी नाहीं. -WAY *ad.* कोणत्याही प्रकारानें नाहीं, कसाहीं नाहीं. -WHERE *ad.* कोठेंही नाहीं.

NOBLE *a.* (*nobilis*) exalted मोठा, थोर, उमदा, प्रगल्भ (heart); grand भव्य, उत्कृष्ट, आ-लीजाहा, नामी (edifice); high-born कुलीन, मोठ्या कुळांतला, नामदार (personage);—as metals, &c. अशराफ *Hind.*—*n.* -HEARTED *a.* उदार मनाचा, महामनस्क. -MAN उमराव, बडालो-क, अमीर उमराव.—NOBILITY कुलीनपणा, खान-दानी *f*; dignity of a nobleman अमीरी *f*; those who are noble बडे लोक *pl*, अमीर लोक *pl.*—NOBLY *ad.* मोठ्या मनानें; splendidly छानदारीनें; मोठ्या कुळांत जन्मलेला (born).

NOCENT *a.* (*nocere,* to hurt) अपकारक, अप-कारशील, बाधक (qualities).

NOCTURNAL *a.* (See NIGHT) रात्री संबंधी, रा-त्रीचा; रात्रीं अन्न मिळविणारा, रात्रीं अन्न मि-ळविण्याच्या संवयीचा (birds).

NOD *v. i. W.* incline the upper part with a quick motion झुलणें, झुकणें; incline the head with a quick motion डोकें-मान हलविणें -डोलवणें; be drowsy डुकल्या खाणें [to].—*i.* डोलवणें, हलवणें; signify by a nod मान डोलवून खुणावणें, खुणावणें; make a motion of assent, or of salutation मान डोलवणें, मान्य होणें; सलाम क.—*n.* झोका, हेलकावा; डुकली *f*; खूण *f,* इशारत *f,* शिरसंकेत.—NODDLE टाळकें *n,* डोकें *n,* नारळ.

NODE (*nodus*) knot गांठ *f*; *Med.* a swelling सूज *f*; *Astron.* उपग्रह; ascending n. राहु; descending n. केतु.

NOISE (*noxa,* hurt) sound आवाज, ध्वनि, शब्द, नाद; clamor कल्ला, गलबा; frequent talk गवगवा; to make a n. in the world नांव -कीर्त्ति गाजविणें, नांवाचा डंका वाजविणें; to make a n. about हाकाटी क.—*v.* गाजवणें, बोभाटा क.; to be *noised* abroad गाजणें, वाजणें. [about].—NOISOME *a.* अपकारक, बाधक (winds); disgusting कंटाळवाणा; offensive to the smell दुर्गंध, हिडीस, घाणेरडा. [to].—NOISY *a.* मोठ्या शब्दाचा, महानाद; गलबल्याचा, दणक्याचा, कडाक्याचा (procession); full of noise गजबजीत, गजगजीत, गाजता (town).

NOMAD (*Gr. nomos,* pasture) कुरणासाठीं हिंडत फिरणाऱ्या लोकां पैकीं.—& -IC *a.* पशु-चारणजीवी.

NOMENCLATURE (*nomen,* name, *calare,* to call) a dictionary शब्दकोश; terminalogy पारिभाषिक शब्दकोश.

NOMINAL *a.* (See NAME) नांवाचा, नामसंबं-धी; existing in name only नांवाचा, केवळ नांवाचा, नामधारी, नांवापुरता.—NOMINATE *v.* नांव ठेवणें; appoint नेमणें, नेमणूक क. [for].—NOMINATION नेमणें *n,* नेमणूक *f*; power of nominating नेमण्याचा अधिकार, नियोजना-धिकार.—*n. Gram.* प्रथमा *f,* कर्ता [for]. —NOMINATOR योजणारा, नेमणारा.—NOMINEE नेमलेला, नियोजित, नियुक्त.

NON-ACCEPTANCE अस्वीकार, अपरिग्रह.

NON-AGE बालदशा *f*, अप्रौढदशा *f*.

NON-ATTENDANCE गैरहजिरी *f*, अविद्यमानता *f*.

OVER* *prep.* (*Skr. upari*) above वर: clouds o. head; across पार, पलीकडे, वर: a dog leaps o. a stream; upon the whole surface वरून, वर, भर: to wander o. a field; above, denoting superiority अधिक, आगळा, वर: the advantages which the Christian world has o. the heathen; advantage o. प्राधान्य *n*, वर्चस्व *n*, अधिकत्व *n*, प्रमुखता *f*; above in authority वर (Gen. xli., 40); with care काळजीनें; वर (Ps. cxlv., 9); during the whole time वर, भर, साद्यंत: to keep any thing o. night; above the top of वर, वरून: the water is o. the shoes.—*ad.* from side to side अधिक, पार; on the opposite side पलीकडे, पार: the boat is safe o.; from one to another by passing एकाकडून दुसऱ्याकडेस: to deliver o. goods to another; from one country to another, by passing एका देशाहून दुसऱ्या देशास: to carry any thing o. to France; above the top वर, शिखरावर, वरून, भरून (Luke vi., 38); beyond a limit अधिक, आगळा (Ex. xvi., 18); throughout पार, सगळा, साद्यंत; to read o. a book; o. again फिरून, दुसऱ्यानें; o. against समोर, सन्मुख; o. and above अधिक, आगळा; to be o. राहणें, उरणें; to give o. सोडणें, पुरे क.; आशा सोडणें.—*a.* वरचा: o. shoes. -ACT *v.* अधिक -अतिशय क. -AWE दाब, दरारा, धाक.—*v.* धाक बसविणें -घालणें. -BALANCE उपराळा.—*v.* अधिक वजन होणें. -BEAR *v.* दाबणें, दपटणें. -BEARING *a.* दपटणारा; tending to repress or subdue by insolence दांडगाईचा, उदमस्तीचा. -BOARD *ad.* गलबताच्या बाजूवरून पाण्यांत. -CAST *v.* झांकणें, आच्छादणें, धुंद क.; to rate too high अधिक किंमत क. -CHARGE *v.* अधिक ओझें घालणें; fill with too much powder and ball, as a gun अधिक -जास्ती बार भरणें; make an excessive charge against -च्या हिशेबांत अधि

मोल -किंमत -खर्च सांगणें -मांडणें -लिहिणें. -COME *v.* subdue जिंकणें, पराजय क.; surmount पार पाडणें, खालीं घालणें, मोडणें. —*i.* जय मिळविणें. -DO *v.* अधिक क.; fatigue दमविणें, भागविणें; boil, bake, or roast too much अधिक उकडणें -शिजविणें -भाजणें. -FLOW *v.* बुडवणें, जलमय क.—*i.* वरून -उफाटून चालणें -वाहणें, वरसांड होणें. -GROW *v.* वाढून -रुजून व्यापणें -व्यापून टाकणें; grow beyond -हून किंवा -पेक्षां वाढणें. -GROWN *a.* पुष्कळ -फार वाढलेला. -HAUL *v.* draw over वर ओढणें, वरून ओढणें; turn over for an examination चाळून -शोधून पाहणें, धुंडणें; examine again पुनः पाहणें -शोधणें. -HEAR *v.* सहज ऐकणें, कानीं पडणें, बोलणारास नकळतां ऐकणें -ऐकूं येणें. -HEAT *v.* फार तापविणें. -JOY अत्यानंद, परमानंद. -JOYED अत्यानंदी [with]. -LAND *a.* जमिनीवरचा, खुश्कीचा (journey). -LAY *v.* cover superficially मढवणें, मढणें; smother with close covering पांघरूण घालून गुदमारणें -घुसमटवणें (an infant); overcast झांकणें, धुंद क.; press दडपणें, दाबणें [with]. -LEAP *v.* पार उडणें. -LOAD *v.* अधिक ओझें घालणें -लादणें. -LOOK *v.* -च्या उंच -वर असणें: to o. the sea; inspect देखरेख -चवकशी क. -ठेवणें; pass by वगळणें, गाळणें; pardon पोटीं घालणें, क्षमा क.; to look o. the shoulder of खांद्यावरून पहाणें. -MUCH *a.* अतिशय, पुष्कळ, फार.—*ad.* फारच, अतिशय. -NIGHT अवशेची रात्र *f*; last night कालची रात्र *f*. -PASS *v.* पार -उतरून जाणें; overlook अंतरणें, उपेक्षणें. -PERSUADE *v.* बळेंच -भीड घालून समजावणें, गळघालणें. -PLUS उरवण *f*, शिलक *f*, उपराळा. —*a.* उरलेला, फाजील, अवशिष्ट. -POWER *v.* जिंकणें, पाडणें, चालेनासा क.; affect with power that cannot be borne व्याकूळ क., जेरीस आणणें [with]. -RATE. -PRIZE *v.* किंमती -योग्यतेपेक्षां अधिक मानणें. -REACH *v.* फसवणें, डोयीवरून हात फिरवणें, ठकवणें; पलीकडे -पार पोंहचणें. -RIDE *v.* ride beyond the strength of the horse शक्तिपलीकडे घोड्यास दामटणें; trample down पायाखालीं तुडवणें, उपमर्द क.; annul रद्द क.: this law *overrides* all previous acts. -RULE *v.* अधिकाराच्या बळानें चालवणें; *Law,* annul रद्द क., मागें सारणें. -RUN *v.* व्यापणें, भरणें, वेढणें; overcome by invasion स्वारी करून जिंकणें; outrun धांवण्यांत मागें टाकणें, अटपून मागें टाकणें. -SEE *v.* देखरेख -चौकशी क. -SEER देखरेख -चौकशी करणारा, चौकस्नीस, 'ओवरसियर.' -SET *v.* उपडा -पालथा क.; subvert मोडणें, लयास नेणें, पाडणें. -SIGHT देखरेख *f*, चौकशी *f*; an overlooking नजरचूक *f* -भूल *f*, दृष्टिदोष. -SLEEP *v.* अति झोंप घेणें. — *i.* फारवेळ निजणें. -SPREAD व्यापणें, वेढणें, ग्रासणें, आच्छादणें, भरणें. -STEP उलंघन-आक्रमण क. -STOCK *v.* अधिक -जास्त बेगमी क., भरपूर भरून ठेवणें, भरपूर क. -TAKE *v.* अटपणें, गांठणें; catch धरणें; take by surprise अकस्मात -एकाएकीं गांठणें -येऊन पडणें [by, with]. -TASK *v.* अधिक काम सांगणें, जिवाआगळें काम सांगणें. -THROW *v.* upset उलथा -पालथा क.; defeat utterly पाडाव -पराभव क., मोडणें, मारणें, बुडविणें, नाश -विध्वंस क.—*n.* मोड, पराजय, पाडाव; नाश, भंग, विध्वंस. -TURN, See OVERTHROW.—*i.* उलंडणें, कलथणें. -VALUE, See OVERRATE. -WEENING *a.* पत्राजीचा, फुशारकीचा. -WHELM *v.* crush underneath चिरडणें, दडपणें, दाबून टाकणें; immerse and bear down गर्क -गडप क. -WISE अतिशाहणा. -WORK *v.* शक्तिपलीकडे -जिवापलीकडे काम क. -करून घेणें, फार राबणें -राबवणें, भुसडा पाडणें. -WROUGHT *a.* अति संस्कृत -परिष्कृत; कामानें भरलेला: o. with gold भरजरी. -ZEALOUS *a.* अत्युत्कंठित, अत्यासक्त.

OVERT *a.* (*operire,* to cover) उघड, राजरो-

शीचा, प्रसिद्धपणाचा. -URE proposal उद्गू, बोलणें *n*; *Mus.* पूर्वरंग, प्रस्तावना *f*.

OVIFORM, See under OVAL.

OWE* *v.* be obliged or bound to pay कर्ज -देणें लागणें, ऋणी असणें, लागणें; be obliged for -विषयीं उपकारी -आभारी असणें [to].—OWING यायाचा, येणें, द्यायाचा, देणें; consequential -मुळें झालेला -आलेला; in comp. मूलक, प्रयुक्त, चा : the fever is o. to fasting; imputable as to an agent चा, योगानें, योगें : his recovery is o. to his physician [to].

OWL* घुबड *m n*.

OWN *a. O. E.* belonging to चा; my o. माझा; peculiar खासगत, पदरचा, आत्म, स्वीय, स्व; o. office, duty स्वकर्म *n*, स्वधर्म; o. advantage स्वार्थ, आत्महित *n*; one's o. secret गूज *n*.—*v.* hold as property मालकी -सत्ता असणें, धनीपणा ठेवणें; acknowledge possession of अंगीकारणें, पत्करणें, आपला ह्मणणें : o. me for your son; confess पदरीं घेणें, कबूल क. (a fault). -ER अंगीकारणारा; आपला ह्मणणारा; rightful proprietor धनी, मालक, मालधनी. -SHIP धनीपणा, मालकी *f*, स्वामित्व *n*.

OX* (*Skr. ukshan*) बैल, वृषभ.

OXYGEN (*Gr. oxus,* sharp, acid, *genein,* to bring forth) प्राणवायु, 'आक्सिजन.'

OYSTER*—the animal कालव *n*;—the shell शिंपला.

P

PABULUM (*L.*) food अन्न *n*, खाद्य *n*; fuel सरपण *n*.

PACE (*passus*) step पाऊल *n*, कदम *n*, पावडा; gait चाल *f*, पाऊल *n*, गति *f*; degree of celerity in walking चालण्याची चपळाई *f*;—of horses चाल *f*; some *paces* are सात्रक -तुरुक -टणक चाल *f*; to keep p. with पाऊल बरोबर टाकणें -चालवणें, कदम बराबर चालणें; running p. धांवचाल *f*.—*v. i.* चालणें, जाणें; मंदगतीनें चालणें, हळू चालणें, पाऊल टाकीत -मोजीत चालणें; चालीनें चालणें.—*t.* पावलें घालून मोजणें.

PACIFIC *a.* (*pax, pacis,* peace, *facere,* to make) सामदामाचा, सामोपचाराचा, सामोपचारक (words); शांत, शांतीचा, स्वस्थतेचा (state). -ATION शमन *n*, उपशमन *n*, शांति *f*; समेट, संधिकरण *n*; कलहशांति *f*, मिलाफ, संधि.—PACIFY *v.* calm शांतवणें, सांतवन क.; restore peace to स्वस्थ -स्वस्थता -शांति क., थंड क.: to p. countries in contention [with].

PACK *Ger.* bale गट्ठा, बस्ता, गाठोडें *n*;—of cards गंजिफा, जोड;—of hounds झुंड *f*, कळप;—of thieves चांडाळचौकडी *f*, चोरांची टोळी *f* -चा गट.—*v.* stow away within दडपून भरणें, भरणें; place together and prepare for transportation बांधणें, आवळणें, बांधाबांध क.; compose by iniquitous collusion चांडाळचौकडी मिळविणें, संगनमत क.; dispatch घाईनें -लगबगीनें पाठवणें -फेंकणें, पिटणें.—*i.* -चा गट्ठा बांधणें -आवळणें; वाईट कामासाठीं जथणें; घाईनें -तडक -लगबग जाणें. -AGE गट्ठा, बस्ता, गाठोडें *n*; charge for packing बांधणावळ *f*. -CLOTH बासन *n*, वेष्टन *n*, लिफाप. -ET पुडका, पुडा, पुडकें *n*; dispatch -vessel डाकेचें गलबत *n*.—*v.* पुडका -पुडकें बांधणें -क.; डाकेच्या गलबतांतून पाठविणें. -HORSE पडताळ्याचा -कंठाळीचा तट्टू, पाठाळ *n*. -ING दट्टया; *Masonry* भर *f*. -NEEDLE दाभण. -SADDLE मूठ *f*, खोगीर. -THREAD सुतळी *f*, सडा.

PAD* road पायवाट *f*; easy-paced horse नरम चालीचा घोडा; highway man वाटमाऱ्या.—(?) गादी *f*, तक्या; —for a horse खोगीर.—*v. i.* धिमेधिमे -हळूहळू चालणें.—*t.* पायानें चालणें, पायीं चालणें; trample तुड-

वणें; beat smooth or level ठोकून गुळगुळीत क., चोपणें [with].

PADDLE *Ger.* oar वल्हें *n*, हातवल्हें *n*; broad part of an oar चपणी *f*;—of a weapon मेख *f*.—*v. i.* वल्हें मारणें, वल्हवणें; play in water पाण्यांत डुबकणें -खेळणें; handle or finger about हातचाळा क., हातळणें.

PADDOCK* frog बेडूक; small inclosure under pasture वाडी *f*, वाडगें *n*;—for deer मृगशाला *f*.

PADLOCK* कुलूप *n*, टाळें *n*.

PAGAN (*paganus*, peasant) one who worships false gods खोट्या देवांची भक्ति करणारा; one who is neither a Christian, a Mohamedan, or a Jew मूर्त्तिपूजक. -ISM मूर्त्तिपूजकांचा धर्म, मूर्त्तिपूजा *f*.

PAGE (*pagere*, to make, compose, fix) पृष्ठ *n*, पान *n*.—(*Gr. pais*, a servant) हुजऱ्या, खासबरदार, खवास, अंतिक.—*v.* पानांवर -पृष्ठांवर अंकडा -मांडणें -घालणें.

PAGEANT* show तमाशा, खेळ; fleeting show पाण्यावरचा बुडबुडा, घटकेचें घड्याळ *n*, काजव्याचा उजेड; statue in show तमाशांतली बाहुली *f*, सागडबाहुली *f*.—*a.* थाटमाटाचा, शोभेचा, टामटुमीचा. -RY थाटमाट, डौल; तमाशा.

PAGODA *Per.* मूर्त्तीचें देऊळ *n*, देऊळ *n*; a coin होन.

PAIL* डोल, पीप *n*; to rain by *pails*ful मुसळधारा लागणें.

PAIN* punishment suffered or denounced शिक्षा *f*, दंड; bodily distress दुःख *n*, पीडा *f*, वेदना *f*; uneasiness of mind मनःपीडा *f*, क्लेश *pl*, दुःख *n*; labor कष्ट, श्रम, मेहनत *f*; throes of travail वेण *f*, तिडीक *f*, प्रसूतिवेदना *f pl*; *pains* of death मरणांत वेदना *f pl*; sharp, lancinating p. कळ *f*, तिडीक *f*, उसण *f*; acute p. शूळ; pungent p. चुरचूर *f*; shooting p. धमक *f*, चमक *f*; *pains* of hell यातना *f pl*, यमयातना *f pl*.—*v.* दुःख देणें; क्लेश -दुःख देणें, पीडा क. [with]. -FUL *a.* दुःखाचा, वेदनेचा; कष्टाचा, क्लेशाचा; requiring labor श्रमाचा, कठीण, मेहनतीचा (service) [to].

PAINT *v.* (*pingere*) color रंग देणें, रंगविणें; form in colors, a likeness of रंगानें चित्र काढणें, रंगाचें चित्र काढणें; depict वर्णण क., वर्णणें.—*i.* चित्र काढणें, चितरणें; तोंडास किंवा अंगास रंग लावणें: she *painted* half an inch thick. -ER चितारी, रंगारी. -ING रंगाचीं चित्रें काढणें *n*, चित्रलीपि *f*; रंग देणें *n*, रंगरेजी *f*; picture चित्र *n*, रंगित चित्र *n*; art of painting चित्रविद्या *f* -कर्म *n*.

PAINTER *Ir.* a rope at the bow of a boat पाग.

PAIR (*par*) couple जुळें *n*, जुळी *f*; two things suiting one another जोडा, जोडी *f*.—*v.* जोडणें, जोडी क.; जुळी -जुळें क.—*i.* जुटणें, जुळणें; जमणें, बनणें, जुगणें.

PALACE (*palatium*) royal house राजगृह *n*, राजवाडा, राजमंदिर *n*; splendid place of residence वाडा *n*, हवेली *f*, महाल.—PALATINE *a.* राजवाड्याचा, राजमंदिर संबंधी.

PALANQUIN *Hind.* पालखी *f*.

PALATE (*palatum*) roof of the mouth टाळू *f*, टाळा; taste रुचि *f*, लज्जत *f*; mental relish अभिरुचि *f*, आवड *f*.

PALE *a.* (*pallere*, to be or look pale) wan पांढरा, फिकुट, म्लान; light फिका, निस्तेज.—*n.** picket कठड्याचा गज; limit मर्यादा *f*, हद्द *f*; fence कुंपण *n*; limited territory प्रांत, समर्याद प्रदेश. -NESS फिकुटपणा, काळवंडी *f*; फिकेपणा, उभरंगपणा.—PALLID *a.* फिका, निस्तेज.—PALISADE कठडा, लकडीकोट.—*v.* कुडणें कठडा घालणें [round].

PALINDROME (*Gr. palin*, back, *dramein*, to turn) a word verse, or sentence that is the same when read backward or forward अनुलोम विलोम (शब्द, श्लोक इ०): *madam*.

PALL (*pallium*, cover) mantle शेला, उपरणा, उपवस्त्र *n*; large black cloth thrown over a coffin खेंडा, प्रेतवस्त्र *n*.

PALLET (*palea*, chaff) निजायाचें फटकूर *n*, गोदडी *f*.

PALLIATE *v*. (*palliare*) cover with excuse बाहणा सांगणें, निमित्त -सबब सांगून झांकणें, पांघरूण घालणें; mitigate हलका क., उपशमन क. [by].

PALM (*palma*) inner part of the hand तळहात, तळवा, करतल, हाताचा तळवा; [a measure of length equal to four inches]; a tree ताड; victory जय; branch or leaf of the palm ताडाची झावळी *f*, ताडपत्र *n*.—*v*. the hollowed p. खोबळा; the hollowed *palms* joined अंजुली *f*.—*v*. handle हातांत घेणें, हातबोट लावणें; conceal in the palm of the hand हातांत -मुठींत लपविणें; impose by fraud दगलबाजीनें घेवविणें -पदरीं बालणें, टोपि -गंडा घालणें [off]. -ER, -WORM सुरवंट, कुसरूड. -ISTER हात पाहणारा, हस्तसामुद्रिक. -ISTRY the pretended art or practice of divining or telling fortune by lines and the marks on the palm of the hand हस्तसामुद्रिक *n*; trick performed with the hand हातचलाखी *f*, हस्तलाघव *n*.

PALPABLE *a*. (*palpare*, to touch softly) perceptible by the touch स्पर्शगोचर, स्पर्श्य; plain स्पष्ट, उघड, प्रत्यक्ष; gross स्थूळ, वळघळीत, धडधडीत, ढळढळीत (error).

PALPITATE *v. i*. (*palpitare*) धडकी भरणें, धडधडणें, धगधगणें.—PALPITATION स्फुरण *n*, धुगधुगी *f*, धकधक *f*.

PALSY (See PARALYSIS) अर्धांगवायु, पक्षवायु.—PALSIED *a*. वारागेलेला, पक्षघाती.

PALTRY *a*. *Ger*. हलका, नुकसान, गैरी, नादान.

PAMPER *v*. (*pampinus*, a vine-leaf) खायास घालून माजवणें, लाड पुरवणें, पोसणें, धन पुरविणें [with].

PAMPHLET *F*. चोपडी *f*, वही *f*. -EER चोपड्या लिहिणारा.

PAN* shallow, open dish थाळा; part of a flint-lock which holds the priming that communicates with the charge काना, रंजकीचा पेला; the brain-pan कपाळ *n*, टाळकें *n*; frying-p. तवा, कढई *f*, इ०, तळणी *f*, 'फ्रैपान'; to flash in the p. रंजकविणें. -CAKE धिरडें *n*, ढेबरें *n*, मालपोवा इ०.

PANACEA (*Gr. pan*, all, *akeiomai*, to heal) remedy for all diseases त्रैलोक्य चिंतामणि, सर्वौषधीचूर्ण *n*.

PANCREAS (*Gr. -kreas*, flesh) a gland situated at the bottom of the stomach लिबलिब *n*.

PANDECT (*Gr. -decheomai*, to take) complete treatise on a science शास्त्रसंहिता *f*.

PANDER (*Gr.* from *Pandarus*) कुंटण्या, भडवा.—*v. i*. कुंटणगिरी क.

PANDICULATION (*pandere*, to spread out) आंगमोडा, आंगपिळा -पिळणी *f*.

PANE *F*. distinct compartment खण, पूड *n*; plate of glass भिंग *n*, तावदान *n*, ताव.

PANEGYRIC (*Gr. pan*, all, *aguris*, assembly) स्तुति *f*, प्रशंसा *f*, स्तोत्र *n*, गुणवर्णन *n*.—PANEGYRIST स्तुतिपाठक, स्तुति करणारा.

PANEL, PANNEL*, a board having its edges inserted in the groove of a surrounding frame कवाडांतला खण -चकला, लांकडी तावदान *n*; roll of the names of jurors पंचांचे नांवनिशीची याद *f*.

PANG* a momentary and violent pain तिडीक *f*, कळ *f*, वेण *f*; paroxysm of extreme distress दुःखाचें भरतें *n* -लहर *f*.

PANIC (*Gr. panikos*) धडकी *f*, हैबत *f*, धसका. —*a.* कल्पित, व्यर्थ (fear). -STRUCK *a.* धसका -धडकी बसलेला.

PANNEL (*pannus*, a cloth) खोगीर.

PANNIER (*panis*, bread) bread-basket रोवळी *f*; basket carried on a horse पेटारा.

PANT *v. i. W.* gasp धापणें, धापा देणें; be overpowered with eagerness, desire, or longing जीव टांगला असणें, नितांतणें.

PANTALOON *F.* इजार *f*, पायजामा.

PANTHEISM (*Gr. pan*, all, *theos*, a god) the doctrine that the universe, taken or conceived of as a whole, is God जगदीश्वरमत *n*, अद्वैतमत *n*.—PANTHEIST अद्वैतवादी.—PANTHEISTIC *a.* अद्वैतमताचा, अद्वैतमत संबंधी.—PANTHEON सर्वदेवालय *n*, सर्वदेवसभा *f*; a work in which all the divinities worshipped by a people are treated of सर्वदेवपुराण *n*; the whole body of divinities worshipped by a people एक देशाचे सर्व देव *pl*, देवगण. ?

PANTHER (*L.*; *Skr. pundarika*) बिब्यावाघ, बिबळ्यावाघ.

PANTILE (*pan & tile*) a tile with curved or hollow surface नळा.

PANTRY (*panis*, bread) फराळाची कोठडी *f*.

PAP (*papilla*) a nipple of the breast स्तनाग्र *n*, थानाची बोंडी *f*; teat स्तन *n*.—PAPILARY *a.* स्तनाग्र संबंधी.

PAP (*papa*) a soft food for infants मुलांची लापसी *f*; pulp of fruit गर, गीर. -PY *a.* बिलबिलीत, मऊ.

PAPA *L.* बा, बाबा, 'पापा.'

PAPAL *a.* (*papa*, the pope) पोपाचा, पोपा संबंधी; proceeding from the pope पोपापासून निघालेला, पोपाचा.—PAPACY पोपाचा अधिकार -चें राज्य *n*; line of the popes पोपांची माळका *f*, पोपावळी *f*, पोपपरंपरा *f*.

PAPAW *Malya*, पोपिया *f*, पोपै *f*.

PAPER (*papyrus*, paper reed) a substance formed into thin sheets for writing on कागद; a sheet of such substance कागद, ताव; an essay निबंध; document दस्तऐवज, कागद *n*; settlement p. व्यवस्थापत्र *n*; piece of paper कागद, कागदाचा तुकडा; newspaper वर्त्तमानपत्र *n*, कागद; bills of exchange, bank-notes, &c. हुंडी वगैरे कागदपत्र *pl*; hangings printed or stamped भिंती शृंगारण्याचे -ला लावायाचे कागद *pl*; waste p. रद्दी *f*, गबाळ *n*; clean p. कोराकागद; p. blank at the back पाठकोरा का.—*v.* कागद लावणें, कागदानें शृंगारणें, कागदानें मढवणें -झांकणें. -KITE वावडी *f*, पतंग.

PAR (*L.*) बराबरी *f*, समता *f*; to be at p. बराबर होणें.

PARABLE (*Gr. para*, beside, *ballein*, to throw) a fable or allegorical relation or representation of something real in life or nature, from which a moral is drawn for instruction दाखला, दृष्टांत, दृष्टांतरूप कथा *f*.—PARABOLICAL *a.* दृष्टांतरूप. -LY *a.* दृष्टांतानें, दृष्टांतेंकरून.

PARABOLA (*L.*) *Geom.* समकक्षछिन्न *n*.—PARABOLICAL *a.* बाणाकार.

PARADE (*parrare*, to prepare) pompous exhibition आव, थाटमाट, डौल; military display कवाईत *f*, 'परड' *f*; place where such display is held कवाइतीची -परडेची जागा *f*; procession मिरवणूक *f*, स्वारि *f*, यात्रा *f*, वरात *f*; to make empty p. डौल मिरविणें.—*v.* मिरवणें, डौल दाखवणें; कवाईत करवणें.—*i.* मिरवत जाणें, मिरवणें; कवाईत करण्यास मिळणें, -ची कवाईत होणें.

PARADIGM (*Gr. para,* beside, *deiknunai,* to show) *Gram.* उदाहरणार्थ लिहिलेलीं धातूचीं सर्व रूपें *n pl.,* धातुरूपमालिका *f.*

PARADISE (*Heb.; Skr. paradésa,* the best land) the garden of Eden, in which Adam and Eve were placed immediately after the Creation एदेन बाग; place of bliss सौख्यलोक *n,* आनंदभुवन *n* -लोक; heaven आकाश *n,* स्वर्ग.

PARADOX (*G. para,* beside, *doxa,* opinion) something false in appearance but true in fact जी गोष्ट खरी असून दिसण्यांत खोटी भासती ती *f,* असत्याभास.

PARAGON *F.* model कित्ता, नमूना; model by way of distinction, implying superior excellence धेंड *n,* प्रकरण *n,* प्रस्थ *n.*

PARAGRAPH (*Gr. para,* besides, *graphein,* to write) कलम *n,* प्रकरण *n;* new p. खेरीज कलम *n;* p. added as a postscript ताजाकलम *n.*

PARALLEL *a.* (*Gr. -allelon,* of one another) *Geo.* समांतर; like सारखा, सम, सदृश [to, with]—*n.* समांतररेषा *f;*—of latitude अक्षवृत्त *n;* सारखेपणा, बरोबरी *f;* comparison बरोबर पाहणें *n,* तुलना *f* [to].—*v.* समांतर क. -राखणें; उपमा -तुलना -बरोबरी क.; be equal to बरोबरीस उतरणें, बराबरी येणें, सम असणें. -OGRAM *Geo.* समांतरबाजूचौकोन *n,* दीर्घचतुरस्र *n.*

PARALOGISM (*Gr. -logos,* discourse) false argument अयुक्ति *f,* सिद्धांताभास, मिथ्या हेतु.

PARALYSIS (*Gr. -luein,* to loosen) अर्धांगवायु, पक्षवायु.—PARALYZE *v.* नबळेपणा आणणें, चलनवलनशक्ति नाहींशी क.—PARALYTIC *a.* अर्धांगीं वायु झालेला, पक्षघाती, वातरोगी, सुनबहिरा.?

PARAMOUNT *a.* (*par* & *amount,* upward) वर्चढ, श्रेष्ठ, प्रधान; p. sovereign सम्राट्.

PARAMOUR *F.* सोयरा, यार, जार.

PARAPET (*-pectes,* the breast) छातीएवढी भिंत *f,* बरवंडी *f.*

PARAPHERNALIA (*Gr. -pherne,* dowry) articles which a wife brings with her at her marriage, or which she possesses beyond her jointure, and which remain at her disposal after her husband's death स्त्रीधन *n;* ornaments अलंकार *pl,* भूषणें *n pl;* trappings मिरवणुकीचा पोषाक, साज.

PARAPHRASE (*Gr. -phrasein,* to speak) टीका *f,* व्याख्या *f,* विवरण *n.*—*v.* व्याख्या -टीका क.

PARASITE (*Gr. -sitein,* to feed) one who frequents the tables of the rich, and earns his welcome by flattery परान्नरुचि, परान्नपुष्ट, उंडीबकाल, तुकडमोड्या; *Bot.* a plant obtaining nourishment immediately from other plants, to which it attaches itself, and whose juices it absorbs बांडगूळ *n,* बांधें *n;* [*Zool.* an animal which lives during the whole or part of its existence on the body of some other animals, as lice, &c].—PARASATICAL *a.* खुशामती, आर्जवी; बांडगुळाचे जातीचा.

PARASOL (*F. parer,* to ward off, *L. sol,* the sun) बायकांची लहान छत्री *f,* अफताबी *f.*

PARBOIL *v. F.* अर्धकच्चा शिजवणें -रांधणें. -ED अर्धशिजा; as rice, pulse अर्धबोबडा.

PARCEL *F.* bundle पुडकें *n,* पुडा; portion गड्डा, पुड्डा, अंश, भाग; quantity रास *f,* ढीग; —of land ठिकें *n,* फाळी *f.*—*v.* वांटणें, वांटणी क. [out].

PARCH *v. Rus.* scorch भाजणें, हुरपळणें; shrivel with heat वाळवून चिरमुटणें; सुरकुत्या पाडणें; *parched* rice पोहे *pl;*—grams फुटाणे *pl.*

PARCHMENT (*pargamena*) skin of a sheep or goat dressed and rendered fit for writing on चर्मपट -पत्र *n.*

PARDON *v.* (*-donare*, to give) forgive क्षमा -माफी -माफ क.; remit सोडणें, सूट देणें : I p. thee thy life.—*n.* क्षमा *f*; माफी *f*, सूट *f*. मुक्ति *f*. -ABLE *a.* क्षमा करण्याजोगा, क्षम्य; सोडायाजोगा, मोचनीय [for].

PARE *v.* (*parare*, to prepare) cut off, as the extremities of a thing तासणें, छाटणें; —as an orange साळणें, सोलणें;—as a horse's hoof नख काढणें -कापणें [away, down, off].—PARING तासणी *f*, छाटणी *f*; shoe-makers p.-knife रांपी *f*.

PARENT (*parere*, to beget) a father or mother बाप किंवा आई *f*; source मूळ *n*, कारण, *n*, आई *f*, खाण *f*, बाप, योनि *f*: idleness is the p. of vice; *pl* आईबापें *n pl.* -AGE कुळी *f*, जन्म. -AL *a.* आईबापांचा; becoming parents आईबापांस योग्य; p. affection अपत्य -पुत्रस्नेह.

PARENTHESIS (*Gr. entithenai*, to put in) sentence inserted in a sentence कुंडलींतलें वाक्य *n*, प्रक्षिप्त वाक्य *n*; sign of a parenthesis ( ) कुंडली *f*.

PARHELION (*Gr. helios*, the sun) a mock sun or meteor, appearing in the form of a bright light near the sun मिथ्या सूर्य, सूर्याभास.

PARIAH (from Tamul *pareyer*, *parrior*, or Hind. *pahâriyâ*, a mountaineer) one belonging to the lowest and most despised class in parts of India परवारी, महार, धेड इ०; an outcast जातिभ्रष्ट [p. dogs, native dogs without masters or home].

PARISH (*Gr. oikos*, house) उपाध्याची पांढर *f*, -चा प्रदेश.—*a.* उपाध्याचे पांढरीचा; maintained by the parish उपाध्याच्या पांढरींतून ज्याचें पोषण होतें तो, पौरोहित्यप्रदेश प्रतिपाळित. -IONER पांढरींत राहणारा.

PARITY (*paris*, equal) सारखेपणा, समता *f*, साम्य *n*.

PARK*, inclosure for chase शिकारखाना, शिकारगा *H.*, क्रीडावन *n*, मृगयाभूमि *f*;—for walking, riding, &c. रमणा;—of artillery तोफखाना.

PARLEY *v. i. F.* converse संभाषण क.; confer with an enemy युद्धामध्यें शत्रूशीं बोलणें. [with, about].—*n.* संभाषण *n*, बोलाचाल *f*; शत्रूसीं सल्लयाचें वगैरे बोलणें *n*, सल्लयाचें भाषण *n*.—PARLIAMENT, the grand assembly of the three estates of the United Kingdom of Great Britain and Ireland 'पार्लमेंट' सभा *f*. -ARY *a.* पार्लमेंटाचा; पार्लमेंटानें ठरवलेला; पार्लमेंटाच्या रिवाजा प्रमाणें.

PARLOR (do.) बसायाची खोली *f*, दिवाणखाना.

PAROCHIAL *a.* (See PARISH) उपाध्येपणाचे देशाचा, पांढरीसंबंधी.

PAROLE *F.* word वचन *n*, शब्द;—of a prisoner of war युद्धांत धरलेल्या शत्रूचें वचन, *n*, कौल *n*, बोली *f*; *Mil.* इशारत *f*, इशारा. —& PAROL *a.* तोंडचा, मुखजबानी.

PARONYCHIA (*Gr.*) *Med.* नखरूड *n*.

PAROXYSM (*Gr. -oxus*, sharp) भरतें *n*, लहर *f*, उचल *f* (रोगाचें वगैरे).

PARRICIDE (*pater*, father, *cædere*, to kill) बाप किंवा आई मारणारा, पितृ किंवा मातृहत्या करणारा, पितृघ्न किंवा मातृघ्न.

PARROT *F.* रावा, पोपट; red-ringed p. राघू.— PAROQUET पोपट, हिरामण.

PARRY *v.* (*parare*, to prepare) ward off टाळणें, चुकवणें, वारणें (a blow); evade चुकवाचुकव -टाळाटाळ क. (payment).

PARSE *v.* (*pars*, part) व्याकरण क., वाक्याचें व्याकरण क.

PARSIMONY (*parcere*, to spare) covetousness कृपणपणा, कार्पण्य *n*, किरटेपणा; frugality

काटकसर *f,* अल्पव्यय.—PARSIMONIOUS *a.* कृपण, हाताचा जड; काटकसऱ्या, दक्ष.

PARSLEY *F.* अजमोदा.

PARSON (*parsona*) priest of a parish पांढरीचा उपाध्या, ग्रामपुरोहित; clergyman धर्मोपाध्या, धर्माध्यापक.

PART (*pars*) portion भाग, अंश; piece तुकडा, खंड; division विभाग, भाग, अवयव; member प्रकरण *n,* अंग *n,* विषय;—in the payment of debts, rents, &c. खिस्त; share वांटा, हिसा; *pl* बुद्धि *f,* गुण *pl;* concern अंग *n,* हात, संबंध; side बाजू *f,* पक्ष, वांटा: he takes his brother's p.; allotted duty काम *n,* स्वकर्म *n,* धर्म; *Drama,* सोंग *n;* for my part मजकडून; in p. कांहीं वाट्यांनीं, कांहीं अंशीं; for the most p. बहुधा; वारंवार; on the p. of निसबत.—*v.* वांटणें, वांटून देणें; फोडणें, तुकडे क.; वेगळा -निराळा क.; stand between मध्यें पडणें, मध्यस्थी क.—*i.* तुटणें, सुटणें, अलग -विभक्त -वियुक्त -वेगळा होणें; with सोडणें, जाऊं देणें. -LY *ad.* कांहींसा, किंचित, थोडा बहुत. -NER विभागी, वांटेकरी; a consort बायको *f* किंवा नवरा, जन्माचा सोबती; *Law,* भागीदार, सर्कती, पातीदार [with, in, of]. -SHIP भागीदारी *f;* सरकत *f,* पाती *f.*—PARTY faction फळी *f,* तट; plaintiff or defendant पक्षकार, वादी किंवा प्रतिवादी; a social assemblage बैठक *f,* जेवणास -चहास वगैरे बोलावलेली मंडळी *f;* detachment टोळी *f,* तुकडी *f,* 'पार्टी' *f;* part तरफ *f,* बाजू *f,* पक्ष; single person असामी, मनुष्य; company टोळी *f,* जूट *f.* -COLORED *a.* चित्रविचित्र (flower);—as a horse अबलक;—as a bullock बांडा. -FENCE, -WALL दोन घरांच्या मधली भिंत *f,* छाटदिवाल *f H.*—PARTISAN तरफदार, पक्षकार.

PARTAKE *v.* (*part* & *take*) वांटा असणें.—*i.* दुसऱ्या बरोबर वांटा घेणें -असणें -पावणें [in, of]; -चा गुण स्वभाव -हुद्दा असणें.

PARTERE *F.* an ornamental garden नजरबाग.

PARTIAL *n.* (See PART) inclined to favor one party more than another तरफदार, पक्षपाती;—of judgments, &c. तरफदारीचा, पक्षपाताचा; not general एकपक्षी, एकदेशी, एकांगी (eclipse, deluge, &c.) [to]. -ITY पक्षपात, तरफदारी *f;* special fondness आवड *f,* अभिरुचि *f,* चहा *f:* p. for poetry [for]. -LY *ad.* पक्षपातानें; कांहीं वांटें, अंशतः, एकपक्षी.

PARTICIPATE *v.* (*partis,* part, *capere,* to take) See PARTAKE [in, of].—PARTICIPATION वांटा, हिस्सा [in].—PARTICIPATOR भागीदार, विभागी.—PARTICIPIAL *a. Gram.* कृदंतरूप.—PARTICIPLE *Gram.* कृदंत *n.*

PARTICLE (*pars,* part) minute part कण, लेश, रज; *Gram.* अव्यय *n;* extremely minute *particles* अणुरेणु *pl.*—PARTICULAR *a.* not general असाधारण, असामान्य; individual विशेष, भिन्न, निराळा: each plant has its p. nutriment; notable विशेष, लोकोत्तर, अधिक विशेष (news); minute सूक्ष्मदर्शी, कच्चें -बारीक पाहणारा;—of statements, accounts, &c. तपशीलवार, कच्चा, सविस्तर; nice खंतखोर, खोडकर: p. in diet; p. person अमुक, अमका; it is nothing p. तादृश नव्हे; p. duty विशेष धर्म p. occasion समयविशेष.—*n.* विशेष गोष्ट *f,* विशेष *n;* individual जन, असामी *f;* in p. विशेषेंकरून, विशेष [in]. -ITY असाधारणता *f;* विशेषता *f,* विशेषभाव; minute detail तपशील *f,* बयान *f,* विस्तार; that which is particular विशेष गोष्ट *f.* -IZE *v.* तपशीलवार बोलणें -सांगणें. -LY *ad.* विशेषेंकरून; तपशीलवार.

PARTISAN, See under PART.

PARTITION (*pars,* part) division विभाग, वांटणी *f;* separation वियोग, विरह; that

which divides पडदा, व्यवधान *n*; place parted off खण, खिमा, पुड *n*; that by which a partition is made आडभिंत *f*, पडदा, कूड.—*v.* खण क. -पाडणें, पडदा घालणें [of, off, from].

PARTNER, See under PART.

PARTRIDGE (*perdix*) तितर, तित्तिर, कवडा.

PARTURIENT *a.* (*parere,* to bring forth) कोनी निघणारी, बाळंत होणारी, प्रसवणारी.—PARTURITION प्रसव, प्रसूति *f*.

PASS *v. i.* (See PACE) go जाणें, चालणें; undergo transition पालटणें, बदलणें; be current चालणें, पटणें (coins); be received in opinion पसंत पडणें, मान्य होणें (for); be spent जाणें, गुजरणें, लोटणें (time); happen घडणें, होणें; die मरणें, गतहोणें, जाणें; go by a certain necessary step पर्यायानें -पायरीनें जाणें; surpass वरचढ होणें; to p. away, off, over नाहींसा होणें, टळणें, ओसरणें;—on पुढें जाणें -चालणें; to let p. सोडणें, सांड क.; to p. into हळूहळू पालटणें; पर्यायानें होणें; -on, upon -ला घडणें;—वर येणें; लागणें; ठराव क.—*t.* go beyond, over, through पार -पलीकडे जाणें; omit उपेक्षणें, गाळणें, सोडणें; as time spent घालवणें, क्रमणें;—pleasantly करमणें, गमत क.;—painfully काढणें, कंठणें;—under shifts and expedients लोटणें, ढकलणें;—idly कालवंचना क.; be carried through पसार-रुजू -सादर क. (bill); utter जाणें, बोलणें, निघणें: thy word is *passed;* achieve सिद्धीस नेणें, घडविणें; enact करणें, पसार क. (a law); cause to proceed चालवणें, पोंहचता क.; put in circulation चालवणें (money); take notice of लक्ष देणें -लावणें, मनावर घेणें; by, over पोटीं घालणें, क्षमा क.;—off, on, upon ठकविणें, फसवणें; a law पसार -ज्यारी क. [from, to]—*n.* passage रस्ता, वाट *f*; narrow passage खिंड *f*, बारी *f*;—over a hill घाट, घाटी *f*; passport परवाना, दस्तक *n*, रहदारी चिठ्ठी *f*, 'पास' *f*; push in fencing हूल *f*, ढुसणी *f*; condition अवस्था *f*, दशा *f*; to bring to p. घडवणें, बनून आणणें; to come to p. होणें, घडणें. -ABLE *a.* capable of being passed जायाजोगा, गमनार्ह; current पटायाजोगा, चालायाजोगा; tolerable कामचलाऊ, बराच, असाच. -AGE जाणें *n*, चलन *n*, गमन *n*; ओलांडणें *n*, अतिक्रम, क्रांति *f*; journey, as by water, carriage, &c. प्रवास; fare वाटेचें भाडें *n*; ship's p. नौर; liberty of passing जाण्याची मोकळीक *f*; death मरण *n*, गति *f*; way वाट *f*, रस्ता; a hall मधलें घर *n*, माजघर *n*; incident गोष्ट *f*, घडलेली गोष्ट *f*: in thy *passages* of life; reception स्वीकार, अंगीकार: this book will have a fair p.; part of a book or text स्थल *n*; enactment ठराव: the p. of a law;—as between houses गल्ली *f*, बोळ; of p. भ्रमण -देशांतर करणारा (birds). -ENGER मार्गस्थ, वाटेनें जाणारा, वाटसरू;—in a vehicle उतारू. -ING *a.* श्रेष्ठ, उत्कृष्ट. -WORD वरदीचा -खुणेचा शब्द.

PASSION (*pati, passus,* to suffer) दुःखसहन *n*, भोग *n*; the suffering of Christ ख्रिस्ताचें दुःखसहन *n*; mental feeling मनोविकार, भाव, रस; feeling or emotion in which the subject is moved by an impulse beyond control मनःक्षोभ -ताप; anger राग; love प्रीति *f*, शृंगाररस; eager desire आस्था *f*, उत्कंठा *f*, उत्साह; pursuit engaged in with fondness व्यसन *n*, वेड *n*, छंद, नाद: poetry became to him a p.; the *passions* षड्रिपु *pl*; absence of p. विराग, वैराग्य *n*; of subdued *passions* जितेंद्रिय; a fit of p. रागाचा झटका, वेष; to fly into p. पित्त खवळणें [for]. -ATE *a.* रागीट, तापट; उत्कंठित, आवेशी, आवेशाचा; हौसेचा. -ATELY *ad.* रागानें; उत्साहानें, उत्कंठेनें.—PASSIBLE *a.*

सुखदुःखयोग्य -क्षम.—PASSIVE *a.* not active निर्व्यापार, निश्चेष्ट; suffering सोसणारा, सोसीक, सहिष्णु; *Gram.* कर्मणि. -FLOWER कंगोरी *f.*

PASSOVER (*pass, over*) यहुदी लोकांचा एक सण आहे, वल्हांडण सण; वल्हांडण सणाचा यज्ञपशु. See Ex. xii.

PASSPORT *F.* परवाना, दस्तक रहदारी.

PAST *p. a.* गेलेला, गत, गतकालचा.—*prep.* पुढें, पलीकडे; नंतर, वर, पसार.—*ad.* जवळून, वरून, पुढून.

PASTE (*pastus,* pasture) खळ *f,* चिकी *f*; p. of iron rust, &c. शाई *f.*—*v.* खळ लावून -खळीनें चिकटविणें.—PASTRY पिठाचे पदार्थ, *pl* मिष्टान्नें *n,* पिष्टान्नें *n pl.* -BOARD पुष्टिपत्र *n.* -COOK हलवाई, पक्वान्नें करणारा.

PASTERN *F.* part of a horse's leg between the fetlock joint and the hoof नेवर.

PASTIME (*pass, time*) खेळ, करमणूक *f.*

PASTOR (*passere,* to pasture) shepherd मढक्या, मेंढपाळ; minister of the gospel having the charge of a church and congregation ख्रिस्ती मंडळीचा धर्मोपदेशक, पाळक. -AGE पाळकाचें काम *n.* -AL *a.* मेंढक्यांचा (life); मेंढक्यांच्या रहाणीचा -स्थितिरीतीचा -च्या संबंधी (poem); पाळकाचा, पाळका संबंधी; p. tribe पशुचारणजीवी लोक. -ATE पाळकाचें काम *n.*—PASTURAGE, business of feeding cattle गुरेंचराई *f*; grazing-ground चरण *n,* गायरान *n*; grass for feed चारा, चरण *n.*—PASTURE *v.* चारणीस -चारायाला घालणें.—*i.* चरणें.—*n.* कुरण *n,* गायरान *n*; चारा, चार *f.*

PAT *a. D.* योग्य, उचित, समर्पक (allusion)—*ad.* नेमका, टापासरीप, ठीक.— *n. Ger.* a light, quick blow, or stroke, with the fingers or hand थापटी *n,* थाप *n,* थापड *f*; a small flatish lump वडी *f,* चपटी *f,* थापटी *f.*—*v.* थापडणें, थापटणें [with, on].

PATCH *n. Ger.* piece of cloth sewed on a garment to repair it ठिगळ, कपा; small piece of any thing used to repair a breach गावडी *f,* पुस्ती *f*; small piece of silk used to cover a defect on the face, or to heighten beauty टिकली *f,* पट्टी *f*; small piece of ground जमिनीचा तुकडा, ठिकें *n.*—*v.* ठिगळ लावणें; repair clumsily तांगडणें, तुकडे जोडणें; टिकले लावून शृंगारणें; up तुकड्यातांकड्यांचा क. [with]. -WORK ओबडधोबड -तुकड्यातांकड्यांचें काम *n,* तांगडकाम *n.*

PATE *Ger.* the head डोसकें *n,* टकलें *n,* नारळ; [skin of a calf's head].

PATELLA (*L.*) *Anat.* गुडघ्याची वाटी *f.*

PATENT *a.* (*patere,* to be open) उघड, स्पष्ट; appropriated by letters patent सनदेचा, सनदी.—*n.* an official document conferring a right or privilege on some person, for a term of years, the exclusive right to an invention सनद *f,* फरमाना. -EE सनद मिळालेला, सनददार. -LEATHER रोगण चढविलेलें -रोगणी कातडें *n.*

PATERNAL *a.* (*pater,* father) बापाचा, पित्याचा, पितृ; fatherly बापासारखा, पितृतुल्य (admonition); derived from a father बापापासून मिळालेला, पितृप्राप्त; hereditary वडिलोपार्जित, पिढीजाद.—PATERNITY पितृधर्म, पितृत्व *n,* बापपणा.

PATERNOSTER (*L.* our Father) the Lord's prayer प्रभूची प्रार्थना *f.*

PATH* (*Skr.* path) road वाट, रस्ता, मार्ग, पंथ; foot-way पायवाट *f,* पाऊलवाट *f*; fig. course of action वाट *f,* रहाटी *f,* रीत *f,* मार्ग (Ps. xxv., 10); the right p. सत्पथ, सन्मार्ग; —of the planets कक्षा *f* [to, through].

PATHOS (*Gr. pathein,* to suffer) करुणारस, राग, कारुण्य *n.*—PATHETIC *a.* द्रव आणणारा, मनोवेधक, करुणारसाचा.

PATHOLOGY (*Gr. pathos*, suffering, *logos*, speech) *Med.* the science which has for its object the knowledge of disease रोगनिदानशास्त्र *n*, निदान *n*.

PATIENT *a.* (*pati*, to suffer) bearing सोशिक, सहनशील; not hasty धीर, धिराचा, धिमा; passive recipient कर्मपात्र, कर्माश्रय; diseased person under medical treatment वैद्याचें कूळ *n*, रोगी मनुष्य. -LY *ad.* निमुटपणें, गम खाऊन; सोशिकपणानें, धैर्य धरून; धिरानें, धिमाईनें.—PATIENCE, the suffering of afflictions, pain, toil, calamity, provocation, or other evil, with a calm unruffled temper सहनशीलता *f*, शांति *f*, सोशिकपणा; act or quality of waiting long for justice or expected good without discontent दम, धैर्य *n*, सबुरी *f*, धीर; perseverance दीर्घ उद्योग -प्रयत्न [with, in].

PATRIARCH (*Gr. patro*, father, *archos*, a chief) father and ruler of a family मूळ पुरुष, कुलाधिपति; [app. to heads of families in ancient history, esp. in biblical and Jewish history; *Eastern Churches*, a dignitary superior to the order of archbishops]. -AL *a.* मूळ पुरुष संबंधी, मूळ पुरुषाचा, गोत्रपतीचा; subject to a patriarch पेत्रिआर्कच्या अधिकारा खालचा. -ATE पेत्रिआर्काचें काम *n* -चा प्रांत; पेत्रिआर्काची जागा *f* -गादी *f*.

PATRICIAN (*patres*, fathers) कुलीन पुरुष.—*a.* मोठ्या कुलांतला, कुलीन, खानदानीचा.

PATRIMONY (*pater*, father) right or estate inherited from one's ancestors पितृप्राप्त अधिकार किंवा धन *n*, वतनवाडी *f*, बापरोटी *f*, इत्यादि; Church estate or revenue देवळाचें उत्पन्न *n*.—PATRIMONIAL *a.* वतनाचा, वतना विषयींचा, वतनी; पितृप्राप्त, वडिलोपार्जित.

PATRIOT (*patria*, one's native country) person who loves his country, and zealously supports and defends it and its interest स्वदेशभक्त, स्वदेशहितकारी, स्वदेशाभिमानी. -ISM स्वदेशप्रीति *f*, स्वदेशाभिमान. -IC *a.* स्वदेशहिताचा, स्वदेशनिष्ठ, स्वदेशासक्त.

PATROL *F.* guard which goes the rounds of a camp or garrison लष्करी गस्त *f*, छोटी गस्त *f*. *H.*—*v.* गस्त घालणें.—*i.* भवतालें फिरणें, गस्तांसाठीं फिरणें [about, round].

PATRON *a.* and *n.* (*pater*, father) one who countenances, supports, or protects पोशिंदा, पोषक, पुरस्कर्ता;—of the poor and humble प्रणतवत्सल. -AGE हिमाईत *f*, आश्रय, पालण *n*. -IZE *v.* आश्रय देणें, हातीं धरणें, पक्षघेणें;—in a unfavorable sense काखेस -बगलेस मारणें [by]. -ESS यजमानीण *f*, पोषणकरणारीण *f*; रक्षणकरणारीण *f*.

PATRONYMIC (*Gr. patros*, father, *onoma*, name) पितृप्राप्त नाम *n*.

PATTEN *F.* खडावा.

PATTER *v.i.* (See PAT) पटपट -सटसट पडणें. —*t.* पटपट पाडणें; repeat in a muttering manner, as prayers जपणें, जप क.; to p. flash, to speak the dialect of thieves, &c. चकारी भाषा बोलणें.—*n.* टपटप -पटपट शब्द.

PATTERN (See PATRON) model proposed for imitation नमूना, सांचा, फर्मा; specimen मासला, वानगी *f*; quantity of cloth sufficient for a garment अंगरखा वगैरे एका वस्त्रा पुरतें कापड *n*.

PAUCITY (*paucus*, few) थोडेपणा, अल्पसंख्या *f*; smallness of quality थोडेपणा, कमीपणा, न्यूनता *f*: p. of blood.

PAULINE *a.* (from *Paulus*, Paul) पौलस नामक मनुष्याचा; पौलसाचा -पौलसानें लिहिलेला, पौलसाचा, पौलसलिखित (epistles).

PAUNCH (*pantex*) the belly पोट *n*; the first and largest stomach of a ruminant quadruped रंवथ करणाऱ्या जनावराचा पहिला व सर्वांहून मोठा कोथळा.

PAUPER (*L.*) भिकारी, भिक्षुक, नादार. -ISM भिकारपण *n*, भिक्षुकी *f*, नादारी *f*.

PAUSE (*pausa*) temporary stop खंड, विराम, महकुबी *f*; suspense दुग्धा *f*; a temporary cessation of the voice in reading and speaking विराम; a point विरामचिन्ह *n*; *Mus.* थाक *f*, अवसान *n*.—*v.i.* मध्यें राहणें -थांबणें, खोळंबणें, विसंबणें [for, at].

PAVE *v.* (*pavire,* to beat down) lay with stone or brick फरसबंदी -चिरेबंदी किंवा वीटबंदी क.; prepare the way for वाटपाडणें, रस्ता क. मार्ग मोकळा क., [with]. -MENT फरसबंदी *f*, चिरेबंदी *f*.

PAVILION (*papilio,* a butterfly and a tent) डेरा, तंबू; *Arch.* घुमटाच्या आकाराचें घर *n*; a flag बावटा; *Anat.* auricle of the ear बाहेरील कान.

PAW *W.* पंजा.—*v.* scrape with the fore-foot टापरणें; handle roughly हाताळणें, घुसडणें, गुचडणें.

PAWN *F.* गहाण *n*.—*v.* गहाण ठेवणें.—(*padis,* foot)—in chase प्यादें *n*. -BROKER गहाणाचा व्यापारी.

PAY *v.* (*pacare,* to pacify) satisfy as another person, for service rendered वेतन -मजुरी -पगार देणें; discharge one's obligation to फेडणें, वारणें, देणें; punish शासन क.; off फेडणें, चुकवणें; on देणें, ओपणें (blows); out ढिला सोडणें -क., सोडणें: to p. out more cable [to].—*i.* फेडणें, निस्तरणें; for भरून देणें; खर्च देणें; -चा दंड -गुन्हेगारी देणें.—*n.* पगार, रोजमुरा, दरमहा; extra p. to public servants or soldiers भत्ता. -ABLE *a.* देण्याजोगा, देय; suitable to be paid देण्यास योग्य, देण्यास लायक: thanks are a tribute p. by the poorest [to]. -MENT देणें *n*; फेड *f*; reward वेतन *n*. -ROLL बटवडे पत्रक *n*. -MASTER देणारा; पगार वांटणारा, सबनीस, 'पेमास्तर.'

PEA* वाटाणा.

PEACE (*pax, pacis,*) state of quiet स्वस्थता *f*, स्वास्थ्य *n*, स्वस्थपणा; freedom from war सख्य *n*, सला, संधि; public tranquility देश -लोकसौख्य *n*; quiet of conscience मनश्शांति *f*, शांति *f*, चित्तस्वास्थ्य *n*; harmony ऐक्य *n*, सख्य *n*, मिलाफ; at p. शांतीनें; सख्यानें; to hold one's p. चुप -उगा राहणें, मौन्य धरणें; to make one's p. सला -समेट क. -ABLE *a.* स्वस्थ, निरुपद्रव, शांत, थंड; शांतिशील -प्रिय. -FUL *a.* शांतीचा, शांत. -MAKER समेट करणारा, कळमिटव्या. -OFFERING शांत्यर्पण *n*, शांतिहोम. -OFFICER शरीफ, कान्स्टेबल इ० प्रकारचा सरकारी हुद्देदार.

PEACOCK* मोर, मयूर.—PEAHEN लांडोर *f*.

PEAK* a point टोंक *n*, अग्र *n*; point of a hill पर्वताचें शिखर *n*.

PEAL *F.* दणका, धडाका; a set of bells tuned to each other घंटानाद.—*v.* दणदणणें, कडकडणें.

PEAR* the prickly p. निवडुंग *n*, *m*; the flat-jointed prickly p. फड्यानि०.

PEARL* मोती *n*, मुक्ताफल *n*; a jewel रत्न *n*, दाणा; lack lustre खरडा; mother of p. मोतीशिंप *f*; artificial p. कागदी मोती *n*, फुगा.—PEARLY *a.* मोत्याचा; मोत्यासारिखा (dew).

PEASANT (*pagus,* the country) शेतखण्या, नांगऱ्या.—*a.* गांवढळ, गंव्हार. -RY रयत *f*, शेतकरी लोक *pl*.

PEBBLE* गोटा, खडा, गुंडा.

PECK* *v.* strike with the beak चोंचीनें मारणें; pick up with the beak चोंचीनें वेंचणें -टिपणें; strike with a pointed instrument अणीनें टोंचणें -बोचणें [at].

PECTORAL *a.* (*pectus, pectoris,* breast) उराचा, छातीचा; relating to the disease of the chest छातीचे रोगाचा; p. medicine

कासघ्न *n.*—*n.* दम्यावरचें -दम्याचें औषध *n*, कासघ्न *n.*

PECULATE *v. i.* (*peculium*, private property) सरकारचा पैका खाणें, तनाखोरी क.—PECULATION तनाखोरी *f.*

PECULIAR *a.* (do.) of private possession and use आपला, खासगत, खुद; particular विशेष, असाधारण.—*n.* आपला माल, स्वस्व *n.* [to]. -ITY खासगतपणा; असाधारणता *f*; विशेष धर्म -गुण.

PECUNIARY *a.* (*pecunia*, property in cattle, *pecus*, cattle) relating to money पैक्याचा, द्रव्याचा; consisting of money धन -द्रव्यरूप, पैक्याचा, द्रव्य in comp.: p. mulct द्रव्यदंड.

PEDAGOGUE (*Gr. pais*, a boy, *agein*, to lead) पंतोजी, शिक्षक; a pedant पंडिताचा डौल मारणारा, पंडितंमन्य.—PEDANT विद्येचा डौल मारणारा, पंडितंमन्य. -RY पोकळ पांडित्य *n*, विद्येचा डौल.

PEDESTAL (*pes, pedis*, foot) base of a column खांबाचा बुंधा, तळखडा;—of a lamp चाडें *n*, पडघी *f*.—PEDESTRIAL *a.* पायाचा-चरणाचा.—PEDESTRIAN पायीं चालणारा, पदाति, पदाचारी.

PEDICLE (do.) फुलाचा देंठ.

PEDIGREE *F.* line of ancestors पिढी *f*, वंशावळ *f*; account of register of a line of ancestors वंशचरित्र *n.*

PEDLAR, -LER, PEDDLER (do.) फेरीवाला, बिछायती, फिरस्ता.—PEDDLERY फेरीवाल्याचा धंदा; goods of a pedler बिछायती माल.

PEDO-BAPTISM (*Gr. paidos*, child, *baptism*, baptism) लहान मुलाचा बाप्तिस्मा.—PEDO-BAPTIST लहान मुलाचा बाप्तिस्मा करावा असें मत बाळगणारा; लहान मुलांचा बाप्तिस्मा करणारा.

PEEL (*pilus*, a hair) साल *f*, त्वचा *f*.—*v.* साल काढणें, सोलणें; strip, as the skin of an animal कातडें काढणें, छिलणें; plunder लुटणें, नागवणें [off].—*i.* साल निघणें: it *peels* easily.—*F.* उलथणें *n*, कलथा.

PEEP *v. i.* (*pipilare*, to begin, to appear) दिसणें, दिसूं लागणें; chirp चिवचिव क.; look forth from concealment डोकावून पाहणें [at].—*n.* चिवचीव *f*; चोरनजर *f* -दृष्टि *f*; p. of day प्रभात *f*; p. hole चोरखिडकी *f*, झरोका.

PEER (*par*, equal) बरोबरीचा, तोलाचा; associate सोबती; nobleman बडालोक, उमराव, 'पीर.' -AGE अमिराची -बडे लोकांची पदवी *f*; the body of peers बडेलोक *pl.* -LESS *a.* अनुपम, निरुपम, सर्वोत्कृष्ट.

PEER *v. i.* (See APPEAR) दिसणें; look narrowly, curiously, or sharply न्याहाळून पाहणें, हेरणें, निरखून -टवकारून पाहणें.

PEEVISH *a. F.* किरकिऱ्या, कटकट्या. -NESS जिकीर *f*, खिसखीस *f*.

PEG* खुंटी *f*;—of an instrument खीळ *f*, खुंटी *f*; a p. lower एक पायरी कमी -खालीं (उतरणें).—*v.* मेख -खुंटी मारणें -मारून बांधणें -अडकवणें; restrict अटकाव क., दाबांत ठेवणें.

PELF (*pilare*, to rob, *facere*, to make) money पैका, पैसा; illicit gains हरामाचा पैसा, अन्यायोपार्जित द्रव्य *n.*

PELICAN (*Gr.*) पानकोळी.

PELLET (*pila*, a ball) गोळी *f*, गोटी *f*.

PELLICLE (*pellis*, skin) तवंग, कोश, सूक्ष्म पटल *n.*

PELLITORY (*paries*, wall) अकलकाढा -रा.

PELLMELL *ad.* गोंधळ -गर्दी करून, घोळक्यानें.

PELLUCID *a.* (*per*, very, *lucidus*, clear) स्वच्छ, निर्मळ, प्रसन्न.

PELT *Ger.* चामडें *n*, कातडें *n*, चरसा.—*v. F.* strike with something thrown सडकणें, सडकावणें, फेंकून मारणें [with].—*n.* टोला, तडाखा.

PELVIS (*L.*, a basin) *Anat.* lower part of the abdomen खालचें पोट *n*, बस्तिप्रदेश, ओंटी *f*.

PEN (*penna*) लेखणी *f*; errors of the p. कलमकुचराई *f*.—*v*. लिहिणें. -KNIFE चाकू. -MAN कलमबहादर, लेखणीचा गुरु; an author ग्रंथकर्ता. -SHIP लिहिण्याचें कसब *n*; chirography लेखन *n*, अक्षर *n*; good p. कलमसफाई *f*, मुक्ताफल *n*.

PEN* *v*. कोंडणें, कोंडवाड्यांत घालणें [up].—*n*. कोंडवाडा.

PENAL *a*. (*pœna*, punishment) दंडप्रकरणाचा, दंडाचा; subject to penalty दंडास योग्य, दंडालायक, दंडाधीन, दंडनीय. -TY दंड, शिक्षा *f*; forfeiture अट *f*, अडती *f*.

PENANCE (See PAIN) तप *n*, प्रायश्चित्त *n*; bodily p. देहदंड; to perform p. तप क., प्रायश्चित्त क.; mortal p. देहांत प्रायश्चित्त *n*.

PENATES *pl*. (*L.*) [household gods of the ancient Italians]; कुलदेवतें *n pl*, आराध्यदेवता *f. pl*.

PENCHANT (*F.*) decided taste चटक *f*.

PENCIL (*penis*, a tail) brush of a painter चितार्‍याचें कलम *n*;—for writing on slate दगडी लेखणी *f*, 'पेनसिल' *f*;—lead p. शिसयाची पेनसिल *f*; *Opt.* collection of rays of light किरणांचा समूह, अंशुजाल *n*.

PENDANT (*pendere*, to hang) लोंबणारा पदार्थ लोलक; ornament hanging at the ear भोंकर *n*, लोलक; a hanging appendage झुबका, झुमका, झिळमिळी *f*.—PENDENT *a*. लोंबणारा, लटकणारा.—PENDING *a*. भिजत पडलेला, चालता, खरकटा (suit).—PENDULOUS *a*. लोंबता, लटकता.—PENDULUM लोलक.

PENETRATE *v*. (*penetrare*) enter into भेदणें, वेधणें, प्रवेश क.; affect मनास लावणें, मन वेधणें; comprehend समजणें, बोध होणें [through, into].—*i*. शिरणें, शिरकणें; अर्थभेद होणें.—PENETRABLE *a*. भेदायाजोगा, भेद्य, भेदनीय.—PENETRABILITY भेद्यता *f*, प्रवेश्यता *f*.—PENETRATION भेदणें *n*, भेदन *n*; acuteness सूक्ष्म -तीक्ष्ण -कुशाग्रबुद्धि *f*.

PENINSULA (*pœne*, almost, *insula*, island) द्वीपकल्प *n*.—PENINSULAR *a*. द्वीपकल्प संबंधी; inhabiting a peninsula द्वीपकल्पवासी.

PENITENT *a*. (*pœnitere*, to repent) sincerely affected by a sense of guilt, and resolving on amendment of life पश्चात्तापी, अनुतापी.—*n*. ज्यास पश्चात्ताप झाला आहे तो; पश्चात्तापी मनुष्य -स्त्री *f*.—PENITENCE पश्चात्ताप, अनुताप.—PENITENTIARY, one who prescribes penance प्रायश्चित्त सांगणारा; a penitent पश्चात्तापी; one who does penance प्रायश्चित्त घेणारा, तपस्वी; place of penitence प्रायश्चित्तालय *n*; house of correction in which offenders are confined for punishment and reformation, and compelled to labour तुरुंग, कारागृह *n*.

PENNANT (*penna*, feather) पताका *f*, फरारा.

PENNY* आठ पईच्या किमतीचें एक नाणें आहे, दोन फदे *pl*, 'पेनी'; a small sum दमडी *f*, टोली *f*, अधेला; money पैका, टका. -WISE लहान -बारीक गोष्टींमध्यें कसर पाहणारा; p. and pound foolish इळा मोडून खिळा करणारा; a p. in the pound जळत्या घरचा वासा.—PENNILESS खंक, कंगाल, गरीब.

PENSILE *a*. *pendere*, to hang) लोंबणारा, लंबमान.

PENSION (*pensio*, a pay) पगार; allowance for past services बैठापगार, 'पेनशन' *n*; p. granted by Government to the family of a soldier or servant who has died in its service बाळपरवेशी *f* [for].—*v*. बैठापगार करून देणें.-ER पेनशनदार, पेनशनर; [a student of the second rank in the Universities of Cambridge, England, and Dublin, who is not dependant on the foundation for support, but pays for his food].

PENSIVE *a. F.* thoughtful ध्यानस्थ, सचिंत; expressing thoughtfulness with sadness चिंताक्रांत, उदास, दिलगीर.

PENT *a.* कोंडलेला [up].

PENTACHORD (*Gr. pente,* five, *chordè,* cord) पंचतारी वाद्य *n.*

PENTAGON (*Gr. -gonia,* angle) पंचकोणाकृति *f.*

PENTAPETALOUS *a.* (*Gr. -petalon,* petal) पंचपाकळी, पंचदळ.

PENTECOST (*Gr. pentekosté,* fifty) यहुदी लोकांचा एक सण आहे, पन्नासाव्या दिवसाचा सण.

PENTHOUSE (*pendere,* to hang down) पडवी *f.* —PENTICE पडसाळ *f,* एकपाखी पडवी *n.*

PENTILE, See PANTILE.

PENULTIMATE *a.* & *n.* (*pœne,* almost, *ultimus,* the last) शेवटल्या वर्णामागचा, उपांत्य.

PENUMBRA (*-umbra,* shade) अपूर्ण -खंड छाया *f.*

PENURY *penuria* गरीबी *f,* कंगाली *f,* अनुपपत्ति *f.*—PENURIOUS *a.* कृपण, हाताचा जड; थोडा, भिकार (crop).

PEON (*H. piyadah*) चपराशी, पट्टेवाला, शिपाई; —at chess प्यादें *n.* प्यादा.

PEOPLE (*populus*) body of persons who compose a community लोक *pl*; population प्रजा *f,* रयत *f*; folks लोक *pl,* माणसें *n pl,* आलमदुनिया *f*; the vulgar कुणबी माळी *pl,* तेली तांबोळी *pl.*—*v.* वसाहत क., वसवणें [with].

PEPPER* (*Skr. pippali*) black p. मिरें *n*; red p. मिरची *f*; long p. पिंपळी *f.*—*v.* sprinkle with pepper -वर मिरपूड टाकणें-पसरणें; cover with wounds जखमांनीं भरणें. -BOX मिरपुडीची डबी -बाटली *f.* -MINT,—the plant पुदीना ;—the essence पुदिन्याचा अर्क, 'पेपरमेंट' *n.*

PEPTIC *a.* (*Gr. peptein,* to cook) पाचक. अग्निवर्धक, दीपक.—*n.* पाचक औषध *n.*

PER *prep.* (*Lat.*) दर, प्रति, गणिक: p. man.

PERADVENTURE *ad.* कदाचित्, नजाणो, दैववशात्.

PERAMBULATE *v.* (*-ambulare,* to walk) हद्दी हद्दीनें फिरणें -जाणें, फेरी घालणें, फिरणें, —PERAMBULATION फेरी *f,* परिभ्रमण *n*; वर्षांतून एकदां सिमेची पाहणी *f,* सालाबाद शींव पाहणी *f.*—PERAMBULATOR भ्रमण करणारा, फिरणारा; instrument for measuring distances अंतर मोजण्याचें यंत्र *n*; carriage for a child, propelled from behind मागून लोटण्याची मुलाची गाडी *f.*

PERCEIVE *v.* (*-percipere,* fr. *per* and *capere,* to take) obtain knowledge of through the senses -चें इंद्रियज्ञान होणें, पहाणें, जाणणें, समजणें; take intellectual cognizance जाणणें, समजणें, बोध होणें; be affected by लागणें, स्पर्श होणें, भेदणें.—PERCEIVABLE *a.* इंद्रियगोचर, समजण्या -उमजण्याजोगा; स्पृश्य. —PERCEPTIBLE *a.* पहायाजोगा, इंद्रियगोचर -गम्य.—PERCEPTIBILITY इंद्रियगोचरता *f.*—PERCEPTIBLY *ad.* पहायासारखा -जोगा; समजेसा, कळेसा.—PERCEPTION पहाणें *n,* इंद्रियानें घेणें *n,* समजणें *n,* इंद्रियग्रह; बोध, समज, faculty of perceiving जाणीव *n,* चैतन्य *n.* —PERCEPTIVE *a.* ज्यास समजण्याची शक्ति आहे तो, ग्राहक.—PERCIPIENT *a.* ग्राहक, सचेतन, विषयग्रहणक्षम.

PERCH (*pertica*) पोल, काठी *f*; measure of length containing 5½ yards काठी *f*; [fortieth part of an acre]; roost अड्डा.—*v. i.* पाखरां सारखें बसणें, बसणें.

PERCHANCE *ad.* नजाणो, कदाचित्.

PERCOLATE *v.* (*-colare,* to strain) गाळणें-शोषणें.—*i.* गळणें, पाझरणें, निचरणें.

PERCUSSION (*quatere*, to shake) act of striking अपटणें, आदळणें *n* ; effect of violent collision धक्का, आघात.

PERDITION (*-dare*, to give) entire loss नाश, विनाश, सत्यनाश ; utter loss of the soul, or of final happiness in a future state अधोगति *f*, नरकवास, आत्म्याचा नाश.

PEREGRINATE *v*. (*-agri*, a field) फिरणें, देशभ्रमण -देशाटन क.—PEREGRINATION परिभ्रमण *n*, देशाटन *n*, प्रवास.

PEREMPTORY *a*. (*peremtorious*, final) express निखालस, साफ, खसखसीत ; authoritative अधिकाराचा, प्रभुसम्मित ; dogmatical मतवादी, हटवादी.—PEREMPTORILY *ad*. निक्षून, खसखसीत, तुकडा मोडून.

PERENNIAL *a*. (*-annus*, year) lasting through the year बारमाही, वर्षजीवी ; perpetual अक्षयी, बारमाही, सतत, निरंतर ; continuing more than two years दोन वर्षांहून अधिक वांचणारा, वर्षद्वयाब्दिकजीवी.—*n*. दोन वर्षें वांचणारें झाड *n*.

PERFECT *a*. (*facere*, to make) brought to completeness पुरा, पूर्ण ; complete समग्र, सकल, पूर्ण ; without blemish अव्यंग, निर्दोष ; complete in moral excellences संपन्न, पूर्ण, गुणसंपन्न ; p. tense पूर्णभूतकाळ.—*v*. पुरा -पूर्ण क. ; निपुण -निष्णात -प्रवीण क. -ION सिद्धि *f*, पूर्णता *f*, पुरेपणा ; प्रवीणता *f*, नैपुण्य *n*, सर्वोत्कृष्टता *f*, सर्वसंपन्नता *f* ; excellent quality उत्तम -परम गुण, गुण. -LY *ad*. अगदीं, पुरता, पुरतेपणीं.

PERFIDY (*-fidus*, faithful) विश्वासघात, दगा, कपट *n*.—PERFIDIOUS *a*. खोटा, बेइमानी, दगेबाज, दगलबाज.

PERFORATE *v*. (*forare*, to bore) भोंक -छिद्र पाडणें.—PERFORATION वेधणें *n*, विंधणें *n* ; the hold bored भोंक *n*, वेज *n*, रंध्र *n*, वेध.

PERFORM *v*. (*fourn*, to complete) carry through पार -शेवटास नेणें, करणें ; accomplish साधणें, संपादणें, करणें ; fulfil पुरा -पूर्ण -सत्य क., फेडणें (duty, office, vow).—*i*. act सोंग घेणें, सोंगाची संपादणी क. ; play upon a musical instrument वाजवणें, बजावणें, खेळणें. -ABLE *a*. साध्य, साधनीय ; संपादनीय. -ANCE संपादणी *f*, संपादन *n* ; act कर्म *n*, क्रिया *f*, कृति *f* ; theatrical p. सोंग *n*, नाटक *n*. -ER करणारा, कर्त्ता ; सोंग आणणारा नट.

PERFUME (*-fumus*, smoke) fragrance सुवास, सुगंध, परिमळ ; substance that emits scent which affects agreeably the organs of smelling सुगंधी पदार्थ-द्रव्य *n* ;—for the person उटी *f*, उटणें *n*.—*v*. सुवास इ० लावणें, सुवासित क.—PERFUMER गंधी, गांधी, अतार [with].—PERFUMERY गंधीसामान *n*, सुगंधद्रव्यादि.

PERFUNCTORY *a*. (*-fungi*, to perform) वरवरचा, चालढकलीचा, वरपंगी.—PERFUNCTORILY *ad*. चालढकल -गडबडगुंडा करून.

PERHAPS *ad*. (*per* & *haps*) कदाचित्, कोण जाणे, नजाणों : p. he will come आला तर कदाचित् येईल.

PERICARDIUM (*L.*) the membranous sac which incloses the heart हृत्कोश.

PERIGEE (*Gr. peri*, near, *gé*, earth) *Astron.* नीच *n*, नीचस्थान *n*.

PERIL (*periri*, to try) भय *n*, संकट *n*, जोखीम *n*, धोका ; p. of life प्राणसंकट *n*.—*v*. जोखमांत -धोक्यांत घालणें -पाडणें. -OUS *a*. धोक्याचा, जोखमाचा, भयाचा.

PERIOD (*Gr. peri*, round, *hodos*, way) portion of time as limited and determined by some recurring phenomenon काळाची ठेप *f*, वेळ *f*, मुदत *f* ; cycle संवत्सरचक्र *n* ; interval of time अवकाश ; complete sentence पूर्णवाक्य *n*, फक्किका *f* ; *Print.* full stop पूर्णविरामचिन्ह *n*. [.] ; p. of twelve years तप *n* ;—of sixty साठी *f* ;—of

five वर्षपंचक *n*; p. of life वय *n*; in auspicious p. कालवेला *f*, काळवेळ, कुमुहूर्त; fixed p. बंदी मुदत *f*; unfixed p. कच्ची मुदत *f*. -ICAL *a*. नेमलेल्या काळाचा, नियतकालिक; happening by revolution फेरीनें होणारा, फेरीचा, परिवर्त्तनाचा.—*n*. नियमित काळीं निघणारें पाक्षिक -मासिक -त्रैमासिक पुस्तक *n* -पत्र *n*, इ०.

PERIPHERY (*Gr. pherein*, to bear) घेरा, परिधि; —as of a drum, &c. गाडा.

PERIPHRASE, PERIPHRASIS (*Gr. phrasein*, to speak) use of more words than are necessary to express the idea बोलण्याचा फेरा, गिरकांडा, द्राविडी प्राणायाम.

PERISH *v. i.* (*-ire*, to go) be destroyed नाश पावणें, नष्ट होणें, बुडणें; die मरणें, प्राणास मुकणें; decay gradually सडणें, नासणें, गळणें, झडणें [by]. -ABLE *a*. नाशवंत, नश्वर; p. goods नासकें केणें *n*.

PERITONEUM (*L.*) *Anat.* पोटाचा पडदा, अंत्रवेष्टन *n*.

PERIWIG *F*. केशाचा लहान टोप.

PERJURE *v*. (*-jurare*, to swear) render guilty of perjury खोटी शपथ वाहविणें, खोट्या शपथेचा दोषी क.; deceive by oaths and protestations खोट्या आणाभाका घेऊन फसविणें.—PERJURY खोटी शपथ *f*; crime of swearing falsely खोटी शपथ घेतल्याचा -केल्याचा अपराध -दोष.

PERK *v. i. W*. नटणें, नखरा क.—*a*. नखरेबाज, मिजाजखोर.

PERMANENT *a*. (*-manere*, to remain) नेहमीचा, निश्चित, मुकरर, नित्य. -LY *ad*. जाथू, कायम, नित्य, मुकरर.—PERMANENCY शाश्वती *f*, स्थिरता *f*.

PERMEATE *v*. (*-meare*, to go) भेदून -मुरून पार जाणें.—PERMEABLE *a*. भेदून जायाजोगा, भेदनगम्य, व्याप्य.—PERMEATION व्याप्ति *f*, भेदन *n*, प्रवेश.

PERMISCIBLE *a*. (*-miscere*, to mix) मिसळायाजोगा, मिश्रणीय.

PERMIT *v*. (*-mittere*, to let go) देणें; give leave of -ची परवानगी -रजा -मोकळीक देणें; grant leave to -ला परवानगी देणें.—*n*. परवाना, परवानगीचिठी *f*, दस्तक *n*. -TANCE हुकूम, परवानगी *f*.—PERMISSION परवानगी *f*, आज्ञा *f*, हुकूम; full and free p. मुभा *f*, मुक्तद्वार *n*.—PERMISSIVE *a*. आज्ञादायक, परवानगी देणारा (will); granted दिलेला, परवानगी दिलेला (freedom).

PERMUTATION (*-mutare*, to change) अदलाबदल, विनियम; *Math*. अंकपाश.

PERNICIOUS *a*. (*-necare*, to kill) अपकारक, वाईट, दुष्ट, हिंसक.

PERPENDICULAR *a*. (*-pendere*, to hang down) नीट, उभा, सरळ, सुती; *Geom*. समकोनपाती [to].—*n*. लंब, लंबक. -LY *ad*. नीट, सरळ, लंबरूपानें. -ITY नीट -उभेपणा, सरळपणा.

PERPETRATE *v*. (*-patrare*, to perform) (वाईट) काम क., गुन्हा क., गुन्हेगार होणें.

PERPETUAL *a*. (*perpetuus*, continuous) नेहमीचा, नित्याचा, नित्य. -LY *ad*. नित्य, निरंतर, सतत, हमेशा.—PERPETUATE *v*. शाश्वत -नित्य -निरंतर -सतत चालेसा क., सदोदित राहेसा क.—PERPETUITY शाश्वती *f*, सातत्य *n*.

PERPLEX *v*. (*-plectere*, to plait) make intricate घोटाळा क., गुंतवणें, गुरफटणें; embarrass गोंधळवणें, घोटाळ्यांत पाडणें -घालणें, तारंबळ क.; vex त्रास -उपद्रव देणें [with]. -ITY गुरफटा, गोंधळ, गुंताडा; धांदल *f*, तारंबळ *f*, पंचाईत *f*, विचार.

PERQUISITE (*-quærere*, to seek for) a gift or allowance in addition to fixed wages शिवाय -अवांतर प्राप्ति *f*, दस्तुरी *f*; p. of hereditary village हक्क, कर.

PERSECUTE *v.* (*-sequi,* to follow) persue in a manner to injure, vex, or afflict छळणें, जाचणें, गांजणें; afflict, harrass or punish for adherence to a particular creed or system, or religious principles, or to a mode of worship धर्मासाठीं -मतासाठीं -भक्तीसाठीं पाठलाग क. -छळणें -छळ क. [with, for].—PERSECUTION जाच, काच, छळ, पाठलाग, उपद्रव.—PERSECUTOR छळ करणारा, छळणारा, छळक.

PERSEVERE *v. i.* (*perseverus,* very strict) persist in any business or enterprise undertaken कामांत -उद्योगांत टिकून राहणें, टिकणें, दीर्घप्रयत्न क.; not to give over what is undertaken दम धरणें, पाठपिच्छा न सोडणें [in, with].—PERSEVERANCE उद्योग, दीर्घप्रयत्न, आग्रह; दम, धीर, नेट; *Theol.* continuance in, or conservation of, the Christian character, and the consequent favor of God ख्रिस्ती सद्गुणांत व ईश्वरी कृपेंत टिकून राहणें *n*;—of the saints भक्तांचा टिकाव.

PERSIST *v.* (*-sistere,* to stand) चिकटून -दम धरून राहणें [in]. -ENCY दीर्घ प्रयत्न, व्यवसाय; आग्रह. -ENT *a.* स्थिर, दीर्घप्रयत्नी, व्यवसायी; आग्रही, चिकट.

PERSON (*persona,* mask) *Drama.* character सोंग *n,* रूप *n*; part or character which any one sustains नातें *n,* संबंध, अंग *n*; body शरीर *n,* आंग *n*; a living soul व्यक्ति *f*; a living human being माणूस, मनुष्य *n,* गडी; *Gram.* पुरुष; attendance on the p. शरीरशुश्रूषा *f,* खिजमत *f*; in person साक्षात्, प्रत्यक्ष, जातीनें, खुद; in one's own p. स्वतः. -ABLE *a.* सुरेख, देखणा. -AGE individual distinguished by rank, social position or reputation थोर -संभावित -प्रतिष्ठित मनुष्य; exterior appearance रूप *n,* आकार, डौल; character assumed सोंग *n.* -AL *a.* व्यक्तिसंबंधी पुरुषांचा किंवा बायकांचा; रूपाचा; स्वरूपाचा (charms); peculiar or proper to private concerns खासगत, खासगी; done in person आंगचा, जातीचा, खुद; applying to the character and conduct of individuals in a disparaging manner लावून बोलण्याचा, घालून पाडण्याचा; *Gram.* पुरुषवाचक; *Law.* p. estate जंगममाल, अस्थावर मिळकत *f*; p. pronoun पुरुषवाचक सर्वनाम *n.* -ITY व्यक्ति *f,* स्वत्व *n*; लावून बोलणें *n* -लिहिणें *n.* -LY *ad.* व्यक्तीनें, व्यक्तितः; साक्षात्, प्रत्यक्ष, खुद, साक्षात्, जातीनें: to be p. present. -ATE *v.* सोंग -वेष -मिष घेणें.—PERSONATION वेष धरणें *n,* वेषधारण *n.*—PERSONIFY *v.* अचेतनावर सचेतन धर्माचा आरोप क.—PERSONIFICATION सचेतनधर्मारोप, पुरुषभावारोप;—of time कालमूर्त्ति *f,* कालपुरुष *f*; —of justice धर्ममूर्त्ति *f,* साक्षात् धर्म; —of wealth लक्ष्मी *f*;—of poverty आकाबाई *f.*

PERSPECTIVE *a.* (*-specere,* to look) यथार्थ दर्शन -चित्रलेखन विद्यासंबंधी.—*n.* a glass through which objects are viewed दुर्बीण *f*; the art of drawing objects on a plane so as to make them appear in their relative situation हुबेहुब चित्र काढण्याची विद्या *f,* यथास्थानदृष्ट चित्रलेखनविद्या *f.*—PERSPICACIOUS *a.* quick-sighted कुशाग्र -तीक्ष्णदृष्टि; of acute discernment तीक्ष्णबुद्धि.—PERSPICUITY clearness निर्मळता *f,* स्वच्छता *f*; easiness to be understood सुबोधपणा, सुबोधता *f.*—PERSPICUOUS *a.* निर्मळ, स्वच्छ, प्रांजळ; बाळबोध, सुबोध, व्यक्त.

PERSPIRE *v. i.* (*-spirare,* to breathe) sweat घाम येणें-निवणें-सुटणें; to be evacuated insensibly through the excretories of the skin रोमरंध्रांतून पाझरणें, स्रवणें.—*t.* रोमरंध्रांनीं सोडणें -विसर्जन क.—PERSPIRATION घाम येणें *n,* घर्मस्राव; sweat घाम, घर्म.

PERSUADE *v.* (*-suadere,* to advise) influence by argument or entreaty मनावणें,

मन वळविणें, मथवणें, समजावणें; convince by argument खात्री -समजूत क.—PERSUASION समजूत *f*, खात्री *f*, समजी *f*; मनावणी *f*, बधवणूक *f*; a creed or belief पंथ, संप्रदाय, मत *n*.—PERSUASIVE *a*. समजूत करणारा, मनावणारा, समजुतीचा.

PERT *a*. *W*. lively चपळ, चलाख; bold धीट, उद्धट. -LY *ad*. चपळाईनें; धिटाईनें. -NESS चलाखी *f*, चापल्य *n*; धिटाई *f*, उद्धटपणा.

PERTAIN *v*. *i*. (-*tenere*, to hold) belong -चा असणें; relate संबंध असणें -लागणें [to].—PERTINACIOUS *a*. obstinate हट्टी, दुराग्रही; steady निग्रही, नेटाचा, चिकट [in].—PERTINACITY हट्ट, दुराग्रह; नेट, धीर, दम.—PERTINENT *a*. समयोचित, समर्पक [to].

PERTURB -ATE *v*. (-*turbare*, to disturb) agitate संतापवणें, क्षोभवणें; confuse घोटाळा क. -ATION संताप, क्षोभ, तळमळ *f*; घोटाळा, गोंधळ.

PERUSE *v*. (-*uti*, *uses*, use) लक्ष लावून वाचणें, वाचणें.—PERUSAL *a*. वाचणें *n*, पठण *n*; —of a Purán पारायण *n*.

PERVADE *v*. (-*vadere*, to go) पार जाणें, भेदणें; spread through व्यापणें, वेढणें, ग्रासणें.—PERVASION व्याप्ति *f*, आक्रमण *n*.—PERVASIVE, PERVADING *a*. व्यापक, व्यापी; *pervading* the world जगद्व्यापी; p. all things सर्वव्यापी.—PERVADED व्याप्त [by].

PERVERT *v*. (-*vertere*, to turn) फिरवणें, उलटविणें; corrupt कुमार्गांत आणणें, भ्रष्ट क., बिथरणें [from, to].—*n*. बिघडलेला -भ्रष्ट झालेला मनुष्य.—PERVERSE *a*. हेंकट, हेकेखोर, करनकर; devious वांकडा, वक्र, कुटिल; cross खोडकर, वात्य, द्वाड [in].

PERVIOUS *a*. (-*viâ*, a way) admitting passage भेद्य, प्रवेशनीय; capable of being penetrated by the mental sight शोधनीय, अर्थगम्य [to].

PEST (*pestis*) plague मरी *f*, धाम *f*; anything destructive व्याधि *f*, पीडा *f*. -ER *v*. पिडणें, छळणें; encumber खोडा -लोडणें घालणें; दाटी करून अवघडविणें [with].—PESTIFEROUS *a*. मरगी उत्पन्न करणारा, मरीचा; अपकारक, विषकारक; noxious to peace, to morals, or to society उपद्रवकारक, कुचाळ, कुटाळ.—PESTILENCE मरी *f*. धाम *f*, मरगी *f*.

PESTLE (*pistare*, to pound) मुसळ *n*, बत्ता, दस्ता; p. and mortar खलबत्ता.—*v*. मुसळानें -दस्त्यानें कुटणें.

PET *F*. रागाचा झटकारा.—*F*. लाडका, बगलबिल्ली *f*.—*v*. लाड क. -TISH *a*. चिरडखोर, तिरसट.

PETAL (*Gr*. *petalon*, leaf) पाकळी *f*, दल *n*. -OUS *a*. सदल, पाकळ्यांचा.

PETITION (*petere*, to beg) request विनंती *f*; prayer to the Supreme Being प्रार्थना *f*;—to a person or organized body having to grant the request अर्जी *f*, विनंतीपत्र *n*; paper containing such a request अर्जी *f*, याद *f*, अर्ज, अर्जदास्त; a p. to amend or amplify a preceding p. अर्जीमरमत. —*v*. अर्जी -विनंती क. -ER अर्जदार.

PETRIFY *v*. (*petra*, rock, *facere*, to make) दगड -पाषाण क.; make callous कठीण -निष्ठुर -पाषाणमय क.; fix स्तब्ध -काष्ठवत् क., थिजवणें.—*i*. पाषाणत्व पावणें, दगड होणें. —PETRIFACTION पाषाणीकरण *n*, पाषाणपरिणाम; पाषाण झालेला पदार्थ, कृत्रिमपाषाण. —PETROLEUM (-*oleum*, oil) मातीचें तेल *n*.

PETTICOAT *F*. लंघा, घागरा.

PETTIFOGGER *F*. हलका -छोटेखानी वकील.

PETTY *a*. *F*. small लहान; inferior हलका, क्षुद्र, येरशेर.

PETULANT *a*. (*petere*, to fall upon) peevish चिरडखोर, तिरसट; wanton छांदिष्ट,

लहरी.—PETULENCE तिरसटपणा, तिरतिरेपणा, खिसखीस *f.*

PEW *F.* inclosed seat in a church देवळांत बसायाची कठड्याची जागा *f.*

PEWTER *F.* जस्त *n*; जस्ताचीं भांडीं *n pl.*

PHAETON (*Phaethon*) एक प्रकारची गाडी *f*, 'फेटन' *f.*

PHALANX (*Gr.*) फौजेची एक प्रकारची रचना *f*, सेनाव्यूह, गट्ट.

PHANTOM (*Gr. phantacein*, to make visible) छाया *f*, आभास *f*; ghost भूत *n*, प्रेत *n*.

PHARISEE (*Heb. pârash*, to separate) यहुदी लोकांच्या एका पथांतील मनुष्य, परोशी.—PHARISAICAL *a.* परोशी लोकांचा, दांभिकभक्तीचा.

PHARMACY (*Gr. pharmakon*, medicine) औषधें तयार करण्याची विद्या *f*, औषधक्रिया *f.*—PHARMACOPÆIA औषधें तयार करण्याच्या विषयावरचा ग्रंथ, औषधक्रियाकल्प.

PHARYNX (*Gr.*) upper part of the gullet below the larynx ससपथ.

PHASE (*Gr. phasis*) appearance दर्शन *n*;—of the moon चंद्राचा प्रकाशित भाग, कला *f.*

PHENIX *F.* [a bird fabled to exist single, and to rise again from its own ashes, and hence used as an emblem of immortality].

PHENOMENON (*L.*) appearance देखावा, दर्शन *n*; unusual appearance अद्भुतदर्शन *n*, चमत्कार; any thing visible दृष्टिविषय.

PHIAL (*phiala*) शिशी *f*, कुपी *f.*

PHILANTHROPHY (*Gr. philos*, loving, friend, *anthropos*, man) जनप्रीति *f*; benevolence toward the whole human family लोकोपकारबुद्धि *f*, परनिष्ठा *f.*—PHILANTHROPIST परोपकारी, जगन्मित्र.

PHILIPPIC (*Gr. Philippikos*, belonging to Philip) discourse or declamation abounding in acrimonious invective निर्भर्त्सनात्मक भाषण *n.*

PHILOLOGY (*Gr. -philos*, loving, *logos*, speech) शब्दविद्या *f*, शब्द -भाषाशास्त्र *n.*—PHILOLOGIST भाषाशास्त्रज्ञ.

PHILOSOPHY (*Gr. -sophia*, wisdom) love or search after wisdom ज्ञानाची प्रीति *f* किंवा शोध; explanation of the reasons of things तत्त्वज्ञान *n*, विज्ञान *n*, ज्ञान *n*; moral p. नीतिशास्त्र *n*; natural p. पदार्थविज्ञान *n*; logical p. तर्कविद्या *f*, न्यायशास्त्र *n*; particular system or theory तत्त्वज्ञानाचा सिद्धांत -उपपत्ति*f* -मत *n.*—PHILOSOPHER तत्त्वज्ञानी, तत्त्वबोधक; *philosopher's* stone परीस.—PHILOSOPHIC *a.* तत्त्वज्ञानाचा, विज्ञानाचा, ज्ञानाचा (pride); skilled in philosophy तत्त्वज्ञाननिपुण.—PHILOSOPHIZE *v.* तत्त्वविचार क.—PHILOSOPHIST, See SOPHIST.

PHILTER (*Gr. philein*, to love) potion or charm intended to excite love वशीकरण औषध *n* किंवा मंत्र.—*v.* वश क., मोहिनी घालून वश क.

PHLEBOTOMY (*Gr. phlebos*, a vein, *temein*, to cut) शिरा तोडणें *n*, शिरावेध.

PHLEGM (*phlegma*, flame) watery humor of the body कफ, श्लेष्मा; dullness सुस्ती *f*, थंडाई *f*, जाड्य *n.* -ATIC *a.* कफाचा, कफविषयींचा; कफकारक, कफोत्पादक (meat); कफमय, कफाचा;—constitution कफप्रकृति *f*; cold थंड, -सुस्त (temper).

PHONICS (*Gr. phoné*, sound) ध्वनिशास्त्र *n.*

PHOSPHORUS (*Gr. phos*, light, *phorein*, to bring) the morning star शुक्र; an elementary substance एक तत्त्व आहे, 'फासफरस.'

PHOTOGRAPHY (*Gr. photos, graphein*, to write) science of the action of light on bodies पदार्थांवर प्रकाशाच्या क्रियेची विद्या *f*; art of producing pictures of objects by the action of light on chemically prepared surfaces; or the art of receiv-

ing and fixing on such surfaces the images formed by the camera 'फोटोग्राफी' -ची विद्या *f*, सूर्यकिरणाच्या योगानें चित्र काढण्याची विद्या *f*.

PHRASE (*Gr.*) *phrasein,* to speak) short, pithy expression वाक्य *n*, झण *f*, चुटका; mode of speech भाषणसंप्रदाय. -OLOGY बोलण्याची धाटणी *f* -धरती *f*.

PHRENETIS (*L.*) inflamation of the brain, attended with acute fever and delirium सन्निपातज्वर; frenzy उन्माद, वेड *n*.

PHRENOLOGY (*Gr. phrenos,* mind, *logos,* discourse) the theory that the mental faculties are shown on the surface of the head or skull कपालसामुद्रिक *n*, कपाललक्षणविद्या *f*; [the science of the special functions of the parts of the brain].

PHTHISIS (*Gr.*) क्षयरोग.

PHYLLANTHUS LONGIFOLIUS हरपररेवडी *f*; P. Niruri भुईअंवळी *f*.

PHYSIC (*Gr. phusis,* nature) art of healing diseases वैद्यक्रिया *f*, वैद्यकी *f*; remedy for diseases औषध *n*, औषध उपचार; a purge जुलाबाचें औषध *n*, जुलाब.—*v.* औषध उपचार क., औषध पाणी देणें.—*pl* science of natural objects सिद्धपदार्थविज्ञान *n*. -AL *a.* सिद्धपदार्थविज्ञान संबंधी; corporeal शरीराचा, मूर्त्त, भौतिक; natural स्वाभाविक.—PHYSICIAN वैद्य; one who heals moral diseases पापहारक वैद्य, प्राणाचार्य.

PHYSIOGNOMY (*Gr. -gnomon,* a judge) art or science of discerning the character of the mind from the features of the face मुखसामुद्रिक *n*; the countenance, with respect to the temper of the mind मुख *n*, तोंडवळा, मुद्रा *f*.

PHYSIOLOGY (*Gr. -logos,* a discourse) the science which treats of the functions of animals and plants प्राणी आणि वनस्पति यांचे गुणधर्म जाणण्याची विद्या *f*, प्राणिगुणधर्मशास्त्र *n*.

PIAZZA *It.* covered walk supported by columns छावणीचा रस्ता, मंडप पथ.

PICK* *v.* peck at, like birds with their bills बोचणें, टोंचणें; pull off with the fingers खुडणें, तोडणें, खुटणें; clean by picking from निसणें, निवडणें; take up by a quick, pointedly directed movement वेंचणें, टिपणें; cull निवडणें; collect जमा क., उचलणें; up कोरणें (the teeth); उकरणें (the nose); सळईनें -खिळ्यानें उघडणें (a lock); सहज चालतां चालतां मिळवणें, उचलणें, सांपडणें, गवसणें;—a quarrel कज्जा उकरणें -विकत घेणें;—a hole in one's coat छिद्र -दोष पाहणें.— *i.* eat slowly चाखतमाखत खाणें; do any thing nicely चोख -बारकाईनें क.; steal चोरणें.—*n.* a sharp pointed tool कोरणें *n*; a tooth p. दांतकोरणें *n*; an iron tool पिकांव *n*; choice निवड *f*, आवड *f*. -AXE पिकांव *n*. -BACK *ad.* पाटकुळी. -ING खुडणें *n*, खुडणी *f*; खाणें *n*, हरामखोरी *f*; *pl* अवांतर प्राप्ति *f* -मिळकत *f*; illicit p. खाद *f*. -LOCK कुलूप काढायाची सळई *f*; person who picks locks सळईनें कुलपें उघडणारा. -POCKET खिसेकातरू -कातरणारा, भामट्या.

PICKET *F.* stake मेख *f*, खुंटा; guard placed before an army छबीना, वलावा; punishment which consists in making the offender stand with one foot on a pointed stake मेखेवर उभा करण्याची शिक्षा *f*.—*v.* खुंट्यांनीं -शीं खिळवणें; fence with narrow, pointed boards मेखांनीं कुडणें.

PICKLE *D.* solution of salt and water in which fish and meat may be preserved खार, खारवणी *f*; any article of food which has been preserved in vinegar लोणचें *n*; troublesome child त्राग्य -त्रासदायक पोर; to be in a p. गव्हाट्यांत पडणें,

चवचव होणें, फटफजिती होणें.—*v.* लोणचें-खार घालणें -क.; imbue highly any thing bad निसविवणें; a *pickled* rouge चोराचा अर्क.

PICNIC *F.* an entertainment carried by a party on an excursion of pleasure into the country वनभोजन *n*, रानजेवण *n*.

PICTURE (*pingere*, to paint) that which is painted चित्र *n*, तसबीर *f*; art of printing चित्रविद्या *f*; image प्रतिमा *f*, रूप *n*. —PICTORIAL *a.* चित्राचा, चित्रयुक्त, चित्रलिखित.—PICTURESQUE *a.* चित्रा सारखा, चित्रवत् -सदृश;—a country पर्वत, वन, नदीमिश्रित देश.

PIE *D.* एक पक्वान्न आहे.—*F.* एक पक्षी आहे. -BALD *a.* चित्रविचित्र, अबलक, कबरा.

PIECE *F.* fragment तुकडा, कुटका; portion भाग, वांटा, अंश; individual article डाग, डागिणा, नग; gun तोफ *f*; musket बंदूक *f*; coin नाणें *n*; a p. दर असामीस, प्रत्येकास; of a p. एकसारखा; of one p. एकसलग, अखंड; a p. of song गाण्याची चीज *f* -चा चुटका;—of work काम *n*;—of composition ग्रंथ, प्रबंध; *pl* तुकडेताकडे *pl*; चाराचुरा; to break in *pieces* तुकडे तुकडे -चुरा क.; to fall to *pieces* कोसळणें, ढासळणें, निखळणें (a building, &c.); ओघळणें, सुटणें (wreath, &c.); *apiece* तुकडे तुकडे करून; p. learning टाणाटोणा.—*v.* तुकडा जोडणें, सांधा देऊन वाढविणें; patch ठिगळ देणें; join जोडणें. -LESS *a.* अखंड, सलग, बिनजोड. -MEAL *ad.* तुकडे तुकडे करून, खंडशः; by piece थोडे थोडे, अंशतः.—*a.* तुकड्यांचा केलेला.—*n.* तुकडा, कुटका. -WORK खंडकाम *n*.

PIER* column to support the arch of a bridge मनोरा, धिरा, पुलाचा खांब; mole projecting into the sea धक्का.

PIERCE *v. F.* thrust into or transfix with a pointed instrument टोंचणें, भोंसकणें; penetrate शिरकवणें, भेदणें, प्रवेश क.; touch, as the affections लागणें, मनास लागणें, चित्त वेधणें; dive into, as a secret or purpose रहस्य पाहणें, गुज समजणें, मनांतील आशय जाणणें [through].—*i.* रुतणें, बोचणें, शिरणें; रहस्य समजणें.—PIERCING *a.* टोंचणारा, वेधक, भेदक; biting कडक, कडकडीत (cold); thrilling कर्कश, किर्र (sound).

PIETY (*pietas*) filial reverence मातापितृभक्ति *f*; affectionate reverence of friends, or country देशबांधवप्रीति *f*, स्वदेशभक्ति *f*; reverence of the Supreme Being and love of his character ईश्वरभक्ति *f*, धर्मनिष्ठा *f*, धर्मशीलता *f*.—PIETISM भक्तीचें देव्हारें *n*, पोम *n*.—PIETIST भक्तीचा अभिमानी, भक्तीचें पोम बाळगणारा, दांभिक.

PIG *D.* young sow डुकराचें पोर *n*, डुकरूलें *n*; [an oblong mass of cast iron or other metal, as first extracted from the ore, and weighing from 50 to 250 lbs]. -HEADED हेकड, तेडा, बांका. -STY डुकरवाडा.

PIGEON *F.* कबुतर *n*, कपोत; milky white p. कागदी कबुतर *n*; grey colored p. पारवा. -HEARTED *a.* भित्रा, भ्याड. -HOUSE खुराडें *n*, खबुतराचें घर *n*. -HOLE खुराड्याचें दार *n*; little opening or division in a case for papers घर *n*, खण, पूड *n*.

PIGMENT (*pingere*, to paint) रंग; [wine that is highly spiced and sweetened with honey].

PIGMY (*Gr. pugmé*, fist) बुटबैंगण *n*, वामनमूर्ति *f*.

PIKE *F.* spear भाला, बर्ची *f*. -MAN बर्चीवाला, भालेकरी, शूलपाणि. -STAFF भालेकाठी *f*.

PILASTER (*pila*, pillar) चौकोनी खांब, चौधारी खांब, चतुष्कोनस्तंभ.

PILE (*pila*, ball) heap रास *f*, ढीग, गंज; a mass regularly formed by rows and layers थर, शेज; mass designed for a

special use, as for burning a corpse सरण *n*, चिता *f*; edifice इमारत *f*, वाडा; as of pitchers, shot, &c. उतरंड *f*, डाळा; *pl* मूळव्याधि *f*, मूळव्याध *f*.—(*pila*, pillar) large stake driven into the earth रोवलेला खांब, मेढ *f*, खुंट.—*v*. रास -ढीग क.; खुंट रोवणें -पुरणें; [to p. arms or muskets, to place three guns together in such a manner that they may stand upright steadily] [up, on].

PILE (*pilus*, hair) केंस, सड; nap फूल *n*.

PILFER *v. i. F.* भुरट्टेचोरी क., उपटणें, उचलणें, ताव देणें, -वर हात -पट्टा मारणें. -ER भामट्या, भुरट्टेचोर.

PILGRIM (*peregrinus*, a foreigner) traveller प्रवासी, मुशाफर, पांथिक; one who travels to a distance from his own country to visit a holy place, or to pay his devotion to the remains of dead saints यात्रेकरू, तीर्थकरू. -AGE यात्रा *f*, तीर्थाटन *n*; periodical p. वारी *f*; one that performs it वारकरी; p. to Benares काशीयात्रा *f*.

PILL (*pila*, ball) औषधाची गोळी *f*, गोळी *f*. —*v. F.* लुटणें, नागवणें. -AGE लूट *f*.—*v*. लुटणें, बुचाडणें, धुऊन नेणें.

PILLAR (*pila*) column खांब, स्तंभ; that which resembles a pillar स्तंभाकार वस्तु *f*, सोट, लोळ: a p. of smoke or fire; a character which resembles such a pillar in stability and strength धीरपुरुष, धीर, आश्रय, खांब, हात.

PILLORY *F.* खोडा; हात आणि मान अडकविण्याचा खोडा, हात -मानखोडा.

PILLOW *F.* उसी *f*, तक्या, लोढ *n*. —*v*. उशीवर टेंकणें, टेंकणें, ओटंगणें. -CASE उशीची गवसणी *f*.

PILOT *F.* one who steers a ship जहाजास वाट दाखवून बंदरांत आणणारा, किंवा बंदरा बाहेर नेणारा, बंदरवाटाडी; guido वाटाडी, सारथी.—*v*. जहाजास वाट दाखविणें; अडचणींतून वाट दाखवून नेणें. -AGE बंदरवाटाड्याचें वेतन *n* -ची दस्तुरी *f*.

PIMENTO *Sp.* Myrtus p. कंकोळ.

PIMP *F.* कुंटन *f*, भडवा.

PIMPLE* पुळी *f*, पुटकुळी *f*.

PIN (*pinna*, pinacle) peg खुंटा, खुंटी *f*; small pointed instrument for fastening clothes टांचणी *f*; linch-p. चाकाची -आंसाची खीळ *f*, bolt खीळ *f*, सळई *f*; a trifle काडी *f*, कवडी *f*, नखभर माती *f*; *Med.* obscurity of vision dependent upon a speck in the cornea सडी *f*.—*v*. टांचणी -खीळ लावणें -घालणें, टांचणीनें अडकविणें [up, to].

PINCH *v. F.* squeeze between the ends of the fingers चिमटणें, चिमटा घेणें; squeeze between two hard bodies चेंगरणें, चिरडणें; distress अडचणींत -कातरींत घालणें -आणणें; the belly पोट मारणें -बांधणें, उपासमारा क.; as clothes दाटणें, अडस होणें.—*n*. चिमटी, चिमखुरा;—of snuff, &c. चिमूट *f*, चिमटी *f*; अडचण *f*, सकट *n*, चिमटा; to be *pinched* अडचणींत पडणें.—PINCHERS *pl*. चिमटा, सांडस.

PINE (*pinus*) एक वृक्ष आहे, देवदारू. -APPLE the plant अननस *f*;—the fruit अननस *n*.

PINE* *v. i.* languish झुरणें, खितपणें, धुपणें, झिजणें; languish with desire खंत घेणें -धरणें, टाहो -छंद घेणें.—*t*. झिजवणें, झुरवणें; -ची खंत धरणें -घेणें -बाळगणें; bemoan in silence आंतलें आंत -मनांत दुःख क.

PINION (*pinna*, feather) पंख *n*; joint of a bird's wing पंखाचा सांधा; band for the arms मुसक्या बांधण्याची काढणी *f*; a smaller wheel with teeth working into the teeth of a larger wheel मोठ्या चाकाच्या दात्यांत फिरणारें लहान चाक *n*.—*v*.

पंख बांधणें; cripple by cutting off the first joint of the wing पंखाचा सांधा कापून लंगडा -लुला क.; मुसक्या बांधणें, चतुर्भुज क.; chain सांखळणें, सांखळीनें बांधणें [down].

PINK *D.* a color गुलाबी -प्याजी रंग; [a plant and its flower] श्वेतरक्त वर्ण anything supremely excellent श्रेष्ठ, उत्कृष्ट, असल. —*v.* लहान लहान भोंकें पाडणें. -EYED *a.* लहान डोळ्यांचा, गजनयन.

PINNACLE (*pinna,* feather) high spiring point शिखर *n,* कळस;—of a building गृहशिखर *n.*—*v.* कळस -शिखर बांधणें.

PINT* १२ औंस किंवा ३० तोळे म्हणजे एक पैंट; half a quart अर्धी बाटली *f.* दीडपाव.

PIONEER *F.* one who goes before to clear the way for others दुसऱ्या करितां पुढें जाऊन वाट तयार करणारा, अग्रगामी;—of an army बेलदार, 'पायनेर.'

PIOUS *a.* (*pius*) having affectionate or filial reverence for parents पितृभक्तिशील -परायण; having reverence and love toward the Supreme Being धार्मिक, भक्तिवान, धर्मशील, ईश्वरसेवा -धर्मनिष्ठ; proceeding from religious feeling भक्तिभावाचा, धर्मनिष्ठेचा, भक्तिमूलक; practised under the pretence of religion धर्माच्या निमित्तानें केलेला, ढोंगाचा, दांभिक भक्तीचा. -LY *ad.* भक्तिबुद्धीनें, ईश्वरनिष्ठेनें.

PIPE* wind instrument of music पांवा, वेणु; long tube नळी *f*;—as a conductor of water पऱ्हळ, नळ, नळी *f*;—for smoking tobacco हुक्का, चिलीम *f n,* चुट्टा; cask पींप *n.*—*v.* पांवा वाजवणें. -CLAY खडू *f,* शाडू *f.* —PIPER पांवा वाजविणारा, मुरलीधर.

PIQUE *F.* feeling of annoyance or resentment awakened by a social slight or injury चीढ *f,* रुसवा; keenly felt desire खुरखूर *f,* खंत *f*; nicety बारीक गोष्ट *f.*—*v.* चिथवणें, चिरडीस आणणें; stimulate अभिमानास घालणें, हटास पेटवणें;—one's self upon अभिमान -बाणा बाळगणें.—PIQUANT *a.* stimulating to the tongue खमंग, चणचणीत; pungent चरमरीत, खारटतुरट (railleries).—PIQUANCY चणचणीतपणा, चरमरीतपणा.

PIQUET, See PICKET.

PIRATE (*Gr. peira,* to attempt) robber in the high seas समुद्रावरचा -समुद्रांतला लुटारू, चांचा; ship employed in piracy चांच्याचें -लुटारू गलबत *n*; one who infringes the law of copyright, or publishes the writing of other men without permission ग्रंथ -विद्याचोर.—PIRACY समुद्रावरचा दरवडा, चांचेपणा.—PIRATICAL *a.* चांच्याचा; चांचेपणा करून मिळवलेला.

PISCES (*piscis,* a fish) *Astron.* मीन रास *f.*—PISCIVOROUS *a.* मासे खाणारा, मत्स्याहारी, मत्स्यभक्षक.

PISH *int.* छीः, छ, छत्, फीस्.

PISMIRE *D.* मुंगी *f.*

PISS *v. i. D.* मुतणें.—*n.* मूत *m, n.*

PISTACHIO *Per.* पिस्ता.

PISTIL (*pistillum,* pestle) *Bot.* फुलांतील केसर, मध्य -स्त्रीकेसर.

PISTOL *F.* तमंच्या, 'पिस्तूल' *n.*

PISTON (*pinsere,* to pound) दट्टा.

PIT* large deep hole in the ground खळगा, खाडा, खांच *f*; hell नरक; grave प्रेताची खांच *f,* शवगर्ता *f*; snare for wild beasts, made by concealing a hole in the ground सावजें धरण्याचा खळगा; whatever ensnares सांपळा, फांस; hollow place under the arm काख *f,* बगल *f*; hollow of the stomach शिंप *f,* उराची खळगी *f*; mark left on the flesh by a postule of the small-pox देवीचा वण; lowest place in a theatre where spectators assemble अंगण *n*; as in a stone,

wood, &c. खोंच *f*;—as of chalk, stone, clay, &c. खाण *f*.—*v.* खळ्या -खांचा पाडणें. -A-PAT धडधड, धसधस, बाकबूक *f*, माटमूट *f*. —*ad.* बाकबूक, धडधड, &c. -COAL खनिज कोळसा. -FALL pit slightly covered for concealment, and intended to catch wild beasts and men चोरखळी *f*.

PITCH* राळ *f*.—*v.* राळ लावणें; blacken काळें क. -DARK *a.* (अंधार) गडत.

PITCH *F.* point टोंक *n*; degree of elevation उंचीचें मान *n*, महत्त्वमान *n*;—of a note or voice गळा, सूर, स्वर; slope उतरण *f*; a fall पडणें *n*, पतन *n*; highest p. पराकाष्ठा *f*, कळस; to such a p. एथवर -पावेतों.

PITCH* *v.* throw झुगारणें, फेंकणें;—a tent देणें, उभा क.;—tune सूर धरणें; fix the price of किंमत बसविणें; *pitched* battle, battle in which the hostile forces have a fixed position ठाणावरची लढाई *f*.—*i.* light उतरणें, बसणें, तळ देणें; fall headlong डोईकडून पडणें; fix choice पसंत क., निवडून घेणें: to p. upon the best course of life; encamp डेरा -तळ -तंबु देणें, राहुटी ठोकणें. -FARTHING a play in which copper coin is pitched into a hole गलकवड्या *f pl*, अगलझ्याप (*H*). -FORK *a.* fork used in throwing hay or sheaves of grain in loading or unloading खाचेरा, टोंचणी *f*.

PITCHER *F.* घागर *f*, घडा, मडकें *n*.

PITH* the soft, spongy substance in the centre of many plants and trees गर, मोख, गीर; marrow मगज, मेंदू; strength बळ, बळकटी *f*; essence सार, *n* तत्त्व *n*, कस. -LESS *a.* गरावेगळा; निसत्त्व, फुसका, पोकळ.—PITHINESS बळकटी *f*, तेज *n*, सत्त्व *n*.—PITHY *a.* गाभाचा, गिराचा; जिवट, कसदार, रसिक (word).

PITTANCE *F.* charity, gift धर्मादाय; allowance of food, bestowed in charity सिधा, शेरपीठ *n*, मोताद *f*; any small allowance हलकी मोताद *f*; small quantity थोडा भाग, अल्पांश.

PITY (*pietas*) the feeling or suffering of one person, excited by the distress of another दया *f*, करुणा *f*, काकळूत *f*; ground of pity दयेस कारण *n*, दयाहेतु.—*v.* दया क., कींव -काकळूत येणें [for].—PITEOUS *a.* काकळुतवाणा, दीनवाणा; compassionate दयाळू.—PITIFUL *a.* कृपाळू, दयाळू, कनवाळू, (James v., 11); काकळुतवाणा, बापुडवाणा (condition); contemptible हलका, फुसका, नाकारा.—PITILESS *a.* निर्दय, दयाहीन.

PIVOT *F.* a pin on which any thing turns कांटा.

PLACABLE *a.* (*placere*, to please) सांत्वन करण्यास योग्य, सांत्वनीय; willing to forgive क्षमाशील.

PLACARD *F.* प्रसिद्ध ठिकाणीं (बाजारांत, चावडीवर वगैरे) चिकटवलेला -लावलेला जाहीरनामा. —*v.* प्रसिद्ध स्थळीं जाहीरनामा लावणें; post, as a libel निंदेचा जाहीरनामा लावणें.

PLACE *F.* open space मोकळी जागा *f*, मैदान *n*; broad way in a city चव्हाटा; site जागा *f*, ठिकाण *n*; rank जागा *f*, पदवी *f*; official post जागा *f*, असामी *f*, काम *n*; elegant dwelling वाडा, महाल, स्थान *n*; village, town, or city गांव: are you a native of this p.? country मुलूख, देश; stronghold गढी *f*, बंदोबस्ताची जागा *f*; opportunity प्रसंग, सवड *f*; passage of a written or printed document स्थळ *n* (Acts viii. 12); vacated space रिकामी -खाली जागा *f*, जागा *f*; reception; implying the making room for पैस जागा करणें *n*, जागा *f*; *Astron.* position in the heavens, as of a heavenly body स्थान *n*; to give p. जागा देणें; वाट देणें; दबणें, हात टेंकणें; to take p. घडणें; to take the p. of

-ची जागा घेणें, -चा बदली होणें-राहणें; in the first p. पहिल्यानें, मुळीं, पहिलें; in the second p. दुसऱ्यानें; in the next p. पुनः,अणखी; in this p. एथें, ह्या ठिकाणीं -जागीं; out of p. भलत्याच जागीं, अन्यस्थळीं; पदच्युत; in one p. एकत्र.—*v.* ठेवणें, स्थापणें; put in an office जागीं -जाग्यावर नेमणें, ठेवणें, नेमणें; put out at interest व्याजीं -व्याजावर ठेवणें; ascribe लावणें, आरोपणें: I *placed* them to a wrong motive.

PLACENTA (*L.*) *Anat.* the soft spongy disk which connects the mother with the fetus in the womb वार *f.*

PLACID *a.* (*placere,* to plead) शांत, सौम्य, सुमनस्क. -ITY सौमनस्य *n,* सौम्यता *f.*

PLAGIARY (*plagium,* kidnapping) thief in literature ग्रंथचोर, काव्यचोर.—PLAGIARISM ग्रंथचौर्य *n.*

PLAGUE (*plaga,* a blow) afflictive evil or calamity अनर्थ, अरिष्ट *f;* pestilence मरी *f,* मरगी *f,* धाम *f;* vexation पीडा *f,* खटराग *f,* पलिस्त *n,* कंटक.—*v.* मरीनें पिडणें; जाचणें, गांजणें [with, by].

PLAIN *a.* (*planus*) flat सपाट, सारखा; open साफ, उघडा; evident स्पष्ट, व्यक्त, उघड; simple साधा, साधारण रूपाचा, मध्यम (countenance); unsophisticated साधा, भोळा, बाळबोध (people); open सरळ बुद्धीचा, धोपट मार्गाचा, सरळ (character); not rich साधा (diet); not ornamented साधा (pattern of cloth).—*n.* level land मैदान *n,* पटांगण *n,* माळ; field of battle रणांगण *n,* रणभूमि *f.*—*v.* सपाट क. -DEALING उघड -धोपट मार्ग.—*a.* धोपटमार्गी, धोपटमार्गाचा, खरा, साबडा (man). -LY *ad.* साधे रीतीनें, साफ, स्पष्ट; खणखणीत, धडधडीत, निष्कपट.—PLAINT complaint रड *f,* फिर्याद *f;* private memorial tendered to a court पूर्वपक्ष -वाद. -IFF वादी, पूर्ववादी. -IVE *a.* बापुडवाणा, किलवाणा; indicative of grief दुःख -खेदसूचक.

PLAIT *W.* fold चुणी *f,* निरी *f,* घडी *f;* braid वेणी *f.*—*v.* चुणणें, निऱ्या क.; वेणी घालणें, विणणें [together].

PLAN *F.* draught बेत, नमुना, नकशा; scheme मसलत *f,* कल्पना *f,* तजवीज *f,* उपाय.—*v.* कल्पना -मसलत क.; बेत -नकाशा काढणें [out].

PLANE *a.* (*planus*) सपाट,समतल.—*n. Geom.* क्षेत्र *n,* तल *n,* पातळी *f;* inclined p. उतरण *f;* tool for smoothing boards रंधा, रोखणें *n;* bead-p. रंधागोलची *f.*—*v.* सारखा -सपाट क.; रंधणें, रंधा फिरविणें.

PLANET (*planeta*) a heavenly body which revolves round the sun ग्रह. -ARY ग्रहाचा; consisting of planets ग्रहमय, ग्रहांचा (system); *Astrol.* under the influence of a planet ग्रहवश, ग्रहाच्या दशेंतला (hour); having the nature of a planet ग्रहधर्मक, ग्रहाच्या गुणाचा; revolving फिरणारा, फिरता; produced by planets ग्रहांपासून झालेला (plague). -STRICKEN, -STRUCK *a.* ग्रहदशा लागलेला, ग्रहपीडित.

PLANK (*planca*) फळी *f,* फळें *n,* तक्ता.—*v.* पाटणें -तक्तपोसी क.

PLANT (*planta*) a vegetable झाड *n,* वनस्पति *f;* young tree रोप, रोपा.—*v.* put in the ground and cover, as seed for growth लावणें, रोपणें, रुजत घालणें, बीं लावणें -पेरणें; set in the ground for growth, as a young tree लावणें, रोपा लावणें; furnish with plants झाडें लावणें, बाग क. (a garden); settle वसाहत क., वसवणें (a colony); introduce and establish the principles of चालू क., स्थापणें: to p. Christianity among the heathens; set firmly रोवणें, पुरणें, नेमणें (a post); point रोखणें, लावणें (a cannon). -ATION place planted बाग, बन *n,* बाफा *n;*—of vegetables मळा;—of cocoanut or beetlenut trees आगर *n;* —of sugarcane, &c. थळ *n;* colony वसा-

हत *f*. -ER लावणारा, लावणी करणारा; रोवणारा, पुरणारा; one who owns a plantation फडकरी, बागवान -वाला, थळकरी.

PLANTAIN (*plantago*)—the tree केळ *f*, केळीचें झाड *n*;—the fruit केळें *n*.

PLASH *D*. डबका, डबकें *n*.—PLASHY *a*. डबक्याचा, पाणथळाचा.

PLASTER* composition used to cover walls or cast figures गिलावा; *Med.* मलमपट्टी *f*, 'पलास्तर' *n*.—*v*. गिलावा क., लेप देणें; मलम लावणें, पलास्तर मारणें [over].—PLASTIC *a*. having the power to give form to a mass of matter आकार -रूप देणारा, घडवणारा: the p. hand of the Creator; capable of being moulded वळण घेण्याजोगा, वळविण्याजोगा (material).

PLAT *F*. विणकाम *n*.—*v*. विणणें, गुंफणें.—(*Gr. platus*) piece of flat even ground तक्ता, वाफा. -FORM सपाटीचा -भुईचा नकाशा; flat floor raised above the ground माळा, मंचक, 'प्लाटफार्म'; *Mil.* मोर्चा.

PLATE (*Gr. platus*, broad) flat piece of metal पत्रा, तगट *n*; dishes, cups, &c., wrought in gold or silver रुपेरी सामान *n*, चांदीचीं -सोन्याचीं भांडीं वगैरे; metallic ware which is plated मुलाम्याचीं भांडीं *n pl*; small shallow vessel तबक *n*, ताट *n*, पितळी *f*, थाळी *f*;—of wood or earth परळ *n*;—of China बसी *f*; piece of metal on which anything is engraved कोरींव पत्रा; impression from an engraved piece of metal कोरींव पत्र्यावरून छापलेली प्रत *f*; printed picture छापलेलें चित्र *n*.—*v*. मुलामा चढवणें, रुपेरी -सोनेरी लेप देणें; beat into thin flat pieces ठोकून पातळ पत्रे क. [over].—PLATTER परात *f*;—of wood or earth परोळ *n*, परळ *n*.

PLATINA *Sp*. एका प्रकारची धातु आहे.

PLAUDIT (*plaudere*, to praise) शाबासकी *f*, वाहवा *f*.—PLAUSIBLE *a*. शाबासकी देण्याजोगा; superficially pleasing तोंडावर गोड, लाघवी; specious वरपडीचा, देखणाऊ, वरपंकी चांगला (doctrine); using specious arguments लाघवी, गोडगोड गोष्टी सांगणारा (a man).—PLAUSIBLY *ad*. चांगला, पसंत वाटायाजोगा.

PLAY* *v. i.* sport खेळणें, क्रीडा क; trifle गमणें, खेळणें, रमणें; contend in a game खेळणें; gamble जुगार खेळणें; perform on a musical instrument वाजवणें, वाद्य वाजवणें; act खेळणें, चालणें, व्यापार क.: engines p. against a fire; personate a character सोंग घेणें, सोंग घेऊन खेळणें -बतावणी क., -होऊन with another verb: to weep and p. the woman बायको होऊन रडणें; wanton खेळणें, नाचणें.—*t*. खेळवणें, चालवणें; वाद्य वाजवणें, बजावणें; सोंग आणणें, संपादणी -बतावणी क.; खेळणें (a game).—*n*. any exercise or series of actions intended for pleasure, amusement, or diversion खेळ; amusement करमणूक *f*, क्रीडा *f*, गमत *f*, खेळ; practice of contending for victory डाव, खेळ, हात; action क्रिया *f*, चेष्टा *f*, व्यापार; dramatic composition नाटक *n*; motion व्यापार, चलन *n*; room for free motion अवकाश, सवड *f*, अवसर; dramatic show नाटक *n*, खेळ, तमाशा. -BOOK नाटक *n*, चंपू. -DAY सुटीचा दिवस, सुटी *f*. -ER खेळणारा; सोंगआणणारा, सोंगाड्या; वाजविणारा, वाजंत्री. -FELLOW खेळगडी, सवंगडी. -FUL *a*. खेळकर, मौज्या. HOUSE नाटकशाळा *f* -गृह *n*. -MATE खेळगडी, सवंगडी.

PLEA (*placere*, to please) that which is advanced in pleading निमित्त *n*, कारण *n*, सबब *f*; *Law* उत्तरवाद, प्रतिवादीचा जबाब, उत्तर *n*; lawsuit खटला, कज्जा; urgent prayer आग्रहाची प्रार्थना *f*, मिन्नत *f*.—PLEAD *v. i.* पक्ष धरून बोलणें; urge reasons for

or against a thing पुरावा देणें, दाखविणें; *Law*, तकरार क. -सांगणें, वादीस उत्तर देणें; खटला चालविणें.—*t.* प्रमाण-पुरावा देणें, प्रमाणार्थ पुढें क. -सांगणें; प्रतिपादन क.; वाद -खटला चालविणें. -ER पक्ष धरून बोलणारा, वाद सांगणारा; वकील, 'प्लीडर.' -INGS *pl.* वादी प्रतिवादी यांची तकरार *f.*

PLEASE *v.* (*placere*) gratify संतोषविणें, खुष -रंजन क.; satisfy समाधान -संतोष क.; to be *pleased* in or with मान्य -पसंत क., आवडणें [by, with].—*i.* चहाणें, आवडणें, मर्जीस येणें -उतरणें;—in entreaty or courtesy कृपाकरून: p. to give me my book.—PLEASANT *a.* गोड, चांगला, मनोरम; cheerful आनंदी, रंगेला, विनोदी (fellow). -LY *ad.* आनंदानें, खुशालीनें. -RY थट्टा *f,* मस्करि *f,* विनोद; lively talk मस्करीचें भाषण *n,* विनोदोक्ति *f.*—PLEASING *a.* सुखकर, संतोषकारक, मनोरंजक.—PLEASURE, gratification of the senses or of the mind सुख *n,* आनंद, संतोष; frivolous or dissipating enjoyment ख्यालखुशाली *f,* ऐषआराम; sensual gratification विषयसुख -भोग; sexual p. अंगसुख *n*; choice मर्जी *f,* खुशी *f*; favor मेहेरबानी *f.* -GROUND ऐषआरामाची -विलास करण्याची जागा *f,* रमणा, क्रीडास्थळ *n.*—PLEASURABLE *a.* (See PLEASING).

PLEBIAN (*pleb, plebis,* common people) साधारण लोकांतला एक; साधारण लोक *pl.*—*a.* साधारण लोकांचा.

PLEDGE *F.* a pawn गहाण *n*; anything given as security for the performance of an act तारण *n,* हडप *n*; surety जामीन; hostage ओल *f.*—*v.* गहाण ठेवणें -लावून देणें; तारण ठेवणें; ओलीस लावणें-ठेवणें -देणें [to, for, against].

PLEIADES (*L.*) *Astron.* कृत्तिका नक्षत्र *n.*

PLENARY *a.* (*plenus*) पुरा, पूर्ण; [p. indulgence, (*R. C. Church*) an entire remission of penalties due to all sins; p. inspiration, inspiration in which there is no mixture whatever of error].—PLENITUDE पूर्णता *f,* पूर्त्ति *f*; abundance समृद्धि *f,* विपुलता *f,* चंगळ *f*; redundancy of blood and humors in the animal bodies रक्तधातुपुष्टि *f.*

PLENIPOTENT *a.* (*-potens,* potent) पूर्ण शक्तिमान. -IARY person invested with full power to transact any business कुल कारभारी; an envoy to a foreign court furnished with full power to negotiate a treaty कुल मुकत्यार वकील.—*a.* कुल अकत्याराचा.

PLENTY (*plenus,* full) पुष्कळपणा, समृद्धि *f*; abundance सुकाळ, चंगळ *f,* सुबत्ता *f* [of, for].—*a.* पुष्कळ, बहुत, विपुळ.—PLENTEOUS, PLENTIFUL *a.* बहुत, पुष्कळ, भरपूर.

PLEONASM (*Gr. pleos,* full) redundancy of words in speaking or writing शब्दबाहुल्य *n.*

PLETHORA (*Gr. plethoria*) fulness of habit अतिपुष्टि *f,* रक्तातिशय.

PLIABLE, PLIANT *a.* (*plicare,* to play) flexible लवचीक, मृदु; flexible in disposition नरम, चलमति, मृदु.—PLIANCY, PLIABILITY लवचीकपणा, मृदुता *f*; नरम स्वभाव, चलमति *f.*

PLICATION (*plicare,* to fold). See FOLD.

PLIGHT* *v.* गहाण ठेवणें (word, faith, honor). —*n.* गहाण *n*; condition अवस्था *f,* गति *f*; exposed condition घाण *f,* दशा *f,* अवस्था *f,* हाल *pl*; miserable p. फटफजिती *f,* बुरे हाल *pl.*

PLOD *v. i. Gael.* travel with steady laborious diligence रेंरें करून जाणें -चालणें -शिकणें; drudge खपणें, कष्ट क.—*t.* कष्टानें चालणें.

PLOT *D.* जमिनीचा तक्ता-वाफा.—* scheme बेत, आकार; conspiracy कुट *n,* कंत्राड *n,* कट; design मसलत *f,* तजवीज *f,* युक्ति *f*;—of a poem, play, &c. वस्तु *f,* जमीन *f,* सांखळी

f; secondary p. प्रतिमुख *n*.—*v*. *i*. कंत्राड -लचांड क. -रचणें; तजवीज -मसलत क.—*t*. तजवीज -युक्ति क. [out].

PLOUGH *D*. नांगर.—*v*. नांगरणें, फोडणें;—for the first time उखळणें;—second time दुसारणें; to cross p. बेरणें. -BOY आगल्या, नांगऱ्या. -ING नांगरकी *f*, नांगरणी *f*, जोत धरणें *n*; —for the first time उखळ *f*, उखळी *f*; —second time दुसारणी *f*. -LAND नांगरवट *f*, नांगरड *f*. -MAN नांगऱ्या, जोत्या. -SHARE नांगराचा फाळ -दांत.

PLUCK* *v*. pull with sudden force हिसकावणें; pull off उपटणें, उपटून काढणें; strip by plucking बुचाडणें, बुचाडून (पिसें) काढणें (a fowl);—as fruits, vegetables, &c. खुडणें, तोडणें; up, out, &c. उपटणें, उपटून काढणें.—*n*. heart, liver, and lights of an animal जनावराचें काळीज, अंतडीं वगैरे; spirit जीव, पाणी *n*, दम.

PLUG *D*. दट्टा, बूच.—*v*. दट्टा लावणें -बसवणें, बूच मारणें [up].

PLUM* a fruit आलुबुखार; a raisin मनूक, बेदाणा; sum of £10,000 लाख रुपये *pl*. -CAKE एक पक्वान्न आहे.

PLUMB, PLUMMET (*plumbum*, lead) sounding lead बुडीद *n*, गळ;—of masons, carpenters, &c. ओळंबा, लंबक; weight वजन *n*; piece of lead used by children to rub their paper for writing मोहरा.

PLUMBAGO (*L*.)—Zeylamia चित्रक.

PLUME (*pluma*) feather पीस *n*, पर *n*; ornamental feather तुरा, कलगी *f*.—*v*. adjust the feathers of पिसें निटावणें -सुधारणें; strip off feathers पिसें उपटणें; adorn with feathers or plumes पिसांनीं किंवा तुऱ्यांनीं सजवणें -शृंगारणें; pride (one's self) अकड -शेखी -तोरा मिरवणें, आढ्यता बाळगणें.—PLUMAGE पिसारा.

PLUMP *a*. *Ger*. fat लठ्ठ, गुबगुबीत, भरदार, पुष्ट; complete पुरा, पक्का: a p. lie; p. and sleek तुंद. -LY *ad*. निखालस, निक्षूण, साफ; to refuse p. वाटाण्याची अक्षत लावणें.

PLUNDER *v*. *Ger*. लुटणें, नागवणें, बुचाडणें.—*n*. लूट *f*. -ER लुटारू.

PLUNGE *v*. *F*. immerse बुडवणें; baptize by immersion बुडवून बाप्तिस्मा देणें [in].—*i*. बुडी -डुबकी मारणें; fall or rush, as into distress संकटांत पडणें, आगींत उडी टाकणें. —*n*. बुडी *f*, डुबकी *f*; आगींत उडी *f*.

PLURAL *a*. (*plus*, more) अनेक, बहुत; p. number अनेक वचन *n*. -ITY अनेकत्व *n*. बहुत्व *n*. -LY *ad*. अनेक वचनांत.

PLUS (*L*.) *Alg*. अधिक, धन; याची ही + खूण *f*.

PLUTO (*L*.) god of the infernal regions; the Indian P. यम.

PLUTUS (*L*.) god of wealth; the Indian P. कुबेर.

PLY *v*. (*plicare*) lay on लावणें, लागोपाठ मारणें, लगावणें; employ diligently दामटणें, चोपून काम घेणें; practice diligently चालवणें, झटून क. [from, to, for].—*i*. work steadily खपणें, नेटानें काम क., झटणें; make regular trips खेपा टाकणें, येरझारा क.—*n*. fold चुनी *f*, निरी *f*; bent वांक, कल.

PNEUMATIC, -AL *a*. (*Gr*. *pnein*, to blow) consisting of air वायुमय; pertaining to air वायूचा; moved by means of air वायूचा, in comp. वायु: वायुयंत्र *n*; fitted to contain air वायु राहण्यास योग्य, वायूचा.—*n*. *pl* the branch of science which treats of air वायुशास्त्र *n*.

POACH *v*. *F*. cook, as eggs, by breaking them into a vessel of boiling water अर्धशिजा -बोबडा क.; pocket and convey away by stealth, as game पारध चोरून नेणें; plunder लुटणें; stab, as fish भोसकणें, भाल्यानें भोसकणें.

POCK* देवीचा -कांजणीचा फोड. -HOLE देवीचा वण.—POCKY *a*. देवींच्या वणांचा, फोडेला.

POCKET *F.* a small bag in a garment खिसा; —as of a purse, bag, &c. पुड *n*, कप्पा.—*v.* खिशांत -खिशांत घालणें -लपविणें; take clandestinely चोरणें, हातमारणें, तावदेणें; to p. an insult, affront गिळणें, पोटांत घालणें. -BOOK खिशांत ठेवायाची वही *f*, टिपणवही *f*, 'पाकेट बुक' *n*. -KNIFE खिशांत ठेवायाचा चाकू. -MONEY खाऊचा पैसा.

POD *W.* शेंग *f*.

PŒDARIA *a.*—fœtida हरणवेल *f*, जीवंती *f* (*Sanskr.*).

POEM (*poema*) कविता *f*, काव्य *n*.—POESY, art of composing poems कवित्व *n*, कविताशक्ति *f*; poetry कविता *f*.—POET, author of a poem कवि, काव्यकर्त्ता; one skilled in making poetry कवन करण्यांत कुशल, काव्यकुशल, कवि; p. laureate, poet employed to compose poems for the birthdays of a prince, or other special occasions राजकवि, राजाच्या पदरचा कवि; a ready p. शीघ्रकवि. -ESS कविता करणारीण *f*, कवयत्री *f*. -IC, -AL *a.* कवितेचा, कविते संबंधी; expressed in poetry कवितारूप, श्लोकबद्ध; possessing the peculiar beauties of poetry काव्यरसाचा, रसिक.—POETRY कविता *f*, कवन *n*; imaginative composition कल्पित कवन *n*; art of writing verse कविता विद्या *f*, काव्यरचना *f*.

POIGNANT *a.* (*pungere*, to prick) pungent तिखट, तीक्ष्ण; acutely painful तीक्ष्ण, भेदक, तीव्र, अति वेदनाकारक.—POIGNANCY तिखटपणा, तीक्ष्णता *f*.

POINT (do.) sharp end of a piercing instrument टोंक *n*, अग्र *n*, अणकुची *f*, कोंच *f*; mark made by the end of a sharp instrument टोंकानें केलेली खूण *f*; mere spot clearly indicated परमाणु, बिंदु: a p. in space; promontory भूशलाका *f*, टोंक *n*; critical moment टिपण *n*, अणी *f*; mark बिंदु; punctilio बारीक -सूक्ष्म गोष्ट *f*; degree पर्याय, पायरी *f*; a peculiarity विशेष गुण -गोष्ट *f* -लक्षण *n*: good or bad *points* of a man, horse, &c.; single subject विषय, प्रकरण *n*, गोष्ट *f*; *Geom.* बिंदु; punctuation विरामचिन्ह *n*; object लक्ष *n*, धोरण *n*; to know the world, not to love her, is thy p.; subject of discussion वादाचाविषय -गोष्ट *f*, विषय; wit खोंच *f*, नोक *f*, खुबी *f*; moment क्षण; that is on the p. of उन्मुख; on the p. of death मरणोन्मुख; to be on the p. of टेंकणें; highest p. पराकाष्टा *f*, सीमा *f*, कळस; lowest p. कडेची पायरी *f*; to such a p. एथवर-पर्यंत; a particular p. टूक *f*; a sore p. वर्म *n*; striking p. खुबी *f*, टूम *f*; a weak p. नागवें *n*; if you look at it on this p. असें पाहिलें असतां; that is to the p. प्रासंगिक.—*v.* sharpen अणी काढणें -क., शेवटणें; aim रोखणें, धरणें, नेमणें (a sword); direct attention toward लक्ष लावणें; विरामचिन्ह घालणें -क.;—a wall, &c. दरजागिरी क., दरजा भरणें; out बोटानें दाखविणें.—*i.* बोट क. -दाखविणें, रोख -नेम असणें; दरजा भरणें. -BLANK *ad.* खुणेकडे -कडचा; plain खरमरीत, खसखसीत. -ED टोंकाचा, अणीदार; नोकदार, खोंचीचा. -EDLY *ad.* विशेष उद्देशानें -लक्षानें, नोकझोकीनें. -ER बोटानें दाखविणारा; [variety of dog trained to stop, and with his nose point out the game to sportsmen]. -LESS *a.* बोथट, बुळा; खडाखडी, खसखसीत, निर्भीड (remark).

POISE (*pendere*, to weigh) वजन *n*; balance, कांटा, तराजू *f*, *m*; equipoise समतोल; a thing suspended on a poise कांट्यावर धरलेली वस्तु *f*.—*v.* वजन क., तोलणें; कांट्यावर धरणें; समतोल क.; examine, as by a balance कांट्यांत घालून -जोखून पाहणें -अजमासणें.

POISON (*potio*, a drink) any substance which, introduced into the animal

organization, is capable of producing a morbid, noxious, or deadly effect upon it विष *n*; any thing infectious or malignant विष *n*, रोग: the p. of pestilential diseases; that which destroys moral purity or health भ्रष्टकारक वस्तु *f*, विष *n*: the p. of sin; mineral and vegetable p. स्थावर विष *n*; animal p. जंगम विष *n*; application or use of p. विषप्रयोग; taking p. विषभक्षण -सेवन *n*; drinking p. विषप्राशन *n*; curing p. विषघ्न.—*v*. विष देणें-घालणें; बिघडणें, नासणें; —one's self विष खाणें; to be *poisoned* विखारणें; to p. the ears of कान फुंकणें, [with]. -OUS *a*. विषाचा, विखारी, जहरी.

POKE* खिसा, कप्पा; to buy a pig in a p. पाण्यांत म्हैस आणि वर मोल.—*D. v*. भोसकणें; —as an ox हुंदाडणें, ढोसणें.—*i*. चांचपणें, चापसणें; at ढुसकणें.—POKER, instrument for stirring the fire खोरणें *n*, उकरणें *n*.

POLE (*polus*) one of the extremities of an axis, in which a sphere revolves कण्याचें टोंक *n*;—of the earth ध्रुव; heavens आकाश. -STAR ध्रुवतारा.—POLAR *a*. ध्रुवाचा, ध्रुवाकडला -चा. -ITY विवक्षित शक्ति दाखविण्याचा धर्म.

POLE* long staff दांडा, काठी *f*, सोट;—of a tent खांब;—of a palanquin दांडी *f*;—of a carriage दांडी *f*, 'पोल';—with a crook to pull down pods, fruits, &c. अकडी *f*, शेकाटी *f*; measure of length of five and a-half yards काठी *f*. -AXE फरशी *f*, फरस.

POLEMIC, -AL *a*. (*Gr. polemos*, war) controversial वादाचा, वादात्मक (treatise); disputatious वादकरणारा, प्रतिवादी, तकरारी (writer).—POLEMICS वाद; धर्मसंबंधी वाद; धर्मसंबंधी वादाची विद्या *f*, धर्मवादशास्त्र *n*.

POLICE (*Gr. polis*, city) government of a city or town शहरची -गांवची बंदोबस्ती *f* -व्यवस्था *f*; internal regulation and government of a kingdom or state राज्याचा -देशाचा बंदोबस्त; body of civil force by which a city or country is regulated पोलीसचें लष्कर *n*, गांवखान्याचें लष्कर *n*, पोलीस *n*; p. station पोलिसाचें ठाणें *n*, चौकी *f*.—POLICY, the art of government राजनीति *f*, राज्य चालविण्याची युक्ति *f*; dexterity of management चतुराई *f*, हतोटी *f*; prudence in the management of affairs काम करण्याची चतुराई *f*, व्यवहारचातुर्य *n*—POLITIC *a*. राजनीतीचा, नीतिज्ञ, नीतिकुशल; sagacious in promoting a policy मतलबी, कारस्थानी; prudent शहाणा, समजदार; cunning हिकमती, कावेबाज. -AL *a*. राजकारभाराचा, राजनीतीचा; लोकांचा, देशाचा; public सरकारी, सरकारी नात्याचा (character); p. economy व्यवहारशास्त्र *n*. —POLITICIAN *n* राजनीतिकुशल, राजनीतिज्ञ; a man of artifice लागलाव्या, कवायती, कारस्थानी.—POLITICS, science of government राजनीति *f*, राजशासनविद्या *f*; political trickery कारस्थान *n*.—POLITY राज्यव्यवस्था *f* -नियम, नीति *f*, बंधारण *n*.

POLISH *v*.(*polire*) make smooth and glossy जिल्हई देणें, उजळणें; make elegant and polite सभ्य -शिष्ट क. [up, with].—*n*. सफाई *f*, जिल्हई *f* ओप *f*; सभ्यता *f*, प्रौढि *f*, सौजन्य *n*. -ER उजळणारा, ओपदेणारा, सफाई आणणारा;—of weapons or tools शिकलकर. —POLITE *a*. elegant in manners सभ्य, शिष्ट; courteous आदरशील, सत्कारी. -NESS शिष्टता *f*, सभ्यता *f*, सौजन्य *n*; गृहस्थपणा, रीतरवेस *f*. -LY *ad*. सभ्यपणानें, शिष्टपणानें, ताजीम देऊन.

POLL *Ger*. the head of a person डोई *f*, डोसकें *n*; register of heads, that is, of persons डोईपट्टी *f*, माणूसपट्टी *f*; [entry of the names of electors who vote for civil officers; election of civil officers; place

where an election is held].—*v.* खडसणें, ठुंखणें;—the head, &c. कैंस कापणें -कातरणें; fleece लुचाडणें, नागवणें, लुटणें; enter, as polls, in a list मत देणारांचीं नांवें पटावर दाखल क.; [to p. a jury, to examine each member of the party individually as to his concurrence in a verdict which has been rendered by them.] -ARD tree having its top cut off ढुंखन *n*, ठुंखन *n*; stag that has cast his horns मुंढा काळवीट; clipped coin कापलेलें नाणें *n*. -TAX डोईपट्टी *f*, जिजिया.

POLEN (*L.*) फुलांतला बुका, पराग, रज *n*.

POLLUTE *v.* (*polluere*) make foul मळविणें, मळीण क.; defile morally मळीण -भ्रष्ट क., बिघडणें;—ceremonially विटाळविणें, बाटवणें, अशुद्ध -ओंवळा क.; violate by illegal sexual commerce भ्रष्ट -खराब क. [with].—POLLUTION मळविणें *n*; अपवित्रता *f*, मळ; बाट, भ्रष्टाकार; [*Med.* emission of semen, or spern, at other times than in sexual intercourse].

POLLUX (*L.*) *Astron.* पुनर्वसु नक्षत्र *n*.

POLTROON *F.* भित्रा, फटलंडी, भागुबाई *f*.

POLYANDRY (*Gr. polus*, many, *andros*, man) एकाच वेळेस अनेक नवरे असणें *n*, बहुभर्तृत्व *n*.

POLYGAMY (*Gr. -gamos*, marriage) एकाच वेळीं अनेक बायका करण्याची चाल *f*, बहुपत्नीत्व *n*, अनेक बायका *f pl*.—POLYGAMIST ज्यास अनेक बायका आहेत तो; advocate for polygamy बहुपत्निवादी.

POLYGLOT *a.* (*Gr. glotta*, tongue) पुष्कळ भाषांचा, बहुभाष.—*n.* a man knowing many languages बहुभाषज्ञ; a book containing several versions of the same text बहुभाषग्रंथ; [the text of one of the versions in a proper polyglot, printed by itself].

POLYGON *a.* (*Gr. gonos*, angle) बहुकोण.

POLYMATHY (*Gr. mathein*, to learn) अनेक विद्याज्ञान *n*.

POLYPARIOUS *a.* (*Gr. polos*, many, *L. parere*, to produce) बहुत उपजविणारा, बहुप्रसव.

POLYTHEISM (*Gr. -theos*, god) doctrine of a plurality of gods or invisible beings superior to man, and having an agency in the government of the world बहुदेवमत *n*.—POLYTHEIST बहुदेवमतवादी.

POMEGRANATE (*pomum*, a fruit, *granatus*, grained)—the tree डाळिंब *f*, डाळिंबी *f*;—the fruit डाळिंब *n*, अनार *n*.

POMFRET सरगुटलें *n*, सरंगा; black p. हलवा.

POMMEL (*pomum*, a fruit) बोंड *n*, गोंडा, &c. —*v.* कुदळणें, बडवणें, कुंदी काढणें, बुंदकणें.

POMP (*pompa*) grand procession समारंभाची -थाटमाटाची स्वारी *f*; show of magnificence डामडौल, थाटमाट. -OUS *a.* थाटमाटाचा, छानदारीचा, समारंभाचा; boastful बढाईचा, शेखीचा. -NESS थाट, थाटमाट, डौल, बढाई *f*, पत्राज *f*.

POND* तळें *n*, तलाव. डबकें *n*.

PONDER *v.* (*pondus*, a weight) विचार क., चिंतणें; मनांत ठेवणें.—*i.* -वर विचार -चें चिंतन क. [on, upon, over]. -ABLE *a.* वजन करायाजोगा; तुलनीय. -OUS *a.* वजनदार, जड, भारी; important वजनदार, भारी, ऐवट.

PONIARD *F.* कटार *f*, जंब्या.

PONTIFF (*pons*, a bridge, *facere*, to make, because the first bridge over the Tiber was constructed and consecrated by the high priest) मुख्य धर्माधिकारी, महा धर्माध्यक्ष; the pope रोमन कॅथोलिक धर्माधिकारी, 'पोप'; Mahomedan p. खलीफ, इमाम; Hindu p. शंकराचार्य, जगद्गुरु.—PONTIFICAL *a.* मुख्य धर्माध्यक्षाचा.

PONTOON (*pons*, a bridge) पूल बांधण्याची नाव *f*.

PONY (from *puny*) तट्टू *n*.

POOL* small collection of fresh water supplied by a spring, or occurring in the course of a stream कुंड *n*; puddle डबरा, डबकें *n*.

Pooh *int.* थत्, फु.

Poop (*puppis*) गलबताचा मागला भाग.

RAIN*, water falling in drops from the atmosphere पाऊस, पर्जन्य; r. during sunshine नागवा पाऊस; pelting r. फटकाऱ्याचा पाऊस; soaking r. भिजपाऊस; brisk and passing r. शिडशिडी *f;* heavy r. मुसळधार *f;* r. which brings blight upon the crops रोगवणी *n;* the *rains* पावसाळा, पाऊसकाळ; to r. cats and dogs मुसळधार पडणें.—*v. i.* पाऊस पडणें -लागणें.—*t.* पाऊस पाडणें, वृष्टि क.; to r. spittingly पिरपिरणें [down, on, upon]. -BOW मेघ -इंद्रधनुष्य *n.* -GAUGE पाऊस मोजण्याचें -पर्जन्यमापक यंत्र *n.* -WATER पावसाचें पाणी *n,* वृष्टिजल *n.*—RAINY *a.* पावसाचा, पर्जन्याचा, झडीचा.

RAISE* *v.* cause to rise उठवणें, उचलणें; exalt उंच क., वाढविणें, सरफराजी क., उंच पदावर बसवणें : to r. to office; intensify वाढावणें, चढवणें (the voice);—the price किंमत वाढवणें; give life to जिवंत क., उठवणें (Acts xxvi. 8); set up उभा क., उभारणें; awaken जागा -जागृत क.; incite to tumult दंगा उठवणें, दंगा करायास चेतविणें; originate उठवणें, उडवणें, पिकवणें (reports); collect जमा क., मिळविणें (money, troops, &c.); grow पिकवणें, उत्पन्न क. (wheat); procure to be bred ताणा वाढविणें (oxen, sheep); up उत्पन्न क. (Deut. xviii. 18); utter बोलणें, वदणें; to r. a cry आरोळी मारणें -ठोकणें; cause to rise, as by the effect of leaven फुगवणें (bread); *Law,* create or constitute करणें: to r. a use; to r. a siege वेढा उठवणें; to r. a blockade नाकेबंदी उठवणें.

RAISIN *F.* बेदाणा, खिसमीस *n.*

RAKE* an instrument for collecting hay, or for breaking and smoothing the earth दांताळें *n,* दांता.—*Ger.* सोदा, व्यसनी, रांडबाज.—*v.* दांताळ्यानें गोळा क.; -वर दांतळें फिरवणें -फिरवून साफ क.; scrape together खरडून गोळा क.; ransack धुंडाळणें; pass over with violence or rapidity जोरानें -त्वरेनें ओसरणें -ओलांडून जाणें; up बिस्तवावर राख घालणें.—*i.* खरडणें; कातरीत जाणें; lead a dissolute, debauched life दुराचरण -बदफैली -सोदेगिरी क., दुर्व्यसनांत जन्म घालवणें [up, together, in].—RAKISH *a.* सोदा, बदफैली, व्यसनी.

RALLY *v. F.* फौजेची थाराथार क., फौज सावरणें; reunite; पुनः मिळवणें, जमवाजमव क. [round, from].—*i.* सावरासावर होणें, पूर्वस्थितीवर येणें; मिळणें, जमणें.

RALLY *v. i.* (See RAIL) थट्टामस्करी -उपहास क.—RAILLERY मस्करी *f,* उपहास.

RAM* male sheep मेंढा, एडका; *Astron.* मेषराशि *f;* engine for battering walls भिंतीस धक्का देण्याचें यंत्र *n.*—*v.* drive with violence ठासून घालणें, चोंदणें, ठासणें; fill by driving ठासून भरणें;—hard कचकावणें [down, in]. -MER ठासून भरणारा; instrument for driving down मोगरा, सुंबा; ramrod गज. -ISH, -MY *a.* एडक्यासारखा; rank माजलेला; strong scented उग्र, उग्रट. -ROD बंदुकीचा -तोफेचा गज.

RAMBLE *v. i. Ger.* wander इकडे तिकडे फिरणें, रमणें, हिंडणें; grow without constraint फोपावणें, अफाट वाढणें; in speech चाचरणें, रानघेणें [about].—*n.* फेरफटका, सहल *f,* विहार. —RAMBLER इकडे तिकडे हिंडणारा, विहारी, भटक्या, हिंडफिऱ्या.

RAMIFY *v.* (*ramus,* branch, *facere,* to make) शाखा-भाग क.—*i.* शाखा होणें -पडणें, फांटे फुटणें. —RAMIFICATION फांद्या फुटणें *n*; शाखा *f,* फणगडा; विभाग, खंड.

RAMPANCY* माज, ऊत.—RAMPANT *a.* माजलेला, मातलेला, माजाचा, मर्यादातीत; to get r. माजणें, उतणें, उफणणें.

RAMPART *F.* किल्ल्याची भिंत *f,* तट, प्राकार; —of a city शहरपन्हा.

RANCID *a.* (*rancidus,* to be rancid) खवट, खवचट (oil, butter). -ITY खवचटपणा, कुईटपणा.—RANCOR, deepest malignity or spite चुरस *f,* हाडवैर *n,* दीर्घद्वेष. -OUS *a.* द्वेषी, खुनसी, द्रोहबुद्धि.

RANDOM* *a.* नेमावांचूनचा, बेशिस्त, भलता, संधानहीन; at r. नेमावांचून, शिस्त धरल्या वांचून, सैरावैरा, भलतीकडे.

RANGE *v. F.* set in a row ओळीनें ठेवणें; dispose in a classified order वर्ग -प्रत लावणें; pass over पार -पलीकडे जाणें: teach him to r. the ditch; pass in a direction parellel to or near बाजूनें किंवा कडेनें जाणें: to r. the coast.—*i.* फिरणें, हिंडणें; have range टप्पा -मारा असणें: the shot *ranges* four miles; ओळीनें -रांगेनें पंक्तींत बसणें, प्रत -रांग लागणें: the front of a house *ranges* with the street; -च्या कडेनें -बाजूनें जाणें: to r. along the coast [about, over].—*n.* ओळ *f,* कतार *f,* रांग *f,* हार *f*: a r. of buildings; प्रत *f,* पायरी *f,* वर्ग, विल्हा; step of a ladder पावटा; extended cooking apparatus of cast iron set in brick work, and containing pots, oven, &c. पाकोपकरणपंक्ति *f*; reach पोंहोंच *f,* आटोका; horizontal distance to which a shot or other projectile is carried टप्पा, पल्ला, मारा; region of country in which cattle may wander and pasture रमणा, गुरें चरण्याची जागा *f,* चरण *n*; that which may be ranged over रमणा, विहारस्थान *n.*—RANGER फिरणारा, विहारी, परिभ्रमक; keeper of a forest वनकरी, अरण्यरक्षक; one of a body of mounted troops घोडेस्वार.—RANK, line ओळ *f,* कतार *f,* हार *f,* रांग *f*; line of soldiers शिपायाची रांग *f,* दंड; grade पदवी *f,* पायरी *f,* दरजा; permanent social class वर्ग, गण, प्रत *f*: the lowest *ranks* of men; high degree मोठी पदवी *f,* दरजा: a man of rank; degree of dignity बहुमानाची पदवी *f.*—*v.* हार लावणें; वर्ग -विल्हे लावणें; व्यवस्थेनें लावणें, बेतानें ठेवणें.—*i.* क्रमानें राहणें -असणें; पदवी -दरजा असणें; उंच दरजांत मोडणें -मोजला जाणें.

RANK* *a.* luxuriant in growth उफाड्याचा, माजलेला; violent भारी, जबर, पराकाष्ठेचा; very rich and fertile मातबर, सुपीक (land); rancid खवचट, कुईट; strong scented वासट, उग्रट; excessive अतिशय, फार, कडक, जलाल.—RANKLE *v. i.* सलणें, खुपणें.

RANSACK *v. Icel.* search thoroughly धुंडाळणें, शोधणें, हुडकणें; plunder लुटणें.

RANSOM *F.* release from captivity, bondage, or the possession of an enemy सुटका *f,* मुक्ति *f,* उद्धार, बंदखुलास; money paid for the redemption of a prisoner, or for goods captured by an enemy खंड, खंडणी *f* [from, for].—*v.* खंड देऊन सोडविणें, -चा खंड देणें [for, with].

RANT *Ger.* बडबड *f,* वटवट *f,* व्यर्थ भाषण *n.* —*v.* बडबड क. [about].

RAP* *v.* knock ठोकणें, फडफडवणें; snatch away हातमारणें, रगडणें, रपाटणें; affect with rapture तन्मय -तल्लीन क.; out, utter with sudden violence कडकावणें, धस्कावून बोलणें.—*i.* -वर ठोकणें, ठोठावणें, थाप मारणें: to r. on the door.

RAPACIOUS *a.* (*rapere,* to snatch away) लुटारू, हाताळ; accustomed to seize for food हिंसक, हिंस्र (tiger).—RAPACITY लुटारूपणा, अपहारबुद्धि *f*; लुटालूट *f*.

RAPE (*rapa*)—the seed घोडराई *f*.

RAPE* robbery हरण *n,* अपहरण *n,* लुटणें *n*; violence done upon a woman हटसंभोग, जुलमाचा स्त्रीसंभोग; [fruit plucked from the cluster; the refuse of raisins used in making wine].

RAPID *a.* (do.) very swift जलद, शीघ्र, चपळ (stream); advancing with haste जलद वाढणारा; of r. growth उफाड्याचा.—*n.* the part of a river where the current moves with more celerity than is common धार *f*. -ITY जलदी *f*, त्वरा *f*; त्वरेची वाढ *f*, वृद्धि *f*. -LY *ad.* त्वरेनें, लवकर.

RAPINE* लुटालूट *f*, झांबडाझांबड *f*; violence जबरी *f*, जुलूम.

RAPTURE*, state of being rapt, or carried away from one's self by agreeable excitement अत्यानंद, अल्हाद, हर्षावेश [with].—RAPTUROUS *a.* अत्यानंदाचा, परमानंदाचा, हर्षकारक.

RARA AVIS (*L.*) rare bird; something seldom met with उंबराचें फूल *n*.

RARE *a.* (*rarus*) thin विरळ, पातळ (atmosphere); thinly scattered तुरळक, तुटक, विखरलेला; unusual असाधारण, असामान्य (event); seldom met with दुर्लभ, अपूर्व. दुर्मीळ (thing); unusually excellent अत्युत्कृष्ट, सर्वोत्कृष्ट (work). -LY *ad.* विरळा, क्वचित.—RAREFY *v.* पातळ -विरळ क.—RARITY विरळपणा, दौर्लभ्य *n*; पातळपणा, सूक्ष्मता *f*; सरसपणा; अपूर्वाई *f*; thing valued for its scarcity दुर्मीळ -अपूर्व वस्तु *f*.—RAREFACTION पातळ होणें *n* -क. *n,* द्रवीकरण *n*. RARESHOW रस्तोरस्तीं फिरवून दाखविण्याचा तमाशा.

RASCAL* सोदा, लुच्चा, शठ, काशीकर; [a lean beast, esp. a lean deer]. -ITY लुच्चेगिरी *f*. -LY *a.* सोदेशाई, सोदेगिरीचा.

RASE *v.* (*radere,* to scrape) erase खोडणें, रद्द क.; overthrow मोडणें, चीत क.; raze पाडणें, जमीनदोस्त क.—*i.* जमीनदोस्त होणें; पराजय पावणें, चीत होणें.

RASH *a. D.* hasty उतावळा, अविचारी; uttered or undertaken with too much haste or too little reflection कच्चे मसलतीचा, अविचाराचा (words, measures). -LY *ad.* उतावळीनें, अविचारानें. -NESS अविचार, उतावळेपणा.—*n. F.* पुरळ, कोंडा, दद्रु.

RASP *D.* किसणी *f*.—*v.* किसणें [off].

RAT* उंदीर; round and tapering mass of hair, or similar material, used by ladies to give fulness to their natural hair गंगावन *n,* केसरी *f*, अगूळ *m, f, n,* इ०; one who deserts his party स्वपक्षत्यागी; to smell a r. वास येणें, संशय येणें.

RATAN *Malay.* वेत, वेत्र; walking-stick made of ratan वेतकाठी *f*, छडी *f*.

RATE *v. Sw.* खडकावणें, खरडपट्टी काढणें [for].

RATE (*rata*) fixed allowance नेमणूक *f*, चंदी *f*, मोताद *f*; price दर, भाव, धारण *f*; tax पट्टी *f*; standard धडा, प्रमाण *n,* मान *n*; at the r. of प्रमाणें, -च्या मानानें; a book of *rates* निरखनामा.—*v.* दर -भाव ठरवणें; estimate मोजणें, गणणें [at].—RATIFY *v.* बहाल -मंजूर -मुकरर क.

RATHER* *ad.* preferably उत्तम, बरें (Job vii. 15); somewhat अमळ, कांहींसा; to

the contrary of what is just before proposed or said उलटा (Mark v. 26); more correctly speaking नीट -खरें म्हटलें असतां: this is an art which does mend nature, change it r.

RATIO (*L.*) मान *n*, परिमाण *n*, प्रमाण *n*. —RATION शेर, सिधा, रतीब, मोताद *f*, 'रासन' *n*, भत्ता.— RATIONAL *a*. relating to reason बुद्धि -तर्कसंबंधी; having reason बुद्धिसंपन्न, तर्कज्ञ; agreeable to reason सयुक्तिक, युक्तिसिद्ध, यथार्थ (conduct, man). -IST, one who proceeds in his disquisitions and practice wholly upon reason कारणवादी; one who relies on his reason as the sole or the supreme authority in matters of religion, and rejects supernatural guidance and aid बुद्धिशास्त्रवादी, निःशास्त्रवादी, चार्वाक; [a disbeliever in the supernatural origin of the Christian religion]. -ISM हेतुवाद; बुद्धिशास्त्रवाद, चार्वाकमत *n*. -ITY ज्ञानशक्ति *f*, चिद्शक्ति *f*, बुद्धि *f*; reasonableness युक्ति *f*, सयुक्तिकपणा. -LY *ad*. युक्तीनें, बुद्धीनें, यथार्थ.— RATIOCINATION अनुमान -तर्क काढणें *n*.—RATIONALE, a detail with reason उपपत्ति *f*.

RATSBANE (*rat* & *bane*) उंदीर मारायाचें -उंदराचें विष *n*, सोमल वगैरे.

RATTLE *v. i. D.* make a sharp noise rapidly repeated खडखडणें, गडगडणें, फडफडणें;—as a dry pod, &c. खुळखुळ -खडखड वाजणें; speak eagerly and noisily कचकावून -भडभड -लवलव बोलणें;—as the throat घरघरणें, खरखरणें.—*t*. खळखळविणें, खळखळ वाजविणें; scold फडफडविणें, फडझडती काढणें -घेणें.—*n*. दणका, कडकडाट; खळखळ *f*, खळखळाट; वटवट *f*, बडबड *f*; *pl* घरघर *f*; instrument with which a rattling sound is made खुळखुळा; jabberer वटवट्या, घणघणघंटा *f*. -SNAKE एक प्रकारचा विखारी सर्प आहे.

RAVAGE *v*. (*rapere*, to ravish) नासधूस क., सप्पा उडवणें.—*n*. नासधूस *f*, विनाश, उच्छेद.

RAVE *v. i.* (*rabere*) wander in mind or in intellect वेडावणें, चळणें; talk irrationally चावळणें, बरळणें; be furious, as a mad man चवताळणें, कावराबावरा होणें;—as in fever बाचळणें, बडबड क.; rush like a mad man घसरणें, धांवणें; on, upon, of -चें वेड -छंद लागणें.—*t*. वेडांत बडबडणें, बरळणें [about].

RAVEL *v. D.* untwist उलगडणें, पीळ काढणें; entangle गुतागुत क.—*i*. उलगडणें, उकलणें.

RAVEN* डोंबकावळा; rapine लुटालूट *f*, झांबड *f*; food obtained by violence जबरीनें -लुटीनें मिळविलेलें अन्न *n*.—*v. i.* वखवखणें, खाखावणें, धाधावणें.—*t*. obtain by violence जबरीनें घेणें, झोंबाडून घेणें; devour with great eagerness गपागप -गपगपा खाणें. -OUS *a*. अधाशी, वखवख्या, खायखाय सुटलेला. -NESS खायखाय *f*, वखवख *f*.

RAVINE *F*. deep and narrow hollow, usually worn by a stream or torrent of water नाला, ओहोळ, घळण *f*; a mountain cleft दरा, खोरा.

RAVISH *v*. (*rapere*) seize and carry away by violence हरणें, हरण क., बळकावणें, हिरावणें; transport अति आल्हादित क., फार संतोषी क.; have carnal knowledge of, as a woman, by force, and against her consent जुलमाचा स्त्रीसंभोग क., हटसंभोग क. [with]. -MENT हरण *n*, बळकावणें *n*, हिरावणें *n*;—of the senses चित्तहरण *n*, मनोहरण *n*; स्त्रीवर जुलूम करणें *n*, हटसंभोग.

RAW* *a*. not cooked कच्चा, हिरवा, अपक्व; inexperienced कच्चा, कोवळा, अल्लड (soldier); immature कच्चा (counsel); not spun कच्चा (silk); not mixed निरा, निर्भेळ, इरसाल (spirits); not tanned न कमावलेला, कच्चा (hides); deprived of skin कातडी

निघालेला, सोललेला, चोळवटलेला (sore); chilly सरद, सरदीचा, शिलटीचा (air); raw from a burn, &c. भाता -भोत निघालेला. —*n.* चोळवटलेला फोड. -NESS कच्चेपणा, हिरवेपणा; सर्दी *f*, शिळट *f*; hasty manner घाई *f*, धांदल *f*, उतावळेपणा.

RAY (*radius*) a single element of light or heat propagated continuously किरण *n*; pencil of *rays* अंशुजाल *n*; vision दृष्टि *f*; intellectual light बुद्धिप्रकाश.

RAZE, See RASE.—RAZOR वस्तरा; *razors* of a boar रानडुकराच्या दाढा *f pl.* -STROP पलाटणें *n.*

REACH* *v.* extend ताणणें, पसरणें; thrust out लांबवणें, लांब क.; hand over हातीं देणें, हातोपातीं पोंचविणें; obtain by stretching forth the hand हात लांब करून घेणें -मिळविणें; pierce भेदणें, टोचणें, लागणें; stretch out as far as -पर्यंत पोंचणें, पावणें: his hands r. the river; arrive at पोंचणें, पावणें; before this letter *reaches* your hand; gain मिळवणें, संपादणें [for, to, after].—*i.* पोंचणें, पावणें, लागणें, ठेपणें; after, at मिळवायास झटणें.—*n.* पोंहोच *f*, अटोका, अवांका; विस्तार, मर्यादा *f*; fetch डाव, पेंच; the r. of the eye नजरेचा टप्पा; a strait portion of a stream or river नदीचा अरुंद भाग; the coast is full of creeks and *reaches*; beyond the r. of the understanding बोधातीत; within r. अटोक्यांतला, पोंहचींतला, गम्य, ग्राह्य; that is out of one's r. वेलाग. In expressing the use of r. great use is made of पर्यंत: कारकुनाचें ज्ञान लेखणीपर्यंत; सरड्याची धांव कुपणापर्यंत.

REACT *v.* उलटून -पुनः क.—*i.* उलट -प्रतिकार क. -ION प्रतिकार; *Med.* depression or exhaustion of vital force consequent on over-exertion, or over-stimulation अति श्रमाची ग्लानि *f*; [*Politics.* backward tendency from revolution, reform, or progress].

64 D

READ* *v.* go over, as characters or words, and utter aloud, or recite to one's self inaudibly वाचणें, पठन क.; take in the sense of, as of language, whether written, or printed वाचणें, अर्थ समजणें; comprehend समजणें, ओळखणें, जाणणें: who is't can r. a woman? discover by indication लक्षणावरून -रूपावरून समजणें: in his face he *reads* great magnanimity; to r. mentally, to one's self मनांत वाचणें, पाहणें; to r. out मोठ्यानें वाचणें; to r. through सायंत -शेवट पर्यंत वाचणें, पारायण क.—*i.* वाचणें: they r. in the book of the law of God; be studious पढणें, अध्ययन -पठन क.; learn by reading पुस्तकांत वाचणें, वाचून समजणें, ग्रंथावरून समजणें: I have r. of a king who put a judge to death for an iniquitous sentence; appear in reading वाचतांना दिसणें, लागणें, असणें; the passage *reads* thus in the early manuscripts.—*a.* (*pron.* red) पढीक, विद्वान. -ABLE *a.* वाचायाजोगा, पठनीय, स्पष्ट; worth reading वाचायाजोगा, वाचायाच्या योग्यतेचा. -ER वाचणारा, वाचक; one whose distinctive office is to read prayers in a church प्रार्थनापाठक, पाठक; one who reads lectures on scientific subjects पाठक; proof-reader प्रूफ वाचणारा, 'रीडर.' -ING वाचणें *n*, पठन *n*; study of books अध्ययन *n*, विद्याभ्यास; lecture पाठ; public recital म्हणणें *n*, पठन *n*; version पाठ, पाठभेद, पाठांतर *n*; suspension of r. अनध्याय; false r. अपपाठ. —*p.a.* वाचणारा, वाचण्याचा, अभ्यासी. -ING, -ROOM पठनशाला *f*, पाठशाला *f*, 'रीडिंगरूम' *f*.

READY* *a.* prepared at the moment तयार, सिद्ध, हजीर; willing राजी, खुशी, तयार, उत्सुक (Acts xxi. 13); dexterous कुशल, दक्ष, फरडा, निपुण (writer); quick शीघ्र, जलद (temper); opportune अनुकूल, संयो-

चा, समयोपयुक्त (weapon); near जवळचा, हातचा, निकट (way); easy सोपा, अनायासाचा (way); on the point of उन्मुख: r. to go गमनोन्मुख;—as knowledge, &c. जाग्रत, कडकडीत;—of understanding सुजाण; —at an answer हाजीरजबाब; to make r. तयार क., सजवणें; r. money रोकड *f*, नगद *f*, नगदी *f* [for, with, at, in].—*ad.* तयार, सिद्ध. -MADE *a.* तयार, आयता, सिद्ध. -WITTED *a.* हजरजबाबी, जाबसाली.—READILY *ad.* सहज, अनायासानें, सुखरूप; खुशीनें, संतोषानें.—READINESS तयारी *f*, सिद्धता *f*; जलदी *f*, चपळाई *f*, शीघ्रता *f*; willingness खुशी *f*, संमति *f*, संतोष.

READMIT *v.* पुनः घेणें, पुनः आंत घेणें [to].

REAL *a.* (*res, rei*, a thing) actually being or existing खरा, वास्तविक, तथ्य (life); genuine असल, खरा (wine); not affected निष्कपट, अकृत्रिम, खरा (dignity); *Law*, pertaining to things fixed, permanent, or immovable, as to lands and tenements स्थावर; r. property स्थावरधन *n*; [r. presence, *R. C. Church*. the actual presence of the body and blood of Christ in the Eucharist, or the conversion of the substance of the bread and wine into the real body and blood of Christ]. -ITY खरेपणा, वास्तविकपणा. -IZE *v.* खरें क.; convert from imaginary into actual कृतींत -व्यवहारांत आणणें; accomplish सिद्धीस -शेवटास नेणें (a project); impress upon the mind as actual खरा भासविणें; make one's own in experience आत्मसंबंधांत -आत्मानुभवांत धरणें -आपला क.: r. all its fine scenes; convert into real property मोडून स्थावर धन क., टक्के क., विकणें, मोडणें; gain मिळवणें;—as monies, profits उत्पन्न -वसूल क., उगवणें; to be *realized* उभा होणें -राहणें.—*i.* पैका उभा होणें. -LY *ad.* खरा, वास्तविक.—

REALIZATION कृतींत आणणें *n*, साधणें *n*, साधन *n*; r. of an object अर्थसिद्धि *f*.

REALM (*regalis*, royal) राज्य *n*; province प्रांत, देश.

REAM *D.* कागदाचें वीस दस्ते *pl*, 'रीम' *n*.

REANIMATE *v.* फिरून जीव आणणें, फिरून जिवंत क., जीव घालणें.—REANIMATION पुनर्जीवदान *n*, संजीवन *n*.

REAP* *v.* cut with a sickle, as grain पीक कापणें, कापणी क.; receive as a reward भोगणें, पावणें, फळ पावणें; clear of a crop by reaping शेताची कापणी क. (a field) [from, with].—*i.* कापणी क. -ER कापणारा, कापणी करणारा. -ING-HOOK इळा, कोयती *f*.

REAR *F.* back part मागली बाजू *f*, पश्चिम भाग;—of an army पिछाडी *f*; in the r. पिछाडीस; to cast in the r. मागें सांडणें. -GUARD पिछाडीची टोळी *f*. -WARD मागला भाग, शेवट; पिछाडीची टोळी *f*.

REAR* *v.* bring up, as young लहानाचा मोठा क., वाढविणें; educate विद्या शिकविणें [up].

REASON (*ratio*, fr. *reri*, to reckon) a thought or a consideration, as bearing on a determination or an opinion हेतु, कारण *n*; efficient cause of actual occurrences or phenomena कारण *n*; proof कारण *n*, प्रमाण *n*; excuse निमित्त *n*, कारण; the faculty or capacity of the human mind by which it is distinguished from the inferior animals बुद्धि *f*, तर्कशक्ति *f*; justice रास्तपणा, उजूपणा, न्याय; propriety समर्पकता *f*, लायकी *f*, युक्ति *f*; the truths and laws by which the universe is supposed to be constructed and governed नीति *f*, सृष्टि चालविण्याचे नीतीचे नेम *pl*; by r. of -च्या मुळें; in r. न्यायानें; without r. हकनाहक, दाटून, विनाकारण [of, for, in].—*v. i.* तर्क क.; debate वाद-

विवाद क.; with समजूत क., समजुतीचें बोलणें क., बुद्धिवाद सांगणें. — *t.* घाटाघाट क., वाटावाट क.; समजूत क. [on, upon, about, against, with]. -ABLE *a.* तर्कशक्ति ज्यास आहे तो, तर्कशक्तिसंपन्न, सज्ञान, ज्ञानविशिष्ट: man is a r. being; governed by reason विचाराधीन, विचारानें चालणारा, विचारी; within due limits नेमस्त, सुमाराचा; just वाजवी, रास्त [in]. -ABLY *a.* वाजवी रीतीनें, वास्तविक पाहिलें असतां; सुमाराचा, बेताचा. -ING तर्क करणें *n*, तर्कवितर्क; course of argument तर्कप्रबंध.

REBEL (*bellum*, war) बंडवाला, राजद्रोही.—*a.* बंडाचा, बंडावलेला.—*v. i.* take up arms traitorously against the state or government बंड -बेदा क., सरकारावर उठणें [against]. -LION, open and avowed renunciation of the authority of the government to which one owes allegiance बंड *n*, दंगा, बलवा; open resistance to lawful authority स्वामिद्रोह, धन्यावर उठणें *n*. -LIOUS *a.* बंडखोर, दंगेखोर; बंडाचा, दंग्याचा.

REBOUND *v. i.* उलटणें, उसळणें, उलटखाणें [from, with].—*t.* मागें हटविणें.—*n* उलट *f*, उसळी *f*.

REBUFF *n.* दाब, दडपणें *n*; beating back मागें पिटविणें *n* -हटविणें *n*; sudden check दाब, दडपण *n*; refusal नाकार, निषेध, अमान्यता *f*; to give a r. तोंडावर मारणें; to meet with a r. तोंडांत खाणें.

REBUKE *v.* (*L.* and *F.*) reprove वाग्दंड क., शब्दाचा मार देणें; check दाबणें, दडपणें; admonish धमकावणें, दटावणें [for, with, by].—*n.* शब्ददंड, वाग्दंड; दाब, दडपण *n*; धमकी *f*, दटावणी *f*, दबावणें *n* [for].

REBUT *v.* (*L.* and *F.*) मागें हटवणें; *Law*, (वादांत) जाब -प्रत्युत्तर देणें [with, by].—*i.* जाब -उत्तर देणें.

RECALL *v.* माघारां बोलावणें [from].—*n.* माघारें बोलावणें *n*, पुनरानयन *n* [from].

RECANT *v.* (-*cantare*, to sound) फिरवणें, बदलणें (words).—*i.* बोलणें फिरवणें, परतणें. -ATION उलट बोलणें *n*, बोलला बोल परतून घेणें *n*.

RECAPITULATE *v.* (-*capitulum*, chapter) संक्षेपानें फिरून सांगणें, सारांश सांगणें.—RECAPITULATION मागल्या बोलण्याची गोळाबेरीज *f*, अनुवाद, उपसंहार.

RECEDE *v. i.* (-*cedere*, to go back) माघार घेणें, मागें हटणें; मागें घेणें;—from a promise, &c. परतणें, फिरणें [from].—*t.* परत देणें; grant to a former possessor पहिल्या मालकास देणें.—RECESS, a moving back मागें फिरणें *n*; withdrawing from public business or notice घरीं बसणें *n*, एकांतवासांत राहणें *n*, काम -रोजगार सोडणें *n*; seclusion एकांतवास: in the r. of the jury they are to consider the evidence; remission or suspension of business कामाची तहकुबी *f*, खंड; niche कोनाडा, कोपरा; private abode एकांतवास: this happy place our sweet r.; secret or abstruse part गहन -गूढ भाग -अंग *n*; the difficulties and *recesses* of science [from]. -ION मागें हटणें *n*; माघार *f*; परत देणें *n*.

RECEIVE *v.* (-*capere*, to take) घेणें, पावणें, स्वीकारणें;—as an opinion मान्य -कबूल क.;—as a custom, tradition, &c. पाळणें, आचरणें (Mark vii. 4);—as a guest आदर -आतिथ्य क. (Acts xxviii. 2); contain सांठवणें, मावून घेणें (1 Kings viii. 64); suffer सोसणें: he can r. no harm; take, as goods from a thief, knowing them to be dishonestly obtained जाणून बुजून चोरीचा माल घेणें.—RECEIVER घेणारा; चोरीचा माल घेणारा; vessel for receiving and containing gases ग्राहकपात्र *n*.—RECEIPT घेणें *n*; capa-

city घेण्याची शक्ति f, ग्राहकशक्ति f; place of receiving (जकात वगैरे) घेण्याची जागा f, नाका (Matth. ix. 9); acknowledgment of payment पावती f; that which comes in जमा f, आमदानी f, आदाय;—of revenue आमदानी f. [for].—RECIPE -च्या आकृतीची याद f.—RECEPTACLE पात्र n, बारदान n, आशय; *Bot.* पुष्पाधार; r. of food अन्नाशय;—of water जलाशय [for].—RECEPTION घेणें n, गृहण n, अंगीकार; सत्कार, संभावना f, आगतस्वागत n.—RECEPTIVE *a.* घेणारा, ग्राहक, ग्राहकशक्तिक्षम.—RECIPIENT घेणारा, ग्राहक; आधार, आशयपात्र.—*n.* घेणारा, ग्राहक.

RECENT *a.* (*recens*) नवा, नूतन, ताजा. -LY *ad.* हल्लीं, नुक्ता.

RECEPTION, See under RECEIVE.

RECIPROCAL *a.* (*reciprocus*) परस्पराचा, एकमेकाचा, अन्योन्य; alternative एकामागून एक येणारा, आळीपाळीचा, अन्योन्यानुगामी. -LY *ad.* परस्पर, एकमेकाकडून.—RECIPROCATE *v.* परस्पर देणें -घेणें; to r. assistance प्रत्युपकार क.—*i.* आळीपाळीनें होणें -घडणें.—RECIPROCATION अदलाबदल f, विनियम.

RECITE *v.* (*-citare*, to call) ह्मणणें, पठन क.: to r. the words of an orator; narrate सांगणें, कथन क.—RECITAL ह्मणणें n, पठन n; कथन n, वर्णन n; सुलावणी f; story कथा f, आख्यान n.—RECITATION ह्मणणें, n, सांगणें n; delivery before an audience of something prepared before hand, or of a piece committed to memory उल्लेख, अनुवाद; alternate r. by two parties, of the lines of a poem चर्चा f.

RECKLESS* *a.* निर्धास्त, बेपरवा [of]. -NESS साहस n.

RECKON* *v.* count गणणें, मोजणें; esteem मानणें, लेखणें, मोजणें (Luke xxii. 37).—*i.* सुमार बांधणें -क.; settle हिशेब बसविणें; for -चा हिशेब -मोजबा देणें; on -वर भरवसा ठेवणें, टेकणें; with हिशेब घेणें -पाहणें -तपासणें. -ING मोजदाद f, गणणा f, गणती f; हिशेब, देणेंघेणें n; खात्याची रुजवात f, झडती f; infliction of deserved punishment दंड -शिक्षा लावणें n, दंड, शिक्षा f; मानणें n, लेखणें n, पाड; you make no r. of duty.

RECLAIM *v.* सुधारणें, ताळ्यावर -मार्गावर आणणें: it is the intention of Providence in its various expression of goodness to r. mankind; tame पाळणें, माणसाळवणें (animals); claim back हक्कानें परत मागणें -घेणें (land); rescue from being wild, desert, waste, submerged, or the like लागवड क., सुधारणें, उजरणें, समुद्र वगैरे पासून घेणें [from, by].

RECLINE *v.i.* (*-clinare*, to lean) टेकणें, ओठंगणें; lean to one side or sideways आडवा पडणें, निजणें [upon].

RECLUSE (*-claudere*, to shut) a person who lives in retirement or seclusion from intercourse with the world, as a hermit or monk एकांतवासी, वानप्रस्थ; one of a class of religious devotees who live in single cells, usually attached to monasteries मठवासी, मठांतल्या खोलींत राहणारा, सन्यासी.

RECOGNIZE *v.* (*-cognoscere*, to know) ओळखणें; admit with a formal acknowledgment मान्य -कबूल क.: to r. a consul [by, from].—RECOGNISANCE, -ZANCE ओळखणें n, ओळख f; *Law*, an obligation of record entered into before some court of record or magistrate duly authorized, with condition to do some particular act, as to appear at the same or some other court, to keep the peace, or pay a debt मुचलका, करारनामा.—RECOGNITION ओळखणें n, ओळख f; मान्य -कबूल क. n.

RECOIL *v.* (*-culus*, the posteriors) fall back मागें हटणें -सरकणें; shrink चपापणें;—as a gun झाडणें, हिसकणें [from].

RECOLLECT *v.* आठवणें, स्मरण होणें; one's self जीव शुद्धीवर आणणें. -ION स्मरण *n*, स्मृति *f*, आठवण *f*; स्मरणशक्ति *f*.—REMINISCENCE, आठवणींतील गोष्ट *f*.

RECOLLECT *v.* पुनः गोळा -जमा क.

RECOMMENCE *v.* पुनः आरंभ क. [by, with].

RECOMMEND *v.* commend to the favorable notice of another दुसऱ्यापाशीं शिफारस -तारीफ क.; make acceptable मान्य -पसंत क.; commit सोंपणें, हवालीं क. (Acts xiv. 10); advice as an action, practice, measure, remedy, &c. सल्ला -मसलत देणें, विचार -उपाय -तजवीज सांगणें [to, for]. -ATION शिफारस *f*, तारीफ *f*; that which recommends to favor कृपाकारण -हेतु; letter of r. भलावण *f*.

RECOMPENSE *v.* (See COMPENSATE) भरून देणें, प्रतिदान क.; pay for तोटा भरून देणें, बदला देणें [for].—*n.* प्रतिदान *n*, प्रतिफल *n*; बक्षीस *n*; तोटा भरून देणें *n*, नुकसानी *f* [for].

RECONCILE *v.* (*-consiliare,* to unite) मिलाफ -समेट क., समजूत पाडणें (2 Cor. v. 20); make consistent ताळा -मेळ बसविणें, एकवाक्यता क.; bring to acquiescence, content, or quiet submission स्वाधीन -वश -राजी क.: to r. one's self to afflictions; settle ताळा पाडणें, मेळ बसविणें [with, to].—RECONCILIATION समजूत *f*, समेट, संधि; ताळा, मेळ, जवा, एकवाक्यता *f* [with, to].

RECONDITE *a.* (*-condere,* to bring together) secret खोल, गहन (studies); secret गुप्त, खोल (causes of things).

RECONNOITER, -TRE *v.* (See RECOGNISE) नजरपाहणी क., हेरणें, टेहळणें.

RECORD *v.* (*recordari,* to remember, from *cor, cordis,* the heart) लिहून ठेवणें, दप्तरांत मांडणें -दाखल क.—*n.* लेख, पट; a book of *records* दप्तर *n*. -ER दप्तरदार; the chief judicial officer of some cities मुख्य न्यायाधीश, 'रिकार्डर.'

RECOUNT *v.* सविस्तर -तपशीलवार सांगणें [to].

RECOURSE धांव *f*, आश्रय, अवलंबन *n*; परत जाणें *n* -येणें *n*.

RECOVER *v.* (*-capere,* to take) फिरून -पुनः मिळवणें; retrieve सावरणें, मिळवणें: to r. lost time; restore from sickness, faintness, &c. बरा -निरोगी क.; reach पोंहचणें, पावणें: if we r. the forest; *Law,* gain as a compensation नुकसानी भरून पावणें [from].—*i.* बरा -निरोगी होणें, सावरणें, उतरणें; उजरणें, निटावणें, सुधारणें; *Law,* succeed in a law suit वाद जिंकणें; to begin to r. जगत्या पंथास लावणें, जीव धरणें. -ABLE *a.* पुनः मिळवायाजोगा, पुनर्लभ्य.—RECOVERY रोगापासून सुटका *f*, रोगमुक्ति *f*, सावरणें *n*; पुनःप्राप्ति *f*; आरोग्य, *n* स्वास्थ्य *n*, सावर [of, from].

RECOVER *v.* पुनः झांकणें, नव्यानें झांकण घालणें -आच्छादणें [with].

RECREANT *a.* (*-credere,* to believe) cowardly भित्रा, भ्याड; apostate क्रियानष्ट, धर्मभ्रष्ट, फितूर.

RECREATE *v.* पुनः जीव देणें -आणणें; refresh ताजा क., विश्रांति देणें [from]; amuse मन रंजविणें, करमणूक क. [with].—RECREATION विसांवा, विश्रांति *f*; पुनर्नवीकरण *n*.

RECRIMINATE *v.* उलटा आळ घेणें, उलटा दोष लावणें, प्रत्यारोप क. [upon, by].

RECRUIT *v.* (*-crescere,* to grow) सावरणें, स्थितीवर आणणें; reinvigorate पुनः शक्ति देणें; supply with new men, as an army नवे शिपाई ठेवणें, भरती क. [with].—*i.* सावरणें, स्थितीवर येणें; शिपाई जमवणें, भरती क.—*n.* पुरवठा, भरती *f*; नवा शिपाई, 'रिक्रूट.'

RECTANGLE (*rectus,* right, *angulus,* angle) समकोणाकृति *f*, समकोण.—RECTANGULAR *a.* समकोण, समचतुरस्र.

RECTIFY *v.* (*-facere,* to make) नीट क., सुधारणें; refine by repeated distillation सत्वशुद्धि क. [by].

RECTILINEAL, -AR *a.* (*-linea,* line) सरळ रेषांचा, सरळ रेखामय.

RECTITUDE (*rectus,* right) सरळपणा, खरेपणा, सचोटी *f;* law of r. नीति *f;* path of r. सत्पथ; to deviate from the path of r. पाऊल वांकडें टाकणें -पडणें.

RECTOR (do.) a clergyman धर्मोपदेशक; headmaster of a public school शाळेचा मुख्य शिक्षक, सर पंतोजी, 'हेड मास्तर.'

RECTUM (do.) मोठ्या अंतड्याचा शेवटचा भाग, उंदुक, चुस्ता *H.*

RECUMBENT *a.* (*-cubare,* to lie down) आडवा झालेला, पासल घेतलेला; idle आळशी; reposing विसांवा घेत बसलेला -पडलेला, लवंडलेला.

RECUR *v. i.* (*currere,* to run) come back परत येणें; come again to mind आठवणें, सुचणें, सई होणें; occur at a stated interval नेमलेल्या वेळीं घडणें -येणें -होणें : the fever will r. to-night; resort आश्रय धरणें -क. [to]. -RENCE पुनः घडणें *n,* पुनरागमन *n.* -RENT *a.* पुनः येणारा; वारंवार येणारा, पुनर्वर्त्ती.

RED* *a.* (*Skr. rohita*) तांबडा, लाल, आरक्त; dusky r. पोंवळा; dark r. अरुण; deep r., flaming r. तांबडालाल, लालभडक, लालबुंद; r. lead शेंदूर; r. ocher काव *f,* गेरू *f;* [r. tape, tape used in public offices for tying up documents, &c.; hence official formality].—*n.* तांबडा रंग, रक्तवर्ण. -COAT लाल डगल्याचा शिपाई, शिपाई. -DEN *v.* तांबडा क.—*i.* तांबडा होणें. -DISH *a.* तांबूस, तांबसर. -HOT *a.* तापून लाल झालेला, अग्निवर्ण, लाल : the iron has become r. लोखंड लाल झालें आहे. -NESS तांबडेपणा, लाली *f.* -SORREL घोळ *f,* घोळीची भाजी *f.*

REDEEM *v.* (*-emere,* to buy) परत विकत घेणें; recall, as an estate, or to regain, as mortgaged property, by paying what may be due by force of the mortgage सोडविणें, गहाण सोडविणें; receive back by paying the obligation, as any promissory note, bond, or other evidence of debt, given by the state, by a company or corporation, or by an individual पैसा देऊन खत -रोखा वगैरे परत घेणें -सोडवणें; ransom from captivity खंड देऊन सोडवणें; *Theol.* rescue and deliver from the bondage of sin and the penalty of God's violated law तारणें, उद्धरणें, उद्धार क.: Christ has *redeemed* us from the curse of the law, being made a curse for us (Gal. iii. 13); compensate भरून देणें, तोटा भरून देणें, भरणें [from, with]. -ER खंड देऊन सोडविणारा; विकलेला परत घेणारा; तारणारा, त्राता; the Saviour of the world, JESUS CHRIST जगाचा तारणारा, प्रभु येशू ख्रीस्त, जगदुद्धार.—REDEMPTION खंड देऊन सोडविणें *n;* विकलेला परत घेणें *n;* तारणें *n,* तारण *n,* उद्धार (Eph. i. 7); सुटका *f,* मोकळीक *f;* गहाणमाल -जिंदगी सोडवणें *n.*

REDOLENT *a.* (*-olere,* to emit a smell) सुवासाचा, सुगंधी.

REDOUBLE *v.* दुणावणें, दुप्पट क.; multiply वाढवणें.—*i.* दुणावणें, दुप्पट होणें; वाढणें.

REDOUBT *F.* बाहेरकोट, पडकोट.

REDOUBTABLE *a. F.* धिमा, शूर, प्रतापसिंह.

REDOUND *v. i.* (*undare,* to rise in waves) roll back as a flood मागें लोटणें; come back परत येणें, उलटणें; have effect परिणामीं लागू होणें, गुण येणें -होणें -असणें, फळ येणें: the honor done to the Christian religion ultimately *redounds* to God, the author of it; be in excess अति -अतिशय होणें; remain over and above पुरून उरणें [to].

REDRESS *v.* remedy उपाय -तजवीज क.; re-

lieve of any thing unjust or oppressive दाद देणें [by].—*n.* दाद *f* [for].

REDUCE *v.* (*-ducere*, to lead) convert फिरवणें, रूपांतर क.: to r. a substance to powder -ची पूड क.;—to ashes राख क.;—to poverty भिकेस लावणें -मिळवणें; bring under rules नेमाखालीं -कायद्याखालीं आणणें, लावणें: to r. men to tribes; bring to an inferior state with respect to size, rank, quantity, value, &c. कमी क., उतरणें, छाटणें (expenses; the intensity of heat); subdue जिंकणें, पराजय क.; bring into a certain order, arrangement, &c. वर्ग -प्रत लावणें: to r. animals to a class; *Arith.* रूप देणें; separate, as a metal, from other substances with which it is combined धातु शोधणें -शुद्ध क.; *Surg.* restore to its proper place or condition जागच्या जागीं -पूर्वस्थितीवर आणणें (a dislocation): to r. figure, design, or draught लहान सांच्यावर धरणें -प्रत क.; to r. a fortification किल्ला हस्तगत क.; to r. to the ranks जमादार, हवालदार वगैरेंच्या पायरी वरून (गैरवर्त्तणुकीमुळें) शिपायाच्या पायरीवर आणणें, -ला शिपाई क. [from, to].—REDUCIBLE *a.* कमी करायाजोगा; रूपांतर करण्याजोगा.—REDUCTION कमी करणें *n*; काटाकाट *f*; भांजणी *f*; पराजय करणें, &c. [from, to].

REDUNDANT *a.* (See REDOUND) अधिक, अतिशय; using more words than are necessary अधिक शब्दांचा उपयोग करणारा, अप्रयोजक (author) [in].—REDUNDANCE अधिकाई *f*, आधिक्य *n*.

REDUPLICATE *v.* दुप्पट क.; *Gram.* अक्षर द्वित्त क., द्विरुक्ति क.—REDUPLICATION दुप्पट *f*; द्वित्व *n*; word formed by r. प्रतिशब्द.

RE-ECHO प्रतिध्वनि.

REED* वेत; writing r. बोरू; arrow made of a reed वेताचा तीर; pipe पांवा, वेणु.

REEF *D.* खराबा, पाण्यांतला खडक.*—of a sail शिकी *f*.

REEK* वाफ *f*, धूर.—*v. i.* वाफ -धूर निघणें -येणें [with].—REEKY *a.* धुराचा, धूममय.

REEL* a frame turning on an axis and on which yarn, thread, &c., are wound चरक.—*v. i.* झोकांडी -भिरकांड्या खाणें. [about].—*t.* चरकावर गुंडाळणें [around]. -YARN रिळाचा धागा.

REENFORCE, -INFORCE *v.* कुमक पाठविणें, बळजोरी आणणें, पुरावा -पाठबळ देणें; लष्कराची -लढाऊ गलबतांची कुमक क. [by, with]. -MENT कुमक *f*, पुरावा; additional force कुमकेस पाठविलेलें लष्कर *n*, लष्कराची कुमक *f*, कुमक *f*.

REFER *v.* (*-ferre*, to bear) send back परत पाठविणें; give in charge हवालणें, सोंपणें; direct, deliver, as for treatment, decision, information, &c. वागवायाला -करायाला -पुसायाला -ठराव करायाला धाडणें -लावणें -सांगणें; pass over to another tribunal for decision ठरावा करितां दुसऱ्या कोर्टाकडे पाठविणें; assign to as a class, a cause, a motive, reason, or ground of explanation -चा हेतु दाखविणें, कारण लावणें -सांगणें. [from, to].—*i.* appeal अर्जी क.; have respect by intimation लक्ष -धोरण असणें, सुचविणें; पुसायाला -पाहायाला -चौकशीला पाठविणें; लागणें, लागू होणें. -ABLE *a.* लावायाजोगा, पुसायाजोगा. -EE तिऱ्हाईत. -ENCE सोंपणें *n*, हवालणें *n*, हवाला; संबंध, धोरण *n*; सूचना *f*; one of whom inquiries can be made as to the integrity, capacity, &c. of another दुसऱ्याविषयीं विचारपूस -चौकशी करण्याचें ठिकाण *n* -ची जागा *f*; a passage in a work to which the reader is referred from another passage संबंधदर्शक स्थळ *n*; *Law*, तिऱ्हाइताकडे निवाडा करणें *n* -सोंपणें *n*; in r. to विषयीं, संबंधीं; containing r. सापेक्ष.

REFINE *v.* purify मळ छाटणें, शोधणें, साफ क.; reduce, as metals from the ore धातु शोधणें; polish सुधारणें, सजवणें, शिष्ट, साजरा क. (manners, language, taste).—*i.* निवळणें, स्वच्छ होणें, गाळ (खालीं) बसणें; चोखट -चोखाळ असणें. -MENT शोधन *n*, शुद्धि *f*; सुधारणूक *f*; सभ्यता *f*, सौजन्य *n*; नाजकाई *f*, सूक्ष्मता *f*;—of manners शिष्टाचार, विनय;—of mind मनशुद्धि *f*.

REFLECT *v.* (*-flectere*, to bend) cause to return after striking upon any surface परावर्त्तन क. (light); give back an image of प्रतिबिंब पाडणें.

> Nature is the glass *reflecting* God,
> As by the sea *reflected* is the sun.
> YOUNG.

—*i.* through, back परावर्त्तन होणें; revert परत प्राप्त होणें; contemplate मनन -चिंतन क.; cast reproach शब्द -बोल लावणें [on]. -ED प्रतिबिंबित, परावर्त्तित; to be r. परावृत्त; r. image प्रतिछाया *f*-बिंब *n*. -ION प्रतिबिंब पाडणें *n*, परावर्त्तन *n*; चिंतन *n*, मनन *n*, विचार; प्रतिबिंब *n* -रूप *n*; the angle of r. परावर्त्तनकोन; शब्द, बोल, दोष. -OR किरण किंवा उष्णता परावर्त्तन होण्यासाठीं जो कांहीं उजळ पदार्थ लावितात तो, 'रिफ्लेक्टर.' -IVE *a.* प्रतिबिंब पाडणारा, परावर्त्तक; मननशील, गंभीर, विचारशील.

REFLUX ओहट *f*, ओहटी *f*.

REFORM *v.* पुनः क.; put into a new and improved form सुधारणें, नीट क. [by].—*i.* सुधारणें, वाटेवर -मार्गावर येणें. -ATION सुधारणूक *f*, सुधारणा *f*; [*Eccl. Hist.* the important religious movement commenced by Luther at the beginning of the sixteenth century, which resulted in the separation of the Protestant Church from the Romish see]. -ED सुधारलेला; [said of the church formed as the result of the Reformation]. -ER सुधारणारा; [one of those who commenced the reformation of religion in the sixteenth century, as Luther, Melancthon, Zuinglius, and Calvin].

REFRACT *v.* (*-frangere*, to break) वांकवणें, वांकडा क. (the rays of light). -ION वांकडा करणें *n*, वक्रीकरण *n* -भवन *n*, वक्रगति *f*. -ORY *a.* दांडगा, शिरजोर, अडेल.

REFRAIN *v.* (do.) राहवणें, थाबवणें, आटोपणें. —*i.* राहणें, थाबणें [from].

REFRESH *v.* ताजा क.; विश्रांति देणें; शीण -भाग उतरणें, श्रम हरण क. [with]. -ED विश्रांत, ताजा, तवाना. -ING *a.* विसांवा देणारा, श्रांत, श्रांतिहर. -MENT विसांवा, विश्रांति *f*; slight repast उपाहार, फळार.

REFUGE (*-fugere*, to flee) shelter from danger or distress आश्रय, आसा, शरण *n*; that which shelters आश्रय, आसा, शरण *n*; expedient उपाय, इलाज, युक्ति *f*; having but one r. अनन्यगति; come for r. शरणागत; seeking r. शरणार्थी [for, from]. —REFUGEE शरणागत, शरणार्थी.

REFULGENT *a.* (*-fulgere*, to shine) चकचकीत, तेजस्वी [with].—REFULGENCE, -CY चकचकी *f*, कांति *f*, तेज *n*.

REFUND *v.* परत देणें -क.; पुनः भरणें, पुनः भांडवल जमविणें [to, by].

REFUSE *v. F.* deny नाकारणें, नाहीं ह्मणणें; reject नको -नलगे ह्मणणें;—flatly, bluntly, &c. तुकडा तोडून देणें.—*a.* टाकाऊ, गाळवट, खेर, रद्दी.—*n.* गाळ, खेर *f*, केर. -AL नाकार, नकार, अनंगीकार.

REFUTE *v.* (*-futare*, to argue) मोडणें, खंडणें, खंडन क. [by].—REFUTATION खंडन *n*, मोड; r. and establishment खंडनमंडन *n*.

REGAIN *v.* फिरून पावणें -मिळवणें.

Regal *a.* (*rex, regis,* a king) राजाचा, राजकीय, राजसंबंधी. -ity बादशाही *f,* राजत्व *n,* नृपत्व *n.* -ia (*L.*) राजचिन्हें -लक्षणें *n pl;* बादशहाचा लवाजमा, सलतनात *f;* insignia of an office or order पदचिन्हें *n pl.* -ly *ad.* राजाच्या रीतीनें, राजास शोभेसा.

Regale *v. F.* संतुष्ट -खुश -तृप्त क.; one's self पारणें फेडणें, हौस पुरवणें, धण पुरवणें.—*i.* चंगळ, घमंडी क. [on, upon, with.]

Regard *v. F.* observe पाहणें, नजर लावणें, टेहळणें; pay attention to लक्ष लावणें, विचार क.; pay respect to मानणें, लेखणें, चांगला मानणें, मान देणें, पाळणें (Rom. xiv. 6); treat वागवणें, -शीं वागणें : he *regarded* me with kindness [with, as, for].—*i.* मानणें.—*n.* प्रीति*f,* स्नेह; लक्ष *n,* अनुसंधान *n;* मानणें *n,* मान, मान्यता *f;* पाळणें *n,* पालन *n;* नजर *f,* भीड *f,* मुलाजा; view दृष्टि *f,* नजर *f,* विचार; in r. to विषयीं [for]. -ing *prep.* विषयीं. -less *a.* बेफिकीर, निश्चित, विरक्त [of].

Regenerate *v.* (*-generare,* to beget) दुसऱ्यानें जन्मविणें, पुनर्जन्म देणें; *Theol.* change the heart and affections from enmity to the love of God नवें अंतःकरण देणें.—*a.* दुसऱ्यानें जन्म पावलेला, नवा उत्पन्न, द्विज, नवें अंतःकरण पावलेला.—Regeneration पुनर्जन्म, पुनरुत्पत्ति *f;* नवीन अंतःकरण *n,* द्विजत्व *n* : He saved us by the washing of r. and renewing of the Holy Ghost (Tit. iii. 5).

Regent *a.* (*regere,* to rule) अधिकारी, अधिकाराचा; queen r. अधिकार -राज्य चालविणारी राणी *f.*—*n.* अधिकारी; one invested with vicarious authority प्रतिनिधि; one who governs a kingdom in the minority, absence, or disability of the sovereign राजप्रतिनिधि; r. of the quarters दिक्पाल.—Regency प्रतिनिधीचा अमल; राजप्रतिनिधीचा अमल; body of men entrusted with vicarious government राजप्रतिनिधि मंडळी *f* -मंडळ *n.*

Regicide (*rex, regis,* king, *cædere,* to kill) राजघातक -हिंसक; murder of a king राजहत्या -हिंसा *f.*

Regimen (*regere,* to guide) system of order व्यवस्था *f,* पद्धति *f;* regulation of diet पथ्य *n.*

Regiment (do.) पलटण *n, f,* 'रिजमेंट' *n, f.* -al *a.* पलटणीचा. -als *pl.* पलटणीचा पोशाग, बाणगुंसी *f.*

Region (do.) country देश, प्रांत, मंडळ *n;* neighbourhood आसपासचा देश, प्रांत (Matth. iii. 5); sky दिशा *f;*—of the body प्रदेश, चक्र *n,* मंडळ *n;* the lower r. अधोलोक -भुवन *n;* upper r. ऊर्ध्वलोक; centre of a r. मध्यदेश;—of the head मस्तकमंडळ *n.*

Register *v.* (*-gerere,* to carry back) a written account or entry लेख, पट, जापता; an official record दप्तर *n,* 'रजिस्टर' *n;* officer who keeps records दप्तरदार; [parish r. book in which are recorded the baptisms of children, and the marriages and burials of the parish].—*v.* बार क., नोंदणें, रजिस्टर क.; दप्तरांत लिहिणें -मांडणें.—Registrar दप्तरदार, 'रजिस्ट्रार.'—Registry लिहून ठेवणें *n,* नोंदणी *f,* बारनिसी *f;* बारनिसीचें हेंपीस *n,* -कचेरी *f;* लिहून ठेवलेल्या गोष्टी *f pl* -ली हकीकत *f.*

Regret *v.* (*-queritari,* to complain vehemently) be sorry for खेद क., दुःख क., रडणें; repent पश्चात्ताप क.; lament the loss of -ची चुरचुर -रुखरुख -हुरहुर वाटणें.—*n.* दुःख *n,* खेद; पश्चात्ताप; चटपट *f,* चुरचुर *f,* [for].

Regular *a.* (*regere,* to guide) conformed to a rule यथाशास्त्र -विधि, कायदेशीर; agreeable to established customary forms संप्रदायशुद्ध, सांप्रदायिक; governed by rules

नेमानें चालणारा, नेमाचा, नियमनिष्ठ (person); instituted according to established form विधिस्थापित, मार्गाचा, रीतीचा, सावसुरत; orderly सुरळीत, यथाक्रम; periodical नियमानें येणारा -होणारा -घडणारा इ०, नियतकालिक, नित्य; r. troops, troops of a permanent army [in]. -ITY कायदेशीरपणा, ससूत्रता *f*; नेमानें वागणें *n*, नेमनिष्ठा *f*; बेतबात, व्यवस्था *f*, सुरळीतपणा, क्रम. -LY *ad.* कायद्याप्रमाणें, यथामार्ग -विधि; बेतबातानें, पद्धतवार; नेहमी, नित्य.—REGULATE *v.* नेमानें -बेतानें चालविणें; put in good order ताळ्यावर -बेतावर आणणें, सुधरणें; subject to governing principles or laws कायद्यांत ठेवणें -आणणें, अनुशासणें [by].—REGULATION बेतानें चालणें *n*, अनुशासन *n*; rule prescribed for management or government कायदा, कानू *f*; व्यवस्था *f*, बंदोबस्त.—REGULATED व्यवस्थित, अनुशासित; well r. सुव्यवस्थित; ill r. अव्यवस्थित.—REGULATOR बेतावर आणणारा, सुधरणारा; कायदा बांधणारा -करणारा, अनुशास्ता *f*; यंत्राची गति -वेग नीट -अटोक्यांत ठेवणारी कळ *f*, 'रेग्युलेटर.'

REGULUS (*L.*) *Astron.* मघानक्षत्र *n*.

REHEARSE *v.* (*re* and *hearsay*) recite पाठ म्हणणें, म्हणून दाखविणें; tell सांगणें; repeat in private for experiment and improvement, before a public representation तयारी करितां म्हणणें.—REHEARSAL पठन *n*, पाठ, अनुवाद; कथन *n*; तयारीचें म्हणणें *n*, भाव्यनुकरण *n*.

REIGN (*rex, regis,* king) राज्य *n*, अमल, शक; time during which a king, queen, or emperor possesses the supreme authority कारकीर्द *f*, राज्य *n* [over].—*v. i.* राज्य क., अमल -सत्ता चालविणें; prevail प्रबळ असणें, प्रचार -चलती असणें, चालणें: diseases r. in summer; rule अधिकार -सत्ता चालविणें (Rom. vi. 12).

REIMBURSE *v. F.* भरून देणें, परत क.; खजिन्यांत भरणें -परत क., भरणें: to r. the expenses of a war [for].

REIN (*-tenere,* to hold) strap of a bridle लगामाची दोरी *f* -वादी *f* अगीन *f*; government अधिकार, आवर, नियमन *n*; to hold a tight r. लगाम आवळ धरणें; to hold with a slack r. सईल दोरी देणें; to give the *reins* to लगाम सोडणें; without r. बेलगाम *n*.

REINDEER* एक जातीचा हरण आहे, 'रेन्दीर.'

REINS *n. pl.* (*renes*) lower part of the back कमर *f*; kidneys मूत्रपिंड, गुर्द *n*; inward impulses अंतर्याम *n* (Prov. xxiii. 16).—RENAL *a.* गुर्दाचा, मूत्रपिंडाचा (arteries).

REINSTATE *v.* फिरून नेमणें, बसवणें.

REITERATE *v.* फिरून -पुनः पुनः -वारंवार बोलणें -क., उगाळणें, खरावणें.—REITERATION उगळणी *f*, उजळणी *f*, पौनःपुन्य *n*.

REJECT *v.* (*-jacere,* to throw) वर्ज क., टाकणें, नापसंत -रद्द क.; refuse to receive अनंगिकार क., नाकारणें; refuse to grant नाकबूल क., अमान्य क. (a request). -ION टाकणें *n*, परित्याग; नकारणें *n*, नाकार, अनंगीकार.

REJOICE *v. F.* खुष -खुशी -आनंदीत क.—*i.* आनंद पावणें -क. [at, with, in].—REJOICING आनंदन *n*; public r. उत्सव, उत्साह.

REJOIN *v.* पुनः जोडणें -मिळवणें; meet or fall in again with पुनः भेटणें, गांठ पडणें.—*i.* उलटजाब -प्रत्युत्तर देणें; *Law,* answer, as the defendant to the plaintiff's replication वादीच्या उत्तरास प्रतिउत्तर देणें. -DER प्रतिउत्तर *n*, उत्तर *n*; प्रतिवादीचें प्रत्युत्तर *n*; defence an r. उत्तर प्रत्युत्तर *n*.

RELAPSE *v. i.* (*-labi,* to fall) परतणें; fall back उलटणें;—from a state of moral condition दुराचाराकडे उलटणें, फिरून बिघडणें;—from a state of convalescence उलटखाणें -घेणें, दुखणें परतणें.—*n.* उलट *f*, उलट

परतणी *f,* माघार *f;* पुनर्धर्मत्याग; पुनरोंग-ग्रस्तता *f* [from].

RELATE *v.* (*-ferre,* to bring or bear) सांगणें, निवेदणें, कथन क. [to].—*i.* संबंध -नातें असणें, लागणें, लागू असणें.— RELATION सांगणें *n,* बयान *n,* हकीकत *f;* कथन *n;* connection संबंध, नातें *n;* connection by consanguinity एकशरीरसंबंध, सगोत्रता *f;* a relative गोत्री, भाऊबंध, आप्त, संबंधी, सोयरा; in r. to -संबंधी.—RELATIVE *a.* संबंधी, विषयक; not absolute सापेक्ष; implying relation अन्योन्य संबंधी; *Gram.* संबंधी (pronoun) [to].—*n.* भाऊबंध, आप्त, संबंधी; संबंधी सर्वनाम *n.* -LY *ad.* अन्यापेक्षेनें.

RELAX *v.* (*-laxare,* to loose) सईल -ढिला क.; make less severe नरम -हलका क.; remit in respect to strenuousness ढिला -सईल क.; ease विसांवा -विश्रांति देणें: conversation *relaxes* the mind; loosen कोठा मोकळा -ढिला क.: medicines r. the bowels [in, from]—*i.* ढील -सैल होणें; ढिला पडणें, थंडावणें; विसांवा पावणें. -ATION सैलावणें *n;* ढिलेपणा; विसांवा, विश्रांति *f;* ढिलेपणा, लघुकोष्टता *f,* प्रसरण *n.*

RELAY *F.*—of horses, runners, &c. डाकेचा टप्पा -चौकी *f;* r. stage or station डाक *f,* चौकी *f.*

RELEASE *v.* (See RELAX) सोडणें, सुटका क., बंदखुलास क.; let go, as a legal claim दावा सोडणें; relieve from pain, trouble, &c. दुःखांतून सोडविणें.—*n.* सुटका *f,* मोकळीक *f;* सोडचिठ्ठी *f,* बेदावेपत्र *n* [from].—RELEASED मुक्त, विमुक्त;—from obligation ऋणमुक्त, वचनमुक्त.

RELENT *v. i.* (*lentus,* pliant, slow) दया -कळवळा येणें [from]. -LESS *a.* कठोरहृदय.

RELEVANT *a. F.* प्रसंगोचित, समयोचित, समर्पक (argument) [to].—RELEVANCY प्रासंगिकता *f,* प्रासंगोचित्य *n.*

RELIANCE, See under RELY.

RELIC (*reliquere,* to leave behind) शेष *n,* शिलक *f;* a corpse प्रेत *n,* शव *n;* memorial यादगारी *f,* आठवणूक *f*: *relics* of youthful days.—RELICT विधवा *f.*

RELIEVE *v.* (*-levare,* to raise) lift up उचलणें; put in relief उठाव क.; alleviate शमन -दुःखपरिहार क.; help सहाय -मदत क.;—a sentinel, &c. बदलणें,बदली क.; to r. one's need -ची गरज चालविणें; to right नीट क., दाद देणें, इनसाफ क. [from, by, with].—RELIEF दुःखशमन *n,* श्रमपरिमार्जन *n;* दुःखपरिहार; दाद *f,* इनसाफ; आराम, चैन *n,* विसांवा; बदली *f,* पाहऱ्याचा पालट; person relieving बदली, बदल्या; मदत *f;* [the projecture of a figure above or beyond the ground in which it is formed]. See BAS-RELIEF [from, for].

RELIGION (*relegere,* to gather again, or from *religare,* to bind fast) recognition of God as an object of worship, love, and obedience ईश्वरभक्ति *f* -सेवा *f,* भक्ति *f,* a system of faith and worship धर्म, मार्ग, मत *n;* establishment of r. धर्मसंस्थापना *f;* extinction of r. धर्मोच्छेद. *Obs. Religion,* as distinguished from *Theology,* is subjective, designating the feelings and acts of men which relate to God; while *Theology* is objective, and denotes those ideas of God which man entertains respecting the God whom he worships, esp. his scientific and systematic views of God. As distinguished from *morality, religion* denotes the influences and motives to human duty which are found in the character and will of God, while morality describes to man the duties to man, to which true religion always influences.—RELIGIOUS *a.* धर्माचा, धर्म संबंधी, धर्म-

प्रकरणाचा, in comp. धर्म,दैव; godly भक्तिमान, धार्मिक; dutiful आज्ञाधारक, सेवातत्पर. -LY *ad.* भक्तिबुद्धीनें -भावानें; पूज्यबुद्धीनें; धर्ममार्गानें; conscientiously नेकीनें, इमानानें : a promise r. observed. -NESS धार्मिकपणा, धर्मशीलता *f.*

RELINQUISH *v.* (-*linquere,* to leave) सोडणें, मागें टाकणें; give up सोडणें, त्याग क.; renounce a claim to हक्क -वारसा सोडणें. -MENT त्याग, उत्सर्ग; r. of right, title to सत्तानिवृत्ति *f.*

RELISH* *v.* take or eat with pleasure गोडीनें खाणें, गोड लागणें, रुचणें, भावणें, आवडणें; give a pleasing flavor to स्वाद -गोडी आणणें -देणें.—*i.* गोड असणें -लागणें; स्वाद -छटा येणें -मारणें.—*n.* रुचि *f,* गोडी *f,* चव *f* [for].

RELUCTANCE (*luctari,* to struggle) कंटाळा, त्रास, नाखुशी *f.*—RELUCTANT *a.* नाराजी *f,* नाखुशी *f.* -LY *ad.* नाखुशीनें.

RELY *v. i.* (*re* & *lie*) विश्वास -भरवसा ठेवणें [on, upon].—RELIANCE विश्वास, भरवसा, इतबार.

REMAIN *v. i.* (-*manere,* to stay) be left after other things have been removed or destroyed उरणें, राहणें, शिलक असणें; stay behind while others withdraw मागें राहणें, उरणें, वांचणें (Gen. vii. 23); last राहणें, टिकणें, तगणें; sojourn राहणें, मुक्काम क.—*n. pl* प्रेत *n*; productions, esp. literary works of one who is dead मेलेल्याचा ग्रंथ -लेख. -DER बाकी *f,* शेष *n*; प्रेत *n*; *Math.* बाद, बाकी *f,* अंतर *n.*

REMAND *v.* (-*mandare,* to commit) परत -माघारां पाठविणें [to].

REMARK *v.* (See MARK) take notice of लक्ष-लावणें, चित्तदेणें; express in words or writing, as observed or noticed कोणत्याही गोष्टीविषयीं जें ज्याला वाटतें तें बोलून दाखविणें -बोलणें, चर्चा क.—*n.* पाहणें *n,* अवलोकन *n,* निरीक्षा *f*; चर्चा *f,* व्याख्या *f,* लेख, 'रिमार्क,' शेरा; a censorious r. टीका *f* [on, upon]. ABLE *a.* लक्षांत ठेवायाजोगा; प्रख्यात, प्रसिद्ध. -LY *ad.* लक्षांत ठेवण्याजोगा, फार, विलक्षण.

REMARRY *vc.* पुनः लग्न क., पुनर्विवाह क.; पुनः लग्न होणें.—REMARRIAGE दुसरें लग्न *n,* पुनर्विवाह.

REMEDY (-*mederi,* to heal) उपाय, तजवीज *f,* इलाज; that which cures a disease उपाय, उपचार; mild r. सामोपचार; violent r. राक्षसी उपाय; external r. बाह्योपचार; internal r. अभ्यंतरोपचार; *Law,* दाद लागण्याचा कायदेशीर उपाय [for].—*v.* उपाय -इलाज क.; रोग बरा -परिहार क. [by].—REMEDIABLE *a.* परिहार करायाजोगा, उपायसाध्य, परिहार्य.—REMEDIAL *a.* उपायाचा, इलाजाचा.—REMEDILESS *a.* निरुपाय, उपाय -गतिहीन.

REMEMBER *v.* (See MEMORY) recall आठवणें, स्मरणें; keep in mind आठवण धरणें -राखणें, मनांत -ध्यानांत ठेवणें [for]. -ANCE आठवण *f,* स्मरण *n*; memorial आठवणूक *f,* यादगिरी *f*; power of remembering स्मरणशक्ति *f*; period over which one's power to bring to mind extends आठवणीचा काळ, आठवणूक *f*; rushing into r. स्फुर्ति *f.* -ANCER स्मरण करणारा, स्मारक; [an officer in the Exchequer of England, whose business is to put the judges of that court in remembrance of such things as are to be called on or dealt in for the Sovereign's benefit.]

REMIND *v.* आठवण -स्मरण देणें [of].

REMINISCENCE (*reminisci,* to recollect) स्मरण *n,* स्मृति *f.* See MEMORY.

REMIT *v.* (-*mittere,* to send) परत पाठविणें; give up सोडणें, माफ क., सूट देणें; relax ढिला -सईल क., जोर कमी क.; forgive क्षमा -माफ क.; transmit to a distance, as money

हुंडी करून पाठविणें, पैका -हुंडी पाठविणें [to]. —*i.* हलकावणें, मंदावणें, उतरणें;—fever, &c. उतार पडणें, उतरणें. -TANCE पाठविलेला पैसा, हुंडी *f*, 'रिमिटन्स' *n*. -TENT *a.* सतत, विषम; r. fever विषमज्वर.—REMISS *a.* ढिला, हयगयीचा, सुस्त [in]. -ION ढिलाई *f*, सुस्ती *f*; माफी *f*, क्षमा *f*, सोड *f*, सूट;—of a distemper उतार; r. and exacerbation उतारचढ;—of sin पापक्षमा *f* -मोचन *n*;—of study अनध्याय, अवकाश.

REMNANT *a.* & *n.* (See REMAIN) शेष *n*, बाकी *f*;—of cloth फडकें *n*, चिरगूट *n*, चिंधी *f*.

REMONSTRATE *v.* (-*monstrare*, to show) तकरार क., कान उघडणें.—REMONSTRANCE दोन गोष्टी सांगणें, कान उघडणें -झाडणें *n*.

REMORSE (-*mordere*, to bite) keen pain excited by a sense of guilt चुरचूर *f*, खरखर *f*, खेद [for]. -LESS *a.* निर्दय, कठीण.

REMOVE *v.* (See MOVE) उठवणें, उचलणें, घेऊन जाणें; displace जागा पालटणें, स्थलांतर क.; take away दूर -परिहार क., घालवणें (a disease); carry from one court to another एका कोर्टातून दुसऱ्या कोर्टात नेणें (a cause or suit by appeal);—from a post जागेवरून काढणें -दूर क. [from, to]. —*i.* जागा पालटणें, स्थलांतर होणें.—*n.* स्थलांतर *n*, स्थानभेद; step in any scale of gradation पायरी *f*; act of putting a horse's shoes on different feet खोलबंदी *f*. [from].—REMOVAL स्थानांतर करणें *n*; स्थानपालट, स्थानांतर *n*; परिहार, निरसन *n*; दूर करणें *n*, दूरीकरण *n*;—of obstacles विघ्ननाशन *n*;—of ignorance अज्ञानखंडन *n*.—REMOVED काढलेला, उठवलेला; दूर केलेला, घालवलेला; remote दूरचा, लांबचा; (a dwelling); r. from office स्थानभ्रष्ट, पदच्युत. REMOVER काढणारा, स्थलांतर करणारा; in comp. नाशक, घ्न, अंतक: रोगांतक, रोगघ्न, &c.—

REMOTE *a.* दूरचा, लांबचा; foreign परका; separate वेगळा; primary मूळचा, अलग [from].

REMUNERATE *v.* (-*munerare*, to give) बक्षीस देणें.—REMUNERATION देणगी *f*, प्रतिफल *n*. —REMUNERATIVE *a.* फल देणारा, बक्षीस देणारा.

RENAL, See under REINS.

RENCOUNTER (*re* & *counter*) meeting of two persons or bodies भेटाभेट *f*, ठेप *f*; combat कचाकची *f*, चकमक *f*, झमाझमी *f*.

REND* *v.* tear asunder फाडणें, चिरणें, टरकावणें; split चिरणें, दुभागणें, विभागणें (1 Kings xi. 11) [into].

RENDER *v.* (-*dare*, to give) return परत देणें -क.; inflict, as a retribution शासन लावणें, सूड उगवणें -घेणें; give देणें; contribute करणें, पुरवणें (service);—as an account हिशोब -झडती देणें; cause to do करवणें: to r. a fortress more secure; translate भाषांतर क.; boil down and clarify कढवून निवळ क.; plaster roughly अस्तरगारी क. [to]. -ING भाषांतर *n*; गिलाव्याचा पहिला थर घालणें -रचणें *n*; अस्तरगारी *f*.

RENDEZVOUS *F.* meeting जमाव; place of meeting संकेतस्थल *n*, जमण्याची जागा *f*, अड्डा.

RENEW *v.* नवा क.; restore to former freshness ताजा क., उजरणें; begin again पुनः आरंभ क.; do over again पुनः -नव्यानें -परतून क.; furnish again पुनः पुरवठा क., पुरवणें; *Theol.* make new spiritually नवें मन देणें, नवा स्वभाव देणें (Rom. xii. 2).—*i.* नवा होणें; पुनः आरंभणें. -AL नवा करणें *n*, नवीकरण *n*, जीर्णोद्धार; फिरून करणें *n*, पुनरारंभ.

RENOUNCE *v.* (-*nunciare*, to announce) disclaim टाकणें, सोडणें, नाकारणें (a title); reject, as a connection or possession

टाकणें, सोडणें, त्याग क., नांव सोडणें. -MENT. —RENUNCIATION आंगाबाहेर टाकणें *n*; अस्वीकार, नाकार; त्याग, उत्सर्ग, परित्याग;—of the world सर्वसंगपरित्याग, सन्यास, संसारत्याग.

RENOVATE *v.* (-*novare*, to make new) See RENEW.

RENOWN (-*nomen*, name) नांव *n*, कीर्त्ति *f*. -ED नामांकित, कीर्त्तिमान, प्रख्यात [for].

RENT* भाडें *n*;—of land धारा, सारा, वसूल. -AL, -ROLL तहशील *fn*, तनखा, वसूल बाकीची याद *f*, जमाबंदी *f*. -ER भाड्यानें -साऱ्यानें लावणारा; the tenant who takes an estate on rent भाड्यानें घेणारा, भाडेकरी; सारेकरी, धारेकरी.

RENT (See REND) चीरफळा.

REPAIR *v.* (-*parare*, to prepare) restore to a good state after injury or decay दुरुस्त क., सुधारणें.—as a house डागडुजी -'रिपेर' क.; supply loss भरणें, भरून देणें, तोटा भरणें.—*n*. डागडुगी *f*, 'रिपेर' *f*, सुधारणूक *f*, जीर्णोद्धार; keep in r. मरामत -उस्तवारी राखणें; to look after the *repairs* of मोडतोड पाहणें.—REPARATION डागडुजी करणें *n*; डागडुजी *f*; amends फेडणें *n*; प्रतिकार, वजपा, मोबदला [for].

REPAIR *v. i.* (-*rapatriare*, to return to one's country) जाणेंयेणें -येणेंजाणें क.

REPARTEE *F.* समयोचित्त उत्तर *n*, हजीरजबाब.

REPAST (*pascere*, to feed) भोजन *n*, जेवण *n*; meal अन्न *n*, आहार.

REPAY *v.* परत देणें -क., फेडणें; make return फेड क., प्रतिदान क.

REPEAL *v.* (-*appeler*, to call) रद्द क., मोडणें. —*n*. मोडणें *n*, भंग, लोप, उच्छेद.

REPEAT *v.* (-*petere*, to attack) फिरून -दुसऱ्यानें -उलटून क., दुसारणें; say again फिरून ह्मणणें; rehearse ह्मणणें, पाठ ह्मणणें [to]. -EDLY *ad*. वारंवार, पुनःपुनः—REPETITION पुनरावृत्ति *f*, दुसारणी *f*, पुनः -दुसऱ्यानें क. *n*; दुसऱ्यानें बोलणें *n*, पुनरुक्ति *f*; पठन *n*, अनुवाद.

REPEL *v.* (-*pellere*, to drive) मागें सरणें -लोटणें, हटवणें; oppose आडवा येणें, वारणें, निवारणें [from].

REPENT *v. i.* (-*pœnitere*, to make repent) feel pain, sorrow, or regret for what one has done or omitted to do पश्चात्ताप -खेद पावणें -क.; change the mind or course of conduct on account of regret or dissatisfaction with what has occurred मन -बुद्धि फिरवणें, वर्त्तन पालटणें; *Theol.* be sorry for sin as morally evil and to seek forgiveness पापाविषयीं खेद क., पश्चात्ताप क. (Luke xiii. 3).—*t*. -विषयीं दुःख क. [of]. -ANCE पश्चात्ताप, अनुताप [for]. -ANT *a*. & *n*. पश्चात्तापी, अनुतापी.

REPERCUSSION (See PERCUSSION) उलटविणें *n*, प्रतिसारण *n*.

REPERTORY (-*parere*, to procure) कोठी *f*, कोठार *n*.

REPETITION, See under REPEAT.

REPINE *v. i.* (*re* & *pine*) मनांत झुरणें, खंतघेणें, चुरमुरणें [at].

REPLACE *v.* पहिल्या जागीं -जागच्या जागीं ठेवणें, पूर्वस्थितीवर ठेवणें; repay परत देणें, भरणें; substitute an equivalent for बदला देणें; supply the want of -ची गरज पुरवणें [by, with].

REPLENISH *v.* (-*plenus*, full) पुनः भरणें; fill completely तंतोतंत भरणें, भरणें [with].

REPLETE *a.* (-*plere*, to fill) पूर्ण, परिपूर्ण [with]. —REPLETION पूर्णता *f*, परिपूर्ति *f*; *Med.* fullness of blood अतिपुष्टि *f*, रक्तवृद्धि *f* -बाहुल्य *n*.

REPLY *v.* (-*plicare*, to fold) उत्तर देणें; *Law*,

प्रतिवादीच्या उत्तराला उत्तर देणें [to].—*n.* उत्तर *n*, जाब; प्रत्युत्तर *n*;—in judicial proceedings उत्तरवाद; an evasive r. टाळाटाळीचें उत्तर *n*, उत्तराभास.

Report *v.* (*-portare*, to bear) bring back, as an answer जाब आणणें -नेणें; relate what one has discovered, as a person sent to examine, explore, or investigate वाका -हकीकत सांगणें -लिहिणें पाठविणें; tell सांगणें, बोलणें, कळवणें; give a formal or official account of हुद्याच्या नात्यानें खबर देणें, रपोट क.; make minutes of, as a speech, or the doings of a public body टिपण घेणें; to be *reported* वाजणें; to r. one's self आपल्या वरिष्ठाचे चाकरी करितां हाजर असणें. —*n.* वाका, अहवाल, हकीकत *f*, 'रपोट'; rumor बातमी *f*, अवाई *f*; reputation आबरू *f*, कीर्त्ति *f*, लौकिक (Acts x. 22); sound आवाज;—of a gun बार, आवाज; record of a judicial opinion निवाडापत्रक *n*, अभिप्राय, 'रपोट'; sketch of a speech, or a public meeting सभेंतील भाषणाचा सारांश, 'रपोट'; written r. हकीकतनामा *f*; loud r. धडाका; false r. कंडी *f*, नीळरांप *f*; flying r. हूल *f*; idle *reports* बाजारी -गटारी बातमी *f*; to spread a r. बातमी फुंकणें, पेरणें [of, on, upon, to]. -er अकबरनवीस, वार्त्तिक; वर्त्तमानपत्राचा बातमीदार, 'रिपोर्टर.'

Repose *v.* (See Pause) lay at rest निजविणें, विसांवा देणें; place in confidence भरवशानें -विश्वासानें ठेवणें, हातीं सोंपणें [on, upon, in].—*i.* निजणें, आंग टाकणें, लवंडणें; विश्वासावर राहणें, भरवशानें -वर राहणें.—*n.* आराम, विश्रांति *f*; झोंप *f*; rest of mind सुख *n*, चैन *n* [from].—Reposit *v.* lay up सांठवणें, सांचवणें; lay up for safety जतनेस ठेवणें, पाळणें.—Repository सांठवण *n*, निधान *n*, निधि.

Reprehend *v.* (*prehendere*, to lay hold of) दोष लावणें [for]—Reprehensible *a.* दोष लावायाजोगा, दूषणीय.—Reprehension दोष, ठपका, शब्द, बोल.

Represent *v.* exhibit दाखविणें, दर्शविणें; delineate वर्णन क.; *Drawing*, चित्र काढणें -काढून दाखविणें; personate सोंग घेणें: to r. Ganpati; supply the place of स्थानीं -जागीं उभा राहणें, प्रतिनिधि होणें; stand in the place of, in the right of inheritance वारसाच्या जागीं राहणें -असणें; give one's own impression and judgment of -च्या विषयीं स्वमत -विचार दर्शविणें; serve as a sign of दर्शविणें, सूचक होणें -असणें: mathematical symbols r. quantities;—as a case सांगणें, निवेदन क., वाका सांगणें; [present a second time by a transcript of what was originally presented to the mind] [to, by]. -ation दाखविणें *n*, दर्शविणें *n*; वर्णणें *n*, वर्णन *n*; चित्र *n*; सोंग *n*, वकिली *f*, प्रतिनिधित्व *n*; प्रतिमा *f*; r. against गिल्ला *n*. -ative *a*. प्रदर्शक, प्रतिरूपक; वांटचा, प्रतिनिधीचा.—*n.* प्रतिनिधि, वकील [for, of].

Repress *v.* दाबणें, दडपणें; restrain आवरणें, निग्रह क.; आटोपणें [by].—Repressive *a.* नियामक, निग्रहकारी, दाबाचा.

Reprieve *v.* (*-probare*, to prove) delay the punishment of शिक्षेची तहकुबी क.; relieve for a time क्षणभर विसांवा देणें -चैन पाडणें.—*n.* शिक्षेची तहकुबी *f*; मरणाच्या शिक्षेची तहकुबी *f*; दम, अवसर, आराम [from].

Reprimand *v. F.* तोंडची शिक्षा क., धमकी देणें.—*n.* तोंडची शिक्षा *f*, धमकी *f*, शब्दमार, वाग्दंड [for].

Reprint *v.* पुनः छापणें [from].—*n.* दुसरी छापणी *f*.

Reprisal (*-prehendere*, to take) act of taking from an enemy by way of retaliation प्रत्यपहार; act of retorting on an

enemy by inflicting suffering or death on a prisoner taken from him, in retaliation for an act of inhumanity प्रतिपीडन *n*; that which is reprised अपहार [for].

REPROACH *v.* (*-prope,* near) abusive reflections निंदा *f,* अपवाद; shame लज्जा *f,* ठपका; object of blame, censure scorn, or derision निंदास्पद, ठपका, लाज *f* [for, with]. -FUL *a.* निंदेचा, निंदात्मक; लाजिरवाणा, लज्जाप्रद.

REPROBATE *v.* (*-probare,* to prove) नापसंद क., नाकारणें; abandon to punishment without hope or pardon सोडणें, टाकणें.—*a.* देवाधर्मानें टाकलेला, माणसांतून उठलेला.

REPROVE (do.) तोंडची शिक्षा क., शब्दाचा मार देणें; reprimand बोल -शब्द लावणें [for]. —REPROOF बोल, शब्दमार, वाग्दंड.

REPTILE *a.* (*repere,* to creep) सरपटत चालणारा; grovelling हलका, अधम, नीच.—*n.* पायाखालचा जीव, सरपटत चालणारा जीव, उरोगामी.

REPUBLIC (*res,* a thing, an affair, *publicus,* public) a state in which the sovereign power is exercised by representatives elected by the people लोकसत्तात्मक राज्य *n,* लोकाधिपत्य *n.* -AN *a.* लोकाधिपत्याचा, बहुनायकीचा; लोकप्रभुत्वानुसारी (manners).

REPUDIATE *v.* (*-pudere,* to be ashamed) reject नाकारणें; divorce बायकोला सोडचिठ्ठी देणें disclaim आंगावेगळें -बाहेर टाकणें (debt) [for].—REPUDIATION त्याग, परित्याग.

REPUGNANCE (*-pugnare,* to fight) विरुद्ध -वांकडेपणा; reluctance नाखुशी *f,* कंटाळा. —REPUGNANT *a.* वांकडा, प्रतिकूल; नाखुश, नाराजी, विमुख [to].

REPULSE *v.* (*-pellere,* to drive) मागें सारणें, हटवणें.—*n.* प्रतिसारण *n,* हटवणूक *f.*—REPULSION प्रतिसारकशक्ति *f* -गुण; प्रतिसारण *n,* मागें सारणें *n.*—REPULSIVE *a.* प्रतिसारक, निवारक; त्रासजनक -कारक; cold अप्रीतिजनक, निःस्नेह, कोरडा, थंड (manners).

REPUTE *v.* (*putare,* to count) मोजणें, गणणें, —*n.* आबरू *f,* प्रतिष्ठा *f;* credit derived from public opinion नांव *n,* कीर्त्ति *f.*—REPUTABLE *a.* आबरूचा, प्रतिष्ठित; कीर्त्तिप्रद, यशस्कर.—REPUTATION आबरू *f,* प्रतिष्ठा *f,* नांव *n.*

REQUIRE *v.* (*quærere,* to seek) demand मागणें, हक्कानें मागणें; make necessary गरज असणें -लागणें, अगत्य पाडणें [of]. -MENT सत्तेचें मागणें *n,* मागणी *f;* गरज *f,* जरूरी *f,* अगत्य *n.*—REQUEST *v.* विनंती क., मागणें, प्रार्थणें [of].—*n.* विनंती *f,* अर्जी *f,* प्रार्थना *f;* that which is asked for मागितलेली वस्तु *f,* इच्छा *f,* मागणें *n;* state of being desired or held in such estimation as to be sought after अपेक्षा *f,* इच्छा *f,* आकांक्षा *f:* knowledge and fame are in great r.—REQUISITE *a.* जरूरीचा, अगत्याचा, अवश्यक; to be r. लागणें, पाहिजे, असणें.—*n.* अगत्याची गोष्ट *f,* अवश्यक वस्तु *f.*—REQUISITION मागणें *n,* मागणी *f;* [a formal demand made by one state or government upon another for the surrender of a fugitive from justice]; that which is required by authority मागणें *n,* मागणी *f.*

REQUITE *v.* (*re* & *quit*) फेडणें, परत क., देणें [for].—REQUITAL प्रतिक्रिया *f,* फेडणें *n;* —in a bad sense प्रतिदंड, प्रतिकार, वजपा.

RESCIND *v.* (*-scindere,* to cut) रद्द क.,माजी पाडणें, मोडणें.—RECISSION रद्द करणें *n,* खंडन *n,* उच्छेद.

RESCRIPT (*-scribere,* to write) आज्ञापत्र *n,* राजाज्ञा *f.*

RESCUE *v.* (*-excutere,* to drive out) सोडविणें, उद्धरणें, बचाव क.—*n.* सोडवणूक *f,* सुटका *f,* तारण *n,* बचाव; [*Law.* the forcible retaking or taking away, against law, of things

lawfully distrained; also the forcible liberation of a person from an arrest] [from].

Research शोधणें *n*, शोध, परीक्षा *f*, विवेचन *n* [into].

Resemble *v*. (-*similis*, like) उपमा -तुलना क.; be like to सारखा -बराबर असणें.—Resemblance सारखेपणा, सादृश्य *n*; likeness प्रतिरूप *n*, प्रतिमा *f*, उपमा *f* [to, between].

Resent *v*. (-*sentire*, to feel) take ill वाईट वाटणें -मानणें, मनावर घेणें; express resentment by word or action वाईट वाटलेलें बोलून किंवा करून दाखविणें. -ful *a*. अकसी; शीघ्रकोपी, तापट. -ment राग, संताप, क्रोध.

Reserve *v*. (-*servare*, to keep) ठेवणें, राखणें, पुढल्या कामासाठीं -खर्चासाठीं ठेवणें; retain ठेवणें, राखणें, पोटांत ठेवणें, बाळगणें.—*n*. राखलेला पदार्थ, सांठा, उपराळा;—of an army राखून ठेवलेली फौज *f*, फाजल *f* (*H*.); backwardness लाज *f*, भीड *f*, संकोच, पडदा; ठेवणें *n*, राखणें *n*; in r. उपराळ्यास, सांठ्यास; to lay by as r. घर ह्मणून ठेवणें [for].—Reservation ठेवणें *n*, राखणें *n*; withholding from disclosure मनांत ठेवणें *n*, गांठ *f*; सांठवण *f*, सांठपा; *Law*, a clause in an instrument in which some new thing is reserved out of the thing granted, and not *in esse* before सवड *f*, फट *f*; to speak without r. मन मोकळें करून बोलणें; to make a r. बोली सोडवणें.—Reserved संकोचवृत्ति, आंतल्या गांठीचा, खोल मनाचा, मख्ख. -ness संकोच.—Reservoir पाण्याचा खजीना -चें सांठवण *n*, टांकें *n*.

Reside *v*. *i*. (-*sedere*, to sit) राहणें, वसणें, नांदणें; inhere धरून -अधिष्ठून असणें, आंत राहणें: in such acts, virtue and duty r. [at, in].—Residence नांदणूक *f*, वस्ती *f*, रहिवास, अधिष्ठान *n*; an abode वस्ती *f*, ठिकाण *n*, घर *n*.—Resident *a*. राहणारा, वस्ती करणारा, रहिवासी, in comp. वासी, स्थ: वनवासी, ग्रामस्थ.—*n*. राहणारा मनुष्य; a public minister who resides at a foreign court परराज्याच्या दरबारांत राहणारा वकील, 'रसिडेंट.'—Residency, See Residence; official dwelling of a government official in India 'रसिडेन्सी' *f*.—Residue बाकी *f*, शेष *n*, उरलेला अंश, ऊर *f*; the balance of a debt or account बाकी *f*, शिलक *f*, शेंपूट *n*, खरकटें *n*.—Residual *a*. बाकीचा.

Resign *v*. (-*signare*, to sign) give up सोडणें, त्यागणें;—as an office सोडणें, राजीनामा देणें; withdraw as a claim सत्तानिवृत्ति क. [to]. -ation त्याग, परित्याग, राजीनामा; state of being resigned मान्यतावृत्ति *f*; r. to the will of God ईश्वराच्या करण्यास -इच्छेस मान्य असणें *n*, ईश्वराज्ञा मान्यतावृत्ति *f*.

Resin (*resina*) राळ *f*, धूप. -ous *a*. राळेचा, राळेच्या गुणाचा.

Resist *v*. (-*sistere*, to stand) विरोध -प्रतिकार क, अडती घालणें; oppose आडवा येणें, विरोध क., प्रतिकूळ होणें: God *resisteth* the proud.—*i*. अडथळा क., आडवा येणें. -ance अडती *f*, हरकत *f*, विरोध, प्रतिकार; unlawful or violent r. दंडेली *f* [against]. -ible *a*. विरोध करायाजोगा. -less *a*. अनिवार्य.

Resolve *v*. (-*solvere*, to loosen) द्रव -रस क.; reduce to the constituent elements मूळ तत्वें निराळीं क.; dissolve and reduce to a different form मोडून -विसर्जन करून वेगळें रूप देणें: the house *resolved* itself into a committee; disentangle उलगडा क., अर्थ सांगणें (a riddle); convince खातरी -समजूत क.; express, as an opinion, by resolution and vote ठराव क., ठरविणें; *Math*. solve, as a problem उलगडा क.; find the answer to -चें उत्तर काढणें -मिळवणें; *Med*. disperse

or scatter, as an inflammation or tumor बसवणें, जिरविणें, भिनविणें [on, upon]. —*i.* द्रवणें, रस होणें; जिरणें, मुरणें, मावळणें (a fever, tumor); संकल्प -निश्चय क. [into].—*n.* धैर्य *n*, धीर, नेट; ठराव, निश्चय, संकल्प.—RESOLUBLE *a.* वितळायाजोगा, द्रवनीय.—RESOLUTE *a.* धिराचा, नेटाचा, दृढनिश्चयी, निग्रही [against]. -NESS दम, धैर्य *n*, नेट.—RESOLUTION धैर्य *n*, नेट, हिंमत *f*; ठराव, निश्चय, संकल्प; firm r. वज्र -दृढसंकल्प; r. of government सरकारचा ठराव.—RESOLVABLE *a.* रस होण्यासारखा, द्रवनीय, मूळतत्वें निराळीं होण्यासारखा; उलगडण्यासारखा.—RESOLVENT द्रावकपदार्थ, द्रावण.

RESORT *v. i. F.* repair जाणें, येणें; have recourse आश्रय धरणें -क., उपाय क. [to].—*n.* जाणें *n*, येणें *n*, आश्रय धरणें *n*; a haunt बसण्याचा अड्डा, बैठक *f*, जाण्यायेण्याची -बसण्याची जागा *f*; last r. निदानीचा उपाय.

RESOUND *v.* घुमणें, दणदणविणें, गाजणें; spread the fame of कीर्त्ति पसरणें, गाजविणें.—*i.* दणदणणें, घुमणें; गाजणें, पसरणें; sound loudly लांबवर आवाज जाणें; his voice *resounded* far; echo प्रतिध्वनि होणें -उठणें [with].—*n.* प्रतिध्वनि, नाद.—RESONANT *a.* प्रतिध्वनि करण्याजोगा, घुमण्याजोगा, अनुनादी, सनाद. — RESONANCE अनुनाद, प्रतिनाद, प्रतिध्वनि.

RESOURCE *F.* resort गति *f*, युक्ति *f*, उपाय, आश्रय; *pl* pecuniary means पैका, द्रव्यबल *n*, अर्थ; गत्यंतर *n*, अन्यगति *f*; having no other r. अनन्यगति; having no r. गतिहीन, निरुपाय; last r. निदानीचा -शेवटचा उपाय.

RESPECT *v.* (-*specere,* to look) relate to लागणें, लागू होणें, संबंध असणें; regard मानणें, सन्मान राखणें [for].—*n.* संबंध, धोरण *n*; मान, सत्कार, आदर, भीड *f*; that which respects to any person or thing प्रकरण *n*, बाबद *f*, गोष्ट *f*; r. of persons भेददृष्टि *f*-भाव; with respect to विषयीं, संबंधी; *pl* मुजरा, सलाम, रामराम; to pay one's *respects* दर्शन घेणें, मुजरा -सलाम क. [for]. -ABLE *a.* अब्रूचा, अब्रूदार, प्रतिष्ठित, संभावित; moderate in degree of excellence or in number, but not despicable बरासा -च, जमेस धरायाजोगा, सरासरी, मध्यम. -FUL *a.* मर्यादेचा, भिडेचा, मर्यादशील, आदबशीर. -FULLY *ad.* मर्यादेनें, आदरपूर्वक -पुरस्सर. -IBILITY अब्रू *f*, प्रतिष्ठा *f*, इज्जत *f*, मर्यादा *f*; family r. कुलमर्यादा *f*. -ING *prep.* विषयीं. -IVE *a.* साक्षेप, ससंबंध; each to each आपापला, ज्याचा त्याचा, in comp. स्वस्व. -LY *ad.* ज्याचा त्यानें.

RESPIRE *v. i.* (-*spirare,* to breathe) श्वास -दम टाकणें, दम घेणें.—RESPIRATION श्वास, उश्वास, प्राण.—RESPIRATORY *a.* श्वासोश्वासाचा, श्वासोश्वास संबंधी (organs).

RESPITE (See RESPECT) postponement तहकुबी *f*; pause विसांवा, अवकाश, विराम; *Law,* reprieve शिक्षेची तहकुबी *f* [from]. —*v.* तहकूब क.; विसांवा देणें; शिक्षेची तहकुबी क.

RESPLENDENT *a.* (*splendere,* to shine) चकचकीत, तेजस्वी, प्रकाशमान [with].

RESPOND *v. i.* (-*spondere,* to promise) उत्तर -जबाब देणें; suit मिळणें, जमणें, जुळणें; render satisfaction तोटा भरून देणें, भरणें: the defendant is held to r. in damages. [to].—*t.* तोटा भरून देणें.—*n.* [a short anthem interrupting the reading of a chapter which is not to proceed until the anthem is ended]. -ENT *Law,* प्रतिवादी-पक्षी; जुळणारा, बेताचा;—one who maintains a thesis in reply प्रत्युत्तर देणारा, स्थापन -मंडन करणारा. -ENCE उत्तर देणें *n*.—RESPONSE उत्तर *n*;—in disputation समाधान *n*, उत्तर *n*, प्रतिवाद;—in a litany

उत्तरवाक्य *n.* [to]. — RESPONSIBLE *a.* जबाबदार, मोसबेदार [for].—RESPONSIBILITY जबाबदारी *f*, जामिनकी *f*, जिम्मा *f*, मोसबा.—RESPONSIVE *a.* उत्तर देणारा; जुळणारा, जमविणारा: the vocal lay r. to the strings.

REST* state of quiet or repose स्थिरता *f*, निवांतपणा, शांति *f*, निश्चलता *f*; cessation from motion or labor विसांवा, आराम, विश्रांति *f*; tranquillity सुख *n*, समाधान, चैन *n*, शांति *f*, स्वस्थता *f*; that on which any thing rests or leans for support आधार, धीर, धिरा; a place where one may rest विसांव्याची जागा *f*, विश्रांतिस्थान *n*;—for porters धक्का, ओटा, तक्या इ०; sleep निद्रा *f*, निद्रावस्था *f*; death मरण *n*; देहावसान *n*; *Poet.* and *Mus.* a short pause in reading अवसान *n*, यति *f*;—as of a lance आधार, नेटावा, घोडा, लाग; to feel at r. सुखास -चैन पडणें; to lie down to r. निजणें.—*v. i.* आराम क., झोंप घेणें; स्थिरावणें, स्थिर होणें, थांबणें; स्वस्थ -सुखी -शांत असणें, सुख वाटणें; विसंबणें, विसांवा घेणें -पावणें, बसणें; आधार -आश्रय क., टेकावा असणें, राहणें: a column *rests* on its pedestal; अवसान पावणें, मरणें; rely टेकून राहणें, टेकणें, विश्वास ठेवणें: to r. on God's promises; to r. with -च्या हातीं देणें; it *rests* with him to decide [on, upon, in, from].—*t.* शांत -स्वस्थ क., बसवणें; ठेवणें, टेकणें. -LESS *a.* अशांत, शांतिहीन, बेआराम, व्याकूळ; passed in inquietness तळमळीचा, बेआरामीचा: the patient has had a r. night रोग्याला रात्रभर डोळ्यास डोळा लागला नाहीं -चैन पडलें नाहीं; hard कठीण, अडचणीचा; discontented with one's lot, residence, &c. आपल्या भोगास -स्थितीस कंटाळलेला; not satisfied to be at rest चुळबुळ्या, चंचळ, घालमेल्या: a r. prince; disposed to be turbulent धांदल्या, धुमाळ्या, बंडखोर: a r. subject; sleepless निद्राहीन. -LESSNESS असमाधान *n*, तळमळ *f*, बेआरामी *f*, हळहळ *f*; चुळबुळ *f*, उठबैस *f*, चंचळपणा; घालमेल *f*, चडफड *f*; निद्राराहित्य *n*.

REST (*restare*, to stay back) शेष *n*, बाकी *f*; the remainder वरकड -बाकीचे -अवांतर जिन्नस -मनुष्यें इ०.—*v. i.* राहणें, उतरणें [with]. -OFF, IVE *a.* अडेल, खलेल. -NESS दंडेली *f*, खलेली *f*, अडेलपणा.

RESTITUTION (*statuere*, to put) परत देणें *n*, प्रतिदान *n*; तोटा भरून देणें *n*; पूर्वस्थितीवर आणणें *n*, उद्धार.

RESTORE *v.* (*restaurare*) bring back from the state of ruin निटावणें, पूर्वस्थितीवर आणणें, उजरणें; give or bring back, as that which has been lost (गमावलेला) परत देणें -आणणें; bring back to health or strength बरा -निरोगी क.; give in place of or as satisfaction for बदला -भरून देणें. [from, to, buy, with].—RESTORATION परत देणें *n*, प्रतिदान *n*; सुधारणें *n*, सुधारणूक *f*, जीर्णोद्धार; पुनःस्थापन *n*, पूर्वस्थितिस्थापन *n*, [to].—RESTORATIVE *a.* पूर्वस्थितीवर आणणारा; तेजोदायक. —*n.* तेजोदायक, तेजवर्धक औषध *n*, तेजबल *n*.

RESTRAIN *v.* (*stringere*, to draw together) आकळणें, आवरणें, दाबांत ठेवणें; confine अटकेंत ठेवणें -घालणें, बांधणें; withhold माघारां ठेवणें, राखणें, न देणें; abridge संक्षेप क. [from, by]. -ABLE *a.* आकळायाजोगा, आकलनीय, दमनीय. -ED आकळलेला, नियत, संयत, निगृहीत;—in desire जितेंद्रिय, बद्धकाम. -ER आकळणारा, नियामक, निरोधक.—RESTRAINT आकळणें *n*; आकलन *n*, नियमन *n*; आटोप, दाब, अवरोध, लगाम; self-r. आत्मसंयम;—of speech, action, &c. भीड *f*, संकोच, दाब; to feel under r. भीड पडणें -असणें, संकोच वाटणें; that

which restrains, as a law, a prohibition आसेध: r. of time कालासेध; r. of place स्थानासेध; a r. अटक*f*, दडपण *n*, आडकाठी *f*.—RESTRICT *v.* मर्यादा -हद्द क., आळा बांधणें: to r. a patient to a certain diet रोग्यास पथ्यावर ठेवणें [to]. -ED निबद्ध, परिमित;—as a word मितार्थ, योगरूढ. -ION मर्यादा *f*, आळा; आडकाठी *f*, अटकाव, दडपण *n*.

RESULT *v. i.* (*resultare*, to leap back) proceed निघणें, येणें, फळ होणें, होणें; end in परिणाम -शेवट होणें; *Logic* सिद्ध होणें [in, from].—*n.* फळ *n*, परिणाम; सिद्धांत, निश्चितार्थ; उपपत्ति *f*. -ING प्रयुक्त, उत्पन्न, प्रभव: pain r. from sin पापप्रयुक्त दुःख.

RESUME *v.* (*-sumere*, to take) परत घेणें; begin again पुनः आरंभ क., चालवणें.—RESUMABLE *a.* परत घ्यायाजोगा.—RESUMPTION परत घेणें *n*, प्रत्याहार;—of a grant दत्तापहार; [*Law*, taking again into the king's hands such lands or tenements as he had granted to any man on false suggestions].

RESUME *F.* सार, उपसंहार, सारार्थ, गोश्वारा.

RESURRECTION (*-surgere*, to rise) पुनः उठणें *n*; rising again from the dead मरून पुनः उठणें *n*; the future state पुनरुत्थिति *f*.

RESUSCITATE *v.* (*-suscitare*, to raise) revive, esp. to recover from apparent death फिरून जिवंत -सजीव क., जिवांत जीव आणणें -घालणें: to r. a drowned person; to r. withered plants.—*i.* जिवांत जीव येणें, पुनः जिवंत होणें, सजीव होणें.

RETAIL *v. F.* cut up and dispose of in small parcels फुटकळ -किरकोळ विकणें; sell in small portions थोडें थोडें सांगणें. -ER किरकोळ -फुटकळ विकणारा, घेवारी, फडकरी.

RETAIN *v.* (*-tenere*, to hold) ठेवणें, धरणें, राखणें; keep in pay पदरीं -जवळ ठेवणें, मुशारा देऊन -चाकरीस ठेवणें [in]. -ER ठेवणारा, राखणारा; a servant पदरचा माणूस, आश्रित; body *retainers* परिवार, सेवकवर्ग. -ING धारण *n*, धृति *f*. -TIVE *a.* धारणशक्तिविशिष्ट, दृढ (memory). -TION ठेवणें *n*, धारण *n*; धारणाशक्ति *f*, धारणा *f*; custody राखण *f*, रखवाली *f*; [*Law*, right of withholding a debt or of retaining property until a debt due to the person claiming this right be duly paid].—RETINUE स्वारी *f*, जिलीब *f*, इतमाम, खटलें *n*; light r. सडीस्वारी *f*.

RETALIATE *v.* (*-talis*, such) उलट -परत क., फेडणें, सूड उगवणें (injuries) [upon].—RETALIATION फेड *f*, उसणें फेडणें *n*, प्रत्युपकार, वाईटा बदल वाईट फेडणें *n*, सूड [for].

RETARD *v.* (*-tardare*, to delay) उशीर लावणें, खोळंबा -खोटी क., मंद -ढिला क.: to r. the march of an army; to r. the motion of a ship; to put off लांबणीवर टाकणें, उशिरानें क., दिवसगतीवर लोटणें: to r. a rupture between nations.

RETENTION, See under RETAIN.

RETICLE *F.* लहान जाळें *n*; [net work dividing a telescope glass into equal squares].—RETIFORM *a.* जाळ्याचा आकाराचा, जाळीदार.—RETINA (*L.*) डोळ्याचा एक पडदा आहे.

RETIRE *v. i. F.* draw back or away मागें सरणें -हटणें -होणें -जाणें; go from company or from a public place into privacy सभेंतून -मंडळींतून उठून जाणें, निघून जाणें; retreat from danger संकटापासून निघून जाणें, पळणें; withdraw into private life घरीं बसणें, रोजगार सोडणें; recede मागें सरणें -हटणें: the sea *retires* in bays [from, with]. -MENT मागें सरणें *n*; घरीं बसणें; एकांतवास; एकांतवासाचें स्थल *n*.—RETIRED मागें सरलेला; घरीं बसलेला; sequestered आडवळणी, एकांताचा;—of

persons साबडा, भिडस्त, संकोचवृत्ति; a r. spot आडवळण *n.*

RETORT *v.* (*-torquere*, to turn) bend or curve back वळविणें, पीळ देणें; return, as an argument उलट -परत देणें; reverberate प्रतिध्वनि क. [in, upon].—*i.* उलटून बोलणें -सांगणें.—*n.* उलट गोष्ट *f*, फेरजबाब, जाबसाल, प्रत्युत्तर *n*; *Chem.* वक्रयंत्र *n.*

RETRACE *v.* (*re* & *trace*) परत जाणें -येणें; —one's steps मागें परतणें, मागें पाऊल टाकणें; trace back पत्ता लावणें; trace over again गिरवणें; reverse फिरवणें: to r. one's proceedings.

RETRACT *v.* (*-trahere*, to draw) draw back, as claws नखें आंत घेणें; recant बोलणें परत घेणें -फिरवणें.—*i.* बोलणें परत घेणें. -ION बोलणें फिरवणें *n*, बोलला बोल परत घेणें *n*, उक्तत्याग.

RETREAT *v. i.* (do.) मागें सरणें -हटणें; retire from an enemy शत्रूपुढून पळणें; शत्रूस पाठ दाखविणें; retire एकांत -अज्ञात वासांत जाणें, आश्रय धरणें [from].—*n.* मागें जाणें *n*, माघार *f*; एकांतस्थान *n*, शत्रूपासून पलायन *n*, पळणें *n*; मागें जाण्याची खूण *f* -इशारत *f*; *Mil.* & *Naval* संध्याकाळचा तंबूर; *Rom. Cath. Ch.* एकांतीच्या भक्तीची वेळ *f.*

RETRENCH *v. F.* कापणें, कमी क., तोडणें, छाटणें; furnish with a retrenchment चर खणणें -बांधणें.—*i.* कमी खर्चावर राहणें. -MENT कमी करणें *n*, तोडणें *n*; काटाकाटी *f*, काटकसर *f*; चर, खंदक.

RETRIBUTION (*-tribuere*, to bestow) प्रतिक्रिया *f*, प्रतिफळ *n*, फळ *n*; reward and punishment, as distributed at the general judgment जगाच्या न्यायकाळीं मिळणारें कर्मफळ *n.*—RETRIBUTIVE *a.* प्रतिफलदायक.

RETRIEVE *v. F.* पुनः मिळवणें; bring back परत -माघारां आणणें; repair सुधारणें, नीट क. [from, by].

RETROGRADE *v.* (*retro*, back, *gradi*, to step) परत जाणें -येणें, परतणें, उलटणें.—*a.* परतणारा, प्रतिगामी; contrary उलटा, विपरीत; *Astron.* वक्रगति, वक्र. —RETROGRESSION परत जाणें *n*, व्यत्क्रिम; वक्रगति *f.*

RETROSPECT *v.* (*-specere*, to look) मागें परतून पाहणें.—*n.* मागें पाहणें *n*, गतावलोकन *n*, मागचा विचार. -IVE *a.* मागला पाहणारा, गतावलोकी, अनुदर्शी; having reference to what is past मागल्यास लागू पडणारा, गतकालापेक्षक.

RETURN *v. i.* (*-tornare*, to turn) परत -माघारां -फिरून येणें -जाणें; come again, as a visitor परतून भेटायास येणें, परत येणें; appear again after an interval कांहीं वेळानें -राहून -थांबून पुनः दिसणें -येणें, परत येणें: seasons r.; reply उत्तर देणें; retort उलटून दोष लावणें -वर घालणें.—*t.* परत आणणें; परत पाठविणें -क.; repay परत देणें, फेड क. (money); परतजाब देणें; report खबर देणें, कळवणें, जाहिर क.; report officially सरकारांत खबर देणें, सरकारि नात्यानें -अधिकारपरत्वें याद करून -तक्ता भरून पाठविणें; convey into official custody or depository सरकारि कोठींत -तिजोरींत वगैरे भरणें -नेणें.—*n.* परत जाणें *n*, पुनरागमन *n*, पुनरावृत्ति *f*; परतणें *n*, उलटणें *n*, परतणी *f*; उलट *f*, माघार *f*, प्रतिगमन *n*; परत करणें *n*, परतणी *f*; परत देणें *n*, प्रतिदान *n*, फेड *f*; उलटजाब, प्रत्युत्तर *n*; हकीकतनामा, 'रिटर्न' *n*; tabular r. तक्ता, 'रिटर्न' *n*; r. hire परत भाडें *n*; blank r. डौलपत्र *n*; profit on labor प्राप्ति *f*, मिळकत *f*, उपज [from, to]. -ABLE *a.* परत करण्याजोगा -देण्याजोगा; [*Law*, legally required to be returned, given or rendered].

REUNITE *v.* फिरून -पुनः जोडणें [with]. —*i.* पुनः मिळणें.—REUNION पुनर्योग; an assembly of familiar friends मित्रांची मंडळी *f*, बैठक *f*, मेळा, सभा *f*, इ०; पुनः मिळणें *n*, पुनर्मेलन *n*, मिलाफ.

REVEAL *v.* (*-velare*, to vail) उघडा क., पडदा -झांकण काढणें; show दाखविणें; disclose प्रसिद्ध क., फोडणें, सांगणें; communicate that which could not be known or discovered without divine or supernatural instruction ईश्वरी प्रेरणेनें -उपदेशानें प्रगट क. -कळविणें [to, by]. -ATION प्रगट करणें *n*, प्रगटीकरण *n*; प्रगट केलेली गोष्ट *f*; the act of revealing divine truth ईश्वरी ज्ञान *n*, उपदेश *f*, इ० प्रगट क.; that which is revealed by God to man ईश्वरानें प्रगट केलेली गोष्ट *f*, ईश्वरोक्त शास्त्र *n*, ईश्वरीवाचा *f*, शास्त्र *n*; the last book of the sacred canon, containing the prophecies of St. John प्रगटविण्याचें पुस्तक *n*, प्रगटविणें *n*.

REVEL *v. i.* (See REBEL) बहर -मौजा मारणें, धुमाळी -चैन क., धणंगणें.—*n.* चैन *n*, धुमश्चक्री *f*, बहर *f*. -RY घमंडी *f*, दिवाळी *f*, चंगळ *f*, रंग.

REVENGE *v.* (See VINDICATE) inflict punishment in vindication of सूड घेणें -उगवणें; inflict injury for, in a spiteful, wrong, or malignant spirit सूड घेणें, वैर उगवणें, दावा साधणें, वजपा काढणें [upon].—*n.* सूड उगवणें *n*, प्रतिफल *n*, सूड [for]. -FUL *a.* अकसखोर, खुनसी, काळा साप, कृष्णसर्प.

REVENUE (*-vinire*, to come) that which returns from an investment उत्पन्न *n*, वसूल, आदा; reward बक्षीस *n*, फळ *n*: a rich r. of praise; annual produce of taxes, customs, &c., which a nation or state collects and receives into the treasury for public use जमाबंदी *f*, वसूल, महसूल; arrears of r. सनदबाकी *f*; assignment for pay on the r. तनखा वरात or वरात *f*; collection of the r. कमावीस or कमाविसी *f*, कमावीसदारी *f*, तहसील *f*, खोतकी *f*; collection of r. due from the ryots तळाटी -ठी *f*; collectors of r. कमावीसदार, वसूलदार, खोत; extra r. खेरीज जमा *f*; fixed and regular r. ऐन जमा *f*, ऐन जमाबंदी *f*; full r. भरवसूल; general abstract of r. तरजमा *f*; gross r. भरजमा *f*, भरवसूल; maximum of the r. कमाल *n*; of or belonging to the r. महसुली; one employed in collection of r. वसुली or वसुल्या; remission of r. सूट *f*, एहसान *n*; r. and disbursements जमाखर्च; r. from the soil काळीचा वसूल, काळीचा पैका; r. police शिबंदी *f*; r. survey पाहणी *f*; r. surveyor पाहणदार or पाहणीदार; r. survey-report पाहणी खरडा; settlement of the r., assessment of the lands, &c. जमाबंदी *f*; shares out of the r. which belong to the head-officers बाबती *f pl*; sum in commutation of r. in kind तसर *n*; that has an assignment on the r. वरातदार; that yields good r. वसुली; that yields full r. भरवसुली; to collect r. वसूल करणें; settlement of *revenues* by instalments खिस्तबंदी *f*; r. year फसली साल *n*.

REVERBERATE *v.* (*verberare*, to lash) echo प्रतिध्वनि क., पडसाद उठवणें; reflect, as light or heat परावर्तन क.; send back मागें पाठविणें: flame *reverberated* in a furnace. —*i.* प्रतिध्वनि होणें; मागें हटणें -सरणें [with].

REVERE *v.* (*-vereri*, to fear) पूज्यबुद्धीनें मानणें, भीड धरणें, मान राखणें [for].—REVERENCE पूज्यबुद्धि *f*, श्रद्धा *f*, भीड *f*, सत्कार; act of revering नमस्कार, प्रणाम, अभिवंदन *n*; a person entitled to be revered पूज्य-शिष्ट जन -पुरुष; [a title applied to priests or ministers]; to do r. नमस्कार क. [for] *v.*

पूज्यबुद्धीनें मानणें, भीड राखणें [by, for].—Reverend *a.* पूज्य, शिष्ट, मान्य, बुद्रुख; [this word often employed as a title of respect given to the clergy; a clergyman is styled r.; a bishop, right r.; an archbishop most r.; in England, a dean is styled very r].—Reverent *a.* भिडेचा, भिडस्त, आदरयुक्त (words); नम्र, आदरशील. -ial *a.* पूज्यबुद्धीचा, पूज्यबुद्धीनें मानणारा, अदब राखणारा, अदबशीर: r. esteem of sacred things. -ly *ad.* आदरबुद्धीनें, आदरानें, भिडेनें, मर्यादेनें.

Revert *v.* (*-vertere,* to turn) परतवणें, उलटवणें [to]—*i. Law,* return to the proprietor मालकाकडे परत येणें.—Reverse *v.* परत फिरवणें, फिरवणें; change totally उलटा क., बदलणें: turn upside down पालथा क., उफराटणें; subvert पाडणें, मोडणें; confound घालमेल क.; *Law,* overthrow by a contrary decision फिरवणें, रद्द क.; [to r. an engine, to cause it to perform its revolutions or action in the opposite direction].—Reversion returning of an estate to the grantor or his heirs पहिल्या देणाराकडे किंवा त्याच्या वारसाकडे परत जाणें *n*; right to future possession उत्तराधिकार. -ary *a.* उत्तरभोग्य, अन्य भोगोत्तरप्राप्य. —Review *v.* मागें पाहणें; go over and examine पाहणें, चौकसी क.; reconsider फिरून पाहणें -विचार क.; make a formal or official examination of the state of -ची पाहणी -चौकशी क·;—a book, &c. गुणदोष काढणें, गुणदोष विवेचन क.—*i.* पाहणी क. —*n.* फिरून पाहणें *n,* उलट पाहणी *f,* पुनर्विचार; पाहणी *f,* चौकशी *f;* गुणदोष विचार -विवेचन *n;* inspection of troops under arms लष्कराची पाहणी *f,* 'रवी' *f;* a periodical pamphlet containing examinations or analysis of new publications गुणदोषविवेचक पुस्तक *n,* 'रिव्यु' *f.*

Revile *v.* (*re & vile*) treat with opprobrious and contemptuous language निंदा क., निंदणें.—Reviler निंदक, कुटाळ, निंदाखोर.

Revise *v.* (*-videre,* to see) फिरून पाहणें, तपासणें: review, alter, and amend तपासून नीट क. -शुद्ध क.—Revisal तपासणी *f,* शोध. —Reviser तपासणारा, शोधणारा, तपासनीस; ग्रंथ तपासणारा, 'रिवैजर.'—Revision तपासणी *f,* शुद्धि *f,* शोध; that which is revised तपासलेली गोष्ट *f,* शोधलेलें पुस्तक *n,* वगैरे.

Revive *v. i.* (*-vivere,* to live) मरून उठणें, जिवंत -सजीव होणें, जिवांत जीव येणें; recover from a state of neglect, oblivion, obscurity, or depression जीव धरणें, सावरणें, फिरून उपस्थित होणें, उजेडीं येणें.—*t.* सजीव क., जिवांत जीव घालणें; जीव आणणें, उचलउठावणी क. [by, with].—Revival संजीवन *n;* पुनर्जीवन *n;* सावरणें *n,* सावर, पुनःसंस्थिति *f;* renewed interest in religion after indifference and decline धर्मसंजीवन *n.*

Revoke *v.* (*-vocare,* to call) रद्द क., फिरवणें.

Revolt *v. i.* (*revolvere,* to roll back) फिरणें, उलटणें; renounce allegiance or subjection फितणें, फितूर होणें, बदलणें, उलटणें; to be grossly shocked धडकणें, धडकी -दचका बसणें [against, from].—*n.* फितवा, फितूर.—Revolution फिरवणें *n,* आवर्त्तन *n;* return पाळी *f,* प्रदक्षिणा *f;* rotation परिभ्रमण *n;* —of a planet गति *f;* a fundamental change in political organization राज्याची उलटापालट *f,* उलथापालथ *f,* राज्यक्रांति *f,* राज्यांतर *n,* गर्दी *f;*—of Nadir Shah नादिरगर्दी *f;*—of Bhavoo भाऊगर्दी *f.*

Revolve *v. i.* (*-volvere,* to roll) फिरणें, परिभ्रमण क.—*t.* फिरवणें, परिभ्रमण करविणें; —in the mind मनांत घोळणें, मथणें [around]. —Revolver फिरणारा; एक प्रकारचें पुष्कळ बारांचें पिस्तुल आहे, 'रिवाल्वर' *n.*

Reward *v. F.* give in return, whether good or evil परत -उलट देणें;—in a good sense बक्षीस देणें.—*n*, प्रतिदान *n*, उलट देणें *n*, इनाम, *n*, बक्षीस *n*, देणगी *f* [for, of].

Rhapsody (*Gr. rhaptein*, to sew, *odé* a song) विसंगत -असंबद्ध भाषण *n*, पांटीभर बोलणें गुं-जभर अर्थ.

Rhetoric (*Gr. rheo*, I speak) art of composition वाक्यरचनाविद्या *f*; art of elegant and accurate composition in prose अलंकारशास्त्र *n*; art of speaking with propriety, elegance, and force अलंकारिक व रसभरित शब्दांनीं भाषण करण्याची विद्या *f*, सुभाषित *n*, वक्तृत्व *n*.—Rhetorical *a*. अलंकारिक; अलंकारशास्त्र संबंधी.—Rhetorician अलंकारशास्त्रज्ञ.

Rheumatism (*Gr. rhein*, to flow) a painful inflammation affecting muscles and joints of the human body वातरोग; chronic r. proceeding from affection of the bowels आमवायु; r. attended with fever वातपित्त; acute r. उग्रवायु; r. of the loins कटिवात, उसण *f*, शिलक भरणें *n*; r. in the joints संधिवात; to be affected with r. फुटणें (हात -पाय).—Rheumatic *a*. वातरोगाचा.—Rheumy *a*. चिपडा, पिचका.

Rhinoceros (*Gr. rhinos*, the nose, *kepas*, a horn) गेंडा.

Rhomb (*rhombus*) *Geo*. विषमचतुरस्र.

Rhubarb *Ar*. रेवाचिनी *f*.

Rhyme*, harmony of language भाषेचा ताल -मेळ; poetry कविता *f*, काव्य *n*; correspondence of sound in poetry यमक *n*; a word answering in sound to another word यमक *n*; neither r. nor reason ताळ नाहीं तंत नाहीं.—*v. i.* यमक मिळणें -होणें; कविता -कवन क.—Rhythm (*Gr. rhuthmos*) ताल.—Rhythical *a*. तालबद्ध.

Rib*, one of the long bones inclosing the thoracic cavity फांसळी *f*, बरगडी *f*;—of leaf दांडा, हीर;—of an umbrella शलाका *f*. -wort इसपगोल.

Ribald *a. F.* तोंडाचा फटकळ, तोंडशिनळ.—Ribaldry अभद्र -शिवरें -पचकळ बोलणें *n* -भाषण *n*.

Riband, Ribbon (*rubens*, red) फीत *f*, 'रिबन' *f*; shred चिंधी *f*.

Rice *F.* the grain in the husk भात *n*, साळ *f*;—as husked तांदूळ;—as boiled भात; r. with milk खीर *f*.

Rich* *a*. wealthy मातबर, श्रीमंत, धनवान्; abounding आढ्य, संपन्न, मय, प्रचुर, all in comp.: विद्यासंपन्न, गुणसंपन्न, &c.; fruitful पिकाऊ, मातबर (soil);—as a dish रसरसीत, मसालेदार, पक्वान्नाचा; bright घवघवीत, भडक (color); full of sweet and harmonious sounds मधुर, सुस्वर; abounding in beauty शोभिवंत, छान, देखणा (landscape); abounding in humor विनोदाचा, ख्याली (incident); r. from birth गर्भश्रीमंत; to get r. उखळ पांढरें होणें [in]. -es संपत्ति, दौलत *f*, धन *n*, ऐश्वर्य *n*; lust of r. धनलोभ; puffed up by r. मालमस्त; r. of unrighteousness पापधन *n*. -ly *ad*. बहुत धनानें, बहुत पैसा देऊन; पुरतेपणीं, पुष्कळ; थाटानें, शोभा येईसा; truly खरोखर; fully पुरा, खूब. -ness श्रीमंती *f*, सधनता *f*; रसरसीतपणा, मिष्टता *f*; मातबरी *f*; विपुलता *f*, भरपुरी *f*; भडक *f*, घवघवीतपणा; शोभा *f*, तेज *n*.

Rick* गंज, ठिकी *f*;—of unthreshed corn सुडी *f*, उडवी *f*.

Rickets* *pl*. कुटिलवात.—Rickety *a*. कुटिलवाताचा; feeble in the joints लटपटीत, डळमळीत, खिळखिळा; to be r. लटलटणें, डकडकणें, लडबड हलणें.

RID* *v.* सोडवणें, मोकळा क.; to get r. of टाळणें, वाट देणें, मोकळा होणें [of]. -DANCE सोडवणूक *f*, सोडवण *f*; वेंचणी *f* (Lev. xxiii. 22); सुटका *f*, मुक्ति *f*.

RIDDLE* मोठी चाळण *f*, घोळणा.—*v.* चाळणें, घोळणें; make many holes in चाळण क.: a house *riddled* with shot.

RIDDLE*, enigma उखाणा, आहणा, कूट *n*; anything puzzling कूट *n*; to find out a r. उखाणा जिंकणें.

RIDE* *v. i.* be carried on the back of any animal (घोडा, गाढव इ०) बसणें, स्वार होणें, -बसून जाणें; be borne in a carriage गाडींत बसून जाणें; be borne in or on fluid तरंगणें, पोहणें, तरणें; manage a horse well घोड्यावर मांडी -आसन साधणें; sit बसणें [from, to].—*t.* -वर बसणें; manage insolently at will मगरुरीनें मनास वाटेल तसें चालवणें, दामटणें, दपटणें.—*n.* घोड्यावरची रपेट *f* -सहल *f*; a road for riding घोडेवाट *f*.— RIDER घोड्यावर बसणारा, स्वारी *f*, स्वार; one who breaks a horse चाबुकस्वार; an addition to a manuscript or other document, inserted after its completion, on a separate piece of paper पुरवणी *f*.

RIDGE*, back पाठ *f*;—of a hill कणा, दांडा, रांग *f*;—of a roof पाटेस; as raised on a plantation to stop water कांडोळें *n*, दंड; r. pole आढें *n*.—*v.* दांड घालणें; wrinkle सुरकुती पाडणें. -TILE ढापा.

RIDICULE *v.* (*-ridere*, to laugh) हासणें, थट्टा -उपहास क. [for, by].—*n.* हसें *n*, थट्टा *f*, टेर *f*.—RIDICULOUS *a.* हसायाजोगा, उपहासास्पद.

RIFE *a.* चालू, चलतीचा, प्रवृत्त [with].

RIFLE *v. F.* carry off हिरावून नेणें, हरण क., हिरावणें; plunder लुटणें.—*n.* एक प्रकारची बंदूक *f*, 'रैफल' बंदूक *f*.

RIG* *v.* सजवणें, सज्ज क. -GING—of a ship दोरखंडें *n pl.*

RIGHT* *a.* straight उजू, नीट, सरळ (way); upright उभा, सरळ, खरा (a beam); conformed to the constitution of man and the will of God खरा, नेक, सत्य, यथार्थ; fit उचित, योग्य, लायक; unquestionable खचीत, निःसंशय: they manifested themselves to be r. barbarians; not wrong खरा, वास्तविक: you are r. तुम्ही बोलतां -करितां इ० तें खरें आहे; most favorable अनकूळ, उजू, सोयीचा (side); not left उजवा (hand); being on the same side as the right hand उजवीकडला, उजव्या हातचा, दक्षिण; well regulated सुव्यवस्थित, बंदोबस्ताचा; [being on the right hand of a person whose face is toward the mouth of a river]; designed to be placed or worn outward सुफराटा, सुलटा, उजू: the r. side of a piece of cloth; winding to the r. दक्षिणावर्त्ती; r. ascension विषुवांश; r. line सरलरेखा *f*; r. angle काटकोन; r. and left सव्यापसव्य.—*ad.* नीट, ठीक, बरोबर, यथामार्ग; खरा, यथार्थ; नीट, समोर, धडक, धोपट (Prov. iv. 25); in a great degree फारच, अति (sorry); [very;—prefixed to titles: r. honorable; r. reverend]. —*n.* that which is right or correct न्याय, नीति *f*, उजूपणा; freedom from falsehood खराई *f*, खरेपणा; adherence to truth सत्यनिष्ठा *f*; a just judgment न्याय, इनसाफ, दाद *f*; integrity प्रमाणिकपणा; that to which one has a claim हक्क, हक्कमाल; legal power अधिकार, सत्ता *f*; a sheriff has a r. to arrest a criminal; claim दावा, हक्क; all *rights* कुलबाब *f*; immunity माफी *f*, सूट *f*; उजवी बाजू *f*, उजवें अंग *n*; सुफराटी बाजू *f*; one's own r. स्वाधिकार; might makes r. फांसा पडेल तो डाव राजा करील तो न्याव; to set to r. नीट क., सुधारणें; बंदोबस्तानें चालवणें.

—*v. t.* निटावणें, सुफराटणें, न्याय क., दाद देणें. —*i.* निटावणें, सुफराटणें. -FUL *a.* हक्कदार (heir); सत्तेचा, हक्काचा (property); रास्त, यथान्याय, वाजवी, in comp. धर्म (war). -HAND उजवा हात. -LY *ad.* नीट, उजू, बरोबर, न्यायानें; यथायुक्त, यथामार्ग; दुरुस्त, खरा. -NESS उजूपणा, सरळपणा: r. of a line; यथान्यायता *f*, लायकी *f*, न्याय.—RIGHTEOUS *a.* न्यायी, नीतिमान; holy पवित्र, पुण्यशील. -NESS न्यायीपण *n*, नेकी *f*, रास्तपणा; *Theol.* the work of Christ, which is the ground of justification ख्रीस्ताचें पुण्य *n*.

RIGID *a.* (*rigidus*, to be stiff) ताठ, ताठर; severe करडा, खरमरीत, जालीम;—account, &c. काडीकाडीचा, तिळानतिळाचा. -ITY ताठपणा, ताठरपणा; करडेपणा, जालीमपणा.—RIGOUR ताठपणा; करडेपणा, कठोरपणा;—as of heat or cold कडाखा, कडका; *Med.* as in the cold fit of fever कांटा, कांटे; sternness कठोर -कडकडीतपणा; stiffness of opinion कडकडीत मत *n*;—of temper करडी प्रकृति *f*. -OUS *a.* करडा, उग्र; कठोर, निष्ठुर; कडक, कडख्याचा (cold); minute काडीनकाडीचा, कवडी कवडीचा (account).

RILL (*rivulus*, a small brook) ओहळ, उपळी *f*.

RIM* कांठ, किनारा.

RIND* साल *f*, त्वचा *f*, सालपट *n*.

RING*, a circle कडें *n*, चक्र *n*, वेढा; as an ornament for the wrist तोडा; finger r. अंगठी *f*, मुद्रिका *f*, वळें *n*;—of metal कडी *f*, कडें *n*, वाळा; a circular group of persons घेरा, वेढा, कचोळें *n*;—of grass, cloth, &c. चुंबळ *f*, आहरा;—at top playing रंगण *n*; as of a bullock turning a mill भोंवार *f*; r. binding mallets, rammers, &c. मांडळ *f*, वसूं *n*;—of wire for the nose or ear वाळी *f*;—for the toe जोडवें *n*;—for the hand of a female पाटली *f*, चुडा;—of a male कडें *n*;—of a drum, sieve, nose-ring, &c. गाडा.—*v.* घेरा -वेढा घालणें; अंगठी -वाळी इ० घालणें;—a horse चक्रावर -मंडळावर धरणें. -BOLT, an iron bolt, with an eye at its head, and a ring through the eye हलकी *f*. -LEADER मोहरपी, पुढाईत. -LET झुलूप *n*. -WORM गजकर्ण *n*, दाद *f*, दद्रु.

RING* *v.* cause to sound, as a metalic body वाजवणें, घणघणावणें; produce by ringing, as a sound वाजवून नाद उत्पन्न क., नाद क.; repeat often, loudly or earnestly खणकावणें, शिरा ताणून -ठोठावून बोलणें; [to r. in or out, to usher, attend on, or celebrate, by the ringing of bells; to r. out the old year and r. in the new].—*i.* वाजणें, झणझणणें;—the ear झणझणणें, भणभणणें; be filled with a report or talk घुमणें, दणदणणें.—*n.* झणकार, झणत्कार.

RINSE* *v.* wash lightly विसळणें, धुणें;—as clothes खंगाळणें, खळबळणें; cleanse by the introduction of water, as hollow vessels खंगाळणें, विसळणें;—as the mouth गुळणा क. [out].

RIOT *F.* wanton or unrestrained behavior दंगा, हंगामा, गर्दी *f*; wild festivity धुमाळी *f*, धुमश्चक्री *f*; to run r. बावचळणें, वायकळणें, माजणें.—*v. i.* गर्दी -दंगा क. -उठवणें -माजवणें; धुमाळी -धुमश्चक्री क. [in]. -OUS *a.* धुमाळीचा, धुमश्चक्रीचा (Luke xv. 13); गर्दीचा, दंग्याचा, धुंडाईचा (assembly, proceeding).

RIP* *v.* tear or cut open चिरणें, फाडणें, विदारणें; open up उसवणें, उस्तरणें; discover उघाडीस आणणें, विचका क.;—faults उखाळ्या पाखाळ्या काढणें [off].

RIPE* *a.* ready for reaping पिकलेला, पक्व; advanced to the state of fitness परिपक्व,

तयार, झालेला (cheese); to be r. as a fruit पिकणें, होणें; matured पिकलेला, पक्क (tumor); perfected सिद्ध, परिपूर्ण,निपुण, निष्णात (scholar);—in years पोक्त, प्रौढ,वृद्ध; —prepared तयार, सिद्ध: things are r. for war; resembling ripened fruit in ruddiness and plumpness लाल व भरदार, तांबूस व गुबगुबीत (lips).—RIPEN *v.* पिकवणें; पूर्णतेस आणणें, परिपक्व क.—*i.* पिकणें; पूर्णतेस येणें; as mangoes, tamarind, &c. गुळमटणें, पाडास येणें -लागणें;— a field of corn, &c. काळसरणें. -NESS पक्वपणा,पक्वता *f*, पक्वदशा *f*; प्रौढी *f*, पोक्तपणा;—of a crop पाक *n*.

RIPPLE *v. i. Ger.* खळखळणें, खळखळ वाहणें. —*n.* खळखळ *f*, खळाळी *f*.—RIPPLINGLY *ad.* खळखूळ, खळखळ, खळकण.

RISE* *v. i.* ascend वर जाणें, वर चढणें; ascend or float in a fluid तरंगणें; grow upward वर -उंच वाढणें, वाढणें: a tree *rises* a hundred feet; become erect उठणें, उभा राहणें: to r. from a chair, or from a fall; leave one's bed उठणें, निजून उठणें; tower up उंच चढणें -दिसणें: the Alps r. far above the sea; slope upward चढणें, चढण लागणें: a path *rises* in this direction;— a heavenly body उगवणें, उदय पावणें -होणें;—a river, &c. चढणें,फुगणें, पाणी चढणें; increase in value or price, &c. दर -भाव -मोल चढणें -वाढणें; swell सुजणें,फुगणें (a boil); increase in intensity वाढणें,चढणें,बळावणें, जोर होणें (heat, the voice, debt); be promoted चढणें, वाढणें, मोठा होणें; come to mind आठवण -स्मरण -स्फूर्ति होणें, सुचणें: a thought *rose* in me; come to hands हातीं लागणें -येणें: there chanced to r. to my hand a book; revive मरून उठणें, सजीव होणें (Cor. i. 20); close a session सभा उठणें -बरखास -विसर्जन होणें; issue निघणें, उगम होणें, उद्भवणें (a river); break into rebellion उठणें, फिरणें, बंड क.—*n.* उभें राहणें *n*, उत्थान *n*; वर चढणें *n*, आरोहण *n*, ऊर्ध्वगमन *n*; चढती *f*, वृद्धि *f*, उदय; उगवणें *n*, उदय; मूल *n*, उगम, आरंभ; चढण *f*, चढाव; चढ, तेजी *f*.—RISING चढणारा, चढता, चढते कळेचा; वाढणारा, वर्द्धमान: चढत्या वयाचा; उगवणारा, उदयमान.—*n.* उठणें *n*, उत्थान *n*; पुळी *f*, फोड;—of measles, smallpox, &c. उगवण *n*.

RISIBLE *a.* (*ridere*, to laugh) हसणारा, हसनसमर्थ; हास्यजनक, हसूं येण्याजोगा.

RISK *F.* जोखीम *n*, भय *n*, धोका; to run a r. तवकल क.; at all *risks* जरूर.—*v.* जोखमांत -धोक्यांत घालणें -पाडणें.

RITE (*ritus*) act of performing divine or solemn service, as established by law, precept, or custom अनुष्ठान *n*, व्रत *n*, विधि, संस्कार.—RITUAL *a.* विधीचा, क्रिया संबंधी; संस्काराचा.—*n.* संस्कारपद्धति *f* -शास्त्र *n*.— RITUALIST क्रियावान, अनुष्ठानी, कर्मठ.

RIVAL *v.* (*rivalis*, belonging to a brook) बराबरी -स्पर्धा क., झुंजणें, लढणें.—*n.* & *a.* स्पर्द्धा करणारा, प्रतिस्पर्द्धी. -RY स्पर्द्धा *f*, चढाचढी *f*, हेवा.

RIVE* *v.* चिरणें, फाडणें, छेदणें.—*i.* चिरणें, फाटणें, तडकणें.

RIVER (*ripa*, a bank) नदी *f*; copious flow ओघ, पूर, नदी *f*: *rivers* of blood; bank of a r. नदीतीर *n*; the mouth of a r. नदीमुख *n*; bed of a r. पात्र *n*; watered by *rivers* नदीमातृक; a sacred r. गंगा *f*; r. of heaven सुरनदी *f*;—of hell वैतरणी *f*.— RIVULET ओहळ, नाला, ओढा.

RIVET *v. F.* fasten with a rivet खिळा ठोकून -मारून बोळवणें, खिळ्यानें खिळणें -जोडणें; fasten firmly पक्का क., न हालेसा क.; clinch बोळवणें, वळवणें.—*n.* दोहों शेवटांनीं बोळवलेला खिळा, चुरसा.

ROAD* रस्ता, वाट *f*, मार्ग; —for ships नांगरवाडा; to be on the r. वाटचालणें; to take to the r. वाटमारणें, रस्त्यावर लुटणें; public r. हमरस्ता, राजमार्ग. -STEAD नांगरवाडा.

ROAM *v. i. F.* रमणें, फिरणें, भटकणें, भ्रमणें [about].—*n.* भ्रमण *n*, हिंडणें *n*, विहार, परिचार.

ROAN *a. F.* having a bay color चितांडा (horse).

ROAR* *v. i.* cry with a full, loud, continued sound ओरडणें, आरोळी मारणें; as a beast डरकाळी फोडणें, गरजणें; as in pain ओरडणें, केंकणें, आक्रंदणें; cry in anger डरकावणें, डरकाळी फोडणें, गुरकावणें; make a loud confused sound, as wind, waves, cannon, passing vehicles, &c. दणाणणें, गरजणें, गडाडणें, धडधडणें; laugh out loudly and continuously मोठ्यानें -खदखदां हासणें; make a loud noise on breathing, as horses having a certain disease घोरणें [out].—*n.* डरकणें *n*, डरकणी *f*, डरकाळी *f*; ओरडणें *n*, आरोळी *f*; गडगडाट, गर्जना *f*, दणका. -ING *a.* डरकणारा, डरक्याफोडणारा; गरजणारा, दणदणीत; ओरडणारा, आरोळी मारणारा.

ROAST *v. F.* prepare, as meat, by exposure to heat भाजणें; parch भाजणें, होरपळणें (coffee); banter severely हुरेरवडी उडवणें. —*n.* भाजण *n*, भाजप *n*.—*a.* भृष्ट.

ROB *v. Ger.* plunder लुटणें; take away by force हिरावणें, छिनावून घेणें; steal from चोरणें. -BER लुटारू. -BERY, *Law*, the felonious taking of money or goods from the person of another, or in his presence, against his will, by force, or by putting him in fear लुटणें *n*; जबरीची चोरी *f*, चोरी *f*, लूट *f*; gang r. दरोडा; highway r. वाटमारा.

ROBE *F.* जामा, झगा; r. of honor presented by a king, &c. खिलात *f*; r. and turban bestowed in honor शेलापागोटें *n*, शिरपाव.—*v.* पोशाक घालणें, वस्त्रें नेसवणें.

ROBIN *Ger.* एक गाणारा पक्षी आहे.

ROBUST *a.* (*robustus*) hard धट्टाकट्टा, जोरदार, बळकट; rough दांडगा; requiring vigor मेहनतीचा, बळाचा, दांडगा, घसमर (employment).

ROCK *F.* a large mass of stony material खडक, धोंडा, दगड; refuge आश्रय: (2 Sam. xxii. 2); r. in the sea खराबा, कांटा; sheet of r. कातळ, खडक; ledge of r. दांडा, खडक; flat r. in the sea कासा; a projecting r. बिंडा; to cause the r. to flow दगडास पाझर आणणें; r. salt शेंदेलोण *n*; r. oil मातीचें तेल *n*.—ROCKY *a.* खडकाचा, खडकळ; खडका सारखा, कठीण, निर्दय, in comp. पाषाण.

ROCK* *v.* move backward and forward as a body resting on a support beneath डोलवणें, झोका -झोके देणें; put to sleep by rocking पाळणा हालवून निजविणें [to and fro]. -ING *a.* डुलडुल हलणारा, डळमळीत; r. stone उलटा दगड.—*i.* डुलणें, डगमगणें. -ET बाण, तारा.

ROD* (*Skr. ridh,* to grow) a long twig काठी *f*, दांडा; instrument of punishment काठी *f*, छडी *f*, दंड; sceptre छडी *f*, वेत्र; instrument for measuring काठी *f*; race कूळ *n*, जात *f*; a measure of length containing 16½ feet काठी *f*.

RODOMONTADE *F.* अरेरावकी *f*, तीनतेरा गोष्टी *f pl.*

ROE *Ger.* माशाचीं अंडीं *n pl.*

ROE* हरणी *f*; buck हरण *n*, *m*.

ROGUE *F.* a knave सोदा, लुच्चा, ठक; vagabond भटक्या, उडाणटप्पू; way गुलाम, गुंड. -RY लबाडी *f*, सोदेगिरी *f*, लुच्चेगिरी *f*, गुलामगिरी *f*.

ROLL *v.* (*rotulus*, a little wheel) लोटणें, लोटून नेणें; make to revolve फिरवणें; wrap round on itself गुंडाळणें, लपेटणें;—cakes, &c. लाटणें, वळणें; along, over, in लोळवणें;

STUB* खुंट *n*, खोड *n*. -BY *a.* आडव्या आंगाचा, गिड्डा, चेंडू; टिल्लू.

STUBBLE *D.* गहूं वगैरे धान्याचा सड.

STUBBORN* *a.* refractory अडेल, हट्टी, दुराग्रही; stiff ताठ; persevering धिराचा, निश्चयाचा. -NESS हट्ट, दुराग्रह.

STUCCO *It.* चुन्याचा गिलावा, संदला.

STUD*, ornamental nail चमकी *f*, गुलमेख *f*; ornamental knob गुलमेख *f*.—*v.* चमक्या -गुलमेखा जडणें, जडित क.

STUD* घोड्यांची पागा *f*.

STUDY (*studere*) application of mind to books and learning विद्याभ्यास, व्यासंग,

अभ्यास; meditation मनन *n*, विचार, चिंतन *n*; contrivance युक्ति *f*, तजवीज *f*, उपाय; any particular branch of learning that is studied शिकण्याचा -अभ्यासाचा -अध्ययन विषय; apartment devoted to study शिकण्याची खोली *f*; [*Fine Arts*, a work undertaken for improvement in the art, and often left incomplete].—*v. i.* शिकणें, अभ्यास क.; विचार -मनन क.; be zealous झटणें, तिडकेनें क.—*t.* शिकणें, अध्ययन क.; विचार क.; arrange by previous thought पूर्वी विचार -तजवीज करून ठेवणें; commit to memory पाठ क.—STUDENT शिकणारा, विद्यार्थी.—STUDIED *a.* शिक्षित, अभ्यासित; पढीक, विद्वान; पूर्वयोजित -रचित. —STUDIOUS *a.* अभ्यासी, व्यासंगी, उद्योगी; विद्याभ्यासी, विद्याव्यसनी. -NESS विद्याव्यासंग; उद्योग, व्यासंग, व्यवसाय.

STUFF *Ger.* cloth कापड *n*; material वस्तु *f*, द्रव्य *n*; essence तत्व *n*; nonsense भलतेंच, बडबड *f*; worthless matter ऐलपैल *n*, इळाखिळा; medicine औषध *n*.—*v.* crowd दाटी क., कोंदणें; fill full ठासून भरणें; obstruct कोंदणें, बंद क., बुजवणें; fill the skin of, for the purpose of preserving as a specimen गवत -मसाला वगैरे भरून ठेवणें.—*i.* कचकावून -रगडून -दपटून जेवणें. -ING पुरण *n*, भरण *n*; seasoning for meat पुरण *n*, मसाला.

STUMBLE *v. i. Ger.* trip in walking अडखळणें, ठेंचळणें; err चुकणें, घसरणें; light on by chance अवचित सांपडणें -मिळणें -भेटणें [about, down].—*t.* अडखळवणें, ठोकर खायास लावणें; confound गोंधळविणें, घोटाळ्यांत पाडणें.—*n.* ठेंच *f*, ठोकर *f*.—STUMBLING-BLOCK, -STONE अटकाव, अडखळण *n*.

STUMP *D.* stub खुंट *n*, खोड *n*;—of a limb थोट *n*, बोटूक *n*.—*v.* lop तोडणें, छाटणें.—*i.* दणदण चालणें.—STUMPY *a.* गिड्डा, ठेंगू; थोंटा, लांडा.

STUN* *v.* make senseless by a blow ठोक्यानें मूर्च्छित -बेसावध क.; overpower the sense of hearing -च्या कानठळ्या बसविणें; surprise completely चकित -दंग क. [with, by, at].

STUNT* *v.* वाढ खुंटवणें, खुरट क. [in].—*n.* खुरट -खुजेपणा; खुरट जनावर *n*, खुजा.

STUPID *a.* (*stupidus*) very dull जड, मंद, मूर्ख; heavy गुंग, सुस्त, धुंद; formed without skill ढोबळा, ठोसर (things). -ITY जडपणा, मंदबुद्धि *f*, बेकुबी *f*; गुंगी *f*, धुंदी *f*, सुस्ती *f*;—STUPEFY *v.* जड -मंद -गुंग क.; गुंगी आणणें [by, with].—STUPEFACTION धुंदी *f*, गुंगी *f*, भूल *f*.— STUPEFACIENT *a.* गुंगी आणणारा.—*n. Med.* गुंगी आणणारें औषध *n*.—STUPENDOUS *a.* चकभूल करणारा, आश्चर्यकारक; of astonishing magnitude मोठा, महान्, अचाट, अवाढव्य.—STUPOR (*L.*) गुंगी *f*, धुंदी *f*; जडबुद्धि *f*, जाड्य *n*, बेकुबी *f*.

STURDY *a. F.* obstinate हट्टी, दुराग्रही, हेकड; violent जोराचा, बळकट (stroke); strong घटमूट, धटिंगण, दांडगा (lout); stout बळकट, दांडगा (tree).

STUTTER *v. i. Ger.* तोतरें बोलणें [in].

STY* डुकरखाना -वाडा -वाडी *f*.—*v.* डुकरखान्यांत कोंडणें.

STY* रांजणवाडी *f*, आंजुरली *f*.

STYLE (*stylus*) mode of expressing thought in language, whether oral or written वाणी *f*, धाटी *f*, धरती *f*, लवक *f*, ढब *f*; fashion रीत *f*, चाल *f*, मोळा; title किताब, प्रतिष्ठा *f*, नांव *n*; mode of presentation, esp. in music or any of the fine arts कवितेची -गाण्याची सरणी *f* -थाकी *f*; —of a dial शंकु;—of a flower बोंड *n*, पोंगी *f*;—for writing लेखणी *f*; pointed iron

सळई *f*, शलाका *f*.—*v.* झणणें, नांव -किताब देणें.—STYLISH *a.* छानदार, विराजित.

STYPTIC *a.* (*stypticus*) रक्त बंद करणारा, रक्तावरोधी.—*n. Med.* रक्त बंद करणारें औषध *n.*

STYRAX (*L.*)—liquid शिलारस.

SUAVITY (*suavis*, sweet; *Skr. svâdu*) गोडी *f*, गुलाबी *f*, मधुरता *f*, माधुर्य *n.*

SUBACID *a.* (*sub & acid*) अंबटगोड, मधुराम्ल.—*n.* मधुराम्ल पदार्थ.

SUBALTERN (*sub*, under, *alternus*, one after another) हाताखालचा मनुष्य किंवा कामदार.

SUBAQUEOUS *a.* (*-aqua*, water) पाण्याखालचा; *Geol.*, formed under water पाण्याखालीं झालेला -जमलेला (deposits).

SUBDIVIDE *v.* पोटभाग क., लहान लहान भाग क. [into].—SUBDIVISION वांटणीची वांटणी *f*, पोट वांटणी *f*, अंशांश.

SUBDUE *v.* (*ducere*, to lead) bring under जिंकणें, ताब्यांत आणणें, वश क., हस्तगत क. (enemies); overcome जिंकणें, मोडणें (opposition); tame वळवणें, वठणीस आणणें; soften हलका -नरम क. (ferocity); break, as land लागवडीस आणणें, बेनणें [by].

SUBJACENT *a.* (*-jacere*, to lie) खालचा, अधोवर्त्ती; being in a lower situation, though not directly beneath खालचा.

SUBJECT *a.* (do.) placed under खालचा; placed under the rule of हुकमी, खालचा, अधीन; liable जोगा, अधीन, वश: a country s. to extreme heat; to be s. unto -च्या आज्ञेत -हुकमांत -स्वाधीन असणें.—*n.* one who lives under the dominion of another प्रजा *f*, रयत *f*, दुसऱ्याच्या अधिकारांतला -राज्यांतला मनुष्य -ताबेदार; that on which any operation is performed पात्र *n*, अधिष्ठान *n*; *Gram.*—of a verb कर्त्ता;—of a proposition साध्य *n*;—of a predicate अनुवाद्य *n*; topic विषय, प्रकरण *n*, अर्थ; the mind मन *n*: thinking s.; [dead body for the purposes of dissection].—*v.* खालीं -अमलांत आणणें; जिंकणें, वश क.; स्वाधीन -पात्र -योग्य क.; make subservient कामास -उपयोगास लावणें; cause to undergo भोगायास -सोसायास लावणें [to]. -ION ताबेदारी *f*, पारतंत्र्य *n*, अधीनता *f*; योग्यता *f*, वशता *f*. -IVE *a.* विषयसंबंधी; मनासंबंधी, मनाचा; अधिकरणसंबंधी. -MATTER विषय, प्रस्ताव.

SUBJOIN *v.* खालीं जोडणें, दुमाल्यास लावणें.—SUBJUNCTIVE *a.* खालीं जोडलेला -लिहिलेला; *Gram.* संशयार्थ (mood).

SUBJUGATE *v.* (*-jugum*, a yoke) जिंकणें, वश क.

SUBLET *v.* पोट भाड्यानें देणें [to].

SUBLIMATE (*sublimis*, high)—white रसकापूर.—SUBLIMATION फूल काढणें *n.*

SUBLIME *a.* (do.) उंच: grand उंच, प्रौढ, उमदा, नामी; elate अत्यानंदित, आल्हादित.—SUBLIMITY उंची *f*, थोरवी *f*, थोरी *f*;—of place उंची *f*;—of nature प्रौढी *f*, पोक्तपणा, भरजुमी *f*, उमदेपणा;—of language भाषणाची प्रौढी *f*;—of feeling consisting of a union of astonishment and awe at the contemplation of great scenes and objects वचक *f*, दरारा, भय *n*, इबरत *f*.

SUBLUNAR, -RY *a.* चंद्राखालचा; pertaining to this world इहलोकचा, ऐहिक, प्रापंचिक.

SUBMARINE *a.* समुद्रांतला.

SUBMAXILLARY *a.* (*-maxilla*, jaw-bone) glands लालोत्पादक पिंड *pl.*

SUBMERGE *v.* (*mergere*, to plunge) बुडवणें, मज्जन क.—*i.* बुडणें.—SUBMERSION बुडवणें *n*, मज्जन *n.*

SUBMIT *v.* (*mittere*, to send) yield वश असणें, आज्ञेत राहणें -वागणें, मान्य होणें; refer दुसऱ्यावर सोपणें -घालणें -ठेवणें: to s. a question to the court.—*i.* दबणें, वश होणें, हार

येणें; आज्ञेंत -हुकमांत राहणें [to].—SUBMISSION वश होणें *n*, शरण जाणें *n*; ताबेदारी *f*, अधीनता *f*, आज्ञांकितपणा; confession of error अपराध कबूल क. -पदरीं घेणें.—SUBMISSIVE *a*. हुकूमबंदा, हुकमी, आज्ञांकित, विनयी.

SUBORDINATE *a*. (*ordinare*, to arrange) खालचे पायरीचा, खालचा; गौण, अप्रधान.—SUBORDINATION खालची पायरी *f*; गौणता *f*, अप्रधानता *f*.

SUBORN (*-ornare*, to furnish) cause to take a false oath खोटी शपथ घ्यायास लावणें, पैसा देऊन बदवणें; procure by indirect means वांकड्या मार्गानें मिळवणें.

SUBPŒNA (*-pœna*, punishment) *Law* कोडताचें साक्षीसमन *n*.

SUBSCRIBE *v*. (*-scribere*, to write) write underneath खालीं लिहिणें; sign with one's own hand स्वदस्तुरची सही क., सही क. -घालणें; attest by writing one's name beneath सही घालणें: clerks s. copies of records; promise to give, by writing one's name सही घालून देणें -कबूल क., वर्गणीदार होणें;—a sum of money पट्टीवर लिहिणें, वर्गणी घालणें [for, to].—*i*. कबूल -मान्य होणें; पुस्तक, वर्तमानपत्र इ० चा -ला वर्गणीदार होणें.—SUBSCRIBER सही करणारा; पट्टीवर लिहिणारा, वर्गणीदार.—SUBSCRIPTION सही करणें *n*; सही *f*, हस्ताक्षर *n*, स्वदस्तूर; वर्गणी *f*, पट्टी *f*, टीप *f*.

SUBSEQUENT *a*. (*-sequi*, to follow) मागून झालेला, मागचा, नंतरचा; मागून होणारा [to].—SUBSEQUENCE अनुगमन *n*, मागून येणें *n*.

SUBSERVE *v*. उपयोगास -कामास पडणें.—SUBSERVIENT *a*. उपयोगी, उपयुक्त [to].

SUBSIDE *v*. (*-sidere*, to settle) बसणें, खालीं जाणें, थिरावणें; become tranquil शांत होणें, उतार होणें;—as a swelling ओसरणें, उतरणें, जिरणें [to, into].—SUBSIDENCY बसणें, *n*, थिरावणें *n*, उतार, उपशमन *n*; ओसरी उतरणें *n*.—SUBSIDIARY *a*. कुमकेचा, सहकारी [to].—SUBSIDY कुमक *f*, पुरावा; aid in money पैक्याची कुमक *f*.

SUBSIST *v. i*. (*sistere*, to stand) असणें; continue राहणें, चालणें; be maintained with food and clothing निर्वाह -गुजारा चालणें; वांचणें, जगणें [on, upon].—*t*. सामग्री पुरवणें; अन्नाचा पुरावा क., खायास घालणें. -ENCE अस्तित्व *n*, असणें *n*; उपजीविका *f*, निर्वाह, गुजारा.

SUBSTANCE (do.) real or existing essence पदार्थ, वस्तु *f*, द्रव्य *n*; essential import तत्व *n*, तत्वार्थ; matter वस्तु *f*, द्रव्य *n*, मूर्त्ति *f*; estate ऐवज, ऐपत *f*, संपत्ति *f*; *Theol.*, the divine essence ईश्वरी तत्व *n*.—SUBSTANTIAL *a*. वास्तविक, खरा (good); ऐपतदार, गबर, खंबीर (free-holder); stout ऐवजदार, बसमर, दलदपट, घट्ट, ठोंसर (cloth); मूर्त्तिमंत, मूर्त्त (agent). -LY *ad*. तत्वतः, वस्तुतः, खरोखर.—SUBSTANTIATE *v*. प्रतिपादणें, पुरवून -खरा करून देणें [by].—SUBSTANTIVE *a*. विशेष द्रव्यवाचक (verb).—*n*. नाम *n*, नांव *n*, विशेष्य *n*.

SUBSTITUTE *v*. (*-statuere*, to put) बदली देणें, -ठेवणें.—*n*. बदल्या, वांटचा, बदली [for].—SUBSTITUTION बदल -मोबदला देणें *n*; बदली *f*; [*Theol.*, the doctrine that Christ suffered vicariously, being substituted, as it were, for the sinner, and that his sufferings were expiatory]. -AL, -ARY *a*. बदलीचा.

SUBSTRATUM (*-sternere*, to strew) खालचा -तळचा थर; *Agric.*, the subsoil खालची माती *f*.—*Metaph.*, basis अधिकरण *n*, आधार.

SUBTERFUGE (*-fugere*, to flee) सोडवण *n*, फट *f*, खिडकी *f*.

SUBTERRANEAN, -EOUS *a.* (-*terra,* earth) जमिनींतला, भुईतला; s. passage तळवाट *f,* सुरुंग; a s. cavity भुयार *n.*

SUBTILE *a.* (-*tela,* a web) thin बारीक, सूक्ष्म (air); delicate नाजूक, बारीक, तलम (line); acute तीक्ष्ण, तीव्र (pain); discerning सूक्ष्म -कुशाग्रबुद्धि; cunning धूर्त, चतुर, कावेबाज.—SUBTILITY बारिकपणा, बारकाई *f,* सूक्ष्मता *f;* कुशाग्रबुद्धि *f;* नाजकाई *f,* बारकाई *f;* धूर्त्तता *f,* कावेबाजी *f.*—SUBTLE *a.* शहाणा, चतुर, कुशळ; कावेबाज, धूर्त.

SUBTRACT *v.* (-*trahere,* to draw) काढणें, घेणें; deduct बाद -वजा क. [from]. -ION काढून घेणें *n; Math.* वजाबाकी *f.*

SUBURB (-*urbs,* a city) शहरा बाहेरची वाडी *f,* शिवार *n,* शहरपन्हा, वाडी *f,* उपनगर *n* [of, to].

SUBVERT *v.* (-*vertere,* to turn) पाडणें, मोडणें, लयास नेणें; corrupt बिघडणें, भ्रष्ट क. [by]. —SUBVERSION नाश, मोड, विध्वंस, लय. —SUBVERSIVE *a.* नाश -ध्वंसकारक.

SUCCEED *v.* (-*cedere,* to go) take the place of जागीं-स्थानीं-ठिकाणीं येणें, जागा घेणें; follow in order मागें -क्रमानें येणें; come after नंतर-पुढें येणें [in, at].—*i.* जागीं-ठिकाणीं येणें; ascend the throne after the removal or death of the occupant -च्या मागून गादीवर बसणें; obtain the object desired यश -जय मिळविणें, साधणें, फलप्राप्ति होणें, लाभणें, मनोरथ सिद्धीस जाणें; be acceptable मान्य -पसंत होणें.—SUCCEDANEUM (*L.*) बदली, वांटचा, बदल्या, अनुकल्प.—SUCCESS सिद्धि *f,* यश *n,* बरकत *f;* जय, फते *f,* सिद्धि *f.* -FUL *a.* शेवटास गेलेला, सफळ (affairs); विजयी, यशस्वी, कृतार्थ (person). -ION अनुक्रम, परंपरा *f,* क्रम; series हार *f,* माळका *f,* परंपरा *f:* s. of kings, events; lineage वंशावळी *f;* power or right to enter upon the office, rank, position, &c., held by another उत्तराधिकार, दायाधिकार. -AL *a.* पारंपरिक. -IVE *a.* लागोपाठचा, पाठोपाठचा. -IVELY *ad.* एकामागें एक, अनुक्रमानें. -OR स्थानीं -जागीं झालेला -आलेला; उत्तराधिकारी.

SUCCINT *a.* (-*cingere,* to gird) संक्षिप्त, थोडक्यांत आणलेला. -LY *a.* थोडक्यांत, संक्षेपानें.

SUCCOR *v.* (-*currere,* to run) मदतीस धांवण, मदत क., हात देणें.—*n.* मदत *f,* सहाय *n.*

SUCCULENT *a.* (*sugere,* to suck) रसरसीत, रसभरित, कसदार.—SUCCULENCE रसाळपणा.

SUCCUMB *v. i.* (-*cubare,* to lie down) दबणें, वांकणें [to].

SUCH* *a.* of that kind तसा, तसला; of this kind असा, असला; certain अमका, फलाणा.

SUCK* *v.* draw in with the mouth चोखणें; draw milk from, with the mouth स्तनपान क., लुंचणें, दूध पिणें; swallow up गिळणें, गरक क.; in शोषणें, शोषण क.; out चोखून रिकामा क.; up शोषणें.—*i.* स्तनपान क.; शोषणें इ०.—*n.* चोखणें *n,* चोषण *n;* थानचें दूध *n.* —SUCKLE *v.* दूध -थान पाजणें.—SUCKLING तान्हा, थानचा, अर्भक *n, m.*—SUCTION चोखणें *n,* चोषण *n.*

SUDDEN* *a.* happening without previous notice एकाएकींचा, आकस्मिक; hastily prepared घाईनें तयार केलेला, घाईचा; quick जलद, त्वरित.—*n.* अकस्मात झालेली गोष्ट *f;* on s. एकाएकीं, अकस्मात. -LY *ad.* एकाएकीं, अकस्मात.

SUDORIFIC (-*sudare,* to sweat) घाम आणण्याचें औषध *n.*—*a.* स्वेदोत्पादक, घाम आणणारा.

SUDS* *pl.* साबणाचें पाणी *n.*

SUE* *v. i.* entreat विनंती क.; prosecute फिर्याद क. [to, for, at].—SUIT, endeavor यत्न, प्रयत्न; courtship लग्नार्थ स्त्रीची आराधना *f,* -चे आर्जव *pl;* process at law खटला, मुकदमा, वाद; company of attendants परि-

वार, इतमाम, जिलीब *f*; set जोड, रंग, 'सूट' *n*;—of cloth जोड;—of cards बाजू *f*, रंग; to bring s. फिर्याद क., खटला चालविणें; original s. असल मुकदमा [to, for]. —*v.* fit साजणें, मिळणें, जमणें, बसणें; please मर्जीस उतरणें, उतरणें, पटणें, पसंत असणें; become शोभणें, साजणें.—*i.* जम -जवा बसणें, जुगणें, मिळणें. -ABLE *a.* लायक, योग्य [for, to]. -NESS योग्यता *f*, लायकी *f*; जम, जुवा. -OR विनंती करणारा; अर्जदार, फिर्यादी; लग्नासाठीं मागणी घालणारा -मागणारा.—SUITE स्वारी *f*, जिलीब *f*; series हार *f*, कतार *f*, माळका *f*: s. of rooms.

SUET (*sebum*) गुर्दावरची चरबी *f*.—SUETY *a.* चरबीचा; चरबी सारखा.

SUFFER *v.* (*-ferrere*, to bear) feel or endure with pain, annoyance, and the like दुःख -त्रास सोसणें -भोगणें; sustain सोसणें, टिकणें, निभावणें; be affected by सोसणें, खाणें, बसणें (damages); permit परवानगी देणें, जाऊं -होऊं देणें (Lev. xix. 17) [for, by, from, in].—*i.* दुःख -त्रास -क्लेश भोगणें; undergo punishment शिक्षा भोगणें; नुकसान -तोटा होणें;—a limb or member दुखवणें. -ABLE *a.* सोसायाजोगा, सहनीय. -ANCE सोसणें *n*, कंठणें *n*, भोग; patience सहनता *f*, सोसणूक *f*, क्षमा *f*; परवानगी *f*, अप्रतिबंध, कानाडोळा; misery दुःख *n*, कष्ट; bearing of pain दुःख भोगणें *n* -कंठणें *n*, भोग. -ER दुःख भोगणारा, दुःखी, कष्टी, श्रमी; सोसणारा, भोगणारा; होऊं देणारा, सहन करणारा इ०. -ING दुःख *n*, क्लेश, व्यथा *f*; दुःखानुभव, दुःखभोग.—*a.* दुःखी, दुःख भोगणारा.

SUFFICE *v. i.* (*-facere*, to make) पुरणें, पुरे होणें.—*t.* पुरे -तृप्त क. [for].—SUFFICIENCY पुरेपणा, पर्याप्ति *f*, पुरवठा; ability शक्ति *f*, योग्यता *f*, लायकी *f*; competence निर्वाहा पुरतें -त्यागभोगा पुरतें धन *n*; ample stock सामग्री *f*, बेगमी *f*; conceit अहंता *f*, मीपणा. —SUFFICIENT *a.* पुरा, पुरेसा, पर्याप्त; योग्य, लायक; amply s. पुष्कळ, विपुल [for]. -LY *ad.* पुरे, बस, पुरा.

SUFFOCATE *v.* (*faux, faucis*, the throat) श्वास -दम कोंडणें किंवा कोंडून मारणें; extinguish विझवणें (fire) [by, with].—SUFFOCATION दम कोंडणें *n*; कोंडमारा, श्वासावरोध.

SUFFRAGE (*suffragium*, vote) सम्मति *f*, अनुमति *f*.—SUFFRAGAN *a.* सहायकारी: a s. bishop.—*n.* सहायकारी बिशप.

SUFFUSE *v.* (*-fundere*, to pour) व्यापणें, भरणें. —SUFFUSION व्याप्ति *f*, व्यापणें *n*.

SUGAR *O. E.* (*Skr. sarkara*) साखर *f*; that which resembles sugar in taste साखरे सारखा गोड पदार्थ, साखर *f*; flattery गोडगोड गोष्टी *f pl*, साखर *f*, आर्जव, गूळखोबरें *n*.—*v.* साखर घालणें -पसरणें, साखरेंत घालणें, इ०; गोडगोड गोष्टी क., साखर पसरणें, वरपंगी बोलणें [with]. -CANDY खडीसाखर *f*. -CANE ऊंस. -MILL गुऱ्हाळ *n*, चरक. —SUGARY *a.* साखरेचा, गोड, मिष्ट; साखरेच्या सारखा; fond of sugar साखरेचा आवडता, गोडखाऊ; in comp. साखर.

SUGGEST *v.* (*-gerere*, to carry) introduce indirectly to the thoughts सुचवणें; insinuate व्यंगोक्तीनें सुचवणें, दर्शविणें [to]. -ION सूचना *f*; that which is suggested सुचविलेली गोष्टी *f*, सूचना *f*; *Law*, information without oath बिनशपथेची जबानी. *f*. -IVE *a.* सूचनेचा, सूचनात्मक.

SUICIDE (*sui*, of one's self, *cædere*, to kill) the act of designedly destroying one's life, committed by a person of years of discretion and of sound mind आत्महत्या *f*; one guilty of self-murder आत्महत्या करणारा, आत्महत्यारा, आत्मघातकी.—SUICIDAL *a.* आत्मघाताचा, आत्मघातक.

SUIT, See under SUE.

SULKY* *a.* दुर्मुखलेला.—SULKS *pl.* खळ *f,* फुरगुट *n, m;* to take the s. हट्टास पेटणें, खळ घेणें.

SULLEN *a. O. E.* dismal काळोखीचा, अंधारीचा; malignant दुष्ट; cross दुर्मुखलेला; obstinate कुचर, घुम्या.

SULLY *v.* (See SOIL) मळवणें, मळीत क.; tarnish कलंक -डाग लावणें.

SULPHER (*L.*) गंधक; roll s. नळ्यागंधक. -OUS *a.* गंधकाचा; गंधकाच्या गुणाचा; गंधकयुक्त.—SULPHATE—of copper मोरचूत.

SULTRY* *a.* उकाड्याचा, गदमदण्याचा; उष्ण, गरम; to be s. गदमदणें, उकडणें.

SUM (*summa*) aggregate जमा *f,* बेरीज *f;* amount रकम *f;* substance सारांश, अर्थ, एकंदरी *f;* *Arith.* उदाहरण *n,* हिशोब.—*v.* एकंदर -गोळबेरीज क.; up उपसंहार क. -MARY संक्षेप, सारांश, उपसंहार.—*a.* संक्षेपाचा, संक्षिप्त; अटपसार, अटपता (proceedings). -MARILY *ad.* संक्षेपानें; थोडक्या काळांत, लागलाच, ताबडतोब.

SUMMER* उन्हाळा, ग्रीष्मकाल;—s. friend सुखाचा -शाळु सोबती. -HOUSE बंगला, बारादारी *f.*

SUMMER *F.* दारकस *f,* दारपटी *f.*

SUMMIT (*summus,* highest) कळस, शिखर *n;* highest degree पराकाष्ठा *f,* सीमा *f,* हद्द *f,* कळस, शिखर *n*: the s. of fame.

SUMMON *v.* (*summonere,* to give a hint) call बोलावणें; cite by authority सत्तेनें बोलावणें; up उत्तेजित क.; call upon to surrender स्वाधीन होण्यास -शरण येण्यास सांगणें [to, for, up] *n.*—*pl.* सरकारी बोलावणें *n,* तलबनामा, 'समन्स' *n,* 'समान' *n.*

SUMPTUOUS *a.* (*sumptus,* cost) खर्चीचा; बहु मोलाचा; magnificent भडक, भळभळीत; s. dinner चमचमीत -चंगीळ जेवण *n.*

SUN* (*Skr. sûrya,* fr. *svar,* heaven) सूर्य; whatever resembles the sun in splendor and importance सूर्य, तेजोराशि; sunshine ऊन *n;* under the s. पृथ्वीवर, इहलोकीं.—*v.* उनांत ठेवणें -टाकणें -घालणें, सूर्यपुट देणें; orbit of the s. सूर्यमंडल *n;* the region of the s. सूर्यलोक; ray of the s. सूर्यकिरण *n;* worshipper of the s. सूर्योपासक, सौर. -BEAM सूर्यकिरण *n.* -BLINK तिरीप *f.* -BURNT *a.* उनानें काळवटलेला. -DAY आदितवार, रविवार; the Christian Sabbath ख्रिस्ती लोकांचा शाब्बाथ.—*a.* शाब्बाथ वाराचा. -DIAL छायायंत्र *n,* शंकुयंत्र *n.* -FLOWER सूर्यफूल *n.* -NY *a.* उनानें केलेला; उनानें रंगवलेला; सूर्यतप्त. -RISE सूर्योदय; the east उगवत *f,* पूर्व *f.* -SET सूर्यास्त; evening संध्याकाळ *f;* the west पश्चिम *f,* मावळत *f.* -SHINE ऊन *n,* निवर *n;* illumination प्रकाश, उजेड, रोशनाई *f.*—*a.* प्रकाशाचा, उनाचा; सूर्या सारखा, तेजःपुंज. -STONE अग्निगर्भ, सूर्यकांत. -STROKE उनाचा चटका, झळ *f;* उनाच्या चटक्यानें होणारा रोग.

SUNDER* *v.* तोडणें, वेगळा क. [in, from].—SUNDRY *a.* अनेक प्रकारचे, नाना प्रकारचें.—SUNDRIES *pl.* परचुरण *n,* किरकोळ.

SUP* *v.* घोट घेणें [up].—*i.* रात्रीचें जेवण क. [on, off]. -PER रात्रीचें जेवण *n;* Lord's s., the memorial sacrament of the communion प्रभुभोजन *n.*

SUPERABOUND *v.* (*super* & *abound*) बहुत -पुष्कळ असणें [in, with].—SUPERABUNDANT *a.* अतिशय, अधिक.—SUPERABUNDANCE विपुलता *f,* पुष्कळपणा; ऊरपूर *f,* महापूर *f.*

SUPERANNUATED *a.* म्हातारपणानें थकलेला, थकलेला, वयातीत: to be s. सांठळणें.—SUPERANNUATION अति वयस्कता *f,* वार्धक्य *n,* साठी *f.*

SUPERB *a.* grand (*superbus*) मोठा, नामी, भव्य; elegant छानदार, भडक, झळक; showy देखाऊ, छानदार.

SUPERCARGO कबाडी गलबताची देखरेख करणारा.

SUPERCILIOUS *a.* (*-cilium*, eyelid) haughty दिमाखदार, तोरेदार; दिमाखाचा, माजुरी. -NESS दिमाख, तोरा, बदमस्ती *f*, पीळ.

SUPEREMINENT *a.* सर्वश्रेष्ठ, अतिश्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट.

SUPEREROGATORY *a.* (*-erogare*, pay out money from the public treasury after asking the consent of the people) अत्याचाराचा, कर्त्तव्यातिरिक्त, पाहिजे त्यापेक्षां अधिक केलेला.

SUPERFICIAL *a.* (*-facies*, make) lying on the surface वरचा, वरल्या आंगाचा; बाहेरील; shallow उपरटपी (scholar).—SUPERFICIES वरलें -बाहेरचें आंग *n*; *Civil Law*, everything on the surface of a piece of ground or of a building, so closely connected by art or nature as to constitute a part of it जमीन व तिजवरचीं झाडें वगैरे, घर व त्यावरची माडी वगैरे.

SUPERFINE *a.* फार बारीक, तलम (cloth).—SUPERFLUOUS *a.* (*-fluere*, to flow) अधिक, जास्त, फाजील, उपराळ.—SUPERFLUITY अधिकाई *f*, आधिक्य *n*; something that is beyond what is wanted गरजे बाहेरची वस्तु *f* -गोष्ट *f*, जिची गरज नाहीं ती वस्तु *f*, फालतु जिन्नस *f*, *m*.

SUPERHUMAN *a.* मनुष्यकृतीच्या पलीकडचा, अमानुष, अतिमानुष्य; s. power विभूति *f*, अमानुषशक्ति *f*.

SUPERINCUMBENT *a.* वर पडलेला, उपरिस्थ.

SUPERINDUCE *v.* ओढून वर आणणें -मिळवणें: long custom of sinning *superinduces* upon the soul new and absurd desires.

SUPERINTEND *v.* पाहणें, चौकशी क. -ठेवणें. -ENCE देखरेख *f*, चौकशी, पाहाणी *f*. -ENT देखरेख करणारा, पाहणीदार, चौकसनीस, 'सुप्रिंटेंडेंट.'

SUPERIOR *a.* (*super*, above) वरच, वरला; higher in rank or office वरचे पदवीचा -पायरीचा, वरिष्ठ, श्रेष्ठ; higher in excellence सरस, अधिक, श्रेष्ठ, उंच; beyond the power or influence of अनधीन, अस्वाधीन, -च्या वर, पलीकडे, अवश; s. planets, planets more distant from the sun than the earth बहिर्वर्त्ती.—*n.* वडील, श्रेष्ठ जन, ज्येष्ठ; —of a convent महंत, आश्रमगुरु. -ITY वरचा अधिकार, वरची पदवी *f*; वर्चस्व *n*, सरशी *f*, प्राधान्य *n*, श्रेष्ठत्व *n*; प्राबल्य *n*, चढ.

SUPERLATIVE *a.* (*-ferrelatum*, to carry) परमावधीचा, सर्वोत्कृष्ट, पराकाष्ठेचा; *Gram.* परमावधिवाचक; s. degree पराकाष्ठा कोटी *f*. [to].

SUPERNATURAL *a.* वरचा (regions); celestial आकाशीय, अलौकिक, अद्भुत, अमानुष.

SUPERNUMERARY *a.* (*numerus*, a number) नेमणुकी बाहेरचा, जास्ती, फाल्तु, जास्त; s. expense उपराळ -फाजील खर्च.

SUPERPOSE* *v.* (*-ponere*, to place) -वर ठेवणें.

SUPERSCRIBE *v.* (*-scribere*, to write) -वर लिहिणें; -वर पत्ता लिहिणें: to s. a letter. —SUPERSCRIPTION -वरचा लेख -पत्ता.

SUPERSEDE *v.* (*sedere*, to sit) replace -च्या जागीं दुसरा ठेवणें; make void माजी -रद्द क.; suspend कामावरून अमानत क., दुसरा पाठवून कामावरून काढणें [in, by].

SUPERSTITION (*superstitio*, a standing still over or by a thing; hence wonder, dread, esp. of the divine or supernatural) ignorant and irrational worship of the Supreme Deity अज्ञानभक्ति *f*, अन्यथा भक्ति *f*; excessive exactness in religious practice अति भक्ति *f*, कुभक्ति *f*, अत्याचार, भक्तिवेड *n*; worship of false gods खोटे देवांची भक्ति *f*;

false religion खोटा धर्म, अन्यथा -मिथ्या धर्म; belief in omens and prognostics शकुनभोळेपणा, शकुनादिकावर विश्वास.—SUPERSTITIOUS *a.* अत्याचारी, भक्तीचा वेडा; अतिश्रद्धामूलक; शकुनभोळा.

SUPERSTRUCTURE पायावरची इमारत *f*, जमिनीच्या वरचा इमला; वरचा थर.

SUPERVENE *v. i.* (*-venire,* to come) अणखी येणें, नवा येणें; happen घडणें, होणें.—SUPERVENIENT *a.* नवा आलेला.

SUPERVISE *v.* (*-videre,* to see) पाहणें, देखरेख -चौकसी क.—SUPERVISOR पाहणारा, देखरेख करणारा, चौकसनीस.

SUPINE *a.* (*super,* above) उताणा, उलथा; indolent सुस्त, निरुद्योगी.—*n. Gram.* कारक *n.* क्रियावाचक नाम *n.*

SUPPLANT *v.* (*-planta,* sole of the foot) remove by stratagem युक्तीनें -डोईवर पाय देऊन पाडणें; overthrow मोडणें, पाडणें, खालीं पाडणें, मोड क. [in].

SUPPLE *a.* (*-plicare,* to fold) pliant लवचीक, लवका, नरम; flattering आर्जवी, तोंडदेखला; compliant नरम.—*v.* लवचीक क.; नरम क.

SUPPLEMENT (See SUPPLY) पुरवणी *f*, पुरवणीबंद; that which completes पुरवठा *f*, भर *f*, भरती *f*. -ARY *a.* पुरवणीचा, भरतीचा.

SUPPLIANT *a.* (*supplex,* kneeling down) प्रार्थना -विनंती करणारा; expressive of humble supplication दैन्यवाणा, दीन प्रार्थनेचा, विनंतीचा; s. for protection शरणार्थ.—SUPPLICATE *v.* प्रार्थणें, विनवणें, पाय धरणें; entreat for -साठीं प्रार्थना क., मागणें; s. abjectly पदर पसरणें, मिन्नतवारीनें मागणें [for].—SUPPLICATION प्रार्थना *f*, विनंती *f*; मिन्नतवारी *f*, विनवणी *f*.

SUPPLY *v.* (*plere,* to fill) पुरवणें, पुरवठा क.; take the place of -ची जागा घेणें, -बाटचें काम क. [with, to].—*n.* पुरवणी *f*, पुरावा; matter supplied भर *f*, भरती *f*, पुरवठा, बेगमी *f*, साहित्य *n*, भरणा; [*pl.* amount of money provided, as by Parliament or Congress, to meet the annual national expenditures: to vote s.]

SUPPORT *v.* (*-portare,* to carry) bear by being under वाहणें, धरणें, नपडूं देणें, आधार हात -आश्रा देणें; sustain सोसणें, साहणें; assist मदत क., संभाळ क., पाठबळ देणें; maintain पोसणें, पाळणें (a family); carry on चालवणें, चालता ठेवणें (war, government); verify खरा करून देणें, पुरावा करून देणें; uphold by aid मदत क., पुस्ती देणें; अनकूल असणें, अनुमोदन देणें; attend, as an honorary assistant: a chairman *supported* by a vice-chairman;—spirit, courage, &c. दम -धैर्य -अवसान देणें [in, by.]—*n.* धरणें *n*, संभाळणें *n*; आधार, सांभाळ; सहाणें *n*, सोसणूक *f*; निर्वाह; पालन *n*, पोषण *n*; आधार, पाठबळ *n*, आश्वासन *n*; उपजीविका *f*, जिनगी *f* [for]. -ABLE *a.* धारण करायाजोगा; सोसण्याजोगा. -ER आधार देणारा, चालवणारा; पालक, पोषक, पालनवाला; पाठ देणारा, पाठिंबा, सारथी; स्थापना -पुष्टी करणारा. -LESS *a.* निराधार, निराश्रित.

SUPPOSE *v.* (*-pausare,* to pause) lay down without proof अटकळ क., मानणें; imagine कल्पिणें, मनांत आणणें; require to exist or be true आहेसा दाखवणें, गर्भित असणें, दर्शवणें: the existence of things *supposes* the existence of a cause of things.—SUPPOSITION कल्पना *f*, अटकळ *f*, भावना *f*, कल्पित गोष्ट *f*; doubt संशय.

SUPPRESS *v.* (*-premere,* to press) मोडणें, नाहींसा क.; conceal दडपणें, दाबणें, छपविणें; stop बंद क.;—an emotion गिळणें, पिणें. -ION मोडणें *n*, ध्वंस; छपावणी *n*, दाबादाबी *f*; as of urine मूत्रस्तंभन *n*, मूत्रावरोध.

SUPPURATE *v. i.* (*-pus,* matter) पिकणें, पुळणास

येणें.—SUPPURATION पुवळणी *f*, पुवाळणी *f*. —SUPPURATIVE *a*. पिकवणारा.

SUPREME *a*. (*supremus*) highest in authority मुख्य, श्रेष्ठ, वरिष्ठ; most excellent सर्वोत्कृष्ट; utmost पराकाष्ठेचा, बेहद्द (folly). —SUPREMACY मुख्य अधिकार, प्राधान्य *n*, वरिष्ठता *f*.

SURD (*surdus*) *Alg*. करणी *f*.

SURE *a*. *F*. confident beyond doubt निभ्रांत, निःसंशय; certain खचीत, निश्चयाचा; of certain actions अचूक; to be s. खचीत, निःसंशय; तर बरिक, बरें. -LY *ad*. खचीत निखालस. -TY खचित -निश्चितपणा; security जामीन, जिम्मेदार; monied s. मालजामीन; s. for a s. आडजामीन;—for good and peaceable conduct फिलजामीन;—for the personal appearance of any one when required to attend हाजीर जामीन, दर्शनप्रतिभू; a s. for confidence, one who engages for the general honesty and responsibility of another प्रत्ययप्रतिभू; a s. for the repayment of a loan or fulfilment of an engagement दानप्रतिभू; a s. who engages to give up property belonging to the debtor if he fails to pay the debt द्रव्यार्पणप्रतिभू. -SHIP जामीनकी *f*.

SURF *F*. कांठावर फुटणारी लाट *f*.

SURFACE (*F*. *sur*, *L*. *super*, & *face*) वरचा -बाहेरला भाग, पृष्ठभाग; outward appearance रूप *n*, बाहेरील देखावा, बाह्यरूप *n*; s. of the earth भूतल *n* -पृष्ठ *n*; on the s. वर.

SURFEIT *v*. *F*. ओकारी येईतों खाववेणें -जेवायास -खायास घालणें; ओकारी येई तोंपर्यंत खाणें [with].—*n*. टर *f*, चेंल *f*, उपट *f*.

SURGE (*surgere*, to rise) मोठी लाट *f*.

SURGEON *O*. *E*. शस्त्रवैद्य; veterinary s. अश्ववैद्य.—SURGERY शस्त्रवैद्यकी *f*.—SURGICAL *a*. शस्त्रवैद्याचा -वैद्यकीचा.

SURLY *a*. *Ger*. sour दाट, खाट, खट्याळ.

SURMISE *v*. (*mettre*, to put) संशय -वहीम आणणें.—*n*. अंदेशा, वहीम.

SURMOUNT *v*. *F*. overcome पार पडणें, निभावणें; excel मागें टाकणें, चढ -तोड क.

SURNAME (*sur* & *name*) आडनांव *n*, उपनांव *n*, कूळ *n*; [*surnames* originally designated occupation, estate, place of residence, or some particular thing or event that related to the person: Robert *Smith*, William *Turner*]. [in, at, by] नांव *n*.—*v*. आडनांव देणें -ठेवणें.

SURPASS *v*. मागें टाकणें, चढ -तोड क.

SURPLICE (-*pellicum*, a robe) उपाध्याचा झगा.

SURPLUS (-*plus*, more) ऊर *f*, शिलक *f*, उपराळा.—*a*. फाजील, वर राहिलेला.

SURPRISE *v*. (-*prendere*, to take) take unawares एकाएकीं गांठणें, अकस्मात धरणें; strike with wonder चकवणें, दंग क.; confuse घोटाळ्यांत पाडणें [by, with, in, at].—*n*. विस्मय *n*, आश्चर्य *n*; एकाएकीं गाठणें *n*. —SURPRISING *a*. चमत्कारिक, विस्मय -आश्चर्य उत्पन्न करणारा (patience). -LY *a*. आश्चर्य वाटण्याजोगा.

SURRENDER *v*. (-*rendre*, to render) yield to the power of another स्वाधीन -हवालीं क., सोडणें; yield to any influence वश -स्वाधीन होणें.—*i*. स्वाधीन -हवालीं होणें [to, up]. —*n*. त्याग, परित्याग, अधीनता *f*; शरण येणें *n*.

SURREPTITIOUS *a*. (-*rapere*, to snatch away) खोटा, कपटाचा, कृत्रिम.

SURROUND *v*. (*sur* & *round*) वेढा -घेरा घालणें, वेष्टणें [by, with]. -ING *a*. वेढणारा, वेष्टक; चहूंकडला, आसपासचा, भोंवतालचा,

SURTOUT *F*. वरून घालायाचा अंगरखा.

SURVEILLANCE (-*vigilare*, to watch) पाहरा, चौकी *f*, नजरबंदी *f*, नजरकैद *f*, दृष्टीची कैद *f*.

SURVEY *v*. (-*videre*, to see) पाहणें, निरखणें; examine with reference to condition,

value, &c. पाहणें, तपासणें; measure land, &c. पैमाशी क., जमीन मोजणें.—*n.* पाहणें *n*, टेहळणी *f*, अवलोकन *n*; पाहणी *f*, तपासणी *f*; पैमाशी *f*, जमीनमोजणी *f*. -ING जमीन मोजण्याची विद्या *f*. -OR पाहणारा, चौकसनीस; जमीन मोजणारा, 'सर्वेयर.'

SURVIVE *v.* (*vivere*, to live) मागें -पाठीमागें जगणें -वांचणें.—*i.* जगणें, वांचणें, टिकणें. —SURVIVAL मागें वांचणें *n*.—SURVIVOR मागें वांचणारा; *Law* उत्तराधिकारी.

SUSCEPTIBLE *a.* (-*capere*, to take) ग्राहक, ग्रहणसमर्थ; tender कोमळ, कोंवळा;—as of disease or injury गोडा, दुबरा, कोंवळा [of, to].—SUSCEPTIBILITY ग्राहकत्व *n*, ग्रहणशक्ति *f*.

SUSPECT *v.* (-*specere*, to look) imagine to exist कल्पना क.; imagine to be guilty upon slight evidence or without proof वहीम -अंदेशा येणें; doubt संशय -भ्रांति असणें [of, for].—SUSPICION वहीम, वहमा; सशंय, भ्रांति *f*.—SUSPICIOUS *a.* संशयखोर, संशयी; indicating suspicion संशय आणणारा, वहिमाचा, संदेहजनक; doubtful शंकित, साशंक; liable to suspicion संशय येण्याजोगा, संदेहशील.

SUSPEND *v.* (-*pendere*, to hang) टांगणें, लोंबत ठेवणें; make to depend ठेवणें, गुंतवणें, अडकवणें: God hath *suspended* the promise of eternal life on the condition of faith and obedience; cease for a time तहकूब -महकूब क., थांबविणें; hold in a state undetermined तरंगत -मोहगम ठेवणें; debar from any privilege, from the execution from an office, or from the enjoyment of income तूर्त कामावरून -अधिकारावरून दूर क., अमानत ठेवणें, 'सस्पेंड' क.; to s. respiration दम कोंडणें -छाटणें [from, for].—SUSPENSE दुग्धा *f*, अनिश्चय; तहकुबी *f*, महकुबी *f*.—SUSPENSION टांगणें *n*, लोंबत ठेवणें *n*; तहकूब क., ठेवणें *n*, तहकुबी *f*; अमानत क. *n*, अमानती *f*.

SUSTAIN *v.* (-*tenere*, to hold) धरणें, संभाळणें; support पोसणें, पाळणें; suffer सोसणें, भोगणें; sanction मंजूर -कबूल क.: the court *sustains* the action; prove खरा -स्थापित क. [by, in].—SUSTENANCE उपजीविका *f*, अन्न *n*, पोटगी *f*, भक्ष.—SUSTENTATION संभाळ; आश्रय; अन्नसामोग्री *f*.

SUTLER *D.* फौजेबराबर चालणारा वाणी, लष्करी बनिया, *Hind*.

SUTURE (*suere*, *sutum*, to sew) शिवणें *n*; seam शिवण *f*, संधि, चाळा;—of the cranium कपालसंधि, चाल *f*.

SWAB *D.* बोळा *f*.—*v.* बोळ्यानें झाडणें -साफ क. -पुसणें [up].

SWADDLE* *v.* गुंडाळणें, लपेटणें [up].—SWADDLING-CLOTH बाळंतें *n*.

SWAGGER* *v. i.* मोठाल्या गोष्टी सांगणें, तोरा मिरवणें, ताल तोडणें [about, in, off].

SWALLOW* पाकोळी *f*? निळवी?

SWALLOW* *v.* take into the stomach गिळणें, ग्रासणें; absorb खाणें, गडप क., जिरवणें; up, receive implicitly अविचारानें -डोळे झांकून खरा मानणें -घेणें; गिळणें, उतरणें; appropriate खाणें, गिळंकृत क., डल्ला मारणें; occupy आटोपणें, व्यापणें (time); consume, खर्चणें; engage completely ग्रासणें, वेढणें, गडप क.; —words, letters, &c., in speaking खाणें [up].—*n.* throat अन्नमार्ग, गळा; voracity खादाडपणा; as much as is or can be swallowed at once घोट, बकाणा. -WORT मांदारवृक्ष, अर्क; gigantic s. रुई *f*.

SWAMP* दलदल *f*, पाणथळ *f*, रुतण *f*.

SWAN* राजहंस.

SWARD* गवती जमीन *f*.

SWARM* (*Skr. swar*, to sound) large number of small animals or insects घुंगट *n*, पेंव *n*, लोळ, थवा; any great number झुंड *f*, समुदाय, टोळी *f*, [with].—*v. i.* घोंघों क.;—bees, flies घूंघूं क., गोंगावणें; throng and move busily बुचबुचणें, लसलसणें, सुळसुळाट क. (maggots, fleas, &c.); be thronged गजबजणें, गजगजीत असणें, पेंव फुटणें.

SWARTHY* *a.* काळसर, काळवट.

SWATH*, line of grass or grain cut by the scythe in mowing पात *f*.

SWATHE* *v.* गुंडाळणें, लपेटणें, वेष्टणें [with, in].—*n.* वेष्टण *n*, लपेटणें *n*.

SWAY *v. D.* wield with the hand पेलणें, तोलणें, वहिवाटणें, चालवणें; govern अमल -अधिकार क.; cause to incline झोंक देणें, कल देणें, मन वळवणें [with, over, by].—*i.* have weight कल -तोल -भार असणें -पडणें; lean कलणें, झुकणें.—*n.* वजन *n*, भारदस्ती *f*; अमल, अधिकार; कल, झोंक.

SWEAR* *v. i.* utter an oath शपथ वाहणें -घेणें; *Law*, give evidence on oath शपथेवर साक्षी देणें; use the name of God profanely देवाचें नांवानें व्यर्थ शपथ वाहणें, देवाचें नांव व्यर्थ घेणें.—*t.* शपथ घालणें -घेणें; शपथ घेऊन साक्षी ठेवणें [into, to, at].

SWEAT* (*Skr. svedas*) moisture excreted from the skin घाम, घर्म; moisture issuing from any substance पाझर, निचरा, तेल *n*; toil कष्ट, मेहनत *f*, घाम.—*v. i.* घाम येणें -सुटणें;—copiously डगडगणें, दरारणें; निचरणें, पाझरणें, रेळणें; काबाडकष्ट -घाम येईतों काम क., हाडांचें मणी-रक्ताचें पाणी क.—*t.* घाम आणणें, स्वेदन क.; पाझरविणें; [to s. coin, remove a portion of a piece of coin, as by shaking it in a bag, so that the friction wears off some of the metal, and so that the diminution of the value is not readily perceived].

SWEEP* *v.* clean by brushing झाडणें, केर काढणें; carry along or off by a long brushing stroke or force वाहवणें, लोटून नेणें: a flood *sweeps* away a bridge; carry off many at a stroke सप्पा उडवणें, घोशा पाडणें, झाडून नेणें; observe rapidly, as parts of a surface वरवर पाहणें, नजर चाळवणें [out, from, up, with].—*i.* सपाट्यानें चालणें -जाणें; pass with pomp डौलानें मिरवणें, मिरवत जाणें.—*n.* झपाटा, झटकारा; compass of a stroke अटोका, पोंहोंच *f*: a long s.; sweeper झाडू, झाडूवाला; large oar पतिंगा. -ER झाडणारा; झाडू, भंगी, हलालखोर. -INGS *pl.* गदळ, गाळ.

SWEET* *a.* saccharine साखरेचा, गोड, मिष्ट; fragrant सुवासिक, मधुर (odor); melodious सुस्वर, गोड, मधुर (voice); beautiful सुंदर, प्रसन्न (face); not salt गोड, गोडा, मिठा (water); not stale ताजा (butter); soft मऊ; obliging बोलून चालून गोड, उपकारी (manners).—*n.* गोड पदार्थ; *pl.* मिठाई *f*; सुख *n*, गोडी *f*: the *sweets* of domestic life; a darling जीवप्राण, प्राणसखा. -EN *v.* गोड क. [with].—*i.* गोड होणें. -FLAG वेखंड *n*. -GUM TREE, the balsam शिलारस. -HEART प्रिय, प्यार. -ISH *a.* गोडसर. -MEAT मिठाई *f*, खाऊ. -NESS गोडी *f*, मिष्टपणा, माधुर्य *n*; गोडीगुलाबी *f*, सौजन्य *n*. -POTATO,—the plant रताळी *f*; —the root रताळूं *n*. -ROOT जेष्ठिमद *f*. -SCENTED *a.* सुवासाचा, सुवासिक. -SOP शिताफळा सारखें एक फळ आहे.

SWELL* *v. i.* grow larger सुजणें, फुगणें, वाढणें;—as a river फुगणें, तुंबणें, फुगा येणें; —with anger फुगणें;—with pride फुगणें, चढणें, ताठणें;—with grief उमासा येणें; heave खळबळणें, उसळणें (billows); be enlarged वाढणें, जमणें, चढणें (debt); be turgid फुगणें, ताठणें, तमतमणें (words)

—*t.* सुजवणें, फुगारा आणणें; फुगवणें, तुंबवणें; चढवणें, माजवणें; फुगवणें, वाढवणें [up, with].—*n.* सूज *f*, फुगारा; हुंडका, उमाळा; नदी वगैरेचा फुगा; खळबळाट. -ING सूज *f*; हुंडका, उसासा, उमाळा; फुगारा, फुगवणी *f*.

SWELTER* *v. i.* उबणें, डगडगणें.

SWERVE *v. i. D.* चळणें, भकणें [from, to].

SWIFT* *a.* rapid चपळ, जलद; ready तयार, सिद्ध; speedy जलदीचा. -FOOT *a.* जलद चालणारा, पायसूट. -LY *ad.* जलदी, जलदीनें, लवकर, त्वरेनें. -NESS जलदी *f*, चलाखी *f*, त्वरा *f*.

SWIM* *v. i.* float तरणें, तरंगणें; move progressively in water by means of the hands and feet, or of fins पोहणें, पोहून जाणें; be dizzy भोंवणें, फिरणें, तिरमिरणें: the head *swims*; be overflowed जलमय होणें, पाण्यानें भरणें, पोहणें: the earth *swims* in rain; abound रेलचेल असणें, न्हाणें, पोहणें: they now s. in joy.—*t.* पोहणें, पोहून जाणें; immerse in water that the lighter parts may swim बुडविणें: to s. wheat for seed; cause or compel to swim पोहून नेणें, पोहायास घालणें: to s. a horse across a river. -MER तरंगणारा, पोहणारा. -MING तरंगणें *n*; पोहणें *n*; घेरी *f*, तिरमिरी *f*. -LY *ad.* तडाख्यानें, धडकून.

SWINDLE *v. D.* उपटणें, मुंडवणें, धुतारणें [out, of].—SWINDLER धुतान्या, उपट्या, उचल्या.

SWINE* डुकर *n*.

SWING* *v.* vibrate झोका घेणें -खाणें; practice swinging झोपा घेणें -खेळणें.—*t.* झोपा काढणें, झोंके देणें; फिरवणें, खेळवणें, हालवणें: he *swings* his tail.—*n.* झोका, झेंप *f*, आंदोलन *n*;—as of a whip झपाटा, फटकारा, झटका; swinging line, seat, bed, &c. झोंपाळा, चौफाळा;—as erected at fairs रहाट पाळणा;—to swing devotees बगाड *n*; bent वेग, ओघ, भर; free अस्खलित गति *f*.

SWISS *F.* स्विट्झरलंड देशचा राहणारा; स्विस् भाषा *f*.—*a.* स्विट्झरलंड देशचा; स्विस् लोकांचा.

SWITCH* डाहळी *f*, छडी *f*, शिपटी *f*.—*v.* छडीनें मारणें.

SWIVEL*, a ring which turns upon a pin फिरकी *f*; a small cannon which turns in a socket फिरकीची तोफ *f*, जेजाल *f*.

SWOON* मूर्च्छा *f*, कलम *f*.—*v. i.* मूर्च्छा येणें [away].

SWOOP (See SWEEP) झेंप *f*, झडप *f*.—*v.* झडप घालणें; catch up झेलणें; take with a sweep झेंप घालून घेणें [away, up].

SWORD* तलवार *f*, खड्ग *n*; belt of a s. पडदळें *n*; hilt of a s. परज *n*. -BLADE तलवारीचें पान *n*. -FISH एक जातीचा मत्स्य आहे. -LAW तलवारीचा अंमल; जबरीचा अंमल, जुलूम. -PLAYER पट्टा खेळणारा. -SMAN तलवार बाळगणारा; तलवारबहादूर.

SYCAMORE *Heb.* अंजिराच्या जातीचा एक मोठा वृक्ष आहे.

SYCOPHANT (*Gr. sukon*, a fig, *phainein*, to show) आर्जवी, खुशामती.—SYCOPHANCY आर्जव, खुशामत *f*.

SYLLABLE (*syllaba*) अक्षर *n*.—SYLLABIC *a.* अक्षरसंबंधी, अक्षराचा.—SYLLABUS सारांश, गोश्वारा, सार *n*.

SYLLOGISM (*syllogismus*) *Logic* अवयवघटित वाक्य *n*.—SYLLOGISTIC *a.* अवयवघटित वाक्याचा -संबंधी.

SYLVAN *a.* (*silvea*, *sylva*, a wood) रानटी, जंगली, वन्य; woody अरण्यमय, वृक्षमय, —*n.* वनदेवता *f*.

SYMBOL (*symbolus*) sign चिन्ह *n*, निशाणी *f*, खूण *f*; a letter which is significant अर्थसूचक अक्षर *n*; summary of the articles of religion धर्मसिद्धांतसार *n*. -IC, -AL *a.* खुणेचा, लाक्षणिक, सांकेतिक, प्रदर्शक, रूपक.

SYMMETRY (*Gr. sun*, with, *metron*, measure).

आकारशुद्धि *f*, अंगसंयोग, वळणशुद्धपणा.—SYMMETRICAL *a*. आकार -वळणशुद्ध, साखसुरत, सुभट.

SYMPATHY (*Gr. -pathos*, suffering) conformity of temperament प्रकृतीचा सारखेपणा, प्रकृतिसाम्य *n*, साधर्म्य *n*; commisseration दुसऱ्याचें दुःख -दरद जाणणें *n*, कळवळा. [with].—SYMPATHETIC, -AL *a*. समदुःखी. —SYMPATHIZE *v. i.* दुसऱ्याचें दुःख जाणणें, कळवळा येणें; समगुण -साधर्म्य असणें [with].

SYMPTOM (*Gr. ptoma*, a fall) खूण *f*, लक्षण *n*, चिन्ह *n*; *Med.* लक्षण *n*.

SYNAGOGUE (*Gr. sun*, with, *agein*, to lead) a congregation of Jews met for the purpose of worship यहुदी लोकांची भजनसभा *f*; a place where the Jews meet for worship यहुदी लोकांची मशीद *f*, -चें भजनालय *n*, -सभास्थान *n*.

SYNCOPE (*L.*) *Gram.* मधल्या अक्षराचा लोप; *Med.*, a fainting fit मूर्च्छा *f*, मूर्च्छना *f*, कलम *f*.

SYNECDOCHE (*L.*) *Rhet.*, a figure or trope by which the whole of a thing is put for a part, or a part for the whole, the genus for the species or the species for the genus लक्षणा *f*.

SYNOD (*Gr. -hodos*, a way) सभा *f*, मजलस *f*; धर्मप्रकरणी सभा *f*, धर्मव्यवस्थापक सभा *f*.

SYNONYME (*Gr. onoma*, name) पर्याय शब्द, उपशब्द.—SYNONYMOUS *a*. एकार्थक.

SYNOPSIS (*Gr. -opsis*, a sight) गोश्वारा, सारांश; तक्ता, पत्रक *n*.

SYNTAX (*Gr. -tassein*, to put in order) *Gram.* वाक्यरचना *f*, पदयोजना *f*.

SYNTHESIS (*Gr. -thesis*, a placing) the putting of two or more things together, as in compound medicines संयोजन *n*, मीलन *n*, एकीकरण *n*; *Chem.*, the uniting of elements to form a compound तत्वांचें एकीकरण *n*, तत्त्वमीलन *n*; [*Logic*, the combination of separate elements of thought into a whole, as of simple into complex conceptions, species into genera, individual propositions into systems]; [*Surg.*, the operation by which divided parts are united].

SYRINGE (*Gr. surinx*, pipe) पिचकारी *f*, चिपनळी *f*.—*v*. पिचकारी मारणें; wash and cleanse by injection from a syringe पिचकारीनें धुणें -साफ क.

SYRUP, See SIRUP.

SYSTEM (*Gr. sun*, with, *histemi*, to place) scheme बेत, व्यवस्था *f*; method क्रम, पद्धत *f*, परिपाठ; totality of parts in the body, performing the same or an analogous or a connected function देहप्रकृति *f*, प्रकृति *f*, भाव, शरिर *n*. -ATIC, -AL *a*. बेताचा, व्यवस्थित; सृष्टिक्रमाचा. -ATIZE *v*. क्रम बांधणें -लावणें, व्यवस्था क. -ATIST व्यवस्था करणारा -लावणारा.

SYSTOLE (*Gr. -stellein*, to set) contraction of the heart and arteries for expelling the blood and carrying on the circulation हृत्पिंडसंकोच; *Gram.* दीर्घ अक्षर ऱ्हस्व करणें *n*.

T

TABASHEER *Per.* तबकीर *n*.

TABBY *a. Per.* बांडा, कसरा.—*v*. बांडा रंगवणें.

TABERNACLE (*taberna*, a shed, or hut) a slightly built or temporary habitation छप्पर *n*, खोपी *f*, मांडव इ० ; a tent तंबू, राहुटी *f*; *Jewish antiq.*, a portable structure of wooden framework covered with curtains, which was carried through the wilderness in the Israelitish exodus as a place of sacrifice and worship मंडप; a place of worship भजनालय *n*.—*v*. राहणें, वस्ती क.: Christ *tabernacled* in the flesh.

TABLE (*tabula*, a board) पाटी *f*;—of metal

पत्रा; inscription कोरींव लेख, ताम्रपट, शिलालेख इ०; synopsis तक्ता, पत्रक *n*; *Math.* कोष्टक *n*; an article of furniture चवरंग, मेज *n*, 'टेबल' *n*; entertainment भोजन *n*, जेवण *n*, मेजवानी *f*; company assembled round a table पंगत *f*, भोजनमंडळी *f*; the board on which draughts is played पट; the game itself सारीपाट;—of a hill पठार *f*, तबकडी *f*; *Astron.* कुंडली *f*, the Lord's t. प्रभुभोजन *n*; to serve *tables* गरिबांस अन्न देणें -वांटणें; to turn the *tables* कालचक्र फिरवणें; t. expenses भोजनखर्च.—*v.* पत्रक -तक्ता क. -CLOTH मेजावरची चादर *f*, 'टेबल क्लाथ' *n*. -LAND डोंगरसपाटी *f*, माची *f*, पठार *n*, संथळ *n*. -SPOON मेजावरचा चमचा -ची पळी *f*.—TABLET, a small table लहान मेज *n*, बाजवट *n*; a flat surface for writing, engraving on पाटी *f*, पत्र *n*; *pl.* a kind of pocket memorandum book खिशांत ठेवायाची स्मरणवही *f*; a medicine in square form औषधाची वडी *f*.—TABULAR *a.* पत्रकाच्या -तक्त्याच्या तऱ्हेचा, तक्त्याच्या आकाराचा; तक्त्यांत मांडलेला.

TABOR *Ar.* मृदंग, पखवाज, तबला.—*v. i.* मृदंग वाजविणें. -INE खंजिरी *f*.

TACHYDROMUS ASIATICUS (*Gr. tachus*, fast, *dromos*, a running) a bird पोरचाळवणी *f*.

TACIT *a.* (*tacere*, to be silent) अर्थसिद्ध, ध्वनित, फलित. -LY *ad.* अर्थात, उगाच राहण्यानें. -URN *a.* अबोल्या, मौना, अल्पभाषी; t. person मुकाह्मसोबा, मुक्की मण्यार *f*. -ITY अबोलेपणा, मौन्य *n*.

TACK *D.* a small, short, sharp-pointed nail चूक *f*, गुलमेख *f*.—*v.* टांचे -टांके मारणें; fasten जोडणें, जडणें; change the course of, as a ship हेरे घेणें, वाली येणें [to, up, on, together] -LING, cordage दोरखंडें *n pl*, दोर; harness सामान *n*, सरंजाम.

TACT (*tangere*, to touch) युक्ति *f*, कसब *n*, छाप *f*, शिताबी *f*. -IC,-AL *a.* कवाईतीचा.—*n. pl.* कवाईत *f*, सैन्यरचनेची विद्या *f*. -ILE *a.* स्पर्श करायाजोगा, स्पर्शनीय, स्पर्श्य.

TADPOLE (*pullus*, a young animal) बेडकीचें पोर *n*, बेडकुली *f*, बेंडकुळी *f*.

TAFFETA *Per.* तापता.

TAIL*, the part of an animal which terminates the body behind शेंपूट *n*, पुच्छ *n*; the back, lower, or inferior part of anything शेवट, शेव; anything hanging long शेंपूट *n*, शेंडी *f*; a train of attendants जिलीब *f*, लवाजिमा, शेंपूट *n*; a downy appendage to certain seeds तुरा; the t. of a comet धूमकेतूचें पुच्छ *n*; -ची शेंडी *f*; to turn t. मुठींत नाक धरणें, शेंपूट खालीं घालणें; to bristle up the t. शेंपूट फिदारणें; to hang at the t. कासेस लागणें, दुमची पुरवणें.

TAILOR *F.* शिंपी, दरजी. -BIRD a species of— सुगरण *f*.

TAINT *v.* (*tingere*) stain कलंक लावणें, दूषित क.; corrupt बिघडणें, खराब क.; infect रोग लावणें; imbue, as with some extraneous matter which alters the sensible qualities of the substance विजातीय पदार्थ घालून गुण बदलणें [with].—*i.* दूषित होणें बिघडणें; लागणें, नासणें (meat).—*n.* दोष, विटाळ, बाध; कलंक, काळें *n*, काळवटी *f*. -ED दूषित; रोगन दिलेला -लावलेला;—as meat लागरा, लागट, लागलेला; कलंक लावलेला, सकलंक.

TAKE* *v.* lay hold of धरणें, पकडणें; obtain possession of by force घेणें, सर्र क., जिंकणें (a city); charm मोहणें, मोहित क. (Prov. vi. 25); elect निवडणें, निवडून घेणें: the sparrow *takes* a bush; require लावणें, लागणें, खाणें, घेणें: it *takes* so much cloth to make a coat; this man always *takes* time before he passes his judgmen

picture तसबीर काढणें -उतरणें; assume आपणावर घेणें : *I take* the liberty to say; accept घेणें, स्वीकारणें, ग्रहण क.; partake of घेणें, खाणें, पिणें, सेवन क. (food, a glass of wine); leap उडी मारून जाणें, उडणें (a fence); submit to ग्रहण क., मान्य होणें, वश होणें; endure सोसणें (a joke); allow कबूल क., मानणें : to t. a thing for granted; this I t. to be the man's motive; to t. men for spies; receive घेणें, खाणें, मारणें; to t. well गोड करून घेणें;—as breath, leave, revenge, &c. घेणें; to t. advantage of एकाएकीं गांठणें; सवड साधणें; to t. aim नेम धरणें; to t. air फुटणें, बाहेर पडणें, षट्कर्णी होणें; along नेणें;—arms हत्यारें घेऊन उठणें, लढाईस उठणें; away नेणें, घेऊन जाणें, हिरावणें, हरवणें;—breath थांबणें, दम -विसांवा घेणें;—care संभाळणें, जपणें;—care of पाहणें, देखरेख क., दिमतींत असणें;—down कमी क.; उतरणें, काढणें (pride); गिळणें, घेणें, पिणें (a potion); लिहून -टिपून -टांचून ठेवणें, मांडणें (a man's words); हल्ला क., -चढून जाणें;—effect लागू होणें, -गुण क.;—fire पेटणें, आग लागणें; from -पासून हरण क.; -चें घेणें; बाद -वजा क.; कमी -उणा क.; [-ground to the right or left, *Mil.*, to extend the line to the right or left];—heart मन मिळवणें; धीर धरणें, धीर -दिलासा मिळणें;—heed संभाळणें, जपणें, सावध असणें;—heed to संभाळणें;—hold of धरणें, पकडणें;—horse स्वार होणें, घोड्यावर बसणें; in कोंडणें, कुडणें; फसवणें; घोटाळ्यांत पाडणें; उमजणें, समजणें; गुंडाळून बांधणें, वळकटी -सुरळी क. (a sail); घेणें, आंत घेणें : a leaky vessel will t. in water; घेणें, वेळच्या वेळेस घेणें -पावणें (a newspaper);—in hand हातीं घेणें -धरणें;—in vain व्यर्थ बोलणें -घेणें (Ex. xx. 7.);—leave निरोप -आज्ञा घेणें;—notice पाहणें, लक्ष देणें; चर्चा क., बोलणें;—oath शपथ घेणें; off काढणें, उतरणें (a load); काढणें (one's hat); कापणें, कापून काढणें (a limb); नाश क., प्राण घेणें (life); व्यर्थ -रद्द क., खोडणें (the force of an argument); परत घेणें -बोलावणें; अंग काढणें; पिणें, घेणें (a glass of wine); विकत घेणें, खरेदी क.; नकल -ठाकी उतरणें (models); नक्कल क., सोंग आणणें, बतावणी क.; on अंगावर घेणें, -वर घेणें (responsibility); सोंग घेणें;—one's own course आपल्या इच्छेप्रमाणें चालणें -क.; out बाहेर काढणें, काढणें; वेगळा क.; वजा क.; काढणें, साफ क. (a stain from cloth);—a paper, &c. वर्गणीदार होऊन घेणें, घेणें;—part वांटून घेणें, विभागून घेणें; part with -शीं मिळणें;—place घडणें, घडून येणें, होणें; लागू होणें;—root रुजणें, मूळ धरणें; मुळावणें, स्थापित होणें;—sides पक्ष -बाजू धरणें;—the air वाऱ्यावर फिरणें, हवा खायास जाणें;—the field लढाईस जाणें, लढाई चालू क.;—to heart मनास लागणें, मनावर घेणें; up उचलणें; विकत घेणें; उसनें घेणें; उधार घेणें (goods); चालू क.; *Surg.* पट्टीनें बांधणें, पट्टी बांधणें; घेणें, खाणें, गुंतवणें (time); धरणें, पकडणें (a thief); कबूल क., विश्वासणें; निषेध क., कान उघडणें; झेलणें, धरणें; व्यापणें, वेढणें, अटपणें, घेणें, गुंतवणें (room); उचलणें, पत्करणें, हातीं धरणें आदरणें, पत्करणें (practice, opinion); लागणें, घेणें : this dictionary has *taken* up six years; पक्ष -कैवार घेणें, कर बसविणें; देणेंघेणें क., व्यवहार क. : to t. up a note at the bank; up arms लढाई चालू क., लढूं लागणें;—upon one's self आपणावर घेणें, पत्करणें; आपल्या कामीं लावणें; आपणास लावून घेणें, आपल्यावर घेणें (punishment).—*i.* fix or be fixed जडणें, लागणें, लागू होणें : the infection did not t.; gain reception चालणें, पटणें, मान्य

होणें: if the thing should t.; go जाणें, येणें: the fox *took* to the hedge; after मागून जाणें, अनुसरणें, वळण घेणें; सारखा असणें, वळणावर -मोडणीवर जाणें; in with आश्रय धरणें; on सोंग घेणें; to सोकणें, सोकावणें; up वाटणें.—*n.* the quantity of fish captured at one catch एका खेपेस धरलेले मासे *pl*; [*Print.*, the quantity of copy taken in hand by a compositor at one time].—TAKING घेणें *n*, स्वीकार, ग्रहण *n*; धरणें *n*, अपहार; agitation तळमळ *f*, त्रेधा *f*, गडबड *f*.

TALC *Ar.* अभ्रक; calx of t. अभ्रक भस्म *n*; yellow t. पिंवळा अभ्रक.

TALE*, story गोष्ट *f*, कथा *f*, कहाणी *f*; reckoning गणती *f*, माप *n*, हिशेब; to be as a t. that is told नक्कल होणें; with full t. फडाचे मापानें, भरमापानें. -BEARER चुगल्या, चुगलीखोर, चहाड.

TALENT (*Gr. talanton*, a balance, *Skr. tul*, to bear, weigh) साडेसव्वीस शेरांचें एक वजन आहे; २४३७॥ रु० च्या किंमतीचा तोडा -नाणें *n*; intellectual ability गुण; *pl* बुद्धि *f*, अक्कल *f*, प्राज्ञा *f*. -ED गुणी, बुद्धिमान.

TALISMAN *Ar.* ताईत, कवच *n*, पत्र *n*.

TALK *v. Sw.* speak freely बोलणें: to t. French; speak बोलणें, भाषण क.: to t. nonsense; consume in talking बोलण्यांत खर्चणें -गमावणें -दवडणें: to t. away an evening; over -विषयीं बोलणें (a matter).—*i.* बोलणें, गोष्ट क.: I will not t. with you; confer बोलणें, मसलत क.; prate वटवट -बडबड क., बकणें; of सांगणें, कथन क.; to बुद्धिवाद सांगणें, कान झाडणें, चार गोष्टी सांगणें -बोलणें: I will t. to my son respecting his conduct [about, of, with, to].—*n.* गोष्टी *f*, वार्ता *f*, संभाषण *n*; rumour गप *f*, बोलवा *f*; subject of discourse गोष्ट *f*, चर्चा *f*: this achievement is the t. of the whole town. -ATIVE *a.* बोलका, बहुभाष, वाचाळ, चावट. -ER बोलणारा, संभाषणकर्त्ता; वक्ता; वटवट करणारा, बडबड्या; mere t. तोंडचा शिपाई.

TALL *a. W.* उंच, उंच काठीचा -बांध्याचा.

TALLOW* चरबी *f*. -CANDLE चरबीची मेणबत्ती *f*. -CHANDLER चरबीच्या मेणबत्त्या विकणारा.

TALLY *F.* a stick with notches to mark numbers हिशेब ठेवण्या करितां खांडे पाडलेलें लांकूड *n*, सळई *f*; a match जोड, जवा.—*v. i.* जमणें, उतरणें, जुवा बसणें -मिळणें.—*t.* जमविणें, बसविणें [with].

TALLON *F.* पंजा, नख *n*.

TAMARIND *Ar.* the tree and fruit चिंच *f*.

TAMBOURINE *F.* डफ *n*, टमकी *f*, तंबुरी *f*.

TAME* *a.* domesticated माणसाळलेला, पाळलेला, पाळीव, ग्राम्य; subdued जिंकलेला; spiritless लेचापेचा, मेंगा, नामर्द; flat पचपचीत, पळपळीत (poem)—*v.* माणसाळणें, सवयीचा क.; वश क., वठणीस आणणें. -LY *ad.* नामर्दपणानें, मेंगेपणानें: to submit t. to oppression.—TAMABLE *a.* माणसाळावयाजोगा, वश करायाजोगा, वश्य.

TAMPER* *v. i.* meddle लुडबुडणें, बुचा-लांडाकारभार क.; practice secretly वळवण्या करितां -फितवण्या करितां संधान -उद्योग चालवणें [with].

TAN *v. F.* impregnate with bark कमावणें, रांपवणें, तयार क. (leather); make brown काळा क.—*i.* काळसरणें, काळवटणें (the skin). -NER कातडें कमाविणारा, ढोर, चांभार. -PIT रावणी *f*, चांभाराची कुंडी *f*.

TANGENT (*tangere*, to touch) *Geom.* स्पर्शरेषा *f*; to fly off at a t. ओझरता जाणें.—TANGIBLE *a.* स्पर्श करायाजोगा, स्पर्शायाजोगा, स्पर्शनीय; capable of being realized मिळवायाजोगा, उत्पन्न करायाजोगा; readily apprehensible by the mind सहज समजा-

याजोगा, बुद्धिगम्य, सुगम.—TANGIBILITY स्पर्शाची योग्यता *f*, स्पर्शनीयता *f*.

TANGLE, See ENTANGLE—*n*. गुतागुत *f*, गुरफाटा, गळफाटा.

TANK (*stagnum*) तळें *n*.

TANTALIZE *v. F.* torment or tease by presenting pleasures which cannot be reached छळवणें, चालवणें, झुलवणें, आशेस लावणें [with, by].—TANTALIZATION चाळवणी *f*, झुलवणी *f*.

TANTAMOUNT *a.* (*tantus*, so much, and *amount*) बरोबर, समतोल -भाव [to].

TAP *v. F.* थापटणें, थोपटणें, थाप मारणें [with, at].—*n*. थाप *f*, थापटी *f*;—of the hand, upon a tabor छाप *f*, हात, थाप *f*.

TOY *D*. plaything for children खेळणें *n*, खेळ; trifle खेळ, हलकी गोष्ट *f*; old story जुनी कहाणी *f*.—*v*. खेळणें, रमणें [with].

TRACE (*trahere*, to draw) track माग, छडा; vestige मागमूस, ठिकाणा.—*v*. follow by the track of थांग लावणें, छडा काढणें; mark out अंकणें, बेतणें; to t. letter of a copy in learning to write गिरवणें, घोटाळणें [out].

TRACHEA (*L.*) श्वासनळी *f*, नरडें *n*.

TRACK (See TRACE) माग, छडा; वाट *f*, रस्ता; —of a thing dragged, of a snake, &c. फरकंड *f*, फरपट *f*.—*v*. मार्ग काढीत जाणें; दोरीनें जहाज ओढणें [with].

TRACT (do.) region मैदान *n*, देश; short treatise अल्पप्रबंध, निबंध; a short treatise on practical religion धर्म संबंधी विषयाची चोपडी -निबंध, 'त्राक्ट' *n*; length लांबी *f*, विस्तार: t. of time. -ABLE *a*. docile हुकमी, कह्यांत वागण्याजोगा, वळण्याजोगा; feasible घडायाजोगा, साध्य.

TRADE (do.) commerce व्यापार, उदीम; occupation धंदा, व्यवहार, उद्योग; custom चाल *f*, रीत *f*, वहिवाट *f*: thy sin's not accidental, but a t.; company of men engaged in the same occupation धंदा, पेशा.—*v.i.* उदीम -व्यापार क. [for, with, in.] TRADER, TRADESMAN व्यापारी, उदमी.—TRADEWIND, a wind in the torrid zone, and often a little beyond it, which blows from the same quarter throughout the year; so called because of great advantage to navigators, and hence to trade].

TRADITION (*trans*, over, *dare*, to give) unwritten or oral delivery of opinions, doctrines, practices, rites, and customs from father to son, or from ancestors to posterity पूर्वी पासून चालत आलेलीं वाडवडिलांचीं मतें, चाली, विधि, आचार इ०, पूर्वसांप्रदाय; knowledge or belief transmitted without the aid of written memorials दंतकथा *f*; *Theol.*, that body of doctrine and discipline, or any article thereof, supposed to have been put forth by Christ or his apostles and not committed to writing ख्रिस्ताचा किंवा त्या-

चे प्रेषितांचा परंपरागत चालत आलेला उपदेश, गुरुक्रम (2 Thes. ii. 15). -AL, ARY *a.* पूर्वींपासून चालत आलेला, परंपरागत -प्राप्त. -LY *ad.* लोकालोकीं, कर्णोपकर्णी, परंपरेनें.

TRADUCE *v.* (*trans*, across, *ducere*, to lead) तुफान -तोहमत -आळ घेणें -घालणें.

TRAGEDY (*Gr. tragos*, a goat, *odé*, a song, either from the oldest tragedies being exhibited when a goat was sacrificed, or because a goat was the prize, or because the actors were clothed in goatskins) a drama that has a fatal issue दुःखपरिणामक नाटक *n*; a fatal and mournful event दुःखपरिणामक गोष्ट *f.*—TRAGICAL *a.* दुःखपरिणामक नाटक संबंधी; दुःखपरिणामक, दुरंत, दुःखाच्या शेवटाचा, ज्याचा शेवट दुःखानें होतो किंवा झाला असा.

TRAIL *v. D.* draw along the ground फरपटीत नेणें -ओढणें; tread down, as grass, by walking through चालतांना पायांखालीं तुडवणें, तुडवणें [along].—*i.* फरफटत जाणें; grow to great length, esp. when tender and creeping upon the ground, as a plant जमिनीवर वाढत जाणें, ताणा वाढणें.—*n.* ओढ *f*, फरकांडा; scent left on the ground by the animal pursued वास, वासाचा माग.

TRAIN (*traha*, a drag) that which draws along ओढण *f*; trap सांपळा; that which is drawn along ओढ *f*;—of a gown गोशा, झोळ, घोळ; tail of a bird सोगा; retinue जिलीब *f*, स्वारी *f*, खटलें *n*; series माळ *f*, शेज *f*, रांग *f*: the t. of ills; process अनुक्रम, पर्यायक्रम; line of gunpowder, laid to lead fire to a charge दारूची ओळ *f*, रंजक *f*; connected line of carriages on a railroad तांडा, कतार *f*, 'ट्रेन' *f*;—of artillery तोफखाना, तोफा *f pl*; t. of reasoning तर्कप्रबंध.—*v.* draw along ओढणें, फरफटणें; allure मोहणें; discipline शिकवणें, वळण लावणें; break, as oxen पेटविणें, वठणीस -वळणीस आणणें; up शिकवणें, वळण लावणें;—a horse, &c. शिकवणें, तालीम देणें. -ING शिक्षा *f*, अनुनयन *n*; वठवणें *n*, पेटवणी *f*.

TRAIT (*trahere*, to draw) mark लक्षण *n*, चिन्ह *n*; touch कसब *n*, हात, वस्तादी *f*.

TRAITOR (*tradere*, to betray) one guilty of treason राजद्रोही, फितुरी माणूस, फितूर; betrayer विश्वासघातकी. -OUS *a.* राजद्रोही; विश्वासघातकी; विश्वासघाताचा, दगलबाज.

TRAMMEL *F.* जाळें *n*, पाश; a kind of shackles used for regulating the motions of a horse, and making him amble खोडा, लोंढणें *n*, बेडी *f.*—*v.* अडकविणें, पायांत खोडा घालणें -गुतवणें [with, by].

TRAMP *v. D.* tread तुडविणें; cleanse, as clothes, by treading upon them in water कुचलून धुणें.—*i.* पाय झिजवणें, धांवाधांव क. —TRAMPLE *v.* तुडवणें, मर्दणें, खुंदलणें [down, under, on, upon].

TRANCE (*trans*, across, *ire*, to go) state in which the soul seems to have passed out of the body into another state of being, or to be wrapt into visions समाधि *f*, तन्मयावस्था *f*, देहातीत वृत्ति *f*; *Med.*, catalepsy फेंपरें *n*, अपस्मार.

TRANQUIL *a.* (*tranquillus*) स्वस्थ, शांत. -IZE *v.* स्वस्थ -शांत क. [by, with]. -ITY शांतपणा, शांति *f*, स्वस्थता *f*, निरुपद्रवता *f*.

TRANSACT *v.* (*trans*, across, *agere*, to act) करणें, वाहिवाटणें, चालवणें. -ION वहिवाट *f*, आचरण *n*, निर्वाह; affair गोष्ट *f*, कार्य *n*, काम *n*; *Law*, adjustment of a dispute between parties by mutual agreement आपसांत तोडजोड *f* -समजी *f*.

TRANSCENDENT, -AL *a.* (*-scandere*, to climb) वरिष्ठ, श्रेष्ठ, उत्कृष्ट; going beyond the bounds of human knowledge मनुष्यज्ञानाच्या पलीकडचा, अमानुष.

TRANSCRIBE *v.* (*-scribere,* to write) प्रत क., नक्कल उतरणें [from, to].—TRANSCRIPT नक्कल *f,* प्रत *f.*

TRANSFER *v.* (*-ferre,* to bear) एका जाग्यापासून दुसऱ्या जाग्यावर नेणें, स्थलांतर क., बदली क., बदलणें; make over the possession of सोंपणें, हवालणें, स्वाधीन क.; remove from one substance to another एका पदार्थावरून दुसऱ्यावर नेणें -उतरणें: to t. drawings to a lithographic stone [from, to]. -ABLE *a.* स्थलांतर करण्याजोगा, बदलण्याजोगा; negotiable एका पासून दुसऱ्यास देण्याजोगा, व्यवहार्य.

TRANSFIGURE *v.* (*-figurare,* to, from) रूप बदलणें, रूपांतर क.—TRANSFIGURATION रूप पालटणें *n,* रूपांतर *n.*

TRANSFIX *v.* आरपार भोसकणें -टोंचणें, वेधणें [with].

TRANSFORM *v.* रूपांतर क.; transmute द्रव्यांतर क.: to t. lead into gold; *Theo.,* change the disposition and temper of, from a state of enmity to God and his law into the image of God, or into a disposition and temper conformed to the will of God पापी स्वभाव बदलणें, पवित्र क. (Rom. xii. 2); [*R. C. Ch.,* change, as the elements, bread and wine, into the flesh and blood of Christ]; among the mystics, change, as contemplative soul, into a divine substance, by which it is lost or swallowed up in the divine nature ईश्वरी तत्वांत मिळवणें, ब्रह्मरूप क.; सरूपता -मुक्ति देणें; *Math.* रूप देणें [from, to]. -ATION रूपांतर इ० क.; रूपांतर *n*; द्रव्यांतर *n*; स्वभावांतर *n,* नवा स्वभाव होणें *n,* पवित्रीकरण *n.*—See the verb.

TRANSFUSE *v.* pour, as liquor, out of one vessel into another एका पात्रांतून दुसऱ्या पात्रांत ओतणें; *Med.,* transfer, as blood, from the veins or arteries of one animal to those of another एका प्राण्याच्या शिरांतील रक्त दुसऱ्याच्या शिरांत नेणें -घालणें [from, to].

TRANSGRESS *v.* (*gradi,* to pass) उल्लंघणें, ओलांडणें, अतिक्रम क. [in].—*i.* हुकूम -आज्ञा मोडणें -तोडणें. -ION उल्लंघन *n,* अतिक्रमण *n,* अतिक्रम. -ER मर्यादा उल्लंघणारा, मर्यादेचें अतिक्रम करणारा; अपराधी, अन्यायी: the way of the t. is hard (Prov. xiii. 15).

TRANSIENT *a.* (See TRANCE) fleeting थोडा वेळ राहणारा, क्षणिक, चंचल; imperfect अपूर्ण.—TRANSIT आरपार जाणें *n*; *Astron.* क्रांति *f,* संक्रमण *n*; conveyance नेणें *n*: t. of goods through a country. -DUTY रहदारी *f,* जकात *f.*—TRANSITION संक्रमण *n,* संक्रांति *f*; स्थलांतर *n.*—TRANSITIVE *a.* सकर्मक.—TRANSITORY *a.* क्षणभंगुर, क्षणिक, चंचल.

TRANSLATE *v.* (See TRANSFER) स्थलांतर क., जागा पालट क.; cause to remove from one part of the body to another शरिराच्या एका भागावरून दुसऱ्या भागावर नेणें (a disease); transform रूपांतर क.; remove, as by death मृत्युद्वारां नेणें; change to another condition, position, or office स्थित्यंतर -स्थलांतर-पदांतर क.: by faith Enoch was *translated,* that he should not see death (Heb. xi. 5); render into another language भाषांतर क. [from].—*i.* भाषांतर क.; भाषांतराच्या कामांत गुंतणें -असणें -लागणें.—TRANSLATION स्थलांतर *n*; भाषांतर *n,* तरजुमा.—TRANSLATOR भाषांतर करणारा -कर्ता.

TRANSLUCENT *a.* (*-lucere,* to shine) स्वच्छ, नितळ, निर्मळ; पारदर्शक.

TRANSMARINE *a.* समुद्रा पलीकडचा.

TRANSMIGRATE *v.* देशांतर क.—*i.* pass from one body or state into another देहांतर पावणें, जन्मांतर पावणें, दुसऱ्या जन्मास जाणें [from, to].—TRANSMIGRATION देहांतर *n*; the

passing of the soul into another body, according to the opinion of Pythagoras देहांतर *n*, जन्मांतर *n*, पुनर्जन्म, जन्ममरण *n*.

TRANSMIT *v*. (-*mittere*, to send) पाठविणें, धाडणें, पोंचवणें; suffer to pass through पार जाऊं देणें: metals t. electricity [from, to].—TRANSMISSION पाठवणें *n*, प्रेरण *n*.

TRANSMUTE *v*. (*mutare*, to change) द्रव्यांतर क., जात्यांतर क. [from, to].—TRANSMUTATION द्रव्यांतर *n*, जात्यांतर *n*.

TRANSPARENT *a*. (-*parere*, to appear) उजेडास वाट देणारा, पारदर्शक, प्रकाशभेद्य; clear निवळ, नितळ.—TRANSPARENCY प्रकाश-किरणभेद्यता *f*; निवळपणा, स्वच्छता *f*.

TRANSPIRE *v*. *i*. (-*spirare*, to breathe) become public फुटणें, प्रसिद्ध होणें, बाहेर पडणें; happen घडणें, होणें.

TRANSPLANT *v*. remove and plant in another place एका ठिकाणाहून काढून दुसऱ्या ठिकाणीं लावणें, लावणी क.; remove and settle in another place दुसऱ्या ठिकाणीं नेऊन बसवणें [from, to]. -ATION रोपलावणी *f*, लावणी *f*; स्थलांतर *n*.

TRANSPORT *v*. (-*portare*, to carry) नेणें, वाहणें; carry into banishment हद्दपार क.; काळ्या पाण्यावर पाठवणें, देशपार क.; ravish with pleasure परमानंदित क.;—with ecstasy देहातीत वृत्ति क., देहभान उडवणें [from, to, for, with].

TRANSPOSE *v*. (-*ponere*, to put) जाग्याची उलटापालट क., स्थलांतर क. [from, to].—TRANSPOSITION जाग्याची अदलाबदल *f*, स्थानविनियम, स्थलांतर *n*.

TRANSUBSTANTIATION (-*substania*, substance) द्रव्यांतर *n*; [*Rom. Cath. Theol.*, the doctrine held by Roman Catholics that bread and wine in the eucharist is converted into the body and blood of Christ].

TRANSVERSE *a*. (-*vertere*, to turn) आडवा, वांकडा.

TRAP*, instrument for catching game फांस, सांपळा; stratagem डावपेंच, कचाट *n*; the play इटींदांडू [for].—*v*. सांपळ्यांत धरणें; पेंचांत धरणें, पकडणें [with, by, in]. —*i*. सांपळा मांडणें *i*. -लावणें. -DOOR चोपदार *n*. -PINGS *pl*. मिरवणुकीचा पोशाक; घोड्याचा साज. -STICK दांडू, दांडा.

TRAP *Sw*. a heavy igneous rock एक जातीचा जड पाषाण आहे, कारदगड.

TRAPA BISPINOSA (*L*.) अतिकेशर.

TRAPEZIUM (*L*.) *Geom*. विषमचतुरस्र.

TRASH *Ger*. that which is worthless ऐलपैल *n*, खेर *f*; loppings of trees फांटीं *n pl*.—*v*. फांद्या तोडणें -साळणें.

TRAVAIL *v*. *i*. *F*. labor with pain कष्ट क., खपणें; suffer the pangs of childbirth प्रसूतिवेदना सोसणें, वेणा देणें.—*n*.श्रम, कष्ट; प्रसूतिवेदना *f*, वेण *f*.

TRAVEL *v.i.* (do.) walk चालणें; journey प्रवास -देशाटन क.; pass जाणें [from, to, for, in, by, with, through].—*t*. देशपर्यटन क.—*n*. मुशाफरी *f*, देशाटन *n*, प्रवास, फेरी *f*; *pl*. account by one who travels, of occurrences and observations made during a journey देशाटन वृत्तांत: a book of t. -LER मुशाफर, पांथस्थ, वाटसरू; देश फिरणारा, प्रवास करणारा.

TRAVERSE *a*. (See TRANSVERSE) आडवा.—*ad*. आडवा.—*v*. फिरणें, कंठणें; आडवा येणें, अटकाव क.; survey carefully पाहणी क., न्याहळणें, चौकसीनें पाहणें.

TRAY* तबकडी *f*, ताट *n*, खुमचा, तबक *n*, इ०; —of wood काठवट *f*.

TREACHEROUS *a*. *F*. विश्वासघातकी, दगलबाज; —to the state फितुरी *f*, निमकहराम. —TREACHERY विश्वासघात, दगलबाजी *f*, फितुरी *f*, दगा.

Treacle (*theriaca*) काकवी *f*, बेरी *f*.

Tread* *v. i.* set the foot पाय ठेवणें, पाऊल टाकणें : fools rush in where angels fear to t.; walk or go जाणें, चालणें; copulate, as birds जुळणें; on, upon तुडविणें; मागोमाग जाणें, लागोपाठ जाणें: year *treads* on year [on, upon, with].—*t.* वरून चालणें; press with the feet तुडवणें, पायानीं मळणें; crush under the foot पायाखालीं चिरडणें.—*n.* मळणी *f*; पाऊल *n*; gait चालण्याची ढब *f*, *f*, पावठा, पाऊल *n*, गति *f*; पक्ष्यांचें जुळणें *n*. -mill गिरणी *f*.

Treason (*tradere*, to give up) राजद्रोह, फितूर. -able *a.* राजद्रोहाचा (act); सरकारासीं दुश्मनी करणारा, राजद्रोही (person).

Treasure (*thesaurus*) wealth accumulated धन *n*, भांडार *n*, द्रव्य *n*; abundance विपुलता *f*, रेलचेल *f*, महामुरी *f*; that which is very much valued रत्न *n*, निधान *n*, दाणा, परीस; hidden or reserved t. डबुकलें *n*, गुप्तधन *n*, निधान *n*, डल्ला.—*v.* संचय क., द्रव्यसंचय क., जोडणें [up].—Treasurer खजीनदार; पोतनीस, कोशाधीश, भांडारी.—Treasury जामदारखाना, खजीना, पोतें *n*, भांडार *n*, 'तिजोरी' *f*; t. bags of Government पोतें *n*; settlement of the accounts of the t. पोतेंझाडा.

Treat *v.* (*tractare*, to draw violently) handle चालवणें, वागवणें: to t. prisoners ill is the character of a barbarian; discourse on विषयावर बोलणें; entertain मेजवानी क. (a company) [with, to]; manage in the application of remedies उपचार-उपाय -चिकित्सा क.; subject to some action -वर क्रिया चालवणें;—carefully जोगवणें, संभाळणें; —considerately, leniently वागवून -संभाळून घेणें;—honorably सन्मान -संभावना क.; —roughly कुदळणें, गुधडणें, हेटाळणी क., खरडपट्टी काढणें [with, to].—*i.* विषय-प्रकरण चालवणें -सांगणें -लिहिणें [on, in]; negotiate तहाचें बोलणें क. [with, for]; मेजवानी क.—*n.* मेजवानी *f*. -ment वागवणें *n*, वागणूक *f*, वहिवाट *f*; उपचार, चिकित्सा *f*, क्रिया *f*; औषधपाणी *n*.—Treatise ग्रंथ, प्रबंध, निबंध.—Treaty तह, ठराव.

Treble *a.* (*trilpex*) तिप्पट, तिहेरी, त्रिगुण; *Mus.* तृतीय सवनाचा, किनरा.—*n.* तृतीय सवन *n*, उच्च सवन *n*, किनरी *f*, टीप *f*, टिपेचा सूर. —*v.* तिप्पट क.—*i.* तिप्पट होणें.

Tree* (*Skr. taru*) झाड *n*, वृक्ष; genealogical tree वंशवृक्ष.—*v.* झाडावर चढायास लावणें, झाडाकडे हांकून लावणें: the dog *trees* a squirrel; झाडावर ठेवणें: to t. a boat.

Tremble *v. i.* (*tremere*) लटलटणें, कांपणें, डळडळणें;—from fear, cold, &c. कांपरें सुटणें, हुडहुडी भरणें.—Tremendous *a.* भयंकर; dreadful जोराचा, जबर, अनर्थाचा (wind). —Tremor कापरें *n*, थरकांप, थरथराट —Tremulous *a.* डळडळीत, कंपित, सकंप.

Trench *F.* खंदक, चर.—*v.* खंदक खणणें; खळ्या -पाळ्या पाडणें. -er काथवट *f*; food अन्न *n*, गोडगोड जेवण *n*, सुग्रास.

Trepidation (*trepidus*, trembling) कांपरा, थरकांप, शहारे *pl*.

Trespass *v.* (*trans*, over, and *pass*) pass over the boundary line of another's land दुसऱ्याच्या हद्दींत जाणें, -ची हद्द ओलांडणें; enter unlawfully upon the land of another कायद्याविरुद्ध दुसऱ्याच्या जमिनीवर जाणें; go too far अतिक्रमण क.; transgress हुकूम तोडणें; offend अपराध -आगळीक क. [on, upon].—*n.* सीमोल्लंघन *n*; अतिक्रमण *n*, अपराध, आगळीक *f*, अन्याय; criminal t. अन्यायाची आगळीक *f*.

Tret *F.* an allowance in weight for waste or refuse कडता, कसर *f*, कांटा इ०.

Trial (See Try) See under Try [for].

Triangle (*tres*, three, *angulus*, angle) त्रि-

कोण, त्रिकोणाकृति.—TRIANGULAR *a.* त्रिकोणी, तिकोनी, त्रिकोण.

TRIBE (*tribus*) family कूळ *n,* वंश; a nation of savages रानटी लोक -लोकाचें गोत *n;* class वर्ग, जात *f,* गण.

TRIBULATION (*tribulare,* to press) क्लेश, दुःख *n,* संकट *n,* विपत्ति *f.*

TRIBUNAL (*L.*) seat of a judge न्यायाधिशाची गादी *f,* न्यायासन *n,* धर्मासन *n;* court of justice न्यायसभा *f,* कचेरी *f,* अदालत *f.*

TRIBUTE (*tribuere* to bestow) payment made in acknowledgment of submission खंडणी *f,* कारभार; personal contribution made in token of services rendered, or as that which is due or deserved देणगी *f,* इनाम *n,* बक्षीस *n.*—TRIBUTARY खंडणी -करभार देणारा, खंडणीदार.—*a.* खंडणी देणारा; inferior खालचा, गौण; yielding supplies of anything पुरविणारा, पुरवठा करणारा (streams).

TRICE *Sp.* पळ *n,* क्षण, त्रुटी *f;* in a t. क्षणांत, पळ मात्रांत, उभाउभी.

TRICK *D.* stratagem युक्ति *f,* हिकमत *f;* cunning contrivance कुलंगडें *n,* कंत्राट *n;* mischievous behavior खोड *f,* मस्ती *f,* चाळा; antic माकडचेष्टा *f pl;* पोरचेष्टा *f pl;* artifice कळा *f,* युक्ति *f,* गुरुकिल्ली *f.*—*v.* फसविणें [with, by, in].

TRICK *v. W.* सजवणें, नटवणें [out, out in].

TRICKLE *v.i. Ger.* ओघळणें, पाझरणें [down, off, along].

TRIDENT (*tri,* & *dens,* tooth) त्रिशूल -ळ.

TRIDUAN *a.* (*tri,* & *duis,* day) तीन दिवस राहणारा, त्र्याहिक.

TRIENNIAL *a.* (-*annus,* year) तीन वर्षे राहणारा-वर्षांचा; happening every three years तीन तीन वर्षांनीं होणारा, तिसाली, त्रैवार्षिक.

TRIFLE* *v. i.* खेळणें, गमणें, माशा मारीत बसणें [with].—*n.* हलकी -क्षुल्लक गोष्ट *f,* कसपट *n,* कःपदार्थ.—TRIFLING *a.* हलका, लहान, अल्प, एरशेर.

TRIFOLIATE *a.* (*tri, folium,* leaf) तिपानी, त्रिपर्ण, त्रिदल.

TRIFORM *a.* त्रिविध.

TRIFURCATED *a.* तीन बेचक्यांचा.

TRIGGER *Ger.* बंदुकीची कळ *f,* लबलबी *f;* t. guard पालखी *f* (*H*).

TRIGONOMETRY (*Ger. trigonon,* triangle, *metron,* measure) त्रिकोणमिति *f.*

TRILL *D. Mus.,* a shake or quiver of the voice in singing सरांटा.—*v.* सरांटा घेऊन गाणें, अळविणें.—*i.* कंप घेणें; trickle झुळझुळ वाहणें.

TRILLION (*tri, millio*) the number represented by a unit with eighteen cyphers annexed प्रयुत धन.

TRIM* *v.* निटावणें, दुरुस्त क., चकपक क.;—a boat सारख्या वजनाचा -समतोल -भार क.; clip सालणें, छाटणें [with, out].—*ad.* चकपक, नीट; t. and tidy नीटनेटका, साफसफा. -MER नीट करणारा; a time-server काल पाहून चालणारा; one who fluctuates between parties, so as to appear to favor either दोहों दरडींवर हात ठेवणारा. -MINING वस्त्रास लावलेली फीत *f,* डाल *f,* इ०.

TRINITY (*trinitas,* fr. *trini,* three each) *Theol.,* the union of the three persons (the Father, the Son, and the Holy Spirit) in one Godhead, so that all the three are one God as to substance, but three persons as to individuality देवत्रयैकत्व *n.*

TRINKET* डागिणा, नग, वस्त *f.*

TRINOCULOUS *a.* (*tri, oculus,* eye) त्रिनयन, तीन डोळ्यांचा.

TRINOMIAL *a.* (*Gr. -nemein,* to distribute) *Math.* त्रिपद *n.*

TRIO (*tres, tria,* three) त्रिकूट *n,* तिरकूट *n.*

TRIP *v. i. D.* move lightly चमकत -ठुमकत चालणें; take a brief or sudden journey फेरी क., येरझार -खेप क.; make a false step चुकून पाऊल पडणें; fail चुकणें, घसरणें, ठोकर खाणें; stumble अडखळणें, ठोकर खाणें, ठेंच खाणें.—*t.* उलथून पाडणें, ठोकर मारून पाडणें; catch धरणें, पकडणें [up].—*n.* ठोकर *f,* ठेंच *f;* अडखळण *n;* catch by which a wrestler supplants his antagonist पेंच; empty t. हेलपाटा, हिसका [round, about].

TRIPARTITE *a.* (*-pars, partis,* part) तीन भागांचा, त्रिखंड, त्रिभाग.

TRIPE *F.* अंतडें *n.*

TRIPETALOUS *a.* (*Gr. -pètalon,* a leaf) त्रिदल.

TRIPHTHONG (*Gr. -phoggos,* voice) a combination of three vowels in a single syllable, forming a single or compound sound त्र्यच्क *n.*

TRIPLE *a.* (*triplex*) तिप्पट, तिपदरी; of three strings तिपेडी, तिसुती.—*v.* तिप्पट क.—TRIPLICATE *a.* तिप्पट, तिहेरी.—*n.* दोन कागदां-पदार्थां सारखा तिसरा कागद -पदार्थ.

TRIPOD (*Gr. -podos,* a foot) तिवयी *f,* अडणी *f.*

TRISYLLABLE *a.* त्र्यक्षरी शब्द, तीन अक्षरी शब्द.

TRITE *a.* (*terere,* to rub) जुना, उष्टा, शिळा, बासा.

TRITURATE *v.* (do.) वाटणें, उगाळणें.

TRIUMPH (*triumphus*) joy for success जयाचा आनंद, जयानंद, जयोत्सव; victory जय, विजय [over].—*v.* जय मिळवणें, जयजयकार क., टाळ्या वाजविणें. -AL *a.* जयाचा, जयसमारंभाचा, in comp. जय, विजय (arch). -ANT *a.* जयोत्सव करणारा; जय पावलेला, जयवंत, विजयी, विजयशाली (church); [church t., the church in heaven, enjoying a state of triumph; her warfare with evil being over;—distinguished from *Church militant*].

TRIUMVERATE (*tres, trium,* three, *vir,* a man) त्रिकूट *n,* त्रय *n.*

TRIVET (*tri, pedis,* a foot) तिवई *f.*

TRIVIAL *a.* (*-viâ,* way) हलका, क्षुल्लक, क्षुद्र. -ITY हलकेपणा, क्षुद्रता *f.*

TRIWEEKLY *a.* अठवड्यांतून तिनदां निघणारा -होणारा (newspaper).

TROCHE (*trochæus*) a foot of two syllables गल, गलपद *n.*

TROGON भृंगराज.

TROLL *v. Ger.* roll लोटणें, फिरवणें, लोटून जाणें, लोटणें; send about भोंवताला पाठविणें (a drinking vessel); entice मोहणें, भुलवणें; fish in मासे धरणें [round].—*i.* लोटत जाणें; [fish with a rod whose line runs on a wheel or pulley, or by drawing the hook through the water] [for]. -OP भटकणारा; नगरभवानी *f,* भटकभवानी *f;* a slut नेभळी बायको *f.*

TROOP (*turba,* a crowd) मंडळी *f,* जमाव, थवा; *pl.* लष्कर *n,* सेना *f,* दळ *n;* cavalry रिसाला, 'तुरूप';—of monkeys साईर;—of pilgrims, beggars, &c. पोवा, झुंड *f.* -ER घोडेस्वार, बारगीर; a t. stationed on guard at a court of justice सदर बारगीर.

TROPE (*tropos*) a figure of speech which changes a word from its primary sense रूपकालंकार, रूपक *n.*

TROPHY (*Gr. tropé,* a turn) जयाची निशाणी *f,* जयचिन्ह *n.*

TROPIC (do.) दक्षिणोत्तरायनांची सीमा *f,* अयनांतर *n;*—of Cancer दक्षिणायन *n;*—of Capricorn उत्तरायन *n.* -AL *a.* क्रांतिवृत्तांतला.

TROT *v. i. F.* move with a jolting pace दुडकी चालीनें चालणें, दुडदुड चालणें; run धांवणें

[about, along, off, to].—*t.* तुरकी -दुडकी चालीवर घोडा चालविणें.—*n.* दुडकी चाल *f.*

TROUBLE *v.* (*turba,* a disorder) disturb गोंधळ क., हलवणें, गढुळणें; afflict दुःख -कष्ट देणें; give occasion for labor to श्रम -तसदी देणें: I will not t. you to deliver the letter [with, by, in].—*n.* कष्ट, क्लेश, विपत्ति *f*; that which afflicts पीडा *f,* त्रास, उपद्रव; to take the t. श्रम घेणें -क.; तसदी घेणें. -SOME *a.* जाच करणारा, उपद्रवकारक, श्रमकारक, त्रासकारक; जिकिरीचा, खडतर (work). -OUS *a.* संकटाचा, अरिष्टाचा.

TROUGH*—wooden डोण *f,* कोटंबा;—for watering cattle टांकी *f,* डोण *f.*

TROWEL (*trua,* a ladle) करणी *f,* थापी *f.*

TROWSERS *pl. F.* इजार *f,* पायजमा, तुमान *f.*

TROYWEIGHT *F.* सोनें रुपें इ० तोलायाचें वजन *n.*

TRUANT *a. F.* उनाड, उंडगा.

TRUCE*, armistice मुदतीचा तह, लढाईची तहकुबी *f*; intermission of action खंड, खाडा, तूट *f*; short quiet थोडासा विसांवा, अवसर, दम.

TRUCK *v. F.* अदलाबदली क. [with].—*n.* अदलाबदली *f,* विनियम; अदलाबदली करायाचा माल.

TRUCK (*Gr. troxos,* a wheel) a small wooden wheel not bound with iron बिनधांवेचें लांकडी चाक *n*; [a low carriage for carrying goods, stone, and other heavy articles; a swiveling carriage; t. system, the practice of paying workmen in goods instead of money].

TRUCKLE* *v. i.* नाक घांसणें, दांतीं तृण धरणें; पदर पसरणें [to].

TRUDGE* *v. i.* go on foot पायीं चालणें -जाणें, travel with labor तंगड्या तोडीत जाणें, पाय फांसटणें [on, along].

TRUE* *a.* conformable to fact खरा, सत्य; exact असल बरहुकूम, यथामत (copy); faithful खरा, इमानी, प्रमाणिक (friend); genuine असल, खरा, चोख (Christian); unadulterated निर्भेळ, चोख;—as wood निबर. -HEARTED *a.* खरा, निष्कपट, सात्विक. -LY खरोखर, वास्तविक; मनापासून; यथातथ्य; बरोबर.—TRUTH खरेपण *n,* सत्य *n*; real state of things खरी गोष्ट *f,* खरा मजकूर; fidelity विश्वासूपणा, इमान *n*; practice of speaking truth खरें बोलण्याची सवयी *f*: he is a man of t.; honesty प्रमाणिकपणा, सचोटी *f*; an established principle, fixed law, &c. सत्य सिद्धांत, सत्य *n,* सत्यता *f* (John xvii. 17); in t. खरोखर, वस्तुतः; [to do t., to practice what God commands]. -FUL *a.* सत्यशील; विश्वसनीय. -NESS खरेपणा, खरेपण *n.*

TRUMP, *F.* करणा, तुतारी *f.*—*v.* करणा वाजविणें -फुंकणें; proclaim गाजवणें, फुंकणें [to]. -ER तुतारी वाजवणारा, करणेकरी. -FLOWER सागरगोटी *f*; seed of the t. गजगा, सागरगोटा; root of the t. पाहाडमूळ *n.*

TRUMP *v. F.* फसवणें, धत्तुरा दाखवणें, हातावर तुरी देणें. -ERY कवडीमाल, खेर *f.*

TRUNK (*truncus*) stem of a tree कांड *n,* खोड *n*; body of an animal धड *n*; main body पोट *n,* मुख्य भाग; chest पेटी *f,* संदूक *f*; watercourse पन्हळ; proboscis of an elephant सोंड *f*;—of an insect सोंड *f,* तोंड *n*; headless t. धड *n,* कबंध *n.*

TRUSS *F.* bundle गठ्ठा, बिंडा; *Surg.*—for hernia दाब.—*v.* घट्ट बांधणें, आवळणें.

TRUST*, assured resting of the mind on the integrity, veracity, justice, and friendship, or the sound principle of another person विश्वास, भरवसा; worthy of t. विश्वासपात्र; violation of t. विश्वासघात; credit given खातरी *f,* पत *f*; assured

anticipation भरवसा, उमेद *f*; charge जिम्मा *f*, हवाला; tick उचापत *f*, उधार *n*; to buy upon t. उधार घेणें -आणणें; on t. हातावर, उधार; to sell upon t. उधार देणें. —*v.* विश्वासणें, भरवसा ठेवणें; सोंपणें, हवालणें; विश्वासणें, विसंबणें; माल उधार देणें -विकणें [in, with, to].—*i.* विश्वास धरणें, भरवसा ठेवणें; विश्वास-आशा-उमेद धरणें -बाळगणें; उधार विकणें, उधार देणें; in, to विश्वास-भरवसा ठेवणें: trust in the Lord and do good (Ps. xxxvii. 3). -EE जिम्मेदार, निसबतदार. -FUL *a.* विश्वास ठेवण्याजोगा, विश्वासयोग्य, विश्वासू.—TRUSTY *a.* खातरजमेचा, खात्रीचा.

TRY *v. F.* examine परीक्षा-पारख क.; purify, as metals शोधणें; put to the test कसणें, कसून पाहणें; examine judicially तपासणें, चवकसी क.; experience अनुभव-प्रचीति घेणें, -पाहणें; attempt हातीं घेणें, यत्न-उद्योग करून पाहणें; on घालून -नेसून पाहणें (a garment); to t. the eyes ताटकळवणें, ताटकळणें [into, by, at, in].—*i.* उद्योग-यत्न क. -करून पाहणें.

TUB *D.* पिप *n.*

TUBE (*tubus*) pipe नळी *f*, नळ, नळकांडें *n*; conduit पन्हळ, नळ; a vessel of animal body or plants नाडी *f*, धमनी *f*, शीर *f*, इ०. -ROSE गुलछडी *f*.—TUBULAR *a.* नलिकाकृति.

TUBERCLE (*tuber*) फोड, गांठ *f*, ग्रंथि *f*.—TUBERCULOUS *a.* गांठाळ, गांठीचा, ग्रंथिमय.

TUCK *W.* a long narrow sword तेगा? fold in a garment दुमड *f*, मुरडण *n*, चुणी *f*.—*v.* खोंचणें, खोवणें, मुरडून खोवणें; कापडांत गुंडाळून ठेवणें: to t. a child into a bed.

TUESDAY* मंगळवार.

TUFT *F.* bunch झुपका, पुंजका, गोंडा; cluster झुपका, घोंस;—of trees बेंट *n*.—*v.* गोंड्यानें -नीं शृंगारणें; वेगळाले झुपके क. -ED *a.* झुपकेदार, गोंडेदार, गोंडस.

TUG* *v.* श्रमानें -कष्टानें ओढणें.—*i.* कष्ट-श्रम क.

TUITION (*tueri*, to see) guardianship राखण *f*, रखवाली *f*; instruction शिकवणी *f*. शिक्षा *f*; payment for instruction शिकविण्या बदल पगार, शिकविणावळ *f*, गुरुदक्षिणा *f*.

TUMBLE* *v. i.* roll लोळणें, गडबडणें; roll down ढकलत -लोटत -गडबडत जाणें-कोसळणें; play mountebank tricks कोल्हांटी मारणें, कोल्हाट खेळ क.—*t.* पाडणें, लोटणें, ढकलून पाडणें, ढासळणें; rumple गुधडणें.—TUMBLER ढकलणारा, लोटणारा; कोल्हांटी, गोपाळ; drinking glass कांचेचा पेला, 'टंब्लेर' *n*, 'ग्लास'; a variety of domestic pigeon लोटण *n*, गिरेबाज *n*.

TUMBRIL *F.* छकडा, छकडी गाडी *f*.

TUMID *a.* (*tumere*, to swell) सुजलेला, फुगलेला; bombastic ढबीचा, डौलाचा, आवाचा, फुगीर (style).

TUMOUR (do.) गलांड *n*, उबाळूं *n*, गळूं *n*, बेंड *n*;—on the spine देंटपुळी *f*.

TUMULT (do.) commotion गडबड *f*, गलबल *f*, दंगा; agitation क्षोभ, खळबळ *f*. -UOUS *a.* गडबडीचा, धांदलीचा (assembly); disorderly अव्यवस्थित (flight); violent तडाख्याचा, जोराचा, कडाक्याचा, दणक्याचा (speech).

TUNE (See TONE) स्वर, आवाज; *Mus.* सूर, तान *f*, चाल *f*; the state of giving the proper sound स्वरांचा मेळ, मिलाफ, स्वरैक्य *n*; harmony मिलाफ, जम, ऐक्य *n*.—*v.* लावणें, स्वर मिळवणें-जमवणें. -FUL *a.* सुस्वर, गोड.

TUNIC *a.* (*tunica*) integument वेष्टण *n*, आवरण *n*, पापुद्रा; [*R.C. Ch.*, a long undergarment worn by the officiating clergy].

Tup *Prov. Eng.* a ramp टपूर.

Tunnel *F.* an artificial subterraneous; passage बोगदा -सुरंगाची वाट *f*, विवरमार्ग; funnel गळणें *n*, नरसाळें *n*; opening of a chimney for the passage of smoke धुराड्याचें तोंड *n*.—*v.* गळणीच्या आकाराचा क.; बोगदा पाडणें, विवर क.

Turban *Per.* पागोटें *n*.

Turbid *a.* (*turba*, tumult) गढूळ, गदळ, खडूळ. —Turbulence दांडगाई *f*, धांदल *f*, धुंडाई *f*. —Turbulent *a.* बंडखोर, दांडगा, धांदल्या.

Turf*, sod गवताचा भुईतळ; -चीं जमीन *f*; race-ground शर्यतीची जागा *f*; horse-racing घोड्याची शर्यत *f*, पैज *f*; lump of t. गवताचा गड्डा -पेंढ.

Turgid *a.* (*turgere*, to swell) See Tumid.

Turkey विलायती कोंबडा, 'टर्की' *f*.

Turmeric *F.* हळद *f*; scented t. अंबेहळद *f*; clove of t. हळकुंड *n*.

Turmoil (*turn*, & *moil*) trouble तळमळ *f*, संताप, ताप; harassing labor खटपट *f*, दगदग *f*, अट्टाहास.

Turn*, *v.* form in a lathe कातणें; shape डौल देणें, घडणें; cause to move upon a centre फिरवणें, भोंवडणें (a wheel, the head); cause to present a different side uppermost उलथणें, उलटणें, पालटणें (a board); direct otherwise फिरवणें, वळवणें, मुरडणें, कल देणें (the eyes, a horse, the attention); change from a given use फिरवणें, दुसऱ्या कामास लावणें, बदलणें: God will make these evils the occasion of greater good, by *turning* them to our advantage; transform रूप बदलणें, रूपांतर क.: to t. a worm into a winged insect; translate भाषांतर क.: to t. Greek into English; convert मन फिरवणें, बदलणें, -चा करणें: to t. a Hindoo to a Christian; to be turned of—च्या पलीकडे जाणें; to t. a corner कोपऱ्यास वळणें; aside वळणें, बाजूस फिरणें; to t. as milk, wine, &c. आंबवणें, आंबट क.; away चाकरीवरून काढणें, दूर क., घालवणें; निवारणें, टाळणें (evil); back परत क. -देणें; down घडी क., दुमडणें;—in the mind मनांत घोळणें, विचार क.; off घालवणें, हांकून लावणें; कमी क.; फिरवणें, वळवणें (the thoughts); पुरे क.—one's coat पक्ष बदलणें;—one's money or goods व्यापारांत मिळवणें -कमावणें -वाढणें; out काढून देणें, रद्द क.; चरणीस घालणें -सोडणें (cattle); उत्पन्न क., लाधणें; over पक्ष बदलणें; हवालणें, सोपणें (business); पुस्तकाचीं पानें चाळणें: to t. over a concordance; उलथणें, उलटणें, पालथा क. -पाडणें; to t. tail बेअदबी क., हेलना क.; to t. the back पळणें, पाठ दाखविणें -देणें; हिडसून टाकणें; to t. die फांसा उलटा टाकणें, नशीब फिरणें; to t. the edge of धार बसवणें; to t. the head of डोकें फिरवणें, वेड भरणें; to t. the scale तोल जास्ती क.; to t. the stomach of पोटांत कळमळ क.; to आश्रय धरणें; पाहणें, -कडे जाणें; upon परत टाकणें—*v. i.* फिरणें, भोंवणें; उलटणें, पतरणें, फिरणें: to t. from the road; बदलणें, मन फिरणें, बुद्धि पालटणें: to t. Mohamedan; रूप -धर्म -गुण पालटणें, द्रव्यांतर होणें, होणें: wood *turns* to stone लांकडाचा दगड होतो; चाकावर फिरणें; आंबणें, आंबट होणें; पोटांत कळमळणें -ढवळणें; [*Obstretics*, bring down the feet of a child in the womb, in order to facilitate delivery]; above तोंड फिरवणें; away मार्ग सोडणें; निघून जाणें; in आंत वांकणें -जाणें; बिऱ्हाडास -जेवणास आंत जाणें -उतरणें; निजायास जाणें; off फिरणें, फुटणें, वळणें: the road *turns* off to the left; on, upon उलट जाब देणें; अवलंबून राहणें; टणटण उडणें -बोलणें; out उखळणें, जाग्यावरून हालणें, पडणें, निघणें (a bone); बाहेर येणें; उठणें,

निजून उठणें; बाहेर पडणें, फुटणें, निघणें (a matter); over उलटणें, उलटा होणें;—from sickness चळवळणें; to t. to account कामास पडणें; up बाहेर पडणें, निघणें, उमगणें.—*n.* फिरणें *n*; परिभ्रमण *n*; फेरा, फेरी *f*; पालट, विकार: the *turns* of passions; bend विळखा, वेढा, वळसा; successive course पाळी *f*, पालट, बारी *f*: your *turn* will come to laugh at you again; opportune deed उपकार; ill t. वाईट *n*; convenience सोई *f*; डौल, आकार, वळण *n*;—of mind मनाचा कल, -झोंक; निराळी तऱ्हा *f* -प्रकार; one round of a rope वेढा, वळसा; *pl. Med.* ऋतु, रज *n*; by *turns* पाळीपाळीनें, आळीपाळीनें; to take a t. आढी घेणें, विळखा घालणें; to make a t. वळणें; t. of life, *Med.* ऋतु बंद होण्याचा काळ. -COAT रंग पाहून चालणारा, दुरोखी, स्वपक्ष सोडणारा. -ER फिरविणारा; चरक -चाक फिरविणारा, कांतारि; लोटण कबूतर *n*; कसरती, पेहलवान. -ING वळसा, बांक; सन्मार्गापासून सुटणें *n*, विचलन *n*; कांतणें *n*, कांतीव काम करणें. -PIKE, -STILE, a revolving frame in a foot-path, preventing the passage of horses or cattle but admitting that of persons बेडें *n*.

TURNIP* सलगम *n*.

TURPENTINE (*terebinthus*, of the turpentine tree) देवदाराचें तेल *n*, नखतेल *n*, 'टरपेंतेल' *n*.

TURPITUDE (*turpis*) हलकेपणा, छिछोरीपणा, छिछोरी *f*.

TURRET (*turris*, tower) मनेरा.

TURTLE *F.* कांसव *n*, कूर्म *n*. -DOVE कबुतर *n*.

TUSK* सुळा दांत, सुळा; elephant's t. हस्तिदंत.

TUTELARY *a.* (*tueri*, to watch) राखणारा, रक्षण करणारा, रक्षक; t. deity आराध्य दैवत *n*, इष्टदेवता *f*.—TUTOR शिकविणारा, शिक्षक; *Law*, guardian पालनकर्त्ता.—*v.* शिकवणें; दिमतीस -दिमत असणें.

81 D

TWANG *v. i. Ger.* झणझण वाजणें.—*t.* झणझणां वाजविणें.—*n.* झणत्कार, झणत्कारा; nasal sound नाकांतला उच्चार -शब्द -स्वर, गेंगाणें -गुणगुण बोलणें *n*.

TWATTLE *v. i. Ger.* बडबडणें, वटवट क.

TWEEZERS *pl. F.* केंस वगैरे उपटण्याचा चिमटा.

TWELVE* *a.* बारा.—*n.* बाराचा अंकडा, बाराची संख्या *f*. -MONTH बारा महिने *pl*, वर्ष *n*; during t. बारमहा; of a t. बारमाही.—TWELFTH *a.* बारावा, बारा वाट्यांतला एक.—*n.* बारावा भाग, द्वादशांश.

TWENTY* *a.* वीस.—*n.* विसाचा अंकडा; विसांची संख्या *f*.

TWICE* *ad.* दोनदां, दोनवेळ; doubly दुप्पट, बेवार; t. born द्विज.

TWIG* डाहळी *f*, टहाळी *f*, शिपटी *f*, फोक.

TWILIGHT*—of evening तिनीसांज *f*;—of morning पांहट *f*, धुंदूक *f*, झुंजुमुंजु *n*; imperfect t. फुटकी तीनसांज *f*; height of t. भर तिनीसांजा *f pl*, कातरवेळ *f*.

TWIN* जुवळ, जुळा, आवळा जावळा; *pl. Astr.* मिथुन रास *f*; t. pair जोडपें *n*.

TWINE* *v.* twist together पिळणें, पीळ घालणें; wind about वेष्टणें, वेढणें.—*i.* घट्ट बसवणें; वेढा घालणें, वेष्टून जाणें.—*n.* वेढा, वेष्टन *n*, पिळा; सुतळी *f*, सडा.

TWINKLE* *v. i.* डोळा उघडणें, उघडझाप क., मिचकणें; sparkle लकलकणें, चमकणें.—*n.* quick motion of the eye स्फुरण *n*, निमेष, निमिष; time of a wink चिपडी *f*, पलख *n*.

TWIRL* *v.* गरगरां फिरवणें.—*i.* गिरकांडी देणें -मारणें, गरगरां फिरणें.—*n.* गिरकांडी *f*, गिरटी *f*.

TWIST* *v. i.* contort पिळणें, पिळवटणें, मुरगळणें; pervert वळवणें, ओढणें, विपरीत क. (meaning); wind गुंडाळणें, लपेटणें; weave विणणें; form by convolution वळणें; form into thread सूत काढणें, सूत वळणें.

TWIT* *v.* नाकांत काड्या घालणें, ठोमणा मारणें.

TWITCH* *v.* हिसकणें, हिसका देणें.—*n.* हिसडा, हिसका.

TWITTER *v. D.* चिवचींव -किलकील -चुंचुं क. —*n.* चिवचींव *f,* किलकील *f,* चिमचीम *f.*

TWO* (*L. duo, Skr. dwi*) दोन; in t. दोन तुकडे, द्विधड: c. in t.—*n.* दोहोंची संख्या *f;* दोहोंचा अंकडा. -FOLD *a.* दुप्पट; दोन प्रकारचा, द्विविध.—*ad.* दुप्पट. -EDGED दुधारी: the word of God is like a t. sword.

TYMPANITES (*L.*) वातोदर, कासव्या रोग; to have t. पोटांत तडस भरणें.

TYPE (*typus*) stamp छाप, ठसा; symbol खूण *f,* चिन्ह *n,* लक्षण *n;* figure of something to come प्रतिरूप -बिंब *n; Med.,* symptom भावना *f,* स्वरूप *n; Printing* ठशाचें अक्षर *n;* raised letter, &c., cast in metal ठशाचें अक्षर *n* वगैरे, टैप.

The following lines show some of the different types :—

Nonpareil.

I will put my spirit within you.—Ezk. xxxvi. 27.

Brevier.

Resist the devil and he will flee from you.—Jas. iv. 7.

Bourgeois.

The Lord is my portion, saith my soul.—Lam. iii. 24.

Long Primer.

Consider the wondrous works of God.—Job xxxvii. 14.

Small Pica.

Be ye doers of the word, and not hearers only, deceiving yourselves.—Jas. i. 22.

Pica.

God is angry with the wicked every day.—Ps. vii. 11.

English.

Christ died for the ungodly.—Rom. v. 6.

Great Primer.

Believe on the Lord Jesus Christ and thou shalt be saved.—Acts xvi. 32.

—TYPICAL *a.* लाक्षणिक, सांज्ञिक, सांकेतिक.—TYPIFY *v.* प्रतिरूपानें दाखवणें, सुचवणें.

TYPHUS (*Gr. tuphos,* smoke) सन्निपातज्वर.

TYPOGRAPHY (See Type) छापण्याची कळा *f,* खिळेछाप.

TYRANT (*Gr. turannus*) absolute ruler मुखत्यार राजा, स्वतंत्र राजा; despotic and cruel ruler जुलमी राजा; cruel master जुलमी धनी *f;* oppressor जबरी -जुलूम -जाच करणारा.—TYRANNY स्वतंत्र राज्य *n;* जुलमी -बेदाद-राज्य *n;* जुलूम,जबरदस्ती *f.*—TYRANNICAL *a.* जुलमी, जबरदस्त, जालीम, जुलमाचा, कहराचा (power).—TYRANNIZE *v. i.* जुलूम -जबरी -सखती क.; जाचणें, गांजणें, कांचणें, पीडणें.

TYRO (*tiro,* a beginner) नवशिका, नूतनाभ्यासी.

TYTHE, See TITHE.

U

UBIQUITY (*ubique,* everywhere) व्याप्ति *f,* विश्वव्याप्ति *f,* सर्वसमीक्षता *f,* सर्वत्रता *f.*—UBIQUOUS *a.* सर्वत्र असणारा, सर्वव्यापक.

UDDER* (*Skr. ûdhar*) ओटी *f,* कास *f;* side of an u. पाखें *n.*

UGLY* *a.* deformed कुरूप, विद्रुप, बेडौल; ill-natured कुस्वभावाचा, कुबुद्धि.—UGLINESS कुरूपता *f,* बदसुरत *f;* कुस्वभाव.

ULCER (*ulcus*) *Med.* खट *n,* क्षत *n,*व्रण,फापर *n.* -ATE *v. i.* क्षत -व्रण पडणें.

ULTERIOR *a.* (*L.*) situated beyond पलीकडचा; further पुढचा (demands).

ULTIMATE *a.* (*ultimus,* last) शेवटचा,अंतिम,

निदानींचा (repose); final शेवटचा, शेवटील (truths); constituent मूळ-कारणभूत (element). -LY *ad.* शेवटीं, सरतें शेवटीं, परिणामीं. —ULTIMATUM (*L.*) निदानींचा शब्द, शेवटचें ह्मणणें *n.*

ULTRAMARINE *a.* (*ultra*, beyond, *marinus*, marine) समुद्रा पलीकडचा.

UMBER (*umbra*, shade) कात *f*?

UMBRA (*L.*) छाया *f.*—UMBRAGE छाया *f*; offence रुसवा, गैरमर्जी *f.*—UMBRAGEOUS *a.* छायेचा; छाया करणारा -देणारा (trees).—UMBRELLA छत्री *f*, छत्र *n*; u. borne over rájás, &c., in their procession अब्दागिरी *f.*

UMPIRE (See Impair) तिऱ्हाईत, मध्यस्थ.

UNABLE *a.* अशक्त, असमर्थ.

UNACCENTED *a.* अनुदात्त, अस्वरित.

UNACCEPTABLE *a.* नापसंत, अग्राह्य [to].

UNACCOMPLISHED *a.* शेवटास न गेलेला, अपुरा, कच्चा.

UNACCOUNTABLE *a.* not to be accounted for ज्याचें कारण सांगतां येत नाहीं तो; mysterious गुढ, गहन; not responsible बिन मोसबी -जबाबदारीचा.

UNACCUSTOMED *a.* अनभ्यासी, अनभ्यस्त [to].

UNACQUAINTED *a.* गैर माहीत, गैर वाकब, अनभिज्ञ [to].

UNADVISED *a.* उतावळा, अविचारी, धसक्या; done without due consideration उतावळेपणाचा, अविचाराचा (measures).

UNAFFECTED *a.* निर्विकार; not real खरा, मनापासूनचा, अकृत्रिम (sorrow); destitute of affection गहींवर न आलेला, अजातद्रव, कठीण, विराग [by].

UNALTERABLE *a.* फिरवायास अयोग्य, अविकार्य.

UNANIMITY (*unus*, one, *animus*, mind) एकी *f*, ऐक्य *n*, एकमत *n.*—UNANIMOUS *a.* एकचित्त, एकदिल; formed with unanimity एकदिलाचा, एकोप्याचा, सर्वसंमताचा [in, for].

UNANSWERABLE *a.* दुरुत्तर, अनुत्तर, अखंडनीय.

UNAPPEASABLE *a.* असांत्वनीय, अशाम्य.

UNAPPROVED *a.* नापसंत, अमान्य.

UNAPT *a.* अनुपयोगी; अनुपयुक्त; dull मंदमति, जडबुद्धि [for].

UNARMED *a.* बिनहत्यार, उघडा, शस्त्रहीन, निरायुध.

UNASKED *a.* बिन पुसल्याचा -वांचूनचा, अयाचित [for].

UNASSUMING *a.* निरभिमानी, साळसूद, बिन दिमाखाचा, बाळबोध, साधा (manners).

UNATTAINABLE *a.* असाध्य, दुःसाध्य, अलभ्य

UNAUTHORIZED *a.* बिन हुकमी, हुकमा वांचूनचा, . बिन सनदी.

UNAVAILING *a.* निरर्थक, निष्फळ.

UNAVOIDABLE *a.* अनिवार्य, अनिवार; necessary आवश्यक, अगत्याचा.

UNAWARE *a.* गैर माहीत; बेसावध, बेहोष [of].—UNAWARES *ad.* अकस्मात, एकाएकीं

UNBECOMING *a.* अयोग्य, अनुचित, अमर्याद गैरशिस्त [of].

UNBEGOTTEN *a.* न झालेला, अनुत्पन्न; eternal सनातन.

UNBELIEF अविश्वास; infidelity अश्रद्धा *f*, अभक्ति *f*, नास्तिक मत *n* [of].—UNBELIEVER अविश्वासी, अभक्त, नास्तिक.

UNBEND *v.* उतरणें, ढिला सोडणें -क., दोरी सोडणें (a bow); relax विसांवा देणें: to u. the mind from study.

UNBIASSED *a.* निष्पक्षपाताचा, उदासवृत्तीचा.

UNBIDDEN *a.* न सांगितलेला, हुकूम न दिलेला; spontaneous स्वतःसिद्ध, आपोआप; uninvited न बोलावलेला, अनामंत्रित, आगंतुक.

UNBLEMISHED *a.* निर्दोष, निष्कलंक, निर्दोष.

UNBLEST *a.* आशिर्वाद न पावलेला; wretched हतभाग्य, कपाळकरंटा, फुटक्या नशिबाचा [by].

UNBORN *a.* न जन्मलेला, अजात; future पुढला, पुढील (sorrow).

UNBOSOM *v.* विश्वासानें तोंडा बाहेर काढणें, पोटफोड क. [one's self].

UNBOUNDED *a.* अपार, अमर्याद (power); unrestrained अनिवार, बेकैद, बेलगाम (extravagance).

UNBRIDLED *a.* बिन लगामी, बेकैदी.

UNBUTTON *v.* गुंड्या काढणें -सोडवणें.

UNCEREMONIOUS *a.* बेमुरवतीचा; familiar खेळीमेळीचा, सलगीचा.

UNCERTAIN *a.* not certain अनिश्चित, संदेहयुक्त, संशयाचा (evils); insecure बेभरवशाचा, संकटांत, धोक्याचा: man, without the protection of a Superior Being is u. of everything that he hopes for; not sure of the direction बिन धोरणाचा, बेशिस्त, भलता, नेमावांचून; soon bent his bow, u. in his aim. -TY भ्रांतिवटपणा, संदेह, संशय, दुग्धा *f.*

UNCHANGEABLE *a.* निर्विकार, अविकारी.

UNCHARITABLE *a.* दोषदर्शी, दोष पाहणारा -पाहण्याचा (opinion).

UNCHASTE *a.* व्यभिचारी;—woman असाध्वी *f*, व्यभिचारिणी *f.*

UNCHRISTIAN *a.* ख्रिस्ती नव्हे तो; contrary to Christianity ख्रिस्ती धर्मा विरुद्ध, ख्रिस्तीधर्मबाह्य.

UNCIVIL *a.* रानटी, गव्हार; unpolite अशिष्ट, असभ्य, दांडगा [to].

UNCLE (*avunculus,* a maternal uncle) —paternal चुलता;—maternal मामा.

UNCLEAN *a.* मळका, मळीण; unholy अपवित्र, अशुद्ध;—ceremonially विटाळलेला, भ्रष्ट, अशुद्ध, अपवित्र, ओंवळा.

UNCLOTHE *v.* कापडें -वस्त्रें उतरणें -काढणें.

UNCOMELY *a.* न शोभेसा, अयोग्य (manners); असुंदर, साधारण, साधा (person).

UNCOMFORTABLE *a.* गैर सोयीचा, अडचणीचा, गैरलागी (seat); gloomy उदास, विषण्ण, उजाड (season).

UNCOMMON *a.* थोडा, विरळा; strange विलक्षण, असाधारण, अलौकिक (courage). -LY *ad.* फारच, अतिशय; क्वचित्, विरळ.

UNCONCERN अनास्था *f.*—UNCONCERNED *a.* निष्काळजी, बेपरवा, निश्चिंत.

UNCONDITIONAL *a.* बिन अटीचा, सरळ, अप्रतिबंधक.

UNCONNECTED *a.* अनन्वित, असंगत, विलग, विसंगत. -NESS अनन्वय, असंबंध.

UNCONQUERABLE *a.* अजिंक, अजेय.

UNCONSCIONABLE *a.* अयुक्तिक, अमर्याद, भलता -ती *f* -तें *n* (request); vast फार मोठा, अवजड.

UNCONSCIOUS *a.* अचेतन, निचेत, धुंद; अजाणता, अज्ञ; imperceptible इंद्रियागोचर, अव्यक्त [of].

UNCOURTEOUS *a.* बेमुरवत, बिन माणुसकीचा, असभ्य.

UNCOUTH *a.* अडाणी, हेंगाडा.

UNCOVER *v.* उघडणें, झांकण काढणें.

UNCREATED *a.* अनुत्पन्न, नित्य: God is u.; अद्याप उत्पन्न न झालेला (misery).

UNCTION (See ANOINT).—UNCTUOUS *a.* चिकण, स्निग्ध (earth).

UNCULTIVATED *a.* बिन लागवडीचा, पडीत, नाकीर्द; not civilized अशिक्षित, गव्हार, रानटी

UNDAUNTED *a.* निर्भय, निधाड, धीट.

UNDECAYING *a.* अविनाशी, अनश्वर, अक्षर.

UNDECEIVE *v.* भ्रांति उडवणें, डोळे -कान उघडणें.

UNDECIDED *a.* अनिश्चयाचा, निश्चय -ठराव -निवाडा न केलेला, अनिश्चित, डळमळीत. -LY अळमटळम, अनिश्चित.

UNDEFILED *a.* निर्मळ, अलिप्त, भ्रष्ट न झालेला, शुद्ध.

UNDEFINABLE *a.* अलक्ष्य, अनिर्वचनीय.

UNDEFINED *a.* मोघम, संदिग्ध, अस्पष्ट.

UNDENIABLE *a.* नाहीं -न म्हणायाजोगा, अबाधित.

UNDER* *prep.* (*Skr. antar*) below खालीं, खालतीं; in वारीं, खालीं (खेळण्यावारीं, कामावारीं); in relation to some thing or person that exceeds in rank or degree, in number, size, weight, &c. खालीं; there are several parishes u. twenty pounds; in relation to something that comprehends, that represents, that furnishes a cover, pretext, pretence, &c. निमित्तानें, मिषानें : u. the name of friendship; in subjection to ताब्यांत, खालीं; less than खालीं, कमी.—*a.* खालचा; subordinate आड (आडगडी); हाताखालचा, उप (उपगुरु).

UNDERDO *v.* पाहिजे त्यापेक्षां कमी क.; cook insufficiently कच्चा शिजविणें, बराबर न-शिजवणें, अर्धबाट क.

UNDERGO *v.* सोसणें, भोगणें, कंठणें.

UNDERHAND *ad.* लपून छपून.—*a.* चोरीचा, लपंडावाचा, in comp. चोर.

UNDERLIE *v.* खालीं असणें; be at the basis of -च्या मुळास असणें, -ला आधार असणें.

UNDERLINE *v.* -च्या खालीं रेघ काढणें -ओढणें.

UNDERLING हाताखालचा, बगल्या.

UNDERMINE *v.* पाया खणून काढणें -पाडणें -ढासळणें; ruin in an underhand way आंतून नाश क. गुप्त घाला घालणें.

UNDERMOST *ad.* सर्वांच्या खालचा; सर्वांहून हलका, अति कनिष्ठ.

UNDERNEATH *ad., prep.* खालीं.

UNDERPRICE *v.* हलकी -उणी किंमत क. -लावणें -समजणें.

UNDERSETTER धिरा.

UNDERSIGN *v.* खालीं सही क.; the *undersigned* खालीं सही करणारा.

UNDERSTAND *v.* (*under* & *stand*) apprehend समजणें, उमजणें; become informed of माहीतगार होणें, कळणें; imply गर्भित असणें, फलितार्थानें दाखवणें [from, by].—*i.* समज -बोध असणें; be informed by another दुसऱ्याकडून समजणें. -ING, knowledge बुद्धि *f*, ज्ञान *n*; harmony समजूत *f*, समजी *f*: to come to an u. with another; union of minds बनाव, रहस्य *n*, एकी *f*.

UNDERTAKE *v.* engage in उचलणें, हातीं घेणें, पत्करणें; take solemnly upon one's self प्रतिज्ञेनें -करारानें घेणें.—*i.* हातीं घेणें, पत्करणें; promise वचन देणें, कबूल क.; for जामीन राहणें -होणें.—UNDERTAKER पत्करणारा, हातीं घेणारा; one who takes the charge and management of funerals प्रेतक्रियेची खटपट करणारा.—UNDERTAKING पत्करणें *n*, पतकर; काम *n*, कार्य *n*, धंदा.

UNDERTENANT पोटभाडेकरी.

UNDERVALUE *v.* कमी किंमत क.; esteem lightly तुच्छ -हलका मानणें.

UNDERWOOD झाडझुडूप *n*, झाडी *f*.

UNDERWRITER विमेदार, विमेकरी.

UNDESERVING *a.* नालायक, गैरलायक, अयोग्य, अपात्र.

UNDESIGNING *a.* निष्कपट, निष्कृत्रिम.

UNDESIRED *a.* अनपेक्षित.—UNDESIRABLE *a.* अनपेक्ष; विचार करायास अयोग्य.

UNDETERMINED *a.* अनिश्चित, अळमळीत, न ठरलेला; not limited अमर्याद, अपार.

UNDIGESTED *a.* अजीर्ण, अपक्व, कच्चा.

UNDISCIPLINED *a.* अशिक्षित, गैरसाळ.

UNDISGUISED *a.* उघडा, बिन पडद्याचा, निष्कपट

UNDISTURBED *a.* निरुपद्रव, निष्कंटक, उपद्रवरहित; थंड, अव्यग्र, स्वस्थ.

UNDIVIDED *a.* अखंड, सलग, सबंध.

UNDO *v.* reverse फिरवणें, उलटवणें; annul रद्द

क.; loose उघडणें, उकलणें, उलगडणें; ruin, as in reputation, morals, and the like नाश क., अब्रू वगैरेचा नाश क.; bring to poverty भिकेस मिळविणें; make void नाहींसा -न केलासा क. [by, with].

UNDOUBTED *a.* निस्संशय, निस्संशयाचा.

UNDRESS *v.* वस्त्रें -पांघुरणें -काढणें, पोशाक उतरणें; अलंकार उतरणें; *Med.* जखमेवरून मलम -पट्टी वगैरे काढणें.

UNDUE *a.* नालायक, गैरशिस्त, अयोग्य (proceeding); excessive बेसुमार, बेहद्द, अमर्यादः u. regard to the externals of religion; not due न द्यायाचा (a debt).

UNDULATE *v. i.* (*undula*, a little wave) हेलकावणें, हेलकावा खाणें.—*t.* हेलकावा देणें, हेलकावणें.—UNDULATION हेलकावा, उतारचढ; आंदोलन *n.*

UNDUTIFUL *a.* बेहुकमी, आज्ञा न मानणारा, दांडगा, स्वधर्मविमुख.

UNDYING *a.* न मरणारा, अमर : the u. soul; imperishable अविनाशी, अनश्वर.

UNEASINESS अस्वास्थ्य *n,* असुख *n,* असमाधान *n.*—UNEASY *a.* अस्वस्थ, असमाधानी, बेआराम; stiff in manners खळबळीतपणा वेगळा, आदराच्या डौलाचा, करडा, रांठ इ०.

UNEMPLOYED *a.* रिकामा, खाली, निरुद्योगी.

UNENLIGHTENED *a.* तेजहीन, हीनतेज; न सुधारलेला, अज्ञान, गव्हार.

UNENTITLED *a.* अनाधिकारी.

UNEQUAL *a.* उंचनीच, अधिकउणा, असम, विषम; inferior हलका; insufficient अपुरता, कोता, उणा [to]. -ED *a.* अप्रतिम, अद्वितीय, अपूर्व; inadequate असमर्थ, नालायक.

UNEQUIVOCAL *a.* स्पष्ट, व्यक्त; not of doubtful signification स्पष्ट, स्पष्ट अर्थाचा (words).

UNERRING *a.* अचूक; certain अचूकसंधानी, निभ्रांत [in].

UNESSENTIAL *a.* अनावश्यक, बिन जरुरीचा, गौण, अप्रधान.

UNEVEN *a.* उंचनीच; unequal असम, असदृश.

UNEXAMPLED *a.* अनुपम, अप्रतिम, अपूर्व.

UNEXCEPTIONABLE *a.* अबाध, निर्बाध, निर्दोष, चोख (character).

UNEXPECTED *a.* आकस्मिक, अकल्पित. -LY अकस्मात्, एकाएकीं.

UNEXPLORED *a.* अज्ञात, ज्याचा शोध केला नाहीं तो.

UNEXTINGUISHABLE *a.* न विझण्याजोगा, अशाम्य.

UNFADING *a.* अवीट, न विटणारा, न कोमणारा.

UNFAIR *a.* गैरवाजवी, खोट्या चालीचा, अप्रामाणिक [to].—UNFAITHFUL *a.* खोटा, बेइमान [to, in]. -NESS खोटेपणा, बेइमान *n*;—of a wife to her husband नवऱ्याशीं बेइमानी *f,* अपातिव्रत्य *n*;—of a husband to his wife बायकोशीं बेइमानीपणा.

UNFASHIONABLE *a.* लोकचालीविरुद्ध, लोकसंप्रदायविरुद्ध, गैर चालीचा -रीतीचा (dress, language).

UNFATHOMABLE *a.* तळ लागत नाहीं असा, अतळ, अगाध.

UNFAVORABLE *a.* अनिष्ट, अशुभ, अमंगळ; contrary उलटा, वांकडा; as wind समोरचा [to].

UNFEELING *a.* निर्दय, बेदर्द, कठीण, कठोर [to].

UNFEIGNED *a.* खरा, वास्तविक, निष्कपट.

UNFIT *a.* अयोग्य, अनुचित, नालायक, अनुपयुक्त. [for].—*v.* नालायक -अयोग्य क.

UNFIXED *a.* अनियमित, अनिश्चित.

UNFOLD *v.* उघडणें, उकलणें, पसरणें; reveal कळवणें, प्रगट क.

UNFORESEEN *a.* पूर्वीं न पाहिलेला, अनपेक्षित [by].

UNFORGIVING *a.* असोशिक, दीर्घद्वेषी, अक्षम.

UNFORTUNATE *a.* हतभाग्य, दुर्दैवी (man); हतभाग्याचा, अपेशाचा, अरिष्टाचा (measures, affairs) [in]. -LY *a.* दुर्दैवें करून [for].

UNFOUNDED *a.* न स्थापलेला, अस्थापित; न बांधलेला; vain पोकळ, व्यर्थ (hopes); baseless निराधार, निर्मूळ, मिथ्या.

UNFRIENDLY *a.* अनिष्ट; शत्रुभावाचा [to].

UNFRUITFUL *a.* निष्फळ (tree); barren वांझ, वंध्या (female); not producing good works व्यर्थ, वृथा, सत्कर्महीन (life); not fertile नापीक, भरड, रुक्ष (soil).

UNFURL *v.* (गुंडाळलेला) सोडणें, मोकळा क., सुरळी सोडणें (sails).

UNGAINLY* *a.* अडाणी, बेढब, बेसुरत (figures).

UNGENEROUS *a.* कृपण, अप्रशस्त मनाचा, हिमटा [to].

UNGIRD *v.* कंबरबंद सोडणें, कमर सोडणें.

UNGODLY *a.* अधार्मिक, देवनिंदक, दुष्ट; polluted by sin भ्रष्ट, पापलिप्त.

UNGOVERNABLE *a.* अनिवार.

UNGRACEFUL *a.* बेढब, विशोभित [in].

UNGRACIOUS *a.* अनुपकारी, निर्दय; unpleasant नावडता; unacceptable अमान्य.

UNGRATEFUL *a.* कृतघ्न, अनुपकारी, निमकहराम; unpleasing नावडता, अरुचिकर; as sounds कर्कश [to].

UNGUENT (*ungere*, to anoint) उटणें *n*, उटी *f*.

UNHANDY *a.* आडमुठ्या, नाकसबी; not convenient अडचणीचा, गैरसोयीचा (posture).

UNHAPPY *a.* असुखी, दुःखी; children sometimes render their parents u.; unlucky हतभाग्य, दुर्दैवाचा; affairs have taken an u. turn; calamitous अनर्थाचा, अरिष्टाचा, अशुभ [in].

UNHEALTHY *a.* रोगी; habitually indisposed सदारोगी; abounding with disease रोगाचा, रोगप्रचुर, रोगी (season); insalubrious रोगी, रोग आणणारा (climate); not resulting from health वाईट प्रकृतीचा -पासून झालेला.

UNHEARD *a.* न ऐकलेला, अश्रुत; obscure सांदीकोंदीचा [of].

UNHESITATING *a.* बेशक, अकुंठित [in].

UNHINGE *v.* बिजागरी -सांधा उखळणें; displace जाग्यावरून उचलणें -उठवणें; render unstable अस्थिर -चंचल क. (the mind).

UNHORSE *v.* घोड्यावरून पाडणें; घोड्यावरून उतरायास लावणें.

UNHURT *a.* दुखापत न झालेला, अनाहत; नुकसानी शिवाय; safe and sound सुरक्षित, सलामत [by].

UNICORN (*unus*, one, *cornu*, a horn) एकशिंगी कल्पित जनावर *n*.

UNIDIOMATICAL *a.* भाषणसंप्रदायविरुद्ध, अप्रशस्त.

UNIFORM (*unus*, one, *forma*, form) एका तऱ्हेचा -जातीचा; not different सारखा, समान. —*n.* एका मंडळीचा धंद्याचे -लोकांचा शिपायांचा वगैरे सारखा पोशाक; military u. बाणगुती *f*. -ITY समरूपता *f*, समसमानता *f*, बराबरी *f*, साम्य *n*.

UNIMAGINABLE *a.* कल्पने बाहेरचा, अतर्क्य, कल्पनातीत, अचिंत्य.

UNIMPAIRED *a.* साबीत, शाबूद, अक्षत, धड, निकोप.

UNINFORMED *a.* गैरमाहीत, अज्ञान, अजाण.

UNINHABITED *a.* उजाड, निर्जन, ओस, बेचिराग.

UNINSPIRED *a.* ईश्वरी प्रेरणा न झालेला, ईश्वरानें न प्रेरलेला [by].

UNINSTRUCTED *a.* अशिक्षित, अनक्षर.

UNINTELLIGENT *a.* बुद्धीचा जड -मंद.

UNINTELLIGIBLE *a.* समजायास कठीण, दुर्बोध, दुर्ज्ञेय.

UNINVITED *a.* न बोलावलेला, अनाहूत [by].

UNION (*unus*, one) junction जोड, संबंध, संधि; harmony एकी *f*, एकोपा, ऐक्य *n*; con-

federation कट, कूट; [hypostatical u. *Theol.*, the personal union of the divine and human natures in Christ, that is, so as to constitute one person with two natures] [with].

UNIQUE *a.* (do.) अनन्य, असाधारण, एकमात्र.

UNIT (do.) एक, एकांक; एकं.—UNITARIAN, one who denies the doctrine of the Trinity अत्रैक्य तत्ववादी, 'युनितेरियन.'—*a.* युनितेरियन मताचा.—UNITE *v.* जोडणें, मिळवणें; join by legal or moral bond जोडणें, एक क. [with, in, together, against].—*i.* मिळणें, एक होणें; एकचित्त -मत होणें, जुटणें. —UNITED जोडलेला, संयुक्त; एकचित्त. -LY *ad.* मिळून, मिळणीनें.

UNISON (-*sonus*, a sound) मेळ, मिलाफ, जम; *Mus.* स्वरांचा मेळ, एकताल.—UNITY एकपणा, ऐक्य *n*; concord ऐक्य *n*, एकी *f*; *Poet.* and *Rhet.* विषयांचें ऐक्य *n*, मिलाफ, संविधान *n*.

UNIPAROUS *a.* (*unus*, one, *parere*, to bring forth) producing one at a birth एकप्रसू.

UNISON, See under UNIT.

UNIVERSE (*unus*, one, *vertere*, to turn) all created things viewed as constituting one system or a whole विश्व *n*, जग *n*, सकल सृष्टि *f*, सृष्टि *f*; pervading the u. विश्वव्यापक; lord of the u. विश्वेश्वर; soul of the u. जगदात्मा.—UNIVERSAL *a.* सर्व ठिकाणचा, सर्वांचा, सार्वजनिक, सार्वत्रिक (good); total सर्व, अखंड, सगळा (frame); comprising particulars सामान्य, साधारण (terms); u. Church, the whole Church of God in the world यावत् ख्रिस्ती मंडळी *f*, सार्वत्रिक मंडळी *f*. -ITY सर्वव्यापकत्व *n*; सर्वसाधारण्य *n*, सर्वांचा संबंध. -LY *ad.* सर्वत्र, सर्व ठिकाणीं; सर्वांस, सर्वांनीं: God's laws are u. binding on his creatures.—UNIVERSITY, an assemblage of colleges established in any place with professors for instructing students in the science and other branches of learning, and where degrees are conferred पाठशाळा समाज, 'युनिवर्सिटी' *f*, शाळामंडळ *n*; a universal school, in which are taught all branches of learning, or the four faculties of theology, medicine, law, and the sciences and arts सर्व विद्यालय *n*, 'युनिवर्सिटी' *f*.

UNJUST* *a.* अन्यायी, अधर्मी (man); अन्यायाचा, अधर्माचा, गैरवाजवी; in comp. अन्याय (actions) [to].

UNKIND *a.* उपकारशत्रु; निर्दय, स्नेहहीन, कठीण मनाचा [to]. -NESS अवकृपा *f*.

UNKNOWN *a.* अज्ञात, अनोळखीचा; u. quantity अव्यक्तराशि *f* [to].

UNLADE *v.* ओझें उतरणें, भार काढणें; ओझें -भरताड काढणें, रिकामा क. (Acts xxi. 3).

UNLAWFUL *a.* अशास्त्र, शास्त्रविरुद्ध; an u. assembly, *Law* कायद्या विरुद्ध -बंडाळीची सभा *f* दंगल.

UNLEARNED *a.* अविद्वान्, अनक्षर; not known अज्ञात; not suitable to a learned man विद्वानास अयोग्य (verses).

UNLEAVENED *a.* बेखमिराचा, बेखमीर, न फुगलेला (bread).

UNLESS *conj.* (*un* & *less*) नाहींतर, वांचून, खेरीज, शिवाय.

UNLIKE *a.* निराळा, भिन्न. -LY *a.* न होण्याजोगा, असंभाव्य; with neg. con. अगाध.

UNLIMITED *a.* अमर्याद, अपार; undefined अलक्षित, साधारण, सामान्य [by].

UNLOCK *v.* कुलूप उघडणें -काढणें; उघडणें, उघडा क.

UNLOOKED-FOR *a.* अतर्क्य, आगेवांचून, अनपेक्षित.

UNLUCKY *a.* हतभाग्य, दग्धहस्ती (man); दुर्दैवाचा, अपेशाचा (adventure); inauspicious अशुभ, अमंगळ, अभद्र (day) [in, at].

UNMAN *v.* emasculate वीर्यहीन क.; disheartened धैर्यहीन -हतवीर्य क.; deprive of men मनुष्यहीन क.;—a town उजाड क. -LY *a.* पुरुषास अयोग्य, नामर्दीचा; base नीच, अधम; cowardly भित्रा, गांडू.

UNMANNERLY *a.* गैरशिस्त, असभ्य, दांडगा, दांडगे चालीचा (a youth).

UNMARRIED *a.* अविवाहित, सडा, अवरठा;—woman सडी *f*, अनूढा *f*.

UNMASK *v.* पडदा -मुखवटा काढून रूप दाखविणें, उघडा क.

UNMEANING *a.* अर्थहीन, निरर्थक, पोकळ (words); not indicating intelligence बुद्धिहीन, मंद, जड.

UNMEASURABLE *a.* अपरिमेय, अपरिमित.

UNMEASURED *a.* अपरिमित, असंख्य, अपार [in].

UNMERCIFUL *a.* निर्दय, क्रूर; exorbitant भारि, जड (demands).

UNMINDFUL *a.* गाफिल, गैरसावध; careless बेफिकीर, निष्काळजी.

UNMINGLED *a.* बिन मिसळीचा, अमिश्रित, निर्भेळ, निरा, शुद्ध.

UNMOLESTED *a.* निरुपद्रव, उपद्रवरहित.

UNMOOR *v.* गलबताचा नांगर काढणें.

UNNATURAL *a.* गैर रीतीचा, मनुष्य धर्मास विरुद्ध; contrary to the laws of nature सृष्टिनियमा -धर्मा विरुद्ध, सृष्टिविरुद्ध; acting without the natural affection निर्दय, ममताहीन (a father).

UNNECESSARY *a.* बिनजरूरीचा, निष्कारण, अप्रयोजक, निराकारण.

UNNEIGHBOURLY *a.* शेजारधर्मास वांकडा, निर्दय, ममताहीन.

UNNERVE *v.* बळ-जोर मोडणें अशक्त, -नवळा क.

UNNUMBERED *a.* अगणित, असंख्य.

UNOBJECTIONABLE *a.* निर्बाध, अबाधित.

UNOBSERVED *a.* न पाहिलेला, अलक्षित [by].

UNOBTAINABLE *a.* दुर्लभ, दुर्मीळ.

UNOCCUPIED *a.* रिकामा, रिता, खाली.

UNOFFENDING *a.* निरुपद्रविक, गरीब.

UNORGANIZED *a.* निरवयव, घटना -रचना रहित, निरिंद्रिय: metals are u. bodies.

UNOSTENTATIOUS *a.* बिन डौलाचा, साधा.

UNPALATABLE *a.* अरुचिकारक, बेचव; disagreeable नावडता, अप्रिय [to].

UNPARDONABLE *a.* अक्षम्य *n*, माफी करण्यास अयोग्य.

UNPERCEIVED *a.* न पाहिलेला, लक्षांत न आलेला [by].

UNPERFORMED *a.* न केलेला, अकृत.

UNPHILOSOPHICAL *a.* अयुक्तिक.

UNPIN *v.* टांचणी काढणें, टांचण्या काढून मोकळा क. (a frock); खीळ -खुंटी -काढणें.

UNPLEASANT *a.* नावडता, अप्रिय.

UNPOLISHED *a.* असभ्य, अशिष्ट, रानटी; बिन नक्शीचा, साधा.

UNPOPULAR *a.* लोकांस न आवडण्या सारखा -नावडता.

UNPRACTICED *a.* गैरवहिवाटलेला, अनभ्यस्त, अनभ्यासी, नवा, कोरा.

UNPRECEDENTED *a.* अपूर्व, नवा, मागें न झालेला; ज्यास मागचा आधार -प्रमाण नाहीं तो.

UNPREJUDICED *a.* बिन पिळाचा -गांठीचा, साफ -मोकळ्या मनाचा [by].

UNPREMEDITATED *a.* अकल्पित, अचिंतित.

UNPRINCIPLED *a.* दुराचारि, बदफैल, बेचाल [in].

UNPRODUCTIVE *a.* नापीक (land); fruitless निष्फळ, बिन हांशिलाचा, निरर्थक; not profitable गैरफायद्याचा, बिन नफ्याचा, निरर्थक [of].

UNPROFITABLE *a.* बिन नफ्याचा, गैरफायदा, व्यर्थ, रिकामा.

UNPROPITIOUS *a.* अशुभ, अमंगळ.

UNPROTECTED *a.* उघडा, निराश्रित, अनाथ;—as a country बिन बंदोबस्ताचा, उघडा [by].

UNQUALIFIED *a.* नालायक, अयोग्य, अनधिकारी; not having taken the requisite oath or oaths शपथ न घेतलेला -वाहिलेला; unconditional बिन अटीचा, मोकळा, सरळ, प्रशस्त (praise).

UNQUENCHABLE *a.* अशाम्य, न विझण्याजोगा, अशमनीय.

UNQUESTIONABLE *a.* निस्संशय, निस्संदेह.

UNREASONABLE *a.* गैरवाजवीचा, अयुक्तिक; exorbitant अतिशय, बेसुमार, अति, फारच: u. love of life or money.

UNRELENTING *a.* कठोर, कडवा, निर्दय, कठीण; inflexibly rigid अति कठीण, करडा, कडक (rule).

UNREMITTING *a.* एकसारखा, न खोळंबता, सतत, अखंड (exertions).

UNRESERVED *a.* मोकळ्या मनाचा, खळबळीत, असंकोची; full पुरा, अनन्य, पूर्ण, अखंड (obedience) [in].

UNRESISTING *a.* अप्रतिकारक अनिवारक.

UNRESTRAINED *a.* बेबंद, बेलाग, अनावर; खळबळीत [by].

UNRIGHTEOUS *a.* अधर्मी, दुष्ट; unjust अन्यायाचा, अधर्माचा (sentence).

UNRIPE *a.* कोवळा, हिरवा, कच्चा [for].

UNRIVALLED *a.* अप्रतिम, अनुपम [in].

UNROLL *v.* गुंडाळी उकलणें, सोडणें (cloth); दाखविणें, दृष्टीस पाडणें.

UNROOF *v.* छप्पर काढणें, उस्तरणें.

UNRUFFLED *a.* संत, शांत.

UNRULY *a.* शिरजोर, दांडगा, बेहुकमी.

UNSAFE *a.* जोखमाचा, सभय.

UNSANCTIFIED *a.* अपवित्र; असंस्कृत, अप्रतिष्ठित.

UNSATISFACTORY *a.* बिन खातरीचा, नापसंतीचा. —UNSATISFIED *a.* अतृप्त, नाखुश.

UNSAVORY *a.* बेचव, पाणचट, निरस; disgusting *a.* कंटाळवाणा, त्रासदायक, ओंगळ.

UNSAY *v.* बोलणें, माघारें घेणें.

UNSCRIPTURAL *a.* अशास्त्र, शास्त्रविरुद्ध.

UNSEARCHABLE *a.* अतर्क्य, दुर्ज्ञेय, गूढ: the counsels of God are to us u.

UNSEASONABLE *a.* अवेळेचा, अवकालिक, अकालिक (hour); late उशिरानें आलेला, विलंबित; ill-timed कुवेळचा, भलत्याच वेळचा.

UNSEEMLY *a.* नालायक, अयोग्य; indecent अमर्याद, निर्लज्ज.

UNSEEN *a.* न पाहिलेला, अदृष्ट; invisible न दिसणारा, अदृश्य: the u. God.

UNSERVICEABLE *a.* कामांतून गेलेला, निकामी, निरुपयुक्त, रद्द.

UNSETTLED *a.* ठराव न झालेला, अस्थापित; बिन बंदोबस्ताचा, अव्यवस्थेचा; चंचळ, अस्थिर.

UNSHOD *a.* अनवाणी.

UNSIGHTLY *a.* बेढब, विशोभित.

UNSHEATH *v.* म्यानांतून काढणें, तरवार उपसणें; to u. the sword लढाई क. -चालू क.

UNSKILFUL *a.* अडाणी, नाकसबी, अडमुठ.

UNSOCIABLE *a.* एकलकोंड्या, माणूसघाण्या.

UNSOUND *a.* नुकसान, फुसका (timber); infirm अधू, अशक्त (constitution); not orthodox अशास्त्र, पाखांडी (doctrines); dishonest अप्रामाणिक, खोटा, कुजका; not close पातळ, विरळ (cheese); not sincere कपटी, कप, टाचा, कृत्रिमी (love); erroneous चुकीचा-भ्रांतीचा (agreement); not calm अस्वस्थ, तळमळीचा (sleep); questionable संशय धरण्याजोगा (credit) [in, of].

UNSPEAKABLE *a.* अनिर्वाच्य, सांगतां येत नाहीं असा.

UNSPOTTED *a.* बिनडाग, चोख, निष्कलंक, निर्मळ (reputation).

UNSTEADY *a.* चंचळ, क्षणिकबुद्धि, अस्थिर.

UNSTRING *v.* तारा काढणें -सोडणें (a harp); loosen सैल क.; take from a string दोरीं-तून -सरांतून काढणें (beads).

UNSUBDUED *a.* अजित, न जिंकलेला; अजितेंद्रिय (passions).

UNSUBSTANTIAL *a.* निर्जीव, पोकळ, निःसार; not real खोटा, अवास्तविक.

UNSUCCESSFUL *a.* ज्याचें कार्य -सार्थक झालें नाहीं तो, अप्राप्तयश (person); निष्फळ, व्यर्थ (measures) [in, with, at].

UNSUITABLE *a.* नालायक, निरुपयोगी: timber u. for a bridge; proper अयोग्य, नालायक, अनुचित: a dress u. for a clergyman [for, to].

UNTAUGHT *a.* अशिक्षित, अशिष्ट [by].

UNTHINKING *a.* अविचारी, अविवेकी; अविचा-राचा.

UNTIDY *a.* अव्यवस्थित, भोंगळ, नेभळा [in].

UNTIE *v.* सोडणें, मोकळा क.; let loose सोडून देणें; loosen from coils वेंटाळें सोडविणें; unfold मोकळा क., उलगडणें.

UNTIL* *prep.* पर्यंत, पावेतों.

UNTIMELY *ad.* अवेळीं, अकाळीं, काळापूर्वी.

UNTOUCHED *a.* अस्पष्ट; not affected by use कोरा, अचळ [by].

UNTOWARD, UNTRACTABLE *a.* शिरजोर, बेहु-कमी, वांकडा, दंडेल.

UNTRUE *a.* असत्य, खोटा, मिथ्या.

UNUSUAL *a.* रितीविगळा, गैर वहिवाटीचा, असा-धारण, विरळ [for].

UNUTTERABLE *a.* अवाच्य, सांगतां येत नाहीं असा.

UNVEIL *v.* बुरखा -पदर काढणें.

UNVIOLATED *a.* न मोडलेला, अभंग; न भ्रष्ट केलेला, शुद्ध [by].

UNWARRANTABLE *a.* अधिकारा वांचूनचा, बिन सत्तेचा; illegal बेकायद्याचा; unjust अन्या-याचा, अधर्माचा; improper अयोग्य, अनु-चित.

UNWELL *a.* असमाधानी, अस्वस्थ, कांहींसा आजारी.

UNWHOLESOME *a.* वावडा, अपथ्य, अपथ्यकार-क (food, air); pernicious अपकारक, अहितकारक, दुष्ट, वाईट (advice).

UNWIELDY *a.* अटोपसार नव्हे तो, ऐवट, अवजड, बोजड [in].

UNWILLING *a.* नाखुश, नाराजी, नाकबूल; नाखु-शीचा. -NESS नाराजी *f*, नाखुशी *f*.

UNWISE *a.* वेडा, मूर्ख; वेडपणाचा, अविचाराचा-मूर्खपणाचा (manners).

UNWITTINGLY *ad.* न जाणतां, नसमजून, चुकून, he has u. injured himself.

UNWORTHY *a.* अयोग्य, अपात्र; हलका, नीच [of].

UNWRITTEN *a.* न लिहिलेला, तोंडचा, in comp. मुख; blank कोरा.

UP* *ad.* वर, वरतीं; out of bed निजून उठलेला; in a state of approaching to the whole amount भर, शेर; completely पुरा, पुरता, पूर्ण, अगदीं: to eat u. खाऊन टाकणें; to burn u. जाळून फस्त क.: u. let us go चला -उठा आपण जाऊं; it is all u. with him तो आ-टपला -वारला; the time is u. वेळ भरला, वेळ झाली -आली; to blow u. फुगविणें, ताणणें; खरडपट्टी काढणें, खूप घेणें; to come u. with मागून येऊन पोंचणें, गांठणें; पुरा पडणें, अटोप-णें; to draw u. रांगेनें -व्यवस्थेनें उभा क. -रचणें इ०; u. and down खालींवर; मागें पुढें.—*prep.* वर, वरतीं; [u. the country, in a direction towards the head of a stream or river].

UPBRAID* *v.* दोष लावणें -ठेवणें, निंदणें [with].

UPHEAVE *v.* वर उचलणें.

UPHOLD *v.* वर उचलून धरणें; support आश्रय देणें, न पडूं देणें : honor shall u. the humble in spirit (Prov. xxix. 23); defend मंडन -प्रतिपादन क.; countenance पाठ राखणें, मेहेरबानी क.

UPHOLSTERY (corrup. from UPHOLDER) खुर्च्या, पलंग, मेज, वगैरे सामान पुरवणारा, बोहरी.

UPLAND माळजमीन *f,* पठार *n.*—*a.* माळजमिनीवरचा; माळजमिनीचा (pasture).

UPLIFT *v.* उचलणें.

UPON* *prep.* वर, वरता, वरतीं.—See ON.

UPPER* *a.* वरचा; वरचा, वरिष्ठ, श्रेष्ठ : u. house of a legislature. -HAND वरचढपणा, वर्चस्व *n.* -WORLD, atmosphere अंतराळ *n,* आभाळ *n;* heaven आकाश *n,* स्वर्ग *n;* this world in distinction from the *under world* पृथ्वी *f,* जग *n,* दुनिया.

UPRIGHT *a.* उभा, सडक; honest नेकीचा, उजू, रास्त, प्रमाणिक, न्यायी (conduct, man).

UPROAR*, great tumult गलबला, कल्ला, बंडाळी *f,* गलका (Acts xvii. 5).

UPROOT *v.* मुळासुद्धां ·समूळ उपटणें, निर्मूळ क., अगदीं काढून टाकणें.

UPSET *v.* पालथा क., कलंडणें, लवंडणें.—*i.* उलटणें, कलंडणें, लवंडणें.—*a.* उलटलेला; विकायास ठेवलेला, विकाऊ.

UPSHOT* परिणाम, पर्यवसान *n,* शेवट.

UPSIDE वरली बाजू *f;* u. down उलटा, उफराटा.

UPSTART एकाएकीं श्रीमंत झालेला, आजकालचा.

UPTRAIN [a train on railways, which goes towards the main terminus].

UPWARD *ad.* वर, वरतीं, आकाशाकडे.—*a.* वरचा, उपरिस्थ.—UPWARDS *ad.* वर; वरच्या भागीं; अणखी; u. of -हून अधिक, -च्यावर : u. of twenty years.

URBAN *a.* (*urbs, urbis,* a city) शहरी, नागरिक, पोर. -ITY माणुसकी *f,* सौजन्य *n,* गृहस्थपणा.—URBANE *a.* शिष्ट, सभ्य, भला.

URCHIN (*ericius*) पोर, पोरटा, ठेंगू, चिटालिंग.

URGE *v.* (*urgere*) push निकट -नेट लावणें, ताण देणें; press upon attention गळीं पडणें, आग्रह क., गळ घालणें; follow closely लगोलग -पाठोपाठ जाणें [to, on].—URGENCY निकड *f,* जरुरी *f,* तांतड *f.*—URGENT *a.* निकडीचा, जरुरीचा, तांतडीचा. -LY *ad.* निकडीनें, तांतडीनें.

URINE (*urina, Skr. vári,* water) मूत *n, m.* विराखत *f,* मूत्र *n.*—URETER मूत्रपिंडापासून मूत्राशयास मूत्र नेणारी वाहिनी. *f.*—URETHRA मूत्राशयापासून मूत्रविसर्जन करविणारी वाहिनी *f,* मूत्रपथ.—URINARY *a.* मूत्राचा; मुतासारखा. मूत्रधर्मक; u. affection मूत्रदोष.—*n.* मुताट *n,* मुतरी *f.*

URN (*urna*) चंबू; a vessel in which the ashes of the dead were formerly kept चिताभस्मपात्र *n.*

URSA (*L.* a she-bear) अस्वल *n;* u. Major सप्तऋषि *pl.*

USE *v.* (*usus*) employ कामास -लावणें, वापरणें; practice अभ्यास -राबता -वहिवाट ठेवणें; treat -शीं वागणें -वर्त्तणें; take घेणें, सेवन क.; up खर्चणें, खलास क., कस -जोर -जीव न ठेवणें.—*i.* वहिवाट -चाल -सराव असणें.—*n.* वहिवाट *f,* वापर; अभ्यास, सराव, राबता; utility उपयोग, काम *n;* need गरज *f,* प्रयोजन *n,* काम *n;* custom चाल *f; Law,* profit of lands and tenements जमिनीचें उत्पन्न *n,* भाडें *n,* [for, of]. -FUL *a.* कामाचा उपयोगाचा, उपयुक्त, उपयोगी [for, to]. -FULNESS उपयोगीपणा, काम *n,* उपयुक्तता *f.* -LESS *a.* निरुपयोगी, अप्रयोजक, निकामी [for, to].—USAGE चाल *f,* वागणूक *f;* वहिवाट *f,* धारा *f;* customary use, as of a word in a particular sense शब्दाचा प्रचार

-ची रूढि *f*, रूढ *f*; family u. कुलाचार; u. of a country देशाचार;—of a people लोकाचार.—USUAL *a*. चालीचा, वहिवाटीचा, शिरस्त्याचा, सांप्रदायिक. -LY *ad*. बहुधा, बहुतकरून, प्रायः.

USHER *F*. officer whose business it is to introduce strangers, or to walk before a person of rank भालदार, छडीबरदार; officer or servant who has the care of the door of a court, hall, chamber, &c. परवानगीबरदार, द्वारपाळ; under-teacher उपशिक्षक, मालचाट्या.—*v*. मुलाखत -ओळख -भेट करविणें [in].

USUFRUCTUARY (*usus*, use, *fructus*, fruit) उत्पन्न खाणारा, भोक्ता.

USURP *v*. (*usus*, use, *rapere*, to seize) बळकावणें, दपटणें. -ATION बळकावणें *n*, आक्रमण *n*, अपहरण *n*;—of the throne राज्यापहरण *n*, गादी बळकावणें *n*. -ER बळकावणारा, दपटणारा.

USURY (See USE) interest व्याज *n*; exorbitant interest भारी व्याज *n*.—USURER व्याजबट्याचा व्यापार करणारा; व्याजखाऊ, जबर व्याज घेणारा -खाणारा.

UTENSIL (do.) implement आऊत *n*, शस्त्र *n*, हातेर *n*; vessel used in a kitchen भांडें *n*, हांडी *f*; culinary utensil हांडीभांडीं *n pl*.

UTERINE *a*. (*uterus*, the womb) गर्भाशयाचा; born of the same mother, but by a different father सहोदर.—UTERUS (*L*.) गर्भाशय.

UTILITY (*utilis*, useful) उपयोग, हित *n*, गुणः the u. of medicines [to].—UTILITARIANISM [the doctrine that the greatest happiness of the greatest number should be the end and aim of all social and political institutions; the doctrine that virtue is founded in utility; the doctrine that utility is the sole standard of morality].—UTILITARIAN [one who holds the doctrine of utilitarianism].

UTMOST* *a*. last सरशेवटचा; of the highest degree परम, परमावधीचा (happiness); u. limit परम मर्यादा *f*, परमावधि *f*; at the u. निदानीं, शेवटीं.—*n*. सरशेवट; पराकाष्ठा *f*, बेहद *f*.

UTTER* *a*. पुरा, पुरता, पूर्ण (ruin); absolute अगदीं, निखालस, साफ (refusal); mere केवळ, अगदीं: they are u. strangers to these thoughts. -LY *ad*. निखालस, अगदीं, साफ. -MOST *a*. अखेरचा, शेवटचा; परमावधीचा.—*n*. पराकाष्ठा *f*, परमावधि *f*.

UTTER *v*. *Ger*. speak उच्चारणें, बोलणें; divulge बोलणें, तोंडावाटे काढणें, फोडणें; put in circulation चालवणें, वापरणें (coin). -ABLE *a*. उच्चारायाजोगा, उच्चारणीय. -ANCE उच्चारण *n*, उद्गार, उल्लेख.

UVULA (*uva*, a grape) पडजीभ *f*, लोळा.

UXORIOUS *a*. (*uxor*, a wife) submissively or excessively fond of a wife बाईलबुद्ध्या, स्त्रीलंपट, स्त्रैण. -NESS बायकोचें वेड *n*, भार्यासक्ति *f*.

V

VACANT *a*. (*vacare*, to be empty) रिकामा, खाली, रिता; unemployed रिकामा, फुरसतीचा; not filled with an incumbent खाली, रिकामा (throne, post, &c.); thoughtless अविचाराचा, विचारशून्य; *Law*, abandoned फरारी (estate).—VACATE *v*. रिकामा -खाली क. -करून देणें; annul रद्द क. (a charter).—VACANCY रिकामेपणा; रिकामी जागा *f*, शून्य स्थळ *n*, पोकळी *f*; leisure अवकाश, फुरसत *f*; gap खिंड *n*, भगाड *n*; place unfilled रिकामी जागा *f*, असामी *f*, जागा *f* [of, for].—VACATION रिकामा क. *n*; रद्द क. *n*; अवकाश, रिकामपण *n*; recess of courts, schools, &c. कोर्टांची -शा-

ळेची सुटी -बंदी *f*; सुटीचे दिवस *pl* -चा वेळ. —VACUIST, one who holds to the doctrine of a vacuum in nature शून्यवादी.—VACUITY शून्यता *f*; रिकामी जागा *f*, पोकळी *f*. —VACUOUS *a.* पोकळ, रिकामा.—VACUUM शून्य *n*, पोकळी *f*, निर्वात स्थळ *n*.

VACCINE *a.* (*vacca*, a cow) गाईचा, गव्य.—VACCINATE *v.* देवी काढणें.

VACILLATE *v.* (*vacillare*) waver झोंके खाणें, डोलणें; fluctuate in mind नानूं -कांकूं क., घटमळणें, गुरपटणें.—VACILLATION चंचलता *f*, धरसोड *f*.

VAGABOND *a.* (*vagus*, strolling) floating तरता, उडता, भटकता; wandering भटक्या, हिंडता, उडाणटप्पू, भटक्या.—VAGARY लहर *f*, हुक्की *f*, तरंग, वेड *n*.—VAGRANT *a.* उडाणटप्पू, भटक्या; चंचल (course).—*n.* भटकत फिरणारा.—VAGRANCY उनाडकी *f*, उनाडपण *n*.

VAGINA (*L.*) योनि *f*.

VAGUE *a.* (*vagus*) indifferent मोघम, पळपळीत; unauthorized अप्रमाणाचा, निराधार, पोकळ, उडत (report).

VAIN *a.* (*vanus*) void पोकळ, रिता, निरर्थक (excuse); ineffectual व्यर्थ, वृथा, पोकळ, लटका (force); inflated बढाईखोर, पत्राजी, दिमाखी; showy दिखाऊ, दर्शनी; in v. व्यर्थ, फुकट; to take the name of God in v., use the name of God with levity or profaneness देवाचें नाम व्यर्थ घेणें [of]. -GLORIOUS *a.* दिमाखीचा, दिमाखदार, पत्राजी. -GLORY तोरा, पत्राज *f*, फुशारकी *f*, शेखी *f*. -LY *ad.* व्यर्थ, वावगा, वायां; रिता, पोकळ; दिमाखानें, अभिमानानें; foolishly मूर्खपणानें. -NESS पोकळपणा, व्यर्थता *f*; अभिमान, बढाई *f*.—VANITY व्यर्थता *f*, दिमाख, पोकळडौल; खोटेपणा, लटकेपणा; unsubstantial enjoyment खोटें -पोकळ सुख *n*; terms expressive of v. पाण्यावरचा बुडबुडा, काजव्याचा उजेड, दुपारची सावली *f*; idle show पोकळ बडिवार, रिकामी खटपट *f*; v. fair मायापुरचा बाजार.

VALE, VALLEY (*vallis*) दरी *f*, दरा, खोरें *n*; plain bordering on a river थड (गंगथड -डी).

VALEDICTION (*vale*, farewell, *dicere*, to say) जाते वेळचा निरोप घेणें *n*, विचारणें *n*, शेवटचा सलाम.—VALEDICTORY *a.* जाते वेळचा, निरोप घेण्याचा, शेवटचा सलाम करण्याचा -सलामीचा.

VALET *F.* हुजऱ्या, खिदमतगार.

VALETUDINARIAN *a. f, n.* (*valere*, to be strong) जन्मरोगी, सदारोगी, पिंडरोगी.

VALIANT *a.* (do.) पराक्रमी, शूर; पराक्रमाचा, वीर्याचा (actions).—VALOR पराक्रम, शौर्य *n*. -OUS *a.* पराक्रमी, शूर.

VALID *a.* (do.) weighty जोराचा, प्रबल, बळकट (argument); *Law*, having legal strength व्यवहाराचा, उपयोगी, व्यवहारोपयोगी. -ITY मजबुती *f*, बळकटी *f*, उपयोग.

VALUE (do.) worth योग्यता *f*, मान *n*, किंमत *f*, मोल *n*; import अर्थ; price किंमत *f*.—*v.* किंमत क. ठरवणें; गणणें, मानणें, लेखणें [at, for].—VALUABLE *a.* मोलवान, मोठे मोलाचा; योग्य, सन्माननीय (friend) [for].—VALUATION किंमत ठरवणें *n*; किंमत *f*, किंमतीचा आकार, (Bombay word) 'वलिसांव' *n*.

VALVE (*valva*, the leaf of a door) दुतलफीदार *n*; cover to open in one direction and close in another कळीचें दार *n*, जिव्हाळी *f*.

VAMP *v. F.* (जोडा) नवा जुना क.; दुरुस्त क., डागडुजी क. [up].

VAN *F.* फौजेची आघाडी *f* -चें तोंड *n*, बिनी *f*. -GUARD बिनी *f*.

VANE* वायुगतिदर्शक यंत्र *n*.

VANISH *v. i.* (*vanus*, empty) disappear

नाहींसा होणें, अदृश्य होणें, अंतर्धान पावणें; be lost नाश पावणें, नष्ट होणें [from, away].

VANITY, See under VAIN.

VANQUISH *v.* (*vincere*) subdue in battle लढाईत जिंकणें; defeat in any contest जिंकणें, मोड क., खंडन क. [by, in].

VANTAGE-GROUND *F.* वर्चस्व *n*, वर्चढ, वरकस *f*.

VAPID *a.* (*vapor*, steam) फिका, पाणचट, पचपचीत.

VAPOR (*L.*) an elastic fluid rendered æriform by heat वाफ *f*; smoke धूर; vain imagination वृथा कल्पना *f*.—*v.* वाफ होणें; boast बढाई क., फुरफुरणें, तमतमणें. -OUS *a.* वाफेचा, बाष्पमय; flatulent वावडा, वातुल; unreal असत्य, लटका, खोटा.—VAPORY *a.* वाफेचा, बाष्पमय; peevish किरकिऱ्या, किटकिट्या.

VARICOSE *a.* (*varus*, bent, *Gr. kule*, tumor) रक्ताचे नाडीवर गांठ आलेला, शिराशोथ.

VARNISH *F.* a glossy liquid substance रोगण *n*, लुकण *n*; glossy appearance तुकतुकी *f*; outside show लावा, अर्थवाद.—*v.* रोगण लावणें; लावालावी क., बनावणें, तिखट मीठ लावून सांगणें [with, over].

VARY *v.* (*variare*) फिरवणें,पालटणें; exchange अदलाबदल क.; diversify रूपांतर क.—*i.* फिरणें, पालटणें; अंतर -फरक -भेद असणें; alternate पाळीपाळीनें येणें, आळीपाळीनें घडणें; deviate अंतर -फरक असणें; disagree मतभेद पडणें -असणें [from].—VARIABLE *a.* पालटण्याजोगा; चंचळ, अस्थिर. -NESS चंचलता *f*, चांचल्य *n*.—VARIANCE भेद, फरक, अंतर *n*; dissension कलह, वांकडें *n*, वैमनस्य *n*, बेबनाव.—VARIATE *v.* बदलणें, वेगळा क. —VARIATION पालट, फेर, भेद; अंतर, तफावत *f*; *Gram.* रूपांतर *n*, प्रत्ययांतर *n*;—of time and place, to calculate for चालन *n*.—VARIEGATE *v.* चित्रविचित्र क.—VARIEGATION वैचित्र्य *n*, नानारंग.—VARIETY चित्रविचित्रपणा, विचित्रता *f*; भेद, अंतर *n*; नाना प्रकार *pl*; one of many different kinds प्रकार, तऱ्हा. —VARIOUS *a.* नाना प्रकारचा, तऱ्हतऱ्हेचा, नानाविध. -LY *ad.* नाना प्रकारें -नें, परोपरी.

VASE (*vas, vasum*) a vessel of various forms and materials, for domestic purposes and anciently used for sacrificial uses पात्र *n*, भाजन *n*; चंबू, वाटी *f*, प्याला, गंगाळ *n*, तस्त *n*, इ०; [a solid piece of ornamental marble representing in form an ancient vase].—VASCULAR *a.* नाडीमय, नाडीचा (functions).

VASSAL *F.* a feudatory जाहागीरदार, मोकासदार; subject रयत *f*, प्रजा *f*, कूळ *n*; slave गुलाम. -AGE ताबेदारी *f*; रयतावा.

VAST *a.* (*vastus*) फार मोठा, अवजड; great in number पुष्कळ, मोठा (army); mighty भारी, बळकट (labor); great in importance मोठा, भारी (concern). -LY *ad.* फारच, अतिशय.

VAT* मोठें पिंप *n*; एक माप *n* आहे.

VAULT (*volvere*, to roll) a continued arch घुमट; a cell तळघर *n*, भुंयार *n*; a leap उडी *f*; v. of heaven नभोमंडळ *n*.—*v.* घुमटाकार क.; उडी मारणें; उडी मारून चढणें [over].

VAUNT *v.* (*vanus*, vain) फुशारकी -शेखी मिरवणें, वल्गना क. [of].—*n.* बढाई *f*, फुशारकी *f*.

VEAL (*vitulus*, a calf) गोवत्समांस *n*, गायीच्या वासराचें मास *n*.

VEER *v. i. F.* तोंड -दिशा फिरवणें -बदलणें [about, round].

VEGETABLE (*vegetare*, to enliven) a plant औषधि *f*, वनस्पति *f*; esculent भाजी *f*, शाकभाजी *f*, तरकारी.—*a.* औषधीचा, वनस्पतीचा; भाजीपाल्याचा, भाजीचा.—VEGETATE *v.* मोड -अंकुर -कोंब फुटणें.—VEGETATION मोड फुटणें *n*. अंकुरोद्भव; vegetables in general गवत *n*, झाड *n*, हिरवळ *f*, तृणजाति *f*.

VEHEMENT *a.* (*ve*, privation, *mens*, the mind) impetuous प्रचंड, जोराचा, झपाट्याचा (wind); very ardent आवेशी, खंदा, कडक.—VEHEMENCE जोर *n*, बळ *n*, झपाटा, तडाखा; आवेश, तलखी *f*.

VEHICLE (*vehere*, to carry) carriage वहन *n*, वाहन *n*, यान *n*; गाडी, पालखी वगैरे; a substance in which medicine is taken अनुपान *n*; that which is used as an instrument of conveyance or communication मार्ग, वाट *f*, उपायः a simple style forms the best v. of thought to a popular assembly.

VEIL (*velum*) आडपडदा; screen पडदा; —to hide or protect the face मुखवस्त्र *n*, बुरखा, पदर इ०; disguise मुखवटा.—*v.* पडदा घालणें; लपविणें, छपविणें.

VEIN (*vena*) *Anat.* शीर *f*, नाडी *f*, धमनी *f*; *Bot.*, small rib or the branch of the framework of leaves, &c. शीर *f*, दोरा; a cavity in the earth घळ *f*, बीळ *n*, खळगी *f*, इ० *f*; fissure चीर *f*, भेग *f*; peculiar temper तब्यत *f*, प्रकृति *f*.—VENAL *a.* शिरांचा, शिरांतला (blood).—VENOSE *a.* *Bot.* शिराळ, शिरांनीं भरलेला.—VENOUS *a.* शिरांचा; शिरांतला, शिरांचा (blood);—*Bot.* शिराळ.

VELOCITY (*velox*, *velocis*, swift) rapidity वेग, त्वरा *f*, जलदी *f*; rate of motion गतिमान *n*, वेग, गति *f*.

VELVET (*villus*, shaggy hair) मखमाल *f*.—*a.* मखमाली, मखमालीचा.

VENAL *a.* (*venus*, sale) to be bought for money पैशानें विकत घ्याया -मिळायाजोगा (services); mercenary लालुचखोर, लाचखोर (a judge).

VEND *v.* (*vendere*) विकणें [it is applicable only to small articles; we never say, to v. a farm or a horse]. -ER विकणारा. -IBLE *a.* विकण्याजोगा, क्रेय.

VENEER *v.* *Ger.* फर्द जोडणी क.

VENERATE *v.* (*venerari*) मान राखणें -ठेवणें -क.: we v. parents and elders.—VENERABLE *a.* मान्य, पूज्य, आर्य.—VENERATION पूज्यबुद्धि *f*, मान्यता *f*, श्रद्धा *f*; मान, सन्मान.

VENEREAL *a.* (*venerius*, from *Venus*, goddess of love) relating to sexual intercourse संभोगाचा, मैथुनाचा; arising from sexual intercourse उपदंशाचा, गर्मीचा, वीसनखीचा (disease); adapted to the cure of venereal diseases गर्मीचा, गर्मीचा रोग बरा होण्याचा -करण्याचा (medicines); adapted to excite venereal desire कामोत्तेजक.—VENERY रतिसुख *n*, संभोग.

VENERY* (*venari*, to hunt) शिकार *f*, मृगया *f*, पारध *f*.

VENETIAN *a.* *F.* वेनिस शहराचा; v. blind खिडकीच्या झिळमिळ्या *f pl*.

VENGEANCE (*vindicare* to avenge) प्रतिकार, प्रतिक्रिया *f*; to take v. सूड उगवणें [for]. —VENGEFUL *a.* अकसखोर, खुनसी.

VENIAL *a.* (*venia*, pardon) क्षमा करायाजोगा, क्षम्य (fault); allowed परवानगीचा, अनिषिद्ध, मोकळीक दिलेला; [v. sin, *Rom. C. Theol.*, a sin which weakens, but does not wholly destroy, sanctifying grace, like mortal or deadly sins].

VENISON (*venari*, to hunt) हरणाचें मांस *n*, मृगमांस *n*.

VENOM (*venenum*) poison विष *n*, जहर *n*; malice अकस, खून. -OUS *a.* विखारा, जहरी, - विषयुक्त.

VENT (*ventus*) दार *n*, वाट *f*, द्वार *n*; publication प्रसिद्धि *f*, फूट *f*;—of a fire-arm काना.—for water उघडी *f*, दार *n*; give v. to बाहेर सोडणें -जाऊं देणें; काढणें, ओतणें (anger); to take v. उघड होणें, फुटणें.—*v.* सोडणें, मोकळा क.—VENTILATE *v.* वारा सोडणें -घेणें -देणें, वाऱ्याचा संचार होईसा क.;

winnow उफणणें, पाखडणें, असडणें; sift and examine चाळून पाहणें, हुडकणें.—Ventilator वारा आंत घेण्याची किंवा खराब हवा बाहेर काढून टाकण्याची युक्ति *f* -चें यंत्र *n*.

Ventral *a.* (*venter*, the belly) पोटाचा.—Ventricle हृदाचें विवर *n*.—Ventriloquism, the art of speaking in such a manner that the voice appears to come, not from the person, but from some other place गारूडवाणी *f*.—Ventriloquist गारूडवादी.

Venture (See Adventure) hazard जोखीम *n*, खत्रा *f*; chance नशीब *n*, दैव *n*; at a v. तवकताल्यानें.—*v*. जोखमांत घालणें -पाडणें; नशीबावर टाकणें.—*i*. जोखीम पत्करणें -उचलणें [for]. -some *a*. साहसी, जोखीम उचलणारा; daring हिय्यादार, हिंमतदार.

Venus (*L.*) the goddess of female beauty रति *f*;—the planet शुक्र.

Veracious *a.* (*verax*) observant of truth सत्यवादी -भाषी -वचनी; true खरा, सत्य.—Veracity खरेपणा, सत्यशीलता *f*.

Veranda *Per.* ओसरी *f*, पडवी *f*, ओटी *f*.

Verb (*verbum*, a word) क्रियापद *n*; active v. सकर्मक क्रि॰ *n*; neuter v. अकर्मक क्रि॰ *n*; root of a v. धातु; table of *verbs* धातुपाठ. -al *a*. बिनलेखी, तोंडचा, मुखजबानी (message, contract, testimony); शब्दास शब्द असा (translation); शब्दाचा, शाब्दिक (dispute); v. noun धातुसाधित नाम *n*. -ly *ad*. तोंडानें; शब्दशः. -atum (*L.*) अक्षरशः, शब्दशः.—Verbose *a*. शब्दविस्ताराचा, पाल्हाळाचा.—Verbosity शब्दविस्तार, पाल्हाळ.

Verdant *a.* (*viridis*, green) हिरवळीचा, निळवटीचा, सबजीचा; raw कोवळा, कच्चा, कोवळ्या बुद्धीचा (youth).—Verdancy हिरवेपणा; कोवळेपणा.

Verdure (do.) हिरवळ *f*, निळवट *n*, हिरवें *n*.

83 D

Verdigris *F.* कलंक, जंग.

Verdict (*vere*, truly, *dictum*, a word) *Law*, जुरीचा अभिप्राय -ठराव; decision ठराव, फैसला.

Verge (*virga*, a rod) काठी *f*.

Verge *v. i.* (*vergere*) tend towards झुकणें, कलणें; border upon किनाऱ्यावर येणें -असणें, -च्या घरांत असणें -येणें: he is *verging* on seventy [on, upon].—*n*. कांठ, किनारा, कड *f*.

Verity (*verus*, true) खरेपण *n*, सत्य *n*; true assertion सत्यप्रतिज्ञा *f* -भाषण *n*.—Veritable *a*. खरा, सत्य.—Verify *v*. खरा -सत्य -शाबूत करून देणें; to be *verified* प्रचितीस येणें, पटणें [by].—Verily *ad*. खरोखर, वास्तविक; खचीत, निश्चयानें.

Vermicelli (*vermis*, a worm) शेवया *f pl*.—Vermicular *a*. क्रिमीसारखा, क्रिमिवत्.—Vermiform क्रिमिरूप.—Vermilion हिंगूळ;—the color हिंगळ्या -हिंगुळ्या रंग.—Vermin किडा, कीड *f*, मुंगी *f*, जीव, ढेंकूण, पिसूं *n*, चिलट *n*, इ॰.

Vernacular *a.* (*verna*, a native) देशीय, मुलकी, in comp. स्व, जन्म.—*n*. देशीय -देश -जन्मभाषा *f*, स्वभाषा *f*.

Vernal *a.* (*ver*, spring) वसंताचा; वसंतऋतूंत होणारा, वसंतोद्भव, in comp. वसंत (flower); belonging to youth तारुण्याचा, यौवन.

Veronica (*L.*) [a portrait of the face of our Savior on handkerchiefs].

Versatile *a.* (*versare*, to turn around) changeable चंचल, अस्थिर; turning with ease from one thing to another चपल बुद्धि, अष्टावधानी.—Versatality चांचल्य *n*; चपलबुद्धि *f*, चापल्य *n*, चलाखी *f*.

Verse (do.) metrical line चरण, पद *n*; metrical composition कविता *f*, कवन *n*, पद्य *n*; short division of a prose composition

ओवी *f*;—of a poem श्लोक, कडवें *n*, इ० ; blank v. मुक्तप्रास; prose and v. गद्य पद्य *n*. —VERSED निपुण, निष्णात, अभिज्ञ, वाकब, तरबेत, हुशार [in].—VERSIFY *v. i.* पदरचना क.—*t.* श्लोकांत उतरणें,-चें कवन क., श्लोकबद्ध क.—VERSIFICATION काव्य -श्लोकरचना *f*.—VERSION भाषांतर करणें *n*; translation भाषांतर *n*, तरजुमा.

VERTEBRA (*L.*) मणका (पाठीचे कण्याचा).—VERTEBRAL *a.* मणक्याचा.

VERTEX (*L.*) कळस, माथा; zenith उच्च दिशा *f*, ऊर्ध्व.—VERTICAL *a.* डोक्यावरचा; खमध्यस्थ; upright उभा.

VERTIGO (*vertere*, to turn) तिरमिरी *f*, घेरी *f*, भोंवळ *f*.

VERY *a.* (*verax*, true) खचीत, खरा, सत्य, वास्तविक; तोच, हाच : his v. friend.—*ad.* बहुत, फार, अति.—VERILY *ad.* सत्य, वास्तविक, खचीत.

VESICLE (*vesica*, a bladder) फोड, फुटकुळी *f*.—VESICULAR *a.* फुटकुळीचा; hollow पोकळ.

VESPER (*L.*) the evening star शुक्र; evening संध्याकाळ.—*n. pl.* रोमनक्याथोलिक लोकांचें संध्याकाळचें भजन *n*.

VESSEL (*vas*) भांडें *n*, पात्र *n*; a ship गलबत *n*, जहाज *n*; tube for containing and conveying blood or sap वाहिनी *f*, नाडी *f*.

VEST (*vestis*, a garment; *Skr. vâsas*; *vas*, to be clothed) जामा *f*, झगा; waistcoat बंडी *f*, 'वासकुट' *n*.—*v.* वस्त्र नेसविणें; अधिकाराचीं वस्त्रें नेसविणें -परिधान करविणें; *Law*, clothe with possession स्वामित्व -सत्ता देणें. -MENT. -URE वस्त्रप्रावरण *n*; पेराव, पोषाक.

VESTA (*L.*) रोमन लोकांची एक देवी होती; एक ग्रह आहे.

VESTIBULE (*vestibulum*) देवडी *f*, ओटी *f*.

VESTIGE (*vestigium*) ठाव ठिकाणा, माग; footstep पदांक, पाऊल *n*.

VETCH (*vicia*) कुळीथ *n*, हुलगा.

VETERAN *a.* (*vetus*, *veteris*, old) फार वहिवाटलेला -वापरलेला, व्यवहारवृद्ध, जुना (soldier). —*n.* फार दिवसांचा -जुना शिपाई.

VEX *v.* (*vexare*, to shake) make angry by little provocations चाळवणें, खिजवणें, चिढवणें, संतापवणें, मर्जी मोडणें; plague उपद्रव -त्रास देणें [with]. -ATION इतराजी *f*, नाखुशी *f*, चिरड *f*; उपद्रव, त्रास, इजा *f*, तसदी *f*. -ATIOUS *a.* चेतवणारा, संतापवणारा; खडतर, खचरट. -ED खट्टु, खप्पा, नाखुशी; बेजार, कष्टी; to be v. त्रासणें.

VIAL (*Gr. phialé*) शिसी *f*, कुपी *f*.

VIAND (*vivere*, to live) पदार्थ, पक्वान्न *n*; delicate मिष्टान्न *n*, मिष्ट पदार्थ.

VIBRATE *v. i.* (*vibrare*) move to and for झुलणें, झोके खाणें; sound वाजणें, नादाविणें; pass from one state to another एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाणें.—VIBRATION झोका, झोला; undulation आंदोलन *n*.

VICAR (*vicarius*) deputy प्रतिनिधि; incumbent of appropriated benefice धर्मोपाध्या. -AGE धर्मोपाध्याची वृत्ति *f*.—VICARIOUS *a.* दुसऱ्याचे वाटचा, प्रतिनिधीचा (power); दुसऱ्या करितां केलेला -भोगलेला, बदलीचा : the v. work of the Great Deliverer; दुसऱ्या करितां भोगणारा -करणारा (agent).

VICE (*vitium*) defect ऐब *n*, खोड *f*; moral fault दुराचरण *n*, पापाचरण *n*, दुर्गुण, दुर्व्यसन *n*. —VICIOUS *a.* वाईट, दुराचारी; व्यसनी, दुर्गुणी, खोडकर.—VITIATE *v.* भ्रष्ट क., बिघडणें; cause to fail बातल -पोकळ -रहित क. [by].

VICE *F.* शेगडा; hand v. हात शेगडा.

VICE-ADMIRAL (*vice*, instead of, & *admiral*) जहाजावरचा, दुय्यम अधिकारी.

VICEGERENT प्रतिनिधि, नायब.—*a.* प्रतिनिधीचा, प्रतिनिधीच्या अधिकाराचा.

VICE-PRESIDENT उपाध्यक्ष.

VICEROY *F. L. & Eng.* राजप्रतिनिधि, 'वैसराय', नवाब. -ALTY राजप्रतिनिधित्व *n.*

VICINITY (*vicinitas*) जवळपणा, नैकट्य *n*; neighbourhood शेजारचा -जवळचा प्रदेश, शेजार.

VICISSITUDE (*vicis*, change) पालट, फेरफार; alternation आळीपाळी *f*, अनुक्रम, अनुवृत्ति *f*; *vicissitudes* of life, fortune उलटापालट *f*, रहाटगाडगें *n*, संसारचक्राचा फेरा.

VICTIM (*victima*; fr. *viere*, to bind) a living being sacrificed to some deity, or in the performance of a religious rite बळी; a person or thing destroyed or sacrificed in the pursuit of an object, or gratification of a passion बळी, बळ *f.* [of, to].

VICTOR (*vincere*, to vanquish) जिंकणारा, विजयी, जयवंत [over, at]. -IOUS *a.* विजयी, जयवान, जयवंत (troops); productive of victory जयावह, जयकर, जयप्रद (day); indicating victory जयाचा, जयसूचक -दर्शक (wreaths) [in].—VICTORY जय, विजय, फत्ते *f*; proclamation of v. जयघोष; record of v. furnished by defeated party जयपत्र *n*; glory of v. जयश्री *f*; shout of v. जयघोष -ध्वनि शब्द गजर, जयजयकार.

VICTUALS *pl.* (*victualis*, fr. *vivere*, to live) खाणें *n*, आहार, भक्ष्य *n.*—*v.* अन्नाची बेगमी करून ठेवणें.

VIE* *v. i.* स्पर्धा -बरोबरी क., सरलावणें [with]. —*t.* स्पर्धेनें क.; urge आग्रह -निकट लावणें.

VIEW *v.* (*videre*) survey पाहणें, लक्ष लावणें, टेहळणें; consider विचार क.—*n.* पाहणें *n*, दृष्टि *f*, अवलोकन *n*; विचार, पाहणें *n*; reach of the sight दृष्टीचा टप्पा, दृष्टिपात; scene दृष्टीखालचा देश; opinion मत *n*, संमत *n*, समजूत *f*; design उद्देश, आशय, मतलब; appearance देखावा, दर्शन *n*; in one point of v. एकपक्षीं.

VIGIL (*L.*) जागरण *n*; waking for religious exercises जागरण *n*, जागर. -ANCE उजागरा, जागरण *n*; watchful circumspection सावधगिरि *f*, हुशारी *f*. -ANT *a.* जागरूक, जागरा; सावध, हुशार, जागृत (1 Pet. v. 8.)

VIGOR (*vigere*, to be lively) physical force बळ *n*, कुवत *f*; energy धमक *f*, दम, उत्साह; strength or force in animal or vegetable nature रस, कस, जोर, जीव, ऐवज. -OUS *a.* जोरदार, बळकट; चिवट, जिवट; धमकीचा, झपाट्याचा, दमाचा.

VILE *a.* (*vilis*) base वाईट, नीच, खराब, ओंगळ, गदळ (things); वाईट, दुष्ट, नीच खट (person).—VILIFY *v.* बदनामी क., कलंक -बट्टा लावणें.

VILLA (*L.*) बागेंतला बंगला, हवेली *f*.

VILLAGE (do.) गांव *n*, खेडें *n*, खेडें गांव *n*; a v. of which the houses are scattered; also a detached v. फूट गांव; incidental v. expenses सादिलवार खर्च; a number of *villages* viewed collectively पुठा.—*a.* खेडे गांवचा, खेड्याच्या.—VILLAGER गांवकरी.

VILLAIN (*villa*, a farm) सोदा, लुच्चा, हरामी. -OUS *a.* खट, खल, शठ; सोदेगिरीचा, लुच्चाईचा (action).—VILLAINY लबाडी *f*, लुच्चेगिरि *f*, सोदेगिरि *f*; सोदेगिरीचें काम *n*, लुच्चेगिरी *f*, हरामखोरी *f*.

VINCIBLE *a.* (*vincere*, to conquer) जिंकण्याजोगा, जेय.

VINDICATE *v.* (*vindicare*) assert स्थापणें, खरा करून देणें, पुरवणें; justify दोष उडवणें, न्यायी ठरविणें [from, by].—VINDICATION स्थापना *f*, प्रतिपादन *n*; स्थापणें *n*, पुरवणी *f*, दोषनिवारण *n.*—VINDICATIVE *a.* सूड उगविणारा; सूड उगविण्याचा.

VINE (*vinum*)—the plant द्राक्षाचा वेल, द्राक्षी *f*; creeper वेल, ताणा; vinegar शिरका. -YARD द्राक्षाचा मळा, द्राक्षमळा.—VINOUS

a. द्राक्षरसाच्या गुणाचा, द्राक्षाचे दारूचा (taste).

VIOL, VIOLIN *F.* सारंगी *f.* -IST सारंग्या.

VIOLATE *v.* (*violare*) injure जुलूम क., नाहक दुःख देणें; profane मोडणें, उल्लंघणें, भंग क.; ravish बाटविणें, बळजोरीनें भोगणें, हठसंभोग क.; [by].—VIOLATION बलात्कार, जुलूम; भंग, भंजन *n,* उल्लंघन *n;* हठसंभोग.—VIOLABLE *a.* मोडायाजोगा, उल्लंघनीय.—VIOLENCE जोर, वेग, तडाखा, नेट; बलात्कार, जबरी *f;* vehemence जोर, आवेश; जुलूम, हठसंभोग; personal v. दंडपारुष्य *n.*—VIOLENT *a.* जोराचा, वेगाचा, प्रचंड (wind); जुलमाचा, जबरीचा (deeds); अनर्थाचा, कहराचा; produced by force जबरीनें केलेला, जुलमाचा, जबरीचा; v. measures जुलम जास्ती *f;* v. death अपघाताचें मरण *n.*

VIOLET (*viola*) वनफशा.—*a.* लाल व निळ्या रंगाचा, रक्तनीळ.

VIPER (*vipera,* fr. *vious,* alive, *parere,* to bring forth) एक विखारी जातीचा सर्प; a malignant person दुष्ट, मनुष्य, कृष्ण सर्प.

VIRGIN (*virgo*) a woman who has had no carnal knowledge of man कुंवार *f,* कुमारी *f; Astron.* कन्यारास *f.*—*a.* शुद्ध, चोख (gold); कुमारी योग्य; मर्यादशील, सलज्ज. -ITY कौमार्य *n,* कुंवारपण *n.*

VIRILITY (*vir,* a man) पुरुषपणा, पौरुष *n;* power of procreation पुरुषत्व *n,* चेतना *f.*

VIRTUE (*virtus,* strength) बळ *n,* शक्ति *f;* efficacy गुण, तेज *n,* सत्व *f;* worth गुण, सद्गुण; uprightness नेकी *f,* भलाई *f;* female chastity सतीत्व *n;* by v. of -प्रत्वें करून; path of v. सन्मार्ग.—VIRTUOUS *a.* सद्गुणी, नेकीचा, भला, सत्वशील; सती, साध्वी. v. person सज्जन; v. wife सती *f,* साध्वी *f.* —VIRTUAL *a.* कामाचा, गुणाचा; being in essence वस्तुसदृश, वास्तविक. -LY *ad.* कार्य -गुणदृष्टीनें.

VIRULENT *a.* (*virus,* poison) जालीम, जहाल, कडक; malignant खुनसी, दुष्ट भावाचा.—VIRULENCE जहाली *f,* तलखी *f;* दुष्ट भाव.

VISAGE (*visus,* a look) चेहरा, मुखवटा, रूप *n.*

VISCERA *pl.* of viscus (*L.*) आंतडीं *n pl,* पोटांतले अवयव *pl.*

VISCID *a.* (*viscum,* birdlime) चिकट, चिकचिकीत. -ITY चिकटपणा, चिकटाई *f.*

VISCOUNT (*vice,* in the place of, *comes,* a companion) a nobleman next in rank below an earl एक उमरावाची पदवी आहे, 'वैकौंट.'

VISCUS (*L.*) आंतडीं *n pl,* अंतरावय *pl.*

VISIBLE *a.* (*videre,* to see) पाहाया जोगा, दृष्टिगोचर, दृश्य; open उघड, उघडा [to]. —VISIBILITY दृष्टिगोचरता *f,* उघडपणा.—VISION, act of seeing पाहणें *n;* actual sight दर्शन *n;* faculty of seeing दृष्टि *f,* नजर *f;* object of right दृष्टीचा विषय; supernatural, prophetic, or imaginary sight दृष्टांत, दर्शन *n;* phantom आभास, छाया *f.* -ARY *a.* मनःकल्पित, मानसिक (project); given to reverie लहरी, मनमान्या, छांदिष्ट, छांदसवृत्ति.

VISIT *v.* (do.) go or come to see पाहायाला -दर्शनाला -भेटीला जाणें -येणें, भेट घेणें; go for examination तपासायाला -पाहणी करायाला जाणें.—*i.* भेटीस जाणें -येणें.—*n.* भेटीकरितां जाणें *n,* दर्शनयात्रा *f;* पाहणी करायास जाणें *n.* -ATION भेट घेणें *n;* भेट *f;* ईश्वरी दृष्टांत, दर्शन *n;* retribution प्रतिक्रिया *f,* कर्म फळ *n.* ईश्वरीक्षोभ. -OR भेट घेणारा; पाहणी करणारा, चौकसनीस, 'विजिटर.'

VISOR (do.) मुखवटा, मुखटोप; the forepiece of a cap, projecting over, and protecting the eyes.

VISTA *It.* view through an avenue, or the trees, or other things that form the

avenue दुतर्फी झाडें वगैरेच्या मधला देखावा किंवा रस्ता.

VITAL *a.* (*vita,* life) जिवाचा, प्राणाचा (powers); necessary to life प्राणरक्षक, जीवनोपयोगी, in comp. प्राणः v. air प्राणवायु; living जिवंत, सजीव (spirits); being the seat of life जिव्हाळीचा, प्राण राहण्याचा; essential अगत्याचा, जरूरीचा, अवश्यकः a competence is v. to content. -ITY जीव, चेतना *f,* प्राणशक्ति *f.*—VITALS *pl.* जिव्हाळी *f,* मर्मस्थान *n.*

VITIATE (See under VICE).

VITRIOL (*vitrum,* glass) blue v. मोरचूत *f;* white v. सफेद मो॰; green v. हिराकस.

VITUPERATE *v.* (*vitium,* a fault, *parare,* to prepare) दोष लावणें, बोल लावणें.—VITUPERATION दोष लावणें *n;* दोष, बोल.

VIVACIOUS *a.* (*vivere,* to live) उल्हासी, आनंदी. -NESS.—VIVACITY आनंद -उल्हासवृत्ति *f,* तेज *n.*—VIVID *a.* bright ठळक, उजळ (colors); lively लकलकीत, चकचकीत (imagination).—VIVIFY *v.* जीव देणें -घालणें, सजीव क.—VIVIPAROUS *a.* producing young in a living state जरायुज.

VIZ (contr. of *videlicet*) म्हणजे.

VOCAL *a.* (*vox, vocis,*voice) वाणीयुक्त; uttered by the voice वाचेचा, वाणीचा (prayer); sonorous सनाद. -LY *ad.* वाणीनें, शब्दानें.—VOCABLE शब्द.—VOCABULARY शब्दकोश, -संग्रह.—VOCATION, call बोलावणें *n,* आमंत्रण *n;* calling उद्योग, धंदा, वृत्ति *f.*—VOCATION *Gram.* संबोधन *n.*—*a.* बोलावण्याचा, हाक मारण्याचा; संबोधक.—VOCIFERATE *v. i.* गोंगाट -गलबला -कलकल क.—*t.* मोठयानें उच्चार क.—VOCIFERATION गलबल *f,* गोंगाट.—VOCIFEROUS *a.* गोंगाटया, कलकल्या.—VOICE, sound uttered by the mouth आवाज, स्वर, कंठ; power of utterance वाचाशक्ति *f,* वाचा *f;*—in singing गळा, कंठ; language भाषण *n;* बोलणें *n;* vote मत *n;* *Scrip.,* command आज्ञा *f,* वाणी *f* (Deut. viii. 20); *Gram.* पद *n;* active v. परस्मैपद *n;* middle v. आत्मनेपद *n;* passive v. भाववाच्य *n.*

VOGUE *F.* वहिवाट, प्रचार *f,* प्रघात.

VOID *a.* (*viduus,* widowed) empty रिकामा, रिता, पोकळ; destitute रहित, शून्य, हीनः (Prov. xi. 13; Acts xxiv. 16); vain व्यर्थ, निर्जीव, फुसका, पोकळ, निरर्थकः lifeless idol, v. and vain; *Law,* of no legal force निरर्थक, रद्द, बातल [of].—*n.* शून्य *n,* पोकळी *f.*—*v.* रिकामा क., सोडणें, टाकणें, उत्सर्ग क. (excrements); रद्द -बातल -निकामी क. (an oath).

VOLATILE *a.* (*volare,* to fly) उडून जाणारा, वायुरूप होणारा, वायुरूपानें जाणारा; fickle चंचल, चंचळ स्वभावाचा (temper).

VOLCANO *It.* ज्वालामुखी *f,* ज्वलत्पर्वत.—VOLCANIC *a.* ज्वालामुखीचा (heat); ज्वालामुखीपासून उत्पन्न झालेला; ज्वालामुखीनें पालटलेला -विकार पावलेला.

VOLITION (*volo, velle,* to will) इच्छा *f,* मन *n;* exercise of the will योजना *f,* संकल्प; the power of willing इच्छा शक्ति *f,* संकल्प, संकल्पशक्ति *f.*—VOLITIVE *a.* इच्छेचा, संकल्पशक्तीचा, संकल्पयुक्त.

VOLLEY *F.* a flight of shot गोळ्यांचा पाऊस, -ची वृष्टि *f,* शिलक -ख *f,* सरबत्ती *f;* burst or emission of many things at once वृष्टि *f,* पात, लाखोली *f,* ताशेरा.

VOLUBLE *a.* (*volvere,* to roll) चपळ, लुबलुब हलणारा; fluent जिभेचा चपळ, जाबसाली, वाक्चपल.—VOLUBILITY चपळाई *f;* वाक्चापल्य *n.*—VOLUME, book पुस्तक *n;* part of a book पुस्तकाचा भाग, पुस्तक *n,* खंड *n,* कांड *n,* गुच्छ इ॰; roll वेंटोळें *f,* भेंडोळें *n;*

—of a serpent वेटाळें *n*, पेंडोळें *n*;—of fire झोत, लोळ; dimensions आकार मान: the v. of an elephant's body.—VOLUMINOUS *a.* बहुत ग्रंथांचा; ग्रंथविस्ताराचा; बहुत ग्रंथ लिहिलेला; बहुत वेंटाळ्यांचा.

VOLUNTARY *a.* (*volo, velle,* to will) स्वतंत्र, इच्छेचा, इच्छेपासून निघालेला, ऐच्छिक (action); done by design संकल्पपूर्वक, संकल्पाचा, इराद्याचा: if a man kills another by lopping a tree, it is not v. manslaughter; spontaneous आपखुशीचा, स्वसंतोषाचा, ऐच्छिक, काम्य (service); endowed with the power of willing इच्छावान्-विशिष्ट-संपन्न: man is a v. agent; subject to the will इच्छाधीन, वश: v. motions of an animal; *Law,* according to the will consent, or agreement of a party राजीखुशीचा, आत्मसंतोषाचा, स्वसंतोषाचा, कबुलाती -करारा प्रमाणें.—VOLUNTARILY *ad.* आपखुशीनें, स्वसंतोषानें, इच्छापुरस्सर.—VOLUNTEER आपल्या खुशीनें चाकरी करणारा; [*Mil.,* one who enters into service voluntarily, but when in service is subject to discipline and regulations like other soldiers].—*v.* आपण होऊन देणें -करणें -द्यायास -करायास काढणें: to v. one's services [for].—*i.* आपण होऊन पुढें होणें, राजीखुशीनें (काम -चाकरी) पत्करणें: he *volunteered* in that undertaking.

VOLUPTUOUS *a.* (*voluptas,* pleasure) गुलहौसी, विषयी, चैनी, विषयासक्त, क्रीडासक्त; luxurious ऐषआरामाचा, विषयाचा.—VOLUPTUARY विषयलुब्ध -चैनी -हौसी मनुष्य, खादूनंदन.

VOMICNUT (*nux vomica*) कुचला, काजरा.

VOMIT *v.* (*vomere*) ओकणें, ओकून टाकणें -पाडणें [up].—*i.* ओकणें, वमन -उलटी होणें.—*n.* उलटी *f,* वांति *f;* *Med.,* emetic उलटी *f,* उलटीचें औषध *n.* -IVE, -ORY *a.* उलटीचा. वमनकारक.

VORACIOUS *a.* (*vorare,* to devour) खादाड, अधाशी.—VORACITY अधाशीपणा, खायखाय, *f,* वखवख *f.*

VORTEX (*L.*) भोंवरा (पाण्यांतला).—VORTICAL *a.* भोंवऱ्या सारखा, चक्राकार (motion).

VOTARY (*vovere,* to vow) भक्त, उपासक, परायण [to].

VOTE (*votum,* a vow) मत *n,* संमति *f.*—*v. i.* संमति देणें [for, in, against].—*t.* संमतीनें निवडणें (candidate); समतीनें देणें -ठरवणें: Parliament *voted* them a hundred pounds; the legislature *voted* the resolution unanimously.

VOUCH *v.i.*(*vox, vocis,* voice) साक्षी -निशा देणें, खातरी देणें [for]. -ER दाखला, जाबता, दस्तऐवज; खात्रीनें देणारा. -SAFE *v.* कृपा -मेहरबानी करून देणें; permit to be done without danger सुखरूप होऊंदेणें, निर्विघ्न करूंदेणें.—*i.* कृपा क.; मेहेरबान होणें; अंगीं लहानपणा घेणें [to].

VOW (*vovere, votum,* to vow) a solemn promise made to God or to some deity नवस, संकल्प; promise of fidelity आण भाक *f,* वचन *n;* under a v. व्रतबद्ध, संकल्पबद्ध [to].—*i.* नवस क.—*t.* नवसानें देणें, नवसणें, वाहणें; asseverate सत्य स्मरून बोलणें.

VOWEL (*vox, vocis,* a voice) स्वर, मात्रा *f.* short v. ऱ्हस्वस्वर; long v. दीर्घस्वर.

VOYAGE *F.* जलपर्यटन *n,* -यात्रा *f,* सफर *f.* [from, to].—VOYAGER सफरी, जलपर्यटन करणारा, जलयात्रिक.

VULGAR *a.* (*vulgus,* the multitude) belonging to the common people साधारण लोकांचा, अडाण जातीचा, कुणबाऊ; mean हलकट, पाजी; plebian कुणबाऊ, कुणबी चालीचा (speech).—*n.* अडाणजात *f,* तेली तांबोळी. -ISM अडाण बोली *f;* अडाणी चाल *f.* -ITY अनाडीपणा, अशिष्टाचार, असभ्यता *f.*

VULNERABLE *a.* (*vulnerare,* to wound) घाव घालायाजोगा, भेद्य; assailable हल्ला करायाजोगा; v. point मर्म *n*, वर्म *n* छिद्र *n*.

VULTURE (*vultur*) गिधाड *n*, गृध्र.

W

WABBLE *v. i. Ger.* डुलणें, डुलत फिरणें (a top).

WAD*, a little bundle, as of hay बिंडा, बिंडी *f*;—as of cloth under a load on the head चुंबळ *f*, आहरा;—of a gun जामीन. -DING बोळा, चोंदा;—for stuffing garment पुरणीचें चिरगूट *n*.

WADDLE* *v. i.* डुलणें, डुलत चालणें, हंसगतीनें चालणें [along].

WADE* *v. i.* walk through water, mud, sand, &c. पाण्यांतून -रेतींतून -चिखलांतून जाणें, पाय उतारानें जाणें; move with difficulty कष्टानें -श्रमानें जाणें -चालणें, रेंगत -रखडत चालणें [across, through].

WAFER *D.* a thin cake चांदकी *f*, पापडी *f*. —for letters चिकटायाची चांदकी *f*, वेफर' *n*; [a thin, leaf-like bread used by the Roman Catholics in the Eucharist].—*v.* वेफर लावणें -लावून बंद क.

WAFT *v. D.* तरंगत -वाहत नेणें [across, over].—*i.* तरंगणें, वाहत जाणें.

WAG* *v.* हालवणें, डोलविणें.—*i.* हलणें, डुलणें. —*n.* मस्कऱ्या, हंडीबाग, थट्टेबाज. -TAIL परटाणि *f*, खंजन पक्षी.—WAGERY थट्टेबाजी *f*, कौतुक *n*, मौज *f*.—WAGGISH *a.* मौज्या, विनोदी, थट्टेबाज.

WAGE* *v.* plague पण क., पैज मारणें; venture जोखमांत घालणें; carry on, as a war लढाई चालवणें.—*n. pl.* पगार, मुशारा, वेतन *n* [of, for].—WAGER पैज *f*, पण.—*v. t.* & *i.* पैज -पण क. -बांधणें -मारणें.

WAGON* (*Skr. vâha, vâhan*) गाडा, चौचाकी ओझ्याचा गाडा. -ER गाडेकरी, गाडाहांकणारा.

WAIL *v. i. Ir.* आक्रांत क., गळा काढून रडणें [for].—*t.* शोक -दुःख क.—*n.* आक्रांत, आक्रोश, विलाप.

WAIN* गाडा; *Astron.*, Charles's w. खाटलें बाजलें *n*, सप्त ऋषि *pl*. -SCOT भिंतीची तक्तपोशी *f*, पाटणी *f*.

WAIST* कमर *f*, कंबर *f*, कटि *f*;—of a mountain, vessel, &c. पोट *n*. -BAND कमरपट्टा; upper part of breeches, trousers, &c. नफा. -COAT बंडी *f*, 'वास्कुट' *n*.

WAIT *v. i. F.* stay in expectation वाट पाहणें, खोळंबून बसणें; tarry थांबणें, खोळंबणें; धीर धरणें; be in ambush दबा धरून राहणें; upon चाकरी -शुश्रूषा क.; समाचार घेणें [for].—*t.* -ची वाट पाहणें, आशा धरणें.—*n.* दबा; lie in w. लपून -दडून बसणें.—*pl* सकाळीं किंवा संध्याकाळीं गाणारे. -ER वाटपाहणारा, मार्ग प्रतिक्षा करणारा; धीर धरणारा, थांबणारा; चाकर, हुजऱ्या; salver अडणी *f*. -MAID दासी *f*, सैरंध्री *f*.

WAIVE* *v.* सोडणें, त्याग क., त्यागणें.

WAKE* *v. i.* not to sleep जागणें; sit up late for festive purposes ख्यालीखुशाली करित; जागणें; जागरण क.; awake जागा होणें; be active उद्योगास -कामास लागणें.—*t.* जागा क., उठवणें; excite चेतवणें, जागा क.; revive सजीव -पुनः जिवंत क.; set up, or watch with at night, as a dead body मेता जवळ जागत बसणें [up].—*n.* जागरण *n*; track left by a vessel in the water सांखळी *f*; in the w. of लागोपाठ -माग. -FUL *a.* जागरूक, सावध, जागा, जागृत.

WALK* *v. i.* move along on foot चालणें, पायांनीं चालणें; take one's exercise सहल -रपेट क., फिरणें; be abroad बाहेर असणें, मोकळें फिरणें: when was it she last *walked;* behave वागणें वर्तणें, चालणें; in आंत जाणें, घरांत जाणें; to w. after the flesh,

Script. विषय वासना बाळगणें, पापांत चालणें (Rom. viii. 1); to w. after the spirit देवाच्या आत्म्याच्या बोधानें आणि प्रेरणेनें आणि देवाच्या शास्त्रा प्रमाणें चालणें, सद्धर्माचरणानें वागणें (Rom. viii. 1); to w. by faith शुभवर्त्तमानावर विश्वास ठेवून आणि तारणा करितां ख्रिस्तावर अवलंबून राहणें, विश्वासानें चालणें (2 Cor. v. 7); to w. in darkness अज्ञान, भ्रम व पाप यांत तळमळत राहणें (1 John i. 6.); to w. in the flesh प्रापंचिक बुद्धीनें वागणें (2 Cor. x. 3); to w. in the light सद्धर्माचरण क. (1 John i. 7); to w. through the fire कष्ट -हाल सोसणें -भोगणें (Is. xliii. 2); to w. with God *Script.* ईश्वराच्या आज्ञा मानून त्याच्या समागमें चालणें.—*t.* मध्यें -वर -आंत चालणें -फिरणें: to w. the streets; cause to walk slowly हलक्या धिम्या चालीनें चालवणें; lead, drive, or ride with a slow pace चालीनें -हलक्या चालीनें -हळुहळु नेणें -हांकणें.—*n.* चाल *f*, पायचाल *f*, चालणें *n*; सहल *f*, रपेट *f*; पाऊल *n*, चाल *f*; manner of walking चाल *f*, पाऊल *n*, चालण्याची रीत *f* -ढब *f*; space for walking रपेटीची जागा *f*, विहारस्थान *n*; habitual place of action कामाचा अड्डा, अखाडा, कारखाना, फड इ०; sphere प्रकरण *n*, इलाखा, काम *n*; चालवणूक *f*, चाल *f*. -ING-STICK काठी *f*, हातांत धरायाची काठी *f*.

WALL* भिंत *f*; *pl.* fortification तटबंदी *f*;—of a village, &c. गांवकुसूं *n*; partition-w. पडदी *f*;—of one brick in thickness शिती *f*, चिरणी *f*;—of slight sticks plastered over कुड;—of stones loosely thrown up गडगा;—of a tent कनात *f*;—of a fort तट, कोट; gable w. चांदई *f*.—*v.* भिंत बांधणें [in, round]. -EYE कैरा डोळा (घोड्याचा).

WALLET *F.* पडशी *f*, धोकटी *f*;—of beggars झोळी *f*, चौपदरी *f*.

WALLOW* *v.i.*(*Skr.vulg*, to move one's self) लोळणें; live in filth or gross vice दुर्व्यसनांत गर्क असणें -पोहोणें -लोळणें [about, in].

WALNUT* अक्रोड *n*.

WAN* *a.* फिका, पिकूट निस्तेज.—*v. i.* निस्तेज होणें -दिसणें.

WAND *D.* small stick फोकाटी *f*, छडी *f*; staff of authority वेत्र, छडी *f*, काठी *f*, दंड: rod used by conjurers कांडी *f*.

WANDER* *v. i.* rove हिंडणें, भटकणें, इकडे तिकडे फिरणें; go astray भटकणें, चुकणें, बहकणें; —in speech रान घेणें, चांचरणें, वाट सोडणें; —minds, eyes, &c. भ्रमणें, तरळणें, देहावर नसणें [about, away, over, from]. -ER हिंडणारा, परिचारक, फिरणारा; चुकार, भटक्या.

WANE* *v. i.* decrease लहान -उणा होणें; decline उतरणें, उतरता पाय -दशा लागणें;—as the moon कला उतरणें; क्षय होणें.—*n.* कलाक्षय, तेजोऱ्हास; उतार, उतरता पाया -दशा *f*, क्षय.

WANT*, state of not having नसणें *n*, अभाव, ठणठणाट; lack कमताई *f*, वाण *f*, तोटा; need गरज *f*, अगत्य *n*, अपेक्षा *f*; poverty गरिबी *f*, अबाळ *f*, अनुपपत्ति *f*, हाल *pl*.—*v.* जवळ -पासीं नसणें, अभाव असणें, गरज -अगत्य असणें -लागणें; wish इच्छिणें.—*i.* कमी पडणें, तोटा येणें-असणें; omit गाळणें, सोडणें, चुकणें; not to be present हाजर नसणें: the jury was full, *wanting* one. -ING उणा, कमी; गैरहाजीर; रहित, वेगळा, कमी, शून्य: I shall not be w. in exertion [in, of].

WANTON *W.* frolicsome छंदी, विलासी, ख्याली; loose बेढंगी, सोदा, लुच्चा; lewd इष्की, विषयलंपट;—*a.* female चंचळ, चपळ. -NESS इष्कीपणा, इष्कबाजी *f*; कामबुद्धि *f*; सोदेगिरी *f*, लुच्चेगिरी *f*; विलास, कौतुक *n*, क्रीडा *f*; बेकैदपणा, स्वेच्छा *f*, स्वैरगति *f*.—*v.* काम -विलास -चेष्टा क.; मौजा क.; खेळणें.

WAR*, state of opposition विरोध, वैर *n*; armed conflict of sovereign powers युद्ध *n*, लढाई *f*.—*v*. युद्ध क. [on, with, against]. -CHARIOT रथ. -FARE लढाई बिढाई *f*, युद्ध *n*. -CRY रणघोष -गजर. -LIKE *a*. लढाऊ, रणशूर; लढाईचा, जंगी, युद्धप्रकरणी. -RIOR योद्धा, शूर, वीर, भट.

WARBLE *v*. *Ger*. गाणें; modulate कंप घेणें, खांचखोंच घेऊन गाणें, लकेरी मारणें; कंपित क. —*i*. कंपित होणें; कंप घेऊन गाणें: some birds w.—*n*. कंप, लकेरी *f*, गाणें *n*.

WARD* *v*. watch राखणें, रक्षण क.; off टाळणें, वारणें, निवारणें [off, against].—*n*. guard पहारा; one whose business is to guard पहारेकरी; custody दिम्मत *f*, कैद *f*, परज *f*; person under a guard दिमतींतला मनुष्य, दिमती; minor under the care of a guardian बाल; division of a town पेठ *f*, वाडा, चकला, पुरा, महल्ला इ०; [division of a forest, division of a hospital]. -EN, -ER रखवालदार, अधिकारी. -ROBE, -ROOM, where clothes are kept जामदारखाना; closet for hanging up clothes पांघुरणें टांगून ठेवायाचें कपाट *n*; wearing apparel पांघुरणें *n*, वस्त्रें *pl*.

WARE* माल, सौदा, जिन्नस: China w. चिनाई भांडीं *f pl*, व०; hardware लोखंडी सामान *n*. -HOUSE वखार *f*.

WARY* *a*. सावध, हुशार.—WARILY *a*. सावधगिरीनें, हुशारीनें.

